१८५१
म. ग्रं. सं. ठाणे
क्र. ११८

# ...त्रा भाग ४ था.

## ...स व समुद्र पर्यटण...

...विंद हरी फडके.

## ...ारधाम



श्रीजगन्नाथ.



श्री बद्रीनारायण.



...श्वर.



श्रीद्वारकाधीश.

REFBK-0004566

...मागील भागाप्रमाणें हाही भाग आबालवृद्ध स्त्रीपुरुषांचें मनोरंजन करून त्यांस ज्ञानदायक झाला आहे.

नकाशासुद्धां किं. २॥ रु. व्ही. पी. नें ३ रु. सुटा नकाशा ४ आणे

यात्रेकरूंनीं सुटा नकाशा जवळ अवश्य घ्यावा.

स. ग्रं. नं. ११३
ता. २५-१०-३१
ठाणे
नोंद नं. ६३८८
ठाणे

## सर्वोत्कृष्ट पण सर्वांत स्वस्त.

# बलवंत मुद्रणालय-रत्नागिरी.

छपाई संबंधींच्या कोणत्याही कामांत ग्राहकांना पुण्या-मुंबईची छपाई कोकणच्या अल्प किंमतींत करून देणें हेंच 'बलवंत' मुद्रणालयाचें वैशिष्ट्य असून मुंबईपासून मंगलोरपर्यंतच्या सर्व कोंकणपट्टींत 'बलवंत मुद्रणालया' एवढें एकही मुद्रणालय नाहीं ही एकच गोष्ट त्याच्या सर्व श्रेष्ठतेचा भक्कम पुरावा होय. आपण एकदां अनुभव घ्या ह्मणजे आमचे कायमचे ग्राहक व्हाल. अधिक माहितीकरितां चौकशी करा.

—व्यवस्थापक, 'बलवंत मुद्रणालय'—रत्नागिरी.

BEST YET CHEAPEST.

# माझी तीर्थयात्रा.

## भाग ४ था.

सं-प्र-५-३१३

## महाराष्ट्र प्रवास व समुद्र पर्यटण.

प्रवासाचे नकाशासुद्धां.

ग्रा. क्र. ४९६६

ग्रंथकार
गोविंद हरी फडके
माझी तीर्थयात्रा भाग १, २ व ३ यांचे कर्ते

REFBK-0004566

किंमत अडीच रुपये. व्हीं. पी. नें तीन रु.
सुटा नकाशा किंमत ०-४-०

माझी तीर्थयात्रेचा
भाग १, २, ३ व ४ हीं चारी पुस्तकें सुट्या नकाशासह एकदम घेतल्यास टपालखर्च माफ.

समुद्राची अवर्णनीय शोभा १८
त्याचें मध्यम स्वरूप २०
त्याचें रौद्र स्वरूप २१
बोटींची माहिती २१
तिची रचना २२
महाद्वीपांत जाणाऱ्या बोटी २५
आर्यांचें समुद्र वर्चस्व २६


## यात्रेचें वर्णन.


कान्हेरी २८
एका मित्रानें केलेलें स्वागत २८
लेण्यांचें वर्णन २९
वसईच्या मिठागरांतील मिठाचीं स्थित्यंतरें ३२
वसईच्या किल्ल्याची ऐतिहासिक माहिती ३४
तुंगार ३७
वज्राबाई ३८
शिवाजीला भवानी तलवार कशी मिळाली ३९
वज्राबाईचीं उन्हाळीं (तप्तकुंडें) ३९
सखाराम बुवा कवाडकर यांची समाधी ४०
निर्मळ ४०
विमल व निर्मळ या तीर्थांचे तलाव ४१
सोपाऱ्याचा प्राचीन इतिहास ४२
आगाशी व सुकेळीं ४३
अर्नाळा व किल्ला ४४
महालक्ष्मी ( कोळवणांतील ) ४६
एक चमत्कार ४७
एक नवल वाटण्यासारखी गोष्ट ४८
शुद्धाचाराचें रहस्य ४९
कांहीं साक्षात्कार ५०
चमत्कारीक नवस ५१
कोंकणचा प्रवास ५१
कनकेश्वर ५२
अकलेचें प्रदर्शन ५४
मिरचीं बोवा ५५
ईश्वरी साक्षात्कार ५६
स्वयंभू स्थानाचें कारण ५६
चौल ५७
श्री बल्लाळ विनायक ( पाली ) ५८
पौराणिक कथा ५८
पाका पक्षी ६३
सिद्धेश्वर ( पाली ) ६४
बापूजी देव ६४
वीरेश्वर ६४
येथील देवाचा साक्षात्कार ६५
अस्पृश्यतेचीं दैवी कारणें ६५
उन्हाळें ७१
उद्धर रामेश्वर ७२
जटायूचें घरटें ७३
मेढें ७४
जुनी उत्सव सरणी ७५
नांदगांव ७६
येथलि दंतकथा ७७
मुरुड ७८
देव पळाला ७९
रायगड ८१
अज्ञानांची समजूत ८२
किल्याचें स्थानमहात्म्य ८३
त्याची मांडणी ८४
हिरकणी ८५
टकमक ८७
जगदीशाचें मंदीर ८८
कुत्र्याची समाधी ८९
श्री हरिहरेश्वर ९०

सृष्टिजन्य आकृति ९१
येथील समुद्राची निरुपमेय शोभा ९२
मक्केचें विष्णुपद ९५
परशुरामाचा बाण ९६
**अस्सल कोकणची राहणी** ९६
निसर्ग सोयी ९७
लोकांची राहाणी ९८
सोंवळें ओंवळें १०३
राजकीय माहीती १०४
**परशुराम** १०५
धर्मरहस्याचीं कारणें सांगितलीं नाहींत १०८
**चुळें** १०९
समुद्राचीं नानाविध रूपें ११२
**रत्नागिरी** ११४
लोकमान्याचें जन्मस्थान ११५
सोमेश्वर ११६
**आडिवरें** ११८
ऋषींचे आश्रम ११८
**कनकादित्य** ११९
**राजापूर–गंगा** १२०
**पणजी ( गोवा )** १२४
**मार्भ गोवा** १२५
**गोकर्ण महाबळेश्वर** १२६
ताम्र गौरी १२९
एक गंभीर देखावा १३२
रंभांचें राज्य १३२
लोकांची वहिवाट १३७
**गैरसापाचा धबधबा** १३९
एक विलक्षण आंधळा १४०
धबधब्याची शोभा १४२
एक अधांत्र कडा १४४
एक अपूर्व दृश्य १४५
घाटाची शोभा व उपयुक्त वस्तु १४९
गोकर्णाची इतर माहिती १५१
**बेळगांव** १५३
दुधसागर–कॅसलरॉक–लोंढा १५४
शहापूर ( संस्थान व खालसांतील फरक ) १५५
**गोकाक** १५६
धबधब्याची शोभा १५७
**नरसोबाची वाडी** १५८
दगडी दरवाजे व नकशी काम १६०
भूत संचार १६१
**कोल्हापूर** १६४
असंख्य दगडी खांब १६७
मूळ भगव्या झेंड्याचें दर्शन १६९
जोतीबा १६९
संस्थानांतील गुप्त पोलिसांचा पराक्रम १७०
**औदुंबर** १७१
देवाचा साक्षात्कार १७२
**कऱ्हाड** १७४
प्रीतिसंगम १७४
कोळें नरसिंहपूर १७५
**जरंड्याचा डोंगर** १७६
अमृत संजीवनी १७७
**माहुली** १७८
शंकराचार्य–वेदव्यास–व वाल्मिकि यांचे फोटो १७८
संगम माहुली १७९
एक दगडी कामाचा उत्कृष्ठ नमुना १७९
**सातारा** १८०
महाराष्ट्र राज्यलक्ष्मीची स्थित्यंतरें १८०
एका पायाची बाई १८२
**परळी उर्फ सज्जनगड** १८३

समर्थांचा उपदेश १८४
नवीन सुधारकांचें गौडबंगाल १८७
स्वामी पंचायतन १९३
धावडशी १९५
ब्रह्मेंद्र स्वामीचें कर्तृत्व १९५
जुने व नवे साधूंचे मार्ग २००
वाई २०१
कृष्णाबाईचा उत्साह २०२
कीचक वधस्थान २०५
धोम २०६
मेणवली २०७
नाना फडणवीसांची कल्पकता २०८
प्राज्ञ पाठशाळा २१०
येथील नवी जुनी मतें २११
राष्ट्रीय शिक्षणाचा विचार २१६
महाबळेश्वर-पाचगणी २२१
क्षेत्र महाबळेश्वर व कृष्णेचा उगम २२४
महाबळेश्वराचें देऊळ २२६
ब्रह्मारण्य २२७
सावित्रीचें खोरें २२८
पौराणिक माहिती २२९
जेजुरी २३१
वाघ्या-मुरळ्या २३३
मोरेश्वर ऊर्फ मोरगांव २३४
सिंहगड २३६
राजाराम महाराजांची छत्री २३७
तान्हाजीचें पराक्रम स्थान २४०
देव टाकें व अल्लड तरुण मंडळी २४२
तरुणांस उपदेश २४३
पाषाण २४७
पाण्याचा तेजस्वीपणा २४८
रांजणगांव २४९
दहा सोंडा व वीस हातांचा गणपती २५०
लेण्याद्री २५२
शिवनेरी व शिवाई २५३
क्षेत्रस्थ भिक्षुकांच्या लीला २५५
पौराणिक कथा २५९
गणपतीच्या स्वरूपाचे सात्विक विचार २६०
सुडाचे कागद २६६
ओझर २६८
विघ्नेशाचें अविघ्नत्व २७१
थेऊर २७२
सतीचें वृंदावन २७४
एका सात्विक बाईचा सहवास २७५
केडगांव पंडिता रमाबाईचा आश्रम २७६
नारायण महाराजांचा आश्रम २७७
एका समारंभाचें वर्णन २८०
आश्रमांतील इतर व्यवस्था २८८
संस्थानांतील इमारती २९२
नारायण महाराजांची माहिती २९४
सिद्धटेक २९७
चिंचवड २९९
आळंदी ३०३
देहू ३०५
तळेगांव (दाभाडे) ३०८
कार्लें ३१०
खंडाळे ३११
मढ ३१२
भिमाशंकर ३१५
वैजनाथ व त्याचा जागृत महिमा ३१९
एक तेजस्वी ब्रह्मचारी ३२२
माथेरान ३२३

येथील हवेची स्थिति ३२५
बंगल्यांची शोभा ३२७
हॉटेलें ३३०
क्रीडांगणें ३३१
शर्यतींचें प्रदर्शन ३३२
देवळें व स्मशानें ३३६
मलंगड ३३९
नारायण सरोवर ३४२
बोटीची माहिती ३४५
बोटींतील लोकांची ओळख ३५०
ह्या प्रवासाची स्थानिक माहिती ३५२
एका नाटकशाळेचें वर्णन ३५८
एका ग्रामाधिपतीचें वर्णन ३६१
जुने शस्त्रास्त्राचें वैभव ३६२
मृगजळ ३६४
जंगली उंटांचे तांडे ३६८
सरोवराचें वर्णन ३६९
अंगलाई ३७२
जहाल व मवाळ वृत्ति ३७४
ह्या स्थानाचा हवेवर परिणाम ३७८
कोरटी सोमनाथ ३८१
सुटे पैसे न ठेविल्याचा परिणाम ३८४
सोमनाथाचें दर्शन व पूजेचा थाट ३८५
कृष्णावताराचे पर्यवसान ३८७
तपःश्चर्येचा उपयोग ३९०
अन्यायाचें पातक केव्हांतरी नडतेंच ३९३
या भूमीचें महत्व ३९४
एका श्रीमान व विद्वान यात्रेकरूची संगत ३९६
जोतिर्लिंगाची उत्पत्तिकथा ४००


## उपसंहार


भाग— १ ला
मनुष्याचा उत्पत्तिकाल व संक्रमण ४०१
लेखन कलेची उत्पत्ति ४०४
मनुष्याची देवाविषयीं कल्पना ४०५
भाग २ रा.
ह्या यात्रांपासून ऐहिक बोध ४०९
तात्विक यात्रा ४१०
भक्ति, ज्ञान व वैराग्य यांचा खुलासा ४१४
ओंकाराचें ( शब्दब्रह्माचें ) महत्व ४१६
या यात्रांची तपःश्चर्या ४१८
आत्मज्ञानी मनुष्याचा अधिकार ४२१
परमेश्वराची माया ४३१
यात्रांची फलश्रुती ४३३

# प्रस्तावना.

तिसऱ्या भागाच्या प्रस्तावनेच्या शेवटीं सांगितल्याप्रमाणें हा महाप्रयासानें चौथा भाग तयार झाला. महाप्रयास ह्मणण्याचें कारण त्याच्यावर फार अरिष्टें आलीं होतीं. तशांत चालू काळीं कसल्याही गोष्टीला स्थैर्य नाहीं. उद्योगधंदा व व्यापाराला नाहीं, व मनुष्यालाही नाहीं. पुष्कळ सुशिक्षित गृहस्थ, वर्तमानपत्रवाले, छापखानेवाले, शिक्षक, मोठे व्यापारी व स्वदेशाभिमानी देशहिताकरितां आपलें काम टाकून स्वदेशाश्रमांत ( राजकीय कैदेंत) अहमहमिकेनें जाऊं लागले. यामुळें हा ग्रंथ जवळजवळ दोन वर्षें पडून राहिला होता! पण हें " शिष्टागमनें अनध्यायः" सारखें झालें. त्याला इलाज नाहीं.

यांत वर्णन केलेल्या यात्रा इतर भागांप्रमाणें एकदम झाल्या नाहींत. कांहीं यात्रा करून पस्तीस चाळीस वर्षेंसुद्धां झालीं आहेत! त्यांचीं वर्णनें व जाण्याचे मार्ग त्या काळाला अनुसरून स्मरण करून लिहिले आहेत त्यांत हल्लीं थोडाबहुत बदल झाला असला, तरी त्यांचीं हीं वर्णनें उद्बोधक वाटल्यावांचून राहणार नाहींत असा भरंवसा आहे. मागील तिन्हीं भागांत मोठमोठ्या यात्रांचीं वर्णनें दिलीं आहेत. मोठ्या यात्रांचा अनुभव निराळा व लहानांचा निराळा. लहान यात्रांचा अनुभव थोडा तरी मिळावा ह्मणून त्या इतर भागांतील देतां आपल्या सोयीच्या अशा महाराष्ट्राच्याच दिल्या आहेत, त्यावरून दूर ठिकाणच्या यात्रांचीं कल्पना व अनुमान सहज येईल. अगदीं किरकोळ यात्रांचीं वर्णनें दिलीं नाहींत. लहान यात्रांचीं वर्णनें देण्याचें दुसरें कारण असें कीं, जरी त्या आज लहान दिसत आहेत तरी त्यांच्या साक्षात्कारावरून किंवा त्या ठिकाणच्या वर्णनावरून त्यांच्या वैभवकाळीं त्यांचा महिमा मोठा असलाच पाहिजे असा भास होतो. ठाणें जिल्ह्यांतील सोपारें व कुलाबा जिल्ह्यांतील वैजनाथ वगैरे अशाच उद्बोधक यात्रांचीं वर्णनें दिलीं आहेत. या सर्व यात्रा मागें पुढें केल्या असल्या तरी प्रवासाच्या सोयीकरितां त्याचें संगतवार वर्णन केलें आहे.

तिसऱ्या भागांत सर्व हिंदुस्थानचा नकाशा दिला होता. सबब या भागांत निराळा नकाशा द्यावा लागणार नाहीं, असें वाटलें होतें. पण त्या मोठ्या स्केलच्या

-नकाशांत लहान अंतराचीं स्थळें दाखवितां येईनात, आणि सप्रमाण नकाशा-शिवाय प्रवास करणें धोक्याचें व त्रासाचें आहे. कोणी ह्मणतील आह्माला महाराष्ट्राची माहिती आहे, निदान मुलांच्या भूगोलाच्या नकाशावरून हें काम सहज भागण्याजोगें आहे. पण हें त्यांचें ह्मणणें चूक आहे. यात्रा किंवा प्रवास करण्याच्या हेतूनें ते काढले नसल्यामुळें ते या कामीं उपयोगाचे नाहींत, असा अनुभव आल्यावरून मुद्दाम प्रयत्न करून हा नकाशा काढला आहे. महाराष्ट्रा बाहेरच्या लोकांना त्याचा उपयोग आहेच, पण महाराष्ट्रियांना सुद्धां पुष्कळ होईल असा भरंवसा आहे. चालू परिस्थितीप्रमाणें ग्रंथांत उद्बोधक चित्रें द्यावयाचीं खरीं पण ज्यावेळीं या यात्रा केल्या त्यावेळीं अशा प्रवास वर्णनाचीं पुस्तकें लिहिण्याचा हेतु नसल्यामुळें त्यांचा नाश झाला. आतां तशीं चित्रें मिळविण्याचा मीं पुष्कळ प्रयत्न करून पाहिला पण तीं तशीं मिळालीं नाहींत, याबद्दल माझा हिरमोड झाला. अशांपैकीं चित्र ह्मणजे गेरसप्पाच्या धबधब्याचें- हा धबधबा जगप्रख्यात कॅप्टन न्यूबोल्ट यानें ज्या भयंकर धोंड्या-वरून पाहिला होता, त्याच धोंड्यावरून मी हा धबधबा पाहिला आहे. त्याचें रसभरीत वर्णन मीं यांत केलें आहे. पण तो धोंडा ज्या चित्रांत दर्शविला आहे असें चित्र मला आतां कोठेंही मिळालें नाहीं, यामुळें त्या धबधब्याचीं इतर चित्रें दिलीं नाहींत. इतर चित्रांपैकीं धावडशीचे ब्रह्मेंद्र स्वामींचें चित्र भारत इतिहास संशोधकांतील ग्रंथांतून घेण्यास त्यांचे सेक्रेटरींनीं परवानगी दिली ह्मणून मी त्यांचा फार आभारी आहें. तसेंच बावा मलंगचे यात्रेस गेलों असतां तेथील व्यवस्थापक रा. महादेव नारायण वझे, कल्याणकर यांनीं मुद्दाम प्रेमपूर्वक ह्या बुकांत घालणेस त्या दरग्याचे दोन फोटो दिले. याबद्दल त्यांचाही मी फार आभारी आहें.

महाराष्ट्र आह्माला माहीत आहे. त्याच्या प्रवासांत व यात्रांत एवढें काय असणार, असें कांहीं ह्मणतील. पण हा ग्रंथ वाचल्यावर अतिपरिचयामुळें अवज्ञा झालेल्या महाराष्ट्राची खरी योग्यता त्यांस दिसून आल्याशिवाय राहणार नाहीं. इतकेंच नव्हे तर ह्यांत लिहिलेल्या यात्रा सवडीप्रमाणें तरी त्यांच्यानें केल्याशिवाय राहवणार नाहीं अशी खात्री आहे. मागील प्रत्येक भागाप्रमाणें हाही भाग अगदीं स्वतंत्र वृत्तीचा व तेजस्वी आहे अशी मार्मिक वाचकांची खात्री झाल्याशिवाय राहणार नाहीं.

वेदवाङ्मयाची रचना त्यांतील व्यवहार ती भाषा ह्मणण्याची रीति अगदीं स्वरासुद्धां कायम ठेवण्यांत त्या भाषा रचनेवरून व व्यवहारावरून त्या अज्ञात कालाचा कोणास कधीं तरी शोध लागल्यास पहावा हाच दिसतो. हा काळ ह्मणजे आद्य आर्यांचा ह्मणजे हें मनुष्य कुळ उष्ण प्रदेशांतून ध्रुव प्रदेशीं गेल्या पूर्वीची माहिती कोणी कोणाला कधीं शिकविली याचा पत्ता प्राचीन ऋषींना सुद्धां नव्हता. ह्मा गोष्टी मुख परंपरेनें आह्मांला मिळाल्या असेंच सर्व सांगत आले ह्मणूनच वेदांना अपौरुषेय ह्मटलें आहे असें दिसतें. नव्या स्थित्यंतराप्रमाणें जेव्हां जेव्हां व्यवहार बदलत गेले–ते विरुद्ध असले तरी–तसतसे प्रधान पुरुषांनीं ते धर्मग्रंथांत लिहून ठेवले पण जुने नाहींसे केले नाहींत हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. यामुळें बदललेल्या व्यवहाराची परंपरा कायम मिळते. धार्मिक ग्रंथांत परस्पर भिन्न मतें दृष्टीस पडतात त्याचें कारण हें आहे पण त्यामुळें नवीं मतें प्रचारांत आणण्यापूर्वी आपली जुनी परंपरा याविषयीं काय होती, चालू काळाला त्यांत किती बदल करणें आवश्यक व सोईचें आहे तें पहातां यावें व त्यामुळें त्या त्या अज्ञात काळाचा शोध लावण्यास त्याचा फार उपयोग व्हावा हेंच आहे. हल्लीप्रमाणें त्याचा दुरूपयोग करण्याकरितां नाहीं.

या यात्रांना खर्च काय लागला याचा टिकटिकाणीं थोडाबहुत उल्लेख केला आहेच. शिवाय खर्चाचें मान स्थलें, काल, मनुष्यस्वभाव. व प्रसंग यांवर पुष्कळ अवलंबून असल्यामुळें खर्चाचा तपशील देतां येत नाहीं. तरी तुमच्या खर्चाचें मान आह्माला कळवा ह्मणजे आह्माला आमच्या खर्चाचा अदमास करितां येईल असें पुष्कळांनीं विचारल्यावरून त्याचा थोडक्यांत खुलासा करितों.

पहिल्या भागाची यात्रा १९१६ सालीं केली. त्यावेळीं तीनशें रुपये लागले. यांपैकीं निम्मे हिमालयाच्या सर्व यात्रांना लागले व बाकीचे इतर यात्रांना लागले. दुसऱ्या भागाची यात्रा १९२५ सालीं स्वतंत्रपणें केल्यामुळें त्यास दीडशें रुपये खर्च आला. तिसऱ्या भागाची यात्रा १९२० सालीं केली तिला सहाशें रुपये खर्च आला. चौथ्या भागाची यात्रा निरनिराळ्या काळीं केली असल्यामुळें त्याचा आकार देतां येत नाहीं आणि हा भाग सर्वांच्या परिचयाचा असल्यामुळें त्याची तशी आवश्यकताही नाहीं. ह्मापैकीं गैरमाहीत अशा नारायण सरोवराची यात्रा १९२३ सालीं केली व त्यास पाऊणशें रुपये लागले

एवढें सांगितलें ह्मणजे पुरे. पांचव्या भागांतील यात्रेचा खर्च देण्याचें कारण नाहीं. तें मनुष्याच्या उत्पन्नाच्या सामर्थ्यावर किंवा वडिलार्जित गर्भ श्रीमंतीवर राहील.

यात्रा किंवा प्रवास ह्या दृष्टीनें या चारी भागांत सर्व यात्रांचें वर्णन करून यात्रांची ही बाजू पुरी केली आहे. पण ह्या यात्रांचा मूळ उद्देश मनुष्याची लोक-यात्रा ह्मणजे आयुष्य, कीं ज्याच्याकरितां परमेश्वरानें मनुष्याला जन्म दिला, तें सुखावह होणेंकरितां या यात्रांचा उपयोग आहे. ह्मणजे जेवणाराला जसें तोंडीलावणें, तशा मूळ लोकयात्रेच्या ह्या पूरक यात्रा आहेत. हें मूळ ध्येय नव्हे हें विसरतां कामा नये. याचा खुलासा पहिल्या भागांत स्पष्टपणें केला आहे. सबब त्या मूळ लोक यात्रेचें वर्णन–निदान दिग्दर्शन तरी केल्याशिवाय या विषयाची पूर्णता होणार नाहीं, सबब त्याला पांचवा भाग असें नांव देऊन ही सर्व सेवा जनतारूपी जनार्दनाची करून त्यालाच वाहून मुक्त होण्याचा विचार आहे. काय परमेश्वर करील तें खरें !

नेरळ<br>दशहरा शके १८५३.

गोविंद हरी फडके,<br>नेरळ, जिल्हा कुलाबा.

॥ ॐ ॥



# माझी तीर्थयात्रा

## भाग ४ था

## महाराष्ट्राचा प्रवास

### समुद्र व पर्यटण.

पहिल्या तीन भागांमध्यें इष्ट यात्रेची तयारी कशी करावी हें सांगितलें आहे. त्यापेक्षां ह्या भागांत आतां तयारी कशी करावी हें कांहीं सांगण्यासारिखें राहिलें नाहीं. तशांत हा प्रांत महाराष्ट्रच असल्यामुळें महाराष्ट्रीयांची सर्व प्रकारची यांत सोय आहे, व ठिकाणेंही आपल्या टापूंत असल्यामुळें त्या प्रवासाकरितां काय काय सोयी करून घ्याव्या हें ज्यांनीं त्यांनीं ठरवावें. शिवाय विशेष सूचना ठिकठिकाणीं केल्या आहेतच. आतां यांत समुद्रप्रवास असल्यामुळें त्याच्या तपःश्चर्येविषयीं मात्र विशेष सांगितलें पाहिजे. ही

### तपःश्चर्या

करणें म्हणजे मन, शरीर व बुद्धि हीं शिथिल झालीं असतील तर तीं इष्टकार्या करितां सामर्थ्यवान व बलवान होणें हें होय. त्याप्रमाणें ज्याची तपश्चर्या श्रेष्ठ

असेल व परमेश्वरावर भरंवसा ठेवून आत्मविश्वास उत्पन्न झाला असेल त्याप्रमाणें इष्ट कार्यांत यश येण्याचा व तें निर्विघ्नपणें पार पडण्याचा संभव अधिक मन सामर्थ्यवान होण्यास परमेश्वरावर पूर्ण भरंवसा पाहिजे. ह्मणजे त्या योगानें आत्मविश्वास उत्पन्न होतो, आणि खात्री होते कीं, प्रसंगीं सर्वांनीं जरी सोडलें तरी परमेश्वर मात्र अंतर देणार नाहीं. अशा रीतीनें मन जोरदार झालें ह्मणजे शारीर सामर्थ्यास दुजोरा येतो, व कार्यसिद्धीची पर्वा रहात नाहीं. आतां बुद्धि ही कर्मानुसारिणी आहे, तरी सन्मार्गानें यश येऊं लागलें ह्मणजे बुद्धि सात्विक होऊं लागते. पण दुर्दैवानें मार्ग चुकत गेल्यामुळें अपयश येत गेल्यास कोठून तरी श्रेष्ठत्व येण्यास बुद्धि वाममार्ग पतकरते. ह्मणून बुद्धि शुद्ध करण्याकरितां सुद्धां तिला विचारानें ईश्वरपरायण करावी. ह्मणजे कशाही प्रसंगीं तीं दगा देत नाहीं.

ही तपश्चर्या कार्याच्या बाहुल्याप्रमाणें निरनिराळी करावी लागते. इष्टकार्य सिद्धीकरितां कसल्या सामर्थ्याची आवश्यकता आहे व तें कसें उत्पन्न करावें, हें समजण्याला धोरण लागतें. ज्याचें धोरण श्रेष्ठ, तपश्चर्या श्रेष्ठ, त्याचेंच कार्य प्रामुख्यानें होतें. पण मनुष्य एकदां महत्वाच्या कामाच्या किंवा रागलोभाच्या भरांत असला ह्मणजे त्याचें तें धोरण पाहून शत्रूकडील धोरणी मनुष्य त्याला त्याच्याच धोरणानें खाड्यांत आणण्याचा प्रयत्न करितात. नेपोलियन बोनापार्टीचें असेंच झालें. अफझुलखान ह्याच तत्वावर मारला गेला. व शिवाजीही ह्याच डावानें दिल्लीस अडकला गेला! ह्मणून राजकारभारासारख्या मोठ्या कामांत शत्रूचे व्यूह समजून त्याचें धोरण राखणारा दीर्घदर्शी मनुष्य अगदीं स्वतंत्र व योगी असाच असावा लागतो. ह्मणून अशा मोठ्या कामांत खात्रीच्या अशा अनेक लोकांची सल्ला घेणें अगदीं अपरिहार्य असतें. अशानें आपल्या विरुद्ध शत्रूचे बहुतेक सर्व डाव लक्षांत येऊन त्यावर निश्चित उपाय योजना करितां येतें. व मनुष्य कसाही प्रसंग आला तरी डगमगत नाहीं. तरुण मुलामुलींना हें धोरण सांगण्याचें काम त्यांच्या वृद्ध मातापितरांचें असतें. जे हा बहुमोल उपदेश आपल्या गुर्मीनें ऐकत नाहींत, त्यांची फजिती झालेली आपण वारंवार पाहात आहोंच. निरनिराळ्या प्रवासांत निरनिराळीं धोरणें लक्षांत यावीं व प्रवास सुखावह व्हावा ह्मणूनच ही ग्रंथमाला आहे बुद्धिबळाचा खेळ याच तत्वावर रचला आहे. भारती युद्धांमध्यें हें धोरण सांगण्याचें

काम योगसामर्थ्यानें कृष्णानें आपल्याकडे घेतलें होतें. यामुळें अर्जुन हा सर्व योध्यांत सामर्थ्यवान व यशस्वी झाला. शिवाजीला धोरण सांगण्याचें काम रामदासस्वामींकडे होतें. व कृपाप्रसाद भवानीचा होता. महाराज इष्टकार्या-करितां भवानीची परवानगी घेत असत असें इतिहासांत स्पष्ट सांगितलें आहे. यामुळें शिवाजीला यश आलें व त्यांचें सामर्थ्य वाढलें. पेशवाईच्या अखेरचे वेळीं हें धोरण संभाळण्याचें काम नाना फडणाविसांकडे होतें. ह्यामुळें राष्ट्राची फूट असून ती दृष्टीस न पडतां जूट दिसून सर्व स्वपर शत्रूंना ते बलवान दिसले. तात्पर्य इष्टकार्य सिद्धीस जाण्यास कोणत्या प्रकारची व कशी तपश्चर्या केली पाहिजे हें सर्वांना समजतें असें नाहीं. ज्याला तशा कार्याचा अनुभव असेल तोच त्याबद्दल कांहींतरी सांगूं शकेल. नाहींतर कार्य एक व धोरण भलतेंच. नुसतें पंचपक्वांनाचें जेवण जेवण्याससुद्धां केवळ शारीरसामर्थ्य असून भागत नाहीं. तें जेवण्यांस तारतम्य पाहिजे. नाहींतर तेंच विषवत होईल. जेवणाची ही गोष्ट. मग इतर कार्याची गोष्ट कशाला ? जेवणाचें उदाहरण घेतलें आहे ह्याचें कारण मुख्यत्वेंकरून हेंच कीं, अलीकडील लोकांनीं जेवणा-मध्यें धारबंद न ठेवल्यामुळेंच त्यांच्या शक्ति क्षीण होऊन हल्लींचा अनवस्था प्रसंग मुख्यतः आलेला आहे.

यात्रेच्या पहिल्या भागांत उत्तर हिंदुस्थानची व हिमालयाची यात्रा सांगितली आहे. दुसऱ्या भागांत हिमालयाचीच यात्रा आहे, पण ती भिन्न प्रकारची आहे. महाराष्ट्रीयांना हें निरनिराळें हवापाणी व अन्न पचून निरनिराळ्या पहाडी मुलखांतून जात असतां शरीर बलवान् व मन उत्साहि कसें राहील व त्या योगानें यात्रा क्लेश सहन होऊन यात्रेचा फायदा कसा घेतां येईल हें सांगितलें आहे. तिसऱ्या भागांत दक्षिण हिंदुस्थानची यात्रा सांगितली. यांत शारीर सामर्थ्यापेक्षां निरनिराळ्या स्वभावाच्या लोकांत वापरावयाचें असल्यामुळें मनाच्या धूर्ततेची व प्रसंगावधानाचीच आवश्यकता फार, सबब ती कशी उत्पन्न करावी हें सांगितलें, पण यापेक्षां समुद्र प्रवासाची यात्रा अगदीं निराळी आहे. या ठिकाणीं नुसतें बलवान शरीर असून उपयोगी नाहीं. किंवा केवळ धूर्तपणाही उपयोगी नाहीं. हें सामर्थ्य येण्यास मुख्यत-समुद्राचा किंवा जलप्रवासाचा कांहीं तरी अनुभवच पाहिजे. समुद्राचा अनु-भव सर्वांसच मिळण्याचा संभव नाहीं. घाटावरील मनुष्यास समुद्राची कल्प-

नाहि येणें शक्य नाहीं. त्यांना पावसाळ्यांत दुथडी भरलेल्या नद्या मात्र ठाऊक आहेत, पण त्या पुष्कळ संथ. कोंकणच्या नद्या तशा नाहींत. फार उच्छृंखळ आहेत म्हणूनच समुद्रानें त्यांस आपल्याजवळ ठेविलें आहे! कोंकणच्या नद्यांमध्यें पाणी फार खोल नाहीं पण पाण्यास वेग, वळणें, व खडकाळ जागा फार, यामुळें मधून मधून पाण्याचे ढिसाळ ऊर्फ लोंढे व भोंवरे फार भयंकर येतात. अशांतून होडीनें, सांगडीनें किंवा ताफ्यानें जाणें सुद्धां फारच भयंकर, मृत्यूच्या दाढेंतीलच तो मार्ग आहे. अशा ठिकाणीं नुसतें सामर्थ्य असून काय उपयोग? सामर्थ्याचा अभिमान बाळगणारा पहिला बाजीराव याचा अंत अशाच अविचारीपणामुळें रावेर येथें नर्मदेंत झाला. पण यापेक्षां भयंकरपणा समुद्राच्या पाण्याचा आहे. जमिनीचा जसा केवढाहि भाग सपाट नसतो त्याप्रमाणें समुद्राचा पृष्ठभागहि समपातळींत केव्हांही नसतो. जमिनीचे उंचवटे व खोलवटे कायम तरी असतात, पण पाण्याचें तसें नाहीं. उंचवटा ऊर्फ लाट केव्हां उत्पन्न होईल व केव्हां फुटून मनुष्यासुद्धां होडीचे तुकडे होऊन ती बुडेल व सर्वस्वाचा नाश होईल हें कांहीं सांगतां येत नाहीं. कराचीस एक इंजनीअर लाइट हाऊसवर समुद्र शोभा पहात असतां अशीच काळ लाट येऊन वाहून गेले! काळलाट म्हणण्याचें कारण ती कल्पनेच्या बाहेर व अवेळीं आली. तिनें समुद्राची मर्यादा उल्लंघन करून ती मर्यादेबाहेरच्या मनुष्यांना वेगानें ओढून घेऊन गेली! याच पद्धतीनें होड्या, गलबतें, बोटी यांना कधीं कधीं जलसमाधि मिळते. पाण्याचा पृष्ठ भाग नेहमीं समपातळींत असतो हा पदार्थ–विज्ञान शास्त्राचा पुस्तकी सिद्धांत येथें मुळींच लागू पडत नाहीं!

जमिनीचा पृष्ठ भाग कसा जरी असला तरी वाहनाशिवाय जाता येईल, परंतु तसें जलप्रवासाचें नाहीं. जलप्रवासाला वाहन हें पाहिजेच. वहानाशिवाय जाणें म्हणजे पोहून जाणें. पण जेथें वाहनांतूनसुद्धां जाणें धोक्याचें तेथें तरून जाण्याचा उपायच नाहीं. तरीपण जलप्रवास करणाराला पोहतां येण्याची फारच आवश्यकता आहे. पोहण्याच्या योगानें पाण्याशीं परिचय होतो. व त्याच्या अघटित लीलांची माहिती होते, व मन त्याच्या सान्निध्याला तयार होतें म्हणजे धाडशी होतें. पोहतां येण्यास पहिल्यानें तळ्यासारखें संथ पाणी उत्तम. पाण्याची खोली प्रथम कंबरेपेक्षां जास्त नसावी. आमच्या तीर्थ यात्रेच्या विधींत मनुष्याला पाण्याचा परिचय झाला आहे किंवा नाहीं, हें पाहण्या-

करितां प्रत्येक तीर्थांत त्यानें निदान कंबरभर पाण्यांत उतरून स्नान करावें, निदान तीन बुड्या तरी माराव्या असें मुद्दाम सांगितलें आहे. नद्यांच्या संगमीं स्नानाचें पुण्य विशेष सांगितलें आहे. तसेंच समुद्राशीं सहवास व्हावा म्हणून कांहीं तीर्थें समुद्र सन्निध मुद्दाम ठेविलीं आहेत व कांहींकरितां समुद्रस्नानहीं सांगितलें आहे. सारांश मनुष्य सर्व प्रकारें निष्णात होण्यास जलपर्यटणाची आवश्यकता फार आहे. आमचें राष्ट्र सर्व प्रकारें गुणसंपन्न असून अलीकडच्या जलपर्यटणाच्या अभावामुळें मुख्यता त्याची फजिती झाली आहे. समुद्राचा परिचय व्हावा म्हणूनच रामेश्वर, जगन्नाथ, द्वारका, यासारखीं मुख्य धामें समुद्र काठींच ठेविलीं आहेत. मलासुद्धां वाटलें कीं पहिले दोन तीन भाग लिहून तीर्थयात्रेचे व प्रवासाचे उद्देश शेवटास जातील पण पुढें विचार करितां समुद्रपर्यणाचा भाग लिहिल्याशिवाय चालणारच नाहीं असें दिसलें म्हणून हा भाग लिहिला आहे.

आतां याची तपश्चर्या करण्यास प्रथम जलप्रवासाचीं, तुफानाचीं व वादळाचीं वर्णनें व काव्यें वाचावीं. हीं इंग्रजीमध्यें फार उत्तम सचित्र व विपूल असतात. आपल्याकडेही कादंबऱ्यांत कधीं कधीं तीं येतात पण फारच कमी. याचा अनुभव येण्यास कोंकणांत आगोठीच्या आरंभीं जमिनीवरच्या वादळांत प्रथम जरूर शिरावें. त्याचा परिचय झाला म्हणजे वारापाऊस भिन्न भिन्न दिशांनीं एका एकीं येऊन मनुष्याचा कसा कोंडमारा होतो व त्याचे प्रसंगानधान जाऊन त्यास कसें सुचत नाहीं याचा परिचय करून घ्यावा. नंतर नद्या, तलावं, यांच्यावर स्वाऱ्या करून त्या पोहून जातां येतील इतकी धमक आणावी. संथ पाण्यांत पोहण्यापेक्षां वाहत्या पाण्यांत पोहणें निराळें आहे. वाहत्या पाण्याची धार कापण्यास हात टाकून संवय केली नाहीं व धार कापतां आली नाहीं तर मनुष्य वाहात जातो. म्हणून नुसतें पोहोतां येतें या सबबीवर वेगाच्या नदींत उडी घालूं नये. इतकी तयारी झाल्यावर मग समुद्रदर्शन घ्यावें. समुद्राचें शांत स्वरूप अत्यंत मोहक असतें. अर्थात अशा वेळीं समुद्र पर्यटन अत्यंत मजेदार व फार अल्हादकारक वाटतें. नंतर त्याच्या भरती ओहोटीच्या लाटांचा परिचय करावा व लाट उंच उंच कशी वाढते, कशी फुटते. अशा वेळीं मनुष्याचें जीवित सुरक्षित कसें ठेवावें, याची कल्पना स्वतः बसवावी. कारण सांगण्यापेक्षां अनुभव फार पाहिजे. अशा लाटांत पोहतां येणें दुरापास्त आहे. पण तें

आलें पाहिजे. त्याशिवाय धाडस येणार नाहीं. तळ्यासारख्या संथ पाण्यांतलें पोहणें निराळें. नदीसारखें वाहातें पाणी कापणें निराळें. पण त्या सर्वांपेक्षां समुद्राची लाट फोडून पोहणें निराळें असें त्यावेळीं वाटेल. कारण ज्या ठिकाणीं प्रथम पाऊलभर पाणी नसतें तेथें लाट आली म्हणजे एकदम कंभरभर किंवा कदाचित् गळाभरही होतें. व लाट परत जाऊं लागली म्हणजे पायाखालची बाळू जाऊन त्याचे पाय सुटून मनुष्य पार कोणीकडच्या कोणीकडेच फेकलां जातो. अतीशय वेगामुळें पोहण्याचा कांहीं उपयोग होत नाहीं. लाट वाढूं लागली म्हणजे त्या लाटेबरोबर मनुष्य वरवर जातो पण तीच लाट कोसळली म्हणजे डोकें खालतीं जाऊन तंगड्या वरतीं होतात! मग आपण समुद्राच्या आंत जात आहों किंवा बाहेर येत आहों हें मुळींच समजत नाहीं. सबब लाट फुटण्याची वेळ आली ह्मणजे आपण बुडी मारावी. लाट पूर्ण फुटली ह्मणजे मग वर डोकें काढावें. ह्मणजे पहिल्यासारखा गोंधळ उडत नाहीं. पण भरतीची वेळ असली ह्मणजे आपण डोकें वर काढण्याची व त्यावर दुसरी लाट फुटण्याची वेळ एकच आली ह्मणजे मात्र जीव गुदमरतो! असा प्रसंग उधानाचे भरतीचे वेळेस बहुधा येतो. समुद्राच्या निरनिराळया तिथींच्या भरत्यांची व त्यांच्या बेंदरसम्याची सुद्धां माहिती पाहिजे. बंदरसमा ह्मणजे समुद्रांत जेव्हां भरती असते त्याच वेळा लांबच्या खाड्यांत ती येत नाहीं. त्यांच्या वांकडेतिकडेपणामुळें तेथें भरती पोहोंचण्यास त्यांच्या लांबिमाणें व वळणाप्रमाणें कमजास्त वेळ लागतो. तो इतका कीं, समुद्रांत भरती किंवा खमा असतां त्यावेळीं खाडींत पूर्ण निखार असते, ह्मणजे पाणी मुळींच नसतें! व समुद्राच्या निखाराच्या वेळीं खाडींत पूर्ण भरती येते! खाडी रिकामी झाली ह्मणजे पायउतारसुद्धां मिळतो. व भरतीचे वेळीं मोठमोठीं गलबतें तींत तरतात. खाडीची भरती एकदम मोठ्या वेगानें येते व जाते. तीस पाण्याचा घोडा ह्मणतात. हा बंदरसम्याचा काळ स्थानिक लोकांनाच विचारावा लागतो. तो विचारिल्याशिवाय खाडी कोरडी आहे, असें समजून जातां कामा नये. गेल्यास अनर्थ होतो. लाट आली असतांना उभें राहून ती पाठीवर घेऊं नये. घेतल्यास त्यांस मोठा धसका बसतो. ह्मणून हातपाय रुंद करून उभें राहून कोणत्यातरी बगलेनें तिला कापावी, ह्मणजे छातींत किंवा पाठीस धसका बसत नाहीं. त्याचप्रमाणें लाट परत समुद्रांत जाऊं लागली ह्मणजे करावें. लाट मागें समुद्रांत

जाऊं लागली ह्मणजे पायाखालची वाळू भराभर जाऊन मनुष्य घसरतो. सबब वारंवार पाय उचलीत जावें. गोड्या पाण्यांत वारंवार स्नान केल्यानें तें कधीं कधीं बाधतें. पण खारें पाणी कधींच बाधत नाहीं. यात्रेकरूला थंड पाण्याची सवय प्रथमपासून पाहिजेच, असें मागें सांगितलें आहेच.

अशा रीतीनें पोहण्याचा परिचय झाल्यावर होडींत बसण्याचा सराव केला पाहिजे. होडींत तोल संभाळून कसें बसावें, बसतां आलें ह्मणजे उभें कसें राहावें; व तोल कसा सांभाळावा हें समजलें पाहिजे. लाटांच्यायोगें होडी खालीवर होऊं लागली ह्मणजे तोल सांभाळणें कठीण असतें. त्यावेळी मन सावध राहिलें पाहिजे. गडबडून तोल जातां उपयोगाचें नाहीं. नंतर होडी वल्हवावयाला शिकलें पाहिजे. वल्हें धरावें कसें, कसें वल्हाविलें असतां होडी कोठें वळते, होडी वल्हवण्याकरितां कोठें बसलें पाहिजे, इष्ट ठिकाणीं जाण्याकरितां वल्हें कसें मारावें, दोन वल्हेवाले असले तर त्यांनीं कोठें बसून कसकशीं वल्हीं मारावीं, पाण्याचा प्रवाह किंवा लाट कशी तोडावी, ह्याचें ज्ञान आलें पाहिजे. लाट फोडतांना कसें तिरकें उभें राहावें लागतें, तसेंच कांहींसें होडीचें आहे. लाट होडीच्या बाजूवर घेतां कामा नये. लाटेवर होडी घातली पाहिजे. अशानें होडी खालवर होते, पण बुडत नाहीं. वल्ह्याचें ज्ञान झाल्यावर शीड सुकाणूची माहिती करून घ्यावी. वाऱ्याची दिशा व आपल्या होडीची जाण्याची दिशा यांचेमध्यें जो कोन होतो तो दुभागणाऱ्या कोनाच्या दिशेनें शीड लावावें लागतें. हा शिडाचा शास्त्रीय सिद्धांत लक्षांत पाहिजे. सुकाणू ज्या बाजूला फिरवावें त्या बाजूला होडी किंवा गलबत वळतें. असे अनुभव संथ पाण्याच्या वेळचे व तुफानाच्या वेळचे घेतले पाहिजेत. हें लिहीणें फार सोपें आहे, पण प्रत्यक्ष अनुभव फार खडतर आहेत. मी हे सर्व अनुभव घेतले आहेत. इतकेंच नव्हे तर ह्यापेक्षांही जास्त घेतले आहेत. ह्मणजे होडी खोल पाण्यांत नेऊन मुद्दाम बुडविली आहे. होडी बुडाली तरी ती लाकडाची असल्यामुळें तळीं जात नाहीं. होडी बुडाली ह्मणजे आपण एकीकडे, होडी दुसरीकडे, व वल्हें तिसरीकडे जातें. पण प्रथम वल्हें पकडून होडीकडे पोंहोत गेलें पाहिजे. नंतर तिला उताणी करून उडी मारून आंत बसून वल्ह्यानें तिच्यांतील पाणी काढून टाकिलें पाहिजे. व इष्ट ठिकाणीं तिला खेंचीत नेली पाहिजे. अशा तऱ्हेचे खडतर अनुभव घेतल्याशिवाय मनुष्याचें मन धाडशी बनणारच

नाहीं. व यात्रेचे उद्देश शेवटास जाणार नाहींत. असे अनुभव शिकावे. आपण संकट सोसून दुसऱ्यालाही संकटांतून सोडविण्याची शक्ति यावी हाच या तपश्चर्येचा उद्देश आहे. संकट केव्हां येईल याचा नेम नाहीं. संकट आलें नाहीं, येणार नाहीं किंवा आपण अशा भानगडींत पडणार नाहीं, अशा समजुतीनें तपश्चर्या न करितां असावध वागणें हें अत्यंत गैर आहे. कोल्ह्याच्या शिकारीला वाघाच्या शिकारीची तयारी करावी लागते, ही म्हण सदैव लक्षांत ठेवावी.

होडींत बसल्यावर होडी खालवर होते. त्याचप्रमाणें पोटांतसुद्धां डचमळतें व ओकारी येते. त्याकरितां झोपाळ्यावर मोठमोठ्या झोपा घेण्यास शिकावें व गांवठी यात्रेंतील पाळण्यांत बसून शंभर दोनशें झोका घेतल्या किंवा आपण गिरगिरमाता पुष्कळ केली तरी गरबरत नाहीं, अशी संवय करावी. सर्व प्रकारच्या संकटाला तोंड देतां आलें पाहिजे. संकटाच्या वेळीं न घाब-रतां व न गडबडतां युक्ति सुचून आपण व दुसऱ्याला निदान परोपकार बुद्धीनें तरी पार पाडिलें पाहिजे. हाच यात्रांचा व तपश्चर्येचा मुख्य उद्देश आहे. इतकें विस्तृत वर्णन करण्याचें कारण असें कीं, गेल्या नोव्हेंबर १९२७ महि-न्यांत हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावर अरबी समुद्रामध्यें एकाएकीं भयंकर वादळ होऊन देशी कंपनीची तुकाराम बोट व स्टीम नॅव्हिगेशनची जयंती बोट ह्या एकाएकीं त्या तुफानांत सांपडून अगदीं किनाऱ्याजवळ येऊन बुडाल्या! त्या कोकण किनाऱ्यानें जाणाऱ्या होत्या त्याप्रमाणें त्या किनाऱ्या-किनाऱ्यानें जात होत्या. त्यावेळीं ज्यांनीं ही तपश्चर्या स्वाभाविक किंवा मुद्दाम केली होती असे २५।३० पंचवीस तीस असामी मात्र जगले. व बाकीचे मेले! आतां कोणी म्हणतील कीं जितके लोक बोटींतून प्रवास करतात, त्या सर्वांस ही विद्या येते कीं काय? तर असें नाहीं. हा अपायाला उपाय म्हणून सुचविला आहे. ज्यांच्यांत सामर्थ्य असेल त्यांनीं हें सामर्थ्य आणावें. नाहीं. तर इतरांप्रमाणें त्यांची व्यवस्था होईलच!! समुद्रांतली गोष्ट राहिली पण होडी बुडाली असतां अगदीं थोड्या पाण्यांत सुद्धां पोहण्याच्या अभावीं पुष्कळ लोक विनाकारण जिवास मुकतात. एका श्रीमंत कुटुंबांत एकुलता एक मुलगा होता. त्याला सर्व मंडळी जिवापाड जपत असत. कदाचित् अपघात होईल म्हणून त्यांनीं त्याला पाण्यांत कधींही पाठविला नाहीं. मग त्याला

पोहतां कसें येईल ! ते मोठा झाल्यावर कर्मधर्म संयोगानें त्याला होडींतून प्रवास करण्याची वेळ आली आणि ती होडी नदींत अगदीं थोड्या पाण्यांत बुडाली ! हा नदींत वाहात जाऊन मेला !! व सर्व कुटुंबाचा निर्वंश झाला !! नदी उतारावर पाणी सरासरी कंबरभर होतें. पण हे श्रीमंत असल्यामुळे जिवाच्या संरक्षणाकरितां व सुखाकरितां त्यांनीं हा होडीचा मार्ग पत्करिला पण तेथेंही असा दगा झाला. ह्मणून श्रीमंतांनींसुद्धां आपल्या मुलांना पोहण्यास अवश्य शिकविलें पाहिजे. गरिबांना तें स्वाभाविक येतेंच. युरोपांतल्या मुली-सुद्धां वीस मैलांची इंग्लिश खाडी पोहून जातात मग आपल्याकडच्या पुरुषांना-सुद्धां नुसतें पोहतां येऊं नये ही गोष्ट मोठी लांछनास्पद आहे. हल्लीं डेक्कन जिमखान्यांत पोहण्याची कळा शिकण्याची सोय केली आहे तशी प्रत्येक ठिकाणीं करावी व ही प्राणदायिनी विद्या अवश्य शिकावी व तिची तपासणी नदींत, तळ्यांत व समुद्रांत करावी. बुडी मारून वस्तु काढणें हा त्याचा दुसरा भाग आहे पण तो खुषीवर ठेवावा. पोहोण्याचें अंतिम ध्येय हातपाय न हालवितां नुसतें नाक, तोंड वर करून उताणें पडून राहणें हें आहे, अशानें हातापायांस विश्रांति मिळून मनुष्य पाण्यांत पुष्कळ वेळ राहूं शकतो. संथ पाण्यांत हें साधतें. उपड्यापेक्षां उताणें पोहणें सोपें असून त्यानें फार विश्रांति मिळते. मी हें सर्व करून मुलांसही शिकविलें आहे.

न साहसमनारुह्य नरो भद्राणि पश्यति ॥
सहि साहसमारुह्य. यदि जीवति पश्यति ॥१॥

साहस केल्यांशिवाय मनुष्याला चांगले दिवस येतच नाहींत. साहसाचे तडाक्यांतून मनुष्य जगला तर त्याला मोठा चमत्कार दृष्टीस पडतो. ( तो आपलें विलक्षण स्थित्यंतर पाहातो .) क्लाइव्ह, वारन् हेस्टिंग, औरंगजेब, पहिले बाजीराव, शिवाजी, बाळाजी विश्वनाथ, नाना फडणीस, हैदर वगैरे इतिहास प्रसिद्ध पुरुषांची पुष्कळ बरीं वाईट उदाहरणें आहेत. महाराष्ट्रीयांचा राज्यस्थापनेचा इतिहास साहसानींच भरला आहे. महाराष्ट्रीयांनीं पूर्वजांचें स्मरण या दृष्टीनें करावें. आतां साहस करणें तें थोर अंतःकरणाचें असावें. चोरी किंवा तसें घातक नसावें.

पूर्वी आपल्या देशामध्यें नाविक विद्या इतर विद्यांप्रमाणेंच कळसास जाऊन पोहोंचली होती. परंतु तेव्हांपासून तिच्यांत कांहींएक फेरफार

झाले नाहींत. त्यानंतरच्या सुधारणांपैकीं आह्माला त्या विद्येची कांहींएक माहिती नाहीं. आगबोटी, पाणबुड्या, टारपेडो, यांचा आम्हांला गंधही नाहीं. आह्मी त्यांचीं नांवें ऐकतों, वर्णनें वाचतों व चित्रें पाहतों, मात्र बाकी कांहीं अर्थ नाहीं. सारांश संकटें मनुष्याला शहाणपणा शिकविण्याकरितां येतात. त्याला जो कचरला तो ईश्वरनिर्मित शिक्षणाला मुकला. अर्थात त्याचे हातून कांहीं होणें नाहीं. जन्मास येऊन तो फुकट गेल्यासारखा आहे. मग तो अलिकडच्या पद्धतीप्रमाणें कितीही शिकलेला असो, त्याचा कांहीं उपयोग नाहीं. हल्लींची भयंकर शांति व भित्रेपणा हा मनुष्याचें शरीर व मन नाजूक करून तेजस्विता घालविणारा आहे. हल्लींच्या सुधारणेनें बहुतेक संकटें दूर झालीं आहेत, त्यामानानें लोक सुद्धा नामर्द होत चालले आहेत. व सृष्टिशिक्षणाला मुकत आहेत. राष्ट्रीय पुरुषांच्या आंगीं साहस व धडाडी हे गुणच प्रधान असतात. हे गुण जसजसे अंगीं जास्त असतील तसतशीं त्यांचीं तेजःकिरणें शत्रूस किंवा जगासही दिपवितात. अलीकडे राष्ट्रीय पुरुषांचे उत्साह करण्यांची चाल आहे. व उत्साहाला जाणारे सर्व लोक त्यांचे अनुयायी व अभिमानी असतात. पण ते फक्त केवळ शून्यात्मे असतात, असेंच ह्मणावें लागतें. यांनीं खिरापती खाव्या, हार घालावे, मिरवणुकी काढाव्या व व्याख्यानें द्यावीं. राष्ट्रीय पुरुषांच्या गुणांचा लेशही त्यांच्या अंगीं नसतो. व तो या साधनांनीं येतही नाहीं. हे सर्व देखावे आहेत. कारण तसें जर नसतें तर एवढ्या समुदायांतून दर वर्षास एकतरी तसा किंवा तत्सदृश राष्ट्रीय पुरुष किंवा कांहीं कमी गुण घेतलेला तरी पुरुष निर्माण झाला असता. पण गुणाचे नांवानें अगदीं शून्य आहे. वादाविवाद, बडबड व मत स्वातंत्र्य यांनीं द्वेश मात्र पसरत आहे. यामुळें राष्ट्रीय पुरुष शिवाजी, पहिले बाजीराव, टिळक, विष्णुशास्त्री, तेथें पुतळ्याच्या रूपानें दगड होऊन बसतात, किंवा चित्ररूपानें आश्चर्यचकित होतात. ते ह्मणतात आमच्या गळ्यांत सुगंधी माळा घालून उदबत्त्या लावून किंवा पालखींत आमच्या मिरवणुकी काढून शरीराचे चोचले करण्याकरितां आह्मीं आपला देह राखला नव्हता तर ज्याचे योगानें राष्ट्र उदयोन्मुख होईल असें तेज सर्वांच्या अंगांत भिनेल अशी कृति करण्याकरितां होता. ती जर तुमच्या हातून झाली नाहीं, नुसती बडबड करावयाची असेल तर आमचा उत्साह करूं नका. कारण त्यांत आह्माला फारच कमीपणा आहे. राष्ट्रीय पुरुषांचे उत्साह करून

जर अशी नेभळी प्रजा उत्पन्न होणार असेल तर ते उत्साह न करणेंच बरें. राष्ट्र पुरुषांचें तेज अदृश्य रूपानें प्रत्येकाच्या अंतःकरणांत उतरलेंच पाहिजे. याकरितां आशा उत्साह प्रसंगीं नुसत्या गुणांची कथा, किर्तनें, पुराणें किंवा लाठी, लेजीम, बोथाटी वगैरे चालू काळालासुद्धां गैरलागू व एकदेशी अशी फारशी सोंगें न आणितां मागील उत्साहापासून ह्या उत्साहापर्यंत ज्यांनीं ज्यांनीं उत्साह व्यक्तीच्या सदृश अशीं कांहीं तरी कामें केलीं असतील त्यांचा गौरवपूर्ण उच्चार करीत गेल्यास अहमिहमिकेनें पुष्कळांना तशी उत्साहयुक्त स्फूर्ति येत जाऊन देशांत कर्ते पुरुष निर्माण होण्याचा फार संभव आहे. अशानें त्यांचे उत्साह तेजस्वी होऊन देशोद्धाराला कारणीभूत होतील. नाहींतर अशा नेभळटपणानें ते उत्तरोतर हास्यास्पद किंवा थट्टेचेच विषय मात्र होत जातील. म्हणून अशा उत्साहांतून हीं दृश्य सोंगें शक्य तितकीं कमी करावीं. ही केवळ बायका मुलांकरितां किंवा तत्सदृश पुरुषांकरितां आहेत.

आतां देशकाल वर्तनाप्रमाणें समाजाला परिस्थिति प्राप्त होते. पण त्या परिस्थितीला वश न होतां राष्ट्र पुरुष किंवा अवतारी पुरुष आपला मार्ग काट्या खळ्यांतूनच पण त्याच परिस्थितींतून चोखळून बाहेर काढतात. परिस्थितीला कंटाळत नाहींत किंवा दोषही देत नाहींत. परिस्थितीला दोष देण्याची पाळी आली म्हणजे भांडण्याला सुरवात झालीच. आणि आपल्या कृतीनें भांडणें होतात असें ठरलें म्हणजे आपण राष्ट्रीय कामें करण्यास नालायक आहों असें प्रत्येकानें समजावें. हल्लींचा प्रत्येक पुढारी धर्माला व समाजाला दोष देत आहे. त्यांच्या इच्छेप्रमाणें समाज बदलला म्हणजे हे ध्वजा तोरणें बांधणार! नाहीं तर नाहीं! म्हणजे समाज बदलाला नको व ह्यांच्या हातून बडबडीशिवाय कांहीं व्हावयास नको. शिवाजी, बाजीराव, नाना फडणीस व अलीकडचे लोकमान्य टिळक यांनीं समाजाला दोष देऊन कधींही त्राग केला नाहीं. कर्ता पुरुष मिर्माण झाला म्हणजे समाज त्याचा अनुयायी होतोच हें त्यांनीं स्पष्ट दाखविलें आहे. आतां सर्वच गुण सर्वांच्या आंगीं येतील असा नेम नाहीं. परंतु परक्यांच्या संगतीनें त्यांचे दुर्गुण आमच्या पुढारी मंडळींत शिरत आहेत ते तरी थांबले पाहिजेत. डोक्यांवर केंस ठेवणें, अंगांत सतत कांहीं तरी ठेवणें, वारंवार चहा, सोडा लेमन-सारखीं पेयें पिणें, आहार विहारांत, कपड्यालत्यांत अत्यंत नाजुकपणा दाख-

●

विणें, बायकांसारखें परकी पोषाखांत नटण्यामुरडण्यांत लक्ष ठेवणें, ह्या गोष्टी स्वाभिमान नष्ट करणाऱ्या आहेत. आपल्यासारख्या उष्ण कटिबंधांतील देशास यांची कांहीं जरूरी नाहीं. तीस पस्तीस वर्षांपूर्वी पुरुष अंगांत क्वचित कपडा घाली. नेहमीं त्यांचें शरीर उघडें असे. बाजारांत किंवा कोठें सरकार-दरबारांत जाणें असेल तर अंगावर धोतर व एक पागोटें असे. यामुळें सर्व अंगाला जिवंत हवा मिळून पुरुष तेजस्वी व गोंडस दिसत. अजूनसुद्धां नाटकांत किंवा कोठेंही ब्राह्मणाचें सोंग दाखवावयाचें असतां तो उघडा बंब, भस्म लाविलेला, डोक्यावर एक अग्निहोत्री किंवा दिक्षितपणाची टोपी व एक लहान पंचा नेसलेला, अंगावर छाटी किंवा धोतर असाच दाखवितात. डोक्यावर केस राखलेला, स्टॅन्डींग कॉलर लावलेला, हॅट घातलेला असा दाखवीत नाहींत! आतां आंग उघडें टाकण्याची बायकांप्रमाणें पुरुषांनाही लाज वाटूं लागली आहे. ह्या गोष्टीस सुधारणा ह्मणावी तर तिनें मनुष्य अल्पायुषी व नामर्द होऊं लागले आहेत. अजूनसुद्धां जे लोक चहा पीत नाहींत, उघडे राहतात, अलीकडची भिकार पेयें पीत नाहींत ते निरोगी राहून तेजस्वी व दीर्घायुषी होत आहेत. प्रत्येक पुरुषाला तेजस्वीपणाचा गुण घेतां आला नाहीं, तरी हे दोष टाकले असतांही त्यांची उन्नतीच झाली, असें ह्मणतां येईल. सारांश मनुष्याला श्रेष्ठत्व आणण्यास ह्या बाह्य उपाधींची किंवा परिस्थितीची कांहीं जरूर नाहीं. पण ज्यांना श्रेष्ठत्व किंवा गुण मिळण्याचा संभवच नसेल ते आपण गुणी आहों किंवा विद्वान् आहों असें दाखविण्याकरितां ह्या बाह्योपाधींचा स्वीकार करतात.

तपश्चर्येसंबंधानें इतकें जास्त लिहिण्याचें कारण यात्रांचें तें रहस्य आहे. हें न मिळवितां नुसत्या रेल्वेंत बसून झोपा काढून, तीर्थदेवतेचें दर्शन घेऊन व तेथील तीर्थांत बुड्या मारून यात्रा करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. इतकेंच नव्हे तर यात्रा न करितां नुसती ही तपश्चर्या केली तरीसुद्धां यात्रेपेक्षां पुण्य विशेष लागेल.

अशा रीतीची तपश्चर्या झाली तरी बोटींत बसल्यावर बोटीची किंवा समुद्राची एक प्रकारची घाण येत असते. ही घाण मुख्यत्वें करून बोटींतील भटारखान्याची असते. मांसाहार न करणाऱ्यांना ही घाण फार येते. आणि त्यामुळें डोकें उठून ओकारी येते. खालच्यापेक्षां वरच्या मजल्यावर ही घाण

कमी येते. तरीपण अखेरचे दिवस आले म्हणजे दर्याची सुद्धां घाण येऊं लागते, बोट खालवर नाचते त्यामुळें सर्व जगच हालत व डोलत आहे असें वाटतें. अशा वेळीं बायकांची जी त्रेधा तिरपिट उडते. ती कांहीं विचारूच नये, अती ओकारीमुळें त्यांचीं अगदीं आतडीं बाहेर येण्याची वेळ येते. अशा वेळीं पाण्याकडे न पाहतां स्वस्थ निजून राहिल्यास कांहीं बरें वाटतें. बायकांनींही वरच्याप्रमाणें तपश्चर्येची सवय ठेवल्यास त्यांस बोटीपासून उपद्रव कमी होईल. एवढें सांगण्याचें कारण प्रवासांत देहभान ठिकाणावर नसतें व यात्रा क्लेश भयंकर होऊन यात्रेविषयीं अप्रीति उत्पन्न होते, व त्यांच्यापासून होणाऱ्या सर्व सुखास मनुष्य मुकतो. असो. अशा रीतीची तपश्चर्या झाल्यावर

## बोटींची साधारण माहिती

सांगणें जरूर आहे. कारण रेलवेपेक्षां ही माहिति अगदीं भिन्न आहे. बोटींच्या कंपन्या रेलवेप्रमाणेच निरनिराळ्या असतात व त्यांच्या बोटींची व्यवस्था त्याप्रमाणें निरनिराळी असते. पण सर्व बोटींची सर्वसाधारण माहिती सांगतों.

सर्व बोटींच्या कंपन्यांचें पश्चिमेकडील मुख्य स्टेशन ऊर्फ बंदर मुंबई आहे. मुंबईहून त्यांच्या धरमतर लाईन, उलवा लाईन, कोकण लाईन, गोवा लाईन, मंगळूर लाईन, भावनगर लाईन, कराची लाईन, अशा निरनिराळ्या अरबी समुद्रांतील शाखा असतात व त्या निरनिराळ्या ठिकाणाहून सुटतात. म्हणजे जवळ जाणाऱ्या बोटी एका ठिकाणावरून (अलेक्झॅन्ड्रा डाकमधून) सुटतात व लांबच्या बोटी प्रिन्सेस डॅकवरून सुटतात. जवळ जाणाऱ्या बोटी लहान असतात पण लांब जाणाऱ्या बोटी त्यांच्या दुप्पट तिप्पट मोठ्या असतात. रेलवेप्रमाणें पॅसेन्जर बोटी व माल नेणाऱ्या बोटी निराळ्या असतात. माल नेणाऱ्या बोटींमध्यें माणसेंही घेतात. पण ही त्यांची खुशी आहे. कोणतीही कंपनी मालाबद्दल किंवा, कोणतेही पॅसेंजरचे जिवाबद्दल हमी घेत नाहीं. उतारूनें आपल्या हमीवर जा ये करावी किंवा मालाची ने आण करावी. कंपनी कोणत्याही प्रकारें जोखिमदार नाहीं. कंपनीच्या टिकीट ऑफिसांत त्या कंपनीच्या बोटीचें टाईमटेबल दिलें असतें. पण तें रेलवे प्रमाणें विकत मिळत नाहीं. शिवाय त्या त्या बंदराला त्या

टाईमाला ती बोट येईलच अशी हमी नाहीं. इतकेंच नव्हे तर एखादी बोट एखादेवेळीं एखादें बंदर घेणारही नाहीं. कदाचित् तुफान असल्यास मुंबई बंदरांतून ती बोट ठरलेल्या वेळीं सुटणारही नाहीं! म्हणजे शाश्वती कसलीही नाहीं. याचें कारण समुद्राचें वादळ किंवा तुफान हें आहे. रेलवे लाईन वाहून गेली किंवा मोडली असतांना रेलवेची जशी अशाश्वता असते त्याप्रमाणें बोटींची आहे. वादळ केव्हां होईल हें कांहीं सांगतां येत नाहीं. तरीपण बहुधा श्रावणापासून वैशाखमध्यापर्यंत समुद्र शांत असतो व बोटी बहुधा टाइमशीर जातात येतात बोट निघणार नसली किंवा बंदरांत येणार नसली तर तिकिटें देत नाहींत. कदाचित् तिकिटें दिलीं तरी बोटींत जागा नसली तर कप्तान पॅसेंजर घेत नाहीं. मग त्याना दुसऱ्या बोटीनें जावें लागतें. बोटींत रेलवेसारखे बसावयाला बाक नसतात. समपृष्ठावरच सगळ्यांना बसावें लागतें. अप्पर क्लास, किंवा फर्स्टक्लास यांत क्वचित बाक असतात. स्त्रियांकरितां निराळी व्यवस्था नसते. रेलवेंत प्रत्येक स्टेशनवर जसा प्लॅटफार्म असतो तसे सर्व बंदरांना बोटींचे धक्के नसतात. पश्चिम किनाऱ्यावर मुंबई, कराची, कारवार, मार्मागोवा येथें मात्र धक्के आहेत. तेथें त्या बोटी धक्याला लागतात.बाकी सर्व ठिकाणीं बोटी समुद्रांत उभ्या राहून तेथून पडावानें व होडीनें माणसें किनाऱ्यावर जातात. कांहीं ठिकाणीं हे पडाव त्या कंपन्यांचे असतात व कांहीं ठिकाणीं नसतात.मुंबई पासून मंगलोरपर्यंत हे पडाव असतात पण कराचीलाईनला नसतात. कंपनीचे पडाव असल्यास त्याबद्दल पडाववाल्यास कांहीं द्यावें लागत नाहीं. पण ज्याठिकाणीं कंपनीचे पडाव नसतात खासगी असतात, त्या ठिकाणीं पडाववाले उतारूंपासून वाटेल तसे पैसे चोपून घेतात.

रेलवेप्रमाणें बोटींतही माणशीं पंधरा शेर ओझें फुकट नेतां येतें. रेलवेप्रमाणें कांहीं बोटींत फर्स्टक्लास, सेकंडक्लास, थर्डक्लास, असे तीन क्लास असतात. कांहीं बोटींत ह्मणजे लांबच्या बोटींत अप्परक्लास व लोअर क्लास असे दोनच क्लास असतात. शिवाय अप्परक्लासवाल्यास त्याची इच्छा असल्यास (जास्त पैसे दिल्यास) केबीनही मिळते. तिचा चार्ज सरासरी अप्परक्लासपेक्षां दहा रु. जास्त द्यावा लागतो. शिवाय खाण्यापिण्याचा चार्ज निराळा भरावा लागतो. कांहीं कंपन्यांत केबीनचा चार्ज खाणावळीसुद्धां घेतात. मग तुह्मीं कितीही खा

अगर खाऊं नका. लहान बोटींमध्यें केबिनची व्यवस्था नसते. कारण त्यांत थोडा वेळ राहावयाचें असतें. बोटी जसजशा लांब जावयाच्या असतील त्याप्रमाणें ही व्यवस्था मुख्यत्वेंकरून दोन प्रकारची असते. त्यांच्यावर गोडें पाणी, व खाण्यापिण्याची व्यवस्था केलेली असते. एक मांसाहारी लोकांकरितां व एक शाकाहारी लोकांकरितां. शाकाहारी लोकांकरितां एक गुजराथी किंवा मारवाडी ब्राह्मण ठेविलेला असतो. मांसाहारी लोकांकरितां कोणी गोवेकर खिश्चन, मुसलमान महार, कोणीतरी असतो. जवळ जाण्याऱ्या बोटींत फळफळावळीचें दुकान असतें. ह्याशिवाय गाडी स्टेशनवर आली असतां प्लॅटफार्मवर जशी चहा, विडी, चिवड्याची व इतर जिनसांची फिरतीं दुकानें असतात त्याप्रमाणें बंदर आलें असतां बंदरावरील लोक आपला माल बोटींत विकावयास आणितात व बोट सुटण्याची वेळ आली ह्मणजे परत जातात. बोटीचें उभें राहण्याचें बंदर आलें ह्मणजे १५।२० मिनिटें अगोदर बोटींतील खलाशांकडून अमूक बंदर आलें अशी सूचना सर्व प्यासेंजरांना गाडी स्टेशनवर आल्यावर रेल्वे स्टेशन पोर्टरप्रमाणें मोठमोठ्यानें ओरडून मिळते. ही सूचना मिळतांच त्या बंदरीं जाणाऱ्या लोकांनीं आपआपल्या सामानाची बांधाबांध करून खालच्या मजल्यावर आपल्या मंडळीसुद्धां आलें पाहिजे. बंदरचे मचवे बोटीला लागले ह्मणजे बोटीचा दरवाजा उघडून प्रथम पडावांतील किंवा मचव्यांतील लोक व त्यांचें सामान वर घेतात. मग मचवा रिकामा झाल्यावर बोटींतील मनुष्यांचीं तिकिटें दरवाज्यावर घेऊन एक एकाला मचव्यांत सोडतात. ही व्यवस्था कशी होते ती एकदोन बंदरीं पहावी व विशेषतः आपल्या बायका मुलांना दाखवून ठेवावी ह्मणजे प्रसंगीं त्यांची गडबड होणार नाहीं. रेल्वेप्रमाणें बोटीवर चढउतरण्याची बिलकुल गर्दी करीत नाहींत. सर्वांनीं आपलें सामान मुलें माणसें नीट उतरून बसल्याशिवाय बोटीपासून पडाव सुटत नाहींत आणि पडाव सुटून लांब गेल्याशिवाय बोट सुटत नाहीं. बोट लहान मोठी असेल त्याप्रमाणें बोटीला दोन पासून चार दरवाजे असतात. बंदरांतून एकच पडाव आल्यास एकच दरवाजा उघडतात व त्याला पडाव लागतो. दोन आल्यास दोन उघडतात. असे प्यासेंजरच्या चढण्याउतरण्याचे जरूरीप्रमाणें दरवाजे उघडतात. बंदरांत पडाव अगदीं जमिनीला लागेपर्यंत जातात पण तेथेंही पाणी बरेंच

खोल असतें. तेथेंही होड्या उभ्या असतात व त्यांस काहीं देऊं केलें म्हणजे ते होडी अगदीं पाऊलभर पाण्यापर्यंत नेतात किंवा पडाववाल्यांस कांहीं दिल्यास तेही उचलून किनाऱ्यावर ठेवितात किंवा किनाऱ्यावरचे खलाशी खुर्च्या घेऊन येतात त्यांत बसून जावें. सारांश सर्व प्रकारच्या सोई असतात. जरुरीप्रमाणें त्यांचा उपयोग करावा. आतां ह्या प्रांतांत रेल्वे होण्याचें घाटत आहे ती झाल्यास सर्वच त्रास चुकेल पण मग त्या धैर्याचा अनुभव जाईल, हें वाईट आहे.

खाण्यापिण्याची व्यवस्था ज्यांस पसंत नसेल, त्यांनीं ती आपण आपली स्वतः करून घ्यावी. श्रेष्ठ प्रतीचे हिंदु लोक आपल्या फराळाचें सामान आपल्याबरोबर आणतात. पिण्याचें पाणीही बोटींत बसण्यापूर्वी किनाऱ्यावरून घागर भरून चांगला दादर बांधून घेतात. हेतु हा कीं, ह्या वस्तूंना प्रत्यक्ष कोणाचाही स्पर्श होऊं नये. केबीनमध्यें राहणाराची एक कंपनीचा मनुष्य असतो तो प्यासेंजरची सर्व प्रकारची व्यवस्था करतो. पूर्वी, बॉबे स्टीम नॅव्हिगेशन कंपनी व ब्रिटिश इंडिया स्टीम नॅव्हिगेशन कंपनी अशा दोनच कंपन्या पश्चिम किनाऱ्यावर मुख्यत्वें होत्या. यामुळें पॅसेंजरची सोय फारशी होत नसे. बेपर्वाई असे. पण आतां कंपन्या जास्त झाल्यामुळें त्यांच्यांत सोईची चढाओढ सुरू होऊन भाड्यांचे दर सुद्धां उतरले आहेत. सुख सोईही वाढत्या प्रमाणावर होत आहेत. ही आनंदाची गोष्ट आहे. बोटीचें भाडें रेल्वेप्रमाणें अंतराच्या प्रमाणानें नसतें. कधीं कधीं जवळच्या बंदराला व लांबच्या बंदराला एकच भाडें असतें !

ज्या कंपनीच्या बोटींतून आपणास प्रवास करावयाचा असेल त्या कंपनीच्या त्या लाईनीच्या बोटी मुंबईहून कोठल्या ठिकाणाहून कधीं निघतात मध्यें कोणतीं बंदरें करितात. याबद्दलची विश्वसनीय माहिती त्या कंपनीचे एजंटकडे लिहून आणवावी. रेल्वेप्रमाणें बोटीही मेलप्रमाणें जलद जाणाऱ्या व लहान लहान बंदरें न करणाऱ्या असतात व कांहीं प्यासेंजर गाडीप्रमाणें सर्व बंदरें करणाऱ्या असतात. आपलें बंदर कोणती बोट करणार याबद्दलची नक्की माहिती आणल्यावर त्याप्रमाणें आपल्या जाण्यायेण्याचा प्रवासाचा बेत ठरवावा. तिकिट ऑफीस, लगेज ऑफीस, कुली वगैरे धक्क्यावर असतात.

काांहीं कंपनींचीं तिकिटें केवळ त्यांच्या तिकीट-ऑफिसांत न मिळतां तीं विकणारे लोक बोटीच्या रस्त्यावर आपल्या कंपनीचें नांव व त्यांच्या बोटीचें नांव घेऊन ओरडत असतात. प्रत्येक कंपनीच्या धक्यावर तिकिट ऑफिसावर निघणाऱ्या बोटीचें नांव, कप्तानाचें नांव, बोटींत किती मनुष्यें बसवावयाचीं याचा बोर्ड लाविलेला असतो. त्याप्रमाणें आपलें तिकीट ज्या कंपनीचें असेल त्या कंपनीच्या बोटीवर चढावें लागतें. दुसऱ्या बोटीवर जाणें उपयोगी नाहीं. तिकीट तपासणारे व बोटीवर सोडणारे दरवाजावर तिकिट कलेक्टर असतात, ते ह्याविषयीं काळजी घेतातच, पण आपणही घ्यावी. बोटीवर तिचें नांव मागील भागीं लिहिलेलें असतें. शिवाय तिच्यावरील प्रत्येक वस्तूवर तेंच नांव लिहिलेलें असतें. नांव इंग्रजींत असतें, क्वचीत देशी भाषेमध्यें असतें. त्यावरून तीच बोट आज निघणार आहे असें समजावें.

मुंबईस बोट धक्याला लागते. यामुळें शिडीवरून ( जिन्यावरून ) बोटींत बसण्यास मुळींच त्रास पडत नाहीं. कधीं कधीं आधीं सुटणारी बोट धक्याच्या बोटीच्या पलीकडे बोटीला लागलेली असते. तिला मधल्या बोटींतून पलीकडच्या बोटींत जावें लागतें. अशा प्रसंगीं बोटींत बसणाराला ठिकाठिकाणीं माहिती देणारे लोक असतात. बोटींत बसल्यावर आपला क्लास कोणता, हें पाहून त्या ठिकाणीं बसावें. सर्व उतारूंना बोटींत जाण्याचा मार्ग एकच असतो. आंत गेल्यावर ज्यांनीं त्यांनीं आपल्या क्लासच्या जागेवर बसावें. कुली केल्यास ते उतारूंच्या सोयीनें सामानास व बायका मुलांस सोयीचे जागीं बसवितात. बोटींत गेल्यावर एका क्लासचा मनुष्य दुसरे क्लासांतील मनुष्यांशीं बोलावयास गेल्यास चालतो; पण त्यानें आपली कायमची वस्ती त्या ठिकाणीं केली नसली म्हणजे झालें. मालाच्या बोटी असतात त्यांत प्रथम माल भरतात. माल भरून झाल्यावर मग पॅसेंजरला आंत शिरण्यास परवानगी मिळते. मालाचे गठ्ठे बोटींत यारीनें कसे बिनचूक जाऊन पडतात ही गंमत पाहण्यासारखी असते. बोटीच्या धक्यावर जाण्याचें जी. आय्. पी. रेल्वेचें जवळचें स्टेशन मशीदबंदर आहे व बी. बी. लाईनचें स्टेशन चर्नीरोड आहे. चर्नीरोडपासून बोटीचा धक्का फार लांब आहे; पण मशीदपासून जवळ आहे. कोंकणचा धक्का म्हणजे अलेक्झान्ड्रा डाक मात्र मैल दीडमैल आहे. म्हणून बी. बी. लाइनीचे मंडळीनें दादरला उतरून सवड झाल्यास

२

जी. आय्. पी. नें मशीदवर यावें. दोन्ही स्टेशनवर बोटींवर जाणाऱ्यांकरितां कुली, गाड्या, टांगे, वगैरे तयार असतात व ते इच्छिलेल्या ठिकाणीं बिनचूक नेऊन पोहोंचवितात- मशीदहून प्रिन्सेस डाक मात्र अगदीं जवळ आहे. मशीदवर मेल व एक्प्रेस गाड्या उभ्या राहात नाहींत; सबब लांबच्या उतारूंनीं कल्याण स्टेशनवर उतरून लोकलमध्यें बसावें. व्हिक्टोरिया टरमिनसपासून-सुद्धां बोटीच्या बंदरावर जाणाऱ्या गाड्या मिळतात बोटींसंबंधानें एवढी सर्व साधारण माहिती दिली आहे. विशेष माहिती विशेष ठिकाणीं त्या प्रवासाच्या आधीं दिली आहे. आतां

## सामान

मुख्यत्वें काय घेतलें पाहिजे तें सांगतों. ह्या प्रवासांत कपड्यालत्याचें व भांड्याकुंड्याचें महत्व नाहीं. तीं रीतीप्रमाणें अगदीं जरूरी पुरतीं घ्यावीं. पण फराळाचें सामान मात्र चांगलें व पुष्कळ घ्यावें. हा प्रवास मुख्यत्वें उन्हाळीं करावयाचा असल्यामुळें हवेनें पदार्थ सहसा खराब होत नाहींत. तरी खराब न होणारे व पुष्कळ दिवस टिकणारे पदार्थ मुख्यत्वेंकरून घ्यावे. युरोपियन पदार्थांमध्यें बिस्किटें हा पदार्थ बराच टिकाऊ आहे. आपल्याकडचे तस पदार्थ ह्मणजे आनसें, तळलेल्या डिंकाचे लाडू व साबूदाण्याचा चिवडा हे चांगले असतात असा मला अनुभव आहे. तसेंच ताजे निवडलेले पोहे घ्यावे. बोट लागूं नये ह्मणून आल्याच्या, सुंठीच्या, जिऱ्याच्या वड्या करून घ्याव्या. व तसेंच आतां देशी पेपरमिंटें व बिस्किटें मिळतात तीं घ्यावीं किंवा आपण घरीं करावीं. हल्लीं पुष्कळ बायकांना तीं चांगलीं करितां येऊं लागलीं आहेत. परदेशी घेऊं नयेत. ह्याशिवाय लवंग, सुपारी, वेलची वगैरे पदार्थ घ्यावे. समुद्र लागूं नये ह्मणून ' मुंबईस धक्क्यावर औषधें विकत मिळतात, तींही घेऊन ठेवावीं. तसेंच संत्री, डाळिंबें, द्राक्षें वगैरे फळफळावळ घेऊन ठेवावी. कोचकाईच्या वड्या, चिंच, अमसुलाची चटणी वगैरे पदार्थ ज्याच्या योगानें ओकारी येणार नाहीं, ढवळणार नाहीं व जिभेची चव कायम राहील असे पदार्थ घेतले पाहिजेत.

अशा कृत्रीम उपायांनीं मन स्वस्थ केल्याशिवाय

## समुद्राची अवर्णनीय शोभा

व सौंदर्य यांचा अनुभव घेतां येणार नाहीं. जमिनीवर बागा, बगीचे, इमान

जंगलें, आकाशाला टेकलेले पर्वत व त्यांचीं शिखरें, दरे, खोऱ्या, यांची अपूर्व शोभा दृष्टीस पडून मनरंजन होतें. तितकीच किंवा त्याहूनही अधिक शोभा समुद्राची व महासागराची दृष्टीस पडते. जितकें जग जमिनीवर आहे तितकें सर्व किंवा त्यापेक्षां जास्त पाण्यांत आहे, हें त्याचें यथातथ्य पण संक्षिप्त वर्णन आहे. सिंह, वाघ, गेंडे वगैरे जसे जमिनीवर जंगलांत आहेत तसे समुद्रांतही आहेत ! फार काय सांगावें, मनुष्यासारखीं मनुष्येंसुद्धां समुद्रांत आहेत ! हें कोणास सांगितल्यास खरेंसुद्धां वाटणार नाहीं. पण अशीं माणसें पकडून तीं प्रदर्शनांत दाखविलेलीं आहेत. त्यांचा कमरेखालचा आकार माशासारखा असून वरील हात, डोळे, केस हे सर्व अवयव माणसासारखे असतात. यांस जलदेवता ह्मणतात. कारण यांचा आकार मच्छावतारासारखा असतो. हे प्राणी जलचर आहेत. बाहेर काढले असतां फार वेळ जिवंत राहात नाहींत. दुसऱ्या प्रकारचीं माणसें आहेत व त्यांस हातपाय आहेत; पण त्यांचीं हातापायांचीं बोटें बदकासारखीं जोडलेलीं असतात, त्यामुळें त्यांस फार जलद पोहोतां येतें. यास कोणी बदकी माणसें ह्मणतात. हे भू-जलवासी आहेत. सारांश जमीनीप्रमाणें झाडें, जानेवारें, वगैरे सर्व सृष्टि पाण्यांत आहे. मात्र हे सर्व प्राणी जमिनीवरील प्राण्यांपेक्षां थोड्या निराळया स्वरूपांत आहेत. पक्षांच्या ऐवजीं निरनिराळया पंखाचे मासे आहेत. खाणींत जशीं रत्नें सांपडतात तशीं समुद्रांतसुद्धां सांपडतात. ह्मणूनच त्यास रत्नाकर ह्मणतात. जमिनींत हिरा सांपडला तर समुद्रात मोतीं सांपडतें. बागबगीचे, कुंज, वनश्री हीं जमिनीवरचीं रम्य स्वरूपें आहेत व भयंकर दरे, खोरे, कडे ही तिचीं रौद्र रूपें आहेत. त्याचप्रमाणें समुद्राचीं सौम्य व रौद्र रूपें आहेत. समुद्र शांत असला व आकाश स्वच्छ असून समुद्रास लागलेलें असलें ह्मणजे सकाळीं, दुपारीं, संध्याकाळीं व रात्रीं निरनिराळया ऋतूंत निरनिराळया वेळीं सूर्यप्रकाशांत व चंद्रप्रकाशांत त्याच्या बाललाटांवर निरनिराळया वेळीं सूर्याचीं व चंद्राचीं किरणें पडून जे सुवर्णमय व रत्नमय अप्रतिम देखावे दिसतात, त्यापुढें जमिनीवरचे कृत्रिम देखावे तुच्छ वाटतात आणि आपण सप्त सागरांचा उपभोग घेणाऱ्या नारायणाच्या राजधानीच्या सुखविलासाचा उपभोग घेत आहों असें वाटतें ! त्याची जशी दिवसाची शोभा दिसते तशी रात्रीचीही फारच शांत आल्हादकारक शोभा दिसते. एक

तर संपूर्ण आकाश निरभ्र व समुद्रास लागलेलें दिसतें. त्या आकाश चांदव्यांत दररोज चंद्राचीं निरानिराळीं बिंबें व नक्षत्रांचीं हंड्या झुंबरें व निरनिराळ्या तेजाचे विजेचे दिवे लकलकताहेत. त्यांस तेल नको, वात नको, लावायला कोणी नको. जसजसा अंधार पडेल तसतसे हे दिवे तेजस्वी दिसतात व दिक्कालानुसारें आपल्या गतीनें खालवर नाचून आपलें ऐश्वर्य व त्यांस उत्पन्न करणाऱ्या परमेश्वराचें वैभव दाखवितात. बोटही खालवर माना हालवून त्याला रुकार देत असते; तसा समुद्रही आपल्या प्रकाशमय लाटा त्यांस दाखवून तुमच्याप्रमाणें माझ्यावरही भगवंताची कृपा आहे असें दाखवीत असतो. धर्मशास्त्रांत याला वडवाग्नि ह्मटलें आहे. सकाळीं सूर्यप्रभा चमकूं लागली ह्मणजे त्यांत सर्व शोभा अंतर्धान पावते. अशा त्या दिव्य तेजापुढें आपल्या कृत्रिम विजेच्या दिव्यांची तरी काय प्रतिष्ठा आहे! सृष्टिशोभेची योग्यता कृत्रिम शोभेला कशी येईल? हवा ही शीतोष्णानें मनुष्यांची करमणूक करून त्यांनीं खाल्लेलें अन्न पचवून त्यांस हुशारी देते.

हें याचें रम्य रूप झालें, पण हा जेव्हां खवळतो तेव्हां याच्याकडे काळाच्यानेंही पाहवणार नाहीं, एवढा तो भयंकर होतो. पर्वतप्राय लाटा अगदीं थयमान घालीत असतात. त्यांना वारा जसजसा चिथावतो, तशातशा त्या फारच भयंकर स्वरूप घेतात. अशा वेळीं बोटीचा सुद्धां उपाय चालत नाहीं. ती आतां बुडेल किंवा क्षणार्धांत बुडेल याचा नेम नसतो. तिचें चित्त ठिकाणावर नसतें. मग मचवे, पडाव, होड्या यांची गोष्ट बोलावयासच नको! अखेरचे दिवस आले ह्मणजे बोटीजवळ मचवे लाटेबरोबर पुरुष दीड पुरुष वर खालीं एकसारखे नाचत असतात. एकदां खालीं गेले ह्मणजे हे कसले वर येतात असें वाटून जीव भांबावतो. अशा भयंकर स्थितींत ते कसेतरी बोटीला लागतात व त्यांतील माणसें बोटीवर चढतात. त्यांत ओझीं, बायकामुलें असलीं ह्मणजे काळजी घेणारा परमेश्वरच! अशा भयंकर स्थितींत जे खलाशी माणसांस मचव्यावरून बोटींत बायका, मुलें सुरक्षित चढवितात त्यांचें धैर्य असामान्यच होय! अनोळखी मनुष्याचा जीव अगदीं फाटून जातो. असा प्रकार बहुधा रत्नागिरीसारख्या कठीण बंदरावर मुख्यतः अखेरचे दिवसांत ह्मणजे पावसाचे सुमारास होतो. हें बंदर फार भयंकर आहे पण तेथील खलाशीही नेहमीच्या सवयीनें विलक्षण धाडसाचे झाले आहेत. हें समुद्राचें

मध्यम स्वरूप आहे. रौद्र स्वरूप पाहण्याची कोणाचीच छाती नाहीं. किनाऱ्यावर आपण असलों तरी त्याच्याकडे पाहावत नाहीं, मग आंत कोण शिरणार ? अशा वेळीं वारा, पाऊस, मेघगर्जना त्याला मदत करितात. सर्वत्र भुताटकी सुरू होते. अशा वेळीं अगडबंब काळेकुट्ट ढग गर्जना करीत खालीं आले ह्मणजे ते प्रत्यक्ष यमदूतच दिसतात आणि यमाच्या दरबारचा थाट दृष्टीस पडतो. अशा वेळीं ह्या दरबारकडून आपणांस काय शिक्षा होईल हें सांगतां येत नाहीं ! हा भयंकर देखावा सामान्य माणसास पाहतां येणें शक्य नाहीं. जिकडेतिकडे भयंकर अंधार पडतो व त्यांत विजा चमकतात, यामुळें त्याचा गडबडगुंडाच व्हावयाचा. जमिनीवर भयंकर कड्याखालीं पाहिलें असतां जशी दृष्टि फिरते तशी किंवा त्यापेक्षांही येथें जास्त फिरते. दर्यावरील संकटें ज्यांनीं सहन केलीं आहेत त्यांना जमिनीवरच्या संकटांचें भय वाटतें; व जमिनीवरचीं संकटें ज्यांनीं सहन केलीं आहेत त्यांस दर्याचें भय वाटतें. दोहोंचा स्वतंत्र अनुभव मिळावा ह्मणूनच पूर्वजांनीं दोन्हीं ठिकाणच्या यात्रा मुद्दाम मुख्य यात्रांच्या ठिकाणीं घातल्या आहेत.

असो. बोटींत बसल्यावर जो तो आपल्या जागेवर बसतो. बोटींतील पुढल्या भागापेक्षां पाठीमागचा भाग विशेष चांगला असतो. पुढील भागीं संडास, भटारखाना असतो, यामुळें जिकडे तिकडे घाण येते. शिवाय पुढल्या भागास लाट फोडावयाची असल्यामुळें तो विशेष हालतो, तितका मागचा भाग हालत नाहीं. सुखाकडे सर्वांचीच प्रवृत्ति असते, ह्मणून प्रथम येऊन माहितगार मनुष्य त्याचा फायदा घेतो. खालच्या मजल्यापेक्षां वरचा मजला ह्मणजे सेकंड क्लास किंवा अपर क्लास चांगला असतो हें उघड आहे. हा मार्गेच असतो. याचा दर जास्त असल्यामुळें त्यांत गलिच्छ माणसें कमी येतात. यामुळें त्यांच्या गलिच्छ कपड्यांची व ओकाबोकीची घाण येत नाहीं. वारा जोराचा वाहूं लागल्यानें मोठ्या लाटेचें भरतीचें पाणी बोटींत खालच्या मजल्यावर येतें व कपडे भिजून उतारूंचे हाल होतात, तसे वरच्या मजल्यावर होत नाहींत. पाणी कितीही आंत आलें तरी बोट बुडण्याची धास्ती नसते. तें आंत न जातां परस्पर परत समुद्रांतच जाण्याची तजवीज केलेली असते. बोटीचा डेक किंवा पृष्ठभाग मध्याकडे चढत जाऊन दर्याकडे उतरत आलेला असतो. व त्याचे शेवटास पाणी जाण्याकारितां भोकें ठेविलेलीं असतात. वरच्या क्लासाला

पैसे थोडे जास्त पडतात, पण त्याप्रमाणें फायदाही असतो. मोठ्या बोटीमध्यें अप्पर क्लास व लोअर क्लास असतात. त्यांत लोअर क्लासांत बसण्यास कांहीं हरकत नाहीं; कारण त्या बोटींत पाण्याची लाट कधीं वर येत नाहीं, इतकी ती उंच व मोठी असते. तसेंच ती समुद्रांत फार खोल बुडाली असल्यामुळें साधारण लाटांनीं हालतही नाहीं.

याप्रमाणें बसल्यावर व सामानसुमान नीट लाविल्यावर बोट चालूं लागली म्हणजे डेकवर येऊन बोट बंदरांतून कशी सुटते, मुंबई बंदरांत लहान मोठ्या बोटी नावरत असतात त्यांत कांहीं मालाच्या, माणसांच्या, कोळशांच्या चिखल व गाळ काढण्याच्या आपआपलीं कामें कशा करीत असतात, दुसरीं गलबतें, होड्या, पडाव, समुद्राच्या लाटांनीं खालवर कशा नाचत आहेत, जणुं काय आपल्या वरचा भार कमी झाला–आपण सुखरूप घरीं आलों, मुंबई बंदराचा सुंदर देखावा पाहात पाहात आपली बोट कसकसा मार्गक्रमण करीत आहे व मुंबई बंदराचे देखावे कसे दाखवीत आहे, त्याचें चांगलें निरिक्षण करावें. हा सर्व देखावा पाहण्यांत सुमारें एक तास जातो. शेवटीं कुलाब्याची दांडी दिसत नाहींशी झाली म्हणजे जरा आपल्या जागेवर बसून विश्रांति घेऊन नंतर बोटीची व्यवस्था पहावी. प्रत्येक क्लासच्या उतारूंची काय सोय आहे, त्यांच्याकरितां संडास, जेवण्याखाण्याची व्यवस्था, गोडें पाणी, खारें पाणी, लघवीची सोय, वगैरे सोईची माहिती करून घ्यावी. कधीं कधीं बोटीवर टपाल असतें-त्यांत पत्रें टाकिलीं असतां तीं इच्छिल्या ठिकाणीं जातात. नंतर बोटीची अंतर्व्यवस्था पहावी. बोट ज्याचे ताब्यांत असते त्यास कप्तान म्हणतात. त्याची अगदीं स्वतंत्र खोली असते, तींत ज्या मार्गानें बोट जावयाची त्याचा नकाशा असून त्याचे आसपासचे दुसरेही समुद्राचे नकाशे असतात. बोटीच्या अगदीं वर पुढल्या भागीं सुकाणु धरणारा असतो. त्याजवळ होकायंत्र, सुकाणूं व तें वळविण्याचें चक्र, तसेंच समुद्रतळचा उंचसखलभाग दाखविणाऱ्या खुणांचा, तसें बंदरांच्या दिवेबत्तींच्या खुणांचा असे नकाशे असतात. शिवाय बोटीचे खालीं तळमजल्यावर इंजनीअर बोटीचें इंजन चालवीत असतो, त्याला वरचा सुकाणूवाला विजेच्या घंटेनें खुणा करीत असतो. त्याप्रमाणें तो इंजन चालवितो व त्याप्रमाणें बोटीला इच्छित गति मिळते. सुका-

णू फिरविणें, यारीनें माल चढविणें, उतरविणें, वगैरे जेथें जेथें शक्तीची जरूर आहे, तेथें तेथें ती वाफेची दिलेली आहे.

आगबोटीचें इंजिन फारच मोठें असतें. लहान बोट असली तरी तिचें इंजिन सर्वांत मोठ्या आगगाडीच्या इंजिनापेक्षांही फारच मोठें असतें. इंजनरूममध्यें बहुधा कोणास जाऊं देत नाहींत. पण ओळखीमुळें किंवा कामाची माहिती असलेल्यांना क्वचित् जाऊं देतात. पण तेथें जातांना अगदीं उघडें जावें. जागा अगदीं अपुरी असते व यंत्रें चालू असतात. न जाणों कदाचित् आपला कपडा त्यांत सांपडल्यास अनर्थ होण्याचा संभव असतो. आंत वापरणाऱ्या इंजनीअरचे कपडेसुद्धां अगदीं अंगासरसेच असतात. ह्मणजे विजार कोट सुटे नसून जोडून शिवलेले असतात व ते अगदीं अंगासरसे बसतात. या इंजनमध्यें बोट मागेंपुढें, बाजूला, इकडे तिकडे वळविण्याची व सावकाश जलद चालविण्याचीं साधनें असतात. बॉयलर रूम आणि इंजन रूम हीं गिरणीप्रमाणें बोटींतही निराळीं असतात. बॉयलरमध्यें कोळशानें आग व पाणी कायम ठेवून त्या योगानें इच्छित शक्तीची वाफ ठेवतात. व इंजिनमध्यें त्या वाफेचा नळ आणून ती निराळ्या यंत्रांत सोडून ड्रायव्हर तिचेंजवळून कप्तानाचे हुकुमाप्रमाणें काम करवून घेतो. यामुळें एवढी मोठी बोट, पण अगदीं एका मनुष्याच्या हुकुमाप्रमाणें गोंधळ गडबड न होतां सुव्यस्थित व सुरक्षित चालते. ही व्यवस्था खरोखर पाहण्यासारखी असते. गोडें पाणी कदाचित संपलें तर खारे पाण्याची वाफ करून, पुन्हा त्याचें गोडें पाणी करण्याचें यंत्र असतें. बोट कदाचित तुफानांत सांपडली ह्मणजे ती इष्ट स्थळीं नेतां येत नाहीं. जिकडे ती सुरक्षित नेतां येईल तिकडे तिला न्यावी लागते. अशावेळीं, गोडें पाणी संपल्यास ही योजना आहे. शिवाय मनुष्याप्रमाणें यंत्रालासुद्धां गोडें पाणीच पाहिजे असतें. खारें पाणी चालत नाहीं. त्याला अन्नाच्या ऐवजीं कोळसा लागतो; पण आतां तेलानेंसुद्धां चालणाऱ्या बोटी निघाल्या आहेत.

बोटीला किनारा दिसतो तोंपर्यंत आपण कोठें आहों हें समजतें. पण ती एकदां अखंड दर्यांत गेली ह्मणजे तिला आपण कोठें आहों हें समजण्याचें साधन होकायंत्र घड्याळ, चंद्र, सूर्याच्या गती व नक्षत्रांची स्थिति व त्याचे नकाशे हींच आहेत. पण त्याशिवाय अखंड समुद्रांत मूळ ठिकाणापासून आपण किती लांब आलों आहों हें दाखविण्याकरितां पाण्यांत एक यंत्र

सोडलेलें असतें. तें बोटीच्या वेगाप्रमाणें पाण्याच्या ओढीनें फिरतें व त्यापासून आपण किती मैल लांब आलों आहों हें समजतें. याशिवाय बोटीवर चार पांच लाईट बोटी, कडीं व बंड्या असतात. बोट एकाएकीं फुटली तर, किंवा ती नादुरुस्त होऊन बंद झाली तर ह्या पडावांचा उपयोग करून लोकांचे प्राण वाचवावयाचे असतात. ह्या कड्यांच्या व बंड्यांच्या योगानें मनुष्य पाण्यामध्यें आपोआप तरूं शकतो. याशिवाय महासागरांत जाणाऱ्या बोटींवर बिनतारी तारायंत्र असतें. त्यावरून संकटाच्या प्रसंगीं आसपासच्या बोटींना मदतीस बोलावितां येतें. त्यावेळीं जिच्यावर संकट आहे ती बोट महासागरांत कोठें आहे, हें तिनें सांगितलेल्या अक्षांश रेखांशावरून समजतें व त्याप्रमाणें जवळच्या बोटी येऊन प्राणहानी वांचते. हे सर्व प्राण रक्षणाचे उपाय आहेत. याचें कारण दर्याची अशाश्वती ! ! बोटी निघतांना तुफान होणार नाहीं, हवा स्वच्छ आहे, अशाबद्दल ऑबझर्व्हेटरीचा ( सरकारी वेधशाळेचा ) दाखला मिळतो.

याशिवाय बोटीच्या सलूनमध्यें त्या बोटीला सरकारनें दिलेलें सर्टिफिकेट किंवा परवाना लाविलेला असतो; त्यांत ही बोट कोणाची, कोणीं बांधली, तिचें वजन, तीवर घ्यावयाचे प्रत्येक क्लासचे उतारूंची संख्या, खलाशांची संख्या, तिचा चालण्याचा वेग, तिचें सर्व सामान दुरुस्त असून प्राणरक्षक सर्व साधनें कायद्याप्रमाणें भरपूर आहेत, व यंत्ररचना दुरुस्त असून एक मोसमापर्यंत न बिघडणारी आहे, अशाबद्दल सरकारी इंजनीअरचें सर्टिफिकेट, बोटीचा प्रवास मार्ग ह्मणजे कोठपासून कोठपर्यंत तिनें प्रवास करावा, किती दिवस करावा, त्या काळांतील प्रवासाला योग्य काळ, मध्यम काळ व धोक्याचा काळ कोणता ह्यांचें वर्गीकरण केलेलें असतें. त्यांत पश्चिम किनाऱ्यावर योग्य काळ आक्टोबरपासून मार्चपर्यंत असतो. या काळांत जलप्रवास खरोखरच सुखावह असतो. नवख्या मनुष्यानें ह्या काळांत निर्धास्तपणें प्रवासास निघावें. तसेंच त्यांत चालू कप्तानाचें नांव, इंजनीअरचें नांव, त्याच्या परिक्षा, खलाशांची प्रत्यक्ष संख्या किती आहे, वगैरे सर्व गोष्टी लिहिल्या असतात. या परवानगीच्या आंत सर्व व्यवहार झाले पाहिजेत. बाहेर झाल्यास कंपनीस दंड होतो. कदाचित् त्यांचा परवानाही रद्द होतो. बोटीला दिलेल्या अधिकारापर्यंतच ती चालविली पाहिजे. नंतर सर्व सामान दुरुस्त असल्या

बद्दल पुन्हां दुसरे मोसमाकरितां सर्टिफिकेट घ्यावें लागतें. बोटींची झडती वाटेल तेव्हां वाटेल त्या कस्टम अधिकाऱ्यास घेण्याचा अधिकार आहे; इतका कडक बंदोबस्त आहे. आधुनिक शास्त्राप्रमाणें समुद्राचा तळ, समुद्रावरचे फेरफार व वादळें समजण्याचीं बरींच साधनें उपलब्ध झालीं आहेत व त्याबद्दल पाश्चात्यांना मोठी घमेंड आहे. तरी भलतेच वेळीं एकाएकीं वादळ होऊन त्या बुडतात ! टिटॉनिक सारख्या कोऱ्या, पूर्ण बंदोबस्ताच्या व खात्रीच्या बोटी क्षणार्धांत सहकुटुंब सहपरिवार रसातळाला गेल्या आहेत व अद्यापही जात आहेत ! व मी सर्वस्वी तुमच्या ताब्यांत येणार नाहीं, माझी लहर निराळी आहे, असें मनुष्यांना वारंवार हा रत्नाकर ऊर्फ वरुण राजा बजावीत आहे. तरी मनुष्य आपला प्रयत्न सोडीत नाहींच ! !

असो. येथपर्यंत वरुणाचें प्रकृतिमान, त्याचा राज्याधिकार व त्याला वश करण्याचीं साधनें काय करावीं, तपश्चर्या कशी करावी हीं सांगितलीं. हीं माहिती लहान म्हणजे एका देशाचे किनाऱ्यानें जाणाऱ्या बोटींची झाली. महासागरांतून द्विपांतरास जाणाऱ्या मोठ्या बोटींची माहिती आणखी पुष्कळ आहे. पण तिचा आपल्या यात्रेशीं संबंध नाहीं म्हणून ती दिली नाहीं. तरी सवड साधेल त्यानें परदेशची नांवाजलेली एखादी प्रख्यात बोट अवश्य पाहून घ्यावी. महासागरांतील प्रवास बारा महिने चालू असतो. महिना महिनाही कधीं कधीं प्रवाशाला बोटींत राहावें लागतें. ह्या प्रवासांत हाल होऊंच नयेत तर ऐहिक सुखाची परमावधी करण्याचा त्यांनीं दीर्घ प्रयत्न केला आहे व अजूनही करीत आहेत, असें त्यांच्या प्रवास वर्णनावरून दिसतें. ह्या बोटींत सामान्य प्रवाशानें घरीं कधीं सुख अनुभविलें नसेल, इतक्या सुखाची परमावधी असते. श्रीमंताकडे दिवाळसणांत जावयाचा जो थाटमाट असतो तसा येथें त्यांचा होतो. मात्र त्याची पाश्चात्य पद्धति असते. त्यांना आपण प्रवासांत व समुद्रांत आहों, असें वाटत सुद्धां नाहीं. दिवसांतून चार पांचवेळां परोपरीचें जेवण, खाणें, सुखशय्या, नाचरंग, परोपरीचे खेळ, करमणूक, पोहणें, आराम, विनोद आणि स्वच्छंदीपणा यांची रेलचेल असते. फर्स्ट क्लासांत त्यांचा श्रेष्ठपणा असतो. व सेकंड क्लासामध्यें कांहीं कमतरता असते एवढेंच. भाडोत्री प्रेमाचीं कां होईनात पण प्रेमाचीं चार माणसें शब्द झेलण्यास अगदीं तयार असतात. मात्र पैशाची पिशवी जशी खुली असेल तसें हें सुख अनुभवितां

येईल. आपण हें सुख अनुभविलें नाहीं, तरी तें पाहण्यासारखें व सवडीनुसार अनुभवण्यासारिखें आहे. ही बोट पाहण्यास कस्टमची परवानगी लागते. याशिवाय लष्करी क्रूझरें, टारपेडो, पाणबुड्या, ह्या पाहण्याचें आपल्या नशिबीं नाहीं. मग हें जिवंत शिक्षण आपणांस मिळण्याची आशा कोठली? श्रीमंत लोक दुसरीं शिक्षणें घेण्यास जातात त्यापेक्षां खलाशी होऊनसुद्धां हें ज्ञान शिकतील तर देशाचा फार फायदा होईल. कोणी ह्मणेल कीं, खलाशाचें काम वाईट; पण त्यानें लक्षांत ठेवावें कीं, हें काम इंग्लंडच्या राजपुत्राला सुद्धां करावें लागतें. युरोपियन लोकांना त्यांच्या दीर्घ सहवासानें व परम भक्तीनें वरुण राजा कांहीं प्रसन्न झाला आहे. तो स्वतः रत्नाकर असल्यामुळें अपार संपत्ती स्वतः व व्यापाराच्या रूपानें त्यांस देत आहे. आपले पूर्वज आर्यसुद्ध समुद्रपर्यटण करून फार सामर्थ्यवान् झाले होते.

युरोपमधील रशियांत शिवालय सांपडलें असून तेथें जमिनींतून ग्यास निघून त्यानें अक्षय दिवा तेवत आहे. जावा, सुमात्रा, आफ्रिका येथे गणपती, शंकर, यांच्या मूर्तींचे अवशेष सांपडतात. तेथें व खुद्द उत्तर दक्षिण अमेरिकेंत सुद्धा संस्कृत ग्रंथ व मोठ्या इमारतींचे अवशेष सांपडले आहेत. असें असतां अमेरिकेच्या शोधाचा मान मात्र युरोपियन लोक कोलंबसला देऊन आपल्याकडे घेत आहेत. हें आर्यांचें समुद्रपर्यटण भूकंपाच्या जबरदस्त धक्क्यामुळें आणि अनार्य लोकांच्या वारंवार हल्ल्यामुळें बंद पडलें असावें. किंवा आजपर्यंत पादाक्रांत केलेला मुलुख आपल्या वस्तीला अगदीं पुरेसा आहे, व तो बंदोबस्ताचा आहे, ह्यापुढें आपली संघशक्ति त्याचे रक्षणाकरितां वाढविणें जरूर आहे, असें पाहून समुद्रपर्यटण ह्यापुढें त्यांनीं निंद्य मानिलें असावें असें दिसतें. पण आतां तो काळ जाऊन पुन्हां समुद्रपर्यटण केल्याशिवाय असुरांनीं महासागरांत नेलेली लक्ष्मी परत मिळणें शक्य नाहीं. स्वराज्य असतें तर ती लवकर मिळती. आणि जपानानें ती तशी मिळविलीही आहे. आपल्याकडे स्वराज्य होतें तेव्हां या कार्याला आरंभ शिवाजी महाराजांपासूनच झाला होता. पेशवाईत आंग्र्यांचें आरमार त्यावेळच्या मानानें बरच वरच्या दर्जाचें झालें होतें. पण राज्याच्या आंतली व्यवस्था होऊन सरहद्दीचा बंदोबस्त झाल्यावर ह्या गोष्टींकडे पेशव्यांचे लक्ष जाणार होतें, इतक्यांत सूर्यास्त झाला. अंधार पडून घुबडें ओरडूं

लागलीं व आपला पराक्रम गाऊं लागलीं !

आतां हिंदू लोकांनीं प्रथम खलाशाच्या शिक्षणापासून आरंभ केला पाहिजे. हल्लीं ही विद्या परकीयांचे ताब्यांत गेली असल्यामुळें नवीन सुधारणेच्या दृष्टीनें तिच्यामध्यें प्रवीणता आपणांस मिळणें शक्य नाहीं. तरी खलाशाचें काम आल्यानेंही बराच फायदा होण्याचा संभव आहे. पण आपल्या हिंदू लोकांना द्विपांतरांत जाणाऱ्या प्यासेंजर बोटींत खलाशीसुद्धां घेत नाहींत, मग आरमारी बोटींचें नांवच नको. याचें कारण त्याना माहीत आहे कीं हे लोक खलाशाचें काम शिकण्याकरितां आले आहेत खरे, पण हे जातीचे खलाशी नाहींत ह्यांची बुद्धि आपल्याप्रमाणें तीव्र आहे. हे आपलें कसब घेतल्याशिवाय राहणार नाहींत. इतकेंच नव्हे, तर काळ अनुकूळ झाल्यास ते आपल्यावरही ताण करतील आणि ही गोष्ट अनुभवानें खरी ठरली आहे. आपल्या महाराष्ट्रातील लोकांनीं याचा सरकारास प्रत्यय आणून दिला आहे. हेच जर इंग्लंडांत जन्मलेले असते तर खचित् त्यांचा मोठा गौरव होऊन ते लॉर्ड झाले असते. असो. वरुणराजाच्या राज्याचें किती जरी वर्णन केलें तरी तें पुरें होणार नाहीं सबब तें आतां पुरें करूं. यात जी माहिती दिली आहे, तिचा अनुभव आपल्यासारख्या समुद्र किनाऱ्याच्या प्रवास करणाऱ्या एकदेशी मनुष्यास मिळणें शक्य नाहीं. तरीपण वरुण राजाचें वैभव समजावें म्हणून अगदीं स्थूलमानानें त्याचें दिग्दर्शन केलें आहे; इतका वरूण राजाचा आकुंठित अधिकार सांगितला पण मनुष्यानेंही कांहीं कमी केलें नाहीं. समुद्र कुक्कुटाप्रमाणें पाण्यावर तरणारी व तीच मटारीप्रमाणें जमिनीवर धावणारी व विमानाप्रमाणें आकाशांत उडणारी अशी स्वच्छंदानें त्रिखंड गमन करणारी विमान बोट काढली असून ती अफगाणिस्थानचे अमीर हिंदुस्थानांतून १९२८ सालीं युरोप पाहण्याकरितां गेले त्या वेळीं हिचे प्रयोग मुंबईचे बंदरांत सर्वांस पहावयास मिळाले. अशी बोट त्यांनीं आपणाबरोबर घेतली होती. याशिवाय विशेष माहिती ठिकठिकाणीं सांगितली आहे. आतां

## यात्रेचें वर्णन.

करूं. ह्या यात्रा मागील भागांत सांगितल्याप्रमाणें माझ्या एकदम झाल्या नाहींत. त्या अगदीं भिन्न काळीं झाल्या आहेत. कांहीं यात्रांमध्यें दहावीस

वर्षीचें सुद्धां अंतर आहे ! तेव्हां केलेल्या वर्णनांत व चालू काळीं कांहीं फरक सांपडेल पण तो ह्मणण्यासारखा नाहीं. जशा क्रमानें यात्रा केल्या तशा सांगण्यांत अर्थ नाहीं. ह्मणून वाचणाराला व जाणाराला सोयीस पडेल्या अशा प्रकारें क्रमानें त्यांचें वर्णन करीत आहें. प्रथम मुंबईच्या आसपासच्या ठिकाणाची माहिती देऊं. मुंबईहून बडोदा रेल्वेनें मी प्रथम बोरिवली स्टेशनवर पहाटे गेलों, तेथून पूर्वेस पांच मैलांवर

## कानेरी

च्या डोंगरांत उत्कृष्ट कोरींवलेणीं आहेत. रस्ता सिधा आहे पण सडक नाहीं. ( कदाचित् आतां झाली असेल ) ह्मणून तेथें जाण्याकरितां कोणी माहितगार मनुष्य घ्यावा. असे मनुष्य स्टेशनावर मिळतात, माहितगाराशिवाय जाऊं नये. कारण त्या जातीचे डोंगर तिकडे त्या बाजूस पुष्कळ आहेत. रस्ते अनेक फुटतात, मनुष्य चुकतो व व्यर्थ श्रम मात्र पडतात. आमची ओळख तेथील पब्लीक वर्क्स खात्यांतलि एका कारकुनाची झाली होती. त्यानें, तुह्मांला मी खातरीचा मनुष्य देईन असें सांगितलें होतें. त्याच्या भरंवशावर आह्मीं गेलों. पहाटे पांच वाजतां निघालों. हेतु हा कीं, ऊन होऊन चालण्याचे श्रम वाटूं नयेत व ऊन होण्याचे आधीं वर जाऊन बसावें. पण परमेश्वरास तें रुचलें नाहीं. दिलेला गडी इतका वेळ वाट चुकला कीं शेवटीं आह्मांला त्याला सोडून द्यावा लागला. तो एक डोंगर चढावयाला आरंभ करी, अर्धा चढला ह्मणजे हा कानेरीचा डोंगर नाहीं; मग तो उतरून दुसऱ्यावर नेई. तो फिरून अर्धा चढला ह्मणजे चुकलों असें ह्मणून तो परत फिरे. असें करितां करितां दहा वाजेपर्यंत त्यांनीं आमची फरफट काढली ! अंतर फार थोडें होतें. डोंगराचा चढाव बेताचा, असें मी ऐकिलें होतें. ह्मणून आह्मीं आपल्या बरोबर बायकाही घेतल्या होत्या. उन्हांनीं त्यांचा जीव कासावीस होऊन त्या अगदीं दमून गेल्या. रस्ता आडवळणी होता ह्मणून दुसरा माणूसही भेटेना. शेवटीं अकरा वाजले. तेव्हां रानांत एक कातकरी भेटला, तो लांकडें तोडून मोळी बांधीत होता. त्याला आह्मीं विचारिलें, तुला कानेरीचीं लेणीं माहीत आहेत काय ? तो ह्मणाला, आहेत, नक्की माहीत आहेत. तुझी मोळी गांवांत किती किंमतीस विकते ? त्यानें सांगितलें चार आण्याला. त्याला सांगितलें आह्मीं

तुला चार आणे देतों. आम्हाला कानेरीचीं लेणी दाखवून बोरिवली स्टेशनावर परत पोहोचव. तो प्रथम कबूल झाला नाहीं, पण शेवटीं पांच आण्याला कबूल झाला. आमचा असा करार होत होता तो पूर्वीचा गडी ऐकत होता. तो म्हणे, अहो कशाला चार आणे देता? हा कानेरीचा डोंगर आला. आतां आपण लौकर पोहोचूं. पण त्याच्या ह्या बोलण्याचा आम्हाला अगदीं वीट आला होता. ह्या गड्याचें नक्की झाल्यावर आम्हीं पूर्वीच्या गड्यास परत जाण्यास सांगितलें. तो ऐकेना. तो म्हणे, इतका वेळ लेणीं शोधण्याकरितां मी मेहनत केली आणि हा त्याचें फल घेणार! शेवटीं आम्हीं त्याला सांगितलें आतां जर तूं गेला नाहींस तर आम्हीं सर्व तुला जोड्यानीं मारून हाकलून देऊं, तेव्हां तो एकदांचा गेला! लांडगा आलारे लांडगा आला! ह्या गोष्टीप्रमाणें झालें. आणि नव्या मनुष्यानें अर्ध्या तासाच्या आंत आम्हाला कानेरीस पोहोचविलें, तों बारा वाजले. उन्हाचे दिवस. मे महिना. जीव अगदीं हैराण होऊन गेला. मग आम्हीं एका विहारांत ( दालनांत ) बसून प्रथम विश्रांति घेतली. स्नानें आटोपून यथेच्छ फराळ केला, तो अमृतमय लागला हें सांगणें नकोच. दोन वाजेपर्यंत पुन्हां विश्रांति घेतली व लेणीं पाहूं लागलों.

लेण्यांनीं तो डोंगर बहुतेक पोकळ केला होता. एकंदर लेणीं लहान मोठीं अशीं १०२ एकशें दोन आहेत. पैकीं २७ मोठीं व बाकीचीं लहान आहेत. ह्यांतील शिलालेखांवरून हीं इ. स. च्या दुसऱ्या शतकांत तयार झालीं असावीं. नं ३ च्या लेण्यावरील लेखावरून हें काम शातकर्णी गौतमीपुत्र याचे कारकीर्दींत (इ. स. १८० ) गजसेन व गजमित्र या दोन बंधूनीं केलें असून त्यांच्या पत्नी सुद्धां त्यांच्या मूर्तीं तेथें कोरल्या आहेत. या लेण्यांतील प्रार्थनामंदिरें, सभागृहें, प्रचंड मूर्ती पहाण्यासारख्या आहेत. प्रत्येक लेणें, आंतील मूर्ति किंवा स्तूपासुद्धां अखंड दगडाचें आहे. व प्रत्येक लेण्याजवळ त्याच एकसंध दगडाचें सुंदर कोरलेलें पाण्याचें टाकें आहे. टाक्याचें पाणी इतकें स्वच्छ आहे कीं, आंतील कंबरभर किंवा ढोपरभर तळ स्वच्छ दिसतो. प्रत्येक टाकें नीट चौरस कोरलेलें व कमरेइतकें पाण्यानें भरलेलें आहे. पाण्यास वापर नसतां आंत गाळ किंवा कचरा न सांचतां मे महिन्यांत इतकें स्वच्छ पाणी कसें राहिलें, याबद्दल कल्पना होईना. पाण्यास कांहीं वास येत नाहीं, कांहीं नाहीं. अगदीं पिण्यासारखें पाणी. हें पाणी सांचवणी नसून झऱ्याचें होतें. पण

वैशाख महिन्यांत हें इतकें पाणी राहिलें, मग हीं टाकीं खोदतां कशीं आलीं? शिवाय पाण्याच्या धर्माप्रमाणें तें नासलें पाहिजे. किंवा वाहात असलें पाहिजे. पण हें न वाहतां अखंड गंगेप्रमाणें निर्मळ कसें राहिलें? ह्या गोष्टी खरोखर विचार करण्यासारख्या आहेत. हल्लीं सुधारलेलें जग ह्मणजे पाश्चात्य लोक पाण्याची परीक्षा करून कोणतें शुद्ध हें ठरवितात. पण आमचें जुनें पाणी जेथें आहे, त्याची बरोबरी आजपर्यंतच्या नवीन पाण्यानें कधींच झाली नाहीं. डोंगरी किल्ल्यांत, लेण्यांत, जेथें जेथें आमच्या पूर्वजांनीं पाणी पाहून ठेविलें आहे, तें स्वरूपानें सर्वांत उंची व फारच आरोग्यदायक, पाचक, तरतरीत, तेजस्वी व उत्साहवर्धक असें आहे. तसें नवें पाणी कोठेंही नाहीं. नवें पाणी अगदीं मिशामिशित आहे, ही गोष्ट प्रांजळपणें कबूल करावी लागते.

हीं लेणीं ह्मणजे बौद्धांचे विहार आहेत. बौद्ध भिक्षूंना एकांतामध्यें राहण्यासारख्या खोल्या, पाण्याची सोय, सुंदरपणा, प्रत्येक खोलीला शोभा आणण्याकरितां बरेच ठिकाणीं नक्षी, चित्रें, धार्मिक पुतळे केले आहेत. असे धार्मिक पुतळे करण्याचें कारण हेंच कीं, धर्म व तत्वज्ञान ह्याशिवाय दुसरें कोठें कधींही लक्ष लागूं नये. एकांतामध्यें विचार करण्याकरितां ह्या जागा खरोखर चांगल्या आहेत. मी पुढें वेरूळासारखीं बरींच चांगलीं उच्च प्रतीचीं कोरींव लेणीं पाहिलीं व त्यांचें वर्णन वाचकांना करून दिलें असल्यामुळें मला आतां ह्यांत कांहीं विशेष वाटत नाहीं. परंतु ज्यांनीं पूर्वीं कधींच कोरींवलेणीं पाहिलीं नसतील त्याना हीं लेणीं बघून खरोखर अत्यानंद होईल. दर शनवारीं व रविवारीं बरीच मंडळी मुंबईहून येथें सहलीकरितां येते. पार्शी, ख्रिश्चन, मुसलमान, युरोपियन वगैरे सर्व धर्मांचे लोक येतात. हे येणारे अर्थात सर्व जिज्ञासू असतात. पुराण वस्तू संरक्षण कायद्याप्रमाणें हल्लीं येथें पहारा व बंदोबस्त ठेविला आहे; व प्रत्येक लेण्यावर नंबर घालून तें आहे त्या स्थितींत सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न चालला आहे. हीं लेणीं पाहण्यास त्रास किंवा कर मुळींच नाहीं. सकाळच्या गाडीनें चांगलें फराळाचें घेऊन येऊन संध्याकाळचे गाडीनें सहज मुंबईस परत जातां येतें. हीं लेणीं पाहून परत बोरिवलीस येण्यापेक्षां मुंबई शहरचें पाणी पुरविणारे विहार व तुळशी तलाव येथून जवळच आहेत. ते पाहून बोरिवलीच्या ऐवजीं ठाण्यास रेलवेंत बसण्यास यावें. ठाण्यापासून बोरिवलीपर्यंत डोंगराच्या

आडव्या तीन चार रांगा आहेत. त्यांपैकीं बोरिवलीपासून एक टाकून दुसरींत ही लेणीं व त्यांचे पूर्वेस सखलजागीं तलाव आहेत. पुढें ती टेकडी टाकिली म्हणजे विहार व तुळशी तलाव लागतात. म्हणून ठाण्यापासून किंवा बोरवली-पासून हे सारख्याच अंतरावर आहेत. प्रत्येक ठिकाणाहून एक डोंगर उलटावाच लागतो. हे दक्षिणउत्तर आहेत.

आम्ही सात आठ असामी हीं लेणीं पाहावयास गेलों होतों. लेणीं पाहून झाल्यावर आमच्या मनाचें समाधान झालें व सर्व शीण नाहींसा झाला. पण पुढें वेळ नसल्यामुळें विहार तुळशी दुरूनच पाहून नंतर पांच वाजतां आम्ही तेथून निघालों, ते साडेसहा वाजतां बोरिवलीस सहज हंसत खेळत व गप्पा मारीत परत आलों. येतांना माहित-गार मनुष्य असल्यामुळें आम्हाला बिनकूल त्रास पडला नाहीं. इतका रस्ता चांगला असतां सकाळीं आम्हाला विनाकारण काट्याकुट्यांतून, जंगलांतून जाण्याचा त्रास पडला याबद्दल त्या कारकुनाचा विनोदानें आम्ही बराच समा-चार घेतला. पांडवाना लाक्षा गृहांत घालून जाळण्याचा कौरवांनीं प्रयत्न केला होता, त्याप्रमाणें आम्हाला जंगलांत घालून मारण्याचा प्रयत्न तुम्ही केला होता. पण परमेश्वर आम्हांस सहाय्य असल्यामुळें त्यानें आपला दूत पाठवून आम्हाला वांचविलें व तुमच्या कृपेनें आम्ही कृतकार्य झालों, ह्याबद्दल तुमचे आमच्यावर जन्माचे उपकार झाले आहेत, ते विसरणें शक्य नाहीं, वगैरे निरनिराळया मंडळीचे विनोद त्या कारकुनाशीं चालले होते. त्यानें झालेल्या आगळकीबद्दल क्षमा मागितली व गड्याच्या विश्वासावर राहिल्यामुळें असमजु-तीनें असा प्रकार घडला ह्याबद्दल क्षमा कराल अशी आशा आहे. तुमच्या-पेक्षां बायकांना पडलेला त्रास विशेष चिंतनीय आहे पण आतां उपाय काय! न कळत झालेल्या चुकीबद्दल परमेश्वरही क्षमा करितो, तर तुम्ही कराल अशी बळकट आशा आहे. खरोखर क्षमा मागणें व करणें ह्या केवळ अलीकडे औपचारिक गोष्टी झाल्या आहेत. इंग्रजींत थँक्स-मध्यें जितकी लबाडी भरली आहे तितकीच त्यांत आहे. सुखदुःख ज्याचें त्याला प्रत्यक्ष भोगावच लागतें. अयोध्येस आल्यावर सीता गरोदर असतां तिच्या करमणुकीकरितां रामचंद्र आपल्या वनवासांतील सुखदुःखाचे प्रसंगांची तीस आठवण देत. त्या दुःखाच्या प्रसंगाच्या आठवणीनें तिला दुःख न होतां

सुखच होत असे. तशा त्या झालेल्या अडचणी आम्ही पुढें हशावरीच नेऊन्या आणि आम्ही जिकडल्या तिकड गेलों! मला त्या प्रसंगाची आठवण आज तीस वर्षें झाली तरी अगदीं ताजी आहे. व प्रत्येकाचे हृदयांतून मरेपर्यंत ती जाणें शक्य नाहीं.

बोरीवलीनंतर पुढें भायंदर स्टेशनपासून वसईचा पूल लागतो. हा पूल वसईच्या खाडीवर सुमारें एक मैल लांबीचा बांधला आहे. मध्यें पाणजूं नांवाचे बेट घेतलं आहे. जगांत जे प्रसिद्ध पूल आहेत त्यांपैकीं हा एक आहे. हा पूल बांधण्यास कोट्यावधी रुपये खर्च झाले आहेत. अर्थात हें काम पहाण्यासारखें आहे. आतां हा पूल पुन्हां नवा बांधला आहे. ह्या पुलाच्या संरक्षणाकरितां एक लहान वर्कशॉप व एक स्वतंत्र ऑफिसर पाणजूं येथें ठेविला आहे. नेहमीं याची रिपेअर चाललेली असते या पूलाला पाऊणशें कमानी आहेत व सर्व पूल लोखंडी आहे. भायंदरपासून रेल्वेचे दोहीं बाजूंनीं मिठागरें लागतात. तेथें समुद्राचें पाणी भरतीचे वेळीं खजिन्यांत कसें घेतात, कुंड्यांत कसें सोडतात, कुंड्यांतलें पाणी वरचेवर हालविल्यानें सूर्याच्या उष्णतेनें तें उडून जाऊन त्यांच मीठ कसें बनत जातें, त्या निरनिराळ्या प्रसंगाच्या सर्व कृती या ठिकाणीं गाडींतून सुद्धां स्पष्ट दिसतात कांहीं कुंड्यांत पाणी अगदीं नवीन घेतलें असतें, कांहींत साखा जमलेला असतो, व कांहींत अर्धवट मीठ झालेलें असतें. दुसऱ्यातलें मीठ पूर्ण वाळून पिकल्यामुळें तें काढून त्याचे बांधावर ढीग पडले होते. पुढें तें मीठ निरनिराळ्या चाळणीवर टाकून त्याचे लहान मोठे खड्याप्रमाणें ढीग घालतात. अशी ढीग घातलेली रास सरकारी अधिकाऱ्यांनीं पास केली म्हणजे ती विक्रीकरितां खुली होते. बारीक राहिलेलें मीठ पुन्हां कुंडींत किंवा रस्त्यावर खडीसारखें टाकतात. राशीची विक्री सरकारच्या कस्टम ( मीठ ) खात्याच्या सरकारकून कचेरींतून होते. कचेरींत सरकारी ड्यूटी भरली म्हणजे मीठ नेण्याचा पास मिळतो. तो पास व मीठ तयार करणाऱ्या मालकाची मिठाची किंमत दिली म्हणजे सरकार वेळाकर्ला मीठ मोजून देण्याचा हुकूम करतें व मालकास मीठ मिळतें. मिठाची विक्री मोठी म्हणजे हजारों मण असली तर ड्यूटी मुंबईच्या कस्टम ऑफिसमध्यें किंवा सरकारी बँकेंत भरावी लागते. ह्या मीठ विक्रीचा हंगाम जेव्हां जारीनें सुरू असतो तेव्हां भायंदर स्टेशनहून ऐशीं डब्यांपर्यंतची

एक ट्रेन रोज भरून जाते! त्याशिवाय समुद्र मार्गानें शेंकडों गलबतें भरून जातात. असा भायंदर येथें मिठाचा मोठा दांडगा व्यापार आहे. आगरांतून मीठ मोजून दिल्यावर त्याची बरेच ठिकाणीं तपासणी होते. शेवटची तपासणी मीठ रेल्वेनें पाठविणें असल्यास रेल्वेवर कस्टम ऑफिस ठेविलें आहे. तेथें होऊन त्याचा दाखला घ्यावा लागतो. त्याच्या दाखल्याशिवाय रेल्वेला मीठ पाठविण्याचा अधिकार नाहीं. समुद्रमार्गानें जें मीठ जातें त्याची शेवटची तपासणी खाडीच्या तोंडाशीं सरकारी बार्ज्य ठेवला आहे त्यावर होते. हा बार्ज्य ह्मणजे एक लोखंडी गलबत खाडीच्या मध्यमार्गी नांगरून ठेविलें असतें. त्यावर एक मुख्य अधिकारी व त्याची कचेरी व रेल्वेप्रमाणें काटे ठेविले असतात. मागें सांगितलेल्या रेल्वेच्या व ह्या ऑफिसांत शेंकडा पांचप्रमाणें हव्यातितक्या पोत्यांचा तोल करतात. त्यांत कांहीं फरक आढळला नाहीं तर तें माप पास होतें. प्रत्येक मणामागें पांच तोळेपर्यंत फरक असला तर काट्याच्या फरकाकरितां तो क्षम्य धरितात. पण ज्यास्तचा थोडा संशय आला तर सर्व तोल पुन्हां करतात व वाढव्याची भरपूर ड्यूटी घेतात. शिवाय ज्यानें वजन करून तें जास्त मीठ दिलें त्याला दंड करतात. मोजतांना एखादें पोतें जास्त गेल्यास पुष्कळ नोकर बडतर्फ होतात! असा कडक बंदोबस्त आहे. कारण सरकारची ही रेव्हिन्यूची बाब आहे. दोहींकडे मुख्य ऑफिसर युरोपियन असतात.

सरकार मीठ वजनावर देतें. त्याचें कोष्टक असें. ऐशीं रुपये भार वजनाचा एक शेर व अशा चाळीस शेराचा एक मण किंवा फरा ह्मणतात. असे शंभर फरे ह्मणजे एक आणा, व असे सोळा आणे ह्मणजे राश समजतात. मिठाच्या मापाचा हिशोब असा आण्यावर चालतो. व्यापारी लोक मीठ वजनावर घेतात, व लोकांना मापांनीं विकतात. ह्यामुळें हलक्या मिठाला व्यापारी भाव फार येतो व जड मिठाला कमी येतो. जें मीठ शुद्धपाण्याचें शुभ्र परीट घडीप्रमाणें असतें तें फार हलकें असतें व ज्यामध्यें मातीचा अंश जास्त असतो त्याप्रमाणें तें वजनदार असतें. हें कांहीं अंशीं जमिनीवर व समुद्रकांठच्या स्थानिक पाण्यावरही आहे. ज्या ठिकाणीं मीठ वजनावर जातें तिथें हा फरक नाहीं. पण जेथें मापावर जातें तेथें हा फरक ह्मणजे मिठाचे मालकास भाव कमजास्त मिळतो. बाकी सरकारची ड्यूटी सर्वांवर सारखीच. मिठागरां-

तून मिठाची माती नेली तरी सरकार तेविर तीच ड्यूटी घेतें! कलकत्ता मीठ ह्मणून खताकरितां येथून मीठ नेतात तें असेंच स्वस्त जातें. त्यात मातीच फार असते. अगदीं निरुपयोगी असें हें असतें.

मीठ उत्पन्न करणारे जमिनीचे मालक निराळे असतात. ते गुजराथेंतून खारवे लोक आणून मीठ पिकवितात. पण त्यावर सरकारचा पहारा असतो. मालकानें मीठ पिकवून सरकारच्या स्वाधीन करावें लागतें. सरकारची ड्यूटी व मालकाची मालाची किंमत यांच्यामध्यें फार फरक असतो. सरकारची ड्यूटी मणामागें दीड दोन रुपये असते. पण त्याची मालकाची किंमत मणीं एक आण्यापासून चार आणेपर्यंत फक्त असते. यामुळें मीठ महाग विकतें. मीठ पिकविणारे केवळ पोटावारी मजुरीनें काम करितात, त्याबद्दल सरकार ओझ्यावरी पैसे वसूल करतें व तें तो सरहद्दीवर व मिलिटरींत खर्च करतें. वरुण राजाच्या संपत्तीपैकीं ही दृश्य पण अगदीं टाकाऊ संपत्ती आहे, तरी तिची एवढी किंमत! मग खऱ्या संपत्तीची योग्यता काय वर्णावी! एकंदर मणाचा हिशोब केला तर सर्वांचे नफे देऊन गिऱ्हाइकाला सरासरी तीन चार रुपये मण पडतें. चैत्र वैशाखांत जेव्हां मीठ पिकविण्याचा हंगाम जोरानें चालतो तेव्हां मिठागरांत नव्या मनुष्यास जोडा घालून चालण्याची लाज वाटते. कारण, जाण्यायेण्याच्या रस्त्यावर जिकडे तिकडे पांढरे शुभ्र हिऱ्यासारखें मीठ चकाकत पसरलें असतें. काळी जमीन कोठेंच दृष्टीस पडत नाहीं.

अशीं मिठागरें पाहात असतां वसई रोड स्टेशन लागतें. वसई रोड स्टेशनपासून वसई चार मैल लांब आहे. जाण्यास सडक आहे व टांगे मोटारी मिळतात. सर्व हिंदुस्थानास, विशेषतः महाराष्ट्रास दास्यत्वाचा काळिमा लावणारा वसईचा तह बाजीरावानें इंग्लिशांशीं ज्या वाड्यांत केला तो वाडा वसईस अद्यापपर्यंत सुस्थितींत आहे. त्यांतच हल्लीं वसईचें हायस्कूल आहे. स्थानमहात्म्याचा परिणाम जाणत्याच्या मनावर निराळा होतो. आतां तर त्यानें आपल्याजवळ दास्यत्वाची शाळाच ठेविली आहे! तोही पहावा. नंतर वसईचा इतिहास प्रसिद्ध किल्ला व त्याची रचना व स्थानमहात्म्य पाहून यावें. हा किल्ला गुजराथचा सुलतान महंमद बंगश यानें १४७० च्या सुमारास बांधला. गुजराथेवर मोंगल बादशाहा हुमायून यानें स्वारी

केली तेव्हां सुलतान बहादूर शहानें पोर्तुगीजांची मदत घेऊन हुमायुनांचा पराभव केला. त्याबद्दल वसई गांव व किल्ला १५३४ साली त्यांस इनाम दिला. पुढें पोर्तुगीजांनीं त्या किल्ल्याचें महत्व जाणून १५३६ त त्याची पूर्ण मजबुती केली. यामुळें तो किल्ला त्यांच्या ताब्यांत सुमारें २०० वर्षें राहिला. या मुदतींत त्यांनीं तें मुख्य ठिकाण करून अनेक प्रचंड इमारती बांधून तो ळढाऊ बनाविला. आतां ह्या किल्ल्याच्या कोटाच्या आणि कांहीं इमारतींच्या भिंताडाशिवाय कांहीं राहिलें नाहीं. किल्ल्याचा परीघ एक मैल आहे. कोटाच्या भिंतीची रुंदी पंचवीस फूट आहे. आंत निरनिराळ्या इमारतींच्या जागा दिसतात. त्यांत एका ठिकाणीं पोर्तुगीज चर्च होतें हा किल्ला पोर्तुगीज लोकांपासून चिमणाजी अप्पानें स्वपराक्रमानें व मोठ्या शर्थीनें घेतला. हा घेतांना नऊ लाख बांगडी फुटली. कोणी सवा लाख फुटली ह्मणतात, पण लक्षावधी ही संख्या कमी नाहीं ! ( इतके मनुष्य कामास आले. ) अशी प्रसिद्धी आहे. इतिहासप्रसिद्ध ज्या पराक्रमाच्या व शर्थीच्या लढाया आहेत, त्यापकीं ही एक आहे. समुद्रकांठीं दक्षिणेस गोवें तसें उत्तरेस वसई हें पोर्तुगीजांनीं आपलें कायमचें मजबूत ठाणें केलें होतें. त्या मजबुतीशिवाय येथील सर्व लोक बाटवून गोव्याप्रमाणें स्वजातीचीही मजबुती केली होती. पण हेंच कृत्य त्यांचे नाशास कारण झालें. पोर्तुगीज ऊर्फ फिरंगी आपणांस जुलमानें बाटवितात, आमचें रक्षण करणारा आपल्याशिवाय कोणी नाहीं, अशी येथील लोकांनीं पेशव्यांकडे तक्रार केली. तेव्हां पहिले बाजीराव उत्तर हिंदुस्थानांत नादिरशहावर स्वारी करण्याच्या तयारींत होते व ते तिकडे गेले होते. त्यांनीं ह्या स्वारीचें काम चिमणाजी अप्पाकडे दिलें होतें. चिमणाजी अप्पांनीं स्वारीचा बेत केला. वसईस येऊन पाहतात तो किल्ला अजिंक्य ! सर होणें कठीण. कांहीं भेदही होईना. सहा महिने झाले, तेव्हां सरदार लोकांनीं सांगितलें कीं तूर्त राहूं द्या. पुढें बाजीरावसाहेब आले ह्मणजे पाहूं. पण हें बोलणें त्या मानी मनुष्यास सहन झालें नाहीं. त्यानें सरदार मंडळीस सांगितलें कीं "किल्ला सर होत नसेल तर मला तोफेच्या तोंडीं बांधा, ह्मणजे माझें धड तरी किल्ल्यांत जाऊन पडेल. किल्ला सर झाल्याशिवाय पुण्यास परत जावयाचें नाहीं. रावसाहेब काय ह्मणतील ? लढाया जिंकणें फुकटचें काम नाहीं, तें आमचें आह्मीच करावें, असें ऐकण्यापेक्षां मरण पुरवेल ! पण बाजीरावास

अपयशाचें तोंड दाखविणें योग्य नाहीं." हा त्यांचा कृतनिश्चय पाहून सरदार मंडळींनें मनावर घेतलें. कोणी गोवाऱ्याच्या वेशानें, कोणी भिकाऱ्याच्या वेशानें, कोणी गोंधळी सारंगीवाले; असें ज्याला जे वेष घेतां येतील ते घेऊन त्यांनीं किल्ल्यांतील भेद काढला. शिवाय खरी हकीकत व खरा भेद कोणी गंगाजी नाईक म्हणून अंजूरकर त्या प्रांतांतील राहिवासी होता, त्यानें सांगितला; व त्याप्रमाणें किल्ला सर झाल्यावर त्याच्या कामगिरीबद्दल भिवंडी तालुक्यांत अंजूर गांव त्यास इनाम दिला. तो अद्याप त्याच्याच वंशजाकडे चालला आहे. पेशव्यानें दिलेली गणपतीची मूर्तीही अद्याप त्याजकडे असून तिचा उत्सव अद्यापपर्यंत गौरवपूर्ण होत असतो. ह्या स्वारीची उचल मुख्यतः अंताजी रघुनाथ कावळे व रामचंद्र रघुनाथ कावळे ह्या त्या प्रांताच्या माध्यंदिन वाजसनेय शाखेच्या ब्रह्मवृंदाकडून झाली. पेशव्यांची या स्वारीची तयारी सन १७२९ ते ३९ अशीं दहा वर्षें चालली होती. याप्रमाणें भेदाचा निश्चय होऊन त्यांनीं उत्तरेकडच्या ठरलेल्या बुरुजास सुरुंग लागले, व त्याप्रमाणें बुरुज उडाला; तेव्हां सर्व मराठे हरहर महादेव करीत एकदम मधमाशासारखे घसरले व त्यांनीं किल्ला सर केला. तेव्हां किल्लेदारांनीं सांगितलें, 'किल्ला देतों. आम्हास आमची चीजवस्त घेऊन जाऊंद्या. चिमणाजी अप्पानें तें कबूल केलें. ह्यापूर्वी हा कठीण प्रसंग जाणून किल्लेदारानें आपली बायको गुप्तपणानें होडींतून पुढें गलबतांतून गोव्यास रवाना केली होती. ही बातमी मराठ्यांस समजतांच त्यांनीं एकदम त्यांच्यावर हल्ला केला व तिला पकडून चिमणाजी अप्पांजवळ आणली. पण चिमणाजी अप्पानें तिला नमस्कार करून चोळी बांगडी देऊन तिला तिच्या नवऱ्याकडे पाठवून दिली. तेव्हां तिनें आंत जाऊन आपल्या नवऱ्यास सांगितलें कीं, असल्या पुण्यपुरुषाशीं लढून तुम्हास यश येणार नाहीं. तेव्हां त्यांनीं किल्ल्याचा नाद सोडला. अशी ऐतिहासिक दंतकथा प्रसिद्ध आहे. अशा रीतीनें त्या सतीचें यशही किल्ला मिळण्यास कारणीभूत झालें. कर्तृत्ववान मनुष्याचें लक्ष कार्याकडे असतें, आपमतलबाकडे मुळींच नसतें; म्हणूनच त्यांच्याविषयीं शत्रूचीसुद्धां पूज्यबुद्धि उत्पन्न होते. हल्लीं स्वराज्याचा लढा हिंदुस्थानांत चालू आहे, पण त्याबद्दल खऱ्या इंग्रजांनासुद्धां कांहीं गैर वाटत नाहीं. आतां कायद्यानें त्याला शिक्षा द्यावी लागते

त्यास त्यांचा इलाज नाहीं, पण हें काम हलकट किंवा नीच नाहीं; आपल्यावर प्रसंग आला असता तर आपण याच्याहून जास्त केलें असतें असें त्यांचें म्हणणें आहे. हा किल्ला देतांना आम्हीं बाटविलेल्या लोकांना तुमचेकडून अपाय होऊं नये, अशी किल्लेदारानें अट घातली होती; तीही अप्पानें कबूल केली. यामुळें वसई, आगाशी प्रांतांत बाटे लोक राहिले. नाहींतर त्यावेळच्या परिस्थितीप्रमाणें पेशव्यांनीं त्यांस केव्हांच पावन करून घेतलें असतें. कारण शिवाजीपासून पेशव्यांनींसुद्धां असे लोक पावन करून घेतल्याचे दाखले आहेत. किल्ला स्वाधीन झाल्यावर त्याच किल्ल्यांत मध्यभागीं अप्पानें एक शंकराचें देवालय व समुद्राकडचे मुख्य दरवाजाजवळ मारुतीचें देवालय अशीं दोन देवळें स्थापन केलीं. पोर्तुगीज लोक दर्यावर्दी आहेत, सबब ह्या प्रांताचे बंदोबस्ताकरितां पेशव्यांनीं आगाशीजवळ अर्नाळा किल्ला दर्यांत बांधला व त्या किल्ल्यावर आरमाराचा चांगला बंदोबस्त केला. तेव्हां फिरंग्यांनीं ह्या बाजूचा नाद सोडला. असा वसई किल्ल्याचा संक्षिप्त इतिहास आहे. हें सुवर्णाचें यश बाजीरावास कधीं सांगेन असें चिमणाजी अप्पास झालें होतें. पण रावसाहेब हिंदुस्थानांतून परत येत असतां वाटेंत नर्मदा तटाकीं रावेर येथेंच त्यांनीं देह ठेविला. तेव्हां अप्पास पराकाष्ठेचें वाईट वाटलें. इतकें कीं त्यापुढें ते फार दिवस जगलेही नाहींत. हल्लीं वसई किल्ल्याची कालमानानें नासधूस होऊन आंत शेतजमिनी झाल्या आहेत. जेथें दारूचीं कोठारें होतीं व तोफांचे दणदणाट होत होते तेथें कोल्हाकोल्हांडयांच्या आरोळ्या येऊं लागल्या आहेत! जेथें तरवार घेऊन कसलेला तेजस्वी मराठा शिपाई होता तेथें त्याच मराठ्याजवळ औत व कोयता देऊन त्यास नामर्द नांगऱ्या बनविला. हा कालमहिमा आहे. यांत कोणाचा दोष नाहीं. हल्लीं येथें सरकारी ॲग्रिकल्चरल बाग झाला आहे. अर्नाळा किल्ल्याची हकीकत पुढें आरनाळ्यांत दिली आहे.

वसई स्टेशनच्या पूर्वेस वज्राबाईकडे सडक जाते. त्या सडकेनें

## तुंगार

चें जंगल लागतें. पूर्वी रेल्वे नव्हती तेव्हां हाच मार्ग वसईहून पुण्यास जाण्याचा होता. तुंगारच्या डोंगराच्या दोन तीन रांगा दक्षिणोत्तर अशा बऱ्याच लांबवर पसरल्या आहेत. यांची उंची मात्र अगदीं थोडी म्हणजे

सुमारें पांचशें फूट आहे. या रांगांत अद्याप सुंदर मोठें जंगल अ
असल्यांत हवाही उत्तम आहे. पूर्वजांच्या संप्रदायाप्रमाणें जेथें सृष्टीची रमणीय
असेल तेथें देवस्थानची स्थापना होते. त्याप्रमाणें येथेंही शिवा
स्थापना केली आहे. त्यास तुंगारेश्वर म्हणतात. देऊळ अगदीं लहान अ
पण महाशिवरात्रीस येथें आसपासची बरीच यात्रा जमते. मुख्यत्वें
त्यावेळीं ऊंस व उसाचा रस फार मिळतो. याशिवाय बागायती माल के
ओले नारळ, व कपासाचे पदार्थ मिळतात. यथें पाणी आहे. पण त्याची
कता नाहीं. ह्या भागांत हवा खाण्याचें ठिकाण नाहीं. सबब तुंगार हें
तीच्या हवा खाण्याचें ठिकाण करण्याचा इंग्रज सरकारचा विचार होता; प
तें जमलें नाहीं. वसईपासून सडकेनें वीस मैल गेलें असतां

## वज्राबाई

नांवाचें इतिहासप्रसिद्ध देवालय लागतें. देवालयांत मध्यें वज्राबाई,
बाजूस रेणुका व दुसरे बाजूस महालक्ष्मी अशा आपल्या सत्वरज
गुणाप्रमाणें व स्वरुपाप्रमाणें देवतांच्या तीन मूर्ति आहेत. मूर्ति सिंदूरचा
आहेत. तरी त्याचीं ध्यानें फारच सुबक आहेत. किती वेळ पाहिलें
पाहात बसावेंसें वाटतें. इंद्रानें वृत्रासुराला मारण्याकरितां ह्याच वज्रा
देवीची प्रार्थना केली होती. तेव्हां ही देवी सायुध इंद्राच्या मदतीला
व त्यामुळें इंद्र कृतकार्य झाला, अशी वज्राबाईची पौराणिक कथा आहे. ह
सुद्धां हातांत वज्र आहे. ह्याच गोष्टीला अनुसरून चिमणाजी आप्पा व
सर करण्याकरितां गेले तेव्हां त्यांनीं ह्या देवीची प्रार्थना केली, व ति
सहाय्य मागितलें. आणि ह्या युद्धांत मला जय आला तर मी तुझें देवा
किल्ल्याप्रमाणें बांधीन असें सांगितलें. त्याप्रमाणें भगवतीनें सहाय्य केलें
आप्पा विजयी झाले. यामुळें हिचें देवालय किल्ल्यासारखें मजबूत कोटा
बांधलें आहे. देवालयाचे मागें टेंकडीवर एक लहानशी इमारत आहे
गादडीबुवा नांवाच्या एका देवीभक्ताची समाधी आहे तीही पाहून य
समाधीवर नेहमी गोधडी घातलेली असते! पर्वीचे लोक शूर व दृढनिश्चय
खरेच पण त्यांचा परमेश्वरावर विश्वासही तसाच जबरदस्त असे. म्हणून
मेश्वर नेहमी त्यांचा पाठिराखा असे. ह्यामुळें अपयश त्यांना कधीं आलें न

शिवाजीमहाराज भवानीची प्रार्थना केल्याशिवाय घरातून पाऊलही टाकीत नसत. भवानीचें विस्मरण होऊं नये म्हणून त्यांनें आपल्या तरवारीसच भवानी असें नांव ठेविलें होतें. ह्या योगानें भवानी निरंतर मजजवळ आहे, असें त्यांस वाटे. ही भवानी हरिहरेश्वराहून शिवाजी परत येत असतां त्यांस गोवलेकर सांवत भेटले. त्यांच्याजवळ ही तीनशें होनांची नामांकित तरवार होती ती शिवाजीला अत्यंत आवडून त्याबद्दल सांवतांचा मोठा गौरव करून तीनशें होन व पोशाख देऊन त्यांनीं ती घेतली व तिचें नांव भवानी ठेविलें. व रोज तिची पूजा करूं लागले. ती मिळाल्यापासून शिवाजीला निश्चयानें यश मिळूं लागलें व त्यांचा उत्कर्ष झाला. ह्या प्रकार संभाजीच्या वेळीं नाहींसा झाला. त्याला कर्तव्याची व पराक्रमाची घमेंड उत्पन्न झाली. ईश्वरी प्रसाद नाहींसा होऊन त्याला दुर्बुद्धी उत्पन्न झाली व त्याचा नाश झाला. नाहींतर शिवाजीपेक्षांसुद्धां तो जास्त सामर्थ्यवान असतां व शिवाजीच्या बंदोबस्तानें इतकें सामर्थ्य प्राप्त झालें असतां त्याचा नाश होणें शक्य नव्हतें हें सांगणें नकोच. संभाजीनें आपल्या पराक्रमानें औरंगजेबाला-सुद्धां चकित केलें होतें. यामुळें संभाजी असेपर्यंत मराठ्यांकडे लक्ष देतां येत नाहीं अशी त्याची खात्री झाली होती. पण तो पुढें व्यसनी निघाला. बाहेरख्यालीमुळें त्यानें आपसांत वैर उत्पन्न केलें आणि त्या द्वेषानें फितुरी उत्पन्न होऊन त्याचा अंत झाला.

वज्राबाई हें देवस्थान वैतरणीचें काठीं आहे. म्हणून हें तीर्थही झालें आहे. ह्या नदींत या ठिकाणीं उष्ण पाण्याचीं कुंडें आहेत. व तीं एकापेक्षां एक कढत आहेत. पण भात शिजण्याइतकीं फारशीं उष्ण नाहींत. ह्या नदींत हीं कुंडें सुमारें शंभर आहेत. पावसाळीं नदीला महापूर आला तरी नदीचा हा भाग उष्ण असतो. कुंडें देवळापासून बरीच लांब म्हणजे सुमारें एक मैलावर आहेत. हौशी तरूण मंडळी बरोबर फराळाचें बरेचसें घेऊन कल्याण, भिवंडी, अनगांव, कवाड, आंबाडी ह्या मार्गानें सायकलवर बसून येथें येऊन ह्या कुंडांत स्नान करून, फराळ करून संध्याकाळीं परत येतात. येथें स्नान केलें असतां किंवा बराच वेळ डुंबलें असतां आंगचें बधिरत्व जाऊन आंग हलकें होतें. जठराग्नी प्रदीप्त होतो. व भूक फार लागते. ह्या कुंडांतील पाण्याला गंधकाचा वास येतो. देवदर्शन करून फराळ करून वाटेंत कवाडच्या सखारामबुवांच्या समाधीचें दर्शन घेऊन परत कल्याण मार्गानें जिकडे तिकडे जातां येतें. कल्याणपासून सायकलवरून ही एक दिवसाची सफर फारच

सुमारें पांचशें फूट आहे. या रांगांत अद्याप सुंदर मोठें जंगल आहे. मध्यांत हवाही उत्तम आहे. पूर्वजांच्या संप्रदायाप्रमाणें जेथें सृष्टीची रमणीयता असेल तेथें देवस्थानची स्थापना होते. त्याप्रमाणें येथेंही शिवांशंयाची स्थापना केली आहे. त्यास तुंगारेश्वर म्हणतात. देऊळ अगदीं लहान आहे, पण महाशिवरात्रिस येथें आसपासची बरीच यात्रा जमते. मुख्यत्वेंकरून त्यावेळीं ऊंस व उसाचा रस फार मिळतो. याशिवाय बागायती माल केळीं भोले नारळ, व उपासाचे पदार्थ मिळतात. येथें पाणी आहे. पण त्याची वि - ष्ठता नाहीं. ह्या भागांत हवा खाण्याचें ठिकाण नाहीं. सबब तुंगार हें श्रीमं- तांच्या हवा खाण्याचें ठिकाण करण्याचा इंग्रज सरकारचा विचार होता; परंतु तें जमलें नाहीं. वसईपासून सडकेनें वीस मैल गेलें असतां

## वज्राबाई

नांवाचें इतिहासप्रसिद्ध देवालय लागतें. देवालयांत मध्यें वज्राबाई, एका बाजूला रेणुका व दुसरे बाजूस महालक्ष्मी अशा आपल्या सत्वरजतमो गुणाप्रमाणें व स्वरुपाप्रमाणें देवतांच्या तीन मूर्ति आहेत. मूर्ति सिंदूरचर्चित आहेत. तरी त्याचीं ध्यानें फारच सुबक आहेत. किती वेळ पाहिलें तरी पाहात बसावेंसें वाटतें. इंद्रानें वृत्रासुराला मारण्याकरितां ह्याच वज्राबाई देवीची प्रार्थना केली होती. तेव्हां ही देवी सायुध इंद्राच्या मदतीला गेली व त्यामुळें इंद्र कृतकार्य झाला, अशी वज्राबाईची पौराणिक कथा आहे. हल्लीं- सुद्धां हातांत वज्र आहे. ह्याच गोष्टीला अनुसरून चिमणाजी आप्पा वसई सर करण्याकरितां गेले तेव्हां त्यांनीं ह्या देवीची प्रार्थना केली, व तिचें सहाय्य मागितलें. आणि ह्या युद्धांत मला जय आला तर मी तुझें देवालयें किल्ल्याप्रमाणें बांधीन असें सांगितलें. त्याप्रमाणें भगवतीनें सहाय्य केलें व आप्पा विजयी झाले. यामुळें हिचें देवालय किल्ल्यासारखें मजबूत कोटासुद्धां बांधलें आहे. देवालयाचे मागें टेंकडीवर एक लहानशी इमारत आहे तींत गादडीबुवा नांवाच्या एका देवीभक्ताची समाधी आहे तीही पाहून यावें. समाधीवर नेहमी गोधडी घातलेली असते! पर्वीचे लोक शूर व दृढनिश्चयीतर खरेच पण त्यांचा परमेश्वरावर विश्वासही तसाच जबरदस्त असे. म्हणून पर- मेश्वर नेहमी त्यांचा पाठिराखा असे. ह्यामुळें अपयश त्यांना कधीं आलें नाहीं.

शिवाजीमहाराज भवानीची प्रार्थना केल्याशिवाय घरातून पाऊलही टाकीत नसत. भवानीचें विस्मरण होऊं नये ह्मणून त्यांनें आपल्या तरवारीसच भवानी असें नांव ठेविलें होतें. ह्या योगानें भवानी निरंतर मजजवळ आहे, असें त्यांस वाटे. ही भवानी हरिहरेश्वराहून शिवाजी परत येत असतां त्यांस गोवलेकर सांवत भेटले. त्यांच्याजवळ ही तीनशें होनांची नामांकित तरवार होती ती शिवाजीला अत्यंत आवडून त्याबद्दल सांवतांचा मोठा गौरव करून तीनशें होन व पोशाख देऊन त्यांनीं ती घेतली व तिचें नांव भवानी ठेविलें. व रोज तिची पूजा करूं लागले. ती मिळाल्यापासून शिवाजीला निश्चयानें यश मिळूं लागलें व त्यांचा उत्कर्ष झाला. हा प्रकार संभाजीच्या वेळीं नाहींसा झाला. त्याला कर्तव्याची व पराक्रमाची घमेंड उत्पन्न झाली. ईश्वरी प्रसाद नाहींसा होऊन त्याला दुर्बुद्धी उत्पन्न झाली व त्याचा नाश झाला. नाहींतर शिवाजीपेक्षांसुद्धां तो जास्त सामर्थ्यवान असतां व शिवाजीच्या बंदोबस्तानें इतकें सामर्थ्य प्राप्त झालें असतां त्याचा नाश होणें शक्य नव्हतें हें सांगणें नकोच. संभाजीनें आपल्या पराक्रमानें औरंगजेबाला-सुद्धां चकित केलें होतें. यामुळें संभाजी असेपर्यंत मराठ्यांकडे लक्ष देतां येत नाहीं अशी त्याची खात्री झाली होती. पण तो पुढें व्यसनी निघाला. बाहेरख्यालीमुळें त्यानें आपसांत वैर उत्पन्न केलें आणि त्या द्वेषानें फितुरी उत्पन्न होऊन त्याचा अंत झाला.

वज्राबाई हें देवस्थान वैतरणीचें काठीं आहे. म्हणून हें तीर्थही झालें आहे. ह्या नदींत या ठिकाणीं उष्ण पाण्याचीं कुंडें आहेत. व तीं एकापेक्षां एक कढत आहेत. पण भात शिजण्याइतकीं फारशीं उष्ण नाहींत. ह्या नदींत हीं कुंडें सुमारें शंभर आहेत. पावसाळीं नदीला महापूर आला तरी नदीचा हा भाग उष्ण असतो. कुंडें देवळापासून बरीच लांब म्हणजे सुमारें एक मैलावर आहेत. हौशी तरूण मंडळी बरोबर फराळाचें बरेंचसें घेऊन कल्याण, भिवंडी, अनगांव, कवाड, आंबाडी ह्या मार्गानें सायकलवर बसून येथें येऊन ह्या कुंडांत स्नान करून, फराळ करून संध्याकाळीं परत येतात. येथें स्नान केलें असतां किंवा बराच वेळ डुंबलें असतां आंगचें बधिरत्व जाऊन आंग हलकें होतें. जठराग्नी प्रदीप्त होतो. व भूक फार लागते. ह्या कुंडांतील पाण्याला गंधकाचा वास येतो. देवदर्शन करून फराळ करून वाटेंत कवाडच्या सखारामबुवांच्या समाधीचें दर्शन घेऊन परत कल्याण मार्गानें जिकडे तिकडे जातां येतें. कल्याणपासून सायकलवरून ही एक दिवसाची सफर फारच

मजेची आहे. वसईहून जातांना मध्यें तुंगार खिंडींत चढाव आहे व वाटेंत दुसरें गांवही लागत नाहीं; ह्यामुळें या मार्गानें कोणी जात नाहीं. वज्राबाईस चैत्रवैद्य अमावास्येला मोठी यात्रा भरते. या यात्रेस त्या प्रांताची व घाटावरील बहुतेक व्यापारी मंडळी येत असते. यात्राही पंधरा वीस दिवस असते व तींत सर्व प्रकारच्या प्रापंचिक वस्तु विकावयास येतात. ह्यामुळें आसपासचे गांवढेकरी आपल्या चातुर्मास्याच्या वस्तु कापड, मीठ, मिरची यांचा संग्रह या यात्रेंत करितात. या ठिकाणीं पेशव्यांनीं दिलेलें एक सदावर्त आहे. ब्राह्मण असल्यास त्यास जेवावयास मिळतें. इतरांस सिधा मिळतो. सदावर्ताची रक्कम नियमित असल्यामुळें सिधासुद्धां सर्वांस मिळेलच असा नियम नाहीं. या यात्रेंत चोऱ्या बऱ्याच होतात हा मोठा दोष आहे. यात्रेच्या दिवसांशिवाय हें ठिकाण बहुतेक ओसाडच असतें. कवाड येथें सखारामबुवा कवाडकर या साधूंची समाधी पाहण्यासारखी आहे. बोवांचा छात्रगण, सुशिक्षित, विद्वान व श्रीमंत आहे. यामुळें त्यांचे उत्सवही चांगले व थाटाचे होतात. येथून पुन्हा मी वसई स्टेशनवर आलों व तेथून चार मैलावर

## निर्मळ

येथें आलों. निर्मळास जातांना वाटेंत एक टेकडी लागते तिला हिरा डोंगरी ह्मणतात. तीवर हिऱ्यासारखे लहान मोठे गारगोटीचे दगड सांपडतात. हे फार कठीण, पैलूदार व तेजस्वी आहेत. ह्यांनीं कांचसुद्धां कापते, इतके ते कठीण आहेत. वसईचा किल्ला घेतांना चिमणाजी अप्पानें ह्या डोंगरीवरून तोफा डागून वसई किल्ल्यावर मारा केला होता असें ह्मणतात. किल्ला व टेकडी ह्यामध्यें सुमारें तीन मैल अंतर आहे. जवळ सोपारें येथें जुनें राज्य होतें. त्याचे वैभवाचे सूचक हे हिरे असावे असें ह्मणतात. प्राचीनकाळीं सोपारें येथें एका बुरडाचें मोठें राज्य होतें. त्यावेळीं निर्मळ बंदरही प्रसिद्ध होतें. ह्या सोपाऱ्याला पूर्वीचें त्यावेळचें नांव शूर्पारक असें आहे. त्याची विशेष हकीगत पुढें आहे.

निर्मळ येथें शंकराचार्यांची समाधी आहे. हे शंकराचार्य आद्य शंकराचार्यांपासून दुसरे किंवा तिसरे असावे. कार्तिकवद्य एकादशीस त्यांचे समाधीचा मोठा उत्सव होतो. पेशव्यांनीं ह्या संस्थेस बरेंच इनाम करून दिलें आहे. त्यांतून एकादशीस दर्शनास येतील तितके ब्राह्मणास फराळाचें मिळतें, व

दुसरे दिवशीं द्वादशीस मुक्तद्वार ब्राह्मण भोजन मिळतें तीन दिवस काय कीर्तन व शेवटीं पालखीचेवेळीं छबीना मिरवणूक लळीत होऊन यात्रेची समाप्ती होते. पालखीचेवेळीं दारूकामही सुटतें. ही यात्राही मोठ्या प्रमाणांत ह्मणजे पंधरा वीस दिवस चालते. यावेळीं येथें ह्या प्रांतांतलीं सुकेळीं पुष्कळ मिळतात. या यात्रेंत पूर्वी जुगार चाले तेव्हां यात्रेमध्यें लक्षावधी रुपयांचा घडामोड होत असे.

या प्रांतांत निर्मळचें महात्म्य विशेष आहे. आपण धर्मांतर दोषामुळें ह्या यात्रेस अंतरलों असें ह्या खिश्चनलोकांना या यात्रेमुळें वाईट वाटूं नये ह्मणून खिश्चन लोकांनीं या देवळाशेजारीं आपलें चर्च बांधलें आहे. इतकेंच नव्हे तर निर्मळचे यात्रेचेवेळीं त्यांनीं आपले उत्साहाचे सणही ठेविले आहेत. निर्मळास तीर्थोदकाचे दोन तलाव आहेत. विशेषतः त्यावर ब्राह्मणेतर यात्रेकरू मंडळी सक्षौर प्रायःचित्त पूर्वक पिंडदान करितात ह्या स्थानीं फार प्राचीन काळीं विमल व निर्मळ असे दोन राक्षस राहात होते. त्यानीं मनुष्यांना फार पीडा दिली म्हणून परशुरामानें त्यांस मारलें, पण त्यांच्या इच्छेप्रमाणें त्यांनीं त्या दोन्ही तलावास विमल व निर्मल अशीं नांवें दिलीं त्या स्थानासही निर्मळ असें नांव देऊन त्यांचें स्मारक केलें, व त्याच्याकाठीं शिवालयें बांधिलीं तीं पोर्तुगीजांनीं भ्रष्टविलीं, पण पुन्हा पेशव्यांनीं वसईप्रांताचे सरसुभेदार शंकराजी केशव यांजकडून त्या तलावाची शुद्धि करून देवळाचाही जिर्णोद्धार केला. व बरेच घांट बांधिले. शंकराचार्यांची समाधीही त्यांनींच बांधिली. यामुळें लोक पुन्हां येथें तीर्थविधी करूं लागले. त्याप्रमाणेंच खिश्चनलोक क्षौर करून ते आपल्या देवळांत जातात. असें दोघांचें साम्य ठेवल्यामुळें धर्मांतराबद्दल त्यांना विशेष वाईट वाटत नाहीं आणि तें वाटूं नये म्हणूनच हा प्रयत्न आहे. निमळ महात्म्य म्हणून एक लहानसा ग्रंथ आहे. त्या ग्रंथामध्यें या क्षेत्राचें मोठें महत्व वर्णन केलें आहे. फिरंग्यांच्या संसर्गानें दूषित झालेले किंवा बाटलेले लोक ते विधीपूर्वक प्रायश्चित घेऊन शुद्ध होत असत. हा

आहे, आपण बाटविलेले लोक ह्या तिर्थांत स्नान करून शुद्ध [illegible] व स्वधर्मीत जातात असें फिरंग्यास वाटल्यावरून त्या [illegible] गाई कापून त्यांचें रक्त व हाडें या तीर्थांत टाकिलीं व हें भ्रष्टविलें व तेथें आपलें चर्च स्थापिलें. असा होईल तितका त्रास त्यांनीं दिला, परंतु ही भूमि निर्मळ असल्यामुळें ह्या तीर्थांना बाटच नाहीं असें हिंदु शास्त्र्यांनीं ठरविलें. तेव्हांपासून

यांची प्रसिद्धि जास्त झाली व फिरंगी व हिंदू यांचा झगडा विकोपास जाऊन हिंदूंनीं पेशव्यापाशीं दाद मागून फिरंग्यांना वसई प्रांतांतून हाकलून दिलें. ही निर्मळची प्राचीन पवित्रता पाहून व शंकराचार्यांचें स्थान पाहून त्यांची महती स्वराज्यापासून फार वाढली आहे.

निर्मळपासून पूर्व बाजूस एक मैल दीड मैलावर सोपारें म्हणून हल्लीं लहान गांव आहे. पण पूर्वी ही एका राष्ट्राची राजधानी होती. अद्याप येथें जुन्या राजधानीच्या खुणा सांपडतात व त्यांबद्दल या प्रांतामध्यें दंतकथा प्रसिद्ध आहेत. त्याकाळीं सोपारें हें हल्लींच्या मुंबईसारखें फार प्रख्यात व खोलं असें सुरक्षित बंदर होतें. अजूनसुद्धां त्याची तशी रचना दिसते. जगप्रसिद्ध फिनिशीयन व्यापाऱ्यांची ही प्रख्यात व्यापारी पेठ होती. हिचा सिरियांतील दमास्कस वगैरे शहरीं मोठा व्यापार चालत असे. त्यावेळीं म्हणजे बौद्ध काळीं याला शूर्पारक असें नांव होतें. त्यावेळीं हा किनारा नारगोळापर्यंत फार प्रख्यात होता. असीरियांतील खणलेल्या वाड्याच्या तळघरांत कांहीं विटा सांपडलेल्या आहेत. त्यांत सोपाऱ्याच्या प्रख्यातीची फार मजेदार हकीकत आहे. तींत याला सुरिप्पक म्हणजे देवाचें शहर असें नांव दिलें आहे. या ठिकाणच्या व्यापारामुळें बौद्ध धर्माचें प्राबल्य सर्वत्र झालें. त्यापूर्वी येथें शैव धर्माचें अस्तित्व होतें.

ततः शूर्पारकं देशं सागरः तस्य निर्ममे ।
सहसा जामदग्न्यस्य सोपारांतं महीतलं ।

म्हणजे त्या काळचा सोपारा प्रांत गोंव्यापासून सोपाऱ्यापर्यंत होता. व हा समुद्रानें जामदग्न्य परशुरामाकरितां निर्माण केला असें महाभारत शांतिपर्व अध्याय ४९ श्लोक ९७ वरून समजतें. पुढें भूकंपाच्या उलाढालीनें हें बंदर बुडालें; व बौद्धधर्मही लयास गेला. अशा रीतीनें कालचक्रानें त्याला ही दशा आली. रेल्वे होण्यापूर्वीही हा गांव चांगला भरभराटींत होता. व्यापाराची व धनिक सावकारांची ही पेठ होती. पण आतां तो बराच मोडकळीस आला आहे. पूर्वी येथें लुगड्यांचे झुलाई लोकांचे हातमाग पुष्कळ असत व लुगडींही चांगलीं नामांकित निघत असत. सोपाऱ्याच्या लुगड्यांची पेठ अद्यापसुद्धां प्रसिद्ध आहे; पण तीं हलकी म्हणून आतां प्रसिद्ध आहे. निर्मळचे उत्तरेस तीन मैलांवर

## आगाशी

ह्मणून गांव आहे. हा पेशवाईत वसई प्रांतांचा एक सुभा होता. येथील सुभेदार फडके होते. त्यांचा वाडा आगाशीस फार मोठा आहे. आतां तो मोडकळीस आला आहे. त्यांतील नुसतें देवघर देवाच्या लवाजम्याशिवायं वहा माणसें वसतील येवढें मोठें आहे! व देव्हारा पुरुषभर उंचीचा, दोन हात रुंदीचा व तीन हात लांबीचा शिसवी सुंदर नक्षीचा केला आहे. आतां त्याचा काय उपयोग? याचप्रमाणें त्यांची सर्व प्रपंचाची व्यवस्था अशा मोठ्या प्रमाणांत होती; पण ती आतां नामशेष झाली आहे!

आगाशी येथें जगप्रसिद्ध सुकेळीं होतात. सुकेळीं दुसरे कोठेंही अशीं चांगलीं होत नाहींत. सुकेळें ह्मणजे राजेळें केळें पिकलें ह्मणजे सोलून वाळवून तें खारकेसारखें होतें, त्यास सुकेळें ह्मणतात. ह्या प्रांताशिवाय कोणत्याही ठिकाणचें पिकलेलें केळें असें वाळत नाहीं, नासतें. हा ह्या बाजूकडील जमिनींमध्यें विशेष धर्म आहे. निर्मळच्या जत्रेंत याचा व्यापार मोठ्या प्रमाणांत होतो. हीं राजेळीं केळीं हिरवीं असतां सोलून त्यांचे गराचे काप काढून वाळवितात व त्याचें पीठ करतात. तें फारच पथ्यकारक व पौष्टिक आहे. प्रसिद्ध मेलिन्स फुडपेक्षांही हें अति उत्तम आहे. उपासाला, आजाऱ्याला व सशक्त मनुष्यासुद्धां हें फारच पुष्टी देणारें आहे. याचेसारखें पुष्टी देणारें व पाचक दुसरें नाहीं. याचाही व्यापार येथें बऱ्याच प्रमाणावर होतो. याकरितां एक कंपनी निघाली तर तिला मोठा फायदा होईल. मात्र व्यापारी दृष्टीनें माल तयार केला पाहिजे व त्याची प्रसिद्धि केली पाहिजे. व्यापाराचे कामीं युरोपियनांचा हातखंडा आहे. कोणतीही हलका वस्तु मोहक व सुबक करून व तिचे गोडवे गाऊन गिऱ्हाईकाचें मन कसें वळवावें हें व्यापारी तत्त्व त्यांपासून शिकण्यासारखें आहे. मग मालाची किंमत दसपट किंवा कितीही वाढविली तरी चालते!

आगाशीस भवानी शंकराचें पुरातन देवालय आहे. तसेंच माहीम व केळवें यांच्यामध्यें शंकराचें व जवळ भवानी जोगेश्वरीचें (सितळा देवीचें) देऊळ आहे. हें शंकराचें स्थान स्वयंभू असून तें वाळूच्या दगडाचें बनलें आहे. याच्या मस्तकांतून अक्षय केसासारखा गंगाप्रवाह अगदीं संथपणानें

वाहात आहे. लिंग कोरडें केलें तरी एका क्षणांत त्याच्या मस्तकावरील खाडा या प्रवाहानें भरून वाहूं लागतो. आगाशी व या अशा दोन देवांस व तुंगारे-श्वरास तुंगाचें रान इनाम दिलें आहे. येथील पुजारी गिरीसंप्रदायी आहेत. आगाशीपासून पश्चिमेस तीन मैलांवर समुद्र किनारीं

## आर्नाळा

गांव आहे. आर्नाळा हें त्या किल्याचें नांव आहे. किल्ला नामशेष झाल्यावर बाहेर असलेल्या समुद्र काठच्या वस्तीस हें नांव मिळालें. येथें वैतरणा सिंधु संगम झाला आहे, व ह्या संगमावर एक मैल दर्यांत खडकावर हा किल्ला बांधिला आहे. किल्ला व तीर ह्यामध्यें खाडी सुमारें दोन तीन फर्लांग रुंदीची आहे. येथें समुद्र नेहमीं खवळलेला असतो. आंत समुद्र एकदम खोल गेल्या-मुळें व जवळच वैतरणीचें तीन मैल रुंदीचें पात्र असल्यामुळें भरती ओहो-टीच्यावेळीं समुद्रस्नान करणें धोक्याचें आहे. लाटा फार मोठ्या वेगानें येतात व वेगानें परत जातात. नुसतें उभें राहिलें तरी पायांखालची वाळू भराभर वाहून जाऊन मनुष्य घसरून खालीं पडतो. लाट आली म्हणजे जेथें पाऊल-भरही पाणी नसतें तेथें एकदम पुरुषभर होतें, व तें त्याच वेगानें परत जातें! हा भयंकर दर्याचा अनुभव मिळावा म्हणूनच येथें विशेषेंकरून तीर्थाची योजना झाली आहे. या वैतरणा सिंधु संगमीं स्नान करण्याचें पुण्य विशेष आहे.

वैतरण्याम् सिंधु संगमे कल्क्यावतारः

असें भविष्य आहे. आतां वैतरणा नदी ही किंवा कटक जगन्नाथजवळ पूर्व-वाहिनी मोठी नदी आहे ती, यांचा नेम सांगवत नाहीं. तरी या वैतरणीचें महात्म्यही पुराणांत विशेष आहे. त्र्यंबकेश्वराच्या ब्रह्मगिरी पर्वतांतून एकाच ठिकाणाहून म्हणजे मूळ पर्वतावरील कुशावर्तींतून गोदावरीचा व हिचा उगम आहे व तेथें शिवानें जटा आपटल्याचें स्थान आहे. पूर्वेकडच्या प्रवाहाला गोदावरी म्हणतात व पश्चिमेच्या प्रवाहाला वैतरणा म्हणतात, एवढेंच.

येथें पोर्तुगीज ऊर्फ फिरंग्यांचे आरमाराचा बंदोबस्त करण्याकरित पाण्यांत बांधलेला हा जंजिरा किल्ला बराच मोठा आहे. याचा परीघ सुमारें दोन मैल आहे. या किल्ल्याचे मुख्य बुरुजावर पुढील शिलालेख आहे. आतां

तो कालवश होत जाऊन जीर्ण झाला आहे; तरी प्रयत्न करून मिळविला आहे. तो असा—

बाजीराव अमात्य मुख्य सुमती आज्ञापिलें शंकरा
पाश्चात्यांश बघूनि सिंधु उदरीं बांधा त्वरें जंजिरा।
अर्नाळा जलदुर्ग चिंतुनि मनीं बाजी तुळाजी सुता
शील्पज्ञें दृढ शौर्य जाणुनि मनीं दुर्गासि संस्थापिता. ॥१॥
अंक बाण रस चंद्र शकांते ॥ ज्येष्ठ पिंगल सितेंदु दिनांते.
पंचमी ध्रुव सुपुष्यहि जेव्हां ॥ येशवंत बुरुजाकृति तेव्हां ॥२॥

यांतील बाजीराव ह्मणजे अर्थात पहिले बाजीराव. शंकरा ह्मणजे शंकराजी केशव फडके. यानें आगाशीचें देवालय व तळें बांधिलें. हा ह्या प्रांताचा सुभेदार होता. पाश्चात्यांश बघुनि—पोर्तुगीज लोकांचा दर्यावरचा वरचढपणा पाहून किल्ले बांधणें. सिंधु उदरीं—समुद्रांत. जंजिरा—समुद्रांतील किल्ला बाजी तुळाजी—हा किल्ला बांधणारा मुख्य शिल्पज्ञ. याच्या देखरेखीखालीं किल्ला बांधिला. अंक=नऊ ९, बाण ह्मणजे पांच, रस ह्मणजे सहा (षड्रस) चंद्र=एक अंकानाम् वामतोगति ह्मणजे आंकड्याची गति उजवीकडून डाव्या बाजूकडे सांगितलेली असते. हे आंकडे डावीकडे मांडीत गेल्यानें सोळाशें एकूणसाठ शक होतो या शकांत पिंगलनाम. संवत्सरीं ज्येष्ठ शु॥ पंचमी सोमवार, पुष्य नक्षत्र, ध्रुवयोग या दिवशीं पाहिला ह्मणजे पुढचा यशवंत बुरुज बांधून झाला. हा मुहूर्त त्या प्रांताचे त्यावेळचे प्रख्यात ज्योतिषी वे. शा. सं. हरीशास्त्री जोशी ह्मणून यजुर्वेदी माध्यंदिन वाजसनेय शाखेचे ब्राह्मण होते त्यांनीं दिला होता व त्याबद्दल त्यांना दर वर्षास ५० रु. दक्षणा वंश परंपरेनें अद्यापपर्यंत मिळत होती, पण ती आतां बंद झाली असें ह्मणतात. शके १६५९ ह्मणजे सन १७३७, अर्थात पहिल्या बाजीरावाचाच हा काळ आहे. आणि १७३९ ह्या वर्षी ह्मणजे आणखी दोन वर्षांनीं वसई किल्ला घेऊन टोपीवाल्याचें समूळ उच्चाटन ह्या प्रांतांतून करून टाकिलें. त्यांचा ह्यापुढें जास्त वरचढपणा होऊं नये ह्मणून हा किल्ला प्रथम बांधला होता व त्याचप्रमाणें दर्याकिनाऱ्यावर लहान लहान गढ्या टेहळणीकरितां बांधिल्या आहेत.

हल्लीं ह्या किल्ल्यांत व बाहेर त्या सभोंवतीं माच्छिमार कोळयांची वस्ती आहे. आंत एक तळें असून त्याचें पाणी उत्तम गोड आहे. हा किल्ला संबंध खडका-

वर असल्यामुळें पावसाचें पाणी आंत राहातें व सभोंवतीं पाण्याचा वेढा असल्यामुळें बरेंच दिवस टिकतें. आंत देवळेंरावळें वगैरे सर्व प्रकारच्या सोयी आहेत, ह्मणजे लढाईचे ठिकाणींसुद्धां पूर्वज धर्माला विसरत नसत. इतिहास नुसता पाठ करण्यापेक्षां अशा ऐतिहासिक वस्तुदर्शनानें तो आपोआप समजतो व त्याचा इष्ट परिणाम घडतो. पूर्वजांचें कर्तृत्व स्पष्टपणें उघडकीस येतें व स्फूर्ति होते. नाहींतर आमचे लोक ह्मणजे मूर्ख व नामर्द व युरोपियन तेवढे शहाणे हेंच ठसे परिक्षा पास होणारांच्या कर्मकपाळीं लागावयाचे! ह्मणजे इतिहासामुळें पूर्वजाविषयीं अभिमान उत्पन्न व्हावयाचा त्या ऐवजीं अनादरच उत्पन्न होतो. शाळांत तरी इतिहास शिकविण्याचा हेतु हाच आहे. राष्ट्रीय शिक्षण व सरकारी शिक्षण यामधील हाच फरक आहे. सरकारी शिक्षणानें मनुष्य मवाळ बनतो; ह्मणजे इंग्रजी राज्यांत आपणांस हल्लीं जें सुख मिळतें त्यापेक्षां जास्त सुख निदान ह्या काळांत तरी मिळणें शक्य नाहीं, अशी भावना ह्या शिक्षणानें होते. आह्मास काळ अनुकूल नाहीं, पण हाच काळ युरोपियनांना कसा लाभतो व सुखावह होतो? मग तो आह्माला कां होऊं नये? होत नसेल तर प्रयत्न करून मिळविला पाहिजे. नुसती जपमाळ घेऊन संतोषवृत्ति ठेऊन काय मिळणार? याकरितांच लो० टिळकांनीं कर्मयोगपर गीता सांगितली. ही ज्योत राष्ट्रीय शिक्षणानें झाली पाहिजे. ही जर त्या शिक्षणानें होत नसेल तर तें राष्ट्रीय शिक्षणच नव्हे. काळ हा समुद्रासारखा आहे. त्यावर जो बोट चालवील त्याला तो सुखावह होईल, व होडी चालवील त्याला तो दुःखावह होईल!

आगाशीला स्टेशन विरार हें आगाशीपासून तीन मैल आहे. विरारपासून बरेच पुढें डहाणूरोड स्टेशन लागतें. तेथें उतरून मी कोळवणांतील

## महालक्ष्मीस

गेलों. डहाणूरोड स्टेशनपासून जव्हारेकडे जी सडक जाते त्या सडकेनें वीस मैल गेल्यावर डाव्या हातास फाटा फुटतो. त्या फाट्यानें एक मैल गेलें ह्मणजे हें ठिकाण लागतें.

या बाजूला ह्मणजे तारापूरपासून डहाणूपर्यंत मध्यें चिंचणी बंदरावर समुद्रांत मोठमोठे खडक आहेत. ते भरती आली ह्मणजे बुडतात व ओहो-

टीचे वेळीं दिसतात. या बाजूला समुद्र फार उथळ आहे. यामुळें समुद्र-स्नानाची फार मजा आहे. मोठी लाट मुळींच येत नाहीं. यामुळें बायकामुलें घेऊन जाण्यास हरकत नाहीं. पूर्ण निखाराच्या वेळीं समुद्र दोन मैल लांब आंत जाऊन सर्वत्र जिकडे तिकडे मैदान दिसतें. हें शुद्ध रेतीचें. मैदान आहे. सकाळीं किंवा संध्याकाळीं हें सर्व मैदान समुद्राच्या लाटांनीं सारवल्यासारखें दिसतें. व त्यावर समुद्र किड्यांनीं लहान लहान गोळ्यांच्या आकृति उर्फ रांगोळ्या काढलेल्या असतात. त्यांची शोभा त्यावेळीं फारच चित्ताकर्षक दिसते. याशिवाय उन्हाळयांत येथें

## एक चमत्कार

दिसतो. त्याला समुद्रकमल ह्मणतात. हें कमळ गोड्या पाण्याच्या तळ्यांतल्या तांबड्या कमलाप्रमाणेंच हुबेहूब असतें ! ह्या मैदानांत लाटांच्या योगानें रेतीमध्यें वीतभर खोलीचे खड्डे पडतात. ते भरतीचे पाण्यानें भरून जातात. त्या पाण्यांत बुडलेले हें दिसतें. गोड्या पाण्याप्रमाणें पाण्याच्या वर दिसत नाहीं. याला चांगल्या सुंदर पाकळ्या व मध्यें केस असतात व मध्यें तसाच गड्डा असतो; पण त्याला हात लागला असतां तें लाजाळूच्या झाडाप्रमाणें लाजून एकदम जमिनींत जातें ! हें काढू लागल्यास तुटतें; पण तें मुळापासून उपटत नाहीं. ह्या कमळाखालीं आपल्या कमळासारखाच लांब देंठ असतो. तो शेवटपर्यंत निघत नाहीं. पण आह्मी दोघे तिघे जाऊन एक मोठें कमल मुळासुद्धां काढलें होतें ! सर्व निघाल्यावर तें प्रथम हातभर लांब होतें. तें बाहेर काढल्यावर आंखडत आंखडत वीतभर झालें व मिटलें. कांहीं वेळ पाण्यांत टाकिलें असतां हें उमलतें व स्पर्श झाला असतां पुन्हां मिटतें. गरोदर बायका आडल्या असतील तर हें पाण्यांत टाकून उमलल्यास तिची सुटका होते असें ह्मणतात. याचा त्याशीं काय संबंध असेल तो कळत नाहीं. हें माशासारखे बुळबुळीत व अस्थिरहित असतें. हीं वनस्पती नसून हा एक जीव आहे, असें वाटतसुद्धां नाहीं. कारण नाक, तोंड वगैरे जिवाप्रमाणें त्यास कांहीं अवयव नाहींत. उलट वनस्पतिसारखे अवयव असतात. पण खरोखर हा जीव आहे, असें सिद्ध झालें आहे. ह्याच्या कमळांत एखादा प्राणी सांपडला ह्मणजे हें मिटतें व जमिनींत जातें. ह्मणजे त्या प्राण्याचा रस आपल्या रसांत मिसळून ह्याचें जीवन होतें. वनस्पतीप्रमाणें किंवा स्पंजाप्रमाणें किंवा माशासारखें हें उन्हांत ठेविलें असतां

चालतें. याला माशासारखा वास येतो. उंदीर, पक्षी, मांजर वगैरे याला माशाप्रमाणेंच शत्रु आहेत. पृथ्वीवर मांसाहारी वनस्पती आहेत त्याचप्रमाणेंच हा समुद्रांत मांसाहारी जीव आहे; किंवा समुद्रांतील ही मांसाहारी वनस्पती ह्मणावी !

महालक्ष्मी येथें ह्मणण्यासारखी वस्ती नाहीं. ह्या भागाला कोळवण ह्मणतात. जव्हारचे राजेसाहेब कोळी जातीचे आहेत. आणि त्याच्या नजीक ही देवी आहे. म्हणून हिला कोळवणची महालक्ष्मी म्हणतात. ह्या प्रांतांत हिची फार प्रख्याती आहे. ही बऱ्याच कुटुंबाची कुलदेवता आहे. विशेषतः गुजराथी लोकामध्यें हिची प्रसिद्धी फार आहे. नवसरी, सुरत, भडोच, येथील यात्रा फार येते. चैत्र शु० पौर्णिमेला जी यात्रा भरते त्यांत गुजराथी व भाटे यांचा समुदाय जास्त असतो. यात्रेंत नवल वाटण्यासारखी दुसरी गोष्ट अशी आहे कीं, या देवीचीं उपासक कांहीं पार्शी घराणीं आहेत. या यात्रेला पारशांच्या सुवासिनी बायका आपल्या कपाळीं चांगलें ठळक कुंकू लावून खणा नारळांनीं हिची ओटी भरतात ! मात्र यांना देवीला प्रत्यक्ष शिवूं देत नाहींत. ही मंडळी जवळ जाऊन दर्शन घेतात. जसा ज्याला साक्षात्कार झाला असेल त्याप्रमाणें तो त्याच्या भजनी लागतो व तेथेंच त्याला देव दिसतो हेंच खरें. ख्रिश्चन वस्तीमध्यें जें ख्रिस्ताचें प्रख्यात देऊळ असेल त्यालासुद्धां कांहीं हिंदू लोक भजतात. भायंदरच्या पुढें एका टेकडी-वर एक ख्रिश्चनांची देवी ( मयत माउली ) नांवाचें स्थान आहे. तेथें ख्रिस्ती लोकांची फार यात्रा भरते. त्यावेळीं हिंदूही त्या यात्रेस जाऊन देवीला नवस करतात ! कर्म-धर्मसंयोगानें ती पावतेही !! ही देवी पूर्वींची हिंदूंची होती, पण पोर्तुगीजांनीं हा प्रांत बाटविला त्यावेळीं ही मूळ देवीच बाटविली व तेथून ती काढून तेथें आपली माउली नेऊन ठेविली किंवा तिलाच माउ-लीचें स्वरूप दिलें हें समजत नाहीं. सदरप्रमाणें मुसलमानांचीही स्थिति आहे. औरंगजेबासारखा कडवा मुसलमान, पण मोठ्या गोसाव्यांचें व राजांचें ब्रह्मतेज व साक्षात्कार पाहून त्यानें त्यास इनामाची सनद ताम्रपटावर करून दिली ! असें हजारों ठिकाणीं त्याचें व दुसऱ्या मुसलमानांचे झालें. याच्या उलट कल्याणजवळ बुवा मलंग नांवाचा डोंगरावर पीर आहे. त्याचे पुजारी ब्राह्मण आहेत. मागें १८९७ सालीं हिंदु मुसलमानांची मारामारी

मुंबईस झाली. त्यामुळें पुढें त्यांचा व हिंदूंचा बेबनाव झाला त्यावेळीं सर्व मुसलमानांनीं एक होऊन ह्या पिरासंबंधें ठरविलें कीं, येथील ब्राह्मण पुजारी काढून टाकावा. पण त्या देवानें त्यांच्या पुढाऱ्यांस साक्षात्कार दिला कीं, ब्राह्मणाशिवाय मला कोणीही मुसलमानांनीं शिवूं नये ! आणि ह्या ब्राह्मण पुजाऱ्याला काढूं नये. ब्राह्मणाशिवाय मला कोणाच्याही हातचें पाणी चालणार नाहीं, मला तें आवडणार नाहीं. तेव्हां सर्व मुसलमानांचा निरुपाय झाला ! ! कांहीं ख्रिश्चन कोळी पंढरीचे वारकरी आहेत, हें प्रसिद्धच आहे. सारांश, देवाच्या दरबारामध्यें जात व धर्म हीं झूट आहेत. देव आणि भक्त यांची मात्र सांगड आहे. जेथें प्रेमळ भक्त उत्पन्न झाला तेथें देवाचें वास्तव्य आलेंच. मग तें उपासकाच्या भक्तीप्रमाणें हिंदू, मुसलमान, जैन देऊळ किंवा ख्रिश्चन चर्च असो किंवा प्रल्हादानें दाखविलेला एखादा खांब असो, तेथें इच्छिलेलें दैवत प्रगट होतें व आपला साक्षात्कार दाखवितें. नुसत्या प्रेमळ भक्तीनें जर देव वश होतो तर शुद्ध मंत्रानें कां होणार नाहीं ? मंत्राचा साक्षात्कार जगांत प्रसिद्धच आहे. मात्र त्याची पाळणूक झाली पाहिजे. नाहींतर ते निष्फळ होतात. इतकेंच नव्हे तर तेच कर्त्याला मारक होतात. म्हणूनच वेद, संहिता वगैरे भलत्याच्या तोंडीं जाऊं नयेत, इतकेंच नव्हे तर ते भलत्यानें, मंत्र ह्या दृष्टीनें ऐकूंही नयेत. पाश्चात्याप्रमाणें अर्थ जाणणें हा भाग निराळा आहे. मंत्र-कार्य दृष्टीन, फार काय ब्राह्मण जर शुचिर्भूत नसला तर त्यालासुद्धां तो म्हण-ण्याचा अधिकार नाहीं. सर्पाचें विष उतरणें किंवा भुताटकी घालविणें यांचे मंत्र पूर्णपणें पाळून ते जपतांनासुद्धां त्यानें शुद्ध व्हावेंच लागतें. इतकें शुद्ध व्हावें लागतें कीं स्नान करून ओलेल्यानें आंग न पुसतां पाण्याचा तांब्या भरून आणून त्यानें मंत्रोदक टाकावें लागतें. तसें केलें नाहीं तर मंत्राची कार्यसिद्धि होत नाहीं. सर्पानें चावलेले लोक मेलेले दिसले तरी मंत्रसाम-र्थ्यानें त्यांस जिवंत केल्याचीं उदाहरणें प्रसिद्ध आहेत. इतकें मंत्राचें सामर्थ्य आहे. मात्र तें त्याच्या पाळणुकीप्रमाणें कडक रीतीनें पाळलेंच पाहिजेत. हेंच शुद्धाचाराचें व शुचिर्भूतपणाचें रहस्य आहे.

ह्या महालक्ष्मीच्या यात्रेमध्यें देवाच्या साक्षात्काराच्या एक दोन गोष्टी अद्याप आढळतात. तत्वज्ञान्यांनीं शोध करून आपली अक्कल चालवून त्याचीं कारणें शोधून काढावीं.

१ माशांचा संचार कोठें नाहीं असें नाहीं. त्याप्रमाणें तो येथेंही आहे. पण या यात्रेचे दिवसांत एकही माशी येथें दिसत नाहीं. यात्रा थोडके दिवस नसते, तर पंधरा दिवस असते. मोठमोठीं मिठाईचीं दुकानें असतात. खजूर, गूळ, मांस ताजें, कुजलेलें वगैरे माशांच्या उपद्रवांचे पदार्थ विपुल असतात. पण एकही माशी दृष्टीस पडत नाहीं. यात्रा संपून गेली म्हणजे माशांचा सुकाळ होतो व त्यानें पुढें घाणीचा नाश होतो !

२ महालक्ष्मीजवळ एक डोंगर आहे. तो खालपासून वरपर्यंत अगदीं सुळक्यासारखा गेला आहे. तो हिची दिपमाळच आहे. अगदीं वर कोणा-सही जाववत नाहीं, इतका तो सुळका कठीण व उंच आहे. पण चैत्र शुद्ध पौर्णिमेला रात्रीं दहा अकरा वाजतां देवीचा वर असलेला एक पुजारी एक पुरुषभर उंचीची पताका मोठ्या वाशासुद्धां घेऊन व देवीच्या ओटीचें, पूजेचें साहित्य व दिव्याचें साहित्य घेऊन एकटा वर जातो. व तेथें मुख्य महा-लक्ष्मीचें स्थान आहे तिची मध्यरात्रीं पूजा करून, खणानारळांनीं ओटी भरून, मोठी मशाल लावून व ती पताका लावून उजाडण्यापूर्वी परत येतो ! दिवा रात्रीं लागलेला दिसतो व सकाळीं उजाडल्यावर पताका वीतभर रुंदीची नवी फडकत आहे असें सर्व जगास दिसतें. यावरून तो त्यावेळीं तेथें गेला यांत शंका नाहीं. तो जातो तेव्हां शुद्धींत नसतो व येतो तेव्हां-ही शुद्धींत नसतो. त्याला लोक त्याच्या मर्यादेपर्यंत ह्मणजे लौकिक रस्ता आहे त्यापर्यंत पोचविण्यास जातात. पुढें रस्ता नाहीं, काटेकुटे असतात, तरी तो जलद चालतो. त्याच्या पुढें यांचा उपाय चालत नाहीं, सबब ते परत जातात. हा एकटाच पुढें जातो व कार्य करून येतो. याला विचारिलें, तूं कसा जातोस ? तर तो ह्मणतो, मला माहीत नाहीं. कोणी बाई येते व मला घेऊन जाते व मजजवळून सर्व काम करून घेऊन ती मला या ठिकाणीं पुन्हां आणून पोहोंचविते. ती सांगते त्याप्रमाणें मी करतों. बाई कशी असते ? असें विचारलें तर, सांगतां येत नाहीं असें ह्मणतो. ही पताका, चोळीपातळ व पूजासाहित्य जव्हारच्या राजाकडून येतें. तें सर्व सामान तो एकटा रात्रीं घेऊन कसा जातो, हें आश्चर्य पाहण्या-करितां अतीशय मंडळी जमलेली असते. हें सर्व सामान घेऊन जाण्यापूर्वी देवीजवळ ऊद लावून एक तासभर तो घुमत असतो. त्याच्या अंगांत

४४६६

संचार झाला म्हणजे लोक, विशेषतः बायका त्याला आपल्या इष्ट कामना सिद्धीचे नाना प्रकारचे प्रश्न विचारितात. ते बहुतेक मुलांबाळांसंबंधाचे किंवा भांडण, इस्टेटीसंबंधाचें असतात. त्या इष्ट कामना सिद्धीकरतां नवस घेतात व ते फेडण्याकरितां सिद्धीनंतर येतात. या नवसांपैकीं चोळी, पातळ, बांगडी, एकवीस नारळाची पेंड बांधून नवस करणें वगैरे सर्वांस माहींतच आहे; पण येथें आणखी एक चमत्कारीक नवस घेतात. तो असा कीं, मी माझ्या नवऱ्याजवळ तुझ्या समक्ष पुन्हां लग्न लावीन ! अशीं पांच पांच मिनिटांचीं लग्नें येथें पुष्कळ होतात व त्याबद्दल भिक्षुकास दर लग्नामागें आणा दोन आणे दक्षणा, मगळाष्टकें दीर्घ स्वरांत म्हणण्याबद्दल मिळते. हीं लग्नें अर्थात इतर जातींचीं—कुळवाड्यांचीं असतात. लग्न लावावयाचें म्हणजे नवरीचे हातांत माळ द्यावयाची, नवऱ्याच्या द्यावयाची; जोशीबोवांनीं एक मंगळाष्टक म्हणावें व नंतर एकमेकांनीं एकमेकांच्या गळ्यांत माळा घालावयाच्या. जोशानें नवऱ्याबायकोला कुंकू लावावयाचें कीं झालें लग्न ! ! अशी त्या मांडवांत रात्रभर लग्नांच्या लग्नेंच चाललीं असतात. हे सर्व नवस पूर्ण झाले व विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें त्यानें दिलीं म्हणजे तो सर्व सामानासुद्धां त्याची वेळ झाली म्हणजे धांवतच निघतो, व लोक त्याचे पाठीमागें जातात. मग तेव्हांपासून पुढें यात्रा उलगडत जाते.

वर जाण्याचा अधिकार देवीच्या पुजाऱ्यांच्या कुटुंबांत एकासच असतो. तो मेला तर देवीच्या प्रसादानें त्याच्या कुटुंबांतील ज्याच्याबद्दल साक्षात्कार देईल व ज्याच्या स्वप्नांत येईल त्यास तो अधिकार येतो. असा क्रम चालतो. यात्रेचे दिवसांत डहाणू स्टेशनवर गाड्या, टांगे, मोटारी मिळतात. दर्शनाची यात्रा निघून गेल्यावर वज्राबाईप्रमाणें पंधरा दिवस व्यापारी यात्रा राहाते. तींत सर्व प्रकारच्या प्रापंचिक वस्तु मिळतात व त्यांचा चातुर्मास्य संग्रह तेथील गांवढेकरी करितात. हल्लीं महालक्ष्मीला प्रशस्त धर्मशाळा व विहिरी खणून चांगल्या पाण्याची सोय झाली आहे. पूर्वी पाण्याचा फार त्रास होता.

या यात्रेनंतर मुंबईस येऊन कोंकणचा प्रवास करावयाचा, त्याकरितां निघालों. कोंकणच्या लगत्यास जाणाऱ्या बोटी अलेक्झँड्रिया डॉकमधून निघतात. तेथून उलवे, धरमतर लाईनीच्या व टपालाची बोटही सकाळीं साताचे सुमारास

निघते. धरमतरची बोट प्रथम मांडवी बंदर करते. पुढें करजें, रेवस करून ती धरमतरपर्यंत जाते व तेथून त्याचमार्गानें परत मुंबईस येते. हिच्याशिवाय रोज मांडवे, रेवसकरितां मुंबईहून दुपारीं अडीचला स्पेशल बोट सुटते. ही बोट मांडवी बंदर मुंबईहून येतांना करते. मुंबईला परत जातांना करीत नाहीं. कारण, मांडव्याला समुद्र उथळ असल्यामुळें बोटीला किनाऱ्याजवळ येतां येत नाहीं; ह्मणून होडी व गलबतांतून बोटींत जावें लागतें. हीं गलबतें किंवा पडाव शिडावर चालतात, वल्ह्यावर चालत नाहींत, यामुळें आलेलीं माणसें उतरून पुन्हां जाईपर्यंत बोट रेवस धरमतरवरून निघूनसुद्धां जाते! दोन पडाव ठेवण्याइतकी मांडवी बंदरला मंडळीची गर्दी नसते, यामळें तसा ठेवतां येत नाहीं. ह्मणून मुंबईस जाणाऱ्या उतारूंनासुद्धां प्रथम जाणाऱ्या बोटींतच बसावें लागतें व रेवस, करंज्यावरून मुंबईस जावें लागतें. यामुळें मुंबईस जाण्याचें भाडें, मांडवी, करंजें, रेवस ह्या बंदरांवरून सर्वत्र सारखेंच आहे. बोट चुकल्यास ह्याच बंदरांकरितां मुंबईहून बोटीच्या धक्याजवळूनच पडाव सुटतात. ते मंडळीच्या रहदारीप्रमाणें सुटतात व मुंबईस किंवा बंदरांत वाऱ्याच्या अनुकुलतेप्रमाणें पोंहोचतात. अडीच वाजतां मुंबईहून निघणारी बोट शाश्वतीची नाहीं. म्हणजे कंपनीपाशीं बोट शिल्लक असल्यास ती ते सोडतात. नाहींतर सोडीत नाहींत. यामुळें बरेंच वेळां उतारूंची फजिती होते. बंदराजवळ वस्तींत गांव नसल्यामुळें आल्यामार्गें त्याच मंडळीस परत जावें लागतें. किंवा पडावानें अनिश्चित वेळीं जावें लागतें. शनिवारीं दुपारीं व सोमवारीं सकाळीं मात्र ह्या बोटीचें जाणें येणें निश्चित घडतें.

करंज्याशिवाय कोणत्याही बंदरांत उतरून

## कनकेश्वर.

येथें जाण्यास सोयीचे रस्ते आहेत. ह्मणजे सडकाच आहेत पण त्यांत मांडव्याचा किंवा रेवस बंदरचा रस्ता बरा आहे. धरमतरचा रस्ता सडक सोडून थोडा जास्त आडवळणाचा आहे. मांडवे, रेवस व धरमतर ह्या तिन्ही बंदरावरून अलिबागला जाण्याला चांगल्या सडका आहेत व बोटीच्या वेळीं मोटार टांगे वगैरे वाहानें मिळतात. कनकेश्वराचे डोंगरावर उत्तर टोकांस एक दिपमाळेसारखी लाट आहे. कनकेश्वराचें डोंगरावर जाण्यास पायऱ्या मापगांवपासून

आहेत. कनकेश्वराचा डोंगर रेवस व मांडवे ह्या दोन सडकाच्या मधोमध आहे. वर चढण्यास दाक्षिणेकडून म्हणजे मापगांवावरून पायऱ्या आहेत. मापगांव हे दोन्ही सडकेपासून सुमारें दोन तीन मैल आहे. मुख्य सडकेपासून मापगांवपर्यंत लोकलफंडी सडक आहे मापगांव रेवसपासून आठ किंवा नऊ मैल व मांडव्या-पासून पांच सहा मैल आहे सडक आहे, पण यापेक्षां मांडव्यावर किंवा रेवसवर उतरावें. तेथून अलिबागकडे सडक जाते त्या सडकेनें सात मैल सहा फर्लांगाचे सुमारास झिराड म्हणून गांव लागतो. सडकेवर त्या गांवचीं चहाचीं हॉटेलें आहेत तेथें उतरून एक गडी करून कनकेश्वरचा डोंगर चढावा. गड्याशिवाय मात्र जाऊं नये, निदान डोंगराचा चांगला रस्ता लागेपर्यंत तरी गडी करावा. झिराडपासून डोंगराचा पायथा अर्धा पाऊण मैल आहे. डोंगर-वाटेंत रस्ते पुष्कळ फुटतात. लोक सरळ जा असें सांगतात, पण त्यांत अर्थ नसतो. सबब जातांना डोंगरापर्यंत गडी घ्यावा. येतांना जरूर नाहीं. कारण कोठूनही निघालें तरी मोठी सडक लागतेच. झिराडपासून कनकेश्वराकडे बरीच मंडळी जात असते. कनकेश्वरला बाजार झिराडचाच आहे. थेटचा गडी मिळाला तर बरेंच झालें, नाहींतर स्वतंत्र गड्यास आणा दोन आणे दिले ह्मणजे तो बोजा घेऊनसुद्धां जातो.

कनकेश्वराचे डोंगरास जाण्यास इतर डोंगराप्रमाणेंच डोंगराचे दांड आहेत. तो दांड चुकला ह्मणजे मनुष्य कोठें जाईल याचा नेम नाहीं. सबब कनकेश्व-राच्या दांडाची चांगली माहिती करून घेऊन चढूं लागावें. खरा दांड लागल्यावर कनकेश्वरास जाण्यास चांगला तयार केलेला तीन फूट रुंदीचा प्रशस्त सडकवजा मार्ग आहे. ह्या मार्गाला लागलें ह्मणजे पुढें चुकण्याचा संभव नसतो. हा मार्ग थेट देवळाजवळ जातो. ह्या मार्गानें जाणारास टेकडीच्या पायथ्याशीं ओहोळ, व जिवंत पाण्याचें डबकें हीं लागतात. ही खूण आहे. टेकडीचा चढाव सुमारें मैल दीड मैल आहे. चढाव बेताचा आहे, अवघड नाहीं.

वर गेलें ह्मणजे डोंगराचा माथा लागतो. हा सपाट असून त्यावर उत्तम झाडी आहे. वर गेलें ह्मणजे कनकेश्वराचें देऊळ मधोमध लागतें. त्याच्या भोंवतीं बहुतेक धर्मशाळा आहेत. या धर्मशाळा कांहीं संस्थानांतून आहेत. व कांहीं दर्शनास येणारे व्यापारी व संस्थानिक यांच्या आहेत. हल्लीं यांची रिपेर

होत नसल्यामुळें त्या पडीक होत चालल्या आहेत. व त्यांच्या भिंतीवर कोळशानें किंवा खडूनें वेड्यावाकड्या रेषा, चित्रें, अक्षरें तेथें जाणारांनीं काढून आपल्या अकलेचें व चित्रकलेचें प्रदर्शन केलें असतें. यांत सर्व लोक अशिक्षितच असतात असें नाहीं. चांगले इंग्रजी शिकलेले, निरनिराळ्या कॉलेजमध्यें अभ्यास करीत असलेले, ब्राह्मणसुद्धां आहेत! हा प्रकार येथेंच आहे असें नाहीं. रिकामी किंवा ओसाड जागा दृष्टीस पडली किंवा उतारूंकरितां धर्मशाळा कोणी बांधून ठेविली ह्मणजे अशा अकली व ज्ञानी मनुष्याच्या अकलेचे तारे तेथें तुटलेले जिकडे तिकडे दृष्टीस पडतात. कोणी पायऱ्यावर आपलीं नांवेंही कोरून ठेवितात. दुसऱ्याच्या कृतीवर आपलें नांव चालविणारे परोपजीवी, परभृत, अशी श्ववृत्ति लहानपणापासून सुरू झाली ह्मणजे त्यांना स्वकर्तव्याचा अभिमान कसा येईल? ज्यांनीं ह्या इमारती बांधल्या किंवा परोपकारार्थ सत्कृत्यें केलीं तें आपलीं नांवें आत्मश्लाघा होईल ह्मणून कधीं लिहीत नाहींत. जनता किंवा गुणी लोक चौकशी करून त्यांच्या नांवाचें पुण्य–स्मरण करतात. आणि ह्या मूर्ख मंडळीची ही कृति पाहिली ह्मणजे अत्यंत तिरस्कार उत्पन्न होतो. कोठेंही सत्कृत्यें पाहून यांच्या हातून तशीं किंवा दुसरीं सत्कृत्यें तर होत नाहींतच, पण सडकेवरील काव्यासारखीं दुष्कृत्यें मात्र होतात व सत्कृत्यें विध्वंसक होऊन आपली दुष्कीर्ति मात्र करितात. हा काय बुद्धीचा दुबळेपणा किंवा मनुष्य जन्माचा दुरुपयोग! अशास काय ह्मणावें!

**जे कां व्यर्थ परार्थ हानि करती ते कोण कीं दुर्मती ॥**

जुन्या कृत्यांवर असें जिकडे तिकडे लिहिलेलें दृष्टीस पडतें तें पडूं नये, त्याला थोडा तरी आळा पडावा ह्मणून हे चार शब्द लिहिणें भाग झालें आहे. हा शिक्षणाचा केवळ दुरुपयोग आहे.

कनकेश्वराचें देऊळ महाराष्ट्र सरदार आंग्रे यांनीं बांधिलें आहे. देऊळ जुन्या पद्धतीचें, पुण्याच्या तुळशीबागेच्या देवळाच्या घुमटासारखें आहे व तें अद्याप सुस्थितींत आहे. सभामंडप मात्र मोडकळीस आला आहे. जवळ एक कृत्रिम पुष्करणी आहे. पण तिचें पाणी सांचवणाचि दिसलें. कनकेश्वर देवस्थान उत्तम आहे, पण तेथें पाण्याचें दुर्भिक्ष आहे; ह्मणून तेथें जाणारानें शिमग्यापर्यंत तरी जावें. देवस्थानाला चारी प्रहर वाजणारा चौघडा, त्रिकाळ पूजा, नैवेद्य, आरती करणारे निरनिराळे ब्राह्मण आहेत. आल्यागेल्याला, मग

तो कोणीही असो, मुसलमान, अंत्यज असला तरी त्याला सिधा मिळतो. ब्राम्हणास छत्रांत तीन दिवस जेवावयास मिळतें. एकंदर नोकर चाकर मिळून देवाचे संस्थानाखातर पन्नास पाऊणशें मंडळी त्याच्या मुलांमाणसांसुद्धां असते. सर्वांना राहाण्यास संस्थानच्या इमारती आहेत. डोंगरावर झाडी विपुल आहे. पण त्यांत साग, पळस किंवा उंची लांकडांचें जंगल नाहीं. रान जंगल असल्यामुळें येथें वाघाची पैरवी आहे. संध्याकाळीं किंवा वेळेवर गुरूंढोर आलें नाहीं, ह्मणजे तें वाघोबाच्या भक्ष्यस्थानीं पडलें असें समजावें! वस्तींत मात्र वाघाचा उपद्रव सहसा नाहीं. कधीं चुकन आल्यास नकळे. येथें कार्तिकींचे व महाशिवरात्रींचे उत्सव होतात. ही सर्व व्यवस्था संस्थानची आहे. आंग्रे सरकारनें दिलेल्या दोन हजारांच्या उत्पन्नावर हें चालतें. देवाचें उत्पन्न एकशें पंचवीस खंडी भाताचें असून तो सर्व डोंगर त्यास इनाम दिला आहे. पुजारी, चौघंडेवाले यांना कांहीं जमिनी व थोडा पगार असें दिलें आहे. एकंदर हें ठिकाण तपःश्चर्येला उत्तम आहे. येथें एका झाडींत मारुतीच्या देवळाजवळ

## मिरचीबुवा

ह्मणून एक गोसावी तपःश्चर्या करीत होता. तो मिरच्या खाऊन आपली उपजीविका करी! ओली किंवा सुकी मिरचीशिवाय तो कांहीं खात नसे. याचें सर्व परसूं मिरच्यानें भरलेलें होतें. यानें एक शेर मिरची काकडीसारखी खाऊन दाखविली. हायहुश कांहीं केलें नाहीं व पाणीही प्याला नाहीं. मग डोळ्याला पाणी कोठलें? असें यानें मिरची खाण्याचें व्रत देवस्थानाच्या अधिकाऱ्यास दाखविल्यामुळें रोज याच्या आहारार्थ त्याला संस्थानांतून एक शेर मिरच्या मिळत असत! असा तो दहापंधरा वर्षें तेथें तपश्चर्या करीत होता. पण पुढें एका बाईच्या नादीं लागून गेला, असें ह्मणतात!! सगळेंच आश्चर्य!!! अगोदर जन्मांत मिरची न खाणारे मनुष्य आढळतात. ते तिखटाकरितां मिऱ्यांचा उपयोग करतात. तिखट जास्त खाणारे देशस्थ, कऱ्हाडे, किंवा सर्वांस जास्त खाणारे तैलंग! पण मिरची हाच आहार करणारा मनुष्य क्वचित् मिळणार. माझ्यातरी कोठें पाहण्यांत नाहीं. मिरची हा तामस आहार आहे. ह्मणून जितेंद्रियत्व येण्याला साधुसंतांनीं त्याचा त्याग केला आहे. पण ह्यानें मिरची खाऊन एक दीड तप जितेंद्रियत्वाची तपःश्चर्या केली, तरी त्याच्या शरिरांतील मदन चैतन्य नाहींसें झालें नाहीं. आणि एखाद्या सामान्य बाय-

कोंच्या दर्शनानें किंवा संगतीनें त्यांनें आपली एवढी तपःश्चर्या फुकट घालविली !! यावरून मदनाला जिंकणें किती असाध्य आहे हें पहा !!! हल्लींसुद्धां बाह्यस्वरूप दिसून येईल त्यावरून कोणाचाही अंत महासाधूंचासुद्धां लागला नाहीं; मग इतरांची गोष्ट कशाला ?

कनकेश्वराचें स्थान स्वयंभू आहे. एका खडकाच्या खळग्यांत मध्यें गाईचें पाऊल असून भोंवतीं पांच लिंगें आहेत. हा खळगा नेहमीं सूक्ष्म वाहत्या पाण्यानें भरलेला असतो. हीच त्या शिवाच्या मस्तकांतील गंगा होय. ही सूक्ष्म प्रमाणांत नेहमीं सारखी वाहात असते; पण कोणाचा विटाळ झाल्यास गुप्त होते. अशा वेळीं कितीही पाणी घातलें तरी खळगा कोरडा पडतो. मग पुन्हां अनुष्ठान व शुद्धी केल्यानें ती पुन्हां सुरू होते, असा प्रकार पुष्कळांनीं पाहिला आहे. हा येथें

## एक ईश्वरी साक्षात्कार

किंवा सृष्टिचमत्कार आहे. याची उपपत्ती तज्ञांनीं व भाविकांनीं पाहिजे तर लावावी; व हा देवाचा, मंत्रांचा किंवा सृष्टीचा क्रम आहे हें ठरवावें.

कोंकण हा प्रांत अग्निजन्य खडकाचा आहे. प्राचीन काळीं भूगर्भांतून दगड मातीचा रस ऊर्फ लाव्हा बाहेर येऊन तो जमिनीवर पसरला व तेथें थिजला. पुढें पाऊसपाण्यानें किंवा समुद्राच्या लाटांच्या माऱ्यानें वरील माती धुपून जाऊन लाव्ह्याचा भिन्न भिन्न आकृतीचा खडक मात्र राहिला. आपल्या इष्टदेवतेच्या शोधार्थ निघालेल्या भाविक मंडळीला तें प्रत्यक्ष इष्टदेवतेचें स्वरूप दिसून ते त्याचें ध्यान करूं लागले. ध्यानभावनेच्या ठिकाणीं ईश्वर, माया किंवा आपलेपणा आहेच. तो दगड, धातु, लांकूड किंवा माणूस या कशांतही नाहीं, ही गोष्ट विश्रुत आहे.

काष्ठ पाषाण धातूनाम् कृत्वा भावेन सेवनम्
भावांहि विद्यते देवो तस्मात् भावोहि कारणम्

अशा रीतीनें भाव धरून पूजा अर्चा केली म्हणजे ती ईश्वराला पोंहोंचून इष्ट–सिद्धि होऊं लागते व त्या देवाचा महिमा वाढतो. याच प्रकारें बहुतेक स्वयंभू स्थानें झालेलीं दृष्टीस पडतात. किंवा दुसरा प्रकार असा दिसतो:– प्राचीनकाळीं आर्यावर्तांत किंवा सर्वत्र जगभर आर्यधर्म होता. सबब त्या मंडळींनीं खडकावर किंवा दगडांत इष्टमूर्ति खोदून काढून देवतेची स्थापना केली.

पुढें परधर्मियांचे हल्ल्यानें किंवा सृष्ट घडामोडीनें तें देवस्थान मातींत बुडून गेलें. पुढें कांहीं कारणांनीं ती माती उकरण्याचा प्रसंग आल्यामुळें त्या मूर्तीचें दर्शन होऊन तेथें स्वयंभू देव प्रगट झाले असें म्हणण्याची रूढी पडली. अतिशय भावनेमुळें किंवा निदिध्यासानें एखाद्याच्या स्वप्नांत आल्यामुळें ही जागा खणली व तेथें ही इष्ट मूर्ति सांपडली, असेही प्रकार घडतात. पण तें अत्यंत श्रद्धेनें किंवा भावनेनें घडतें. कनकेश्वराचा हा प्रकार अग्निजन्य खडकापैकींच आहे असें दिसतें. असें लिहिण्यानें देवाविषयीं अश्रद्धा किंवा नास्तिकभाव प्रगट होतो असें नाहीं. विराट स्वरुपाच्या मायेचें हें वर्णन आहे.

कनकेश्वरानंतर अलीबागेवरून

## चौल

ला यावें. येथें अग्निकुंड, पर्जन्यकुंड, वायुकुंड अशीं कुंडें एका साधूनीं आपल्या तपश्चर्येनें करून ठेविलीं आहेत. तीं यथाविधी होमहवन व बलिदानानें जागृत केल्यास त्या त्या देवता प्रगट होतात व अरिष्ट शांती होते. पैकीं अग्निकुंड व वायुकुंड हीं सहसा कोणी उघडीत नाहींत. पण पर्जन्य गेल्यास पर्जन्यकुंड मात्र उघडतात. यथाविधी यज्ञ केल्यावर त्याला बलिदान द्यावें लागतें. अशानें नक्की पाऊस पडतो, असा तेथील लोकांचा अनुभव आहे. हीं कुंडें चौकोनी बांधलेलीं आहेत. तीं माती घालून बुजवलेलीं आहेत. कुंडें उघडणें ह्मणजे येथील माती उकरून काढणें होय. हीं उघडण्याकरितां जो प्रथम कुदळ मारतो ती त्यानें विधीपूर्वक मारली असली तरी त्यावर त्याचा कांहींतरी अनिष्ट परिणाम घडतो असें म्हणतात. परोपकारार्थ ज्यानें जीव धारण केला असेल त्याच्या हातूनच ह्या गोष्टी होतात. निद्रिस्थ देवता जागृत केल्यास ती प्रथम कुदळ मारणाराचें बलिदान घेते व ती इष्टकार्यार्थ सिद्ध होते, असें दिसतें. कुंभकर्णाला उठवला तेव्हां त्यानें असेंच विलक्षण खाणें खाल्लें व नंतर तो युद्धास निघाला! असाच हा प्रकार आहे. त्यांचीं बलिदानेंही तशींच आहेत. एकास घोडा, एकास पितांबर व एकास मनुष्यच बळी लागतो असें म्हणतात. यापैकीं नरयज्ञ आतां गेलाच! चौलला प्राचीन काळचें चंपावती हें नांव आहे. नंतर पुन्हां अलीबाग, धरमतरवरून नागोठण्यास यावें. चौलहून एकदम नागोठण्यास येतां आलें तर यावें. नागोठण्याहून पालीला सडक आहे. तेथें येऊन

# श्रीबल्लाळ विनायक

याचें दर्शन घ्यावें. नागोठण्याहून पाली सात मैल आहे. अष्टविनायकांपैकीं हा गणपती आहे. बल्लाळ गणपतीचें मुख्य स्थान कोणचें ? त्र्यंबकेश्वरास बल्लाळ गणपतीचा अवतार झाला आणि तें खरें मानून रघुनाथराव ऊर्फ दादासाहेब पेशवे यांनीं तेथें देऊळ बांधल्याचें तिसऱ्या भागांत वर्णन केलें आहे. ' स्वस्ति श्रीगणनायको गजमुखो ' या गणपतीच्या अष्टविनायकाचे श्लोकांत ' बल्लाळो मुरूडे ' म्हणजे बल्लाळ विनायक मुरुडास आहे असें सांगितलें आहे. कोणी मुरुडचा गणपती नांदगांवास गेला असें सांगितलें म्हणून तिकडे गेलों. तें वर्णन यांत आहेच. या बल्लाळबद्दल मागें पेशवाईत पुष्कळ वाच्यता झाली व हल्लीं हें स्थान पालीचा गणपती, हाच अष्टविनायकांपैकीं बल्लाळ—विनायक असें ठरवून तेथें मोरोबादादा फडणीस यानें हें देवालय बांधून नेमणूक करून दिली. सभामंडप रिंगे नांवाच्या हिरड्याच्या कंत्राटदारानें बांधून दिला आहे. देवालय तुळशीबागेप्रमाणें असून त्याच्यापुढें पाण्याची दोन कृत्रिम खडकांत खोदलेलीं कुंडें आहेत. पाली गांवापासून हें देवस्थान सुमारें दोन फर्लांग लांब आहे. सिंधुदेशांत गणपतीचा अवतार झाला आहे अशी पौराणिक कथा आहे. त्याप्रमाणें असें पालीचें स्थान सिंधप्रांतातही समुद्रासन्निध आहे. व तेथेंही गणपतीचें स्थान आहे असें म्हणतात. तेव्हां तें खरें किंवा हें खरें याबद्दल पेशवाईत वाच्यता होऊन अष्टविनायकांचीं स्थानें महाराष्ट्रांतच आहेत, यावरून सिंधप्रांतलें स्थान अष्टविनायकांपैकीं नाहीं; सिंधु म्हणजे समुद्र असा अर्थ घेऊन पाली हेंच मुख्य ठरलें आणि हा गणपती मुरूडहून येथें ( पालीस ) कसा आला याची पौराणिक कथा पुढें मुरुडच्या वर्णनांत दिली आहे.

बल्लाळ विनायकाची पौराणिक कथा अशी आहे. समुद्रासन्निध पल्ली ( पाली ) नांवाचे नगरांत कल्याण नामें धनाढ्य व्यापारी होता. त्याला बल्लाळ नांवाचा एकुलता एक मुलगा होता. तो अत्यंतर सुंदर व तेजस्वी होता. ध्रुवाला बालपणापासून जसा नारायणाच्या भक्तीचा नाद लागला तसा बालपणापासून ह्याला श्रीगजाननच्या भक्तीचा नाद लागला. त्यामुळें त्याचे बालपणचे सर्व खेळ गजाननाच्या भजनपूजनाव्यतिरिक्त नव्हते. तो श्रीमंताचा मुलगा होता, म्हणून त्याच्या खेळास गांवांतील सर्व मुलें जमत. ह्या त्यांच्या

वृत्तीमुळें इतर मुलांचीं शाळेंत जाणें वगैरे नित्यनैमित्तिक कामें प्रल्हादाप्रमाणें अंतरूं लागलीं. मुलांचे भजनपूजनाचे नेहमीं कटकटीमुळें लोक त्रासले. तेव्हां त्यांच्या बापांना राग येऊन ते त्यांना मारूं लागले. तेव्हां मुलांनीं आपला खेळ जवळच्या जंगलांत नेला. तेथें शमीवृक्षाखालीं एक सुंदर लहानसें गणपतीचें देऊळ सर्व मुलांनीं मिळून बांधून त्यांत श्रीगणपतीची मूर्ति स्थापन केली. मग त्यांची तेथें नित्य कथा, पुराणें, भजनें आरत्या, पालख्या वगैरे बाललीला सुरू झाल्या! तो श्रीमंताचा मुलगा असल्यामुळें त्याला त्याच्या आईकडून रोज मागेल तसतसे मुलांना वाटण्याकरितां प्रसाद देण्यांत येत असत. यामुळें मुलांचा जमाव फार जमत चालला. त्यांचा सर्व वेळ त्यांतच जाऊं लागला. त्यांचें. शाळेचें व घरचें भानसुद्धां सुटलें. ते घरीं वेळच्यावेळींही येतना. तेव्हां त्यांच्या आईबापांनीं आपल्या मुलांचा तपास केला कीं रोज मुलें जातात तरी कोठें? तेव्हां त्यांना हा प्रकार समजला. तेव्हां सर्व ग्रामस्थ एकत्र होऊन कल्याणशेटकडे आले व त्यांना म्हणूं लागले कीं, तुमच्या मुलाच्या योगानें आमचीं मुलें बिघडलीं; सबब तुमच्या मुलाचा नीट बंदोबस्त करा. नाहींतर आम्ही सरकारकडे तक्रार करूं. तो शेट मानी असल्यामुळें त्याला हें बोलणें सहन झालें नाहीं. शिवाय अशा मुलाच्या तक्रारी कल्याणशेटकडे वारंवार येऊं लागल्या. तेव्हां जुन्या पद्धतीप्रमाणें तो आपल्या मुलावरच रागावला. त्यानें आपल्या मुलाला पुष्कळ वेळां ताकिदही दिली, परंतु ती फुकट गेली. तेव्हां एक दिवस हातांत वेताची छडी घेऊन मुलें जेथें अरण्यांत होतीं तेथें तो आला.

तेथें येऊन अवलोकन करतां त्याला असें दिसलें कीं, आपला मुलगा देवळा-समोर ध्यानस्थ बसला आहे. बाकीच्यांचें कीर्तन, नर्तन, पुराण चालू आहे वाद्यें वाजत आहेत अशी त्यांची बाललीला गणेशभक्तीनें भरली आहे. ह्याबद्दल त्याला कौतुक वाटावें त्याचे ऐवजीं त्याला अगोदर राग आल्यामुळें त्याच्या दुर्दैवानें आपल्याच मुलाचें हें ढोंग आहे असें त्याला वाटून त्यानें आणलेल्या वेताच्या छडीनें त्याला बेदम मारिलें. तेव्हां बाकीचीं मुलें पळालीं. पण हा खरा ध्यानस्थ असल्यामुळें त्याला तें कांहीं कळलें नाहीं. पुढें ध्यान उतरल्यावर आणखी मारलें तेव्हां त्याला मूर्च्छा आली. तरी बापास तें ढोंगच वाटलें. त्यानें त्या मुलास झाडाच्या वेलींनें त्या शमी वृक्षासच बांधून टाकिलें आणि बजाविलें कीं, जर तूं घरीं आलास तर तुला ठार मारीन! माझ्या मनाप्रमाणें तूं

चागत नाहींस, तूं मला नकोस. तुझा देव तुला सोडवील व खाण्यापिण्याची तजवीज करील!!

अशा चढत्या रागानें कल्याणशेट घरीं आले. ग्रामस्थांनीं केलेला अपमान व आपल्या मुलाचें कृत्य पाहून ते घरीं विचार करीत बसले. इतक्यांत त्याची बायको इंदुमती हिनें मुलाची हकीगत काय आहे, असें आपल्या नवऱ्यास विचारिलें. त्याला तुम्ही अरण्यांत टाकून कां आलांत? असें बोलणें-चालणें होत आहे इतक्यांत कल्याणशेटच्या शरिराची अवस्था फार भयंकर झाली. त्याला डोळ्यांनीं दिसेना., कानांनीं ऐकूं येईना, सर्व इंद्रियें स्तब्ध झालीं, शरिरावर भयंकर रोग उद्भवला व अंगाची आग झाली.

नवऱ्याची अशी स्थिति झालेली पाहून बायकोचे मनांत आलें कीं, आपल्या नवऱ्यानें आपल्या मुलाला छळलें, पण तो खरा देवभक्त असल्यामुळें देवानें अशी व्यवस्था केली असावी. असें तिच्या मनांत येऊन नवऱ्याचे विचारानें ती त्या मुलाचा शोध करण्याकरितां जंगलांत आली तों आपला मुलगा सर्व जडजवाहिराच्या अलंकारांनीं युक्त असून तो दैवी वैभवानें युक्त अशा मार्गे सांगितलेल्या देवळांत गणपतीपुढें तपःश्चर्या करीत बसला आहे असें तिला दिसलें. तिनें देऊळ व तेथची शोभा पाहून आपण चुकलों तर नाहींना. असें तिला प्रथम वाटलें. मुलाचें ध्यान समाप्त झाल्यावर त्यानें आईची भेट घेतली. तिनें बापाची सर्व हकिगत सांगितली. पण तो म्हणाला मी काय करूं? अपराध्यास दंड भोगलाच पाहिजे, पण तिनें विशेष प्रार्थना केल्यावर त्यांच्या उद्धाराचा मार्ग त्यानें गणपतीची प्रार्थना करून सांगितला. व त्याप्रमाणें वागून त्याचा उद्धार झाला.

अशी ही बल्लाळ विनायकाची कथा आहे. यापैकीं हें स्थान पालीच्या बाहेर नजीक जंगलांत आहे. जवळ दोन पुष्करण्या आहेत. सर्वत्र जमीन पाणथळ व जागा रम्य आहे. आतां देवळासभोंवतीं घरें बांधिलीं आहेत. देवाची मूर्ति फार रुंद व विस्तृत, ओबडधोबड अशी बस्टसारखीच अकृत्रिम आहे असें दिसतें. याच्या स्वरुपावरून मुरुडाहून बैलाच्या गोणींतून हा आला असेल असें मुळींच वाटत नाहीं. कदाचित् याची स्थापना मागून झाली असेल. मात्र देवस्थान रम्य आहे. त्रिकाळ चौघडा आहे. हा रामभाऊ मोडक म्हणून वकील होते, त्यांनीं देऊन आपलें नांव अशा प्रख्यात ठिकाणीं सर्वतोमुखीं केलें आहे.

इकडे मुलगा कांहीं वेळानें शुद्धीवर आला तेव्हां त्याला देऊळ उध्वस्त झालें आहे, मूर्ति छिन्नविच्छिन्न होऊन कोणी कोठें फेकून दिली आहे, सर्व मुलें पळून गेलीं आहेत, जिकडे तिकडे वस्तु अस्ताव्यस्त पडल्या आहेत, असा देखावा पाहून फार वाईट वाटलें. व आपल्या उपास्य दैवताची अशी विटंबना करणारा कोण असेल त्याला शाप देऊं लागला. त्या शापाप्रमाणें तिकडे मागें सांगितल्याप्रमाणें बापाची स्थिति होत गेली. इतक्यांत एक वृद्ध ब्राम्हण आला व त्यानें त्याची समजूत केली कीं, पूर्व कर्माप्रमाणें सर्व गोष्टी होतात व त्याप्रमाणें त्याला फळें मिळतात; यांत तुला शाप देण्याचें कारण नाहीं, हा नाश करणारा तुझा बापच आहे. तेव्हां मुलगा रागानें म्हणाला, तुला येथें मला उपदेश करण्याचें कारण नाहीं. माझी आराध्यमूर्ति अशी नाश पावली म्हणून मला फार वाईट वाटत आहे. तेव्हां तो ब्राम्हण म्हणाला तूं रागावू नको! तूं ज्याचें ध्यान करीत आहेस तोच गणपती मी! तुझी भक्ति पाहून तुला प्रत्यक्ष दर्शन देण्याकरितां आलों आहे. तेव्हां मुलगा म्हणाला; मी ज्याचें ध्यान करीत आहे तो तूं नाहींस. आणि जर खरा गणपती असशील तर मी जसें तुझें म्हणून ध्यान करीत होतों तशा रूपानें तूं मला सालंकार दर्शन दे! तेव्हां तो तथास्तु म्हणून अदृश्य झाला व हा ध्यान करूं लागला. हे विनायका! तुला विघ्नहर्ता असें म्हणतात, तुझी पूजा केली असतां विघ्नें नाहींशीं होतात, असें असून तुझ्या पूजेनेंच हें विघ्न कसें आलें? मी तुझी पूजा करीत असतां मला मार मिळाला त्याचें कांहीं वाटत नाहीं, पण तुझ्या पूजेचा उच्छेद झाला याबद्दल मला फार वाईट वाटतें. तूं माझी उपेक्षा केलीस असें वाटतें. आता मी तुझें ध्यान करीत देहत्याग करितों. असा त्याचा निश्चय पाहतांच विनायक त्याचेपुढें प्रगट झाले. व त्याचें ध्यान उतरलें व गणपतीनें ऋद्धि-सिद्धींना आज्ञा करून पुढें लिहिल्याप्रमाणें तेथें सर्व थाट केला.

ध्यान संपल्यानंतर थोड्या वेळानें डोळे उघडून पाहातो तों त्याला अघटित घटना दिसून आली. आपल्या भोंवतालीं सर्व देऊळ सोन्याचें झालें आहे. साक्षात मयूरेश्वर हिरेजडित अलंकारांनीं व वस्त्रानें युक्त त्याचेपुढें बसून कृपादृष्टीनें त्याकडे अवलोकन करीत आहेत. सर्व वस्तू, भांडीं सोन्या-रुप्याची व जडावाची झालीं आहेत. देऊळ सुंदर रंगीत असून हंड्या झुंबरें वाळ्याचे पडदे नाना प्रकारच्या अलंकारांनीं गच्च भरलेलें आहे. देवळाभोंवतीं

मोठा बाग आहे. त्यांत मोठमोठ्या पुष्करणी आहेत व त्यांत सुवर्ण कमळें असन त्यांवर भुंगे गुंजारव करीत आहेत. मोर कोकिळा यांचें गाणें व नृत्य सुरू आहे. वृक्ष फलपुष्पांनीं भरलेले आहेत. जिकडेतिकडे सुगंध सुटला आहे. बागेंत शमी, अशोक, बेल, तुळशी, दुर्वा, नाना प्रकारच्या फुलांची रेलचेल आहे. देवळांत जिकडेतिकडे नाना प्रकारच्या फलपुष्पांच्या माळा लावल्या असून जिकडेतिकडे लहान मोठे व सालंकार असे गणपतीच खेळत आहेत ! असें दिसलें. अशा प्रकारें ऋद्धिसिद्धीदात्या त्या गणपतीचें वैभव काय विचारावें ? असें तो पाहात आहे इतक्यांत तो ब्राम्हण आला व त्या बल्लाळाला म्हणाला, मी तुला प्रसन्न आहें; आणखी काय मागावयाचें असेल तें माग व हवे तितके वेळ येथें तपश्चर्या करीत तुझ्या इच्छेप्रमाणें ध्यानस्थ बस. तेव्हां मुलगा म्हणाला, माझ्या सर्व इच्छा परिपूर्ण झाल्या. मला आतां कांहीं नको. तेव्हां गणपती म्हणाले, तूं मला प्रसन्न केला आहेस तेव्हां माझ्या नांवाच्या उच्चारापूर्वीं तुझ्या नांवाचा उच्चार होईल व तुझ्या नांवावरून मला लोक जाणतील; म्हणजे मला या ठिकाणीं बल्लाळ विनायक म्हणतील. तुझ्या इच्छेप्रमाणें मी येथें अंश रूपानें राहीन. जे भाद्रपद शुद्ध चतुर्थीला माझें दर्शन घेतील त्यांच्या इच्छा पुऱ्या होतील.

विनायकानें बांधून दिलेलें देवालय समुद्रतीरीं पल्ली नामक गांवीं होतें. त्यालाच हल्लीं मुरूड असें ह्मणतात हा गांव हल्लीं जंजिरा संस्थानच्या हद्दींत आहे. परंतु सांप्रत बल्लाळ विनायकाचे मुरूड येथें कांहीं महात्म्य नाहीं. जुन्या देवळाचा एक चौथरा मात्र दाखवितात ही हकिगत मुरूडापेक्षां पालीसच जास्त जमते व पाली ही प्रत्यक्ष समुद्र कांठीं नसली तरी खाडीकांठीं आहेच नागोठण्याची खाडी पालीच्या अंबानदीनेंच झाली आहे.

ह्या देवाचे उत्साह भाद्रपद शु. ४ (गणेश चतुर्थी) व माघ शु. ४ स मोठ्या थाटाचे होतात उत्साह गांवच्या गावांतील व जुन्या पध्दतीचे होत असल्यामुळें उत्साह वर्धनाचें कार्य मोठ्या प्रमाणांत व चढाओढीनें चालतें व विशेष समाधान वाटतें. या दोन्ही दिवशीं रात्रीं देवाचा छबिना मिरवून आणल्यावर देवाची धुपारती होऊन महानैवेद्य अर्पण करितात. त्यावेळीं नैवेद्य देवापुढें ठेऊन सर्व दारें लावून घेतात. नंतर रीतीप्रमाणें आरत्या देवे झाले म्हणजे नैवेद्य बाहेर काढून सर्व मंडळीस दाखवितात तेव्हां वरणभातावर बोटें उठलेलीं, मोदक फुट-

ल्लेला वगैरे नैवेद्य देवानें स्वीकारल्याच्या खुणा स्पष्ट दिसतात! कोणी नास्तिकानें ह्यांतला खरा प्रकार काय आहे हें समजण्याकरितां एका गवाक्षांतून मुद्दाम एकदां पाहिलें तेव्हां त्याचे डोळे गेले असें सांगतात. याचा अर्थ भक्तिभावाला किंवा प्रेमाला शास्त्रीय नियम लावतां कामा नये. तुकारामाजवळून पंढरीचा विठोबा घास घेत असे तशीच गोष्ट ही. असे भक्तिभावाचे साक्षात्कार अद्यापपर्यंत दृष्टीस पडतात, व देव आपलें प्रेम भक्ताना व्यक्त करून दाखवितो.

या बल्लाळ विनायकाचा एक वैश्य भक्त होता. हा घाटावर राहणारा असावा. त्याचा प्रतिवर्षी गणेशचतुर्थीला मुरुडाला जाऊन श्रीविनायकाचें दर्शन घेण्याचा नियम होता. तो अगदीं म्हातारा झाला तरी देखील शक्तिनाहींशी होई तोंपर्यंत त्यानें आपला क्रम तसाच चालविला. शेवटल्या खेपेला तेथें गेल्यावर त्याला असें खास दिसलें कीं, पुढले वर्षी दर्शनास येण्याची आपले अंगांत मुळींच ताकद रहाणार नाहीं. तेव्हां त्यानें सद्गदीत होऊन विनायकाची प्रार्थना केली कीं, आजपर्यंत मी तुझ्या दर्शनास येण्याचा नियम चालविला; परंतु पुढें काय होईल तें होवो! असें म्हणून त्याच्या चरणीं डोकें ठेविलें व आपल्या गांवीं जाण्यास निघाला. त्यानें आपले सामानासाठीं बरोबर बैल आणिला होता. सामानाचा तोल दोन्ही बाजूस सारखा करण्याकरितां त्या म्हाताऱ्या वैश्यानें एके बाजूला मुरुड येथील एक दगड घातला. कांहीं दिवसांनीं तो हल्लींच्या पाली या ठिकाणीं आल्यावर त्यानें तेथें सामान घेतलें व गोणींतील दगड काढून जमिनीवर टाकला. रात्रीं त्याच्या स्वप्नांत विनायक आला व त्याला म्हणाला, मी तुझेबरोबर तुझे गांवीं येणार होतों, पण तूं मला येथेंच ठेविलेंस. आतां मी येथेंच राहणार! वैश्य जागा होऊन विचार करूं लागला. त्यानें आपण टाकलेला दगड पाहिला तो मुरूड येथील गणपती सारखा दिसला. तो तेथून उचलण्याची त्यानें पुष्कळ खटपट केली, पण तो तेथून हलेना. तेव्हां तेथेंच त्याची स्थापना केली. हल्लींचें देवालय नाना फडनविसांनीं बांधलें असें कांहींही म्हणतात.

पालीस व त्या सभोंवतालच्या प्रांतांत मी एक पाका नांवाचा प्राणी पाहिला. त्याचा आकार मोठ्या खारीसारखा असून त्याला पंख आहेत. तो झाडांवर खारीसारखा धांवत उड्या मारीत जातो. पण एका झाडावरून दुसऱ्या जव-

ळच्या झाडावर उडून जातो ! याला फार लांब व उंच उडवत नाहीं. याची शेपूट काळ मांजरासारखी झुपकेदार आहे. हा रात्रीं मात्र फिरतो. दिवसा दिसत नाहीं. हा मांजरासारखा ओरडतो. असा प्राणी मी आजपर्यंत कोठेंही पाहिला नाहीं. हा वडवाघळासारखा पशु व पक्षी स्वरूपी आहे.

पालीस देवब्राह्मण केल्यावर तेथील आसपासची पुरातन व प्रख्यात स्थानें पहावयास गेलों. पालीजवळ सरसगड किल्ला आहे त्या किल्यांत आतां बंदोबस्ताचें किंवा किल्ला ह्या दृष्टीनें त्याचें महत्व राहिलें नाहीं. पाली हा गांव भोर संस्थानामध्यें असल्यानें जुन्या पद्धतीस अनुसरून किल्यांतील देवीचे दर्शनास पुष्कळ लोक जातात. नवरात्रांत तेथें मोठा उत्सव होतो. किल्ल्याचा चढाव फारसा मोठा नाहीं. सवडीप्रमाणें तो पाहून यावा. या किल्ल्याच्या डोंगराला उजव्या बाजूनें वळसा घालून गेलें असतां दोन सवादोन मैलावर

## सिद्धेश्वर

नांवाचें पुरातन शिवस्थान आहे. या शिवस्थानावरून त्या गांवचें नांवही सिध्देश्वर पडलें आहे. हें लिंग ब्रम्हा, विष्णु, महेश असें त्रिगुणात्मक तीन तोंडांचें आहे. समोर पुष्करणी आहे. ह्या बाजूला गांवदेवाचें एक बापूजी म्हणून दैवत असतें. मनुष्याच्या तोंडासारखा त्याचा आकार असून त्याला शेंदूर लावतात ! कित्येक ठिकाणचें या नांवाचें हें दैवत फार कडक असतें, तसें हेंही फार कडक होतें. पण आतां त्याचा तेवढा अम्मल राहिला नाहीं असें म्हणतात. देवतांची जागृती पूजेअर्चेनें राहते नाहीं तर तें दगडच आहेत.

पालीपासून कर्जतकडे जी सडक जाते त्या सडकेनें नऊ मैल सहा फर्लांग गेल्यावर तेथून जवळच आसरें गांव आहे. तेथें

## वीरेश्वर

महादेवाचें जागृत स्थान आहे. येथें पिशाच्चबाधेचें व महाव्याधीचे रोगी बरे होतात. मीं तेथें गेलों होतों त्यावेळीं अशी चार पांच मंडळी पानें व डहाळ्या यांच्या लहान लहान झोंपड्या बांधून त्यांत राहात होती. तुम्हाला येथें येऊन किती दिवस झाले ? तुम्हाला काय झालें होतें ? तें आतां कसें आहे ? हें दुरुस्त होण्यास आणखी किती दिवस लागतील ? उपचार काय करतां ? वगैरे बरेच प्रश्न मी त्यांस विचारिले. आणि त्यांचीं उत्तरेंहीं त्यांनीं फार समाधान-

कारक दिली. त्यावरून तेथील दैविक सामर्थ्याची कल्पना आली. ते म्हणाले, देवाचें हें इतकें सांनिध्य आहे—म्हणजे हे देवळापासून पन्नास पाऊणशें फुटावर होते—देवाचें नामस्मरण, देवळाभोंवतीं प्रदक्षणा, जवळ पुष्करणी आहे तिचे पाण्याचा उपयोग व नित्य देवळाच्या शिखराचें दर्शन ह्याशिवाय औषधाकरितां आम्ही दुसरें कांहीं करीत नाहीं. पुष्करणीच्या पाण्याला आम्ही शिवत नाहीं ! कोणाजवळून तरी मागून घेतों. देवळाला प्रदक्षणा करावयाची म्हणजे अर्थात त्याच्या आवारांतूनही करीत नाहीं, मग देवळांतून कोठली ? आवाराबाहेरून आमच्या शक्तीप्रमाणें होतील तेवढ्या प्रदक्षिणा करतों. देवाचें दर्शन कधींच होत नाहीं. पण देवळाचे शिखरालाच आम्हीं मनोभावें नमस्कार करतों व त्यापासून आम्हाला चांगला गुण येत आहे. जसें ज्याचें दुखणें तसें त्याला देवाचा प्रसाद किंवा साक्षात्कार होईपर्यंत राहावें लागतें. पण गुण मात्र निश्चित येतो खरा, असा त्यानें आपला व इतरांचा अनुभव सांगितला. खात्री करण्या-करितां त्यांनीं आपलें शरीर किती सुधारलें तें दाखविलें. ज्या ठिकाणीं लस, पू येऊन आंग सडून दुर्गंधी सुटली होती ती बंद होऊन ती जागासुद्धां सुधारत आहे. याप्रमाणें येथें ओस पडलेल्या घरव्यांतून कांहीं मंडळी राहात होती ती या देवाच्या कृपेनें कृतकार्य होऊन परत गेली, हें आम्ही पाहिलें आहे. आतां आम्ही चौघे पांचजण उरलों आहों ! यापेक्षां या देवाचें सामर्थ्य आणखी काय वर्णावें ?

या गोष्टीवरून परमेश्वरावर भरंवसा, देवाचें कर्तृत्व, त्या पुष्करणींतील पाण्याचा औषधी गुण किंवा तेथील हवेचा गुण यांपैकीं कोणाला महत्व द्यावयाचें किंवा सर्व मिळून महत्व द्यावयाचें याचा तज्ज्ञ विचार करतीलच. ह्मणजे त्यांची जसजशी भावना किंवा समजूत असेल तसतसें त्यांना दिसेल. आतां आमची अस्पृश्य मंडळीसुद्धां अगदीं जवळ जाऊन देवाचें दर्शन घेण्याची इच्छा करितात. त्यांत देवदर्शनापेक्षां मात्सर्याधिक्यच जास्त दिसतें अस्पृश्यतेचें मुख्य कारण अपवित्रता—घाण—कुजणें—सडणें—आणि त्यांत मुख्यतः प्राण्यंगांचे अवशेष हेंच सर्वसंमत आहे. स्पृश्यांच्या उद्देशाला घातक अशी घाण ज्याच्या संसर्गानें येईल तो त्याला अस्पृश्य मानीलच त्याबद्दल किती ठराव केले किंवा सत्याग्रह केले तरी त्यांचा कांहींएक उपयोग होणार नाहीं. घाण किंवा अपवित्रता हे सापेक्ष शब्द आहेत. घाणींत ज्यांचा जन्म झाला आहे किंवा घाणीचाच ज्यांचा व्यवसाय आहे त्यांच्या जीविताला घाण ही

अपायकारक नाहीं हें प्लेगचे वेळीं सिद्ध झालें आहे. ज्या घरांत स्पृश्य मेले तींच घरें अस्पृशांनीं शुद्ध करून दिलीं तरी त्यांपैकीं एकालाही कसली इजा झाली नाहीं. दूषित किंवा अपायकारक संसर्ग टाळणें हें प्रत्येकांचें शास्त्रसिद्ध कर्तव्य आहे. संसर्ग आणि अस्पृश्यता यांचीं तत्वें अगदीं एक आहेत ह्मणून संसर्ग जर टाळला पाहिजे तर अस्पृश्यता ही पाळलीच पाहिजे. घाणीचा व्यवहार करणारांनीं किती जरी शुद्धता केली तरी त्यांच्याजवळील घाण अगदीं निःशेष जात नाहीं. आपण जेवल्यावर किती जरी हात धुतले तरी हाताला अन्नाचा किंवा खाल्लेल्या पदार्थाचा वास आल्याशिवाय राहतच नाहीं. हिंदू-शिवाय इतर धार्मिय अस्पृश्यता पाळीत नाहींत. त्यांच्या समाजांत नवेनवे घातक रोग उत्पन्न होतच आहेत ह्मणून समाजाच्या-देवाच्या धर्माच्या-आरोग्याकरितां किंवा हिताकरितां अस्पृश्यता ही पाळलीच पाहिजे यांत द्वेष मुळींच नाहीं. देवदर्शन हें धार्मिक विधीकरितां घ्यावयाचें असतें. विधर्मी मनुष्यांना तो देव नाहीं हें उघड आहे. मग ज्या धर्मानें कांहीं कारणानें त्यांना अस्पृश्यत्व दिलें आहे तें अस्पृश्यत्व त्यांनीं टाकणें ह्मणजे धर्मबाह्य वर्तन करणें नव्हे काय? मग अशानें त्यांना ज्या धर्मभावनेनें ते देवाचें दर्शन घेतात त्या भावनेचें फळ त्यांना कसें मिळेल? त्यांची भावना जर निर्मत्सर व शुद्ध असेल तर देवळाच्या कळसाच्या दर्शनानेंसुद्धां त्यांना इच्छित फळ ह्या मंडळीस मिळतें त्याप्रमाणें किंवा त्यापेक्षां जास्त खचित मिळेल, यांत संशय नाहीं. व त्यांच्या वाडवडिलांच्या भाविकपणामुळें त्यांना तसें फळ मिळतही असे. आतां देवाचें दर्शन घेतल्याशिवाय समाधानच होत नसेल तर तसा देव आपले घरीं ठेवून सकाळ संध्याकाळ किंवा इच्छेस वाटेल तेव्हां त्याचें दर्शन घेत बसावें किंवा हवा तो सुखसोहाळा करून घ्यावा. खरे भक्त आहेत कोठें? देव ह्मणतो त्याचीच वाण आहे. खऱ्या भक्ताजवळ मीं आहेच त्याला कोणत्याही देवदर्शनास जावयास नको. मी त्याचे घरीं देव ह्मणून दर्शनाकरितां नसून त्याचा चाकर ह्मणून राहिलों आहे! चोख्या मेळ्याकडे त्याच्याबरोबर देवानें मेलेलीं ढोरेंसुद्धां ओढलेलीं आहेत! संत हे ब्राह्मणापासून अंत्यजापर्यंत सर्व जातींत होते हें संतलीलामृतांत स्पष्ट दाखविलें आहे. पण त्यांत कोणी आपली जात सोडली होती? संत हे देव ब्राह्मणानासुद्धां वंद्यच होते. खरोखर ब्रह्मज्ञान्याला व संताला जात च नाहीं. भक्त किंवा संत हीच त्यांची जात. असें होतें तरी

कोणीही संतानें आपली जात टाकून परकीय जातीचा किंवा देवाचा अनादर केला नाहीं. स्वराज्यांत अशा सर्व जाती एकमेकांशीं प्रेमानें नांदत होत्या द्वेष मुळींच नव्हता. तो आतां पाश्चात्यांच्या चिथावणीनें शिरला आहे तो टाकून द्या ह्मणजे जो तो मूळ स्वरूपांत येईलच ! द्वेष करून सर्वांना समानता प्राप्त होईल अशी जर त्यांची अपेक्षा असेल तर ती साफ चुकीची आहे. सृष्टिक्रमच जर असमतेचा आहे, तर कृत्रिम समता टिकणें शक्य नाहीं. समुद्राचा पृष्ठ-भाग समान दिसतो पण क्षोभ झाला ह्मणजे त्याचें खरें स्वरूप समजतें. आमचा नांदता समाज विस्कळीत व्हावा व आह्मी जात व धर्मविहीन व्हावें ह्मणून हीं भांडणें निर्माण होत आहेत. ह्मणजे हीं भांडणें संपाला नकोत व आमची उन्नति व्हावयास नको.

ह्या आजाऱ्यांची चित्तवृत्ति या धर्मतत्वावर स्थिर होती. याविरुद्ध हीच मंडळी जर दुराग्रहानें देवळांत जाऊन दर्शन घेतील, देवावर प्रत्यक्ष पाणी घालतील किंवा शिवतील किंवा पुष्करणीस शिवून पाणी घेतील किंवा तींत स्नान करतील तर त्यांना जें फळ हल्लीं मिळत आहे तें न मिळतां त्यांची, त्यांच्या सनातन धर्माची व श्रेष्ठ जातीची पूर्ण अधोगती होईल व व्यर्थ भांडणें मात्र होतील यांत काडीमात्र शंका नाहीं. मागें जसें कनकेश्वराला स्पृश्य जातींपैकीं अस्पृश्य अव-स्थेंत त्याचा देवाला स्पर्श झाला असतां त्याची वाहण्याची गंगा बंद होते, तसे साक्षात्काराचे प्रकार नाहींसे होतील. देव व धर्म यांच्यांत सत्व राहणार नाहीं व अवास्तव प्रसंग येईल व तो येऊंही लागला आहे. याचा अनुभव प्रत्येकानें आपल्या मनाशीं पहावा ह्मणजे बिनतक्रार तो समजेल व त्याची खात्री होईल. महारोगी जातीनें स्पृश्य असतां दुर्दैवानें ते अस्पृश्य झाले, पण त्यांनीं त्या प्रसंगीं स्पृश्यत्वाचा दुराग्रह न धरितां आपलें अस्पृश्यत्वच मानून धार्मिक विधी केले त्यांत त्यांचा थोरपणा नाहीं काय ? ह्या थोरपणाचेंच त्यांना बक्षिस मिळालें हेंच निश्चयात्मक आहे. आमचे अस्पृश्यबंधु व त्यांचे साथीदार यांनीं या गोष्टीचा विचार करावा, ह्मणजे ते सुज्ञ असल्यामुळें त्यांची समजूत पटेल. त्यांनीं अस्पृश्यत्व पाळणें ह्मणजे धार्मिक तप करणें आहे, आणि न पाळणें ह्मणजेच धर्मलंडपणा करणें आहे. ज्यांना आपल्या धर्माचा अभिमान असेल ते असें कधीं करणार नाहींत. त्यांच्या वडिलांनीं असें कांहीं कधीं केलें नाहीं, तसें यांनींही करूं नये ह्मणजे त्यांच्याप्रमाणेंच यांना शाश्वत सुख मिळेल.

तें अशानें मिळणार नाहीं. स्पृश्य मंडळी अगदीं ब्राह्मणसुद्धां सुतक पाळून किं विटाळशीचा विटाळ मानून अगदीं कठीण प्रसंगींसुद्धां अस्पृश्यत्व राखतात. म अस्पृश्यांनीं अस्पृश्यांचीं बंधनें पाळून धर्माचें रक्षण करण्याकरितां अस्पृश्यत राखावयास नको काय ? आपण वंद्य मानिलेला देव विधर्मीयांच्या चिथावणी आपणच कसा बाटवावा, याची त्यांनीं समजूत करून घ्यावी ह्मणजे कोण न सांगतां त्यांची समजूत होईल. स्पृश्य लोकसुद्धां सोवळें, देव, ब्राह्मण, गंग यांची पवित्रता आपण त्यावेळीं अस्पृश्य राहून पाळतात. मग आपण धर्म रक्षणाकरितां अस्पृश्य राहिल्यानें आपणाला कमीपणा कसा येईल ! कधींच येणार नाहीं, हें त्यांनीं पक्कें लक्षांत ठेवावें. ह्मणजे त्यांची समजूत कोणी न सांगतां खचित पडेल. आतां अस्पृश्य ह्मणतील कीं, तुमची अस्पृश्यता कांहीं मुदतीची आहे, तशी आमची नाहीं. तर असेंही नाहीं. ब्राह्मणांतील सुधारक मंडळी सोवळें ओवळें फारसें मानीत नाहींत. पण ते दुराग्रहानें भिक्षुकांना शिवत नाहींत किंवा त्यांची थट्टा करीत नाहींत. सोवळ्या ब्राह्मणाच्या पंक्तींत बसण्याची ते कधींही इच्छा करीत नाहींत. हा ते वेदाला, ब्राह्मणत्वाला किंवा धर्माला मान देतात. तसा अस्पृश्यांनीं धर्माला मान कां देऊं नये ? आतां ते ह्मणतील हल्लींच्या काळीं रेल्वे, बोटी यामुळें इतकी स्वच्छता कोठें राहिली आहे ? पण पूर्वींही बाजार होते. रस्ता सर्वांस मोकळा होताच पण ती धर्मानें त्या वेळेपासून तशी तितक्यापुरती सूट दिली आहे. अशा स्वाभाविक घडणाऱ्या गोष्टीचा आधार घेऊन मुद्दाम जर या गोष्टी कोणी करूं लागला तर अनवस्था प्रसंग येईल. पोटांत घाण आहे मग बाहेर स्वच्छता कशाला ? एकाच ओहोळावर, नदीवर सर्व जात पाणी भरते; इतकेंच नव्हे तर त्यांतून मळाची लेंडकेंही वाहून जातांना दृष्टीस पडतात. गंगेसारख्या महा नद्यांतून मनुष्यांची प्रेतेंही वाहातांना दृष्टीस पडतात. हा आधार घेऊन कोणीही दुसऱ्याच्या पाण्याच्या भांड्यास स्पर्श करूं लागला किंवा घाण घालूं लागला तर कसें चालेल ! व्यक्तीची व समुदायाची शुद्धता निरनिराळी आहे. तिचा आधार घेऊन व्यवहार करीत गेल्यास सबगोलंकार होईल. सामुदायिक दृष्टीनें सर्व जग एकच आहे. पण व्यवहाराकरितां त्याचे असे भाग करणें अगदीं जरूर आहे. सर्व पदार्थ पोटांत गेल्यावर एकत्र होतात. मग अगोदरच एकत्र करून खाल्लें तर जसें तें हास्यास्पद होईल तसेंच हें आहे. भलत्याचे आधार भलत्यानेंच घेतां कामा नये.

धर्मबंधनें हीं मनुष्यजातीच्या सुखाकरितांच आहेत. ज्या त्या जातीनें आपला धर्म पाळावा व इतर जातीनें त्याला तो धर्म पाळण्याकरितां मदत करावी पण द्वेष करूं नये. तरच प्रत्येकाचें स्वधर्माचरण घडेल एरव्हीं होणार नाहीं. यांत द्वेष नाहीं. तो अस्पृश्यांना अधर्म किंवा द्वेष वाटत असल्यास तें दुर्दैव आहे. ब्राह्मणाची स्वच्छता, पवित्रता व स्त्रियाचें पातिव्रत्य इतरांनीं त्यांना मदत करून राखिल्यासच तीं टिकतील. त्यांच्या नाशाच्या पाठीस लागल्यास तीं टिकणारच नाहींत. जगाच्या आरंभापासून त्यांनीं ब्राह्मणत्व राखिलें आहे. त्याचा अभिमान केवळ ब्राह्मणांनीं न धरितां इतर जाती धर्मियांनींसुद्धां धरला पाहिजे. ब्राह्मणजात आजपर्यंत राहिली ह्मणूनच हिंदुधर्म किंवा आर्य-धर्म आजपर्यंत टिकला, नाहींतर सिलोन, चीन, इराण व मिसर देशाप्रमाणें त्याचा नायनाट झाला असता. कुलधर्माची जेव्हां जरूरी पडते तेव्हां घरच्या ह्मातारीलाच ते विचारावे लागतात; तसा आपल्याकडून हिंदुधर्माचा लोप झाल्यास किंवा होऊं लागल्यास पुन्हां त्याची जेव्हां जरूर पडते तेव्हां तें शिक्षण ब्राह्मणाकडूनच घ्यावें लागतें, नुसत्या पोथ्या पुस्तकावरून तें समजणार नाहीं. ह्मणून ब्राह्मणाचें रक्षण ब्राह्मणांनीं तर करावेंच पण इतर जातींनीं ब्राह्मणावर उपकार करण्याकरितांच नव्हे तर अखिल हिंदुत्वाच्या रक्षणाकरितां व कदाचित आपण आपले जातीधर्म विसरलों, आचारभ्रष्ट झालों तर ते सांगण्याकरितां तरी ह्या धर्मवृद्ध ह्मातारीचें रक्षण प्रयत्नपूर्वक करावें. ब्राह्मणजात इतर जातीपाशीं भीक मागते, तिचा हक्क ह्मणून नाहीं अर्थात ती कोणालाही जड नाहीं. पण द्वेष करणाऱ्या कोणालाही ती जडच आहे. मग तो सार्वभौम राजा असो किंवा जगन्नियंता परमेश्वर असो! कारण असा तिचा इतिहास आहे कीं, कितीही कफल्लक वृत्तींत ही जात टिकते आणि तसेंच तिला शिक्षण दिलें जातें. ह्मणून कोणीही ह्या जातीच्या वाटेस गेला नाहीं व ती आजपर्यंत वंदनीयच होती. पेशवे श्रीमंत झाले. त्यांच्या मुलाची मुंज झाली तेव्हां 'भवतु भिक्षां देहि' हा ब्राह्मणत्वाचा गुरुमंत्र त्यांना गुरूपासून घ्यावाच लागला कारण त्यावांचून मुंज पुरी होतच नाहीं! इतर जातींच्या व सर्व बाय-कांच्या मुंजी करून सर्वांना भीक मागण्याचा उपदेश करून हिंदुधर्म भिकेवर निर्माण झाला आहे असें जगास दाखवावयाचें आहे कीं काय? एका लहानशा जातीचें भीक मागून पुरें होत नाहीं तर हा कंगालखाना किती वाढवा-

तें अशानें मिळणार नाहीं. स्पृश्य मंडळी अगदीं ब्राह्मणसुद्धां सुतक पाळून किंवा विटाळशीचा विटाळ मानून अगदीं कठीण प्रसंगींसुद्धां अस्पृश्यत्व राखतात. मग अस्पृश्यांनीं अस्पृश्यांचीं बंधनें पाळून धर्माचें रक्षण करण्याकरितां अस्पृश्यत्व राखावयास नको काय ? आपण वंद्य मानिलेला देव विधर्मीयांच्या चिथावणीनें आपणच कसा बाटवावा, याची त्यांनीं समजूत करून घ्यावी ह्मणजे कोणी न सांगतां त्यांची समजूत होईल. स्पृश्य लोकसुद्धां सोवळें, देव, ब्राह्मण, गंगा यांची पवित्रता आपण त्यावेळीं अस्पृश्य राहून पाळतात. मग आपण धर्म रक्षणाकरितां अस्पृश्य राहिल्यानें आपणाला कमीपणा कसा येईल ! कधींच येणार नाहीं, हें त्यांनीं पक्कें लक्षांत ठेवावें. ह्मणजे त्यांची समजूत कोणी न सांगतां खचित पडेल. आतां अस्पृश्य ह्मणतील कीं, तुमची अस्पृश्यता कांहीं मुदतीची आहे, तशी आमची नाहीं. तर असेंही नाहीं. ब्राह्मणांतील सुधारक मंडळी सोवळें ओवळें फारसें मानीत नाहींत. पण ते दुराग्रहानें भिक्षुकांना शिवत नाहींत किंवा त्यांची थट्टा करीत नाहींत. सोवळ्या ब्राह्मणाच्या पंक्तींत बसण्याची ते कधींही इच्छा करीत नाहींत. हा ते वेदाला, ब्राह्मणत्वाला किंवा धर्माला मान देतात. तसा अस्पृश्यांनीं धर्माला मान कां देऊं नये ? आतां ते ह्मण-तील हल्लींच्या काळीं रेल्वे, बोटी यामुळें इतकी स्वच्छता कोठें राहिली आहे ? पण पूर्वींही बाजार होते. रस्ता सर्वांस मोकळा होताच पण ती धर्मानें त्या वेळेपासून तशी तितक्यापुरती सूट दिली आहे. अशा स्वाभाविक घडणाऱ्या गोष्टींचा आधार घेऊन मुद्दाम जर या गोष्टी कोणी करूं लागला तर अनवस्था प्रसंग येईल. पोटांत घाण आहे मग बाहेर स्वच्छता कशाला ? एकाच ओहो-ळावर, नदीवर सर्व जात पाणी भरते; इतकेंच नव्हे तर त्यांतून मळाची लेंड-केंही वाहून जातांना दृष्टीस पडतात. गंगेसारख्या महा नद्यांतून मनुष्यांची प्रेतेंही वाहातांना दृष्टीस पडतात. हा आधार घेऊन कोणीही दुसऱ्याच्या पाण्याच्या भांड्यास स्पर्श करूं लागला किंवा घाण घालूं लागला तर कसें चालेल ! व्यक्तीची व समुदायाची शुद्धता निरनिराळी आहे. तिचा आधार घेऊन व्यवहार करीत गेल्यास सबगोलंकार होईल. सामुदायिक दृष्टीनें सर्व जग एकच आहे. पण व्यवहाराकरितां त्याचे असे भाग करणें अगदीं जरूर आहे. सर्व पदार्थ पोटांत गेल्यावर एकत्र होतात. मग अगोदरच एकत्र करून खाल्लें तर जसें तें हास्यास्पद होईल तसेंच हें आहे. भलत्याचे आधार भलत्यानेंच घेतां कामा नये.

धर्मबंधनें हीं मनुष्यजातीच्या सुखाकरितांच आहेत. ज्या त्या जातीनें आपला धर्म पाळावा व इतर जातीनें त्याला तो धर्म पाळण्याकरितां मदत करावी पण द्वेष करूं नये. तरच प्रत्येकाचें स्वधर्माचरण घडेल एरव्हीं होणार नाहीं. यांत द्वेष नाहीं. तो अस्पृश्यांना अधर्म किंवा द्वेष वाटत असल्यास तें दुर्दैव आहे. ब्राह्मणाची स्वच्छता, पवित्रता व स्त्रियाचें पातिव्रत्य इतरांनीं त्यांना मदत करून राखिल्यासच तीं टिकतील. त्यांच्या नाशाच्या पाठीस लागल्यास तीं टिकणारच नाहींत. जगाच्या आरंभापासून त्यांनीं ब्राह्मणत्व राखिलें आहे. त्याचा अभिमान केवळ ब्राह्मणांनीं न धरितां इतर जाती धर्मियांनींसुद्धां धरला पाहिजे. ब्राह्मणजात आजपर्यंत राहिली ह्मणूनच हिंदुधर्म किंवा आर्य-धर्म आजपर्यंत टिकला, नाहींतर सिलोन, चीन, इराण व मिसर देशाप्रमाणें त्याचा नायनाट झाला असता. कुलधर्माची जेव्हां जरूरी पडते तेव्हां घरच्या ह्मातारीलाच ते विचारावे लागतात; तसा आपल्याकडून हिंदुधर्माचा लोप झाल्यास किंवा होऊं लागल्यास पुन्हां त्याची जेव्हां जरूर पडते तेव्हां तें शिक्षण ब्राह्मणाकडूनच घ्यावें लागतें, नुसत्या पोथ्या पुस्तकावरून तें समजणार नाहीं. ह्मणून ब्राह्मणाचें रक्षण ब्राह्मणांनीं तर करावेंच पण इतर जातींनीं ब्राह्मणावर उपकार करण्याकरितांच नव्हे तर अखिल हिंदुत्वाच्या रक्षणाकरितां व कदाचित आपण आपले जातीधर्म विसरलों, आचारभ्रष्ट झालों तर ते सांगण्याकरितां तरी ह्या धर्मवृद्ध ह्मातारीचें रक्षण प्रयत्नंपूर्वक करावें. ब्राह्मणजात इतर जातीपाशीं भीक मागते, तिचा हक्क ह्मणून नाहीं अर्थात ती कोणालाही जड नाहीं. पण द्वेष करणाऱ्या कोणालाही ती जडच आहे. मग तो सार्वभौम राजा असो किंवा जगन्नियंता परमेश्वर असो! कारण असा तिचा इतिहास आहे कीं, कितीही कफल्लक वृत्तींत ही जात टिकते आणि तसेंच तिला शिक्षण दिलें जातें. ह्मणून कोणीही ह्या जातीच्या वाटेस गेला नाहीं व ती आजपर्यंत वंदनीयच होती. पेशवे श्रीमंत झाले. त्यांच्या मुलाची मुंज झाली तेव्हां 'भवतु भिक्षां देहि' हा ब्राह्मणत्वाचा गुरुमंत्र त्यांना गुरूपासून घ्यावाच लागला कारण त्यावांचून मुंज पुरी होतच नाहीं! इतर जातींच्या व सर्व बाय-कांच्या मुंजी करून सर्वांना भीक मागण्याचा उपदेश करून हिंदुधर्म भिकेवर निर्माण झाला आहे असें जगास दाखवावयाचें आहे कीं काय? एका लहानशा जातीचें भीक मागून पुरें होत नाहीं तर हा कंगालखाना किती वाढवा-

वयाचा? पूर्वी क्षत्रीय वैश्यांच्या मुंजी होत असत त्या निराळ्या हेतूनें होत असत व आतां तो काळही गेला ह्मणूनच त्यांच्या मुंजी बंद पडल्या. हल्लीं आपल्या देशांतच हिंदू ह्मणवून घेण्याची किंवा ब्राह्मणत्वाची अथवा जातीभेदाची जेथें लाज वाटूं लागली आहे तेथें हीं जुनीं मढीं उकरून काय करावयाचें? वस्तुतः जाती ह्या श्रमविभागाकरितां उत्पन्न झाल्या आहेत आणि कोणत्या समाजांत त्या नाहींत? पण हिंदु धर्माच्या जातींना मात्र तोंड मुरडावयाचें, हें कां?

आतां स्पृश्य हिंदु हे, मुसलमान व ख्रिस्ती हे धर्मबाह्य असून त्यांस शिवतात मग आपल्याच धर्मांतील पण अस्पृश्य अशा लोकांस कां शिवत नाहींत? तर याचें कारण किंवा समाधान असें आहे कीं बाटलेले मुसलमान किंवा ख्रिस्ती हे परदेशांतून आलेले नसून ते आमचेच भाऊबंद आहेत. बाटलेले ते सर्वच अंत्यज होते असें मुळींच नाहीं, तर ते बहुतेक स्पृश्यच होते; इतकेंच नव्हे तर ब्राह्मणही होते. मग ते बाटले ह्मणून अंत्यज किंवा अस्पृश्य कसे होतील? ब्राह्मणानें पुनर्विवाह केला तर तो कृत्रिम ब्राह्मण फारतर होईल, पण शूद्र किंवा अस्पृश्य कसा होईल? तसें आग्रहानें ह्मटल्यास तें व्यवहाराला धरून होणार नाहीं. यामुळें ते स्पृश्यच राहिले यांत कांहीं वावगें नाहीं. प्रत्येक जातींत किंवा धर्मांत श्रेष्ठ कनिष्ठ हा भेद व्यवसाय दृष्टीनें राहणारच आणि त्या दृष्टीनें तितक्यापुरती त्यांची–जाती दृष्टीनें नसली, तरी व्यक्ति दृष्टीनें–अस्पृश्यता राहणारच. हिंदुधर्मांत धंदे हे जातिविशिष्ट असल्यामुळें मृत पशूंचा व्यवहार करणारांची जात अस्पृश्य राहिली यांत वावगें काय झालें? मृतपशूंचा राहो पण मृताची सर्व उत्तरक्रिया होईपर्यंत त्याचे आप्त अस्पृश्यता (सुतक) पाळतात, इतकेंच नव्हे तर स्मशानयात्रेस गेलेले सुधारक असले किंवा त्यांनीं प्रत्यक्ष मृतास स्पर्श केला नसला तरी स्पृश्यास्पृश्यतेचा दोष मानून स्नान केल्याशिवाय शुद्धता मानीत नाहींत. आतां अस्पृश्य हे बाटले ह्मणजे स्पृश्य होतात हें ह्मणणेंच खोटें आहे. व्यवसाय परिवर्तन होईपर्यंत ते अस्पृश्यच राहतात हें मी प्रत्यक्ष पाहिलें आहे. आतां इतर धर्मांत अस्पृश्यता नसल्यामुळें व्यवहारांत ते स्पृश्य होतात. तसें बाजाररहाटांत अस्पृश्यता ही कोणी मानीत नाहींच पण जाणूनबुजून अस्पृश्यता जाणें शक्य नाहीं व तें आरोग्याचे दृष्टीनें योग्यही नाहीं. मांस विकत घेतलेला भाजीमार्केटांत आलेला चालेल पण भाजीमार्केट व मांसमार्केट कधीं एक होणार नाहीं व तसें करणें

हल्लींच्या सुधारक किंवा सुशिक्षितांसही आरोग्य दृष्टीनें आवडणार नाहीं. तीं निराळींच पाहिजेत हें मांसाहारीसुद्धां कबूल करितील, व करतातच. प्रत्येक धर्मामध्यें जरी जाती नसल्या तरी व्यवसायामुळें उच्चनीच भाव हा आहेच. तेव्हां जे लोक दुसऱ्या जातींत कां होईना श्रेष्ठ व्यवसाय करतात त्यांनाच समव्यवसायामुळें शिवण्याचा प्रसंग येतो. कनिष्ठ मनुष्याच्या व्यवसायाशीं येत नाहीं. जातीबाह्य मनुष्य असला ह्मणजे तो आपल्या अंत्यजापेक्षांही नीच ही विचारसरणी व्यवहारक्षम नाहीं. आतां परंपरेनें सर्व स्पृश्यच आहेत पण त्यांचा प्रत्यक्ष संबंध येऊं नये, एवढीच धर्माची आज्ञा आहे. विटाळशी, किंवा अस्पृश्य लोक किंवा भंगी अगदीं एकाच रस्त्यांतून जातात. पावसाळ्यांत सर्व पाणी एकच असतें व त्यावरूनच अगदीं पवित्र सोवळे ब्राह्मण चालून जातात. पण त्यांना धर्मानें अस्पृश्यत्व येत नाहीं. याचें कारण अप्रत्यक्ष रीतीनें त्यांचा तो संबंध आहे हें होय. असा अप्रत्यक्ष संबंध करण्याला धर्माची आडकाठी नाहीं. त्याचा स्वीकार करावा. प्रत्यक्ष संबंध करूं नये हाच एकंदर लिहिण्याचा व धर्माचा हेतु आहे, तो सर्वांनीं पाळावा; निदान विचार तरी करावा ह्मणजे तो आचरणांत आणण्याची केव्हांतरी इच्छा होईल. स्पर्शाचा पराक्रम हल्लीं विजेनें स्पष्ट दिसूं लागला आहे. मालाच्या रेल्वेच्या ओझ्याच्या गाड्या ओढल्या जात अनंत अंतरावरचा शब्द केवळ हवेच्या स्पर्शानें रेडियोनें स्पष्ट ऐकूं येतो यावरून सज्जन दुर्जनाचा वारासुद्धां सुखदुःखाला कारणीभूत होतो ही जुनी ह्मण अगदीं स्पष्ट दिसत आहे. असो.

पालीपासून कर्जतच्या सडकेनें गांवाबाहेर निघाल्यावर डाव्या हाताला अंबा नदी लागते. ती ओलांडून सुमारें अर्धा मैल गेल्यावर एक

## उन्हाळें

लागतें. ह्या उन्हाळ्याचें पाणी बदरिनारायणाचे कुंडाप्रमाणेंच अगदीं बेताचें ऊन आहे. यामुळें आसपासची मंडळी येथें नित्य स्नानाला येते. कुंड नीट चिरेबंदी बांधून काढलें आहे. सुमारें आठ फूट औरस चौरस चिऱ्यांनीं बांधिलें आहे. खोली कंबरभर आहे. पाण्याला गंधकाचा वास येतो. जवळ विठोबाचें लहानसें देऊळ आहे. येथें स्नान केल्यानें त्वग्रोग नाहींसे होतात. रोगाची जशी कमजास्त बाधा असेल त्याप्रमाणें कमजास्त दिवस स्नान करावें लागतें. बायकांना न्हाण्याला ही अगदीं उत्तम जागा आहे. इतर लोक शेतावर

कामकाँज, श्रम करून रोज संध्याकाळीं येथें स्नानाला येतात. हें खालून उकळ्या येऊन वाहात असल्यामुळें नेहमीं स्वच्छ राहातें व आनंद वाटतो. पुष्कळ वेळ स्नान करीत बसावें असें वाटतें. पण फार वेळ स्नान करीत बसल्यास जीव व्याकूळ होतो. अन्नपचन ताबडतोब होऊन चांगली भूक लागते. श्रीमंत व आळशी मनुष्यांना अनायासें अन्नपचन करण्याचें हें एक साधन आहे. या पाण्यांत स्नान केल्यानें श्रमपरिहार चांगला होतो. जो अवयव दुखत असेल तो या पाण्यांत दुखण्याच्या मगदुराप्रमाणें ठेवीत गेल्यास गुण येतो. असा या पाण्यांत औषधी गुण आहे. पाणी उकळीच्या योगानें एकसारखें वर येत असून वाहातें असल्यामुळें पाण्यांत घाण किंवा दोष राहात नाहीं. हें ऋतुमानाप्रमाणें कमजास्त उष्ण होत असल्यामुळें पावसाळ्यांत व थंडीच्या दिवसांत येथें स्नानास फार लोक येतात. पालीस किंवा ह्या प्रांतांत येणारानें येथें स्नान करून आपलें शरीर पवित्र केल्याशिवाय राहूं नये.

याच बाजूस येथून पुढें चार मैलावर व पालीपासून सहा मैलावर

## उद्धर रामेश्वर

ह्मणून शिवस्थान आहे. रामेश्वराचें (शंकराचें) देऊळ गांवाबाहेर दोन फर्लांगावर एका ओढ्याचे कांठीं आहे. देऊळ अगदीं पडक्या स्थितींत आहे. सर्व देऊळ दगडी आहे. देवळाचा घुमट पडला असल्यामुळें वर गवत पेंढ्यांची शाकारणी घालतात. गाभाऱ्यांत काळोख अगदीं मिट्ट आहे. उजेड व हवा येण्यास साधन नाहीं ह्मणून हवा अगदीं कोंदट आहे. बाहेरचा सभामंडपही दगडी आहे. पण तेही दगड चिरा पडून फुटून पडण्याचे बेतांत आहेत. कोसळून कधीं अपघात होईल याचा नेम नाहीं. तूर्त या दगडांना लाकडी खांबाचे धिरे देऊन थांबविलें आहे. देवळाच्या खालीं ओढ्यांत पाण्याचीं दोन बांधीव कुंडें आहेत. या ठिकाणीं रामानें बाण मारून पाताळांतील गंगा काढून जटायूची क्रिया केली व त्या कुंडांत त्याच्या अस्थि टाकिल्या; ह्मणून अद्याप या ठिकाणीं लोक मृताची क्रिया करून अस्थि या कुंडांत टाकतात. ह्या कुंडांत टाकलेल्या अस्थींच नाशीकच्या रामकुंडांतील अस्थींप्रमाणें पाणी होतें असा इकडे अनुभव आहे. याला खालचें रामेश्वर ह्मणतात. गांवाचें नांव उद्धर असें आहे. ह्या कुंडापासून ओहोळाच्या रूपानें ही गंगा नेहमीं वाहात असते.

ह्या उद्धरगांवचे नजीकच जो डोंगर आहे त्यावर जटायूचें घरटें होतें. रावण सीतेला घेऊन आकाशमार्गें जात असतां जटायूनें आपल्या सामर्थ्यानें त्याला येथें प्रतिबंध केला. त्याबद्दल जटायूचे रावणानें पंख उपटून त्याला मृतवत् केलें. तशा स्थितींत तो राम येण्याची वाट पाहात जीव धरून बसला होता. राम आल्यावर त्यानें त्याला सीतेचा शोध सांगितला व नंतर त्यानें येथें प्राण सोडला तेव्हां रामानें त्याची उत्तरक्रिया केली. डोंगरावर जंगलांत जटायूचें घरटें कोठें होतें ती जागा अद्याप तेथील डोंगरी लोक दाखवितात. तेथेंही जिवंत पाण्याचें एक बांधीव कुंड आहे. त्याचेजवळ जेथें राम जटायूच्या समाचारास बसले होते तेथें खडकांत जटायूचीं पक्षाच्या आकाराचीं पावलें व जवळ रामाच्या पादुका खोदलेल्या आहेत. हें त्यांचें स्मारक म्हणून जंगली लोक दाखवितात. यात्रेकरू परम भक्तीनें त्यांचे दर्शन, वंदन, पूजन करितात. डोंगरावरही रामेश्वराचें (शंकराचें) प्रशस्त देऊळ आहे. हें देऊळ हल्लीं बऱ्या स्थितींत आहे. एका श्रीमंत बाईनें त्याच्यावर पत्रे घालून शाकारणीचें काम चांगलें केलें आहे जवळ एक कुंड आहे. जटायूचें घरटें जरा आणखी डोंगरावर आहे. तेथें त्याच्यामागें सांगितलेल्या पादुका आहेत. तेथें जंगल मोठें उंच उंच झाडांचें असून पाणीही उत्तम आहे. येथेंही अशीं वर खालीं दोन कुंडें आहेत. वरच्या कुंडाचा झराच खालच्या कुंडांत येत आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. मला वरचें कुंड पाहातें दिसलें, तसें खालचें दिसलें नाहीं. रामानें बाण मारून प्रथम हीच गंगा काढली. आणि हिचा प्रवाह खालचे कुंडांत व डोंगराखालच्या, मागें सांगितलेल्या देवळाचे कुंडांत गेला असें म्हणतात. यात्रेकरू येथें स्नानदान करून आपल्या देहाचें सार्थक करितात.

जटायूनें दशरथाला युद्धाचे वेळीं फार मदत केली होती. म्हणून दशरथाचा व जटायूचा फार ऋणानुबंध होता. दशरथाचा राम हा मुलगा व त्याची बायको सीता ही सून हीं आपल्याकडे येत आहेत असें पाहून जटायूला त्यावेळीं प्रेमाचा गहिंवर आला होता. म्हणूनच जटायूनें रावणाला सीता नेतांना फार प्रतिबंध केला. सीतेनेंही आपण सांगितलेल्या रामायणांत जटायूचा योग्य शब्दामध्यें गौरव केला आहे.

येतेंच. हा नियम जुन्या पद्धतीप्रमाणें ब्राह्मणांनाच लागू आहे, इतरांना नाहीं. तसेंच पाहुणेही फार थोडे येत असल्यामुळें ही पद्धति अंमलांत येत आहे हें उघड आहे. इकडील लोक भाविक व त्यांचा ह्या देवावर मोठा भरंवसा असल्यामुळें शिवरात्रीचे दिवशीं वीस पंचवीस ब्राह्मण एकत्र बसून सकाळीं सात वाजल्यापासून रात्रीं बारा वाजेपर्यंत त्यांचे एकसारखे लघुरुद्र चाललेले असतात. उत्साहाचे वेळीं दिवसारात्रीं निरनिराळ्या हरदासांचीं व पुराणिकांचीं कथा, कीर्तनें, पुराणें, गाणेंबजावणें व वेदमंत्रघोष, मंत्रपुष्पें चालू असल्यामुळें उत्सवांत केव्हांही गेलें तरी मन रममाण होतें व वेळ केव्हांच निघून जातो. निरनिराळ्या हरदास पुराणिकांना त्यांच्या योग्यतेप्रमाणें देवस्थानांतून बिदागी मिळते, यामुळें गुणी जनांचाही संग्रह वाढतो.

मेळ्याप्रमाणें नागोठण्यासही असे उत्सव होतात. गांवढें गांवांत एखादेंच देऊळ असतें. म्हणून त्या देवाचे उत्सव फार प्रेमानें होतात. पर ठिकाणीं नोकरीस गेलेले गांवचे लोकही ह्या उत्सवाकरितां मुद्दाम येतात. व कांहींतरी नाटक किंवा ललित इतर भोंवतालच्या गांवांपेक्षां आपलें चांगलें व्हावें म्हणून चढाओढीनें करितात. अशा रीतीनें गांवढेगांवचे उत्सव जुन्या पद्धतीचे एकजुटीनें, चढाओढीनें व प्रीतीनें करितात, यामुळें उत्साह करण्याचा मूळ हेतु चांगल्या प्रकारें सिद्धीस जातो. एकी, जूट, सार्वजनिक काम करण्याची हौस व तत्परता, आपलें कसब व कर्तृत्व दाखविणेची पराकाष्ठा व श्रेष्ठपणाचें अनुकरण यांचें शिक्षण अशा उत्साहामुळें मिळतें. हे उत्साह व लग्नकारणाचे सोहाळे हे, मुलें बुद्धीनें व कर्तृत्वानें पुढें येण्याचे नेहमींचे राजमार्ग आहेत. साधनाभावामुळें गांवढेगांवचीं नाटकें विशेष पाहण्यासारखीं नसलीं तरी देवस्थानास लागलेल्या वेलबुट्या, कागदाचीं खोदकामें, नकशा, चढाओढीच्या रांगोळ्या हीं कामें खरोखर पाहण्यासारखीं असतात. सर्व गांव, मुख्यतः सर्व मुलें या उत्साहाचे वेळीं अगदीं आनंदांत असतात. तीं आपआपले नवे पोशाख व दागिने घालून इकडे तिकडे हिंडत असतात. त्यांना ही पर्वणी केवळ दिवाळीपेक्षांही प्रीय वाटते. सकाळपासून संध्याकाळपर्यंत त्यांच्या देवळांत किती खेपा होत असतील त्याचा नेम नाहीं! प्रत्येक मूल आपणांस कोण काय काम सांगेल याची अगदीं वाट पाहात असतें. आपणांस काम सांगतील कधीं व आपण

कामकाज, श्रम करून रोज संध्याकाळीं येथें स्नानाला येतात. हें खालून उकळ्या येऊन वाहात असल्यामुळें नेहमीं स्वच्छ राहातें व आनंद वाटतो. पुष्कळ वेळ स्नान करीत बसावें असें वाटतें. पण फार वेळ स्नान करीत बसल्यास जीव व्याकूळ होतो. अन्नपचन ताबडतोब होऊन चांगली भूक लागते. श्रीमंत व आळशी मनुष्यांना अनायासें अन्नपचन करण्याचें हें एक साधन आहे. या पाण्यांत स्नान केल्यानें श्रमपरिहार चांगला होतो. जो अवयव दुखत असेल तो या पाण्यांत दुखण्याच्या मगदुराप्रमाणें ठेवीत गेल्यास गुण येतो. असा या पाण्यांत औषधी गुण आहे. पाणी उकळीच्या योगानें एकसारखें वर येत असून वाहातें असल्यामुळें पाण्यांत घाण किंवा दोष राहात नाहीं. हें ऋतु-मानाप्रमाणें कमजास्त उष्ण होत असल्यामुळें पावसाळ्यांत व थंडीच्या दिवसांत येथें स्नानास फार लोक येतात. पालीस किंवा ह्या प्रांतांत येणारानें येथें स्नान करून आपलें शरीर पवित्र केल्याशिवाय राहूं नये.

याच बाजूस येथून पुढें चार मैलावर व पालीपासून सहा मैलावर

## उद्धर रामेश्वर

ह्मणून शिवस्थान आहे. रामेश्वराचें ( शंकराचें ) देऊळ गांवाबाहेर दोन फर्लांगावर एका ओढ्याचे कांठीं आहे. देऊळ अगदीं पडक्या स्थितींत आहे. सर्व देऊळ दगडी आहे. देवळाचा घुमट पडला असल्यामुळें वर गवत पेंढ्यांची शाकारणी घालतात. गाभाऱ्यांत काळोख अगदीं मिट्ट आहे. उजेड व हवा येण्यास साधन नाहीं ह्मणून हवा अगदीं कोंदट आहे. बाहेरचा सभामंडपही दगडी आहे. पण तेही दगड चिरा पडून फुटून पडण्याचे बेतांत आहेत. कोसळून कधीं अपघात होईल याचा नेम नाहीं. तूर्त या दगडांना लाकडी खांबाचे धिरे देऊन थांबविलें आहे. देवळाच्या खालीं ओढ्यांत पाण्याचीं दोन बांधीव कुंडें आहेत. या ठिकाणीं रामानें बाण मारून पाताळांतील गंगा काढून जटायूची क्रिया केली व त्या कुंडांत त्याच्या अस्थि टाकिल्या; ह्मणून अद्याप या ठिकाणीं लोक मृताची क्रिया करून अस्थि या कुंडांत टाकतात. ह्या कुंडांत टाकलेल्या अस्थींचे नाशीकच्या रामकुंडांतील अस्थींप्रमाणें पाणी होतें असा इकडे अनुभव आहे. याला खालचें रामेश्वर ह्मणतात. गांवाचें नांव उद्धर असें आहे. ह्या कुंडापासून ओहोळाच्या रूपानें ही गंगा नेहमीं वाहात असते.

ह्या उद्धरगांवचे नजीकच जो डोंगर आहे त्यावर जटायूचें घरटें होतें. रावण सीतेला घेऊन आकाशमार्गें जात असतां जटायूनें आपल्या सामर्थ्यानें त्याला येथें प्रतिबंध केला. त्याबद्दल जटायूचे रावणानें पंख उपटून त्याला मृतवत् केलें. तशा स्थितींत तो राम येण्याची वाट पाहात जीव धरून बसला होता. राम आल्यावर त्यानें त्याला सीतेचा शोध सांगितला व नंतर त्यानें येथें प्राण सोडला तेव्हां रामानें त्याची उत्तरक्रिया केली. डोंगरावर जंगलांत जटायूचें घरटें कोठें होतें ती जागा अद्याप तेथील डोंगरी लोक दाखवितात. तेथेंही जिवंत पाण्याचें एक बांधीव कुंड आहे. त्याचेजवळ जेथें राम जटायूच्या समाचारास बसले होते तेथें खडकांत जटायूचीं पक्षाच्या आकाराचीं पावलें व जवळ रामाच्या पादुका खोदलेल्या आहेत. हें त्यांचें स्मारक ह्मणून जंगली लोक दाखवितात. यात्रेकरू परम भक्तीनें त्यांचे दर्शन, वंदन, पूजन करितात. डोंगरावरही रामेश्वराचें (शंकराचें) प्रशस्त देऊळ आहे. हें देऊळ हल्लीं बऱ्या स्थितींत आहे. एका श्रीमंत बाईनें त्याच्यावर पत्रे घालून शाकारणीचें काम चांगलें केलें आहे जवळ एक कुंड आहे. जटायूचें घरटें जरा आणखी डोंगरावर आहे. तेथें त्याच्यामागें सांगितलेल्या पादुका आहेत. तेथें जंगल मोठें उंच उंच झाडांचें असून पाणीही उत्तम आहे. येथेंही अशीं वर खालीं दोन कुंडें आहेत. वरच्या कुंडाचा झराच खालच्या कुंडांत येत आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. मला वरचें कुंड वाहातें दिसलें, तसें खालचें दिसलें नाहीं. रामानें बाण मारून प्रथम हीच गंगा काढली. आणि हिचा प्रवाह खालचे कुंडांत व डोंगराखालच्या, मागें सांगितलेल्या देवळाचे कुंडांत गेला असें ह्मणतात. यात्रेकरू येथें स्नानदान करून आपल्या देहाचें सार्थक करितात.

जटायूनें दशरथाला युद्धाचे वेळीं फार मदत केली होती. ह्मणून दशरथाचा व जटायूचा फार ऋणानुबंध होता. दशरथाचा राम हा मुलगा व त्याची बायको सीता ही सून हीं आपल्याकडे यत आहेत असें पाहून जटायूला त्यावेळीं प्रेमाचा गहिंवर आला होता. ह्मणूनच जटायूनें रावणाला सीता नेतांना फार प्रतिबंध केला. सीतेनेंही आपण सांगितलेल्या रामायणांत जटायूचा योग्य शब्दामध्यें गौरव केला आहे.

**त्यावरि मामाजींचे गृध्रेंद्र सखे जटायु या नांवें**
**स्नेहाब्धि भेटले हो, त्यांचें साधुत्व काय वानावें ?**

यावरून त्यावेंळीं जटायू चांगल्या स्थितींत असून त्याचा घरटा नाशीक पंचवटीच्या उत्तरेस विंध्याद्रीवर कोठेंतरी असावा व नंतर त्यानें तो येथें आणला असावा, किंवा जटायू फिरतीवर असतां रावण त्याला येथें भेटला असावा. मागील मोरोपंती आर्येवरून जटायूच्या घरीं राम सीतेसुद्धां कांहीं दिवस राहिले असावे असें दिसतें. त्याशिवाय सीतेची इतकी दाट ओळख राहणार नाहीं व जटायूलाही तिचें स्मरण राहणार नाहीं हें खरें. यावरून रावण सीतेला पंचवटींतून घेऊन लंकेला याच मार्गानें गेला असें दिसतें. यावरून सिलोन हीच लंका असावी असें वाटतें.

यानंतर मी नागोठण्याहून भिसे—खिंडीनें

## मेढें

येथें आलों. हें अवचितगड किल्ल्याचे अगदीं पायथ्याशीं आहे. येथें वाकेश्वर नांवाचें शिवस्थान फार पुरातन आहे. जवळ प्रशस्त बांधीव तलाव आहे. या प्रांतामध्यें हल्लींची सुधारणा फारशी गेली नाहीं. यामुळें जुन्या पद्धतीप्रमाणें लोक पापभिरू, कर्तव्यदक्ष व जुटीनें काम करणारे आहेत. त्यांच्यांत हल्लींप्रमाणें भांडणें, द्वेष नाहींत. त्यांत त्यांचें देवधर्माकडे लक्ष जास्त आहे. देवाची दिडकी चुकून जरी आपणाकडे आली तरी ती आपला व आपल्या कुटुंबाचा सत्य-नाश करील अशी अजून त्यांची भावना आहे. ह्मणून देवाच्या उत्पन्नाचा हिशोब ते चोख राखून खर्च काटकसरीनें करितात. यामुळें देवाचे उत्सव प्रेक्षणीय व स्फूर्तिदायक होतात. कथा, कीर्तनें, पुराणें, मिरवणुकी, छबिनें, भोजनसमारंभ मोठ्या हौशीनें होतात. येथें एक चांगली चाल आहे. ती अशी—या उत्सवाचे वेळीं उत्सवाकरितां जी परगांवची मंडळी येईल त्यांच्या दोन्ही वेळच्या भोजनाची व्यवस्था उत्सव असेपर्यंत देवस्थानांतून चालते. पाहुण्यासंबंधानें नेहमीं सर्व ठिकाणीं आदर असतो. हा नियम गांवकऱ्यांना मात्र लागू नाहीं. ह्मणजे गांवचा मनुष्य बाहेरून नोकरीवरून उत्साहाकरितां आला तर त्याला लागू नाहीं. पाहुणे ज्यांच्या घरीं येतील ते त्यांना आपले घरून दुसरीकडे जेवण्याकरितां सहसा पाठवीत नाहींत. त्यांत थोडा परिचय असला ह्मणजे मुळींच पाठवीत नाहींत. तरी रीतीप्रमाणें देवस्थानचें बोलावणें

येतेंच. ह्या नियम जुन्या पद्धतीप्रमाणें ब्राह्मणांनाच लागू आहे, इतरांना नाहीं. तसेंच पाहुणेही फार थोडे येत असल्यामुळें ही पद्धति अंमलांत येत आहे हें उघड आहे. इकडील लोक भाविक व त्यांचा ह्या देवावर मोठा भरंवसा असल्यामुळें शिवरात्रीचे दिवशीं वीस पंचवीस ब्राह्मण एकत्र बसून सकाळीं सात वाजल्यापासून रात्रीं बारा वाजेपर्यंत त्यांचें एकसारखें लघुरुद्र चाललेले असतात. उत्साहाचे वेळीं दिवसारात्रीं निरनिराळ्या हरदासांचीं व पुराणिकांचीं कथा, कीर्तनें, पुराणें, गाणेंबजावणें व वेदमंत्रघोष, मंत्रपुष्पें चालू असल्यामुळें उत्सवांत केव्हांही गेलें तरी मन रममाण होतें व वेळ केव्हांच निघून जातो. निरनिराळ्या हरदास पुराणिकांना त्यांच्या योग्यतेप्रमाणें देवस्थानांतून बिदागी मिळते, यामुळें गुणी जनांचाही संग्रह वाढतो.

मेळ्याप्रमाणें नागोठण्यासही असे उत्सव होतात. गांवढें गांवांत एखादेंच देऊळ असतें. ह्मणून त्या देवाचे उत्सव फार प्रेमानें होतात. पर ठिकाणीं नोकरीस गेलेले गांवचे लोकही ह्या उत्सवाकरितां मुद्दाम येतात. व कांहींतरी नाटक किंवा ललित इतर भोंवतालच्या गांवांपेक्षां आपलें चांगलें व्हावें ह्मणून चढाओढीनें करितात. अशा रीतीनें गांवढेगांवचे उत्सव जुन्या पद्धतीचे एकजुटीनें, चढाओढीनें व प्रीतीनें करितात, यामुळें उत्साह करण्याचा मूळ हेतु चांगल्या प्रकारें सिद्धीस जातो. एकी, जूट, सार्वजनिक काम करण्याची हौस व तत्परता, आपलें कसब व कर्तृत्व दाखविणेची पराकाष्ठा व श्रेष्ठपणाचें अनुकरण यांचें शिक्षण अशा उत्साहामुळें मिळतें. हे उत्साह व लग्नकारणाचे सोहाळे हे, मुलें बुद्धीनें व कर्तृत्वानें पुढें येण्याचे नेहमींचे राजमार्ग आहेत. साधनाभावामुळें गांवढेगांवचीं नाटकें विशेष पाहण्यासारखीं नसलीं तरी देवस्थानास लागलेल्या वेलबुट्या, कागदाचीं खोदकामें, नकशा, चढाओढीच्या रांगोळ्या हीं कामें खरोखर पाहण्यासारखीं असतात. सर्व गांव, मुख्यतः सर्व मुलें या उत्साहाचे वेळीं अगदीं आनंदांत असतात. तीं आपआपले नवे पोशाख व दागिने घालून इकडे तिकडे हिंडत असतात. त्यांना ही पर्वणी केवळ दिवाळीपेक्षांही प्रीय वाटते. सकाळपासून संध्याकाळपर्यंत त्यांच्या देवळांत किती खेपा होत असतील त्याचा नेम नाहीं! प्रत्येक मूल आपणांस कोण काय काम सांगेल याची अगदीं वाट पाहात असतें. आपणांस काम सांगतील कधीं व आपण

करूं कधीं असें त्यांना होतें. मग चुकारपणाचें नांव कशाला ! त्यांत स्त्री–पुरुषांचा विनय हा तर शहरापेक्षां वाखाणण्यासारखा असतो. त्यांत छिचोरपणा, हलकटपणा किंवा चढेलपणा व बेमुरवतपणा याचा मागमूसही नसतो. अशा प्रकारचा उत्साह जुन्या गांवढेगांवांतच दृष्टीस पडतो, तसा शहरांत दिसत नाहीं. शहरांत हीं कामें मजुरीनें होतात, यामुळें उत्साहाचें खरें शिक्षण शहरीं उत्साहानें मुलांस बहुधा मिळत नाहीं. शहरांतील लोक उत्साहाची वर्गणी पाहिजे तेवढी देतील; पण हें शिक्षण घेण्याकरितां मुलगे मुली पाठविणार नाहींत ह्यामुळें शहरीं उत्साह हीं केवळ प्रदर्शनें होतात.

यानंतर रोहे अष्टमीवरून खाडीनें कोकबनची खिंड उतरून मी

## नांदगांव

येथें आलों. हें प्रख्यात गणपतीचें स्थान आहे. येथील जोशी घराण्यांतील एका गृहस्थाला त्याच्या तपःश्चर्येमुळें हा गणपती प्रसन्न झाला. हा गणपती ह्या गांवच्या उत्तरेस एका केतकी बनांत होता तो त्या जोशांच्या स्वप्नांत आल्यामुळें हे जोशीबुवा नेहमीं तेथें उजाडल्यावर तपःश्चर्येला जात असत. एकदां पाऊस फार पडल्यामुळें पुरानें मधली खाडी भरून देवाचे पूजेला त्यांना आठ दिवस जातां आलें नाहीं तेव्हां त्या दिवसांत उपास करून व कोणाशीं कांहीं न बोलतां ते तसेच राहिले. तेव्हां ह्या गणपतीला संकट पडलें. मग पूर निघून गेल्यावर ते गणपतीला प्रथम कडकडून भेटले. तेव्हां तो गणपतीही अगदीं हलका होऊन त्यांच्या छातीला चिकटून त्यांच्या घरीं आला व त्याच्या इच्छेप्रमाणें इच्छित ठिकाणीं आल्यावर जड झाला व तेथेंच तो राहिला. तेव्हां तेथेंच त्याची स्थापना करून त्यांनीं येथें हें देऊळ बांधिलें आहे.

हा गणपती त्या जोशीबोवांपाशीं बोलत असे असें ह्मणतात. ह्या गणपतीनें त्यांना मक्केस नेऊन रमलविद्या व जोतिषशास्त्र शिकविलें. रस्त्यानें भक्षाभक्ष पदार्थांचा तुला दोष लागणार नाहीं, असें गणपतीनें वरप्रदान दिलें. त्या रमलज्ञानामुळें त्यांचे जोतिषविषयक गणित बरोबर येऊन त्याचा ठोकताळाही जमूं लागला. यांनीं गणपतीच्या प्रसादानें जोतिषविजय नांवाचा ग्रंथ केला होता असें ह्मणतात. पण हल्लीं हा कोठें पाहण्यांत येत नाहीं. हे जोशीबुवा जंजिऱ्याचे सिद्दीकडे दर महिन्यास नवा चंद्र सांगण्यास जात असत. या जोशावर सिद्दीची मोठी कृपा असे. एके दिवशीं जोशीबोवांनीं उद्यां चंद्र दिसेल असें सिद्दीला

सांगितलें. पण पंचांग पाहतां त्या दिवशीं अमावास्या होती ! दुसरे दिवशीं जोशीबोवा सिद्दीकडे गेले तेव्हां सिद्दी ह्मणाले, जोशीबुवा आज अमावास्या असून चंद्र कसा दिसेल? तेव्हां जोशीबोवा चपापले ! पण जोशीबोवांनीं त्यावेळीं मी सांगितल्याप्रमाणें आज चंद्र नक्की दिसणार असें पुन्हां सांगितलें. तेव्हां चंद्र दिसला नाहीं तर डोकें उडवीन असें सिद्दीनें त्यास बजाविलें ! जोशीबोवांनीं तें कबूल केलें. व झालेली हकीकत गणपतीस निवेदन केली कीं 'आतां माझी लज्जा राखणें तुझें काम आहे. जगांत तुला कांहीं अशक्य नाहीं.' अशी गणपतीची फार प्रीतीनें प्रार्थना केली. तेव्हां गणपती प्रसन्न होऊन त्यानें सांगितलें कीं, घाबरूं नको. सूर्यास्ताच्या नंतर चंद्र दिसण्याचे वेळीं पांढऱ्या कागदाची चंद्राची कोर कापून आकाशांत सोड ह्मणजे बादशाहाला मात्र चंद्र दिसेल, दुसरें कोणास तो दिसणार नाहीं. त्याप्रमाणें केलें व बादशाहाला चंद्र दिसला. तेव्हां बादशहानें फार खुश होऊन जोशीबोवांस भरजरीची मोठी शाल दिली व त्यांचा मोठा गौरव केला. जोशीबोवांनीं तीच शाल घरीं आणून तुपांत भिजवून कृतज्ञतापूर्वक गणपतीपुढें जाळली व तें भस्म आपले अंगास लाविलें ! अशी ही त्या प्रांतींची दंतकथा आहे.

अशीच दुसरी ऐतिहासिक गोष्ट घडली. हल्लीं सिद्दीचा जंजिरा किल्ला आहे त्याच्या पायाचा मुहूर्त मिळण्याकरितां त्यांनीं आपला सरदार जोशीबोवांकडे पाठविला. त्यावेळीं जोशीबोवा परगांवीं गेले होते, लौकर येणार नव्हते. पण राजाचें काम आहे ह्मणून तो मुहूर्त त्याचे मुलीनें दिला. मुलगी ही जोशीबुवांचे संगतीनें तरबेज झाली होती यामुळें तो मुहूर्त तिनें इतका उत्तम दिला कीं, हा किल्ला कायमचा अभेद्य व अजिंक्य राहील ! पुढें जोशीबोवा एकाएकीं घरीं आल्यावर त्यांना हा सर्व प्रकार कळला. तेव्हां ते तिला रागावले आणि ह्मणाले, श्रीगणपतीनें असे शाश्वतीचे मुहूर्त मनुष्यांना देऊं नये असें बजाविलें आहे. अशानें मनुष्यें उन्मत्त होतील. तेव्हां जोशीबोवांनीं थोडा फरक करून तो दिला पण पहिली मुहूर्ताची पहार मारली होती तिच्यांतून रक्त निघालें. ह्मणजे ती अगदीं शेषाचे मस्तकापर्यंत पोहोंचल्यामुळें त्याला लागून तें रक्त निघालें असें ह्मणतात. नंतर दुसऱ्या मुहुर्तानें किल्यास सुरवात केली. तरी किल्ला पांचशेंच्या वर वर्षे अजिंक्य व अभेद्य राहीलच असें ठरलें. पुढें जोशीबोवांनीं ही गोष्ट गणपतीस कळविली. तेव्हां गणपतीला राग आला व त्यानें त्याला शाप दिला

कीं, मी एवढी गुप्त विद्या तुला दिली ती तूं पोरांबाळांनासुद्धां शिकविलीस व अनर्थ केलास. आतां तुझी विद्या फ़ळास येणार नाहीं. इतकेंच नव्हे तर तुझा निर्वंश होईल. दत्तक घेतलास तरी सहा पिढ्या औरस संतती होणार नाहीं. अशा आख्यायिका त्या प्रांतीं व त्यांच्या घराण्यांत चालू आहेत. यांत किती सत्यता असेल ती असो, पण ऐतिहासिक दृष्टीनें ह्या आख्यायिका आजपर्यंत अगदीं तंतोतंत मिळाल्या आहेत. ह्मणजे त्यांच्या घराण्यांत तेव्हांपासून अनुक्रमानें सहा दत्तक झाले हें आश्चर्य नव्हे काय? आतां सहाव्या पुरुषाला मात्र औरस संतती ह्मणजे दोन मुलगे झाले आहेत. तसेंच जंजिरा किल्ला घेण्याबद्दल शिवाजीचे वेळेपासून पेशव्यांनींही फार प्रयत्न केला. पण तो आजपर्यंत आजिंक्यच राहिला आहे ही गोष्ट मात्र खरी. कदाचित् यालाच अनुसरून त्या आख्यायिका बनविल्या असतील. इतिहासावरून हा किल्ला फार प्राचीन दिसतो. पूर्वींच्या हिंदु राजापासून अहमदनगरच्या बादशाहानें हा किल्ला १४९० सालीं जिंकून घेतला, व त्यावर शिद्दी जातीचा सुभेदार नेमला. त्यापैकीं शिद्दी अंबरसनक हा सुभेदार सन १७३६ त स्वतंत्र झाला तेव्हांपासून हा किल्ला शिद्दीच्या ताब्यांत आहे.

असा हा गणपती उजव्या सोंडेच्या गणपतीप्रमाणें फार कडक व पराक्रमी असल्याची त्याची कीर्ति आहे. मी याची अनन्यभावानें पूजा अर्चा करून, देव ब्राह्मण करून तीर्थप्रसाद घेऊन निघालों व

## मुरुड

येथें आलों. नांदगांवहून मुरूड सहा मैल आहे. सडक आहे. टांगे मिळतात. ही जंजिरा संस्थानची राजधानी आहे. जंजिरा हें किल्ल्याला नांव आहे. पाण्यांतल्या किल्ल्यास जंजिरा ह्मणतात तसाच तो आहे. अष्टविनायकांच्या स्थानाचा जो मंगलाष्टकांचा श्लोक पौराणिक यात्रांत दिला आहे त्यांत बल्लाळे मुरूडे असा उल्लेख आहे. यावरून मी येथें आलों. पण येथें कोणत्याही गणपतीचें पुरातन असें देऊळ नाहीं. हल्लीं कोणी जोशी वकिलांनीं जुन्या गणपतीचा प्रतिनिधी ह्मणून नवें गणपतीचें देऊळ बांधिलें आहे. मूळ बल्लाळ विनायकाचें हेंच स्थान असें सांगतात. पूर्वीचें देऊळ जेथें होतें तेथें आतां दगडाचा चौथरा मात्र आहे. त्यावर देव नाहीं. मुसलमान लोक ह्या देवळांत शिरूं लागले तेव्हां काशीविश्व

नाथाप्रमाणें देव त्यांतून पळाला आणि एका वैश्याच्या तांड्यांतील एका बैलाच्या धान्याच्या गोणींत बसून भोर संस्थानांतील मागील वर्णन केलेल्या पालीस गेला असें ह्मणतात. ज्या बैलाच्या गोणींतून तो गेला त्या बैलाची गोण जड झाल्यामुळें तो वारंवार बसे. तेव्हां बसण्याचें कारण काय ह्मणून त्या लमाणानें त्याची गोण पाहिली तों त्या गोणींत हा दगड सांपडला. तो त्यांनें गोणींतून बाहेर काढून फेंकून दिला तरी पुन्हां त्याच गोणींत तो येऊन बसे. असें पाली-पर्यंत जातांना दोन तीन वेळां झालें. शेवटीं तो पालीस कायमचा उतरला. आपल्याला आणल्याबद्दल त्या बैलाची ती गोणी सोन्याची झाली व त्या व्यापा-रांत त्या व्यापाऱ्याला फार फायदा झाला. अशीही त्या प्रांतीं ह्या गणपतीची आख्यायिका आहे. हिच्यापेक्षां पालीस सांगितलेलीच विशेष संभाव्य दिसते. मूळ या बल्लाळ गणपतीचा अवतार त्र्यंबकेश्वरीं झाला अशी कथा भाग तीन यांत सांगितली आहे. तेथून येथें मुरुडगांवीं कधीं व कशाकरितां आला याची पौराणिक किंवा अशी दंतकथेची कां होईना, माहिती मिळाली नाहीं. कोणास ग्रंथांतरीं किंवा सांगोसांगी वाडवडिलांच्या तोंडून माहीत असल्यास इकडे कळ-विल्यास उपकार होतील. त्याची दुरुस्ती पुढील आवृत्तींत करूं. ह्या बल्लाळ विनायकाची हकीगत मागें पालीगांवच्या वर्णनांत दिली आहेच.

हिंदूंचा देव अशा रीतीनें मुसलमानांना किंवा खिश्चनांना भिऊन पळून जातो; मग अशा पळपुट्या देवाला भजून तो आपलें काय कल्याण किंवा भय-दूर करणार किंवा सामर्थ्य देणार? आणि असा पळणारा देव कसला? अशा रीतीनें हिंदु द्वेष्टे हिंदूंना हिणवतात, त्यांचा बुद्धिभेद करतात व आमचे असम-जुतीचे लोक तें खरें मानून आपल्या देवाची थट्टा करितात व त्यास भजणें सोडून देतात. पण हें करणें चूक आहे. देव पळाला याचा अर्थ त्यांना सम-जला नाहीं.

**" स्थिर चर व्यापुनी अवघा तो जगदात्मा दशांगुळें उरला "**

ही देवाविषयीं भावना सर्व धर्मांमध्यें आहे. पण तिचा उगम मूळ हिंदू धर्मामध्यें आहे. असें असतां विशिष्ट ठिकाणींच तेवढा देव कसा आहे? ह्याचें समाधान असें आहे कीं, देव सर्वत्र भरला आहे खरा, पण मंत्रानें, पूजेनें किंवा भावनेनें जेव्हां त्याचें अवाहन करून त्याला जागृत करावा तेव्हां विजेप्रमाणें तो कार्य करण्यास प्रवृत्त होतो. ती जागृति नाहींशी झाली ह्मणजे देव गेला. त्याला

आह्मी देव पळाला असें ह्मणतों एवढेंच. मुसलमान किंवा परधर्मी, तुमच्या दवाला हा पद्दा बाटविला असें ह्मणतील त्याच्याकरितां ही धार्मिक वृत्तीची मुख्य तोड किंवा समाधान आहे. ह्मणजे देवाला तूं बाटला ह्मणतोस काय ? तर तेथें त्यावेळीं आमचा देव नव्हताच! मग कोठें होता ? तर आह्मी पूजेचे वेळीं मंत्र ह्मणून त्याची आराधना करूं तेथें व तितक्या वेळेपुरताच तो असतो आणि तो त्या मनुष्याला तेव्हांच वंद्य असतो. तूं शिवाला येशील त्यावेळीं तो जाईल. आणि ही गोष्ट खोटी नाहा. व्यवहारिक व शास्त्रोक्त आहे. दुसरें उदाहरण— प्रत्येक हिंदूच्या घरांत त्याचें कुलदैवत असतें. त्याची तो अत्यंत स्वच्छतेनें पूजा करितो. त्याला अमंगलाचा स्पर्श होऊं देत नाहीं. पण घरांत लहान मूल असतें तें नजर चुकवून पाहिजे त्या स्थितींत असतां त्याचा समाचार घेतें! मुलानें असा समाचार घेतला तरी देवाधर्माला त्याचा बाट येतो किंवा तो देव अपूज्य होतो असें नाहीं. ही नजरचुकीची गोष्ट आहे ह्मणून तिकडे काना-डोळा करून सोडून देतात किंवा लहानसहान प्रायःश्चित्त करितात. पण असें पुन्हां पुन्हां वारंवार न होण्याविषयीं मात्र जपतात. तोच प्रकार विधर्मीयांच्या आचरणाचा आहे. ते देव ह्मणून द्वेषबुद्धीनें त्याची फारच नासाडी करितात! पण ती त्या मूर्तीची किंवा एक प्रकारच्या त्या प्रतीकाची होते देवाची होत नाहीं. प्रतीक दुसरें करितां येतें. ते हें विधर्मीयांना चिथावण्याकरितां करितात. ज्याला वैराचीं उट्टीं काढावयाचीं असतात त्याला हे मार्ग आहेत. देव कधींही बाटावयाचे नाहींत. आपलें इष्टकार्य झाल्यावर आवाहित देवतेचें विसर्जन आपणही करितोंच. तात्पर्य, मूर्ति फोडण्यानें देवधर्माचा मुळींच उच्छेद होत नाहीं. हा वैर साधण्याचा एक प्रकार आह एवढेंच. ओवळें झालेलें धोतर धुऊन पुन्हां स्वच्छ किंवा सोवळें करितां येतें. ओवळें झालें नाहीं तर धुवावयास नको एवढेंच. तोच प्रकार मूर्तीचा आहे. शिवाय अशा रीतीनें देव बाटूं लागले किंवा नाहींसे होऊं लागले तर जगांत कोणत्याही धर्माचा देव शुद्ध राहणार नाहीं. मुसलमानांच्या खुद्द मक्केंतील मशिदीसुद्धां फुटल्या आहेत व ख्रिस्ती लोकांच्या जरूसलेमचा मुसलमान लोकांनीं विध्वंसही केला आहेच!

बीज सर्वत्र आहे पण जेथें जागृति करावी तेथेंच ती दिसते, म्हणजे कार्य करते. तीच गोष्ट ईश्वरी सत्तेची व सरकारी सामर्थ्याची आहे. सरकारचें सामर्थ्य जेथें दिसावें अशी अपेक्षा असेल तेथील सरकारास आव्हान

केल्यास तें दिसतेंही. चोरटे, लबाड, राजकारणी या लोकांना त्याची प्रचिती आहेच. मनुष्यामध्यें जोंपर्यंत जीव असतो तोंपर्यंत तो पूज्य असतो. तो गेल्यावर तो अपूज्यच आहे. तसेंच कोणत्याही दगडाची जोंपर्यंत देव ह्मणून पूजा होत असेल तोंपर्यंतच त्यांत देवत्व आहे. पूजा व आराधना बंद झाली ह्मणजे त्यांतले देवत्व गेलें. ह्मणजे देवत्व येणें किंवा जाणें हें त्या दगडाचें सामर्थ्य नसून त्या मंत्राचे सामर्थ्य आहे. आणि हे मंत्र वाटेल त्यांनीं ह्मणतां कामा नयेत तर ते ब्राह्मणांनींच ह्मटले पाहिजेत हें त्यांचें रहस्य आहे. विजेचे प्रयोग तज्ञांनींच केले पाहिजेत. भलत्यांनीं केल्यास अर्थाच्या ऐवजीं अनर्थ मात्र होतील आणि तसे आतां होतही आहेत. सारांश हिंदूचा देव इतर धर्मियांनीं मारला, तोडला, फोडला किंवा त्याची नासधूस केली असें कधीं व्हावयाचें नाहीं, सबब त्याच्या नादीं लागून असे अत्याचार करूं नका हेंच विधर्मियांना सांगणें आहे. व्यर्थ असंतोषाचें उट्टें केव्हां तरी निघेल हें लक्षांत ठेवावें. हेंच सर्व हिंदूंनीं त्यांना उत्तर देऊन आपलें कर्तव्यकर्म करीत राहिलें पाहिजे. आतां एखादी मूर्ति ध्यानधारणेस अति उत्तम आहे, असें कांहीं लोकांना वाटून ते ती मूर्ति उचलून भाविकपणामुळें इष्ट ठिकाणीं नेतात असेंही दाखले घडतात. द्वारका, पंढरपूर येथील देवांची स्थिति अशीच झाली होती. पण त्याला देव पळाला असें ह्मणत नाहींत तर भक्ताबरोबर गेला असें ह्मणतात. तोच प्रकार मुरुडाहून गणपती पालीस गेल्याचा असावा. मुरुडचा गणपती नांदगांवला गेला असे समजल्यावरून मी अगोदर तेथें गेलों होतों. पण सिद्धीविनायकाचें तें स्थान नाहीं, पालीचेंच होय असें अखेरीस ठरलें व त्याची हकीगत मागें पालीस दिली आहे. नंतर मी बोटीनें हरेश्वर बाणकोटवरून दासगांव, महाड, नातें ह्यावरून इतिहास प्रसिद्ध

## रायगड

किल्ल्यावर आलों. ज्याला सवड असेल त्यानें राजपुरीच्या खाडीनें तळें, इंदापूर, माणगांव ह्यावरून रायगडला यावें. पण हा रस्ता त्रासाचा आहे, सिधा नाहीं.

रायगडास आतां जाऊन तुह्मी तेथें काय पाहाणार? तेथें पडक्या भिंताडांशिवाय कांहीं नाहीं. शिवाय तेथें जाण्याला सोयीचा अजून मार्गही झाला नाहीं. किडीं, सर्प, घुबडें, विंचू यांशिवाय तुह्मांस तेथें आज

कांहीं दिसणार नाहीं. तेव्हां तुह्मी तेथें आतां जाऊं नका, असें तेथील जवळील अज्ञ मनुष्यांनीं मला पुष्कळ वेळां सांगितलें. पण त्यांना ऐतिहासिक दृष्टया ह्या गडाची कल्पना काय येणार? आपण यात्रा करतों तेथें तरी ज्याच्याकरितां यात्रा करितों त्याचेंतरी दृश्य असें काय असतें? सर्वांची स्थिति एकच. यात्रेला गेल्यानें धर्माभिमान, भक्ति व ईश्वरविषयक निष्ठा हीं जशीं जागृत होतात. त्याचप्रमाणें ऐतिहासिक स्थळें पाहिल्यानें त्या इतिहासाचें स्मरण होऊन स्वाभिमान, धर्माभिमान, देशाभिमान व राष्ट्राभिमान यांची जागृति होते. तसेंच तेथील कामें पाहून आपल्या प्राचीन लोकांचे कर्तृत्वाची जागृती होऊन त्यामुळें आपल्या कर्तव्यास स्फुरण चढतें, हें त्यांना काय समजणार? तरीपण मी त्यांना समजण्याकरितां तें सांगितलें. शिवाजी महाराजांचा अवतार झाला नसता तर मुसलमानांपुढें ब्राह्मणांचें जानवें, तुमची शेंडी, आपलीं देवळें व धर्म हीं राहिलीं असतीं काय? कदाचित् राहातीं असें मानल्यास तीं काय स्थितींत असतीं? ज्यानें स्वधर्माकरितां व आपल्या देशबांधवांच्या सुखाकरितां स्वराज्याची स्थापना केली, जुनीं देवळें दुरुस्त केलीं, गोब्राह्मणांचें रक्षण केलें, त्याच्या समाधीचें दर्शन कृतज्ञतापूर्वक आपणांस घ्यावयास नको काय? अवश्य घेतलें पाहिजे. इतकेंच नव्हे तर ज्यांना त्याचें महत्व वाटत नसेल, ठाऊक नसेल त्यांना तेथें नेऊन आपल्या पूर्वजांच्या पराक्रमाची ओळख करून देऊन ते किती निधड्या छातीचे होते हें तेथील कडे व खोरीं दाखवून व तेथची पूर्वींची राजधानीची व्यवस्था दाखवून त्याचें सामर्थ्य दाखविणें व अशा रीतीनें त्यांचा राष्ट्राभिमान जागृत करणें हें आपलें कर्तव्य आहे. यात्रेच्या देवानें स्वर्गसुख दिलें तर ह्या ऐतिहासिक देव मृत्युलोकीं सुखदायक व स्फूर्तिदायक होईल. स्वर्गसुख कोणीं पाहिलें नाहीं, पण मृत्युलोकचें सुख त्याला प्रत्यक्ष दृष्टीस पडेल. सबब त्या यात्रेपेक्षां इहलोकीं सुख देणारी हीच यात्रा करणें जास्त फायद्याचें आहे. अशा स्थळाच्या दर्शनानें कोणाच्या मनांत कधीं, काय व कशी स्फूर्ति किंवा तेज उत्पन्न होईल हें कोणी सांगावें?

रायगड किल्ला पाहिला ह्मणजे त्या काळाला व त्याच्या उद्देशाला अनुसरून ही राजधानी शिवाजीनें केल्यामुळें आपल्याला त्या काळचें ज्ञान होतें. त्यावेळीं जिकडे तिकडे मुसलमानी प्राबल्य होतें. जरी त्यांचें अपसांत वांकडें होतें तरी शिवाजीची राज्यस्थापना व हिंदूधर्माचें वर्चस्व हें प्रत्येक मुसलमानास खपत

नव्हतें. तें रक्षण करण्याकरितां ही राजधानी करण्यात शिवाजीच्या आंगचें चातुर्य, मुत्सद्दीपणा व धोरण याचा चांगलाच प्रत्यय येतो. रायगडची भौगोलिक रचनाच अशी विलक्षण आहे कीं सिंहगड, पुरंदर, जिंजी हे किल्ले मजबूत, बिकट व झुंझार खरे, पण त्यांच्या आजूबाजूला पुष्कळ सपाट मुलूख असून मध्येंच हे उंचवटे आहेत यामुळें शत्रूला आपलें अवजड सामान व वाटेल तितकें लष्कर किल्यासभोंवतीं उभें करितां येत होतें. तसें रायगड किल्ल्याचें नाहीं. हा डोंगर व मुख्य सह्याद्री यांच्यामध्यें बेताचें अंतर असल्यामुळें त्यांना तसें करितां येत नाहीं. रायगडच्या डोंगरामुळें तें मोठें खोरें झालें आहे. शिवाय रायगड किल्याच्या डोंगराची मुख्य रांग सह्याद्रीपासून लांबलचक अगदीं सुटी आहे. ह्मणून देशावरून येणाऱ्या प्रत्येक शत्रूस सह्याद्री ओलांडून यावेंच लागतें. लांब अंतरामुळें सह्याद्रीपासून मारा करितां येत नाहीं. सह्याद्री ओलंडतांना मार्ग बिकट असल्यामुळें बरेंच अवजड युद्धसाहित्य अर्ध्या रस्त्यावर टाकून सड्या शिपायांनिशीं आल्याशिवाय गत्यंतर नसे. पुढें प्रत्यक्ष रायगडावर हल्ला करावा तर त्याच्या सभोंवतीं निसर्गदत्त प्रचंड उभे कडे, सुरुंग लावून कितीही भगदाडें केलीं तरी किल्ल्यांत प्रवेश होणें अशक्य. किल्ल्यावर जाण्यास सर्वांस एकच रस्ता व तोही सोपा नाहीं. त्यांत त्यावर भयंकर तोफांचा मारा ठेवतां आल्यामुळें तो अगदीं अजिंक्य झाला होता. तेथून जाणें ह्मणजे मृत्यूच्या तोंडांतच जाणें असें होतें. बाकी सर्व बाजूला भयंकर अपरंपार खोल आणि अगदीं भिंतीसारखे तुटलेले कडे आहेत. असा हा किल्ला केवळ बेलाग आहे. वर प्रशस्त मैदान आहे व त्याला कमळाच्या पाकळ्यांसारखे फांटे आहेत. यामुळें सभोंवतालच्या शत्रूच्या हालचालींवर चोहोंकडून नजर चालवून वरून मारा करितां येतो. यावर मारा करण्यास योग्य असा एका बाजूला जवळ एक लहान डोंगर, याचाच फाटा आहे. पण त्यावर उभें राहण्याइतकीसुद्धां सपाटी नाहीं व त्याचा मारा वरील मैदानावर पोंचणें शक्य नाहीं. कारण याची उंची १८५१ फूटच आहे. वेढा घालावा तर सभोंवतालचा मुलूख डोंगराळ. सलग सैन्य उभें करितां येत नाहीं, सुरूंगाचा उपयोग नाहींच. इतकेंच नव्हे तर सुरूंग खोदतांना किंवा तो उडतांना एखादा धोंडा पडल्यास शेंकडों सैनिक जायबंदी व्हावयाचे. शिवाय येथें राजधानी केल्यामुळें कोंकणपट्टी, समुद्र किनाऱ्यावरील चांचे, टोपीवाले यांच्यावर, तशीच जवळच्या हब-

कांहीं दिसणार नाहीं. तेव्हां तुह्मी तेथें आतां जाऊं नका, असें तेथील जवळील अज्ञ मनुष्यांनीं मला पुष्कळ वेळां सांगितलें. पण त्यांना ऐतिहासिक दृष्टया ह्या गडाची कल्पना काय येणार? आपण यात्रा करतों तेथें तरी ज्याच्याकरितां यात्रा करितों त्याचेंतरी दृश्य असें काय असतें? सर्वांची स्थिति एकच. यात्रेला गेल्यानें धर्माभिमान, भक्ति व ईश्वरविषयक निष्ठा हीं जशीं जागृत होतात. त्याचप्रमाणें ऐतिहासिक स्थळें पाहिल्यानें त्या इतिहासाचें स्मरण होऊन स्वाभिमान, धर्माभिमान, देशाभिमान व राष्ट्राभिमान यांची जागृति होते. तसेंच तेथील कामें पाहून आपल्या प्राचीन लोकांचे कर्तृत्वाची जागृती होऊन त्यामुळें आपल्या कर्तव्यास स्फुरण चढतें, हें त्यांना काय समजणार? तरीपण मी त्यांना समजण्याकरितां तें सांगितलें. शिवाजी महाराजांचा अवतार झाला नसता तर मुसलमानांपुढें ब्राह्मणांचें जानवें, तुमची शेंडी, आपलीं देवळें व धर्म हीं राहिलीं असतीं काय? कदाचित् राहातीं असें मानल्यास तीं काय स्थितींत असतीं? ज्यानें स्वधर्माकरितां व आपल्या देशबांधवांच्या सुखाकरितां स्वराज्याची स्थापना केली, जुनीं देवळें दुरुस्त केलीं, गोब्राह्मणांचें रक्षण केलें, त्याच्या समाधीचें दर्शन कृतज्ञतापूर्वक आपणांस घ्यावयास नको काय? अवश्य घेतलें पाहिजे. इतकेंच नव्हे तर ज्यांना त्याचें महत्व वाटत नसेल, ठाऊक नसेल त्यांना तेथें नेऊन आपल्या पूर्वजांच्या पराक्रमाची ओळख करून देऊन ते किती निधड्या छातीचे होते हें तेथील कडे व खोरीं दाखवून व तेथची पूर्वींची राजधानीची व्यवस्था दाखवून त्याचें सामर्थ्य दाखविणें व अशा रीतीनें त्यांचा राष्ट्राभिमान जागृत करणें हें आपलें कर्तव्य आहे. यात्रेच्या देवानें स्वर्गसुख दिलें तर हा ऐतिहासिक देव मृत्युलोकीं सुखदायक व स्फूर्तिदायक होईल. स्वर्गसुख कोणी पाहिलें नाहीं, पण मृत्युलोकचें सुख त्याला प्रत्यक्ष दृष्टीस पडेल. सबब त्या यात्रेपेक्षां इहलोकीं सुख देणारी हीच यात्रा करणें जास्त फायद्याचें आहे. अशा स्थळाच्या दर्शनानें कोणाच्या मनांत कधीं, काय व कशी स्फूर्ति किंवा तेज उत्पन्न होईल हें कोणी सांगावें?

रायगड किल्ला पाहिला म्हणजे त्या काळाला व त्याच्या उद्देशाला अनुसरून ही राजधानी शिवाजीनें केल्यामुळें आपल्याला त्या काळचें ज्ञान होतें. त्यावेळीं जिकडे तिकडे मुसलमानी प्राबल्य होतें. जरी त्यांचें अपसांत वांकडें होतें तरी शिवाजीची राज्यस्थापना व हिंदूधर्माचें वर्चस्व हें प्रत्येक मुसलमानास खपत

नव्हतें. तें रक्षण करण्याकरितां ही राजधानी करण्यात शिवाजीच्या आंगचें चातुर्य, मुत्सद्दीपणा व धोरण याचा चांगलाच प्रत्यय येतो. रायगडची भौगोलिक रचनाच अशी विलक्षण आहे कीं सिंहगड, पुरंदर, जिंजी हे किल्ले मजबूत, बिकट व झुंझार खरे, पण त्यांच्या आजूबाजूला पुष्कळ सपाट मुलूख असून मध्येंच हे उंचवटे आहेत यामुळें शत्रूला आपलें अवजड सामान व वाटेल तितकें लष्कर किल्यासभोंवतीं उभें करितां येत होतें. तसें रायगड किल्ल्याचें नाहीं. हा डोंगर व मुख्य सह्याद्री यांच्यामध्यें बेताचें अंतर असल्यामुळें त्यांना तसें करितां येत नाहीं. रायगडच्या डोंगरामुळें तें मोठें खोरें झालें आहे. शिवाय रायगड किल्याच्या डोंगराची मुख्य रांग सह्याद्रीपासून लांबलचक अगदीं सुटी आहे. ह्मणून देशावरून येणाऱ्या प्रत्येक शत्रूस सह्याद्री ओलांडून यावेंच लागतें. लांब अंतरामुळें सह्याद्रीपासून मारा करितां येत नाहीं. सह्याद्री ओलंडतांना मार्ग बिकट असल्यामुळें बरेंच अवजड युद्धसाहित्य अर्ध्या रस्त्यावर टाकून सड्या शिपायांनिशीं आल्याशिवाय गत्यंतर नसे. पुढें प्रत्यक्ष रायगडावर हल्ला करावा तर त्याच्या सभोंवतीं निसर्गदत्त प्रचंड उभे कडे, सुरुंग लावून कितीही भगदाडें केलीं तरी किल्ल्यांत प्रवेश होणें अशक्य. किल्ल्यावर जाण्यास सर्वांस एकच रस्ता व तोही सोपा नाहीं. त्यांत त्यावर भयंकर तोफांचा मारा ठेवतां आल्यामुळें तो अगदीं अजिंक्य झाला होता. तेथून जाणें ह्मणजे मृत्यूच्या तोंडांतच जाणें असें होतें. बाकी सर्व बाजूला भयंकर अपरंपार खोल आणि अगदीं भिंतीसारखे तुटलेले कडे आहेत. असा हा किल्ला केवळ बेलाग आहे. वर प्रशस्त मैदान आहे व त्याला कमळाच्या पाकळ्यांसारखे फांटे आहेत. यामुळें सभोंवतालच्या शत्रूच्या हालचालींवर चोहोंकडून नजर चालवून वरून मारा करितां येतो. यावर मारा करण्यास योग्य असा एका बाजूला जवळ एक लहान डोंगर, याचाच फाटा आहे. पण त्यावर उभें राहण्याइतकीसुद्धां सपाटी नाहीं व त्याचा मारा वरील मैदानावर पोंचणें शक्य नाहीं. कारण याची उंची १८५१ फूटच आहे. वेढा घालावा तर सभोंवतालचा मुलूख डोंगराळ. सलग सैन्य उभें करितां येत नाहीं, सुरुंगाचा उपयोग नाहींच. इतकेंच नव्हे तर सुरुंग खोदतांना किंवा तो उडतांना एखादा धोंडा पडल्यास शेंकडों सैनिक जायबंदी व्हावयाचे. शिवाय येथें राजधानी केल्यामुळें कोंकणपट्टी, समुद्र किनाऱ्यावरील चांचे, टोपीवाले यांच्यावर, तशीच जवळच्या हब-

शीच्या हालचालीवर नजर ठेवितां येऊन घाटावरलि मुख्य सर्व किल्ल्यांवर म्हणजे प्रतापगडापासून पिंपरी घाटापर्यंत सर्व किल्ल्यांवर नजर ठेवितां येत असे. अशा रीतीनें सर्व राज्याचें तारायंत्र त्यांवरलि तोफांच्या आवाजानें व होळ्या पेटवून चाले. घाटमाथ्याची सर्व खबर सह्याद्रीवरच्या ह्या किल्ल्यास समजे व तेथून रायगडवर बातमी पोहोंचे. रायगडवरून सर्व राज्यांत त्याच साधनानें हुकूम पोहोचला जात असे व राज्याचा बंदोबस्त होई. यापेक्षां आणखी धोरण काय पाहिजे!

हें ह्या किल्ल्याचें स्थान—महात्म्य झालें. आतां आंतली मांडणीसुद्धां फार विचारपूर्वक व शहाणपणाची केलेली दिसते. धर्म, राजकारण, खासगी कारभार व लोकव्यवहार ह्या मुख्य गोष्टी परस्परांपासून अगदीं अलग अशा त्या डोंगराच्या निरनिराळ्या पाकळ्यांवर ठेविल्या होत्या व सर्वांचा बंदोबस्त सैन्याकडून व तोफखान्याकडून होत होता. प्रत्येक भागाला पाण्याची सोय स्वतंत्र केलेली होती. धर्माच्या भागांत ब्राह्मण आळी, देवळें व वर्णव्यवस्था यांची चांगली मांडणी केली होती. राजकारणांत गुप्तसभा, प्रगट सभा, राजदरबार, अष्टप्रधानांच्या जागा, त्यांचीं कौन्सिलें किंवा त्यांच्या छोट्या सभा, न्यायसभा, परदेशचें राजकारण, गुप्त व प्रगट राजमार्ग, तोफखाना व त्याला लागणारा दारू गोळा ह्या एका ठिकाणीं न ठेवतां ठिकठिकाणीं ठेविला होता. पागा, शिबंदी, सरदार सैन्य, शस्त्रागार, भांडागार, धान्यागार, शिक्षेचें वधस्थान किंवा कडेलोट करण्याच्या जागा यांची जुळणी सुरेख दिसली. दारूगोळ्यांत कांहीं ठिकाणें स्पष्ट व कांहीं गुप्त होतीं हें विशेष लक्षांत ठेवण्यासारखें आहे. राज्यकारभारावर निरंतर लक्ष पाहिजे म्हणून खाजगी बैठकीची जागा ही त्याच्याजवळच ठेविली होती. म्हणजे कोणत्याही निकडीचे प्रसंगीं राजेसाहेबांस सहज तेथें हजर होतां यावें. खाजगी कारभारांत प्रथम पालखी दरवाजा, सात राजस्त्रियांचे प्रत्येकीचे निरनिराळे असे रंगमहाल असून प्रत्येकीला स्वतंत्र हवा खाण्याकरितां जागा व सर्व बायकां मिळून एका ठिकाणीं हवा खाण्याची जागा, तसेंच हळदीकुंकवासारखेंच धार्मिक समारंभ करण्याची जागा अशा सर्व सोयी दृष्टीस पडल्या म्हणजे फार आनंद होतो. स्त्रियांच्या जाण्यायेण्याच्या जिन्याच्या पायऱ्या फारच विस्तृत व कमी उंचीच्या होत्या. सरकारची अगदीं खासगी भेटीची जागा अगदीं स्वतंत्र होती. धर्म व राजकारण यांच्यामध्यें लोकव्यवहार

ऊर्फ बाजार ठेविला होता. ह्मणजे बाजाराचा उपयोग सर्वांना सारखा व सहज घेतां यावा. शिवाय दुकानांचें नीट संरक्षण व्हावें ह्मणून त्यांच्या दुतर्फा इमारती केवळ दगडी बांधून दिल्या होत्या ह्मणजे आगीपासून व शत्रूच्या हल्यापासून त्यांचें चांगलें रक्षण व्हावें. हल्लीं किल्यावर त्यांच्याच तेवढ्या दुतर्फा दगडी लायनी स्पष्ट दिसतात. बाकींच्या इमारतींचे अवशेष मात्र दिसतात. ह्या लायनी आज सुमारें फर्लांग दीड फर्लांग लांब दिसत आहेत. व प्रत्येक दुकानाचा गाळा पंचवीस तीस फूट रुंदीचा दिसला. किल्याचें जें सर्वांत उंच टोंक मधोमध होतें, त्यावर पुन्हां दुमजली इमारत बांधून तीवर कर्णा, डंका व मोठें थोरली नौबत व चारी प्रहर चौघडा ठेविला होता. हा चौघडा राजदरबारच्या अगदीं पुढें आहे. व तो फार उंचावर असल्यामुळें त्याचा आवाज सर्व किल्यावर पोहोचून घड्याळाचें कार्य करी. मोठ्या नौबदीचा आवाज तर कोंकण व संह्याद्रीवरील किल्ले यांच्यांत तोफेसारखा दुमदुमत असे असें ह्मणतात.

ह्या किल्यावर ठरविलेल्या मार्गाशिवाय मार्ग नाहीं असें मार्गें सांगितलें असतां एका अगदीं अवघड ठिकाणाहून रात्रीं चढून एक बाई आपलें मूल कडेवर घेऊन मुलासुद्धां आली अशी प्रसिद्धी आहे. हिचें नांव हिरकणी असें होतें. हिच्या येण्याची दंतकथा अशी आहे:—ही बाई खालून आपले बागांतून सुवासिक फुलें घेऊन त्यांच्या माळा राजस्त्रियांना व शिवाजी महाराजांना नित्य नेऊन देत असे. याबद्दल हिला महाराजाकडून पुष्कळ बाक्षिस मिळत असेल असें वाटून प्राप्तीच्या अर्ध्या वाट्याप्रमाणें देवडीवाला तिचेजवळून पुष्कळ पैसे उपटी पण खरोखर तिला रोज कांहीं मिळत नसे. तरी ती केवळ शिवरायाच्या प्रीतीकरितां त्या देवडीवाल्याला देण्याकरितां कांहीं पैसे घेई. एक दिवस तिनें नेहमींचे पैसे दिले तरी तो खुष होईना. तिच्याशीं तो दुष्ट बुद्धीनें आंगलट करूं लागला, तेव्हां ती त्याच्याहातून पळाली. आपण त्या नीच्याच्या हातून सुटलों ह्याबद्दल तिला आनंद न वाटतां आपला फुलांचा नियम आज टळला असें वाटून तिला वाईट वाटलें. मग तिनें भवानीचें स्मरण करून किल्ला दुसऱ्या वाटेनें चढण्याचा प्रयत्न केला व ती या भयंकर कड्याच्या टोकानें वर गेली. व तिनें आपल्या माळा व फुलें त्यांस दिलीं. पुढें शिवाजी महाराजांना ही हकिकत समजल्यावर देवडीवाल्यास शिक्षा देऊन बाईच्या बहादुरीबद्दल व तिच्या आपलें ठायीं असलेल्या निःसिम प्रेमाबद्दल महाराजांनीं तिला मोठें बाक्षिस दिलें व

तिच्या मुलाला सरदारी दिली. व त्या टोंकावर नवें दगडी चुनेगची बांधकाम करून तो मार्ग बुजवून टाकला. मुलासुद्धां तिनें पुन्हां चढून व उतरून शिवरायाला दाखविलें, तेव्हां शिवरायालासुद्धां आश्चर्य वाटलें! मीही हा कडा प्रत्यक्ष पाहिला. तो कल्पनेच्या बाहेर आहे. शिवाजी सारख्यांना तो अवघड वाटला मग हल्लींच्या शेंदाड शिपायांची गोष्ट बोलण्याचें कारणच नाहीं. ह्या बाईच्या नांवावरून त्या टोकाला हिरकणी टोंक असें नांव देऊन तिचें ऐतिहासिक स्मारक शिवाजी महाराजांनीं कायमचें केलें व यामुळें तिची कीर्ति अजरामर राहिली. **देशांत कर्तृत्वाचा वारा वाहूं लागला ह्मणजे पुरुष कर्तृत्ववान निपजतात असें नाहीं, तर बायका व मुलेंसुद्धां नेहमीं त्यांच्या कानावर तशाच गोष्टी पडल्यामुळें चढाओढीनें कर्तृत्ववान, धाडसी व अलोट सामर्थ्यवान निपजतात ह्यांत शंका नाहीं. मग त्याकरितां बायकामुलांना हल्लींसारखें शाळेंतून मृतशिक्षण द्यावयास नको.** हल्लीं तेच वारे वाहूं लागल्यामुळें लोकांच्या पुढाऱ्यांकडून निःशस्त्र प्रतिकाराचे अत्यंत नम्रतापूर्वक कायदेशीर भीक मागण्याचे कतृत्वशून्य अशा बोलघेवडेपणाचे जाहीरनामे लागत आहेत. हा कालमहिमा तर खराच, पण अशा जाहीरनाम्यानें कर्तृत्ववान मनुष्याचा पुढाऱ्यांकडूनच उत्साहभंग होतो. व भयंकर शांतीचें ह्मणजे कर्तृत्वशून्य शांतीचें साम्राज्य पसरतें हें अत्यंत वाईट आहे. हल्लींच्या राजकारणांत त्यांच्या मतानें धाडसाची जरूर नसेल पण सर्वत्र ठिकाणीं हा नियम लागू करणें हें आत्मघातकीपणाचें व परंपरेनें राष्ट्रघातकीपणाचें खचित् आहे यांत शंका नाहीं. वस्तुतः साहस, धाडस व चिकाटी हे गुण इंग्लिशांच्या शंभर सवाशें वर्षांचे सहवासानें आपण मिळविले नाहींत किंवा मिळविण्याचा प्रयत्न अजूनसुद्धां केला नाहीं तर मनुष्यत्वाचा किंवा पशूप्रमाणें जगण्याचासुद्धां आपला अधिकार नाहीं. लोकमान्य टिळकांनीं असें कधीं प्रतिपादन केलें नाहीं. कायदा राजशाहीचें रक्षण करण्याकरितां आहे, मग त्याच्या अनुवादानें लोकशाही कशी मिळेल? ह्मणून तो कायदा हरप्रयत्नानें बदलण्याचा प्रयत्नच केला पाहिजे. आतां हल्लींचा निःशस्त्र प्रतिकार हाही एक आत्मोन्नतीची व सात्विक कसोटी दाखविण्याचा राजमार्ग आहे. पण त्यानें तामसवृत्तीचें दमन होत नाहीं. हिरण्यकश्यपू पूर्ण तामसवृत्तीचा व प्रल्हाद पूर्ण सात्विक वृत्तीचा. हिरण्यकश्यपूला प्रल्हादाचा नाश करितां आला नाहीं पण हिरण्यकश्यपूचा नाश करण्याकरितां खुद्द भगवंतासही त्यापेक्षां तीव्र

तामसवृत्तीचा असा नारसिंह अवतार घ्यावाच लागला असें हें ऐतिहासिक व पौराणिक सत्य आहे. भिऊन काव्यानें काटा काढला नाहीं तर तो पुवळून त्या सर्व भागाचा नाश करून आपण कुजून मग बाहेर निघतो!

दुसरी गोष्ट टकमक टोंकाची आहे. हें टोंक एका पाकळीवर एका भिंती सारख्या अरुंद कड्याचें आहे. येथें जाण्यास केवळ पायरस्ता आहे. दोन्हीं बाजूस डोळे फिरण्याजोग्या अपरंपार खोल दऱ्या आहेत. कोणी प्रत्यक्ष खालीं पाहिल्यावर त्याचे डोळे फिरून तो भोंवळ येऊन खालीं पडावयाचा व मग त्याच्या ठिकऱ्या ठिकऱ्या व्हावयाच्या हें सांगणें नकोच. हा कडा दोन्हीं बाजूंस जमिनीपर्यंत सुमारें सात आठशें फूट तरी खोल असला पाहिजे. या ठिकाणीं जाण्यासही असाच हा भयंकर मार्ग आहे पण त्याशिवाय या टोंकापर्यंत जाण्यास निदान शंभर फूट तरी चालावें लागतें. हें टोंक उत्तरेस अगदीं स्वतंत्र असल्यामुळें येथें पश्चिमेकडून समुद्रावरून वारा नेहमीं सोसाट्याचा वाहात असतो. दुपारी बारा पलीकडे अती वारा असल्यामुळें तेथें जाववत नाहीं. फक्त सकाळीं पूर्वेकडून कमी वारा पाहून जावें लागतें. तेथें जात असतां आपण अगदीं अधांत्री अशा विमानांत आहों असें वाटतें. शिवाजी महाराज हा कडा जरा अवेळी पाहण्यास आले असतां त्यांना उन्ह लागताहे असें पाहून त्यांच्या खिजमतगारानें त्यांच्यावर छत्री धरली तों एकाएकीं एकदम वाऱ्याची लाट येऊन तो त्या छत्रीसुद्धां उडाला! तेव्हां शिवाजीनें प्रसंगावधान राखून खबरदार, छत्री सोडूं नको, असें मोठ्यानें ओरडून त्यांस सांगितलें. त्याप्रमाणें त्यानें छत्री सोडली नाहीं. ही राजाची छत्री अर्थात विमानाच्या पाराचूट छत्रीसारखी मोठी होती. तिचे योगानें तो विमानांतून उतरतात त्याप्रमाणें जमिनीवर अचानक सुखरूप उतरला व त्याला विशेष इजा झाली नाहीं! असे त्यावेळचे लोक विलक्षण प्रसंगावधानी होते. जिवावरचे प्रसंग त्यांच्यावर नेहमींच असल्यामुळें या कलेंत ते अगदीं तरबेज झाले होते. ह्या टोंकाचा उपयोग बेइमानी असे राजकैदी व फितुरी यांचा कडेलोट करण्याकरितां होत असे. शिवाजीनंतर संभाजीनें ह्या ठिकाणावरून पुष्कळ लोकांचा कडेलोट केला होता. त्यांत कांहीं अत्यंत प्रामाणिक, विश्वासू व राज्याचे आधारस्तंभही होते. ते केवळ कलुशाच्या सांगण्यावरून व संभाजीच्या संशयवृत्तीवरून प्राणास मुकले! त्यांच्या स्त्रियांनीं दिलेले शाप हेच संभाजीला नडले असावे असें वाटतें. हें टोंक पाहण्यास

जाणाऱ्या जिज्ञासूनें आपला विचार व हिंमत पाहून बसत बसत किंवा रांगत एकटें जावें. खालीं पहावयाचें असल्यास निजून पहावें. कोणी कोणाला धरूं नये, हातांत कांहीं घेऊं नये. केवळ लंगोटी लावून जावें हेंच उत्तम. नाहींतर धोतरांचें व कपड्यांचें शीड होऊन मनुष्य खालीं लोटला जाईल !

ह्या किल्यावर सरकारी इमारतीच सुमारें दीडशें होत्या असें ह्मणतात. त्याशिवाय राजधानीच्या आश्रयास आलेले श्रीमंत, शेट सावकार, ब्राह्मण, मजूर, त्या काळच्या रिवाजाप्रमाणें कळवंतिणी वगैरे पुष्कळ लोक व त्यांच्या स्वताच्या इमारती, देवळें, धर्मशाळा होत्या. आतां त्यांचे कांहीं अवशेष मात्र दिसतात. संपूर्ण अशी इमारत एक जगदीशाचें मंदीर मात्र दिसतें. तें मात्र आपल्या पराक्रमानें व अहिंसेनें अद्यापपर्यंत सुस्थितींत राहिलें आहे. कारण याच्या चुनेगची दगडी भिंतीच सुमारें पांच फूट रुंदीच्या आहेत ! तें एका सावकारानें शिवाजीच्या वेळीं बांधलें असा त्यावर पुसट लेख आहे. हें दिवाकर नांवाच्या जुन्नरच्या धनाढ्य सावकारानें शके १५९५ ह्मणजे सन १६७३ च्या सुमारें बांधलें अशाबद्दल देवळाच्या पूर्वेस एक नंदीची मंडपी आहे तिच्या भिंतीवर एका दगडावर हा शिलालेख अर्धवट पुसट आहे. जिज्ञासूनें तो अवश्य पाहून सर्व लागल्यास इतिहास संशोधकांकडे पाठवावा. नगारखान्याची इमारतही अजून थोडीबहुत जीव धरून आहे. याशिवाय दारूचीं जळकीं कोठारें, पडके पाण्याचे तलाव, कुंडें, बाजारच्या इमारतींचीं जोतीं, कांहीं इमारतींचे चौथरे, व त्यांवरच्या भिंती दिसतात. धान्याच्या कोठारांतून अजून जळकें धान्य निघतें. कोठाराजवळ थोडें खणावें लागतें, ह्मणजे जळलेलें भात वर येतें. भिताडावर आतां घुबडांचें साम्राज्य चालू असून तीं कालाची विचित्र गती घूत्काराच्या योगानें सांगत बसलीं आहेत ! सर्वत्र काट्यांचें जंगल असून त्यांत जंगली लहान लहान श्वापदें, साप वगैरे किडीं यांचें तें आता आश्रयस्थान झालें आहे. जिज्ञासूनें तेथें नीट जपून जावें. कांहीं ठिकाणीं उंच कमानी दिसतात. अश्वशाला, गजशाला यांचे अवशेष दिसतात. ते सर्व नीट पाहावें. किल्यांत गेल्याबरोबर प्रथम गंगासागर तलाव व पुढें भवानीची मूर्ती दिसते. ती हातभर उंचीची आहे. पण ज्या भवानीनें शिवाजीला एवढें ऐश्वर्य दिलें, जिचें स्तवन व पूजन शिवाजी नेहमीं करी ती ही खास नव्हे. हें फार झालें तर तिचें प्रतीक असावें. आतां तेथें जवळ बोर्डाची धर्मशाळा व त्या भवानीचें देऊळ बांधीत आहेत. तिचें

अवश्य दर्शन घ्यावें. हल्लीं शिवछत्रपतींची समाधी किल्याबाहेर मागें सांगितलेल्या जगदीश्वराच्या मंदीरासमोर पूर्वेचे बाजूला चांगली बांधली आहे. त्याचें जवळच त्याच्या कुत्र्याची समाधी बांधलेली आहे. आतां ह्या समाधीचा जीर्णोद्धार करण्याकरितां श्रीमंत तुकोजीराव महाराज होळकर यांनीं पांच हजार रुपये देऊन आपली गुणग्राहकता व्यक्त केली आहे. हा कुत्रा शिवाजीच्या जिवाला जीव देणारा होता. शिवाजीचें दहन झालें हें त्यानें प्रत्यक्ष पाहिलें त्यावेळीं यानेंही त्या चितेंत उडी टाकली. तेव्हां अशा कृतज्ञ प्राण्याची समाधीही शिवाजचिे समाधीजवळ बांधून त्याच्या इच्छेप्रमाणें त्याला शिवाजींचें इहलोकीं अखंड सानिध्य मिळून परलोकीं मिळण्याकरितां तोही गेला. त्यानें त्याला इहपरलोकींही सोडल नाहीं! पशूसुद्धां अती प्रेमामुळें देहत्याग करतात. तर प्रेममय रहस्यमय अशा बायका सती जातील यांत कांहीं महत्व नाहीं. मग रामराजाच्यावेळीं सर्व आयोध्येनें शरयू नदींत देहत्याग केला, पशुपक्षीसुद्धां परत आले नाहींत असें पुराणें म्हणतात तें खोटें कसें म्हणावें? कर्तृत्ववान, तेजस्वी, शुद्ध व उदार अंतःकरणाचे मनुष्यापुढें त्याचे शत्रूसुद्धां अनन्यभावानें त्याला शरण येतात. जसजसे हे गुण मनुष्याच्या अंगांमध्यें जास्त असतात तसतसे त्याचे शत्रूसुद्धां मित्र होतात. फार काय आत्मभाव सोडून भीष्माचार्याप्रमाणें आपलें मरणसुद्धां त्याला सांगतात; मग आणखी गुह्य काय सांगणार नाहींत? महाभारत व हल्लींचा इतिहासही हेंच सांगतो. शिवाजी, बाजीराव, चिमणाजी अप्पा ह्यांचे पुढ शत्रूंच्या बायका पकडून दासी करण्याकरितां आणल्या असतां त्यांनीं त्यांना अभय दिलें व मोठ्या इतमामानें त्यांचे घरीं त्यांस परत केलें. यामुळें त्यांचे शत्रूसुद्धां मित्र झाले, असा हल्लींचा इतिहास सांगतो. असा गुणी व यशस्वी पुरुष निर्माण झाला म्हणजे त्यास सर्वांची सहानुभती मिळून त्यांची प्रीति त्यावर बसते व त्यांच्या मदतीनें व सहानुभूतीनें त्यांचें कार्य होतें. ही गोष्ट अलीकडच्या लोकमान्यांच्या चरित्रावरूनहा दृष्टीस पडते. नाहींतर मनुष्यधर्माप्रमाणें भांडणें, कलह द्वेष, मतांतरें इत्यादि गाढवांचे लाथळें चाललेंच असतें. म्हणून ह वरिष्ठ नुण आणण्याचा प्रयत्न करावा, हेंच या यात्रेवरून मला समजलें. हा किल्ला इंग्लिशांनासुद्धां अजिंक्य वाटला. शेवटच्या बाजीरावाचा जनानखाना व अवशिष्ट वैभव यावर ठेविलें होतें. पण हा किल्ला इंग्लिशांना सर करितां आला नाहीं. शेवटीं त्यांनीं तोफांचे गोळे आंत टाकण्याचा सपाटा

चालविला व भेदामुळें दारूचीं कोठारें जळालीं आणि इमारती पेटल्या तेव्हां त्यांच्या बायकांनीं पांढरा बावटा लावून अभय व सुरक्षितता मागितली व किल्ला त्यांच्या स्वाधीन केला. अशा प्रकारची जिवंत ऐतिहासिक माहिती हल्लींच्या इतिहासांत मिळत नाहीं. ती जिज्ञासूला येथें मिळते. यानंतर मी परत नातें, महाड, दासगांववरून छोट्या बोटीनें बाणकोट जवळील

## श्रीहरिहरेश्वर

बंदरीं व नंतर क्षेत्रीं आलों. बंदरापासून गांव जरा लांब आहे. सुमारें अर्धा मैल आहे. व लहान बोटीच्या स्टेशनापासून दोन मल आहे. मोठ्या बंदराजवळ जो डोंगर लागतो त्याच्या पायथ्याखालूनच डोंगरा-सच वळसा घालून गांवांत जाण्यास चांगली सडक आहे. टेकडीच्या एका बाजूस बंदर व दुसऱ्या बाजूस अगदीं समुद्र किनाऱ्यावर हा गांव आहे. हा गांव ब्राह्मणवस्तीचा असन ते बहुतेक क्षेत्रोपाध्याय आहेत. हा हबशी सरकारच्या हद्दींत आहे. हबशी सरकारची येथें एक बाग आहे.ही राजघराण्यांतलि एका बाईकरितां केली असून तींत दुमजली रम्य बंगला तयार केला होता. ही बाई असेपर्यंत याची व्यरस्था राजघराण्यास साजेल अशी तेथें होती. पुढें बाई पैगंबरवासी झाल्यावर ती ओस पडून हल्लीं तिच्या पडापडीला सुरवात झाली आहे. बागेंत नामांकित आंबे, फणस, नारळ वगैरे फळझाडें, तसेंच गुलाब, चमेली, मोगरा, सबज्या वगैरे सुंदर व सुवासिक फुलझाडांचे मोठमोठे ताटवे अद्याप आहेत. बागेचें रक्षण माळी ठेवून केलें आहे. बागेच्या मधोमध एक सुंदर पायऱ्यांची पुष्करणी केली आहे व तिला दोन रहाट लावून बागेला पाण्याचा पुरवठा केला आहे. बागेंतील फुलें विकतात व फळांचें लिलांव मुरुडास सरकारी कचेरींत होतें. येथेंही एक मार्गे तिसऱ्या भागांत श्रीरंगपट्टणाच्या टिपूच्या बागेंत सांगितल्याप्रमाणें पाण्याचें झाड दृष्टीस पडलें. झाड माडासारखें आहे पण त्याला पानें केळीसारखीं येतात! लोंगरांच्या ऐवजीं एक पोय निघते. ती थोडी कापली असतां ताडीसारखें तींतून अमृतजल निघतें. तें झाडाच्या मगदुराप्रमाणें कमजास्त निघतें. हें झाड अबिसीनिया ऊर्फ हबस देशांतील व साहारा वाळवंटांतील आहे. वाळवंटांत ईश्वरनिर्मित ही पाण्याची सोय आहे. याला जगण्याला पाण्याची आवश्यक

लागत नाहीं. हें हवेंतील ओलावा पानांच्या सहाय्यानें घेऊन उंटासारखें आपल्या पोटांत पाणी सांठवतें. याची पोय ताडीप्रमाणें वारंवार कापून त्यांतून असें पाणी निघतें. हें हबशी सरकारनें आपल्या हौसेकरितां स्वदेशाचें ह्मणून ह्या बागेंत लावलें आहे असें सांगतात.

या क्षेत्राचें स्वरूप ज्वालामुखीच्या स्फोटामुळें समुद्र मागें हटून ज्वालामुखीच्या लाव्ह्याच्या रसामुळें अग्निजन्य खडक उत्पन्न होऊन तो लावा जमिनीवर पसरून थिजल्यामुळें त्याच्या चित्रविचित्र आकृतीचा हा स्वयंभू देखावा झाला आहे. लाव्ह्याचा रस जमिनीवर पसरला त्यावेळीं जमीन खडबडीत होती. त्याप्रमाणें त्याच्या चित्रविचित्र आकृति बनल्या. पुढें समुद्राच्या लाटा त्यावर आपटून व पाऊस पडून त्यांनीं तेथील माती समुद्रांत वाहून गेली व खडकाच्या चित्रविचित्र आकृति दिसूं लागल्या. त्यांत कांहीं शिवलिंगासारख्या व विष्णुपदासारख्या दिसतात. समुद्र सान्निध्यानें याला विशेष रमणियता आली आहे, ह्मणून येथें क्षेत्राची योजना झाली असावी.

येथें स्वयंभू खडकांत एका चौकटी पिंडींत तीन लिंगें दिसतात. त्यास ब्रह्मा, विस्णु, महेश, अशीं नांवें असून शंकराजवळ एक लहान उंचवटा आहे त्यास पार्वती ह्मणतात. श्रद्धाळू व भाविक मनुष्यानें येथें तपःश्चर्या करून या देवता सिद्ध केल्या व त्यामुळें ह्यांचें महात्म्य वाढलें. मग येथें देऊळ बांधून भक्तजन येऊं लागले व त्यानीं त्याचा महिमा वाढविला. या देवतांची स्थापना भगवान अगस्ती ऋषींनीं केली अशी पुराणांतरीं कथा आहे. नंतर जवळ दुसऱ्या देवळांत काळभैरवाची मूर्ति स्थापन केली. कारण ती कृत्रिम आहे. तसें गणेशाचें देऊळही कृत्रिमच आहे. येथें 'जवळच देवळाला लागून दोन टेंकड्या आहेत. त्यासुद्धां हरिहरात्मकच मानतात व त्याची प्रदक्षणा करितात. या डोंगराच्या पायथ्यांशीं खालीं समुद्रासन्निध एक गोड पाण्याचा झरा आहे. तीच गंगा व ती समुद्राला मिळाल्यामुळें हा गंगासागर संगम होऊन तें स्नानकरण्याचें अति पवित्र स्थळ झालें आहे. त्याला शुक्लतीर्थ असें ह्मणतात तेथें जवळच खडकांत मनुष्याच्या पावलाच्या आकाराचें पण जरा मोठें पाऊल उठलें आहे. हें फूट सवा फूट लांबीचें असेल. बारीक मातमिध्यें जसें मनुष्याचें खोल पाऊल उमटलेलें दिसतें तशासारखं हें दिसतें. हें गयेच्या विष्णुपदासारखेंच आहे पण जरा मोठें आहे. याबद्दल पौराणिक महात्म्य,

पुढें दिलें आहे. हें विष्णुपद समजून ज्यांना मातृ किंवा पितृगयेला जाण्याचें सामर्थ्य नसेल ते येथें पिंडदान करून आपल्या पितरांचा उद्धार करितात. हें सर्व एका सपाट खडकावर आहे. हा खडक उधानाचे वेळीं बुडतो. अष्टमीचे भांगाचे वेळीं सूर्यास्तीं येथें बसून समुद्राचें वैभव व येथील सृष्टिसौंदर्य बघण्याची मोठी बहार आहे. आणि हाच येथील मुख्यतः तीर्थमहिमा आहे. धार्मिक तीर्थविधीचें वर्णन पुढें आहे.

हा खडक त्या टेकडीचे भोंवतीं समुद्रकांठीं सुमारें पंचवीस तीस फूट रूंदीचा अगदीं सपाट पश्चिमाभिमुख असा पसरला आहे. त्यावर रांगोळीवजा निरनिराळ्या खडकांच्या आकृति बनल्या आहेत. उजवेकडील डोंगरांत अग्निजन्य खडकाची अकृत्रिम (स्वयंसिद्ध) कोरीव लेण्याची आकृति समुद्राच्या लाटांनीं नेहमीं धुऊन स्वच्छ ठेविल्या आहेत. डावीकडे अपरंपार समुद्र पसरलेला आहे. त्यावर त्याच्या बाललाटा हांसत खेळत आहेत. ह्या लाटा अगदीं खडकाच्या जोत्याला टकरा देत असतात. त्यावर अस्ताचे सूर्यकिरण पडून कितीतरी रंगाचे आकाशाचे व समुद्राचे देखावे दिसतात. कांहीं गलबतें आपल्या डोक्यावर शिडाच्या ध्वजा फडकावीत गजगतीनें चाललीं असतात. मधुनच एकादी आगबोट तोऱ्यानें पाणी उडवीत व धूर सोडीत चालली असते. हा सर्व चमत्कार पाहाण्याकरितां मोठमोठे जलचर मधून मधून पाण्यावर डोकें काढून पहात असतात. फार वेळ पाहाण्याला त्यांना हुकुम नाहीं, ह्मणून निरूपायानें ते पाण्यांत बुडी मारतात. असें त्या काळाचें व स्थळाचें कितीतरी निरुपमेय वर्णन देऊन मनरंजन करतां येईल. पण ही कादंबरी नव्हे ह्मणून सावध होऊन हें नुसतें दिग्दर्शन मात्र केलें आहे. जिज्ञासूनें हा आस्वाद अवश्य घेऊन आपुल्या मनाचें कौतुक पुरवावें. मात्र मोठी भरती असतांना जाऊं नये. कारण एकदम पाणी भरून मनुष्य दगडाच्या कपारींत जाऊन मरेल! कारण त्यास चटकन बाहेर निघण्यास जागाच नाहीं. समुद्र स्नानसुद्धां जपून करावें. लाट येईल तेवढीच घ्यावी. नाहींतर लाटेबरोबर मनुष्य आंत ओढला जाईल!! किंवा बाहेर दगडावर आपटून दुखावेल ह्मणून मुद्दाम सूचना केली आहे.

धार्मिक दृष्टीनेंही हें देवस्थान फार कडक असून तेथें भुतें, खेतें, संमंध हे पळतात; तसेंच महाव्याधीचे वगैरे अंगरोगही दुरुस्त होतात, अशी याची

ख्याती आहे. हें सावित्रीच्या मुखाजवळ असल्यामुळें तीर्थ व क्षेत्रही झालें आहे. येथें पितृकार्य, देवकार्य, व शुद्धिकार्य हीं तिन्हीं होतात. ह्मणून लोक येथें और्ध्वदेहिकाकरितां, मंगल स्नानाकरितां, पूजेकरितां व कोणत्याही पर्वणीला स्नानास येथें येतात. जामदग्न्य रामाला ह्मणजे परशुरामाला हें स्थान फार आवडलें. त्यांनीं आपलें महापराक्रमाचें व दगदगीचें अवतार कृत्य पूर्ण केल्यावर प्रथम ते येथेंच तपःश्चर्येला आले. ह्यासंबंधानें स्कंधपुराणांत सह्याद्री खंडांत ह्या हरिहरेश्वर क्षेत्राचें मोठें महात्म्य सांगितलें आहे. त्यांतील कांहीं महत्वाचे श्लोक पुढें देत आहें.

अधुना मम चित्तस्य पावनं क्षेत्रमस्तु तत्
अत्र विप्रा ब्रह्मविदो नाम्ना तेन महोज्ज्वलाः

अध्याय १ श्लोक ८८

जामदग्न्य रामाला हें स्थान वर लिहिल्याप्रमाणें फार आवडलें. त्याचें चित्त येथें रममाण झालें. ह्मणून त्यानें ह्या प्रांताला व क्षेत्राला चित्तपावन असें नांव दिलें; येथील ब्राह्मण ब्रह्मज्ञानी व तेजस्वी अशी प्रख्याती त्यांना दिसली. यामुळें रामानें त्यांना चित्तपावन (स्थ) असें देशवाचक व गुणवाचक नांव दिलें. पुढें याला कोंकण ह्मणूं लागले. ह्मणून चित्तपावन (स्थ) याचें भाषांतर कोकणस्थ असें झालें. म्हणजे चित्तपावन व कोकणस्थ हे दोन्ही शब्द समानार्थक असे इतरांप्रमाणें देशवाचक व गुणवाचकच आहेत.

उभावात्मशयावात्मरूपावात्मैवकेवलौ
यदा तदांतर्दधाते तत्रावाद्यापि संस्थितौ

अध्याय १ श्लोक ९४

श्रीगुरूदत्तात्रेय परशुरामाचा शोध करीत असतां त्यांना येथें ते तपःश्चर्या करीत बसलेले आढळले. परशुरामानें ह्या पुण्यक्षेत्राचें वर्णन केल्यावर दत्तांनासुद्धां तें पटून ते उभयतां एकरूपच असल्यामुळें त्यांचा येथें अद्यापर्यंत आत्मस्वरूपानें वास आहे.

तच्चित्तपावनं क्षेत्रं लोके ख्यातिमगात्तदा
तस्य दर्शनमात्रेण चित्तं पूतं भवेत् क्षणात्

अ. १ श्लो. ९६

असें ह्या प्रदेशाचें चित्तपावन असें परशुरामानें नांव ठेविल्यामुळें हा प्रांत चित्तपावन ह्या नांवानें पुढें प्रख्यातीस आला.

तत्र तीर्थान्यनेकानि येषु स्नानात् सदोज्ज्वला:
जना. पापौघमाहृत्य यांति योगगतिं परां ॥ ९७ ॥
तत्र क्षेत्रं भार्गवारामं मूलभूतं जन: स्थिते:
अत: संक्षेपतो राजन्नुक्तं तीर्थं कथांतरे ॥ ९८ ॥

भार्गवरामाला क्षेम देणारें हें क्षेत्र लोकांच्या योगक्षेमाला मूलाधार आहे, असें राजा दिलीपाला वसिष्ठऋषींनें सांगितलें. योगक्षेमाला हें मूल आधारभूत आहे. म्हणजे मुख्य धान्य तांदूळ येथें पुष्कळ पिकतो.

एक: पर्वतरूपेण द्वितीयो लिंगरूपधृक्

अ. २ श्लोक १८

येथें हरी पर्वतरूपानें व हर लिंगरूपानें वास करतो आहे असें म्हटलें आहे.

एवं चरंतौ कालेन लोहाद्रौ षण्मुख:पर:
दृष्टौ विश्रामयित्वा तौ स्वाश्रमे विदधेऽर्हणं

अध्याय ३ रा श्लोक ८

पुढें हा महिमा ऐकुन येथें षण्मुख ( कार्तिक स्वामी ) आले. त्या कार्तिकस्वामींच्या समाचाराला अगस्ति व लोपामुद्रा ह्या लोहाचलावर आले होते. त्यांचा तेथें स्वामींनीं उत्तम सत्कार करून पुढें ते सर्व येथें हरिहरांच्या दर्शनास आले.

यत्र ज्ञानाय गायत्री सावित्री भूतयेस्थिता
गंगाद्वयसमायुक्तं ब्रह्मकुंडं जगत्रये

अ. ६ श्लो. १०

ज्ञान देणारी गायत्री व संपत्ती देणारी सावित्री ह्या दोन गंगांनीं युक्त असें हें ब्रह्मकुंड जगत्रयांत प्रसिद्ध आहे.

काशीवासोऽत्र विश्वेशो द्वारका यत्र माधव:
प्रयागं यत्र वै देवत्रयं यत्र त्रयं तत:

[illegible]

जेथें विश्वेश्वर असेल तीच काशी, माधव असेल तीच द्वारका व तिन्ही देव असतील तीच प्रयाग.

ह्या हरिहर क्षेत्रांत केवळ हरिहरांचाच वास नसून ईशान, (ब्रह्मदेव) परशुराम, दत्त, स्कंध, अगस्ती, लोपामुद्रा, गायत्री, सावित्री व कृष्णा या त्रिगुणात्मक नद्यांचाही संगम आहे.

**एकं पदं गयायां तु मक्कायांतु द्वितीयकं**
**तृतीयं स्थापितं दिंव्यं मुक्त्यै शुक्लस्य सान्निधौ.**

अ. ७ श्लो. ६

पितरांना मुक्ति मिळावी ह्मणून विष्णूनें एक पद पितृगयेंत दिलें, दुसरें मक्केंत व तिसरें येथें श्रीहरिहरेश्वरास शुक्लतीर्थाजवळ ठेविलें आहे. यांतील मक्का कोठली ? अरबस्थानांतील कीं काय ? ह्मणजे आर्यांची कर्मभूमि अरबस्थानापर्यंत होती असें दिसतें आणि हें असणें अशक्य नाहीं. कारण भारतवर्षीय प्राचीन छपन्न देशांची मर्यादा आफ्रिकेंतील मिसर म्हणजे हल्लींच्या इजिप्त देशापर्यंत होती. पुढें हे देश बाटले, ह्यामुळें कर्मभूमीची मर्यादा सिंधूनदीपर्यंतच आली. किंवा हिंदुस्थानांत दुसरी कोठें मक्का आहे सांगतां येत नाहीं. पण तसें प्रख्यात ठिकाण कोठें दिसत नाहीं. अरबस्थानांतलि मक्का ह्या पवित्र स्थानीं नानक वगैरे मंडळी गेली होती, व तेथें एक शिवालय होतें अशीही दंतकथा आहे.

**अत्र यद्दीयते दानमनुरप्यत्र जन्मनि,**
**कुलं तारयते सद्यो दशपूर्वान् परान् दश.**

अ. ७ श्लो. १०

ह्या विष्णुपदीं अगदीं थोडें दान दिलें तरी पुढलि जन्मांत तें कुलाचें तारण करितें. त्याच्यायोगानें पूर्वीच्या दहा व पुढील दहा पिढ्या उद्धरतात. पितृगयेच्या संकल्पांत अकरा उद्धरतात असें ह्मटलें आहे.

**बहिस्तः संवृतासूनां परमानंदरेक्षया**
**तर्पणं प्रत्यहं कुर्यात् गृहस्थो भार्यया धिया.**

अ. ११ श्लो. १०१

बाह्य वस्तूपासून आवरलेल्या प्राणांना परमानंदाचा अनुभव मिळावा ह्मणून गृहस्थानें नेहमी येथें तर्पण करावें.

**चित्तमेव मठं कृत्वा प्रकृतिं बहिरावृतः**
**कोऽपि स्वालयमास्थाय प्रतीस्यार्चयतं यतिः**

अ. १२ श्लो. २२

आपल्या चित्ताचा मठ करून प्रकृतीला त्यांतून बाहेर काढलें ह्मणजे कोणताही गृहस्थ घरांत राहूनही व्रती व यती होऊं शकतो.

या परशुराम क्षेत्राचा विस्तार आरंभ गोकर्णमहाबळेश्वर व शेवट सोरटी सोमनाथ व मध्य कनकेश्वर असा ह्यांत दिला आहे.

ह्या एकंदर वर्णनावरून परशुराम क्षेत्र भूकंपामुळें समुद्र हटून झालें असावें असें दिसतें. कारण येथें तद्दर्शक अग्निजन्य खडक आहेत. आतां परशुराम हा परमेश्वराचा अवतार मानल्यामुळें त्याच भूकंपाला परशुरामाचा बाण असें ठरवून त्या बाणांनीं ही भूमि निर्माण झाली असें ठरविलें. व परशुराम अवतार कृत्य संपल्यावर आपला राग टाकून शांत चित्तानें तपश्चर्या करण्याकरितां येथें आले. व येथें आल्यामुळें त्यांचें चित्त ह्या ठिकाणच्या समुद्र सान्निध्यानें रममाण झालें व त्यांच्याबरोबर जे ब्राह्मण आले तेही येथेंच राहिले ह्मणून त्यांस इतरांप्रमाणें चित्तपावनस्थ किंवा कोंकणस्थ अशीं नांवें मिळालीं. सारांश परशुरामाचें चित्त येथें रममाण झालें व त्यानें ह्या प्रांताला चित्तपावन नांव दिलें. तेथील हे ब्राह्मण ह्मणून त्यांना चित्तपावन असें देशस्थ कऱ्हाड्यां-प्रमाणें देशवाचक नांव मिळालें आहे. बाकीचा कोकणस्थांबद्दलचा मजकूर भाग तीनमध्यें माहुरच्या यात्रेंत आलाच आहे. येथून बाणकोट व त्याचेजवळ नाना फडणीसाचें जन्मस्थान वेळास व पेशव्यांचें आदिस्थान श्रीवर्धन व त्यांचा वाडा हीं ऐतिहासिक स्थळें, वेळ असेल त्यानें जरूर पाहून यावीं.

यापुढें रत्नागिरी जिल्हा म्हणजे अस्सल कोंकण लागतें त्याची विशेष हकीकत समजल्याशिवाय इकडील यात्रांचें रहस्य समजणार नाहीं सबब त्याच्या महत्वाच्या गोष्टींचें दिग्दर्शन करूं. ह्या जिल्ह्याची भूरचना डोंगराळ व खडकाळ आहे यामुळें व सह्याद्री सान्निध्यामुळें दक्षिण समुद्रावरून आलेल्या ढगांना येथें प्रतिबंध होऊन ते येथें कोसळतात यामुळें येथें पाऊस सर्वांत जास्त म्हणजे दीडशें ते तीनशें इंचांपर्यंत कधीं कधीं पडतो. हा पाऊस सह्याद्री व हे डोंगर यांचेमध्यें मुरून त्यांतून सतत वाहणारे पाट कांहीं ठिकाणीं निर्माण झाले आहेत. सह्याद्री अगदीं जवळ असल्यामुळें मोठी नदी एकही नाहीं. खाड्या मात्र पुष्कळ आहेत. मुलूख खडकाळ व चढता होत गेल्यामुळें समुद्राचें खारें पाणी जमिनींत मुरून त्यानें वरील पाणी दूषित होत नाहीं. पाणी अगदीं आकाश गंगेप्रमाणें निर्दोष असतें यामुळें येथील लोकांना समुद्राची खारी हवा

व आकाश गंगेचें ह्मणजे झऱ्याचें किंवा पाटाचें अगदीं शुद्ध निर्दोष पाणी यांचा मुबलक पुरवठा होतो. आरोग्याच्या ह्या निसर्गसिद्ध सोयींमुळें ह्या ठिकाणीं मलेरियासारखे दुष्ट व घातक रोगाचें बीजच नाहीं. अर्थात वात, पित्त व कफ यांच्या दोषांस येथें थाराच मिळत नाहीं. मनुष्याला तेजस्वी व दीर्घायुषी होण्याला ह्यासारखी हवापाण्याची सोय साऱ्या हिंदुस्थानांत कोठेंही नाहीं. येथें खडकामुळें जमीन नाहीं, यामुळें येथें अन्न पैदाच होत. नाहीं. कसलें तरी राकट अन्न होतें. येथें जें अन्न उत्पन्न होतें तें त्या लोकसंख्येला वर्षांतून दोन महिनेसुद्धां पुरेसें नसतें. अर्थात बाहेरील अन्नाचा दहा महिन्यांचा पुरवठा व्हावाच लागतो. देशांत ह्मणण्यासारखें उत्पन्न नाहीं यामुळें लोक भिकारी अर्थात त्यांना मिजास चैन कांहीं नाहीं. इतकेंच नव्हे तर इतर देशांतून रंगून तांदुळासारखें भिकार अन्नच त्यांना मिळतें. तरी पण चांगल्या हवा-पाण्यामुळें त्यांना तें पचून लोक अती काटक व तीव्र बुद्धीचे निर्माण होतात. इतकेंच नव्हे तर एथील लोक उदरनिर्वाहास व कांहीं कायमचसुद्धां बाहेर जातात. तरी येथील लोकसंख्या महाराष्ट्रांतील इतर जिल्ह्यांपेक्षां सर्वांतच जास्त असते! ह्या श्रेष्ठ हवापाण्याचा परिणाम केवळ येथील मनुष्यांच्या वृद्धीवरच व त्यांच्या तेजस्वीतेवरच होतो असें नाहीं, तर सर्व प्राणिमात्र व वनस्पति यांजवरही होतो. येथील मुंग्या, डोंगळे, विंचू, साप, वगैरे विषारी प्राणी इतर ठिकाणांपेक्षा फारच तीव्र विषाचे असतात. त्याचप्रमाणें गाय, जनावरें, ऊंस, फणस, आंबे वगैरे फळें इतर ठिकाणांपेक्षां फार तेजस्वी असतात. यामुळेंच रत्नागिरीच्या वनस्पती गुणाला जास्त उतरतात. हापूसचा आंबा सर्वांत श्रेष्ठ आहे. पण तो गांवें साष्टीपेक्षांसुद्धां रत्नागिरीचा हापूस गोडीला व चवीला श्रेष्ठ असून तो त्यापेक्षां फार टिकाऊ आहे. याचा रस आटवून व्यवस्थेनें ठेवल्यास तीन चार वर्षे सहज टिकतो हें मी प्रत्यक्ष अनुभविलें आहे. गुदस्तां आंबा अलोट आला पण यंदा (१९२६) मुळींच नाहीं. पण गुदस्तांचा आटवलेला रस मला येथें अगदीं ताज्यासारखा लागला ह्मणून मी त्याच्या वड्याच इकडील यात्रांचा प्रसाद लोकांस देण्याकरितां व ही माहिती सांगण्या-करितां घेतल्या. व पुढें तो २।३ वर्षे नमुन्याकरितां ठेविलाही होता. तरी तो बिघडला नाहीं. देशावरच्या मावळे लोकांत शक्ति जास्त, पण कोंकणच्या हेटकरी लोकांत युक्ति, तडफ व काटकपणा जास्त आहे. इंग्रज लोक स्वाभि-

मानाकरितां जशी आपली बायको विलायतेस प्रसूतीकरितां पाठवितात तशी आपली प्रजा तेजस्वी व काटक होण्याकरितां महाराष्ट्रीयांनीं आपल्या बायका बाळंत होण्याकरितां रत्नागिरी जिल्ह्यांत पाठवाव्या. इतकेंच नव्हे तर मुलांचें शिक्षण होईपर्यंत त्यांससुद्धां तेथें शक्यतर ठेवावें. ह्मणजे त्यांच्या आंगीं रत्नागिरी जिल्ह्याचे विशिष्ट गुण व सामर्थ्य येईल. कोंकणस्थांची ही जन्मभूमि असल्यामुळें त्यांनीं आपलीं मुलें येथें जरूर पाठवावीं, ह्मणजे त्यांच्या मूळ गुणांचा लोप होणार नाहीं. कांहीं वनस्पती व जनावरें आपल्या जन्मभूमीवर आपोआप वाढतात. त्यांना लावावीं सुद्धां लागत नाहींत किंवा प्रयत्न करावा लागत नाहीं. मग मशागत कोठली? तसा रत्नागिरी जिल्हा हा मनुष्याच्या उत्पत्तीला आदिकारण आहे, असें परशुरामानें सुद्धां हरिहरेश्वर महात्म्यांत सांगितलें आहे.

तत्क्षेत्रं भार्गवारामं मूलभूतं जनस्थितेः

ह्मणजे हें भार्गवराम क्षेत्र लोकांच्या उत्पत्तीला, तेजस्वितेला व योगक्षेमाच्या जीवनाला मूलाधार आहे. ह्मणजे येथें त्यांच्या जीवनाला कांहीं प्रयत्न करावे लागणार नाहींत. येथें उपजीविकेकरितां कांहीं खा, तें पचतें. बाधत नाहीं किंवा रोग होत नाहीं. मनुष्याला औषध नको, पाणी नको, कसलें तरी जाडे-भरडें अन्न व एखादें फाटकें तुटकें वस्त्र असलें ह्मणजे झालें. मनुष्याची संतती येथें अक्लेश होऊन ती जोरानें वाढते. इतकेंच नव्हे तर तेजस्वी, राकट व अगदीं असामान्य अशी उत्पन्न होते. इतर ठिकाणीं संततीचे रक्षणास व वाढीस कितीतरी प्रयत्न करावे लागतात. दवाखानें, इस्पितळें, रुग्णालयें, तालमेचे आखाडे, शिशुसप्ताह, बालवीर संस्था, वगैरे कितीतरी प्रकार करावे लागतात आणि इतकें करूनही बालांचें व तरूणांचें मृत्यूचें व रोगाचें प्रमाण वाढून दीर्घायुष्य तर राहिलेंच, पण तरूणपणासुद्धां सुखानें उपभोगतां येत नाहीं! याचें कारण इतर देशांचें हवापाणी या देशाइतकें मनुष्यजन्मास निसर्गतः उपयुक्त नाहीं, हेंच आहे. औषधानें जे रोग बरे होत नाहींत असे हट्टी रोग विशेषतः क्षयी लोकांनीं येथें येऊन आपली अक्लेश सुधारणा करून घ्यावी अशी शिफारस करण्यासारखें येथील हवापाणी आहे, यांत शंका नाहीं. आतां

## या प्रांतांतील लोकांची राहाणी

ही खरोखरच ऐकण्यासारखी आहे ह्मणून तिचें थोडें दिग्दर्शन करूं. त्या योगानें पूर्वीच्या ऋषींच्या आश्रमाची ओळख होईल. रत्नागिरी जिल्ह्यांत

शहरें फार थोडीं आहेत आणि त्यांतील घरें एकमेकाला लागून नाहींत. क्वचित बाजारपेठेंत अशीं जवळजवळ घरें आढळतात. नाहींतर येथील प्रत्येक घर एका वाडींत, तिचें संरक्षण करण्याकरितां बांधिलें असतें. गांवठण ह्मणून स्वतंत्र नाहीं. यामुळें एका गांवीं पन्नास जरी घरें असलीं तरी त्या गांवचीं लांबी सहज एक मैल होते. यामुळें गांव असा जथाबंद दिसतच नाहीं. एका गांवांतून दुसऱ्या गांवीं जावयाचें असलें ह्मणजे बहुधा खाडी किंवा डोंगर उतरावा लागतोच. घराभोंवतालच्या वाडीमध्यें प्रापंचिक वस्तूंचे सर्व प्रकार असतात. एखादें भातशेत, नारळी, पोफळी, आंबे, फणस व भाजीचे मळे, इतके प्रकार हे असावयाचेच. ही ह्या झाडांची जन्मभूमी आहे. येथें यांचें अक्लेश उत्पन्न होतें. खताची जरूर नाहीं. आणि ह्या सर्वांना पाटाच्या पाण्याचा किंवा विहिरीच्या पाण्याचा पुरवठा असावयाचाच. याशिवाय आव-डीचीं झाडें निराळीं. उन्हाळे दिवसांत फणस येऊं लागले, ह्मणजे गरीब लोक त्यांची भाजी शिजवून नुसती मीठ मिरची लावून अन्नाऐवजीं खातात ! भात अगदीं थोडा, भाजी ही भाता ऐवजीं खाऊन तांदूळ पावसाळ्याकरितां ठेवून फणस संपेपर्यंत त्यांच्यावरच ते गुजारा करितात ! फणसाची भाजी हें अन्न व त्यांतील आठ्या यांचा भाजीप्रमाणें उपयोग होतो. कसातरी तांदूळ वाचवून दोन तीन महिने यावर निर्वाह करतात ! ! तो त्यांना कांहीं बाधतही नाहीं उलट शक्ति मात्र जोराची येते.

मुलांनीं पहाटेस उठून शौचविधी उरकून वाडींतील फुलें, दुर्वा, बेल खुडून शाळेंत जावें. शाळा नसल्यास दहा वाजेपर्यंत पोथी ह्मणत बसावें. मुलींनीं शौचाविधी वेणीफणी करून, स्नान करून घरांत पाटाचें किंवा रहाट चालला असेल तेव्हां पाणी भरावें. लहान मुलींना कडेवर व हातांत घागरी घेऊन पाणी आणतांना पाहिलें ह्मणजे मोठें कौतुक वाटतें. त्यानीं केरवारा करावा. मोठ्या बायकांनीं गाईचीं दुधें, दळण, कांडण, शेणगोठा, झाड सारव, व बागेंतील सर्व झाडांना यथाविभाग शिंपणें करावें. हें पाट चाललेला असतो त्याचें करि-तात. किंवा रहाटावर हें चालतें. बाग मोठी असल्यास एक गडी असतो किंवा घरांतील काम बायका करून हें काम मुली करितात. शिंपणें केल्यावर मळ्यां-तील कसली तरी भाजी आणतात. घरांत एक ह्मातारी बाई असते तिनें जेवण करावयाचें. मुलींनीं लहान मुलामुलींचीं जेवणें, त्यांचीं उष्टीं खरकटीं व पाणी

तापऊन त्यांच्या आंघोळी घालणें हीं कामें करावीं. पाणी तापवितांना लांकडें किंवा गोवऱ्या लावावयाच्या नाहींत. पाल्यापाचोऱ्यावरच पाणी तापवावयाचें. अशा रीतीनें त्यांच्या आयांना मुलांकडे कांहीं पहावें लागत नाहीं! कोठें कांहीं बिघडेल तेव्हां तिनें पहावयाचें. मुलींनीं इतकें करून सुद्धां आपल्या आई-बापांच्या कामाला वयपरत्वें मदत केली पाहिजे!!!

जेवण झाल्यावर थोडी विश्रांति घेऊन लगेच बागेच्या कामास लागावयाचें. भात्याचें उन्हाळीं पावसाळीं शेत असल्यास त्याची मशागत, नारळीचे पडलेले झांप विणणें, हीर काढून केरसुण्या कारणें, नारळाचीं चोडें कुजत घालून तीं कुटून त्यांचे तंतू सुटे करणें, नंतर त्यांच्या वळ्या करून सुंभ विणणें हीं त्यांचीं कामें सुरू होतात. यांपैकीं वळया विणण्याचें काम अगदीं लहान चार वर्षांच्या मुलीसुद्धां हौसेनें करितात. सुंभ मात्र मोठ्या बायका किंवा पुरुष विणतात. आंबे, फणस, नारळ, सुपारी, सुंभ हे पदार्थ घराला पुरून विकण्यासारखे असतात ते विकतात. शहरांत लोक बाजारचे घाणेरडे पदार्थ खातात त्यापेक्षां हें खाणें कितीतरी पटीनें चांगलें व सुखदायक आहे. हे पदार्थ कसे विकावयाचे हें घरच्या यजमानानें सांगितलें असतें त्याप्रमाणें कोणीही ते विकून आलेले पैसे नियमित ठिकाणीं ठेवितात. लवाडी, लुच्चेगिरी कांहीं नाहीं. पेटीला कुलूपसुद्धां नाहीं. बाजार फक्त मोठ्या मुलानें किंवा पुरुषानें करावयाचा. इकडील व्यवहार बहुतेक वस्तूंच्या देवघेवीवरच चालतो. पैसा क्वचित परदेशाच्या वस्तूबद्दल द्यावा लागतो. लाकडांची मोळी, गवताची मोळी वगैरे स्थानिक वस्तु नारळ, फणस, झाप, सुंभाचें वळें यांवरच मिळतात. गड्याना मजुरीसुद्धा तशीच कधीं कधीं देतात. असें सर्व काम अगदीं रेखल्यासारखें व सुरळीत बिनतक्रार चालतें.

हीं घरें, त्यांचीं अशीं नियमित व निर्मत्सर कामें व वेदघोष हीं पाहिलीं ह्मणजे पूर्वीच्या ऋषींच्या आश्रमांची आठवण होते. कामाच्या माऱ्यामुळें राग, लोभ, द्वेष, आवड, प्रीति व प्रेम करण्यास सवडच नाहीं! सर्वत्र अगदीं शांतता व जो तो आपापल्या कामामध्यें गढलेला असतो. पाहुण्यापाशीं क्षणभर बोलण्याला सुद्धां त्यांस सवड नसते. घरांत विटाळशी, बाळंतीण, किंवा अगदीं वृद्ध यांशिवाय रिकामें कोणी नाहीं. वृद्धांनासुद्धां लहान लहान मुलें कडेवर घेऊन किंवा त्यांना खेळवून देखरेखीचें काम करावें लागतें! त्यांनीं गड्यावर देखरेखीकरितां सकाळ संध्याकाळं फिरलेंच पाहिजे. बसतां

क्षमा नये. येथील सर्व मंडळी दीर्घायुषी असतात. इतकेंच नव्हे तर ऐशीं ऐशीं वर्षांची मंडळी केवळ तरुणाप्रमाणें उत्साही दिसतात ! मी बंदरांत उतरल्यावर एक म्हातारा ब्राह्मण गाडीवान मोठमोठीं हमालासारखीं ओझीं उचलून आपल्या गाडींत टाकीत होता. त्याची गाडी भरल्यावर त्यानें मला गाडींत बसविलें. इतक्यांत त्याचा बैल सुटला. तो धावूं लागला पण ह्या बहाद्दराची धांव त्याचे पुढें जाऊन त्यानें त्याला पकडून आणिलें व दोन फटके जास्त देऊन गाडीला जोडलें !!! आमची गाडी अपरात्र झाल्यामुळें कांहीं दिसत नव्हतें तरी चालत होती. गाडींत बसल्यावर मी त्या गाडीवानास विचारिलें तुमचें वय काय ? तो ह्मणाला शायशीं वर्षें पूर्ण झालीं आहेत ! तेव्हां मला आश्चर्य वाटलें. व त्यास पुन्हां तोच प्रश्न विचारला तेव्हां त्यानें सांगितलें तुह्माला माझें टिपण देऊं का ? यांत आश्चर्य कसलें ? नव्वद पंचाण्णव वर्षांची मंडळी अजून चेंडूसारखी उडत आहेत ! त्यांचा एकही केस पांढरा झाला नाहीं. इतकेंच नव्हे तर त्याचा कोणताही अवयव किंवा कान, नाक, तोंड, डोळे यांपैकीं कोणतेंही इंद्रिय तरुणाप्रमाणें अगदीं तेजस्वी आहे. अर्थात मन हें तेजस्वी आणि उत्साहजनकच असतें. आमच्या कडील तरुणांना वृद्ध ह्मणून घेण्यांत भूषण वाटतें व इकडील वृद्धांना तरुण ह्मणून घेण्यांत भूषण वाटतें. इकडील वृद्धांना तरुणांनीं कदाचित् वृद्ध ह्मटल्यास त्यांना राग येऊन ते ह्मणतात मला ह्मातारा ह्मणतोस काय ? तर मी तुझें मनगट धरितों तें सोडतोस काय ? युरोपांत ( इंग्लंडांत ) सुद्धां वृद्धांना वृद्ध ह्मणून घेण्याची लाज वाटते. याची लाज आमच्या तरुणांना पाहिजे. सारांश इकडील सर्व मंडळी अखेरपर्यंत ह्मणजे मरेपर्यंत तेजस्वी असते. त्यांच्या मनाला व शरीराला थकवा कधीं येतच नाहीं. लो. टिळकांचें उदाहरण जगापुढें आहेच. आमरणांत त्यांचा राष्ट्रीय प्रश्नाविषयीं वाद चालला होता आपण आजारी असून आपला काल अगदीं जवळ आला आहे व शेजारीं बसलेली मंडळी आपल्या समाचारास आली असून वादविवाद करण्याकरितां आली आहे ह्याची जाणीव त्यांच्या शरीराला व मनालाही नव्हती. इकडे मंडळीचे औषधोपचार चाललेच होते ! इतके ते देहातीत व योगी, स्थितप्रज्ञाप्रमाणें महाज्ञानी व महासाधु होते खरे. त्यांचा जन्म रत्नागिरीचाच होता तरी त्यांना विद्येशिवाय व्यसन नव्हतें. अलीकडच्या तरुणांचें यांच्या उलट ह्मणजे विद्येच्या

किंवा विचाराचे नांवानें शून्य व व्यसनांची रेलचेल ! ह्मणजे हा फरक केवळ हवेचा नसून व्यसनें, मिजास व पाश्चात्यांचे दुर्गुणी अनुकरण यांतच विशेषें-करून आहे. याबद्दल खुलासेवार वर्णन माझ्या कौटुंबिक आरोग्याचे पुस्तकांत करावयाचें आहे. इकडील मनुष्यांची इतकी उत्कृष्ट प्रकृति असण्याचें मुख्य कारण त्यांना जन्मापासून रोग असा माहितच नाहीं. आणि इकडील मंडळी जन्मापासून रोगी ! रोगानें खाल्यामुळें त्यांचीं सर्व शरिरें निस्तेज दिसतात. त्यांना तारुण्य,. उत्साह किंवा रग मुळींच नसते. ते व्यसनांत गढलेले असतात. रत्नागिरी जिल्ह्यांत व्यसनें मुळींच नाहींत. अती मोठें व्यसन ह्मणजे सुपारी किंवा तंबाखू खाणें या पलीकडे कांहीं नाहीं. "हात फिरे तेंथे लक्ष्मी फिरे" व "तोंड फिरे तेथें अवदसा फिरे" ही गोष्ट रत्नागिरी जिल्हा व इतर जिल्हे यांस अनुक्रमें लागू आहे. रत्नागिरी जिल्ह्यांतील लोकांचे हात फिरतात ह्मणजे ते कामें करितात व इतर जिल्यांत कामेंच होत नाहींत. सर्व कामें मोलमजुरीनें करून घ्यावयाचीं, मग नवरा बायको दोन माणसें असलीं तरी भांडीं घासण्या-पासून मजूर असतो. अर्थात रिकामीं तोंडें घेऊन मन वावरत असतें ! बोला-चाली होते पुढें भांडणें होतात. आप्तद्वेष, धर्मलंडपणा, ख्यालीखुशाली व खाते-पिते रोग वगैरे पुढचें अध्याय सर्वांना ठाऊकच आहेत. !!! आतां रत्नागिरीचे लोक भांडखोर कमी आहेत असें नाहीं. ते वाऱ्याशींसुद्धां भांडणारे आहेत आशी त्यांची प्रख्याती आहे. पण इतरांच्या भांडणांत व यांच्या भांडणांत फरक आहे. इतरांचीं भांडणें सुख व चैनीकरितां व मुख्यतः बायका मुलांवरून होतात. पण यांचीं हक्काकरितां, पोटाकरितां व पैशाकरितां असतात. हे पैशाकरितां इतके बिनमोल श्रम करितात कीं, तितक्याच श्रमानें त्यांना इतर ठिकाणीं चौपट पांचपट पगार मिळतो, यामुळें रत्नागिरी जिल्ह्यांतून. निघालेलीं कुटुंबें पुन्हा रत्नागिरी जिल्ह्यांत जाण्याची इच्छा सहसा करीत नाहींत. रत्नागिरी जिल्ह्यांत पैसा पोटाकरितां मिळवावा लागतो इतर देशांप्रमाणें चैनीकरितां नव्हे. यामुळें रत्नागिरी जिल्ह्यांत चैनीची एकही वस्तु मिळत नाहीं. नाहीं ह्मणाला आतां येथें चहा मात्र फाराच बोकळला आहे हें त्यांचें दुर्दैव आहे. मुंबईचे लोक त्यांच्याकडे वारंवार पाहुणे ह्मणून येऊं जाऊं लागल्यामुळें त्यांच्याकडे याचा प्रसार होत चालला आहे व त्याचा अनिष्ट परिणाम आमच्या पिढीवर होत चालला आहे, असें तेथील लोक आतां ह्मणू लागले आहेत.

मुंबई नजीकच्या प्रांतांत ह्मणजे दापोली, खेड, वगैरे तालुक्यांत सोंवळें ओवळें व धार्मिक भावना कमी प्रमाणांत आहेत. तरी पण त्या इतर जिल्ह्यांपेक्षां जास्तच आहेत. पण रत्नागेरीच्या पुढें जसजसें जावें तसतसें पूर्वीच्या रीती अद्यापर्यंत चालू आहेत असें दिसतें. आपल्याकडे आगगाडीचा, आगबोटीचा, विटाळ निदान पुरुषतरी मानीत नाहींत. पण तेथें अद्याप फार कडक बंदोबस्त आहे. बोटीवरून आलेल्याचे सर्व कपडे कोऱ्या कपड्यांशिवाय बायकांप्रमाणें पुरुषासही भिजवून धुऊन स्वच्छ करवून घ्यावे लागतात. नुसता मुकटा धुऊन भागत नाहीं. इतकेंच नव्हे तर आलेला मनुष्य पुष्कळ दिवस राहावयाचा असल्यास व तो आपला घरचा असल्यास त्यास क्षौर करून पंचगव्य प्राशन करून यज्ञोपवीत घालून अंतर बहिः शुद्ध व्हावें लागतें. ह्मणजे तो मनुष्य देवाधर्माच्या कार्यास योग्य होतो ! मी एका ठिकाणीं गेलों असतां माझा मुकटा बोटीचा ह्मणून मी त्यांचा मागितला. त्यांनीं तो दिला पण माझें पान आपल्या पंक्तीपासून दूर मांडलें ! मला चार दिवस तेथें राहावयाचें होतें तोपर्यंत माझ्या मुकट्यालासुद्धां ओटीपलीकडे माजघरांत नेण्याची परवानगी नव्हती !! मी गेल्यावर तो मुकटा धुऊन त्यांना त्यांच्या सोंवळ्यांत घ्यावयाचा होता. ह्या प्रांतांतील एक मनुष्य इकडून घाटावर मजबरोबर आला होता. तो तिकडे पुन्हां परत गेला व त्यानें वर लिहिल्याप्रमाणें जेव्हां सक्षौर प्रायःचित्त घेतलें तेव्हां त्यास घरच्या व बाहेरच्या देवाची पूजा करण्याची परवानगी मिळाली !!! इतका कडक शुचिर्भूतपणा अद्यापि तेथें चालत आहे, हें मी प्रत्यक्ष पाहिलें तेव्हां मला आश्चर्य वाटलें. हा देशाचार आहे. व " आचारः प्रथमो धर्मः " हेंही खरें आहे. तसेंच जसजसा आचार शुद्ध राखावा तितका तितका तो आरोग्याला व तेजस्वीपणाला हितावह आहे, ह्यांत शंका नाहीं. पण कोणत्याही गोष्टीचा अतिरेक करणें किंवा कीस काढीत बसणें वाईटच. अशानें मनुष्याचा स्वभाव शंकेखोर, संशयी व हेकट बनतो व तो अव्यवहार्य होतो. ह्यांनाच हसावयास नको. गुजराथ, तेलंगण, व खुद्द पाश्चात्य यांच्यामध्येंही असाच प्रकार अद्याप चालू आहे. गुजराथेमध्यें शौचविधीला फार थोडें पाणी नेतात. एक लहान चंबू नेतात पण पाय धुण्याचा व भांडें घासण्याचा मोठा ब्रह्मघोटाळा आहे ! त्यांचा तो चंबू व विहिरीवरचा पोहोरा आंतून बाहेरून पुष्कळ वेळां माती लावून घास घासून घ्यावा लागतो. प्रत्येक वेळेस तो विहिरींत बुडवून नवें

पाणी काढावें लागतें !! जुन्या पाण्यानें भागत नाहीं. यामुळें ओंजळभर माती किंवा राख प्रत्येक वेळीं विहिरींत जात असली पाहिजे. वस्तुतः शुद्ध करावयाच्या ठिकाणची ह्मणजे त्या इंद्रियाची शुद्धता यथातथा करून नुसत्या संसर्गाच्या मंडळीला एवढा दंड कां ! तर याचें उत्तर हा देशाचार आहे, या पलीकडे कांहीं नाहीं !!! आपल्याकडे शुद्ध पायाला घाण लागूं नये ह्मणून शौचविधीच्या वेळीं जोडा घालून जाण्याची रीत आहे. परत आल्यावर संडासांतून आणलेला जोडा बाहेर काढून ठेवून पाय पुष्कळ पाण्यानें घासघासून धुतात. पण पुन्हां तोच जोडा अगदीं ओटीपर्यंत नेतात व आपण शुद्ध समजतात. वस्तुतः घाण-पाणी उडाल्यामुळें किंवा पाय वाईट जागीं पडल्यामुळें जोडा खराब झाला. पायाला व तोंडाला कसलाही स्पर्श झाला नाहीं. पण हात, पाय, तोंड व भांडें यांचे स्वच्छतेची कमाल करितात ! आणि जोडा तसाच घाणेरडा ठेवितात !! अर्थात त्याच्यावर घाणीचा वर्ग घन झालेला असतो तरी तो बिचारा शुद्धच असतो. कारण काय तर कातड्याला दोष नाहीं पण पखालीच्या पाण्याला दोष आहे. वगैरे चालीरीती दुसऱ्यास नांवें ठेवण्यासारख्या आहेत. त्या पुष्कळ असल्यामुळें त्यांचें येथें दिग्दर्शन मात्र केलें आहे. ह्या दिग्दर्शनामुळें प्रत्येक ठिकाणीं याचा उच्चार करावा लागणार नाहीं. प्लेग उत्पन्न झाला त्यावेळीं ह्या स्पर्शास्पर्श संबंधाची युरोपियनांनीं तर कमाल केली होती. ते कोणत्याही नेटिवास आपल्यापासून दहा हात लांबीवर ठेवीत असत. त्यांच्याजवळून कागद घ्यावयाचा असला तर तो अतिशय शुद्ध करून घेत. इतकेंच नव्हे तर ह्या संसर्गामुळें आलेला दोष जावा ह्मणून ते हात साबण लावून धुऊन कपडेही बदलीत. ह्या गोष्टी प्लेगचे आरंभीं प्रसिद्धच होत्या !!! पण त्यामुळें त्यांच्यांत मृत्युसंख्या कमी झाली हें मात्र खरें. ह्मणजे शुद्धाचाराची प्रसंगीं योग्यता कळते.

ह्या कोकणची राजकीय माहिती पुढीलप्रमाणें समजते. शके ४०० ते १२३९ पर्यंत या प्रांतावर चालुक्य, राष्ट्रकूट नवीन चालुक्य व शेवटीं यादव ऊर्फ जाधव यांनीं राज्य केलें. १२३९ पासून १५३९ पर्यंत मुसलमान, १५३९ पासून १७४० पर्यंत मराठे पेशव्यांसुद्धां ( महाराष्ट्रीय ) व नंतर इंग्रज. तालिकोटची लढाई शके १४८७ चे सुमारास होऊन विजयानगरच्या साम्राज्याचा अस्त झाला. नंतर मुसलमानी कारकीर्दींतून प्रथम भोसले घराणें उदयास आलें. शके १५३९ चे सुमारास शहाजी भोंसले वैभवाच्या शिखरास चढले.

त्यांची कारकीर्द शके १५२२ ते १५८७ पर्यंत झाली असा ऐतिहासिक उल्लेख तिकडील लोकांच्या दप्तरांत आढळतो. हा खुलासा आडिवरें येथील दप्तरांतून घेतला आहे. कारण तेथील लेख बरेच संगतवार मिळाले. कोंकणामध्यें राज्य कोणाचें कां असेना त्याला पैशाचें उत्पन्न होणार नाहीं. पण लढाऊ, काटक व बुद्धिमान असे सैनिक व कर्तृत्ववान लोक मात्र मिळतील. त्यांची येथें वाण पडणार नाहीं. अशा मनुष्यांची ही खाण आहे. सर्व जिल्ह्यांत रत्नागिरी जिल्ह्याचें उत्पन्न फार कमी आणि तें सरकार देणेंही तिकडील लोकांना पर जिल्ह्यांत नोकरी करून भरून काढावें लागतें !

ही सर्वसाधारण माहिती आपल्याकडील तौलनीक दृष्टीनें केली आहे. विशेष माहिती तेथें गेल्यावर होईल. आतां इकडील

## यात्रांचें वर्णन करूं.

बाणकोटाहून निघाल्यावर दाभोळ बंदरांत यावें व तेथून गोवळकोटास लहान बोटीनें जावें. तिकीट बाणकोटाहून किंवा (हरिहरेश्वराहून) एकदम गोवळ-कोटचें काढावें. गोवळकोटापासून चिपळूणपर्यंत सडक आहे. गाड्या तांगे बंदरावर हजर असतात चिपळूणचें बंदरच गोवळकोट आहे. त्यालाच कोणी चिपळूण बंदर ह्मणतात. तेथून ते सुमारें एक मैल आहे. चिपळूण वरून परशुरामाचा महेंद्रपर्वत दिसतो. चिपळूणपासून परशुराम गांव एक मैल लांब टेकडीवर आहे. चिपळूण ही कुंभारली घाटाची उतारपेठ आहे. ह्यामुळें येथें व्यापराची मोठी घडामोड चाललेली दिसते.

## परशुराम

येथें जाण्यास हा राजमार्ग आहे. पण चिपळूणास न जातां गोवळकोटाहून परभारें दोन मैल डोंगरसुद्धां चढून परशुरामास जातां येतें. परशुरामाचा डोंगर व चिपळूण यांमध्यें लहान एक वशिष्ठी नदी आहे. व तिचीच ही खाडी झाली आहे. परशुराम हा गांव मोठ्या वस्तीचा आहे. व गांवाच्या मधोमध परशुरामाचें देवालय आहे. देवालय फार विस्तृत आहे. गाभारा, सभामंडप व त्या भोंवतालीं फार मोठी विस्तृत जागा असून त्यांचेंभोंवती कोट बांधला आहे. व मुख्य दिशांस दरवाजे ठेविले आहेत. याशिवाय या आवारांत यात्रेचे वेळीं मोठमोठे मांडव घालतात. देवळांत, गाभाऱ्यांत, कंबरेएवढ्या काळ्या पाषाणाच्या धनुर्धारी अशा तीन सुबक मूर्तीं आहेत. त्यांचीं नांवें काल आणि काम

यांच्यामध्यें भार्गवराम म्हणजेच परशुराम होय. याच्या हातांत मात्र परशु आहे. विष्णूच्या दशावतारांपैकीं वामन आणि परशुराम हे ब्राह्मण अवतार आहेत. हा देव, ब्राह्मण आहे आणि तो रत्नागिरीसारख्या कडक सोंवळ्याच्या ब्राह्मण वस्तींत आहे. अर्थात येथील सोंवळेंओंवळें फार कडक आहे. तरी यात्रेमध्यें सोंवळ्या ओंवळ्याचा धरबंद राहात नाहीं म्हणून यात्रा संपल्यावर देवाला पुन्हां मंगलयुक्त अभिषेक करून देव वर्षभर पुन्हां सोंवळ्यांत ठेवितात. उत्साह परशुरामजयंतीला होतो. त्यावेळीं कोंकणांतील व देशावरील बरीच यात्रा जमते. देवाला उत्पन्न मोठें आहे पण त्याची जरा अव्यवस्था दिसली. उत्साहांत कथा, कीर्तन, छबिना, ब्राह्मणभोजन वगैरे सर्व कांहीं होतें. याशिवाय ठिकठिकाणचे हरदास, पुराणीक, गवई, विद्वान ब्राह्मण, आपआपल्या विद्येची हजेरी देण्याकरितां येतात व त्यांच्या योग्यतेप्रमाणें त्यांस बिदागीही मिळते. हें काम दोन तीन दिवस सकाळपासून संध्याकाळपर्यंत सवडीनें चालतें. व तें पाहण्यासारखें असतें. सर्व उत्साह आटोपल्यावर शेवटल्या दिवशीं भरत-वाक्याप्रमाणें आशीर्वादपर पुढील पद म्हणतात.

श्रीभार्गव सुपर्दि नमन ब्रह्मकुलऽज रामपूर्ण ।
भक्तकाम कल्पद्रुम पावे माधवा ॥ ध्रु ॥
वाशिष्ठी नलिनितीर जो परेश परशूधर ।
भीष्मादिक शिष्य सुकर अधर साधवा ॥ १ ॥
कोटिसूर्य तेजयुक्त लाभ दर्शनी प्रयुक्त
पूर्वपुण्य भाग्ययुक्त दिवस दाखवा ॥ २ ॥
भक्त करिति भजनघोष विप्र करिति वेदपाठ ।
कोंकणांत पुण्य क्षेत्र नमन भार्गवा ॥ ३ ॥
सायकाळ उषःकाळ झडे चौघडा त्रिकाळ
तोफ उडे दोन वेळ आरती पाजळे ॥ ४ ॥
श्रीभार्गव सुपर्दि नमन इ.

देवळाचे आवारांत यात्रेच्या वेळीं पाण्याचा तोटा पडतो म्हणून दोन तीन हौद बांधिले आहेत व त्यांत लांबचें पाटाचें पाणी आणून सोडिल आहे. हा उत्साह अगदीं उन्हाळीं असल्यामुळें पाटाचें पाणी बंद होतें. सबब लांबच्या विहीरीचें किंवा झऱ्याचें पाणी काढून पाटांत सोडतात. ह्या देवळाचा हा

जीर्णोद्धार पहिल्या बाजीराव पेशव्यांचे गुरू श्रीब्रह्मेंद्रस्वामी यांनीं केवळ भिक्षेवर केला. याप्रमाणें त्यांची सर्व महाराष्ट्रांत बरींच धार्मिक कृत्यें आहेत. आपण ह्मणतों गोसावी, संन्याशी हे काय करणार? पण ते करतील तें श्रीमंतांना किंवा राजेरजवाड्यांलासुद्धां करितां येत नाहीं. मात्र साधु त्याच्या दृश्य पेशा-प्रमाणें प्रामाणिक असला पाहिजे. पण प्रामाणिकपणाचीच हल्लीं सर्वत्र वाण आहे. लोकांची श्रद्धा अद्याप कमी झाली नाहीं. कनक आणि कांता ऊर्फ देहसुख आणि चैन यांचें वारें ज्याला लागलें नाहीं, किंवा ज्याचें मन मूळ ध्येयापासून चंचल होत नाहीं तेच खरे साधू. बाकीचे भोंदू. सुभाषितकारांनींही असेंच ह्मटलें आहे.

**भृंगार कांता द्रुय कातरा या । केल्या विधीनें नर कातराया ॥**

**जो सांपडेना नर कातराया । तो योग्य होतो नरका तराया ॥**

कनक आणि कांता या दोन कात्री ब्रह्मदेवानें मनुष्याला कातरण्याकरितां तयार केल्या आहेत. किंवा हे लबाड मनुष्याला पकडण्याकरितां दोन सांपळे तयार केले आहेत. जो या कातरींत सांपडत नाहीं ह्मणजे भुलत नाहीं तोच इहलोक सन्मार्गानें तरून जाण्यास समर्थ होतो. ह्मणजे त्याला इहलोकची माया किंवा सुखदुःखाची बाधा होत नाहीं. याविषयीं सविस्तर वर्णन पुढें केडगांवचे यात्रेंत आहे.

परशुरामाचें जन्मस्थान किंवा जमदग्नीचा आश्रम मूळ माहूरगडावर होता. त्याचें वर्णन तिसऱ्या भागांत आलें आहे. पुढें त्यांचें अवतार कृत्य संपूर्ण झाल्यावर ते महाबळेश्वरावरून सावित्रीच्या काठानें तिच्या मुखाजवळ हरिहर क्षेत्रांत समुद्रतीरीं आले व त्यांना तें स्थान रम्य वाटून तेथें त्यांनीं ब्राह्मणाला योग्य अशी तपःश्चर्या केली व त्या क्षेत्राला पवित्रता आणली. याचें वर्णन मागें हरिहर क्षेत्रांत आलें आहेच. पण त्या ठिकाणीं तेथें कायमचा वास न करितां तें क्षेत्र हरिहरांच्या निवासाला देऊन आपण ह्या महेंद्र पर्वतावर कायमचा वास करण्याकरितां येऊन राहिले. कोंकणस्थांना या यात्रेचें महत्व विशेष आहे. आतां ही यात्रा अगदीं अखेरच्या वेळीं होते यामुळें बोटींतून येणाराला त्रास आहे. पण परशुरामाचा अवतार असाच त्रासाचा झाला व त्याचें शिक्षण त्यांनीं कोंकणस्थांना दिलें आहे कीं, कसेंही परिश्रम पडले तरी न थकतां व न कंटाळतां आपले स्वतःचे व लोकांच्या उन्नतीचे मार्ग त्यांनीं शोधून काढिले पाहिजेत. व हेंच ह्या यात्रेचें रहस्य आहे. आणि हें नेहेमीं

लक्षांत राहावें ह्मणून ते रत्नागिरी जिल्ह्याच्या मध्यावर जागृति देण्याकरितां राहिले आहेत. हे सप्त चिरंजीवांपैकीं एक आहेत.

ही यात्रा येथें ठेवण्याचें मुख्य कारण, घाट व कोंकण यांच्या व्यापाराची कुंभारली घाट ही अर्यांनीं प्रथम रहदारीची वाट पाडली असावी हें दिसतें. हल्लीं घाटावरच्या मालाची उतारपेठ चिपळूणच आहे. घाटावरील माल ह्या पेठेंत उतरून तेथून बोटीनें किंवा गलबतानें मुंबईस येतो, व मुंबईचा माल घाटावर जातो. ही व्यवस्था फार प्राचीन काळापासून, विजयानगरच्या राज्यापासून व त्या पूर्वींची अमून अद्याप चालू आहे. हा घाट चढण्या उतरण्यास सुखावह आहे. याची रहदारी कायम रहावी, तिचा भर मुख्यत्वें-करून वैशाख महिन्यांत व्हावा, आणि तसा तो असतो, ह्मणून ही यात्रा अक्षयतृतीयेच्या सुमारास ठेविली आहे. आतां अक्षयतृतीयेला उत्साह करण्यास योग्य देवता कोणती तर परशुराम, ह्मणून परशुरामाची येथें स्थापना केली असावी असें दिसतें. ह्मणजे आमच्या सर्व व्यवसायांचा संबंध धर्माशीं जोडला आहे. आणि शेवटीं सांगितलें आहे कीं, तुम्ही धर्माप्रमाणें वागा, यात्रा वगैरे करा म्हणजे तुमचें कल्याण होईल. तुमच्या उन्नतीचे तुह्माला मार्ग दिसतील. वाफेचें यंत्र असतें पण तें चालविणें किंवा बंद करणें हें केवळ एक लहानसा दांडा हलविण्यावर ठेवण्यांत जसें यंत्रकाराचें कौशल्य असतें, तसेंच सर्व व्यवहाराची किल्ली प्राचीनांनीं ह्या धर्मरहस्यांत ठेविली आहे. आणि त्याचीं कारणें मात्र सांगितलीं नाहींत. कारण कारणें सांगितलीं तर जम बसणार नाहीं, लोक विनाकारण त्याजवर टीका करीत बसतील, भिन्न व खोटे मार्ग उत्पन्न करतील आणि काम मुळींच होणार नाहीं. ह्मणून त्यांचीं कारणें मुद्दाम गुप्त ठेविलीं आहेत. याविषयीं ह्मातारा व त्याचे आळशी लेक यांची गोष्ट प्रसिध्दच आहे. म्हाताऱ्यानें मरतेवेळीं सांगितलें कीं माझ्या जवळचें द्रव्य मी आपले परसांत खोल पुरून ठेविलें आहे तें मी मेल्यावर शोधून काढा आणि सगळ्यांनीं वाटून घ्या. म्हातारा मेल्यावर त्यांनीं ती जमीन दुप्पट खोल खणून पाहिली पण डबोल्याचा कोठेंच पत्ता लागला नाहीं. पण त्यामुळें जमीन पूर्णपणें नांगरली जाऊन पीक मात्र चौपट आलें हा फायदा झाला. व जमीन अशीच खोल नांगरीत जा, ह्मणजे तुह्माला पुष्कळ पीक येत जाईल हें गूढ तत्व त्या म्हाताऱ्यानें या गोष्टीच्या रूपानें सुचविलें. हीच

गोष्ट धर्माची आहे. मात्र तो केवळ अंधश्रद्धेनें करितां कामा नये. यात्रा करतांनासुद्धां हीच दृष्टि कायम ठेविली पाहिजे. ही गोष्ट वारंवार ठिकठिकाणीं सांगितली आहे. अज्ञान्यांनीं तो अंधश्रद्धेनें केला तरी चालेल. त्याचें फळ त्यांना मिळेल. उन्हाळ्याच्या दिवसांत ही यात्रा घाटावरून करण्यास सोयीची आहे. हल्लीं मुंबईहून बोटीनें करणें फार सोपें झालें आहे. ह्या दिवसांत समुद्र खवळतो व जाणाऱ्या येणाऱ्यांचे फार हाल होतात. समुद्राचें हें कौतुक पाहावयाचें असल्यास यात्रेकरूंनीं मुंबईहून यावें. कदाचित फार तुफान होण्यासारखें असल्यास बोटी बंदही होतात. हल्लीं कऱ्हाड ते चिपळून मोटार सुरू झाली आहे. कोकणांतील हवापाणी विशेष श्रेष्ठ आहे. घाटावरच्या लोकांना त्याचा अस्वाद मिळावा, समुद्र दर्शन फार जवळून व्हावें हाही यांत एक मुद्दा आहे. घाटावरच्या हवेपेक्षां ह्या हवेंत तीव्रता व डोंगर सान्निध्यामुळें काटकपणा मनुष्याच्या मनामध्यें स्वाभाविक येतो. विष्णूचा हा अवतार समुद्रयानाचा मार्गदर्शकच असावा असें दिसतें. ही यात्रा झाल्यानंतर अखेरचे दिवस आले तरी पुढल्या वर्षीं फिरून चिपळुणावरून दाभोळच्या खाडीनें तिवरी बंदरावर यावें. दाभोळच्या खाडींतून लहान बोटीनें प्रवास करण्याची फार मजा आहे. बोट मुळींच हालत नाहीं. बोटींतून भोवतालच्या गांवची व डोंगरांच्या पडद्यांची, जंगलाची चित्रविचित्र शोभा फार बहारीची दिसते. तिवरी बंदराहून

## पुळें

सुमारें चार मैल आहे. लोकलफंडी सडक समुद्रकांठानेंच आहे. पुळ्याजवळ मध्यें खाडी आहे. भरतीचे वेळीं ती भरल्यावर तींतून होडी चालते. ओहोटीच्या वेळीं तींतून गाड्या जातात. मध्यें मालगुंड हा मोठा गांव लागतो. बंदरावर बहुधा गाड्या असतात. पण आगाऊ तजवीज केल्याशिवाय हक्कानें मिळत नाहींत. जागा असल्यास मिळते. बोटीच्या स्टेशनवर धर्मशाळा व हॉटेलें आहेत. तेथें रात्रभर वस्ती करून सकाळीं निघाल्यास चालण्यासारखें असतें. निखार असल्यास समुद्र किनाऱ्यानेंही पुळ्यास जातां येतें. गणपतीचें देऊळ अगदीं समुद्र किनाऱ्यावर आहे. पण तें माहितीशिवाय समजणार नाहीं. या बाजूला गाडीचा धंदा करणारे ब्राह्मणसुद्धां आहेत. हा उत्साह माघ शुद्ध प्रतिपदेपासून पंचमीपर्यंत असतो. ह्या दिवसांत बोटी येथें लागतात. तिवरी बंदरावर स्टीम नॅव्हिगेशन कंपनीची बोट मात्र नियमित दिवशीं लागते. त्यांच्या दोन बोटी

असतात. सकाळची टपालाची एक असते ती रोज मुंबईपासून सर्व बंदरें करीत येते, ती येथें लागते. दुसरी जलद चालणारी असते ती रोज निघत नाहीं. नियमित दिवशीं निघते याचा नीट तपास करून तींत बसावें.

हें पुळें गणपतीपुळें ह्या नांवानें प्रसिद्ध आहे. एका महात्म्याच्या तीव्र तपःश्चर्येमुळें त्याला साक्षात्कार होऊन त्याला या स्वयंभू मूर्तीचें दर्शन झालें. गांवाबाहेर समुद्रालगत एक लहान स्वतंत्र टेकडी आहे. तेथें आश्रम बांधून कोणी वापट नांवाचे गृहस्थ कांहीं विशिष्ट उद्देशानें श्रीमंगलमूर्तीच्या तपःश्चर्येस बसले. पुरश्चरण पुरें होतांच त्यांना स्वप्नांत दृष्टांत झाला कीं जवळ केतकीचें बन आहे, त्याखालीं मी दोन गंडस्थळांच्या रूपानें वास केला आहे. तेथें माझी आराधना कर ह्मणजे तुला इष्टसिद्धि होईल. त्याप्रमाणें त्यानें तें केतकी वन तोडलें तों खडकांतून स्वयंभू गंडस्थळाकृति दिसली. त्यावेळीं तेथें भरतीचें पाणीसुद्धां येत असे. पुढें ती जागा साफ करून त्यांनीं ती देवता वेदमंत्रांनीं व तपःश्चर्येनें जागृत केली. त्यामुळें ती नवसांना पावूं लागली. यामुळें तिची प्रख्याती चोहोंकडे राजेरजवाड्यापर्यंत जाऊन पोहोंचली. यामुळें बडोदें सरकार, सांगली, जमखंडी, मिरजमळा वगैरे संस्थानिकांची या देवावर भक्ति बसली. पटवर्धनांचें तर हें उपास्य दैवत किंवा कुलदैवतच झालें आहे. अर्थात देऊळ उत्तम बांधून उत्साह, पूजा, अर्चा सुरू झाली. यात्रा सुरू झाल्या. देवाला अलंकार, भांडीं, दागिने मिळून चारीप्रहर चौघडाही सुरू झाला. गांवापासून देवळापर्यंत व डोंगरासभोंवती प्रदक्षणेकरितां फरसबंदीची सडक झाली. हल्लीं त्या देवावर त्या गांवच्या लोकांची इतकी श्रद्धा बसली आहे कीं, मूल चालूं लागलें कीं, तें अंघोळ करून गणपतीचें दर्शन घेतल्याशिवाय अन्न घेत नाहीं. हा देव येण्यापूर्वी गांवकरी गणेश चतुर्थीला मृण्मय गणपतीची पूजा करीत. परंतु ही देवता प्रगट झाल्यापासून गणेश चतुर्थीला कोणीही मृण्मय गणपती न आणितां सर्व लोक प्रेमानें जमून याचाच सकाळ संध्याकाळ उत्साह करितात. या देवळाच्या जवळ केतकीच्या बनांत एक ब्रह्मचारी तप करीत होते. पुढें ते गृहस्थाश्रमी बनले. आतां त्यांच्या मठींत दुसरे एक ब्रह्मचारी त्यांचेच शिष्य होऊन पुन्हा तपःश्चर्या करीत बसले आहेत. हा सर्व डोंगर केवळ मंगलमूर्तीमय आहे असें समजून सर्व भाविक यात्रेकरू ह्या डोंगरालाच प्रदक्षिणा करितात. या यात्रेंत डोंगराची प्रद-क्षिणा मुख्य मानिली आहे. देवाचा छबिनासुद्धां ह्या डोंगरालाच प्रदक्षिणा घालतो.

ह्या देवस्थानाजवळ पूर्वीं गोडें पाणी नव्हतें. जवळ नाभी गंगोदक ह्मणून लहान झरा होता; पण त्यांचें पाणी एवढ्या यात्रेच्या समुदायास पुरेसें नव्हतें ह्मणून जवळच एक विहीर बांधून राहाटानें तिचें पाणी एका खजिन्यांत सांठवून त्याचे नळ देवस्थानांत स्वयंपाक घरांत आणले आहेत. यामुळें आतां पाण्याचा तोटा पडत नाहीं. देवाला देणग्या व उत्पन्न मिळाल्यामुळें देवस्थानची कमेटी नेमून तिच्यामार्फत सर्व व्यवस्था होते. कमिटींत सर्व जातीचे पण हिंदू पंच आहेत. व त्यांच्या हाताखालीं मधुसूदनराव केळकर नांवाचे एक कारकून आहेत. ह्यांच्याकडे पूर्वीं गायकवाडांचें अन्नछत्र होतें पण तें आतां कांहीं सबबी-वर बंद केलें आहे. तरीही आला गेला अद्यापपर्यंत त्यांच्याचकडे उतरतो. आतां छत्र नाहीं, सबब लोक जाणून बुजून यथाशक्ति त्यांस मदत करितात. ही संस्था त्यांनीं चालू ठेविल्यामुळें अगदीं परक्या मनुष्याला मी बिऱ्हाड कोठें ठेवूं याची पंचाईत पडत नाहीं. हे सेक्रेटरी उत्साही व हौशी आहेत. यामुळें माघ-शुद्ध चतुर्थीच्या यात्रेच्या वेळीं यांचेकडे मंडळींचा बराच जमाव जमतो व त्यांची राहण्याबसण्याची व खाण्यापिण्याची व्यवस्था यथाप्रसंग कोंकणच्या रिवाजाप्रमाणें पण बऱ्यापैकीं केली जाते. हें त्यांस भूषणावह आहे. उतरण्या-करितां एक स्वतंत्र घर राहत्या घराला लागूनच असून शिवाय दोन्ही घराला लागून प्रशस्त मांडवही घातलेला असतो. व ह्या दोहों ठिकाणीं यात्रेच्यावेळीं रात्रभर जळणारा असा मांडवांत दिवा ठेवतात. सकाळ संध्यांकाळ राहाटास बैल जोडतात. ह्यामुळें सर्वांचें स्नान, कपडे धुणें, शौचविधी यांची सोय होते. यापेक्षां जास्त जशी ज्यास सोय पाहिजे तशी तीही होते. कोणास पूजा अर्चा, अभिषेक, ब्राह्मणभोजन घालावयाचें असल्यास त्याप्रमाणें यांचेकडून व्यवस्था होते. सारांश यात्रेकरूंचें उत्तम स्वागत करण्यांत व यथाशक्ति त्यांचा गौरव करण्यांत यांचा हातखंडा आहे. यामुळें लोकही त्यांच्याकडे प्रेमानें येतात आणि त्यांचाही फायदा करून देतात. बोटीवरून जा ये करण्यांत गाड्यांची व्यवस्थाही तेच करितात. ही परक्या व अनभ्यस्त मनुष्यास मोठी सोयीची गोष्ट आहे, यामुळें ह्या ठिकाणीं पंडे नसतांही यात्रा सोयीची झाली आहे.

ह्या देवाला लोकांनीं, संस्थानिकांनीं पुष्कळ दागिने, भांडी, लवाजमा दिला आहे. सबंध भरीव अशा चांदीच्या लहान मोठ्या श्रींच्या ( मंगलमूर्तीच्या ) मूर्ती करून त्या सालंकार दिल्या आहेत. यावरून भक्तांच्या मनकामना पूर्ण

करणारा हा देव आहे यांत शंका नाहीं. याच्या आरतीमध्यें भक्तानें त्याचें हेंच यश गायिलें आहे.

> **पुळयामध्यें नांदे महा गणपति ॥**
> **माघ चतूर्थीला जन यात्रे येती ॥**
> **जें जें इच्छिति तें तें सर्वही पावती ॥**
> **गणराया मजलागीं द्यावी अविमती ती ॥ जयदेव०**

**जयदेव—जयमोरेश्वरा ॥ तूझा नकळे पार शपा फणिवरा जयदेव०**

याप्रमाणें माघ शुद्ध चतुर्थीला जुने नवस फेडण्याकरितां व नवे घेण्याकरितां पुष्कळ मंडळी येते. येथें घेतलेला नवस सहसा फुकट जात नाहीं अशी समजूत आहे. देव नवसाला पावतो ह्मणजे असंभाव्य नवसाला पावतो असें नाहीं हें उघड आहे. हें ह्याचें धार्मिक रहस्य आहे.

आतां येथील सृष्टिसौंदर्य ह्मणजे येथील समुद्रोदधीचा देखावाही असाच चित्ताकर्षक आहे. हें देऊळ समुद्राच्या अगदीं कांठीं आहे, असें मागें सांगितलें आहे. पूर्वी उधानाचे वेळीं देवाला समुद्रस्नान होत असे. आतां पुढें धक्के बांधून समुद्र मागें हटविला आहे. तरी पावसाळयांत त्यावर लाटा आपटून समुद्र अगदीं देवळाच्या धक्याजवळ येतोच. या धक्यावर बसून किंवा समुद्राच्या विस्तीर्ण वालुकामय प्रदेशावर हिंडून त्या अगाध अनंताचीं नानाविध रूपें पाहात बसणें हें मोठें भाग्य आहे. तो जेव्हां सौम्य असतो, तेव्हां सकाळ संध्याकाळीं त्याचें सौंदर्य खरोखर पाहण्यासारखें असतें. लहान मोठ्या लाटा उसळतात. त्यावर निरनिराळ्या रंगाच्या किरणांची शोभा दिसते. गलबतें आपलीं शिडें उभारून-तीं आह्मीं लहान असून या अगाध समुद्रावर जय मिळविल्याच्या पताका फडकावीत आहेत. मागून बोटी येऊन त्यांना हंसत आणि पाणी उडवीत मोठ्या डौलानें शिंग वाजवीत त्यांच्या पुढून त्वरेनें जात आहेत, आणि ह्मणतात कीं, आमच्या विजयापुढें तुमचें जुनें तुणतुणें कशाला मिरवितां? जरा समद्रानें डोळे वटारले कीं बसाल चूप! आह्मी त्याचीं फार लाडकीं मुलें'असल्यामुळें त्याला मुळींच जुमानीत नाहीं. त्याचा असा भुसकुरा करून त्याला असा उडवून देतां व पुढें जातों! आह्मी त्याच्या रागलोभाची मुळींच पर्वा करीत नाहीं!! इतक्यांत दुसरे कंपनीची बोट चढाओढ करण्याकरितां मागून येऊन ती तिच्या पुढें जाते. अशा ह्या पाण्याच्या अंगणांत धांवपळीचा खेळ त्यांचा चाललेला असतो.

संध्याकाळच्या वेळीं मुंबईहून व रत्नागिरीकडून दोन्हीं बाजूंच्या बोटी येथें यावेळीं येतात ह्मणून ही मजा दिसते.

आता त्याच्या काठच्या वाळूच्या आंगणांत निरनिराळ्या ठिकाणचीं मुलें सकाळ संध्याकाळ निरनिराळे खेळ खेळत व धांवत असतात, त्यावेळीं त्यांचें बागडण्याचें व हालचालीचें कौतूक पाहण्यासारखें असतें. अशा रीतीनें दृष्टीच्या सीमेपर्यंत ह्या समुद्र पटांगणावर बोटी, गलबतें, मच्छिमार होड्या व मुलें यांचें प्रेमाचें साम्राज्य चालतें. सूर्य आपलें सृष्टिकार्य करून थकल्यामुळें घरीं जाण्यापूर्वी तो तें कौतुकानें पाहात असतो. अखेर तो कर्तव्यकर्माला बांधला असल्यामुळें निघून जातो. यामुळें जाणाऱ्या येणाऱ्या बोटी आपला रसभंग झाला ह्मणून रागावून डोळे लाल करून निघून जातात. मागून चंद्र येतो. तो त्यांना हंसतो आणि ह्मणतो कीं, कोणीकडे सूर्य आणि कोणीकडे तुमचे विजेचे डौलाचे दिवे ! माझ्या इतकेंसुद्धां त्यांचें सामर्थ्य नाहीं. उगीच डौल कशाला करितां !

संध्याकाळचे सुमारास ओहोट वळल्यावर समुद्र तीर अगदीं सारवल्यासारखें स्वच्छ होतें. त्यावर निरनिराळे खेकडासारखे लहान लहान जीव वाळूच्या लहान लहान गोळ्यांचा निरनिराळ्या प्रकारचा कणा ( रांगोळ्या ) काढितात त्यांची फार मजा दिसते. समुद्रकांठीं मंद व शीतळ असा वारा वाहात असतो. अशा वेळीं समुद्रकांठावरून फिरत जाण्याची खरोखर फार मजा आहे. आपल्याबरोबर मुलें असल्यास तींही त्या प्राण्यांना धरण्याकरितां धांवतात, बसतात, रेतींत लोळतात व बागडतात. अशा विस्तीर्ण शांत जागीं सृष्टीच्या ह्या मांडीवर आपणही लोळावें असें वाटतें. अखेर सकाळीं ऊन होऊं लागलें किंवा संध्याकाळीं सूर्यास्त होऊन अंधार पडूं लागला ह्मणजे निरुपायानें घरीं यावें लागतें. हा शांत वेळेचा देखावा झाला. यावेळीं वायू व समुद्र यांची गट्टी ऊर्फ प्रीति असते. व ती बहुधा कार्तिकपासून वैशाखपर्यंत टिकते. पण खेळतां खेळतां मुलें शेवटीं भांडतात व वर्दळीवर येतात, तोच प्रकार ह्या पंचभूतांचा ऊर्फ सृष्टिशक्तींचा होतो. ज्येष्ठ आषाढाचे महिन्यांत समुद्राचे गतीस ( भरती ओहोटीस ) जेव्हां वारा प्रतिबंध करतो व त्याला पावसाची मदत होते, तेव्हां समुद्रही आपलें उग्र रूप प्रगट करून आपली मर्यादा सोडून वर आकाशांत उडी मारून वायूचा समाचार घेण्याचा प्रयत्न करतो ! त्यावेळीं वारा व पाणी यांचें स्वरूप पहाणें अतर्क्य आहे ! त्यावेळीं हा माघ फाल्गुनांतला

हा समुद्र असेल असें वाटतसुद्धां नाहीं. अशा वेळीं चंद्रसूर्यसुद्धां आपल्या तोंडांवर ढगांचा बुरखा घेऊन अदृश्य होतात. त्यांच्यानेंसुद्धां त्यांचें तांडव पाहावत नाहीं. मग नक्षत्रांची गोष्ट कशाला ? मग तेथें मनुष्याचा काय पाड लागणार ? जिकडे तिकडे अंधाराचें व विजाच्या भुताटकीचें साम्राज्य सुरू होतें. समुद्राची लाट अस्मान फोडून वर जाते. मनुष्य जर पाहूं लागला तर डोळे उघडतांच त्यांत वारा, माती, रेती घुसून डोळे मात्र जावयाचे व अशा रीतीनें वड्याचें तेल वांग्यावर निघतें. दोघांचें भांडण जुंपलें ह्मणजे त्याचा प्रसाद जसा भोंवतीं कौतुक पाहाणारालाही मिळतो, तोच प्रकार हा. अशा वेळीं वारा, माती, रेती जिकडे तिकडे उधळून दिशा धुंद होतात. मग ह्या भांडणांकडे कोणाची पाहण्याची छाती आहे ! मग कसल्या बोटी व कसलीं गलबतें. सर्व जिकडे तिकडे कोठें तरी ( बंदरांत ) लपून बसतात ! ! हें दृश्य केवळ भयंकर खरें. कधीं कधीं वाऱ्याचा वेग इतका भयंकर वाढतो कीं, त्यानें नारळी पोफळीसारखे झाडांचे शेंडे तुटून पडतात. पक्षांचीसुद्धां गती बंद होते, तेथें मनुष्याचें काय चालणार ? समुद्राच्या ह्या हर्षरोषाचें वर्णन मागें आलें आहेच, पण हा माघ महिना त्याच्या आनंदाचा असल्यामुळें या यात्रेचें दृष्य ह्मणून प्रत्यक्ष पाहिलेला देखावा थोडातरी दाखवावा लागला. जमिनीवरील भयंकर हिमालयाचें जसें कांहीं ठिकाणचें सौंदर्य पाहातां येत नाहीं, तसेंच समुद्राचेंही पाहातां येत नाहीं. तेव्हां तें आपण सोडून देऊं.

यानंतर मी रत्नागिरीस तिवरी बंदरावरूनच यावयास निघालों. पुळ्याहून रत्नागिरीस पायवाटेनें जातां येतें. पण मध्यें दोन खाड्या असून डोंगरांचा चढउतार बराच आहे. त्यापेक्षां हा बोटीचा प्रवास पुरवला असें ह्मणून मी बोटीनें रत्नागिरीस आलों. हें बंदर फार वाईट आहे. त्याचें वर्णन मागें आलें आहेच. आतां येथें धक्क्यांची सोय होत आहे असें ऐकतों.

शहर या दृष्टीनें रत्नागिरीस पाहाण्यासारखें कांहीं नाहीं. पण तेथें दोन नवीन धर्तीच्या पाठशाळा झाल्या आहेत असें ऐकलें. त्यांचें नाविन्य पहाणेस गेलों. एक संस्कृत पाठशाळा व एक वेदशाळा. पण या दोन्हीं संस्थांत नवीनत्व मला कांहीं दृष्टीस पडलें नाहीं. संस्कृत शाळेची इमारत चांगली आहे. बाह्य स्वरूप चांगलें आहे, पण अंतःस्वरूप केवळ जुनेंच आहे. मुलांना नुसते संस्कृत ग्रंथ व व्याकरण शिकवितात. नव्या पद्धतीच्या दृष्टीनें त्यांना संस्कृत लिहितां

किंवा बोलतां येत नाहीं. तसेंच वेदशाळेंत अगदीं जुन्या पद्धतीचें वेदाध्ययन होतें. सार्थ असें फारसें शिकवीत नाहींत. मी ह्मणतों सगळें सार्थ झालें नाहीं तरी चालेल, पण ज्यांचीं भाष्यें व अर्थ प्रसिद्ध झाले आहेत अशीं पुरुषसूक्त, सौर, संध्या, ब्रह्मकर्म वगैरेंची तरी सार्थ माहिती शिकाविणें हल्लींच्या काळीं जरूर आहे. तितक्यापुरतें तरी त्यांस संस्कृत शिकवावें. राष्ट्रीय शाळा ह्या स्वावलंबनार्थ निघाल्या आहेत. पण त्यांत दिलेल्या शिक्षणानें मनुष्य स्वावलंबी व हजारजबाबी बनत नाहींच, पण अगदींच कुचकामाचा निपजतो, असा आज पांच सहा वर्षांचा प्रत्ययही आला आहे. यामुळें राष्ट्रीय शाळेंत विद्यार्थी मिळण्याची मारामार पडत चालली आहे. सरकारी शिक्षण सदोष आहे असें म्हणून हसणारांनीं इकडे लक्ष द्यावें व राष्ट्रीय शाळेचे अभ्यासक्रम व ते देण्याची रीति बदलून मुलें काटक व स्वयंसिद्ध होतील व त्यांचा अभिमान धरून जनता त्यांचा उपयोग करून घेऊन त्यांच्या पोटापाण्याची सोय करीपर्यंत हां केवळ पोरखेळ किंवा तरुणांच्या आयुष्याची हानीच आहे. सरकार त्यांच्या गुणांचें चीज करणार नाहीं. परंतु श्रीमंत व व्यापारीवर्गानें त्यांस हाती धरलें पाहिजे. राष्ट्रीय शाळेंतला विद्यार्थी शरिरानें, मनानें, कर्तृत्वानें, आपल्या विद्येनें व प्रामाणिकपणानें पूर्ण खंबीर असा फार उपयोगी आहे, अशी जनतेची खात्री झाल्यास जनतेकडून आश्रय मिळण्यास कधीं अडचण पडणार नाहीं. महाराष्ट्रांत गुजराथी, मारवाडी व पुरभय्ये कितीतरी येऊन विद्येशिवाय केवळ अशा उपयुक्त गुणांवर पैसे मिळवून गबर होऊन जात आहेत. त्यापेक्षां महाराष्ट्रीय मनुष्याची महाराष्ट्राला जास्त जाणीव येईल यांत शंका नाहीं. मात्र राष्ट्रीयशाळेंतील विद्यार्थी वर लिहिल्याप्रमाणें खंबीर असला पाहिजे. रत्नागिरीस

## लोकमान्यांचें जन्मस्थान

आहे असें मी ऐकिलें होतें, तें पाहण्यास गेलों. हें मधली आळी ऊर्फ हल्लींच्या टिळक आळींत गोरे यांचें घरीं ओटीवर दाखवितात. टिळक ज्या घरीं जन्मले तें हें घर नाहीं, पण ती ही जागा मात्र आहे. टिळकांचें जुनें घर येथें होतें व ह्या ठिकाणीं त्यांची बाळंतखोली होती, तींत त्यांचा जन्म झाला असें त्या घरांतल्या बायकांनीं सांगितलें. ह्मणजे ती पूर्वीची इमारत नाहीं, स्थित्यंतर झालेलें हें स्थान मात्र आहे. येथें सार्वजनिक स्मारक करावें ह्मणून ती जागा

स्मारकफंडानें विकत घेऊन ठेविली आहे. सवड होईल तेव्हां हें ही घर पाडून तेथें जनतेच्या इच्छेप्रमाणें स्मारक होईल. ही जागा पाहिल्याबरोबर टिळकांच्या मूर्तीचें स्मरण झालें. त्यांचें धीरोदात्त व अलोट धैर्य, प्रचंड विद्वत्ता व बोललेलें खरें करून दाखविण्याचें सामर्थ्य, दिव्य राष्ट्राभिमान व धर्माभिमान इत्यादि गुणांचें स्मरण होऊन मन कर्तव्यदक्ष झालें. टिळक निराश असे कधींच झाले नाहींत, हें त्यांचें जीवनरहस्य आहे.

### कीं तोडिला तरु फुटे आणखी भरानें

याप्रमाणें त्यांच्या धैर्याचा स्रोत अखंड पुढें पुढेंच वाहात असे. आमच्या हिंदुस्थानाला स्वराज्य मिळाल्याशिवाय आपसांतील जातिद्वेष, तंटे, शुद्धि-संघटण किंवा कोणतेही धार्मिक किंवा सामाजिक प्रश्न कधीं सुटणार नाहींत. सबब सर्वांनीं दुसरीकडे लक्ष न देतां ह्या एका ध्येयाकडे प्रथम लक्ष द्यावें. व फावल्या वेळांत त्यांनीं आपलीं घरें साफसूफ करावीं ह्मणजे आग्रहाच्या वाईट गोष्टी मिळत्या घ्याव्या. नाहींतर आतां साफसूफ केलेलीं घरें स्वराज्याशिवाय टिकणार नाहींतच, ह्मणून या स्वराज्याकरितां सर्वांनीं जिवापाड मेहनत करून कर्तव्यदक्ष व्हावें हाच त्यांचा मुख्य मंत्र होता. तो टाकून परक्यांच्या शिकवणीनें लोक आपमतलबी व द्वेषी होत चालले आहेत हें दुर्दैव आहे. ह्या आपमतलबानेंच आमचें राज्य गेलें व आह्माला हे दिवस आले. हल्लीं शिकूनसुद्धां हेच परिणाम होत असतील तर आह्माला हें शिक्षणच नको. परसत्ता असली ह्मणजे चांगल्या गोष्टीसुद्धां निष्फळ किंवा विरुद्ध फलदायी कशा होतात, त्याचें हें स्पष्ट उदाहरण आहे. स्त्रियांना व ब्राह्मणेतरांना शिक्षण दिल्यानें त्यांचा किंवा समाजाचा कांहीं विशेष फायदा झाला नाहीं, इतकेंच नव्हे तर फायद्याऐवजीं तोटाच फार झाला आहे. हेंच जर स्वराज्य ( स्वसत्ता ) असून शिक्षण दिलें गेलें असतें तर त्याचा डौल कांहीं निराळाच दिसला असता, हें जपानच्या उदाहरणावरून स्पष्ट आहे. कधींतरी ह्या सिंहावलोकनाकडे जनतेचें लक्ष जावें ह्मणून अशीं स्मारकें करणें जरूर आहे. यानंतर मी जवळच्या खाडीनें

## सोमेश्वर

गांवीं गेलों. स्वराज्यांत हें फार सुस्थितींत व कर्तृत्ववान शहर होतें, असें तेथील रस्ते व देवळें यावरून दिसतें. हल्लीं तें मोडकळीस आलें आहे. येथील

रस्ते काशीप्रमाणें फरसबंदीचे असून अगदीं टेकडीवरून परगांवीं गेले आहेत. यावरून येथें सर्व टेकडीवर पूर्वी वस्ती असावी असें वाटतें. येथील सोमेश्वराचें देऊळ फार प्राचीन आहे. त्याचा जीर्णोद्धार शके १६९६ जयनाम संवत्सरीं विनायक विश्वनाथ आठवले—महाजन—यांनीं केला, असा त्यावर शिलालेख आहे. ह्मणजे हा जीर्णोद्धारच दीडशें वर्षांपलिकडचा आहे! ह्या देवळाचें सर्व काम दगडी आहे. सभामंडपाचें काम लाकडी आहे. सर्वत्र पटांगणाची जमीन फरसबंदीची आहे. भोंवतालीं तीन पुरुष उंचीचा दगडी चुनेगची कोट आहे. या दगडाच्या व लाकडाच्या मजबुतीवरून व त्यावरील कौशल्यावरून त्याच्या जीर्णोद्धारास आजच्या मानांनीं कमींत कमी पंधरावीस हजार रुपये सहज लागतील. आतां हा जीर्णोद्धार एका मनुष्यानें केला आहे, मंडळीनें केला नाहीं. अर्थात इतका दानधर्म करणारा मनुष्य कोट्याधीश असलाच पाहिजे. अर्थात दीडशें वर्षांपूर्वी येथें कोट्याधीश होते इतकें हें नगर विस्तृत होतें यांत शंका नाहीं. तसेंच जीर्णोद्धाराचे पूर्वीचें देऊळ असेंच दोनशें वर्षांपूर्वीचें असावें. अर्थात हें देवस्थान निदान चारशें वर्षांपूर्वीचें तरी असावें असें दिसतें. गांवांत ठिकठिकाणीं घरट्यांचे अवशेष दिसत आहेत. यावरून त्याचा विस्तार कळतो. आंबेघाटावरून कोल्हापुरास जातांना याचा संबंध असावा असें दिसतें. ह्या संबंध परकी राज्यामुळें व बोटीमुळें तुटला किंवा बराच कमी झाला. हें नव्या-काळाचें महात्म्य आहे. पण कालचक्र थांबविण्याचें कोणाच्याच हातीं नाहीं, प्रत्यक्ष भगवंताच्या नाहीं. कारण त्यालासुद्धां वेळ पाहून अवतार घ्यावा लागतो, मग इतरांची कथा काय ?

ह्या देवळावरील कौलें वीतभर लांब व चार अंगुलें रुंद अशीं केवळ सपाट आहेत. मात्र तीं अति दाट आहेत. त्यांना कोणत्याही प्रकारचा आकार नाहीं. केवळ पाटीप्रमाणें चौकोनी आहेत. यानें इकडील पाऊस कसा थांबतो, कोणास ठाऊक! पण मुळींच गळत नाहीं असें तेथील लोक ह्मणतात. कौलांचा असा नमुना अद्यापपर्यंत मी कोठें पाहिला नाहीं. प्रत्येक कोंकणस्थाचें मूळ घराणें कोंकणांत असतें, त्याप्रमाणें आमच्या फडक्यांच्या घराण्याचें मूळ ठिकाण हें असल्यामुळें ही यात्रा मी मुद्दाम केली आहे. सार्वजनिक यात्रेचा याशीं संबंध नाहीं. तरी प्राचीनकाळीं हा प्रांत किती सधन, संपन्न व कर्तृत्ववान होता व ह्या बंदराची हालचाल व दर्यावर्दीपणांत श्रेष्ठत्व कसें होतें हें यावरून समजून

येणारें आहे, ह्मणून याचा उल्लेख येथें केला आहे. यानंतर रत्नागिरीहून पूर्णगड बंदरावर उतरून मचंव्यांतून खाडीनें कशेळी येथें गेलों. तेथून सडकेनें

## आडिवरें

सुमारें दोन मैल आहे, तेथें गेलों. तेथून महांकाळिचें देवस्थान एक मैलावर आहे. देवीजवळ ब्राह्मणवस्ती नसल्यामुळें मी येथेंच उतरलों. या गांवची वस्ती सुमारें दोन तीन मैल लांबीची आहे. ह्मणजे घरास घर लागून नाहीं. कांहीं घरें फर्लांग दोन फर्लांगसुद्धां लांब आहेत. मागें वर्णन केल्याप्रमाणें हें प्राचीन ऋषिंचे आश्रमच खरे. येथील आचारविचार अत्यंत कडक अशा जुन्या पद्धतींचे दिसले. हल्लींचे सुधारक अशा आचाराना हंसोत, पण अशा ठिकाणीं भक्षण केलेलें अन्न अगदीं सात्विक व तेजस्वी असतें व त्याचा शरीरावर अदृश्य तऱ्हेनें कांहीं विलक्षण परिणाम होतो, असें माझ्या अनुभवास आलें आहे. मागें सांगितलेला कडक आचार व सोंवळें हें येथीलच आहे. जेवण अगदीं साधें, ऋषितुल्य असतें. जाड्याभरड्या तांबड्या तांदुळाचा भात, केवळ मीठमिरची घालून केलेली भाजी व गाईचें ताक याशिवाय कांहीं नाहीं! पण इतर ठिकाणच्या जेवणानें शरिराची व मनाची जशी चलबिचल किंवा भगभग होत असे तशी यानें न होतां मन शांत, तेजस्वी होऊन आपण कांहींतरी काम करावें, निदान दोन तीन डोंगर उलटून तरी जावें इतका हुरुप येथें दोन तीन दिवसांनीं राहण्यानें मला आला होता. येथील स्त्री, पुरुष, मुलें, अगदीं अंगावरचीं मुलेंसुद्धां तरतरीत व तेजस्वी दिसलीं व लोक दीर्घायुषी व तेजस्वी दिसले.

ही देवी प्राचीन काळापासून फार प्रख्यात आहे. हिची मूर्ति लहान कृष्णपाषाणाची आहे पण कीर्ति मोठी आहे. हिचे पुजारी हल्लीं ब्राह्मणेतर गुरव आहेत. पूर्वी जैन होते. आडिवरें हें नांव अट्टवेर यापासून झालें. अट्ट=बाजार=वेर=पूर, नगर. यावरून येथें पूर्वी घाटावरील बाजाराची उतारपेठ होती असें दिसतें. मूळ मूर्ति आद्य शंकराचार्यांस जमिनींत सांपडली. त्यांनीं तिची तेथें स्थापना केली. पूर्वी हा मुलुख जैनांचा होता. त्यांशीं भांडण होऊन त्याचा या देवीवर विपरीत परिणाम होऊं नये ह्मणून आचार्यांनींच येथें प्रथम जैन पुजारी ठेविले. नंतर त्यांचा धर्म लयास गेल्यावर त्यांनीं हिंदुधर्म स्वीकारला, तेच हल्लींचे गुरव आहेत. हल्लींच्या महांकाळीची स्थापना पेशवाईतील सरसुभे भिडे या प्रांतावर अधिकारी होते त्यांनीं केली. हिच्याजवळ जुनी दुर्गादेवी आहे. तिची स्थापना

श्रीकृष्णबाबा जोशी यांनीं माघ वद्य पंचमी शुक्रवार शके १८२६ क्रोधीनाम संवत्सरे या दिवशीं केली, असा तेथें उल्लेख आहे. भिड्यांनीं या देवीची स्थापना केल्यापासून येथें प्राणिवध बंद झाला. आतां त्या तीव्र व हिंसक देवतांच्या संतोषाकरितां महिन्यांतून अमावास्येला त्यांना एक नारळ देतात, एवढेंच! ह्या देवीला नवसाप्रीत्यर्थ चोळी, पातळ, नेत्र, पुतळी किंवा पुतळ्याची माळ किंवा नारळाचा पेंद व चोळी बांगडी वाहातात. ह्या देवीला सरकारी उत्पन्न नाहीं, तरी भक्त लोकांनीं देणगीच्या रूपानें दिलेलें द्रव्य बरेंच आहे. तें येथें पंचांचे ताब्यांत आहे. देवीला वाहिलेल्या महत्वाच्या जिनसा जरूर तितक्या ठेऊन बाकिच्यांचे म्हणजे दागिने, कपडे, भांडीं, यांचे पंचा-समक्ष लिलांव होतें. व त्याच्यावर सर्व खर्च चालतो. कलियुगामध्यें देव नवसाला पावले नसते तर त्यांना इतक्या व अशा देणग्या कोणीच दिल्या नसत्या. कलियुगांत देवांत देवत्व नाहीं असें ह्मणतात हें खोटें आहे, हें अशा यात्रावरून सिद्ध होतें. मात्र भावना किंवा विश्वास पाहिजे. नवरात्रांत येथें बरीच यात्रा जमते. या प्रांतांत ही देवी फार प्रख्यात आहे. येथून तीन मैलांवर

## कनकादित्य

म्हणजे सूर्यनारायणाचें प्रख्यात देवस्थान आहे. देवालय प्रशस्त दगडी असून भोंवतीं फरसबंदीचें पटांगण व उंच कोट आहे. शंखचक्रगदाधारी चार हातांची विष्णू मूर्ति सारखी उभी आहे. मी येथील पुजाऱ्यांना विचारिलें, याला सूर्यनारायण कसें ह्मणावयाचें? याचा सप्ताश्वाचा रथ कोठें आहे? तर त्यानें सांगितलें कीं, याचे बैठकीस सात घोड्यांचीं तोंडें दाखविलेलीं आहेत. नीट पाहिल्याशिवाय तीं दिसत नाहींत. ही मूर्ति प्रभास तीर्थाहून एका साधू-बरोबर आली असें तेथील लोक सांगतात. प्रभास येथें ह्यासुद्धां बारा आदित्य मूर्ती होत्या, त्यापैकीं ही आहे असें तिच्या सादृश्यावरून दिसतें. तेथें आतां अशाच अकरा राहिल्या आहेत. प्रभासास मी गेलों होतों व त्याचें वर्णन पुढें आहे. तेथील कनकादित्याचे देवळांतही गेलों होतों. पण त्यांत अकरा मूर्ती दिसल्या नाहींत, कदाचित् त्या निरनिराळ्या देवळांत असतील! पण मला त्यांचा शोध लागला नाहीं. ह्या देवळाचा जीर्णोद्धार बाबुराव केशव कुळकर्णी ह्यांनीं शंभर वर्षांपूर्वी केला असा शिलालेख आहे. देवळाच्या मानानें सभामंडप लहान व लाकडी आहे, व तो प्रसिद्ध नाना शंकरशेट यांनीं बांधिला असें

सांगतात. पण तें पटण्यासारखें नाहीं. नाना शंकरशेटला मुलगा होत नव्हता, तो त्या कनकादित्याच्या प्रसादानें झाला ह्मणून त्यानें हा बांधून आपला नवस फेडला. पण शेटजींच्या प्रख्यात नांवाला व त्या मंगल प्रसंगाला हा मुळींच शोभण्यासारखा नाहीं. कारण, सभामंडपास सुमारें पांचशें रुपये तरी खर्च झाले असतील नसतील एवढेंच. एकुलत्या एक पुत्रोत्सवाकरितां व त्यांत देवाकरितां नाना शंकरशेट पांचशेंच खर्च करतील असें कोणासही वाटणार नाहीं. या गांवीं सर्वत्र कऱ्हाडे लोकांची वस्ती आहे. तेथून जवळच

## राजापूर

च्या यात्रेला तेथील गंगा आली असें समजलें ह्मणून आलों. राजापुरच्या गंगेची कधींपासून प्रसिद्धी आहे, हें नक्की सांगतां येत नाहीं. याबद्दल पौराणिक कथाही नाहीं. ह्मणजे पुराणकालानंतर हिची उत्पत्ती झाली असावी असें दिसतें. तरी ही गंगा दोनतीनशें वर्षांपासून माहीत असावी असें तिला राजेरजवाड्यांनीं दिलेल्या वार्षिक उत्पन्नावरून दिसतें. राजापुरापासून खाडीच्या पलीकडे जवळच्या टेकडीवर एका विशिष्ट ठिकाणीं हें गंगेचें स्थान आहे.

राजापुरची गंगा हा एक सृष्टिचमत्कार किंवा दैवी चमत्कार आहे. याची उपपत्ती सायफनच्या तत्वावर किंवा कृष्णाच्या पेल्याच्या तत्वावर आहे, असें ह्मणतात. पण ज्या डोंगरावर ही गंगा उत्पन्न होते त्याच्याहून भोंवतालचे डोंगर फारसे उंच नाहींत, आणि सायफनच्या तत्वाप्रमाणें ह्या गंगेपेक्षां उंचावरून पाणी एकदां तरी यावें लागतें तसा कांहीं प्रकार या परिस्थितीचा दिसत नाहीं. तसेंच फार खोल भूगर्भांतून हा प्रवाह येत असावा, ह्मटलें तर तो प्रवाह उष्ण पाहिजे ! पण तसा तो उष्णही नाहीं व तसा सारखा वाहतही नाहीं. येथें जवळच गंगेला जाण्याचे मार्गामध्यें एक उन्हाळें आहे. त्याचें पाणी कोंबट असतें व तें सदैव वाहात असतें. पण त्या उन्हाळ्याचा ह्या गंगेशीं कांहींएक संबंध नाहीं. ह्या सृष्टिचमत्काराबद्दल मनुष्यानें विचार करावा ह्मणूनच हें यात्रेचें ठिकाण झालेलें असावें.

ही गंगा केव्हां येते याचा नेम नाहीं, तसेंच जाते केव्हां याचाही नेम नाहीं. हिचें येणेंजाणें केवळ सायफनप्रमाणें आहे हें मात्र खरें. गंगेचें पूर्ण आगमन झालें ह्मणजे ती चौदा कुंडांतून एकदम वाहूं लागते. आणि संपूर्ण झालें नाहीं ह्मणजे कांहीं कुंडें वाहतात व कांहीं वाहात नाहींत. अशा अशा-

श्रतीमुळें ही यात्रा कशी करावी अशा मी विवंचनेंत होतों. पण ती एकदां पूर्ण आली ह्मणजे पंधरावीस दिवस तरी जात नाहीं असा आजपर्यंतचा अनुभव आहे. एकदां मात्र दोन तीन दिवसांनींच गेली होती. विटाळ झाला ह्मणून गेली असें ह्मणतात ! पण पुन्हां अनुष्ठान केल्यावर तिचें अवतरण झालें असें सांगतात. असाच प्रकार घोरपडे सरदारांचा दोन तीन वेळां झाला. गंगा आली असें पाहून हे स्नानाकरितां मुद्दाम येत, परंतु त्या ठिकाणीं दाखल होतांच गंगा एकदम जाई. गंगा गेली ह्मणजे तिचा एक थेंबही कुंडांत राहात नाहीं. असें दोन चार वेळां झालें. एकदां तर हे सरदार गायमुखांत उतरे-पर्यंत ती वहात होती. आतां स्नान करणार इतक्यांत ती गेली ! तेव्हां त्यांना अत्यंत वाईट वाटलें. तेव्हां पुजाऱ्यानें सांगितलें, 'गंगेजवळ' अभिमान चाला-वयाचा नाहीं. निरभिमान होऊन हिच्यावर विश्वास ठेऊन निश्चय कराल तर तिचें स्नान अवश्य घडेल.' ते सरदार बाण्याचे क्षत्रिय. त्यांनीं तत्काळ तसा निश्चय करून तरवार उपसून गायमुखाखालीं आपली मान धरिली आणि तिची प्रार्थना केली कीं, तूं मला स्नान घाल. नाहींतर मी तुला आपल्या कंठाचें स्नान घालतों. ( मान कापून घेतों ) अशा निश्चयानें ते बसले व आंतां मान कापणार इतक्यांत गंगा वाहून येऊन तिनें त्यांना स्नान घातलें व देव-भक्ति व विश्वास यांचा दिग्विजय होऊन गंगेचें दैविक सामर्थ्यही जगजाहीर झालें. उत्तरेकडील गंगेचें ह्मणजे भागीरथीचें अवतरण हा जसा मानुष प्रयत्न आहे तसा हा दैवी चमत्कार आहे. मी गेलों तेव्हां मलाही तीर्थविधीची शंकाच होती, पण तसें कांहीं झालें नाहीं. गंगेचें स्नान, पान, तीर्थविधी, ब्राह्मण भोजन, तीर्थप्रसाद वगैरे सर्व प्रकारें उत्तम रीतीनें पार पडून मनाचें मोठें समाधान झालें. या गंगेमुळेंच राजापुरची मुख्यतः क्षेत्रामध्यें गणना होऊं लागली. बाकी राजापूर ह्या नांवावरून ही पूर्वीं एका राज्याची राजधानी होती हें स्पष्ट आहे. पण राजधानी असली तरी तेथें तीर्थमहिमा असतोच असा नियम नाहीं. अर्थात गंगेमुळेंच या ठिकाणास तीर्थमहिमा आला हें उघड आहे.

राजापुरला मुंबईहून बोटीनें जातां येतें व घाटावरून कोल्हापुराहून आणस्कुरा घाटानें राजापुरास चांगली सडक आहे. त्या मार्गानें घाटावरील पुष्कळ श्रीमंत लोक व संस्थानिक गंगा आली ह्मणजे मोटारीनें येतात. मुंबईहून जैतापूर

बंदराला यांवें. जैतापुरास बोट दर्यांत फार लांब उभी असते. तेथून.पडावानें मुसांकाजी येथें येतां येतें व भरतीच्या वेळीं पडावानें किंवा लहान बोटीनें राजापुरास जातां येतें. मूसाकाजीपासून राजापूर एकोणीस वीस मैल असल्यामुळें एका भरतीनें पडाव राजापुरास जात नाहींत. दोन भरतीनें जातात. मुसाकाजी येथें राहण्यास धर्मशाळा व खाणावळी आहेत. हल्लीं लहान बोटीची योजना झाल्यामुळें फारच मजा झाली आहे. बोट दोन तासांमध्यें सहज जाते. बोटीलासुद्धां भरती लागते, कारण, पात्र उथळ आहे, व त्याच ओहोटीवर ती पुन्हां परत येते. गंगेच्या मार्गावर मागें सांगितलेलें उन्हाळें आहे तेथें स्नान करून नंतर डोंगरावर गंगेचें दर्शन करण्यास जातात. गंगा आली म्हणजे चौफेर मांडव बुडून बाजार भरून त्या ठिकाणास शहरची शोभा येते व गंगा गेली म्हणजे हें स्थान अगदीं शुष्क पडतें. येथें गंगेच्या प्रवाहाचीं चौदा स्थानें आहेत. मुख्य कुंड सर्वांत मोठें असून तें चांगलें दगडानें बांधून काढिलें आहे व पाणी वाहाण्याकरितां त्याला गायमुख केलें आहे. कुंड चुनेगची बांधिलेलें नाहीं. गंगा आली म्हणजे चिरांच्या फटींतून सर्व बाजूंनीं एकदम पाणी वाहूं लागतें. कोणी गायमुखाखालीं स्नान करितात. कोणी कुंडांत करतात. कुंड गळाभर खोल आहे. पाणी नेहमीं छातीभर असतें. गंगा आल्यावर तेथें सकाळ संध्याकाळ फारच मजा असते. कोणी स्नान करितात, कोणी गंगेची पूजा करितात, व ब्राह्मणांचा वेदघोष चाललेला असतो. गंगेच्या कुंडांत नानाप्रकारचीं वासाचीं व रंगाचीं फुलें तरंगत असतात. कापराच्या ज्योती तरंगत असतात. धूप, दीप, आरती, वाद्यें, भोजनें, समाराधना यांची सकाळपासून दोन वाजेपर्यंत एकसारखी गर्दी असते. पुढें गर्दी कमी होते, पण गंगा अगदीं रिकामी अपरात्रीशिवाय कधींच नसते. कारण यात्रा एकसारखी येत असते, व मनुष्य आला कीं, प्रथम तो गंगास्नानाला जातो. मग दुसरें काय करायचें तें करतो! कारण येथें येऊन सुद्धां गंगास्नान किंवा प्रत्यक्ष दर्शनही होणें मुष्कीलीचें असतें. मुख्य कुंडाला काशी कुंड म्हणतात. याशिवाय दुसरे ठिकाणीं कुंडें बांधिलीं नाहींत. अगदीं वर वृक्षाखालीं एक लहान.कुंड आहे. गंगा आली म्हणजे प्रथम तें वाहूं लागतें. व गंगा जांत चालली म्हणजे शेवटीं हें बंद होतें. ह्यामुळें यासच गंगाबाईचें मूळ स्थान म्हणतात. पण या सर्व कुंडांतील उष्णोदकाचें प्रमाण सारखें नसतें. यांवरून या सर्वांचा एकच झरा असावा असें वाटत नाहीं. कधीं कधीं सर्व

कुंडेही वाहात नाहींत, कांहीं मात्र वाहातात. पण अशी थोडी वाहूं लागलीं ह्मणजे गंगा लवकर जाण्याचा संभव असतो. सबब चौदाही झरे वाहूं लागले ह्मणजेच गंगा आली असें प्रसिद्ध होतें. या गंगेच्या येण्याजाण्याला ऋतुमानांची किंवा कसलीही आवश्यकता नाहीं, ती वाटेल तेव्हां येते. ही आली ह्मणजे पाणी येण्याच्या पूर्वी, कुंडांतून नाचण्याचा कोंडा बाहेर येतो व मग गंगा येते. ही गोष्ट विचार करण्यासारखी आहे. त्याचा संबंध कांहीं समजत नाहीं. आसपास नाचण्याचीं शेतें नाहींत, व तिचे येण्याचे वेळीं नाचण्याचा हंगामही नसतो. नाचण्या न येतां कोंडा तेवढा कसा येतो हें विचार करण्यासारखें आहे. लांबच्या प्रवाशांना गंगा आल्याचें कळतांच त्यांनीं प्रथम गंगा दर्शनास जावें, ह्मणजे त्यांस निराश होण्याचें कारण नाहीं. या गंगेचें पाणी भागीरथी प्रमाणें पांढरें शुभ्र व टिकाऊ असतें. हे झरे अकल्पित येतात ह्मणून कोठें अकल्पित झरा वाहूं लागला ह्मणजे गंगा आली असें ह्मणण्याची वहिवाट पडली आहे. अशा सर्व प्रवाहांचें येणेंजाणें आकाशांतील धूमकेतूप्रमाणें अनिश्चित आहे. पण राजापुरच्या गंगेचें अवतरण हें हॅलीच्या धूमकेतूप्रमाणें कांहीं थोडेंसें तरी नियमित आहे. ह्मणजे साधारणपणें ही गंगा तीन चार वर्षांनीं प्राप्त होते असें ह्मणतात. एखादवेळीं अकस्मात येतेही, पण ही तिची नियमित गती नाहीं. तिचें नियमित येणें हें मागें सांगितल्याप्रमाणें दोन तीन वर्षांनीं आहे. पण अलिकडे दहा पंधरा वर्षांत गंगा आली नाहीं. लोकांनीं प्रयत्न करून पाहिले, अनुष्ठानें केलीं पण आली नाहीं. यावरून ती कायमची गेली कीं काय अशी शंका वाटत आहे!

कोणत्याही गंगेवर स्नानाकरितां गेलें असतां बायकांनीं बुरखा घेऊं नये, असें शास्त्र आहे पंजाबी बायका अगदीं नेहमीं बुरख्यांत असतात, पण त्याच गंगेवर आल्या ह्मणजे अगदीं उघड्या होतात. लौकिकार्थ कसेंतरी एक वस्त्र गुंडाळलेलें असतें, व तशा स्थितींत त्या गंगेत स्नान करितात असें पहिल्या भागांत हरिद्वार वर्णनांत आहे. असें असतां येथें येणाऱ्या मराठ्या सरदारांच्या बायका स्नानाचेवेळीं पडदे बांधून स्नान करितात. त्यांचें स्नान होईपर्यंत कोणासही मुख्य काशी कुंडामध्यें स्नानास परवानगी नसते! त्यांतल्या त्यांत एवढी गोष्ट बरी असते कीं, त्यांचें स्नान बहुधा अवेळीं होतें. ह्मणूनच त्या योगानें पुष्कळ माणसांची गैरसोय होत नाहीं. ही बुरख्याची रीत मराठ्यांनीं

मुसलमानांपासून घेतली असावी असें दिसतें. असो. गंगेच्या मुख्य काशी कुंडावर शंकर, पार्वती व गंगा यांची स्थापना आहे. गंगा गेली तरी तेथील क्षेत्रोपाध्ये आळीपाळीनें रोज राजापुराहून येथें दोन तीन मैल येऊन पूजा, नैवेद्य करून जातो. या राजापुरापासून दोन तीन मैलांवर अरण्यांत धोपेश्वर ह्मणून एक रम्य शिवस्थान असून तें या प्रांतीं प्रख्यात आहे. रस्ता जंगली आहे. हेंही अवश्य पाहून यावें. राजापुरची हल्लींची मामलेदार कचेरी ही ईस्ट इंडिया कंपनीची जुनी वखार आहे. ही कंपनीनें १६४९ त बांधली. शिवाजीनें ही १६६१ व १६७० ह्या सालीं लुटली. पुढें ती बंद पडली. ही यात्रा झाल्यावर मी गोकर्ण महाबळेश्वराचे यात्रेस निघालों.

कोंकणच्या बोटी गोव्यापर्यंत म्हणजे

## पणजी

पर्यंत जातात, पुढें जात नाहींत. यामुळें सर्व मंडळीला पणजीस उतरावेंच लागतें. पणजी ही गोंवें सरकारची राजधानी असून पहाण्यासारखी आहे. सर्व व्यवस्था, टापटीप अगदीं रेखल्यासारखी असते. येथील स्थानशोभा व सृष्टिशोभा हीं अशींच अवर्णनीय आहेत. जिकडे तिकडे सपाट भूमि, खाड्या व जलसंचय स्थानें, सर्वत्र नारळी पोफळीचीं बनें पुष्पवाटिका व कृत्रिम शोभिवंत बागा, सर्वत्र मंगलकारक कुंकुमचर्चित रस्ते व घरें व त्यांतून सौंदर्य संपन्न फिरणारी मंडळी व त्यांचे विलास पाहून काश्मिराप्रमाणें हें इंद्राचें दुसरें दक्षिणेकडचें स्वर्गतुल्य नंदनवनच आहे असा भास होतो. बंदर आलें म्हणजे गोंवें परराष्ट्र असल्यामुळें बोटीवरील ब्रिटिश बावटे बदलून लायसन्सचे पोर्तुगीज बावटे लावावे लागतात. बोट बंदराचे बाहेर उभी राहाते. येथें प्रथम गोव्याच्या डॉक्टराकडून बोटींतील सर्व मनुष्यांची शारीरिक तपासणी केली जाते. स्पर्शजन्य किंवा सांथीचे रोगी घेत नाहींत. नंतर बोट बंदराच्या धक्यास लागते. मग कस्टमचे अधिकारी प्रत्येक मनुष्याचें सामान तपासतात व जकातीचें कांहीं सामान असल्यास जकात घेतात. मग लोक धक्यावर उतरल्यावर प्रत्येक मनुष्याचें नांव, गांव, येण्याचा उद्देश किती दिवस राहणार, वगैरे माहिती विचारून घेतात. नंतर उतारूंची सुटका होते. या गोव्याच्या राज्यांत लबाडीबद्दल कडक शासन आहे. एखादा गुन्हेगार

सांपडला किंवा त्याचा संशय आला म्हणजे त्याला कच्च्या कैदेंत महिन्यांचे महिने राहावें लागतें. मग कधीं त्याचा न्याय होईल तेव्हां खरें. यामुळें लोक सहसा लबाडी करीतच नाहींत. कस्टमवर देखरेख करण्यास युरोपियन ( पोर्तुगीज ) असतात. हे पोर्तुगीज आपल्याकडील इंग्लिश गोऱ्याप्रमाणेंच अगदीं शुभ्र व तांबूस रंगाचे असतात. मात्र यांच्या पेहरावांत थोडा फरक असतो. गोंवें पाहिल्यानंतर मी स्टीम लाँचनें जवळच्या मार्मगोव्यास गेलों. या स्टीम लांचला तेथें वाफर ह्मणतात.

## मार्मागोवा

येथें बोटीचा धक्का असून अगदीं धक्यापर्यंत रेल्वे आलेली आहे. ह्या गोव्याच्या बंदराचे धक्के मात्र समुद्रांत फार सुरेख व मजबूत बांधलेले आहेत. हे धक्के सीमेंट कॉन्क्रीटचे फार मोठे दगड बनवून ते यारीनें समुद्रांत टाकून त्यावर हे धक्के बांधिले आहेत. धक्यांमुळें बंदर सुरक्षित झालें आहे. येथें मुंबईच्या बोटींतील माल यारीनें एकदम आगगाडीच्या डब्यांत भरतां येतो. व डब्यांतला माल बोटींत भरतां येतो. मुंबईचा परदेशाचा माल व घाटावरील माल यांची येथें मोठ्या प्रमाणांत घडामोड चालते. मंगलोर लायनीच्या बोटी पणजी बंदर करीत नाहींत. मुंबई सोडली ह्मणजे त्यांचें पहिलें बंदर वेंगुर्लें आणि दुसरें मार्मागोवा असतें. ह्या बोटी मोठाल्या असतात व त्या प्रिन्सेस डाकवरून सुटतात. ह्या रोज सुटत नाहींत. पण जेव्हां सुटतात तेव्हां मुंबईहून बारा वाजतां सुटतात. व रात्रंदिवस चालून सकाळीं सात वाजतां बोट गोव्याच्या धक्याला लागते. बोट लागली ह्मणजे तिच्यांतील मालाची चडाओढ संध्याकाळपर्यंत चालते. आगगाडींतला माल बोटींत जातो व बोटींतला माल आगगाडींत जातो, व रात्रीं आठ वाजतां बोट पुन्हा चालू होते.

मार्मागोवा येथें पोर्तुगीज गव्हर्नर जनरलचा बंगला आहे. म्युनिसिपालटी, शहर, गजबजलेलें आहे, पण पणजीसारखें शोभिवंत नाहीं. येथें रेलवेच्या धर्मशाळा, खाणावळी वगैरे आहेत. मुंबईहून आलेले लोक येथें उतरतात व स्नान, भोजन करून विश्रांति घेऊन पुन्हां संध्याकाळीं ह्याच बोटीवर चढतात. याला बोटीवरच्या अधिकाऱ्यांचा प्रतिबंध नाहीं. मात्र तिकीट जातांना येतांना दाखवावें लागतें. ही बोट सुटल्यावर तिचें पहिलें बंदर कारवार व दुसरें

तदरी. तदरी बंदरावर ती पहाटेस किंवा कदाचित उशीर झाल्यास उजाडल्यावर येते. ही बोट गोकर्णाच्या किनाऱ्यानें जातांना स्पष्ट दिसते. पण गोकर्ण हें बोटीचें बंदर नसल्यामुळें तेथें उभी राहात नाहीं. गोकर्णास बंदर तदरी हेंच आहे. तदरीपासून

## गोकर्ण महाबळेश्वर

गाडीरस्त्यानें डोंगराला वळसा घालून सुमारें चार मैल आहे. पण डोंगरावरून मधल्या रस्त्यानें गेलें असतां दोन मैल आहे. पण ही पायवाट असल्यामुळें माहितीशिवाय जातां उपयोगी नाहीं.

गोंव हें परराष्ट्र असल्यामुळें येथून बोट तदरी बंदरावर आली म्हणजे पुन्हां ब्रिटिशांचे हद्दींत येते, सबब ह्या बंदरीं उतरणाऱ्या लोकांचीही ब्रिटिश कस्टम खात्याकडून कसून तपासणी केली जाते. गोंव्यांतून कांहीं जकातीचा माल आला आहे किंवा काय, याची नीट तपासणी करितात. निदान गोंव्याचें नाणें असल्यास तें इंग्रजी राज्यांत चालत नाहीं, तरी ती चांदी आपल्या राज्यांत आली असें समजून त्याचेवर जकात घेतात. आणि ती फार जबर आहे. सबब गोंव्याचे रुपये किंवा नाणें बरोबर घेऊं नये. गोकर्णाला रेलवे नाहीं. सबब रेलवेनें प्रवास करणाऱ्याला मार्मागोंव्यापर्यंत रेलवेनें येतां येतें. पुढें बोटींत बसलेंच पाहिजे. ह्या बोटी मंगलोरपर्यंत जातात. पुढें मद्रास इलाख्यांतील कंपनीच्या बोटी चालतात, व त्या सर्व कलकत्त्यापर्यंत जातात. बेळगांव व धारवाडकडून सुद्धां मोटारीनें गोकर्णास जातां येतें. गोंव्यास गोकर्णाचे पुजारी यात्रा नेण्याकरितां येतात. त्यापैकीं एका बरोबर बोटींत बसून मी तदरी बंदरावर आलों. गोकर्णास मराठी भाषा क्वचित चालते. पण दुभाषांना म्हणजे पंड्यांना ती साधारण येते.

मजबरोबर माहितगार पंड्या असल्यामुळें आम्ही टेकडीचे मार्गानें गोकर्णास गेलों. ही टेकडी उतरली म्हणजे गोकर्णाची झाडी लागते. गोकर्ण हा मोठा गांव आहे. बाजारही मोठा आहे. मी त्या उपाध्याबरोबर गेलों. त्यानें मला एका कानडी ब्राह्मणाकडे नेलें, कारण तो त्याचा गुमास्ता होता. त्याच्या घरांत पुरुषांना कशीबशी मराठी भाषा येत होती. बायकांना मुळींच समजत नव्हती. मराठी भाषेत लिंगभेद मोठा अनियमित असल्यामुळें

श्रीगोकर्ण-महाबळेश्वर.



( पृष्ठ १२६ )

परकियांस ती फार जाणावतें. मी घरीं आल्यांबरोबर मला प्रथम पुजारी-बाबांनीं उन्ह-पाण्यानें मंगलस्नान घालून नेसावयास पीतांबर देऊन व शाल पांघरावयास देऊन प्रथम महाबळेश्वराचें दर्शन करविलें. कारण पुढें बारा वाजून गेल्यावर देवळाचे दरवाजे बंद होतात, त्यामुळें दर्शन होत नाहीं व एक दिवस फुकट जातो. ह्या महाबळेश्वराची पूजा. होण्यापूर्वी तेथील गणपतींची पूजा व्हावी लागते. हा गणपती उभा लहान मुलांच्या आकृतीचा, डोक्यावर झुलपें राखलेला दोनच हातांचा आहे. चार हात नाहींत. सोंडेवरून हा गणपती असें ओळखावयाचें. हा गोवाऱ्याच्या वेशांत आहे. यानें महाबळेश्वरचें वास्तव्य येथें केलें ह्मणून महाबळेश्वर संतुष्ट होऊन त्यानें अग्रपूजेचा मान याला दिला.

याची पौराणिक कथा अशी आहे रावण हा शंकरभक्त होता. शंकराचे पूजेकरितां त्याला नित्य लंकेंतून हिमाळयावर यावें लागत असे. सबब रावणाचे विनंतीवरून शंकरांनीं त्यांस आपलें आत्मलिंग दिलें. त्याचे दोन भाग करून त्यानें ते दोन कावडींत ठेविले. पण बजाविलें कीं, हे ज्या ठिकाणीं ठेवावयाचे तेथपर्यंत ह्मणजे लंकेस जाईपर्यंत जमिनीवर ठेऊं नको किंवा अस्पृश्य असतां त्यांस शिवूं नको. रावणानें तें मान्य केलें. तो हिमालयांतून गोकर्णापर्यंत जेमतेम मोठ्या कष्टानें आला. हा शंकराचें आत्मलिंग नेत आहे, हें पाहून देवांना फार वाईट वाटलें. कारण हें जर लंकेंत पोचतें तर लंका अजिंक्य होती. सबब रावणाला फसविण्याची कामगिरी त्यांनीं विघ्नहर गणपतीला सांगितली. त्यानें तो कबूल केली व गोवाऱ्याचें रूप घेतलें व जवळ गाई चारूं लागला. त्यास पाहून रावण तेथें आला व त्याला ह्मणाला, 'मला लघवी लागली आहे ह्मणून मी येईपर्यंत ही कावड घेऊन उभा रहा. खालीं ठेऊं नको.' त्यांनीं तें कबल केलें पण बजाविलें कीं, लवकर ये. मी तीन वेळां हाक मारून तूं आला नाहींस तर ही कावड खाली ठेवीन. मला उशीर होतो. रावणानें तें कबूल केलें व विघ्नेश्वरांनीं ती घेतली. नंतर रावण लघवीला बसला. त्याच्या लघवीची एक नदी झाली. ती रावणाची लघवी लवकर आटपते आहे कशाला ? अगदीं सूर्यास्ताची वेळ झाली. तरी रावणाची लघवी सरेना. तेव्हां तो कंटाळला व त्यानें तीन चार हांका मारल्या व त्यानें ती कावड जमिनीवर ठेवली ! त्याबरोबर तीं लिंगें जमिनींत गेलीं. तिचें एक

पारडें परळी वैजनाथ व दुसरें गोकर्ण आहे ! परळी वैजनाथची माहिती तिसऱ्या भागांत सांगितली आहे. तेथेंही याचा खुलासा आहे. आपण जसें शेताच्या बांधावरून चालतों तसा रावण सह्याद्रीवरून चालत होता. त्या दृष्टीनें हीं पारडीं दिसतात. त्यांत गोकर्ण हें विशेष जड असल्यामुळें त्याचें पारडें खांद्याजवळ आलें असावें. हें विशेष जड होतें असें ह्याचें वर्णन पुढें आलेंच आहे.

हीं लिंगें जमिनींत गेल्यावर रावणानें उपटण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. त्यानें हें लिंग उपटण्याकरितां पिळगटलें, पण उपटलें नाहीं. खालीं ह्या लिंगाचा आकार पिळवटलेला आहे असें सांगतात. हें उपटण्याकरितां जसजसा प्रयत्न करी तसतसें तें खालीं जाई. तें पाहून देवांना फार आनंद झाला व त्यांनीं गणपतीस मोठी शाबासकी दिली. रावणानें तें पाहून तो निराश होऊन त्यानें गणपतीच्या डोक्यावर रागासरसा एक ठोसा मारिला. त्यामुळें या गणपतीच्या डोक्यास केशांचा टोप असून मध्यें खळगी आहे. ही रावणानें ठोसा मारल्याची खूण आहे. गणपतीनें हें देवकार्य केलें याबद्दल शंकरसुद्धां प्रसन्न झाले व त्यांनीं माझ्या पूजेच्या आधीं तुझी पूजा होईल, तुझ्या पूजेशिवाय माझ्या पूजेचें फळ त्याला मिळणार नाहीं असा वर दिला. यामुळें प्रथम गणपतीची पूजा करावी लागते. रावण हें लिंग उपटूं लागला त्यावेळीं शंकरांनीं यांत सर्व बळ सांठविलें व हलूं दिलें नाहीं. या कामीं रावणाचासुद्धां गर्व नाहींसा झाला. ह्मणूनच यास महाबळेश्वर ह्मणतात. शंकर आपल्याजवळून चालले ह्मणून पृथ्वी भयाभीत झाली होती. ह्मणून ती गोरूप घेऊन शंकरास शरण गेली. तेव्हां तिची भीति नाहींशी व्हावी ह्मणून श्रीशंकर पाताळांतून अंगुष्टमात्रानें बाहेर पडले, व तिचे कानांत सांगून तिचें सांत्वन केलें. त्याचें हें महाबळेश्वराचें लिंग स्मारक आहे. याचा आकार गाईच्या कानाचा पांढऱ्या दगडाचा असून आंत एक सुपारीएवढें गंडकी शिळेचें लिंग आहे. हें लिंग पाताळांतून स्वयंभू उत्पन्न झालें आहे. किती जरी खणून पाहिलें तरी ह्याचा अंत लागत नाहीं असें ह्मणतात. दर साठ किंवा जास्त वर्षांनीं भोंवतालची जमीन खणून पाताळांतील मोठ्या लिंगाकार शाळुंकेचें दर्शन घेतात. त्यावेळचा थाट अपूर्व होतो. त्यावेळीं भोंवतालची जमीन पुन्हां खणून ते भरण्याच्या वेळीं दिग्बंध करून रत्नें मोतीं याचा खच करून पुन्हां पूर्ववत तें बंद करण्यांत येतें. त्यावेळीं यात्रेचा समुदाय असंख्य जमतो. हजारों रुपये खर्च होतो व अन्न संतर्पण होतें.

हा सोहळा नुकताच सन १९३० सालीं झाला आहे. हा विधी बहुधा चैत्र वैशाखांत करतात. त्यावेळीं स्पेशल बोटी सुटतात, वर्तमान पत्रांत ही गोष्ट प्रसिद्ध होते. दरसालची माही शिवरात्रीची यात्राच कधीं कधीं पंचवीस तीस हजारपर्यंत जमते.

गोकर्णास ईशान क्षेत्र ह्मणतात. पुराणांतरीं व शिवलीलामृतांत याचें महात्म्य फार वर्णन केलें आहे. याशिवाय गोकर्ण महात्म्य ह्मणून अगदीं स्वतंत्र प्राकृत व संस्कृत ग्रंथ निरनिराळे आहेत. त्यांत या क्षेत्रांतील देवतांचें व तीर्थांचें वर्णन पौराणिक पद्धतीनें केलें आहे. व तें अगदीं वाचनीय आहे. या क्षेत्रांत पुष्कळ देवळें आहेत. मुख्य देवालय महाबळेश्वराचें, काळ्या पाषाणांनीं बांधिलें आहे. रचना द्राविडी पद्धतीची आहे. गाभारा व सभामंडप प्रशस्त आहेत. चारी बाजूला दिग्पती व दशावतार ह्यांच्या मूर्ती आहेत. देवळावर तांब्याचा सुंदर कळस आहे. या स्थानाचा महिमा दक्षिणेंत विशेष असल्या-मुळें निरनिराळया शिवभक्तांनीं येथें शंभर दीडशें नंदादीप लाविले आहेत. हे विजेच्या दिव्याप्रमाणें रात्रंदिवस लखलखत असतात. हे सर्व दिवे मिळून गाभाऱ्यांत मंद प्रकाश पडतो एवढेंच. विशेष प्रकाश पडत नाहीं, इतके ते बारीक लकाकत असतात. हे एका कोनाड्यांत ठेवून त्यास कांचेचें दार लाविलें आहे. हा देव महाबली असल्यामुळें देवाला साठ शेर भाताचा रोज नैवेद्य अर्पण होतो ! रोज पंचामृती अभिषेक असून त्रिकाल षोडशोपचारें पूजा होते. यात्रेकरूला पूजेबद्दल येथें देवस्थानचा कर आहे. एकादष्णीस सवा रुपया व लघुरुद्र, महारुद्र, अतिरुद्र यांस अनुक्रमें पन्नास, साठ आणि दीडशें रुपये कर आहे. याशिवाय शंकराचे गाभाऱ्यांत दक्षणा व उपाध्येबोवांची दक्षणा निराळी असते. संस्थानांत हे पैसे भरून पावती पूजेंत ठेवल्याशिवाय ही कृत्यें करण्याचा कोणाला अधिकार नाहीं. संस्थानची कचेरी जवळच पडवीमध्यें आहे. नुसती पूजा किंवा बेल वाहाण्यासही चार आणे कर आहे.

या मुख्य देवळाशिवाय आणखी त्याचे आवारांत वीस देवळें आहेत. त्यांत जवळच पाण्यांत आदि गोकर्णाचें लिंग आहे. त्याचेपलीकडे वीरभद्राचें देवालय नंतर गणपतीचें. या गणपतीची हकीकत मागें सांगितली आहेच. त्यापलीकडे ताम्र गौरीचें देवालय आहे. हिचीही अशीच पौराणिक कथा आहे. —रावणानें शंकराला प्रसन्न करून त्यानें त्याजवळ पार्वतीप्रमाणें सुंदर बायका

मागितली. शंकर भोळे, त्यांनीं पार्वतीलाच घेऊन जाण्यास सांगितलें! रावण म्हणाला, ही माझी आई आहे ती नको. तर तशी त्रैलोक्यांत मिळणार नाहीं. ब्रह्मदेवालासुद्धां तशी उत्पन्न करितां येणार नाहीं. याबद्दल त्यानें ब्रह्मदेवाला प्रत्यक्ष विचारिलें. तेव्हां ब्रह्मदेव तसेंच म्हणाला. तेव्हां निरुपायानें रावण पार्वतीला घेऊन चालला. शंकरानेंच जाण्यास सांगितल्यामुळें तिचाही निरुपाय झाला. रावण तिला खांद्यावरून नेत असतां विश्रांतीकरितां त्यानें तिला येथें ठेविलें. तिला पुन्हां हात लावूं लागला, तेव्हां ती अती रागावून लाल झाली. तेव्हां रावण भिऊन पळाला व ती तशीच तेथें राहिली. हल्लीं हिची मूर्ती सिंदूरचर्चित आहे म्हणून हिला ताम्रगौरी म्हणतात पुढें तिनें ध्यान केल्यावरून प्रत्यक्ष शंकर तेथें आल्यावर तिला अत्यानंद झाला. तिनें आपल्या हातांत तागडी घेऊन तिचें एके पारड्यांत भरतभूमींतील सकल देवता व तीर्थें घातलीं व दुसरे पारड्यांत गोकर्ण घातल्याचें दाखविलें आहे. त्यांत गोकर्णाचें पारडें खालीं गेलें आहे असें दाखविलें आहे. हा प्रकार नित्य नियमाचाच आहे. कारण प्रत्येक ठिकाणीं जें तीर्थ किंवा देवता आहे तीच सर्व जगांत मुख्य असून दुसरी त्यापेक्षां कमी ही कवीप्रमाणेंच धर्मशास्त्रकारांची किंवा तीर्थमहात्म्यकारांची रूढी आहे. आणि तात्विक दृष्टीनें किंवा भावनेनें ती खरीही आहे. इतकें निःस्सीम प्रेम जो जेथें ठेवील त्याला त्या स्थळाचें महत्व व देवत्व प्रत्ययास येईल. नेपोलियन बोनापार्टानेंसुद्धां आपल्या आईचें पारडें सर्व जगाच्या पारड्यांपेक्षां जड आहे असें म्हटलें होतें. त्याला सर्व जगापेक्षां त्याची आईच श्रेष्ठ वाटली, आणि तशी ती बाळपणापासून वाटतेही. पण ह्याला ती मरेपर्यंत श्रेष्ठ वाटत होती हें विशेष.

महाबळेश्वराचे दक्षिणेस एका लहानशा मठींत ब्रह्मदेवाची सुमारें चार हात उंचीची छिन्नभिन्न झालेली मूर्ति आहे. मूर्तीचें काम फार सुबक आहे. प्रत्येक तोंडास दाढीजटा, चारी तोंडाचा सुंदर आकार, दृष्टि याचें काम फार सुबक आहे. ब्रह्मदेव अगोदर अपूज्य आहे. त्यांत हा भंगलेला आहे. सबब दगडी चित्राच्या शोभेशिवाय त्याचा कांहीं उपयोग नाहीं. तरी जुन्या कारागीरीचा हा एक सुंदर मासला म्हणून पाहाण्यालायक आहे. येथें अहिल्याबाई होळकरणीचेंही देवालय व अन्नछत्र असून त्यांत तिची विधवाकृत मूर्ति आहे. ह्या सर्व देवतांना ताम्रपर्णा नदीचा वेढा आहे. हिचें पाणी तांबडें असतें, कारण ते तांबड्या जमिनीवरून वाहात येत असतें. याशिवाय शंकर प्रत्यक्ष कैलासाहून

येथें नजीक आल्यामुळें महाक्षेत्र झालें ह्मणून येथें हिमालयाप्रमाणें प्रत्येक देवतेनें येऊन निरनिराळे लिंगाची स्थापना करून आपल्या हेतूकरितां तपःश्चर्या करून इष्टसिद्धि मिळविली आहे. त्यासंबंधानें त्यांच्या नांवावरून त्या त्या शिवलिंगाला नांवें मिळालीं आहेत. येथें ब्रह्मा, विष्णु, अगस्ती, राम, रावण, कुंभकर्ण, इंद्र, चंद्र, सूर्य वगैरे देव येऊन त्यांनीं तपःश्चर्या केली. त्यांचें स्मारक ह्मणून येथें ब्रह्मेश्वर, इंद्रेश्वर, रावणेश्वर, अशा पन्नास पाऊणशें शिवलिंगांची स्थापना झाली आहे. हीं लिंगें ज्याच्या त्याच्या आवडीप्रमाणें लहान मोठीं आहेत. त्यांत रावण कुंभकर्णाचीं लिंगें विशेष प्रशस्त आहेत! एक मुख्य शिवालय असतां निरनिराळया तपस्व्यांनीं आपआपल्या कार्यसिद्धीकरितां निरनिराळीं लिंगें स्थापून तपःश्चर्या केली व इष्टसिद्धि घेऊन गेले. यावरून देवाच्या महात्म्यापेक्षां त्या स्थानचेंच महात्म्य विशेष दिसतें. ती भूमि सृष्टिसौंदर्याच्या दृष्टीनें तप करण्याकरितां किंवा आपल्या कार्याच्या इष्टसिद्धीकरितां नीट शांतपणानें विचार करण्याकरितां योग्य आहे असें त्यांना वाटलें आणि ती तशी आहे असें कोणालाहीं वाटेल, इतकें तें ठिकाण रम्य व विस्तृत आहे. येथील देवाचा रथोत्सवही फार दांडगा होत असतो. तिसऱ्या भागांत हंपी विरुपाक्षेश्वराचे रथाचें जें वर्णन दिलें आहे तें ह्यालाही लागू आहे; ह्मणून आतां येथें देत नाहीं.

याशिवाय येथें निरनिराळीं तीर्थें आहेत. प्रत्येकाचें शिवालय आणि त्याजवळ त्याचें तीर्थ अशीं तीर्थें आहेत. त्याशिवाय वराहतीर्थ, कूर्मतीर्थ, अगस्तीतीर्थ अशीं स्वतंत्र तीर्थें ऊर्फ कुंडें आहेत. सर्व तीर्थांचें तीर्थ ह्मणजे ताम्रपर्णी नदी. कोटितीर्थ ह्मणून एक मोठा तलाव आहे व त्याचे मधोमध सप्तकोटेश्वर नांवाचें शिवस्थान आहे. होडी करून तें पाहून यावें. याशिवाय रामतीर्थ ह्मणून सुमारें एक मैलावर डोंगरांत एक सुंदर झरा सांपडला आहे. तेथें कुंड बांधून जवळ रामाचें देऊळ बांधिलें आहे. हें कुंड गळाभर खोल असून त्यांत एक मोठा पाट पडत आहे, ह्मणून तें फारच आनंददायक आहे. ही जागा एकांतवासाला अत्यंत रमणीय आहे. जवळ समुद्र असल्यामुळें याला विशेष शोभा आली आहे. सर्व तीर्थांचें पाणी उत्तमच आहे. परंतु त्यांत वराह तीर्थाचें डबकें मोठें असून त्याचें पाणी अगदीं काळेंभोर केवळ निळ्या घासलेटच्या रंगाप्रमाणें फारच आश्चर्यकारक आहे. ह्या देवळाचे भोंवतीं जितके

डोंगर आहेत ते सर्व तीर्थें व देवळें यांनीं भरलेले आहेत. आणि त्या सर्वां- मिळून गोकर्ण क्षेत्र झालें आहे. प्रत्येक ठिकाणचा महिमा गोकर्ण क्षेत्र महात्म्यांत सांगितला आहे. ह्मणजे या ठिकाणीं कोणी कशाकरितां तपःश्चर्या केली व शंकर प्रसन्न होऊन त्याला काय लाभ झाला त्याचें वर्णन आहे. येथें समुद्राशेजारीं खडकाचा एक कडा डोंगराच्या एका बाजूस दुभंग होऊन त्यास एक मोठी ताडभर खोलीची चीर ऊर्फ भेग पडली आहे. तींत वरून एकसारखें झऱ्याचें पाणी पडत असतें. ही भेग डोंगरावर वीज पडून तो दुभंग होऊन पडली असावी असें दिसतें. पण कसें जरी असलें तरी तो देखावा पाहण्यासारखा गंभीर झाला आहे यांत शंका नाहीं. अर्थात आर्यांच्या रीतीप्रमाणें त्यांनीं तेथें त्या पाण्याखालीं शिवलिंगाची स्थापना केली, व ह्या देवाचें दर्शन अवश्य घ्यावें, नाहींतर यात्रा सफळ नाहीं असें ठरवून टाकिलें आहे. ह्मणजे यात्रेकरूंनीं याचे दर्शनार्थ येऊन हा सृष्टिचमत्कार जरूर पहावा असें दिसतें. या ठिकाणीं सर्व देवता व तीर्थें आलीं आहेत. त्यांतील हें गंगेचें स्वर्गांतील अवतरण आहे. येथें जाणारानें गोकर्ण महात्म्य वाचून उपाध्यामार्फत तीं सर्व स्थानें पाहून आपल्या यात्रेचें साफल्य करावें.

या प्रांतांमध्यें ह्मणजे वेंगुर्ल्यापासून गोवें व मंगलुरापर्यंत वारांगनांचा वर्ग ह्मणून निराळें स्त्रीराज्य आहे. आणि त्यांचें पोषण येथील धनिक वर्गाकडून फार उत्तम प्रकारें होतें. याचें कारण असें आहे कीं, येथील लोकांचा मोठे- पणाचा मान या वारांगनांवर अवलंबून आहे. जो मनुष्य जितक्या जास्त वारांगना पोशील तितकी त्याची योग्यता मोठी आहे. यामुळें विद्वान, कर्मठ ब्राह्मणसुद्धां या मार्गांत आहेत. ज्यांच्या आंगाखालीं एकही वारांगवा नसेल त्यास हलकट किंवा तुच्छ मानितात. इतर ठिकाणच्या वेश्या व या वारांगना यांत फार फरक आहे. इतर ठिकाणच्या वेश्या वैद्यशास्त्राच्या दृष्टीनें गमनास अयोग्य असतात, या तशा नाहींत. बहुधा त्यांचा मालक एकच असतो. निदान त्यांच्या यजमानांची संख्या अगदीं नियमित असतें. यामुळें ‘ वेश्या असूनी पतिव्रता ’ अशा त्या पतिव्रतेचा निर्बंध पाळतात. यामुळें राजयक्ष्मा- सारख्या दुष्ट रोगांचें प्राबल्य येथें नाहीं. या बायका मुलें मारीत नाहींत. पण त्यांस मुलगा झाला ह्मणजे त्याची योग्यता त्या कमी समजतात. मुलगी झाली ह्मणजे आपली परंपरा पुढें चालेल अशा समजुतीनें त्यांस आनंद होतो. मुलगी

वयांत आली ह्मणजे आपलेकडे जसें तिचें लग्न करतात तसें येथें लग्न करीत नाहींत, तर निका लावतात. जो जास्त पैसे देईल, कुलीन असून रूपगुणानें संपन्न असेल त्यालाच हा मान मिळतो. निका लावलेल्या मनुष्याची योग्यता त्या बहुधा मोठी समजतात. ह्मणजे त्यास पुढें गरीबी आली किंवा त्यानें दुसरीशीं समागम केला व हिनें दुसरा यजमान केला तरी निका लावलेल्या बाईकडे त्यास केव्हांही मुक्तद्वारच असतें. प्रतिबंध नाहीं. बहुतेक दागिने बायकोच्या अंगावर न घालितां ह्या वारांगनेच्या अंगावर घातले पाहिजेत व तिला नट-विली पाहिजे, तिच्या शृंगारावर यजमानाची योग्यता आहे पण. हिचा मान मात्र बायकोपेक्षां कमी असतो. एखादी मुलगी अतिशय नटली किंवा तिनें नखरा केला ह्मणजे तिला हंसण्याची आपली पूर्वी चाल होती, ती याच कानडी तत्वा-वर होती असें दिसतें. यावरूनसुद्धां कोंकणस्थांचा कानडी लोकांशीं पूर्वी संबंध असावा असें दिसतें. पेशव्यांच्या दरबारांत मुसलमान राजे पेशव्यांना लाज-विण्याकरितां रत्नखचित भरजरी पोषाख घालून आले होते, तेव्हां नाना फडण-विसांनीं आपलें सर्व जवाहीर भालदार चोपदारावर घालून जसें त्यांना लाजविलें होतें, तसें कोणत्याही मिरवणुकीमध्यें निरलंकार अगदीं साध्यां पोषाख कलेल्या बायकोच्या मागें तिची आंचणी किंवा पूजा साहित्य घेऊन ह्या वारां-गननें तिच्यामागें मोठ्या अदबीनें चालणें व तिची दासी म्हणविणें यांतच बायकोचा मोठेपणा असतो. व असें करण्यांतही त्या वारांगनांना व त्या स्त्रियांना मोठें भूषण वाटतें. त्या आपल्या यजमानणीला बाईसाहेब, बाईसाहेब असें मर्यादेनें म्हणण्यांत नेहमीं चूर असतात ही फार समाधानकारक गोष्ट आहे. बायकोच्या अंगावर रीतीप्रमाणें दागिने ठेवतात, पण ते किती जरी जास्त असले तरी वारांगनेपेक्षां कमीच ठेवावे लागतात.

ह्यांचा मुख्य धंदा नृत्ययुक्त गायन होय. ह्यांस ह्या बाजूला भावणी (भाव करणाऱ्या) असें ह्मणतात. ह्यांना जे मुलगे होतात ते त्यांच्या मागें तबला व सारंगी वाजविण्याचें काम करितात. ह्या फार स्वच्छ असतात व देवधर्म चांगला पाळतात. मी कोटितीर्थावर रोज पहांटेस स्नानास जात असे, तेव्हां पुष्कळशा अशा बायका (भावणी) तेथें स्नानास येत. त्या चांगल्या सुंदर व प्रेमळ असत. चौकशी करितां ह्याच त्या वारांगना असें समजलें. तेव्हां त्यांच्या-विषयीं मला आदर वाटला. पुष्कळ बायांचे चांगले दुमजली बंगले असून त्यांत

आरामाच्या व मोहक वस्तु, आरसे, तसबिरी, पडदे, नानाप्रकारचीं वाद्यें, छपर पलंग, मच्छरदाणी, चिकाचे पडदे, राघू मैनेचे पिंजरे वगैरे वस्तु जिच्या तिच्या योग्यतेप्रमाणें सौंदर्याप्रमाणें व यजमानाच्या संपत्तीप्रमाणें असतात. ह्या बायका यजमानाच्या घरीं, कांहीं विशेष गायन नर्तनाच्या कारणाशिवाय सहसा जाव-याच्या नाहींत. यजमानानें आपले इच्छेप्रमाणें वाटेल तेव्हां तिच्याकडे जाऊन ह्या आरामाचा उपभोग घ्यावा. इतकेंच नव्हे तर आपल्याकडे एखादा पाहुणा आल्यास त्यालाही तिकडे पानसुपारीस, गाण्याच्या बैठकीस करमणुकीकरिता न्यावें. सारांश, ह्या बायकांच्या वैभवावर तिकडील पुरुषांचें वैभव आहे. ह्मणजे इंद्राच्या दरबारांतील रंभाप्रमाणेंच ह्या नेहमीं मंगलदायक आहेत. ह्यांचें दर्शन केव्हांही अपवित्र समजत नाहींत. यजमानाच्या घरांत कांहीं सुखसोई किंवा आराम मिळावयाचा नाहीं. सगळें वैभव कायतें येथें असावयाचें! ह्मणजे त्यांची बैठकीची किंवा पाहुण्याचें स्वागत करण्याची ही जागा आहे. मी ज्यांच्या-कडे उतरलों होतों त्या उपाध्येबोवांचें असें कांहीं पात्र आहे काय ह्मणून चौकशी करितां, आहे असें समजलें. पण मी ह्यापेक्षां जास्त खोल पाण्यांत शिरलों नाहीं!

ह्या एका गोष्टीशिवाय तिकडील कुटुंबवत्सल पुरुष आचार संपन्न असतात. हा त्या प्रांताचा आचार आहे असें पाहून माझें मन त्यांचेविषयीं वाईट होतें तें बदललें. पण या आचाराचा अतिरेक जसजसें खालीं दक्षिणेंत जावें तसतसें ह्मणजे त्रावणकोर, कोचीं, त्रिवेंद्रमकडे फार आहे. तेथें ही मंडळी प्रवाशाच्या अगदीं गळीं पडते. एखादा यात्रेकरू देवळांत किंवा धर्मशाळेंत उतरलेला पाह-तांच ह्या बाया तेथें जाऊन त्याचे पाय चेपण्यास आरंभ करतातच. ह्मणून इकडे येणाऱ्या यात्रेकरूनें फार सावधगिरी ठेविली पाहिजे. मला प्रथम वाटलें कीं, येथील ब्राह्मण विद्वान असून आचारसंपन्न आहेत, रोज गोकर्ण महाबळे-श्वराची आराधना करितात, असें असून त्यांच्या मागें असा अंधार कसा?-ह्मणजे आह्मी दिलेली दक्षणा ही ह्याच कार्याकरितां खर्च होते की काय? मग आमचें दान सत्पात्रीं न होतां कुपात्रीं होतें, ह्याबद्दल वाईट वाटलें. पण मग समजूत झाली. हा केवळ देशाचार आहे एवढेंच. आपला नवरा असा बाहेर-ख्याली आहे व रांडेची भरती करतो, ह्याबद्दल तिकडील बायकांना वाईट न वाटतां अशी प्रकारची दासी आपल्याजवळ असण्यांतच त्यांना भूषण वाटते. ह्मणजे

त्याबद्दल सर्वांची संमती आहे. मात्र अशा प्रकारच्या बायकांचा व त्यांच्या मुलांचा दायादावर ह्मणजे मूळ इस्टेटीवर कांहीं हक्क नाहीं. त्यांना उचलून जें कांहीं देतील तेवढेंच त्यांचें. तसेंच तिच्या इस्टेटीवर यजमानांचा किंवा त्यांच्या वंशजाचा कसलाही संबंध नसतो. तिचे मुलगे, मुली किंवा आप्तजन ह्यांना ती तिच्या पश्चात मिळते. सारांश, आपल्याकडे जसें प्रत्येक मुलीचें लग्न झालें पाहिजे तसेंच त्याच्यांत प्रत्येक मुलीनें स्वकर्तव्यानें आपला यजमान पसंत केला पाहिजे व कोणत्याही परिस्थितीत व कसल्याही प्रसंगीं, ह्मणजे त्याला गरीबी आली तरी त्याचा आदर राखला पाहिजे. ह्मणजेच तिच्या जन्माचें सार्थक झालें, असें त्या समजतात. यजमानाशिवाय जी राहील ती त्या समाजांत निंद्य समजतात. ह्मणजे आपलेकडील वेश्येप्रमाणें तिचा मान असतो ! सबब याकामीं तिचे आईबाप मुलीच्या लग्नाप्रमाणेंच तिला या स्वयंवराच्या कामीं मदत करितात. ह्याबद्दल मुलाच्या बापाला, आईला, बायकोला किंवा मुलांना कोणालाही वाईट वाटत नाहीं, इतका हा रूढ संप्रदाय आहे. मात्र अशा बायकांचा योगक्षेम मुलानें आपल्या कर्तबगारीवर चालविला पाहिजे. त्याला आपल्या वडिलार्जित इस्टेटीपैकीं कांहीं देऊं देत नाहींत. यापैकीं ज्या बायका आपल्या नृत्य गायनांच्या कसबांत निपूण असतात त्यांस मंगलोत्सवांत तिकडे मुद्दाम बोलावतात. अशा रीतीनें त्या गेल्यास त्यांच्या यजमानास कांहीं वाईट वाटत नाहीं. त्यांनीं हवे तिकडे अशा ख्यालीखुशालीनें पैसे मिळवावे. मात्र आपलें स्वामित्व कबूल करून त्यांनीं जगांत मिरवावें, व आपली कोणतीही गैरसोय करूं नये ह्मणजे झालें. आपल्याकडेही, विशेषतः श्रीमंताकडे कधीं कधीं मंगल प्रसंगीं त्यांस आणतात, हें सर्वांस ठाऊक आहेच. मुंबई पुण्यास पालखी, चौरी, अबदागीर, बँड जसा सवलतीनें सर्वांस मिळतो तसें ह्या प्रांतांत मंगलोत्सवांत इंद्राच्या दरबारच्या रंभाप्रमाणें यांची सर्वत्र पैरवी आहे. अशा समारंभांत जो नायकीण आणीत नाहीं तो अगदींच गरीब समजला जातो. मोठमोठ्या देवांच्या उत्सवांत देवाच्या छबिन्याच्या ( पालखी ) पुढें किंवा कथा कीर्तनापूर्वी किंवा नन्तर आरतीच्या वेळीं त्यांचा जलसा होतो. ह्याबद्दल देवस्थानांतूनही त्यांस बिदागी मिळते. गोकर्ण महाबळेश्वराच्या त्रिकाल पूजेनंतर ह्यांचें गायन नर्तन होत असतें, व त्याकरितां निरनिराळ्या वेळीं निरनिराळ्या बायकांची योजना केली असते. भक्तांच्या मनोरथाप्रमाणें शंकरही याठिकाणीं अलंकार

प्रिय आहेत. स्मशानवासी नाहींत ! हा संप्रदाय येथें केव्हांपासून व कोणी पाडला ह्याबद्दल ऐतिहासिक विश्वासनीय माहिती मिळाली नाहीं, पण ती असावी.

भाषा भिन्न असतांना ह्या प्रांतांतल्या गोष्टी इतक्या बारकाईनें मला एका स्वाध्यायी गृहस्थाकडून ह्मणजे तेथील एका शाळेच्या शिक्षकाकडून समजल्या. यांच्या शाळेंत अशा बायकांच्या मुली घेतात, पण त्यांस बापाचें नांव लावीत नाहींत. त्याठिकाणीं आईचें नांव लावितात. मी गेलों त्यावेळीं (१९१४) अशा मुली गृहस्थाश्रमी मुलीपासून दूर बसावाव्या लागत असत. हल्लीं या प्रगतीच्या काळांत काय होत असेल हें समजत नाहीं. येथील मास्तर हे रत्नागिरीचे राहणारे होते; परंतु त्यांचा आप्त संबंध इकडे असल्यानें लहानपणापासून ते इकडे राहिले होते. तिकडे रत्नागिरी जिल्ह्यांत व्ह. फा. परीक्षा देऊन नंतर त्यांनीं कानडीचा अभ्यास करून इकडील व्ह. फा. परीक्षा दिली. नंतर ते धारवाडच्या कानडी ट्रेनिंग कॉलेजमध्यें गेले व तेथें तिसरें वर्ष होऊन ह्मणजे कानडीचे प्रोफेसर होऊन येथें हेडमास्तर झाले होते. अर्थात त्यांना मराठी व कानडी या दोन्ही भाषा चांगल्या अवगत होत्या. सम व्यवसायी असल्यामुळें त्यांचें व माझें चांगलें जमत असे. यामुळें इकडच्या चालीरीतींची त्यांनीं मला बरीच ओळख करून दिली. गोकर्णांत मला कांहीं दिवस राहावें लागल्यामुळें मला त्यांचा अनुभव प्रत्यक्ष घ्यावयास सांपडत असे.

या प्रांतांत तूप खाण्याचा प्रघात कमी. तुपाऐवजीं खोबरेल तेलाची जिकडेतिकडे रेलचेल असते. फोडणीला व तळणीला सर्वत्र खोबरेल वापरतात. तसेंच तुरीच्या वरणाच्या ऐवजीं मुगाच्या किंवा उडदाच्या वरणाचा संप्रदाय फार आहे. हा उष्ण मुलूख असल्यामुळें रात्रीं सर्व लोक डोक्याला खोबरेल चोळल्याशिवाय निजत नाहींत. येथील खोबरेल फार शुद्ध असतें. यामुळें तें आपल्यासारखें खवट होऊन त्यानें खोकला होत नाहीं. व तें बाधतही नाहीं. देवाच्या पूजेलासुद्धां तुपाच्याऐवजीं ह्या तेलाचीच फुलवात लावतात. येथें उंची खोबरेलही मिळतें. पण तें येथें विकत नाहीं. विलायतेस श्रीमान राजघराण्यांतील मंडळीच्या केसांची शोभा वाढविण्यास तें तिकडे जातें. कारण त्याची किंमत आपल्या इकडल्या लोकांना देववत नाहीं. हिंदुस्थानांतील उंची मालाची अशीच स्थिति जिकडे तिकडे आहे. त्याचा उपयोग दारिद्र्यामुळें व श्रीमंत परराष्ट्रामुळें हिंदुस्थानाच्या लोकांना घेतां येत नाहीं.

कानडा हा भिन्न देश असल्यामुळें येथील लोकांची, विशेषतः बायकांची राहाणी, खाणेंपिणें व नटणें निराळेंच आहे. येथील बायकांना कासोटा नाहीं, पण आंत पुरुषाप्रमाणें लंगोटी असते असें ह्मणतात. गुजराथीप्रमाणें त्यांचा पेहराव असतो. वेण्यांचे प्रकारही निराळे असतात. आपलेकडे बायकांची एकच वेणी असते, पण इकडे दोन तीन वेण्या घालून मग त्यांचा झुबका बांधितात. नाकांत नथ नसते, पण नाना प्रकारचीं कुडीं किंवा मुद्या घालतात. कान सर्वभर टोंचून त्यांत सोन्याच्या साखळ्यांनीं अडकवावयाचे दागिने घालतात. येथें बायकांना कंबरपट्टा घालण्याची चाल फार आहे; मग तो चांदीचा असला तरी चालतो. येथील भांडींकुंडीं हीं गुंडगुळाच्या आकाराचीं बहुधा ओतींव असतात. येथील बायकांना दागिन्यांचा शोक फार आहे. त्यांचे दागिने मोत्यांपेक्षां सोन्याचेच जास्त असतात. येथील बायकांना मर्यादा जरा कमी आहे. बायका पुरुष एका समाजांत जेवावयास बसतात, मात्र पंक्ती निराळ्या करितात. विधवा बायका न्हाव्याला स्वतः हांक मारून पुरुषाप्रमाणें उघड्या ओटीवर बसून आपल्या इच्छेप्रमाणें खुशाल क्षौर करवितात! अशा बायका घरांत स्वयंपाक करीत असतां किंवा नुसत्या घरांत असतां खुशाल डोक्यावरचा पदर काढून वावरत असतात! बाहेर जातांना मात्र डोक्यावर पदर घेतात; पण तोही कसातरी घेतात! ही रूढी पडण्याचें कारण मुख्यतः हा उष्ण मुलूख हें असावें.

येथें एका ठिकाणीं अग्निहोत्र होतें. त्या ठिकाणीं समारंभांत मला जेवावयास जाण्याचा प्रसंग आला होता. त्यावेळीं व आणखी एक दोन वेळां सभाराधनेस गेलों असतां मला हा प्रकार दिसला. येथील होमशाळा शास्त्रोक्त व व्यवस्थित होती. दरवाज्यावर आद्य शंकराचार्यांचें सुंदर रंगित चित्र होतें. हल्लीं आचार्यांचें रविवर्म्याचें प्रचलित असलेलें चित्र मला त्या ठिकाणीं प्रथम पाहावयास मिळालें. त्याच्याच ह्या प्रतिमा असाव्या असें मला वाटतें. हें चित्र पाहून मनाला फार समाधान झालें. यज्ञमंडपांत आंतल्या भागीं वेदी, दक्षिणाग्नि, गार्हपत्य अग्नि यांचीं कुंडें, श्रुक, श्रुवादि यज्ञीय पात्रें मुद्दाम लांकडाचीं विधिपूर्वक तयार केलेलीं येथें पाहावयास मिळालीं. होमशाळेंतील दिक्षीत विद्वान होते, तशी त्यांची पत्नीही यज्ञदीक्षेची माहितगार होती. आचार्यानें मंत्र ह्मटल्याबरोबर तिला न सांगतां ती सर्व कृती पद्धतशीर करीत असे, सांगण्याचें मुळींच कारण पडत नसे. याचें कारण तिला नित्याचा सराव होता हेंच असावें.

येथील जेवणाचे पदर्थांत तांदुळाचे प्रकार विशेष असतात. गहूं फारच कमी. येथें पाटा वरवंटा नसतो. त्या ऐवजीं रगाडा असतो. रगाडा ह्मणजे एक मोठें उखळ असतें व त्यांत बाणासारखा किंवा लंबगोलासारखा मोठा धोंडा फिरवावयाचा असतो. आपल्याकडील वरवंट्याखालीं पदार्थ वारंवार सारावा लागतो तसा ह्या रगाड्यांत सारावा लागत नाहीं, तो आपोआप खालीं येतो! यामुळें आंतील पदार्थ चांगला वाटला जातो. हा रगाडा एक किंवा दोघी बायका जात्याप्रमाणें फिरवीत असतात. काशीप्रमाणें इकडेही पुरुषांनीं बोडक्यानें फिरण्याची वहिवाट आहे. लहान मुलेंही शाळेंत बोडकींच येतात! आपल्याकडे एखादा मनुष्य बाहेर जाण्यास निघाला असतां त्याच्या समोर एखादा बोडका मनुष्य आला तर अपशकून समजतात, तसें इकडे बोडके येणें अपशकून समजत नाहींत. मी एका कानडी ब्राह्मणाकडे उतरलों होतों, ह्मणून मला ह्या सर्व गोष्टी खुलासेवार समजल्या.

ह्या गोकर्ण क्षेत्रांत जोगळेकर नांवाचें एकच घर कोंकणस्थाचें आहे. बाकी सर्व कानडी ब्राह्मणाचीं आहेत. हें घराणें आज तीन चार पिढ्या भिक्षुकी करण्याच्या इराद्यानें येथें आलें आहे व त्यांची भिक्षुकी चांगली चालली आहे. त्यांचा रिवाज आतां अंशतः कोंकणस्थांप्रमाणें व अंशतः कानड्याप्रमाणें झाला आहे. प्रसंगाप्रमाणें ते त्याचें आचरण करितात. कानडी व कोंकणस्थ ब्राह्मण हे द्राविड असल्यामुळें त्यांचा अन्न व्यवहार होतो, पण बेटी व्यवहार अलीकडे कधीं होत नाहीं. पूर्वीं होत असावा असें मराठी भाषेंत अगदीं जवळचे नातेवाईक शब्दावरून ह्मणजे आक्का, आप्पा, अडगुलें, बडगुलें, इत्यादि व्यवहारी शब्दांवरून व आचारावरून दिसतें. याचें वर्णन तिसऱ्या भागांत केलें आहेच. अर्थात हल्लीं तुमचा शरीरसंबंध कसा होतो? ह्मणून मी त्या जोगळेकरांस विचारिलें, तेव्हां कोंकणस्थाशींच होतो असें ते ह्मणाले. पण येथें तर आसपास सुद्धां कोंकणस्थाची वस्ती नाहीं. तेव्हां काय करतां? तर, मुली शोधून आणाव्या लागतात व शोधून द्याव्या लागतात, असें ह्मणाले. यांच्या घरांत मात्र बायकांना सुद्धां मराठी येतें. बाकी कानड्यापैकीं कोणाचेंही घरांत बायकांना मराठी येत नाहीं. त्यांचेकडे महाराष्ट्रीय ब्राह्मण यात्रेकरू येतात. सबब मराठींतील कांहीं ठराविक वाक्यें ह्मणजे—कोठून आला, घरीं कोण आहे, मुलें किती आहेत, सावकाश जेवा इत्यादि वाक्यें त्यांना ठाऊक असतात. तसेंच कांहीं शब्दही ठाऊक.

असतात. बाकी कांहीं येत नाहीं. कारवार व मंगळूर प्रांतांत कोंकणस्थांचीं कांहीं पिढीजाद घराणीं आहेत. त्यांस कानडीच येतें, मराठी येत नाहीं. फार काय, मंगलुरास दोन हजार कोंकणस्थांचें घर आहे. पण त्या सर्वांची भाषा घरींदारींसुद्धां कानडी चालते. गोव्यासही कोंकणस्थांची वस्ती आहे. त्यांची घरगुती भाषा गोंविकरी कोंकणी आहे. आमच्या घरांत दोन सुना रत्नागिरीच्या, दोन गोव्याच्या व दोन मंगलोरच्या केल्या आहेत मग तुमच्या घरीं त्यांच्या भाषेचा कसा काय गोंधळ होतो ? त्यावर ते ह्मणाले, आमच्या घरांत आह्मी मराठी बोलतों. पण आह्मा सर्वांना कानडी व गोव्याची भाषा येते. सबब प्रथम प्रथम कांहीं दिवस दुभाषाचें काम करावें लागतें ! मुलींची बुद्धि लहानपणीं तीव्र असते व नेहमींच्या घसवटीनें त्या लवकर तयार होतात. असा आमचा अनुभव आहे. पण प्रथम प्रथमतरी भाषेसंबंधीं मोठाच गोंधळ होऊन मजाच होत असेल खरी ! होय, पण तें हंसण्यावेरीं नेलें जातें, असें ते ह्मणाले !!

यात्रा नेण्याकरितां ठिकठिकाणचे उपाध्यांचे गुमास्ते जंक्शन स्टेशनवर येतात. त्याप्रमाणें येथील उपाध्यांचे गुमास्ते मार्मागोव्यास आले होते. त्याबरोबर मी यांचेकडे आलों हें मागें सांगितलेंच आहे. येथें आल्यावर मी उपाध्येबोवास आपल्या यात्रेचा कार्यक्रम सांगितला. त्यांत येथून जवळच गेरसप्पाचा प्रख्यात धबधबा आहे तो पाहावयाचा आहे असें सांगितलें. त्याप्रमाणें ही यात्रा आटोपल्यावर त्यांनीं गडी देऊन गेरसप्पास जाण्याची तयारी करून दिली. गड्यास साधारण मराठी येत होतें. त्याला घेऊन मी निघालों. ज्यांना केवळ

## गेरसप्पा

येथेंच जावयाचें असेल त्यांनीं होनावर बंदरावर उतरून तेथून शेरावती नदीचे खाडीनें गेरसप्पापर्यंत गलबतानें किंवा होडींत बसून जावें, व तेथून मलीमणी घाटानें वर जावें लागतें. गेरसप्पा हें घाटाच्या पायथ्याशीं धबधबा पडतो त्याजवळ मोडकें गांव आहे. मलासुद्धां गोकर्णाहून होनावरास यावें लागलें. कारण, गेरसप्पाला जाण्याचा हाच मार्ग आहे. मी आलेला मार्ग कांहीं सडकेचा व कांहीं गलबताचा होता. ह्या मार्गांतून जात असतां इकडील पुष्कळ खेड्यांचा, गांवढळ मनुष्यांचा व शहरांचा सहवास झाला. आमच्या इकडील कोळी, कातकरी लोकांप्रमाणें इकडील गांवढळांची एक जात आहे. यांच्या बायकांच्या हातांत व पायांत कोपरापर्यंत व ढोपरापर्यंत पितळेच्या चपट्या पाटल्यासारख्या

बांगड्या अडकविण्याची चाल आहे. ठाणें जिल्ह्यांत डहाणू, उंबरगांवाकडे फुदगी लोकांच्या बायका असेच वापरतात. पण त्यापेक्षां यांची कडी जास्त आहे. तसेंच यांच्या गळयांत एकाच रंगाच्या, विशेषतः काळया रंगाच्या पोतींचे सर गळाभरून एक ओझें होईल एवढे घालतात ! उष्ण मुलुख, एकीकडे घाम येत असतो, ह्या स्वतः केंसांच्या वर्णाइतक्या कभिन्नकाळया, गळ्यांत पोत काळी, लुगडें काळें, हातापायांत पितळेच्या बांगड्या पिंवळया किंवा स्वच्छ दिसाव्या, पण त्याही कधीं न घासल्यानें काळ्या झालेल्या असतात. काय या सौंदर्याला ह्मणावें ! आणि त्याकरितां डागिन्यांचा काय हा आटोकाट प्रयत्न ! सर्वच मजा आहे ! एकंदर व्यसनाप्रमाणें वाईट संवयीही जास्त सहवासानें मनुष्यास अभिमानास्पद वाटतात. हेंच खरें, दुसरें काय ?

याच रस्त्यावरून जातांना मला एक त्याच जातींतला भिक्षा मागणारा आंधळा एकटाच सडकेनें काठी टेकीत टेकीत जातांना दिसला. तो दोन्ही डोळ्यांनीं साफ आंधळा होता, पण डोळस मनुष्याप्रमाणें सडकेच्या एका बाजूनें सप्सप् चालला होता. शिवाय त्याला इंग्रजी चांगलें बोलतां येत होतें. त्याचें माझें बरेंच भाषण झालें. सडक असली तरी तुला असें बिनधोक कसें चालतां येतें ? समोरून गाडी किंवा जनावर आलें तर कसें होतें ? असें मी त्यास विचारिलें. तो ह्मणाला, मी जन्मांध आहे. पण माझें कर्णेंद्रिय फार तीक्ष्ण आहे. समोरून कोण किती अंतरावरून येत आहे, जनावर आहे किंवा मनुष्य आहे, जनावर असल्यास कोणत्या जातीचें आहे व मनुष्य असल्यास तो स्त्री किंवा पुरुष आहे, काय दर्जाचा आहे, हें मला त्याच्या चालीवरून समजतें ! व त्या धोरणानें मी सडकेवरून चालतो ! कधीं चुकतेंही, पण फारसें चुकत नाहीं ! तुह्मीं आपल्या गड्याशीं बोलत होता त्या बोलण्यावरून तुह्मी मुंबई प्रांतस्थ असून सुशिक्षित आहां, अर्थात तुह्माला इंग्रजी येत असलेंच पाहिजे असें जाणून मी तुह्मांशीं इंग्रजींत बोलूं लागलों. मला मराठी येत नाहीं. कानडी, तेलंगी व इंग्रजी येतें. तुमच्या स्वरोच्चारावरून व बोलण्याच्या लकबीवरून मी हें अनुमान केलें व तें खरें ठरलें. असेंच माझें नेहमीं होतें. तो आंधळा खरा, पण त्याची धूर्तता वाखाणण्यासारखी होती. याची प्रचीती त्या वाटेनें जात असतां समोरून कोण येत आहे, मागें काय चाललें आहे, असें मधून मधून वारंवार विचारून व

निरनिराळे प्रश्न विचारून व त्यांचीं समर्पक उत्तरें ऐकून मी अगदीं थक्क झालों ! ! तुला इंग्रजी भाषा कशी आली ? ह्मणून मी त्यास विचारिलें, तर तो ह्मणाला, मला सहवासावरून आली. माझ्या दैवयोगानें मला एका विद्वान कुटुंबाचा सहवास घडला होता. त्यामुळें मला ही भाषा व्यवहारापुरती आली. एकंदरींत या भिन्न भाषेच्या लांबलचक मार्गात मला ह्या आंधळयाची चांगलीच करमणूक झाली. विद्वानांच्या सहवासानें तो आंधळा विनोदी, रसीक व चांगला मर्मज्ञ झाला होता. कोणाही सुशिक्षिताची त्याच्या संगतीनें करमणूकच होईल, इतकेंच नव्हे तर त्याचें कौतुकही वाटेल. याच्या संगतीकरितां मी त्याच्या बरोबर जरा सावकाश चाललों होतों तरी, माझ्या चालण्यानें आमचा प्रवास कधीं संपला याचें भानच राहिलें नाहीं पुढें वाट फिरल्यावर मी त्यास संतोषानें चार आणे वक्षीस दिले, आणि मनांत आणिलें आंधळयाला जगाचा अनुभव कसा येईल ? त्याचा जन्म फुकट आहे. पण परमेश्वरी लीला मनुष्याच्या बुद्धीला अगम्य व अतर्क्य आहे तो कोठें काय दाखवील याचा नेम नाहीं. ह्याच्या डोळयाकडे पाहिलें नाहीं तर याला आंधळा ह्मणण्याची कोणाची छाती नाहीं. तसेंच याचे डोळे पाहिले ह्मणजे प्रकाश किंवा सूर्य ही वस्तु जगांत काय आहे, हें त्याला समजणें शक्य नाहीं ! तरी त्याचा कोणता व्यवहार अडला आहे ? इतकेंच नव्हेतर त्याची दृष्टी गेल्यामुळें तो इंद्राप्रमाणें सहस्र नेत्रच झाला आहे ! त्याचें प्रत्येक इंद्रीय त्वचेसुद्धां नेत्राचें काम करीत आहे ! हें प्रत्यक्ष मला त्याच्या दीड तासाच्या अनुभवावरून समजलें ! पहिल्या भागांतील हिमालयांतील आंधळा व हा आंधळा यांचें कौतुक पाहिलें ह्मणजे परमेश्वरी लीला अगाध खरी, असा विद्वानांनींही आपला अनुभव लिहून ठेवल्याचा प्रत्यय येतो.

अशा रीतीनें आम्ही होनावर बंदरावर पोहोंचलों, व तेथें एका खाणावळींत उतरलों. होनावर हें तालुक्याचें नांव आहे. तेथून घाटाखालीं गेरसप्पा ह्या ठिकाणीं माल व माणसें नेण्याकरितां खाडींतून भरतीच्या वेळीं गलबतें जातात. त्या दिवशीं भरती दहा वाजतां होती. जेवून जाण्याचा विचार होता. त्याप्रमाणें खाणावळवाल्यास ताकीद दिली होती. पण कोंकणांत टाईम कसलें ? आह्मी जेऊन बंदरांत आलों, तर अकरा वाजून गेले. अर्थात सर्व गलबतें गेलीं. मग विचार पडला. कारण दुसऱ्या दिवसाशिवाय पुन्हां गलबतें नाहींत. परन्तु इतक्यांत कर्मधर्मसंयोगानें एक श्रीमंत मनुष्य जावयास निघाला. अर्थात त्यानें

स्पेशल होडी केली. मी निम्मे नीर देण्यास कबूल होतों तरी त्यानें तो न घेतां केवळ मी सुशिक्षीत आहे असें जाणून मेहेरबानीनें माझी सोय केली. होडी स्पेशल असल्यामुळें आमची होडी दुसरीं गलबतें गेरसप्याला पोंहोचण्यापूर्वी अगोदर गेली. तरी रात्रीचे आठ वाजले. आह्मी आमचे गड्याचे माहितीनें धर्मशाळेंत न उतरतां एका गृहस्थाचें घरीं उतरलों होतों. त्या घरची मंडळी सज्जन होती. त्यांच्या मदतीनें त्यावेळीं घाटांतून माल घेऊन जाणाऱ्या गाड्या आल्या होत्या व रात्रीं दहा वाजतां त्यांचा तांडा निघावयाचा होता, त्यांत त्यांनीं आमची सोय करून दिली. आह्मी रात्रीं दहा वाजतां निघालों तों रात्रभर घाट चालून सकाळीं वर जोगचे धर्मशाळेंत जाऊन उतरलों. जोग हें एक खेडें आहे. या जोगावरूनच त्याला जोगचा धबधबा असें म्हणतात.

येथून आठ वाजतां जेवणखाण उरकून आम्हीं धबधबा पाहणेस निघालों. येथून धबधबा दीड दोन मैल लांब होता. जसजसें जवळ जवळ जाऊं लागलों तसतसें धबधब्याचें गुरगुरणें व वाफेचे लोट वर जातांना दिसूं लागले. जंगल फार होतें. शेरावती नदी पूर्वपश्चिम वाहत होती. तिचे उत्तर बाजूस ब्रिटिशांची हद्द आहे व दक्षिणेकडची बाजू म्हैसूर संस्थानची हद्द आहे. हें जंगल विख्यात व हें स्थान दर्शनीय असल्यामुळें हा धबधबा पाहण्यास सर्व जगांतून लोक येतात. सर्व जगांत जे प्रख्यात धबधबे आहेत त्यापैकीं हा एक आहे. आल्प्स पर्वतांत शिरसोली धबधगा आहे, त्याची उंचा २४०० चोवीसशें फूट. दुसरा इभनसन् त्याची उंची ,२०० बाराशें फूट, तिसरा आरवी याची उंची ११०० अकराशें फूट आहे. हे तिन्ही धबधबे उंच खरे पण त्यांत पाणी फार थोडें आहे. अमेरिकेंतला नायगारा धबधबा मोठा आहे. पण तो रुंदीमध्यें मोठा आहे. याच्या इतका उंच नाहीं. नायगाराची उंची फक्त १६४ फूट आहे.

ह्या धबधब्याची शोभा ऋतुमानाप्रमाणें व दिवसाच्या विभागाप्रमाणें ह्मणजे सूर्योदयापासून सूर्य अस्तापर्यंत, तसेंच चांदिण्या रात्रीं फार अवर्णनीय दिसते. ही निरनिराळी शोभा केव्हांही नेहमीं पाहतां यावी ह्मणून दोन्ही सरकारांनीं आपआपल्या हद्दींत चांगले प्रशस्त व बंदोबस्ताचे रहदारीचे बंगले बांधले आहेत. मोठें जंगल असल्यामुळें हिंस्र पशूकरितां बंदोबस्त चांगला केला आहे. तेथून धबधब्याची शोभा चांगली दिसते. त्यांत

ब्रिटिश सरकारच्या बंगल्यापेक्षां म्हैसूर सरकारच्या बंगल्यांतून देखावा विशेष चांगला दिसतो व सोयीही जास्त केल्या आहेत. पावसाळ्यांत ह्या धबधब्याला माज येत असल्यामुळें व सर्व पाण्याचा लोट एकच होत असल्यामुळें पाहणारास विशेष मौज दिसत नाहीं. जिकडे तिकडे धुकें दिसतें. पण त्यावेळीं धबधब्याचा भयंकरपणा व गडगडाट, मेघगर्जना, अकाळ विक्राळ स्वरूप व मुसळधार पाऊस, सूर्यदर्शन मुळींच नाहीं, मेघांच्या गडगडाटांचा व धबधब्याच्या चढाओढीनें निघालेला आवाज, सोसायट्याचा वारा, मेघ व धुकें यांचा धुमाकूळ, लालीलाल पाणी, वेग भयंकर, यामुळें लांवून होडींतूनसुद्धां नदीपलीकडे जाण्यास फार त्रास पडतो. ह्यामुळें हें ह्याचें रौद्र रूप कोमल व भित्र्या माणसांच्या छातींत धडकी भरण्यासारखें असतें, ह्मणून ते हा प्रसंग टाळतात. पण सुशिक्षित व धाडशी मनुष्यास हें रौद्र रूप पाहण्याची फार इच्छा होते. तसेंच येथील गांवढेगांवचे लोक मर्दानी बाण्याचे असल्यामुळें त्यांना त्यांतच फार मौज वाटून ते ह्यावेळींच तो पाहाण्यास मुद्दाम जातात. पण त्यांनासुद्धां तें तसें स्पष्ट चांगलें दिसत नाहीं.

पण पूर निघून गेल्यावर ह्मणजे पावसाळा संपून शरदृतु लागल्यावर या धबधब्याची शोभा विशेष पाहण्यासारखी असते. मी ह्याचवेळीं ह्मणजे आश्विन अखेर तेथें गेलों होतों. चैत्र वैशाखांत याची शोभा विशेष चांगली दिसते असें ह्मणतात आह्मी तेथें गेलों तों अकरा वाजले होते, परंतु ती वेळ भयंकर जंगलामुळें मला सुप्रभाताप्रमाणें फारच आनंददायी वाटली.

त्यावेळीं धबधब्याचे चार भाग झाले होते. येथील साधारण देखावा असा आहे.—दोहों बाजूस दोन सह्याद्रीच्या फाट्याच्या उतरत्या रांगा ऊर्फ दांड आहेत, व मधील खोऱ्यांतून ही नदी वाहात आहे. हे डोंगर वनश्रीनें अगदीं गच्च भरून गेले आहेत व त्यावरच दोन्हीकडे दोन बंगले बांधले आहेत. मधील खोऱ्यांतून शेरावती नदी वरून वाहात आहे. तिचे पात्रांत धबधब्याचा आडवा धरणासारखा खडक आला आहे, व तो कडा अधांत्र तुटला आहे. धबधब्याची खोली साडे नऊशें फूट आहे, असें सरकारनें प्रसिद्ध केलें आहे. हें धरण सह्याद्रीचे अगदीं शिखराजवळ आहे. कड्याच्या कांठाशीं नदीचें पात्र २२३० फूट रुंद आहे.

ह्या चार धबधब्यापैकीं सर्वांत मोठा धोत पडतो त्यास राजा फॉल किंवा मुख्य धबधबा ह्मणतात. कारण तो सर्वांत मोठा आहे. हा सुमारें पांच फूट खोल अशा काटकोनचौकोनाकृती गायमुखासारखा आहे. ह्याच्या दक्षिणेस सुमारें ३०० ३५० यार्ड अंतरावर एक त्यापेक्षां लहान धबधबा आहे. त्याचें नांव रोअर किंवा रावण, ह्मणजे नेहमीं ओरडणारा असें आहे. कारण तो एका खालीं एक कड्यावरून आदळत आदळत जाऊन मुख्य प्रवाहास जाऊन मिळतो. हा भयंकर गर्जना करीत जातो ह्मणून यांस रोअर ह्मणजे ओरडणारा असें इंग्रजींत नांव मिळालें आहे. या धबधब्याच्या दक्षिण बाजूस असाच सुमारें ७०० फूट अंतरावर एवढाच प्रवाह खालीं पडत आहे. तो अग्नीच्या ह्मणजे दारूच्या बाणाप्रमाणें सूं सूं करीत कमानदार वळण घेऊन पुढें फुटून त्याचे लहान लहान गोळ्याप्रमाणें असंख्य पाण्याचे गोळे व तुषार होऊन खालीं पडतात. त्यावर सूर्यकिरण पडले ह्मणजे प्रकाश किरणांचे नियमाप्रमाणें ते गोळे तांबडे, हिरवे, पिवळे वगैरे सात रंगाचे तारे दिसतात. ह्मणून यास रॉकेट ह्मणजे बाण असें इंग्रजींत अन्वर्थक नांव मिळालें आहे. ह्याचेपुढें २०० यार्डावर लेडी नांवाचा चवथा प्रवाह आहे. हा अगदीं शेवटीं असल्यामुळें यांस मोठा वेग नाहीं. तरपिण तो ज्या वाटोळ्या दगडाच्या कड्यावरून खालीं पडतो त्यामुळें त्याचा प्रवाह विदारून युरोपियन लेडीच्या पाठीमागल्या झग्याप्रमाणें त्याचा विस्तार दिसतो, व तसा भास होतो. यामुळें त्यांस लेडी हें योग्य नाव मिळालें आहे. ह्या धबधब्याच्या पडण्यामुळें त्या मागच्या खडकांत मोठमोठे कपारे सुरक्षीत राहिले आहेत. ते पोखरून त्यांत लक्षावधी पाकोळ्या, पारवे, घिरट्या घालून शेतांतून आणलेले दाणे अशा ह्या अवघड जागीं आपल्या पोटाकरितां ठेवितात. पण उद्योगी आणि धाडशी माणसें अशाही अवघड जागीं शिकयानें जाऊन त्या कोठ्या फोडून खंडोच्या खंडी धान्य घरीं आणतात! मधमाशाप्रमाणेंच या आहेत. यांनीं आपल्या लहानशा चोचीनें मिळविलेला हा घास मनुष्य हल्ला करून नेतो, ह्याबद्दल त्यांना कितीतरी वाईट वाटत असेल!! हें मनुष्याला समजावें ह्मणून ह्याचें उट्टे देव मनुष्यावर अतिवृष्टि, अनावृष्टि, रोगांच्या सांथी किंवा भूकंप यांच्या रूपानें काढतो असें वाटतें!!!

ह्या सर्व धबधब्यांची अपूर्व शोभा ते वरून खालीं पडेतोंपर्यंत पाहावयाची असते. अशी शोभा पाहण्याचें एक योग्य ठिकाण येथें आहे. पण तें फार

धोक्याचें आहे. धबधब्याचे उत्तर बाजूस पण धबधब्याचे पश्चिमेस खालीं एक कड्याचें टोंक पुढें आलें आहे. हा कडा मूळ कड्यापासून सुटला आहे. पण तो थोडा पांच सहा टनाचा असून चांगला बसला आहे, पडण्याचा संभव नाहीं. तरीपण मूळ कड्यापासून सुटला असल्यामुळें त्या अधांत्र कड्यावरून पाहणें जोखिमाचेंच आहे. पण सुख हें सुखानें मिळत नाहीं. तें दुःख भोगून व जीव संकटांत घालूनच मिळतें. सुख मिळविण्यास श्रम पडतात, अर्थात सुखाचा आरंभ दुःखांतून व संकटांतूनच होतो. तसेंच सुख सरल्यावर दुःख होतें. अर्थात सुखाचा शेवट दुःखच आहे. ह्मणजे सुख हें पर्वताच्या शिखराप्रमाणें आहे. पर्वताचें शिखर भोंवतालच्या प्रदेशापेक्षां उंचच उंच जातें. अर्थात भोंवतालचे खंदक खोल असतात आणि हे खंदक जसजसे जास्त खोल भयाण व गंभीर असतील तसतशी त्या शिखराची शोभा जास्त असते व भोंवतालचा अद्वितीय देखावा दृष्टीस पडतो. तसेंच पुष्कळ दुःखें व अनावर यातना भोगून जें सुख मिळतें त्याची योग्यताही तशीच अप्रतिम व अनिर्वाच्य असते. ह्मणून शहाणे दुःखाला किंवा संकटाला कंटाळत नाहींत. जे भितात किंवा कंटाळतात त्यांचा नाश होतो.

मी त्या दगडावर मौज पहाण्याकरितां निघालों तेव्हां आमचा गडी ह्मणाला, असल्या संकटांत कशाला जातां? आह्मी कडवे लोकसुद्धां असें साहस करीत नाहीं! पण तेथें गेल्याशिवाय एक समयावत्च्छेदेंकरून धबधब्याची खरी शोभा दिसणार नाहीं. कारण तें टोंक धबधब्याच्या अगदीं पुढें आलेलें आहे; ह्मणून मी जातों ह्मटलें. मी ऐकत नाहीं असें पाहून कुलीही मजबरोबर निघाला पण तो खोलाकडे पाहीना व मलाही पाहूं देईना. कारण तो ह्मणे घेरी येऊन पडाल, कडा अधांत्र आहे व खोली अपरंपार आहे. मी ह्मटलें अरे मनुष्य मरायला खोली कितीशी लागते? त्यापेक्षां ती कितीही जास्त असली तरी सारखीच! अशी त्याची समजूत घालून आह्मी गेलों. तेव्हां तो ह्मणाला, आतां येथें कपडे काढा व उपडे निजा, मान पुढें काढा. असें केलें तरी चक्कर येऊन भीतीनें मनुष्य पडेल ह्मणून तो माझे मागचे पाय गच्च धरून बसला होता. मी मान पुढें काढून कडा हातानें धरून पाहूं लागलों तों खरोखरच अपूर्व चमत्कार दृष्टीस पडला!

ह्या पडणाऱ्या पाण्याचे तीन भाग होतात. एक पाण्याचा धोत कांहीं अंतरापर्यंत दिसतो नंतर दगडावर आपटून त्याचे तुकडे तुकडे होऊन वर्षाव होतो

शेवटीं केरसुणीप्रमाणें लहान लहान तुषार होऊन ते चोहोंकडे फुटून फांकतात. आणि शेवटीं त्याची वाफ होऊन त्याचे ढग बनून तेंच पाणी वर हवेंत पुन्हां उडून जातें. आणि ढगाच्या रूपानें विश्रांति घेण्याकरितां पुन्हां पर्वत मस्तकावर बसतें किंवा जमिनीचा हा धांगड धिंग्याचा नाद सोडून आकाशांत निरनिराळ्या रंगानें व रूपानें विहार करतें ! ! असे खालून वर येणारे ढग व त्यांची घनीभवनाची मजा खरोखर पाहाण्यासारखी असते वर हवा थंड असल्यामुळें सुमारें तीन चार वाजतां पाण्याचे ढग कसकसे बनतात, त्यावर सूर्यकिरण पडून त्यांची शोभा कशी दिसते, हा सृष्टि चमत्कार येथें स्पष्टपणें पाहाण्यास मिळतो व अगदीं थोडें पाणी नदीला मिळून त्याचा प्रवाह सुरू होतो. पण पावसाळ्यांत मोठा पूर येतो तेव्हां त्याच्या आघातानें खालचा काळा खडकसुद्धां फोडून त्यांत १३० एकरीं तीस फूट खोल खळगा पडला आहे ! ह्यापेक्षांही हा मोठा झाला असता पण दरवर्षीं आंत पुराची माती दगड पडून तो बुजतो. जेव्हां तो जोरानें पडतो त्यावेळीं उडणाऱ्या तुषारांची उंची फार मोठी असते व त्यांची चित्रविचित्र शोभा दिसते तशा प्रकारचें वर्णन पुढें गोकाकच्या धबधब्याच्या वर्णनांत केलें आहे ह्मणून येथें केलें नाहीं. ह्या पडणाऱ्या पाण्यावर सूर्यकिरण दिवसा बारा वाजल्यापासून तीन वाजेपर्यंत पडतात त्याच्या आधीं, धबधबा पश्चिमाभिमुख असल्यामुळें व दाट जंगल असल्यामुळें सूर्यकिरण त्यावर पडत नाहींत व तीन वाजल्यानंतर जंगल दाट असल्यामुळें पुन्हां पडत नाहींत. पण ह्या तीन तासांत क्षणोक्षणीं जे देखावे दृष्टीस पडतात ते स्मरणांतून जाणें शक्य नाहीं. मी हें वर्णन दहा वर्षांनंतर करीत आहें. परन्तु तो चमत्कार आज अगदीं माझ्या दृष्टीसमोर दिसत आहे !

ह्या कार्तिकाच्या महिन्यांत पाणी अगदीं स्वच्छ असतें. व त्यावर सूर्यकिरण पडले ह्मणजे ते प्रवाह रुपेरी वस्त्राप्रमाणें दिसतात. त्याच्या खालचा भाग पाण्यांच्या गोळ्यांचा असतो. त्यावर सूर्यकिरण पडले म्हणजे त्या वस्त्रांच्या दशांना नानाप्रकारच्या रत्नांची म्हणजे हिरे, मोत्यें, इंद्रनील, पाच, वगैरे रत्नांची त्याला रंगित झालर लावली आहे, असें वाटतें. नंतर शेवटीं तुषार दृष्टीस पडतात. त्यांवर सूर्यकिरण पडले म्हणजे त्या मूळ वस्त्राच्या चित्रविचित्र रंगाच्या वस्त्राच्या दशाच आहेत असें वाटतें. नगराजा अशाप्रकारचीं वस्त्रें पांघरून व डोक्याला हिरवा वनश्रीचा शालू बांधून मोठ्या गर्जनेनें आपल्यास हें

ऐश्वर्य देणाऱ्या परमेश्वराचे गुणानुवाद गात बसला असतां त्याची बहीण सृष्टि-देवी किंवा वनश्री ही हिरवा शालू नेसून सूर्याचा तेजस्वी दिवा हातीं घेऊन व त्यादिव्यानें त्यावेळीं पडणाऱ्या इंद्रधनुष्याच्या हिरेजडित मखरांत त्यास बसवून त्याला ओवाळीत आहे व ओवाळणी मागत आहे असा मला ह्या वनश्रीचा दिपावळीच्या भाऊबिजेचा अपूर्व थाट दृष्टीस पडला! वनश्री सूर्याचा दिवा खालवर नाचवीत आहे. व नवे निरनिराळ्या रंगाचे ढगरूपी नारळ पुन्हां त्याचे हातांत देत आहे व त्यासुद्धां नगराजाच्या हातून चवल्या, पावल्या, रुपये, हिरे, माणकें, वगैरे असंख्य नवरत्नांच्या वर्षावाची व नाण्यांची चकाकी झडून त्यांच्या मोठ्या मोठ्या आवाजांत खळखळाट होऊन ते तिच्या खालच्या डोहाच्या पदरांत पडत आहेत. मी आपल्या बहिणीला किती तरी देऊं असें त्यांस झालें आहे. तेंच द्रव्य ह्मणजे पाणी पृथ्वी आपल्या पृष्ठावर नद्यांच्या व कालव्यांच्या योगानें पसरून त्यापासून रत्नांपेक्षां श्रेष्ठ असें धनधान्य उत्पन्न करून आपल्या मुलांचें ह्मणजे प्राणिमात्रांचें ती पोषण करिते. व नद्यांच्या प्रवाहाच्या योगानें गलबताच्या व बोटीच्या सहाय्यानें व्यापार वृद्धी करिते!! सारांश दिवाळीचा सण केवळ मनुष्य जातीचाच नसून नवीन धनधान्य समृद्धीमुळें अखिल सृष्टीचा आहे, असें मला येथें प्रत्यक्ष दृष्टीस पडलें. या दिवसांत नवीन धान्यें पिकतात. पाणी अमृताप्रमाणें गोड, स्वच्छ, व विपूल असतें. हवा समशीतोष्ण असते. यामुळें थंडीपासून व उष्णतेपासून विकार होत नाहींत. अन्नाला चव येते. जनजनावरांना चाऱ्याची समृद्धी असते. यामुळें खुराकाशिवाय दूध दुभत्यांचा सुकाळ असतो. भाजीपालाही पुष्कळ होतो. यामुळें सर्व प्राणीमात्राला सृष्टि-निर्मित अर्थात अकृत्रिम व अनुपमेय सुखाचा आनंद होतो तसाच आनंद पुढें लग्नकारणाच्या रूपानें मनुष्यकृतीचा दृष्टीस पडतो पण तो कृत्रिम असल्यामुळें त्यास या सारखी विशेष व सार्वत्रिक शोभा येत नाहीं.

अशा प्रकारची शोभा पाहात व विचार करीत मी त्याठिकाणीं कितीतरी वेळ बसलों होतों. माझी तृप्तीच होईचना. शेवटीं आमचा कुली ह्मणाला अहो दादा काय त्यांत पाहातां? पाणी पडत आहे दुसरें काय तुह्मी कधीं पाणी पाहिलें नाहीं काय? चार वाजले, उठा. आपल्यास जाण्यास रात्र होईल. मी घड्याळांत पाहातों तों खरोखरच चार वाजले. हा इतकावेळ कसा गेला हें मुळींच समजलें नाहीं. मी त्यास ह्मणालों, अरे ज्याच्या करितां मी एवढे पैसे

खर्च करून व त्रास भोगून आलों, तें लक्षपूर्वक पाहूं नको तर काय करूं? एकदां येथून गेलों म्हणजे हें दिव्य मला कधीं दृष्टीस पडणार आहे काय? पण तो म्हणाला तुमची छातीच जबर मी इकडे इतके लोक या धबधब्यावर आणले पण ते ह्या दगडावर गेले सुद्धां नाहींत. मग या खोल दरीकडे पूर्णपणें पाहणार तरी कोठून? आणि तुम्हीतर तासांचेतास पाहात बसलांत तेव्हां काय तुमची छाती! तुम्हाला भय कसें वाटत नाहीं? ह्या टोकापासून हा धबधबा कप्तान न्यूबोल्ट यानें पाहिला त्यानें आपला अनुभवही खालीं लिहिल्याप्रमाणेंच दिला आहे. "या शृंगाच्या अग्रापासून कांहीं अंतरावर उपडा पडून सरपटत सरपटत मी काठाशीं गेलों व डोकें मात्र पुढें नेलें त्यावेळीं माझ्या डोळ्यांस जो देखावा दिसला तो मी जन्मभर विसरणार नाहीं. मी यानंतर व्हेसुवियस, एतना, ह्या दोन्ही ज्वालामुखींचीं सदोदीत धुमसत असणारीं विस्तीर्ण तोंडें पाहिलीं. परंतु गिरसप्पाच्या भयंकर भू गंव्हरांत मी प्रथम दृष्टि फेंकिली त्यावेळीं ज्या मनोवृत्ति माझ्या हृदयांत एकदम प्रगट झाल्या तशा पुन्हां कोठेंही माझ्या अनुभवास आल्या नाहींत"! अर्थात् सर्व जगामध्यें हें दृश्य अप्रतिम खरें! म्हणूनच सर्व जगांतील जिज्ञासु मनुष्य नेमका येथें येऊन जातो.

नंतर आम्ही तेथून निघून वर नदीचें पात्र जेथ आहे तेथून होडीनें पली-कडच्या म्हैसूर सरकारच्या बंगल्यावर गेलों. होडी धबधब्यापासून सुमारें १०० फूट अंतरावरून चालते. पण जर ती प्रवाहांत सांपडून धबधब्याकडे वाहवली तर काय होईल? कल्पनाच्र ती पण तो देखावा पाहून मनांत आली एवढेंच!! दोन्ही बंगले समोरा समोरच आहेत. एका बंगल्यावरून दुसऱ्या बंगल्यापर्यंत जातांना सडक आहे. पण मध्यें ही नदी आहे. दोन्ही बाजूस झाडी अगदी किर्र आहे. मी गेलों त्यावेळीं व्हॉईसराय साहेब हा धबधबा पाहण्यास पंधरा वीस दिवसांनीं यावयाचे होते. यामुळें रस्त्याची सफाई व मरामत बंगल्याचा व्हाईटवॉश वगैरे चालला होता यामुळें बंगला संपूर्णपणें पाहतां आला. हा बंगला म्हैसूर सरकारनें राजकीय पाहुण्याकरितां केला असल्यामुळें पाश्चात्य भर्तीच्या राजभूषणास योग्य असाच तो नटविला आहे. त्याच्या भोंवतीं युरो-पियन पद्धतीचे बाग आहेत. व त्यांत नामांकित युरोपियनांचे संगमरवरी पुतळे आहेत. सर्व थाटमाट नीटनेटका आहे हें सांगणें नकोच. धबधब्याच्या शोभा निरनिराळ्या टिकाणाहून निरनिराळ्या दिसतात. अशा सर्व टिकाणीं प्रशस्त अशीं बाकें टेविलीं आहेत. तेथून एक पायवाटही अगदीं शिडीसारख्या

रस्त्यानें थेट खालपर्यंत गेली आहे. वरून खालीं पाहिलें असतां मनुष्य अगदीं लहान चारपांच वर्षांच्या मुला एवढा लहान दिसतो. वरून खालीं जाण्यास सुमारें पाऊणतास लागतो. पण वर येण्यास मात्र दोन तीन तास लागतात. ह्या वाटेनें फक्त उन्हाळ्यांत जातां येतें. पावसाळ्यांत जाण्याचा उपाय नाहीं. मी समोरच्या ज्या धोंड्यावरून धबधबा पाहिला त्यापेक्षां येथें कांहीं विशेष दिसलें नाहीं. तेथूनच खरी व अपूर्व शोभा दिसते. पण ती सर्वांना साध्य नाहीं; तरी ब्रिटीश बंगल्यापेक्षां या बंगल्यावरून ती जास्त दिसते हें मात्र खरें. आतां रात्रीं चांदण्यांतसुद्धां त्याचें गंभीर स्वरूप दिसतें पण अंधाऱ्या रात्रीं मात्र फार भयंकर रौद्ररूप प्रगट होतें. त्यावेळीं कांहीं उद्योगी लोक त्यावर सर्चलाईट सोडतात. किंवा जळत्या पेंढ्या खालीं सोडतात. किंवा शोभेच्या दारूचे बाण त्यावर सोडतात. त्यांचा प्रकाश धबधब्यावर पडलेला पाहून मनावर फार चमत्कारीक परिणाम होतो. व आपण कांहीं विलक्षण जादूचा देखावा पाहात आहों, असा भास होतो. येथें जंगल मोठें असल्यामुळें त्यांत भयंकरपणाची भर पडते. राजे रजवाडे व युरोपियन लोक येथें वाघ व इतर हिंस्र पशूंच्या शिकारीला येतात.

हा धबधबा पाहाण्यास दुसराही घाटावरून रस्ता आहे. म्हैसूर संस्थानांत शिमोग्यापर्यंत रेल्वे आहे. तेथून हा धबधबा चौसष्ट मैल आहे. शिमोग्यापासून डाकेचा टांगा सकाळीं आठ वाजतां निघतो. तो सायंकाळीं सहा वाजतां पंचेचाळीस मैलावरील सागरला पोहोंचतो. तेथून वीस मैलावर हा धबधबा आहे. तेथें जाण्यास टांगे मिळतात. सडक चांगली असल्यामुळें आतां मोटारीही मिळतात. हाच राजरस्ता आहे पण लांब आहे. ह्या धबधब्यापासून सुद्धां म्हैसूर सरकार वीज उत्पन्न करणार आहे असें ऐकतों. पण कांहीं राजकारणी लल्यामुळें तें राहिलें आहे असें दिसतें; असो. हें पाहत असतांना संध्याकाळ झाली, अंधाराचें साम्राज्य जिकडे तिकडे सुरू होऊन भयानक देखावा दिसण्यास सुरवात झाली. फार रात्र झाली नव्हती फक्त पांच साडेपांच वाजले होते. पण दाट जंगलामुळें असा देखावा दिसूं लागला. आह्मी लवकरच आमच्या मुक्कामाच्या ठिकाणीं गेलों. तों तेथें नुकतीच संध्याकाळ झाली आहे असें दिसलें.

रात्रभर तेथें राहून सकाळीं जेवणखाण करून दहा वाजतां घाट उतरण्यास

आरंभ केला. वर येतांना रात्र अंधारी होती ह्मणून भोंवतालची सृष्टि शोभा दिसत नव्हती. ह्मणून मी ती रात्र गार्डीत निजून काढली. पण परत खालीं येतांना उजेड पुष्कळ यामुळें घाटाची सर्व शोभा दिसली. भर दुपारची वेळ होती. पण उन्ह मुळींच लागलें नाहीं. ह्या जंगलांत बरींच निरनिराळीं झाडें दिसलीं त्यांत मुख्यत्वेंकरून वेताचीं झाडें ऊर्फ त्यांचे जाड वेल फार दिसले. येथें वेताचीं मोठमोठीं अरण्यें आहेत त्यांतून पाहिजे तेवढा लहान मोठा व हवा तेवढा लांब वेताचा तुकडा काढून घेतां येतो. हीं झाडें ऊर्फ वेल यांचीं पानें साधारणतः आपल्या ताडमाडासारखींच पण लहान दिसतात. प्रथम मला तीं ओळखूंही आलीं नाहींत. पण आमचे गड्यानें तीं सांगितल्यामुळें तीं मला समजलीं. या झाडांना कांटे असतात. व पानें शेवटाला करवतलेलीं असतात; त्याचीं सर्व सालें काढलीं ह्मणजे आंत वेत दृष्टीस पडतो. वेतावर यांचें बरेंच वेष्टण असतें. सर्व हिंदुस्थानांत वेताचा पुरवठा मुख्यतः याच मलबार प्रांतांतून होत असावा असें वाटतें. कारण वेताचीं झाडें मला दुसरे कोठेंही दिसलीं नाहींत. वेताच्या उत्पत्तीचें स्थान चीन व त्या सभोंवतालचीं बेटें ह्मणजे हिंदी आर्किपेलेगो महासागरांतील बेटें आहेत. वेत क्वचितच एक इंचापेक्षां अधिक जाड असतो. वेताचे वेल पांचशें सहाशें फूट लांब वाढतात ! व टोकराप्रमाणें त्यांची गुंतागुंत असते. ती सोडवून वेत स्वच्छ करणें हें फार श्रमाचें काम आहे. हे वेत झाडांमधून ओढून कांटेरी पाचोळा काढून तयार करतात. वेत सुकला ह्मणजे त्यांस पिंवळेपणा व चमक येते. कलकत्याच्या वेतास जास्त चमक असते. वेतकामाला भांडवल फार लागत नाहीं. पण कौशल्य जास्त लागतें. हल्लीं हीं कामें आंधळ्यालासुद्धां शिकऊं लागले आहेत.

दुसरें उपयुक्त झाड ह्मणजे चंदनाचें. व्यापारी दृष्टीनें हें फार उपयुक्त आहे. जंगलीं पण फार उपयुक्त अशीं हीं दोनच झाडें येथें मोठ्या प्रमाणांत दृष्टीस पडलीं. याशिवाय बांबू, टोकर यांचीं बेटें बरींच आढळलीं. बांबू व टोकर यांत फरक आहे. बांबू भरींव वटोकर पोकळ फार लांब व जाडा असतो. मोठमोठ्या इमारतींच्या शिड्या व परांच्या बांधण्यास याचा फार उपयोग आहे. हा हलका असून अतीशय मजबूत आहे. पाणी लागलें नाहीं तर याची मजबुती कायम राहते. याशिवाय कृत्रिम झाडें ह्मणजे सरकारनें येथें आतां ठिकठिकाणीं नर्सरी स्थापून रबराचीं झाडें लावण्याचा उपक्रम केला आहे. ह्या उष्ण प्रांताच्या हवेवर मसा-

न्यांच्या पदार्थांचीं झाडें चांगलीं होतात. त्यांत मुख्यत: वेलदोड्याचें पीक चांगलें होतें. वेलदोड्याचें मुख्य स्थान शिरसी आहे. सर्व हिंदुस्थानांत येथूनच स्वदेशी वेलदोडे जिकडे तिकडे जातात. सर्व जंगली झाडांचीं कंत्राटें ऊर्फ तोडी लायसन्सनें देतात.

घाट उतरून खालीं आलों तों वारा फार सुटला, पाऊसही जोराचा पडूं लागला. हा पाऊस अगदीं गोकर्णापर्यंत सारखा पडत होता. परत बोटीचा तपास करतां दर्यांत मोठें वादळ झाल्यामुळें बोट गोव्यासच पडून राहिली आहे तेव्हां निरुपाय झाला. कारण बोटीशिवाय दुसरा जाण्यायेण्याचा मार्गच नाहीं. वादळ संपेपर्यंत पांच सहा दिवस थांबावें लागलें. त्या दिवसांत रोज पहाटे कोटीतीर्थाचें स्नान व महाबळेश्वराचे त्रिकाल दर्शन घेण्याचा परिपाठ ठेविला होता. बोलण्याचा कोणाशीं उपायच नव्हता! ह्मणून मधल्या वेळांत गोकर्ण-महात्म्य संस्कृत मिळालें तें वाचलें. त्यामुळें तेथील निरनिराळ्या ठिकाणचा विशेष तीर्थमहिमा कळला. हें महात्म्य प्राकृत पौराणिकही आहे. इच्छेप्रमाणें वाचावें. प्रत्येकानें त्या त्या ठिकाणचा तीर्थ महिमा अवश्य वाचावा. लहान मोठ्या स्थानाकडे ह्मणून दुर्लक्ष करूं नये. असें माझें सांगणें मूळ पासून आहेच.

येथ सहवास बराच झाल्यामुळें त्या प्रांताच्या निरनिराळ्या जातीच्या माणसांची राहाणी व आचार विचार कळले. त्याचें साक्षिप्त वर्णन मागें केलें आहेच. या प्रांतांत आणखीं जगप्रसिद्ध माल ह्मटला ह्मणजे येथील मातीचीं सुंदर भांडीं होत. मंगलोरी कौलें जगप्रख्यात आहेत. ती माती ह्या प्रांतांतच आहे. यामुळें हीं मृणमय पात्रें फार सुबक व टिकाऊ असतात. ह्यांच्यावर हवेचा परिणाम होत नाहीं. ह्मणजे ह्यांत ठेवलेला माल हवेच्या योगानें सहसा बिघडत नाहीं. आपलेकडील कौलें पाझरतात पण मंगलोरी तेवढीं पाझरत नाहींत. यावर गवत किंवा जंगल उगवत नाहीं; हीं नेहमीं तांबडीं लाल राहातात. ही सुंदर पात्रें पुष्कळ घेऊन घरीं पाठवावीं असें वाटलें. पण उपयोग काय? तीं न्यावयाचीं कशीं? तरीपण तेथील पाणी भरून ठेवण्याचे चंबू मुंबईस विकावयास जातातच. यांचा बाजार पाहिला ह्मणजे हा मातीचा माल आहे असें वाटतच नाहीं. तांब्याचा आहे असें वाटतें!

येथील देवाचे एक पुजारी नारायण भटजी होते त्यांकडे मी उतरलों होतों. यात्रेकरू त्यांचेकडे आला ह्मणजे त्याला माझ्याप्रमाणें उष्णोदकाचें मंगल स्नान

घालून पितांबर नेसावयास देऊन अंगावर तांबडी शाल देऊन पळीपंचपात्री देऊन त्याला प्रथम महाबळेश्वराच्या दर्शनास नेऊन आणावयाचा व मग त्याच्या यात्रेसंबंधानें प्रश्न विचारावयाचे. कीं तो खात्रीचा यजमान झालाच ! तो दुसरे कोणाकडे जावयाचाच नाहीं. नारायण भटजींची शाल नव्हे तर तीर्थ-विधींची माळच पडली असें समजावें !! मी येथें असतां असेच एक महाराष्ट्रीय गृहस्थ बरोबर दोन विधवा बायांसह विचारावयाला मात्र आले ! नारायण भटजींनीं लगेच त्यांचे अंगावर शाल घालून त्यानें त्यास दर्शनास नेलें. मग पुढें बोलणें; त्यांची शाल कधीं वाया जावयाची नाहींच !!! ह्याकरितां त्यांनीं एक शाल व पितांबर स्वतंत्रपणें काढून टेविला होता. पहिल्या दिवशीं यात्रेकरूला हें महावस्त्र मिळावयाचें; मागून दुसरे दिवसापासून त्यांनीं आपलीं वस्त्रें नेसावयाचीं !

नारायण भटजींचे कुटुंबांत बरीच मंडळी बायका पोरें, दोन भाऊ त्यांचीं बायका मुलें मिळून मोठें कुटुंब होत, घरही प्रशस्त होतें. त्यांच्याकडे पांचपन्नास यात्रेकरू आले तरी त्यांचा समावेश होण्यासारखा होता. परंतु जसजशी आपली मंडळी जास्त असेल तसतसे विनाकारण जास्त पैसे द्यावे लागतात ह्मणून कोणी स्वतंत्र जागा जेवण करण्याकरितां व राहण्याकरितां मागितली तरी तशी त्याच्याकडे व्यवस्था होती. त्याप्रमाणें ह्या मंडळींनीं स्वतंत्र जेवणाची व्यवस्था केली होती. मंडळी अशी स्वतंत्रपणें जेवण करूं लागली तरी त्यांना देव ब्राह्मण, दानधर्म करावाच लागतो. मग वड्याचें तेल वांग्यावर काढतात. ब्राह्मण सवाशीण बोलावली ह्मणजे मुलगे, मुली वाटेल तिकडे जेवायला जातात ! व त्यांच्यावर व्रत कैवल्यांचा भडिमार करून अखेर बरेच पैसे उपटतातच ! एकूण त्यांना त्यांच्यापासून मिळवावयाचे तेवढे पैसे मिळवितातच !! त्यांचा तीर्थविधी झाल्यावर अनायासें दुसरे दिवशीं वादळ कमी होऊन बोट आली ती मी पाहिली. ती मंगळुरास जाऊन दुसरे दिवशीं रात्रीं परत यावयाची होती. त्याप्रमाणें आह्मी जावयाचे तयारीस लागलों. दोघांनीं मिळून एकच गाडी केली. व सडकेचे मार्गानें आह्मी तदरी बंदराला आलों. जातेवेळीं उपाध्येबोवांनीं आह्मांला प्रसादाचा नारळ देऊन व आपली पाठवणी वसूल करून घेतली. व शिवरात्रीला जरूर या व देवाचा सुखसोहळा पहा, असा निरोप देऊन ते परत फिरले. व आह्मीं आपल्या मार्गास लागलों. नारायणभटजींसारखे उपाध्ये यात्रेकरूला फार फसवतात खरे. पण ते प्रेमळप-

पणानें फसवितात. व त्यापासून यात्रेची माहिती व रहस्यही समजतें. ते असें करणार नाहींत तर त्यांना पैसे मिळणारही नाहींत. सबब त्यांचा अनादर करूं नये.

बोट रात्रीं दहा वाजतां आली. आम्ही पडावातून बोटींत सुखरूपपणें पोहीं-चलों. रेलवेची गोष्ट निराळी; तरी येथें अपरात्रींसुद्धां जमिनीप्रमाणें व दिवसाप्रमाणें अगदीं लख्ख विजेचा प्रकाश चढाउतराची व्यवस्था आंत व बाहेर चांगली-असल्यामुळें भय मुळींच वाटत नाहीं; पण जेथें समुद्राच्या लाटा उसळत असतात येथें पडाव खालवर नाचत असतो. बोट मात्र मोठी असल्यामुळें हालत नाहीं. तेथें मात्र चढउतरण्यास जरा धैर्य व प्रसंगावधान लागतें. आम्ही निर्धास्तपणें शिडीवर चढून बोटींत बसलों. ह्या बोटी मोठ्या असल्यामुळें प्रत्यक्ष पडाव दरवाज्यावर लागत नाहीं, शिडीवरून जावें लागतें. पण ही शिडी जिन्या-सारखी सुरेख असते. बोटींत बसल्यावर आपण निराळ्याच सुंदर वाड्यांत आलों आहों असा भास होतो. जिकडे तिकडे विजेच्या दिव्यांचा लखलखाट व सर्व व्यवस्था उत्तम असते. वादळाचा धांगडधिंगा किंवा समुद्राचा भयाणपणा मुळींच दिसत नाहीं, मजा वाटते. लहान बोटीप्रमाणें येथें गलिच्छपणा नसतो. शिवाय मंगलुराहून नुकतीच बोट स्वच्छ होऊन आली असल्यामुळें व उतारू ताजे दमाचे असल्यामुळें मनाला हुशारी वाटते. असा दिवसाप्रमाणें रात्रीचाही व्यवहार बिनबोभाट व निर्धास्तपणें चालतो. हा नवीन सुधारणेचाच प्रताप आहे. बोटीवर माणसांची चढउतार होऊन पडाव निघून गेले, व बोट चालूं लागली. जरा इकडे तिकडे केल्यावर अन्धार असल्यामुळें पाहाण्याची मजा कांहींच दिसेना. पहाटे उजाडल्यावर बोट सावकाश चालूं लागली. कारण मार्मागोवा बंदर जवळ आलें असें लोक म्हणूं लागले; लगेच बोटीवर लायसन्सचीं पोर्तुगीज निशाणें फडकूं लागलीं. व बंदराची शोभा दिसूं लागली. लोक शौचविधी मुखमार्जन करून उतरण्याचे तयारीस लागले. व उजाडल्यावर बोट धक्यास लागली. मी ही उतरलों. व रेलवेच्या खाणावळींत गेलों. तेथें स्नानसंध्या करून भोजन उरकून घेतलें. कारण तेथून नऊ वाजतां मेलगाडी निघणार होती. त्यांत बसून मी

## बेळगांव

येथें येण्यास निघालों. बेळगांव हें मिलिटरी स्टेशन आहे. गोव्यास नऊ वाजतां बसल्यावर त्या प्रांताची शोभा पाहात पाहात आमची गाडी घाट चढण्याकरितां

घाटाच्या पायथ्याशीं आली. तेथून ह्या रेलवेचें घाटी इंजिन लागतें. ह्या इंजि-नला प्रत्येक बाजूस दोन याप्रमाणें दोन्ही बाजूस चार सिलिंडरें आहेत. सडक-लांबवून चढाव बेताचा घेऊन दिल्यामुळें अशा एकाच इंजनवरही गाडी वर चढली जाते. इंजनाला मात्र डबलसिलेंडरामुळें दुप्पट शक्ति आलेली असते. वाटेस

## दुधसागर

चा धबधबा सहज पाहण्यास मिळतो येथें जंगल फार नसल्यानुळें दुधसागराचा जलप्रवाह, त्याच्या नांवाप्रमाणें निघणारे त्याचे जलतुषार अगदीं दुधासारखे पांढरे दिसतात. त्यावर सूर्यकिरणें पडल्यामुळें चित्रविचित्र रंगाचे इंद्र धनुष्याचें देखावे सिनेमांतील चित्राप्रमाणें जलद दाखवीत दाखवीत आमची गाडी रिव्हरसिंगप्रमाणें सह्याद्रीचे मध्यावर ह्मणजे

## कॅसलराक

येथे आली. कॅसलराक हें ब्रिटिश व पोर्तुगीज सरहद्दीचें ठिकाण आहे. येथें किल्यावर पोर्तुगीज सरकारचीं निशाणें आहेत ह्यापुढें गाडी ब्रिटिश हद्दींतून

## लोंढा

जंक्शनवर जाते. लोंढ्यास पोर्तुगीच रेलवेचें घाटी इंजन सुटतें. व गाडींतील लोकांची दरोडखोराप्रमाणें नीट तपासणी होते; त्यांना कोठें फिरकूं देत नाहींत. त्यांची प्रत्येक चीजवस्त सक्तीनें उघडी करून पाहातात. फक्त अंगावरचा कपडा सोडून पाहात नाहींत हें भाग्य! गोंव्यास व रेलवेंत ब्रिटिश नाणेंही चालतें पण ब्रिटिश हद्दींत पोर्तुगीज नाणें चालत नाहीं इतकेंच नव्हे तर गोंव्याचे रुपये सांपडले तर ती चांदी परराष्ट्रांतून आपल्या राष्ट्रांत आली असें समजून रुपया मागें सहा आणे जकात घेतात! सबब पोर्तुगीज नाणें कोणीही आपणा-जवळ बाळगूं नये. या तपासणीचा मुख्य उद्देश परराष्ट्रांतील नवा माल जकात चुकवून आपल्या राज्यांत येऊं नये. अशा जकातीच्या प्रत्येक ठिकाणीं ज्या त्या सरकारचा स्वदेशी व स्वजातीचाच मनुष्य असतो. दुसऱ्या जातीवर कोणाचाच भरंवसा नसतो मग तो कितीही विद्वान असला तरी प्रामाणिक-पणाची हमी परराष्ट्र घेत नाहीं. मग स्वजातीच्या मनुष्यांनीं दगाबाजी केली तरी चालते! निदान त्याचा फायदा आपल्या जातीला तरी मिळावा. एवढा

तरी उद्देश त्यांत असतो खास. यामुळें संस्थान मुसलमान असल्यास तपासणारा मुसलमान पोर्तुगीज असल्यास अस्सल पोर्तुगीज त्याठिकाणीं असतो इतर युरोपियन किंवा इकडील बाटे चालत नाहींत. कारण ते धर्मसंख्येला पाहिजे आहेत, पण हिताहिताच्या दृष्टीनें ते नको आहेत! तशी वेळ आली म्हणजे तुम्ही ते तुम्ही व आम्ही ते आम्ही! काम करावयाचें असल्यास आपण जुटीनें करूं, पण पगार घेतांना आमचा श्रेष्ठपणा आहेच! ही रीत सर्वांचीच आहे. मराठे संस्थानांत तपासणारा मराटाच पाहिजे तेथें ब्राह्मणही उपयोगी पडत नाहींत! हा अभिमानाचा व विश्वासाचा प्रश्न आहे, विद्वत्तेचा नाहीं. हिंदुस्थानचे लोक शत्रूंची सुद्धा कामें फार विश्वासानें करितात. असा त्यांचे उत्तेजनार्थ शेरा मारावयाचा पण तसा विश्वासाचा प्रश्न निघाल्यास ते पूर्ण अविश्वासू आहेत असें समजूनच त्यांच्याशीं व्यवहार करावयाचा! ही ब्रिटिशनीति विसरतां कामा नये.

लोंढ्याहून एक फाटा धारवाड हुबळीकडे जातो. दुसरा बेळगांव पुण्याकडे जातो. व एक गोव्याकडे जातो. असें तीन फाट्याचें जंक्शन आहे. मी बेळगांवच्या फाट्यानें बेळगावांस दुपारीं चार वाजतां पोहोंचलों. बेळगांवास उतरण्याचें कारण हें सॅनिटरीयम आहे. जवळच संस्थानिकांचा मुलुख आहे. व जातांना भेटून जा असें येथील माझ्या मित्राचें सांगणें होतें, म्हणून उतरलों. स्टेशनवरून एक मैलावर असलेल्या

## शहापूर


गांवीं आमचे मित्राचे घरीं उतरलों, शहापूर हा गांव सांगली संस्थानांत आहे. दोन्ही गांव अगदीं जवळ जवळ आहेत. त्यामुळें संस्थान व खालसा मुलुख यांच्यांतला फरक चांगला दृष्टीस पडतो. खालसा मुलुखांत केवळ पैशाकडे नजर असते. पैसा मिळाल्यास पुढें मानपान, कुळगोत, शिष्टपणा याचा विचार व्हावयाचा; पण संस्थानांत खानदानीच्या घराण्याचा, कदाचित त्यांचा हात खालीं आला तरी मानमरातब कमी केला जात नाहीं; कुलवंताचा दर्जा कमी मानला जात नाहीं. पैसा काय रंडी मिळविते, हा सिद्धांत अद्याप इकडे संमत आहे. आणि इंग्रजी राज्यांत जो पैसा मिळवील मग ती रंडी असली तरी गव्हर्नरसाहेबसुद्धां तिला अदबीनें सलाम करील! म्हणजे इंग्रज हे राजे नव्हत, व्यापारी आहेत. ते व्यापारी दृष्टीनें राज्य करीत आहेत! खानदानीचें त्यांचें

झातून राज्य होणें नाहीं. फार झालें तर ते आपल्या जातीची खानदानी म्हणजे लॉर्डांची खानदानी किंवा पैसेवाल्यांची खानदानी ओळखतात.

येथील हवापाणी उत्तम आहे. येथें इंग्रजी व देशी रेजिमेंन्टाची छावणी आहे. हवापाणी चांगलें असल्यामुळें लोकही सशक्त आहेत. यामुळें येथील कापड चोपडही सुंदर असून चांगलें धडधाकट असावें लागतें. धारवाडी खणांची प्रसिद्धी सर्व महाराष्ट्रभर आहेच. येथें भाषा साधारणतः कानडी आहे, पण मराठी सर्वांनाच चांगलें समजतें. ती पण व्यवहारांत बोलण्याचा संप्रदाय मात्र नाहीं. येथील देवळें रावळें सुंदर आहेत. मिलिटरी कँप असल्यामुळें मिलिटरीचे जुने कपडे, हातमोजे, ब्लँकेटें, ओव्हरकोट, रेनकोट, वगैरे येथें फार स्वस्त दरानें मिळतात. यामुळें गरिबांची सोय होते. या वस्तूंचा बाजार मोठ्या प्रमाणांत चालतो. दोन चार दिवस मी मित्राकडचा पाहुणचार घेऊन बेळगांवाहून

## गोकाकरोड ऊर्फ धूपदाल

या स्टेशनवर उतरलों. गोकाक रोड स्टेशनपासून गोकाकचा धबधबा सुमारें दोनतीन मैल लांब आहे. जातांना सडक आहे. हा घटप्रभा नदीचा धबधबा आहे. हा सुमारें १८० फूट खोल आहे, फार नाहीं. नदीचे एका अंगास गिरणी व दुसऱ्या अंगास गांव आहे. येथील मजूर गिरणींत काम करण्याकरितां येतात. धबधब्यावरून येण्याचा उपाय नाहीं. म्हणून त्यावर तारांचा झुलता पूल बांधिला आहे. झुलता पूल मी येथेंच प्रथम पाहिला. नंतर हिमालयांत पुष्कळ पाहिले. धबधब्याचे वरचे बाजूस नदीचा प्रवाह फुटून त्याचे ओघ खडकाच्या निरनिराळ्या घळींतून वाहात येऊन कड्याच्या पुढल्या भागावर एकत्र होतात. तेथें नदीचें पात्र सुमारें २०० दोनशें यार्ड रुंद असून खालीं उडी घेण्याचे जागीं फक्त ८० ऐंशीं यार्ड रुंद आहे. पाणी कोसळतें तो कडा साधारण गोमुखासारखा आहे, म्हणून या धबधब्यास अमेरिकेंतील नायगारा धबधब्याप्रमाणें गोकाक असें नांव पडलें. गो—गाय आणि कक्कू—पाण्याचा धोधाटा; यावरून असा हा शब्द साधला आहे. येथें पाण्याचा वेग—पाणी पुष्कळ असतें तेव्हां—एका सेकंदास दहा फूट असतो. पावसाळ्यांत पाणी गढूळ असतें त्यावेळीं धबधब्याची शोभा चांगली दिसत नाहीं, पण आक्टोबरपासून दिसेंबरपर्यंत त्याची शोभा फारच खुलते. पुढें पाणी कमी झाल्यावर ती जाते. जुलै महि—



गोकाकचा धबधबा. (पृष्ठ १५६)

ऱ्यांत म्हणजे भरपावसाळ्यांत ह्या धबधब्यांतून जितकें पाणी पडतें तितकें कोण-त्याही धबधब्यांतून बहुधा पडत नसेल असें म्हणतात.

पाणी खालीं पडतांना दगडावर आपटून त्याचे निरनिराळे प्रवाह होतात. त्यापैकीं एक मुख्य प्रवाह मात्र एकदम खालच्या डोहांत कोसळतो. त्या डोहाचा व्यास कधींकधीं ६०० फूटपर्यंत वाढतो. खोली ४५ ते ६५ फूट असते. याची गर्जना पांचमैल पर्यंत ऐकूं जाते. खालीं पडणाऱ्या तुषारांचें धोत शेंकडों फूट वर उडत असतात त्यावर निरनिराळ्या वेळचीं सूर्यकिरणें पडलीं म्हणजे हिरवीं तांबडीं, पिवळीं अशीं अनेक रंगाच्या फळपुष्पानीं भरलेलीं सुंदर झाडें नाचत डोलत आहेत असा भास होतो. कांहीं तुषारांचीं नाना प्रकारचीं कारंजीं व कमानी होऊन, शोभेच्या दारु गोळ्याप्रमाणें तेथें नाना प्रकारच्या सुंदर निरनि-राळ्या रंगांत रत्नांचा पाऊसच पडत आहे असें वाटतें. सूर्यकिरण फार तेजस्वी पडले म्हणजे जिकडे तिकडे सुवर्ण रौप्याचा बगीचा व गालिचा दिसून डोळे दिपून जातात.

धबधब्याचेवर नदीच्या दक्षिण तीरीं ष्टेशन रस्त्यावर महालिंगेश्वराचें मोठें देऊळ आहे. तेथून चारशें कदमांवर गिरणीजवळ खडकाला एक मोठी भेग पडली आहे. तींत एकदम पांच सहा फूट खालीं उतरल्यावर एका विवरांतून रांगत जावें लागतें. मग दोहीं बाजूंनीं उंच उंच कड्यांमधून जाणारी, आणि वर वेलींचा व करंजाच्या हिरव्यागार पालवीचें आच्छादन असलेली, अशी एक अरुंद वाट थेट धबधब्याच्या कड्याच्या पायथ्याजवळ जाऊन पोहोंचते. ह्या ठि-काणाहून धबधब्याचा खालचा देखावा फारच मनोवेधक दिसतो. मागें सांगि-तल्याप्रमाणें वरून व येथून असे दोन्ही बाजूचे देखावे पाहाण्यासारखे आहेत. सकाळ संध्याकाळीं धबधब्याच्या बाजूस उभें राहून पाहिलें असतां सृष्टिसौंद-र्याचें मोठें भव्य आणि रमणीय चित्र डोळ्यापुढें राहतें, व पाहाणारा कोणीही असो, त्याच्या मनांत सृष्टिकर्त्या परमेश्वराविषयीं पूज्यबुद्धि उत्पन्न झाल्यावांचून राहत नाहीं.

नदीचें पाणी ऋतुमानाप्रमाणें असतें. म्हणजे पावसाळ्यांत फार जोराचें असून उन्हाळ्यांत मोठ्या शिकस्तेनें वीज उत्पन्न करणारे नळ भरण्याइतकें असतें. येथें एका बाजूस नदीचा लहानसा कालवा काढला आहे. त्या कालव्याचें तोंड चांगलें बांधून

काढिलें असून त्यावर दरवाजा बसविला आहे. नदीला पाणी जास्त असल्यास कालव्यांत जास्त येऊं नये म्हणून हवी तेवढी फळी उघतात. अशानें कोणताही ऋतु असला तरी कालव्यांतील पाणी व त्याचा वेग हे नेहमीं कायम ठेवतात. तो वेग नेहमीं इतकाच राखावयाचा असतो, मग नदीला एक थेंब मिळाला नाहीं तरी चालेल ! अशा रीतीनें कालवा बांधल्यावर त्याचें पाणी गाळून नऊ नऊ इंच व्यासाच्या दोन नळांतून बंद करून खालीं धबधब्याचे ठिकाणीं वीज उत्पन्न करणारीं यंत्रें ठेविलीं आहेत तेंथ तें पाणी जातें. व त्या योगानें पाणच-क्कीसारखें एक भलें मोठें चाक रात्रंदिवस फिरत राहून त्याच्या घर्षणानें वीज उत्पन्न होऊन तिचा उपयोग वरील गिरणी चालविण्याकडे होतो. विजेच्या कारखान्यांत माहितगार मनुष्याशिवाय कोणास जाऊं देत नाहींत. खालून वर व वरून खालीं जाण्यास चांगली वाट ठेविली आहे. पण ती अगदीं मागें सांगित-ल्याप्रमाणें शिडीसारखी आहे तींतून मजूर जातात. पण ऑफिसराकरितां विजेची लिफ्ट केली आहे. यामुळें ऑफिसरांना खालीं वर येण्यास कांहीं त्रास पडत नाहीं.

यापुढें गोकाक गांवांत जाऊन तेथील लांकडी सुंदर फळांचे कारखाने पाहाव-याचें, पण ते तेथून दोनतीन मैल लांब आहेत. मला वेळ नव्हता म्हणून गेलों नाहीं. सवड असेल त्यांनीं अवश्य जावें व आपला अनुभव कळवावा. नंतर मी मिरजवरून नरसोबाच्या वाडीस जाण्याकरितां निघालों. मिरज येथील प्रख्यात मिशनरी दवाखाना व कृष्णा नदीच्या कांठचीं सप्त ऋषींचीं स्थानें, तसेंच जवळच असलेला प्रख्यात सांगली गांव व तेथील बाजारपेठ हीं पाहणें राहिलीं. सवड असेल त्यानें तीं अवश्य पहावीं. मिरजहून कोल्हापुरला जाण्या-करितां फाटा फुटतो. त्या फाट्याचें पहिलें स्टेशन शिरोळ रोड आहे. तेथून

## नरसोबाची वाडी

नऊ मैल आहे. चांगली सडक आहे. या प्रांतांत काशिंद्याचीं झाडें फारच आहेत. नरसोबाच्या वाडींत जाण्यास गाडीचे वेळीं वाहनें मिळतात, व क्षेत्रोपाध्येही स्टेशनवर यात्रा नेण्याकरितां आलेले असतात. त्यांच्यामार्फत सर्व सोयी होतात. गाडी मिरजेहून सकाळीं निघते. व सुमारें आठ वाजतां शिरोळ रोडवर येते. वाडीस उतारूकरितां स्वतंत्र धर्मशाळा आहेत. तरीपण उपाध्येबोवाकडे

उतरल्यामुळें बऱ्याच सोयी होतात. मी एकटा असल्यामुळें उपाध्येबोवाकडेसच उतरलों होतों.

नरसोबाची वाडी कृष्णा नदीच्या कांठीं आहे. श्रीसद्गुरु महाराज नृसिंह-सरस्वती हे सुमारें एक तप येथें राहिले होते व अद्यापही त्यांचा अदृश्य रूपानें येथें वास आहे. अशी भाविकांची समजूत आहे, व त्याप्रमाणें प्रत्ययाहि येतो. श्रीगुरू चरित्र व त्यांतील बादशाह यांच्या कालासंबंधानें भारत इतिहास संशोधक मंडळाच्या शके १८३७ च्या इतिहास वृत्तांतांत पृष्ठ १२३ वर शिवचरित्र साहित्य खंड १ पृष्ट ७,८ वर अनुक्रमें श्री. चिंतामण विनायक वैद्य व द. वि. आपटे यांनीं सर्व खुलासा दिला आहे. गुरुचरित्रांतील बहुधान्य संवत्सर माघ वद्य १ शुक्रवार कन्यागत गुरु उत्तरायण इत्यादि योगावरून शके १३८० हा तो काळ येतो. नृसिंहसरस्वतीचा समाधी शक हाच आहे. यावेळीं फेरिस्ता अगर सय्यदअल्ली यांच्या ग्रंथांतून बेदरचा बादशाह ह्मणजेच अल्लाउद्दीन बाहामनी हा असल्याचें दिलें आहे. हाच बादशाह आपल्या पायाचा व्रण बरा करण्याकरितां नृसिंहसरस्वतीचा उपासक बनला होता. तो १३८१ शकांत मरण पावला. कोठें हा शक १३७९ असा दिला आहे. पण १३८१ हाच शक विशेष प्रमाणभूत दिसतो.

कृष्णेच्या सांनिध्यानें व सद्गुरुकृपेनें हें स्थान विशेष पवित्र झालें आहे. हिंदुधर्माचीं अद्यापपर्यंत जीं कडकडीत जागृत देवस्थानें आहेत त्यांत याचा नंबर बराच वर लागतो. अद्यापपर्यंत भक्तांना याचा अनुभव येत आहे. कोणी नास्तीक असेल तरी त्याला या ठिकाणीं मोठा चमत्कार दृष्टीस पडेल. भूत ही लबाडी आहे, देव म्हणजे कांहीं नाहीं, केवळ रज्जू सर्पासारखी भावना आहे; असा ज्यांचा दृढ समज झाला असेल. त्यांनीं एकवेळ येथें येऊन आपली दोन्ही बाजूंची समजूत करून घ्यावी. येथें कृष्णाकाठीं घाटावर दत्तमहाराजांच्या पादुका आहेत. त्या दगडाच्या ओबडधोबडच आहेत. देऊळही अगदीं त्यांच्या पुरतें लहानच आहे. म्हणजे त्यांत कोणासही बसतां येत नाहीं. दक्षिण बाजूनें कोल्हापुराकडून पंचगंगा वाहात आली आहे व तिचा कृष्णेशीं संगम झाला आहे. पंचगंगेच्या अलीकडे कोल्हापूर सरकारची हद्द आहे व पलीकडे कुरूंदवाड संस्थानची हद्द लागते. पलीकडे जाण्यास पंचगंगा नदीवर होड्या असतात. तेथून एक मैल गेलें म्हणजे कुरूंदवाड

गांव लागतो. तेथील पटवर्धन संस्थानिकांचा वाडा, त्यांचें विष्णु मंदीर पाहाण्या-सारखें आहे. श्रीविष्णु मूर्ति तर पाहण्यासारखी आहेच, पण ह्या देवळांत मुख्य गाभाऱ्यास चार दरवाजे आहेत तेही दगडी फळ्यांचे असून दगडी बिजाग-ऱ्यांनीं बसविले आहेत, हें विशेष आहे. दरवाजाच्या काळ्या कुळकुळीत दगडी फळ्या व त्यावरील सुंदर नक्षीचें व जाळीचें काम मी आजपर्यंत कोठेंही पाहिलें नाहीं. दरवाजा फार मोठा आहे असें नाहीं. तो सुमारें सहा फूट उंच व प्रत्येक फळी सुमारें दोन अडीच फूट रूंद आहे. अशा दोन फळया मिळून एक दरवाजा आहे. याशिवाय दर्शनी भागासही दर्शनी जाळ्या बसविल्या आहेत. याशिवाय येथें विशेष पाहण्यासारखें कांहीं नाहीं असें पाहून मी परत वाडीस आलों.

वाडी हें सद्गुरूंचें महास्थान बऱ्याच पुरातन काळचें असून अतिशय कडकडीत सोंवळ्याचें आहे. म्हणून भूतपिशाच्यांनीं त्रासलेलीं माणसें, विशेषतः बायका, ज्यांचीं भुतें कोणत्याही उपायान निघत नाहींत अशीं हट्टी भुतें येथें श्रीच्या प्रसादानें निघून जातात. त्याचप्रमाणें महाव्याधीनें त्रासलेले लोक निरुपाय झाला म्हणजे येथें येऊन श्रीची आराधना करितात. कोणी इष्ट कामना सिध्यर्थ येतात. या सर्व लोकांना ज्याच्या त्याच्या भावाप्रमाणें श्रीचा अनुग्रह होऊन गुण येऊन आनंदानें स्वस्थानीं ते परत जातात. याशिवाय निष्काम सेवा करणारे लोकही येतात. येथें येणाऱ्या भक्तानें मग तो कितीही श्रीमंत असला तरी त्यानें इष्ट कामना सिध्यर्थ मधुकरी मागूनच श्रीची आराधना केली पाहिजे. त्याशिवाय इष्ट फळ मिळत नाहीं, असें म्हणतात. यामुळें येथें माधु-करी मागणारांची संख्या पुष्कळ असते. अर्थात प्रत्येक ठिकाणची माधुकरी पैशा-एवढ्या भाकरीच्या तुकड्यापर्यंत येते. व यामुळें बहुतेक सर्व गांव फिरावा लागतो. अनायासें ती श्रीची सेवाच होते. मोठ्या मनुष्यांना, त्यांतल्या त्यांत श्रीमंतांना माधुकरी मागणें, त्यांतल्या त्यांत एवढ्याशा पैशाएवढ्या तुकड्याकरितां ती मागणें लांछनाचें व अपमानाचें वाटतें; पण करतात काय ? निरुपाय होऊन त्यांस तसें करणें भाग पडतें. लोक तरी काय करतील? माधुकरीच फार असतात,, पण कोणीही माधुकरी घालीत नाहीं असें म्हणत नाहीं हें विशेष आहे. श्रीच्या दरबारीं लहान, थोर, श्रीमंत, गरीब, श्रेष्ठ, कनिष्ठ, हा भेदच नाहीं असा समभाव होतो. चित्त परमेश्वराकडे लागतें. तेव्हांच परमेश्वर प्रसन्न होतो व तो प्रसन्न

झाला म्हणजे त्याला अशक्य असें कांहींच नसतें. कारण त्याच्याच मायेनें त्या उपाधी उत्पन्न झाल्या असतात. त्या त्याच्या कृपेनें नाहींशा होतात. कलियुगांत देवाचा साक्षात्कार क्वचित दृष्टीस पडतो, असें म्हणतात. पण हें खाचित तारक क्षेत्र आहे, यांत शंका नाहीं. हें देवस्थान कोल्हापूर सरकारच्या हद्दींत आहे व त्यास सरकारांतून दोन गांव इनाम आहेत. त्यांच्या वसुलांतून श्रीचा नित्य नैमित्तिक खर्च चालतो. हल्लींच्या ब्राह्मण ब्राह्मणेतर वादांचा येथें कोल्हापुर दरबाराकडून कांहीं प्रश्न निघाला होता. पण श्रीच्या अनुग्रहानें त्यांचा तो नाद सुटून पूर्ववत व्यवस्था सुरू झाली असें ऐकतों. तरी मधून मधून कटकटी ऐकूं येतात. येथें श्रीकृष्णेचें स्नान करण्याची मोठी मजा आहे. पाणी वेताचें वाहतें असून डोह मोठा आहे व घाट मोठा प्रशस्त आहे. या नदीत स्नान करून ओलेत्यानें आलें असतां देवाचा अभिषेक चालू असेपर्यंत श्रीचे पादुकांवर प्रत्यक्ष पाणी घालतां येतें. म्हणजे ही मुदत दहा अकरा वाजेपर्यंत सरासरी असतें. एकदां महापूजा बांधून झाली म्हणजे पाणी घालतां येत नाहीं. महापूजा बांधतांना श्रींच्या पादुकांवर नानाप्रकारचे वस्त्रअलंकार घालून वर श्रीचा चांदीचा मुखवटा घातलेला असतो. हा दर्शनाचा सोहाळा सूर्यास्तापूर्वी एक तासपर्यंत असतो. त्यानंतर संध्याकाळच्या धुपारतीची व्यवस्था होते. सूर्य अस्ताच्या सुमारास कृष्णेच्या घाटावर ब्राम्हण मंडळी भस्म वगैरे लावून संध्या करीत ध्यानस्थ बसतात. समोरून कृष्णेचा प्रवाह जोरानें वाहात असतो. इतर भक्त मंडळी घाटावर श्रींचें नामस्मरण करीत ठिकठिकाणीं बसतात. इतक्यांत दिवाबत्तीची वेळ होते व देवाची धुपारती सुरू होते. त्यावेळीं सर्व भक्तमंडळी आपापल्या वाद्य समुदायासुद्धां हजर असते. आरत्या, दंवे, मंत्रपुष्प यांत सुमारें तास दीड तास जातो.

देवाला आरती ओवाळतांना व त्याच्या धुपाटण्यावर धूप टाकला म्हणजे विलक्षण चमत्कार दृष्टीस पडतो. त्यावेळीं ज्यांच्या अंगामध्यें भुतें असतात त्यांचा एकदम संचार होतो. कोणी सोडवा सोडवा असें ओरडतात. कोणी डोकीं फोडून घेतात. कोणी बेशुद्ध पडतात. भक्तजनांचे ललकारणें जयजयकार वगैरे चालूच असतात. त्यात ह्यांचाहि कल्होळ होतो तेव्हां आश्चर्य वाटतें. जी मंडळी आरतीपूर्वी शुद्धीमध्यें लांब लांब गप्पा मारीत होती त्यांचें एका क्षणांत असें रूपांतर कसें झालें? याचें मोठें आश्चर्य वाटतें! व त्या

ठिकाणीं त्यावेळीं श्रींच्या अद्भुत शक्तीचा, अदृश्य व अमंगळ स्थितींत राहिलेल्या पिशाश्चावर मारा चालल्यामुळें तीं भुतें त्या मनुष्याच्या रूपानें दुःखी होत असतील म्हणून असा प्रकार होत असावा असें स्पष्ट दिसतें. श्रींची शक्ति अदृश्य पिशाश्चावर अशी चालतांना येथें प्रत्यक्ष दिसते. तर मग जे लोक येथें भक्तिभावानें जातात त्यांच्या अदृश्य अशा महत्संकटांचा क्षय होत असलाच पाहिजे, आणि म्हणूनच ज्यांचें चित्त प्रेमी मनुष्यांचे वियोगानें किंवा अन्य कारणानें व्यग्र झालें असेल, किंवा चित्तभ्रम झाला असेल असे लोक चित्तशुद्धीकरितां येथें मुद्दाम येऊन राहतात. ह्या साक्षात्कारामुळें त्या-वेळीं श्रींचे क्षेत्रांत अमंगल वृत्तींचा एकही मनुष्य किंवा अदृश्य योनी राहात नाहीं. अशारीतीनें त्या अदृश्य पिशाच्यास किंवा वृत्तीस रोज सकाळ संध्याकाळ मारा होत गेला म्हणजे तें पिशाच्य, तें झाड (मनुष्य) सोडतें व त्यामुळें त्या मनुष्याची व पिशाच्याची अशी दोघांची मुक्तता होते. भूत सुटल्यामुळें मनुष्य मुक्त होतो व भुताची निंद्य व अपवित्र योनी जाऊन त्यालाहि सद्गती मिळते. मात्र श्रींचा प्रसाद होईपर्यंत राहावें लागतें. एखादी गोष्ट होण्यासारखी नसेल तर तसाहि दृष्टांत होतो. दृष्टांत झाल्यावर मग तेथें राहतां कामा नये.

श्रींचा छबिना धुपारती झाल्यावर निघतो. पालखी उत्तम प्रकारें शृंगारतात. व त्यांत उत्सव मूर्ति बसवून श्रींच्या त्या देवळाभोंवतीं सावकाश दोन तीन वेळा प्रदक्षणा करितात. त्यावेळीं भजनी मंडळींचें भजन, भालदार चोपदारांचें ललकारणें, मधून मधून श्रींचा नामघोष व जयजयकार, भुतांखेताचें ओरडणें, निरनिराळीं वाद्यें, शंख, तुताऱ्या, शृंग, यांचा एकच आवाज व गोंधळ होऊन चित्त अगदीं तन्मय होतें. मुलेंसुद्धां पालखीबरोबर हिंडतात. हा भक्तिभावाचा आनंद सोहाळा अपूर्व होय. ही पालखी आठवड्यांतून एक वेळ म्हणजे दर शनिवारीं निघते. याशिवाय कोणी नवसानिमित्त किंवा हौसेनेंहि काढितात. त्याचा खर्च मात्र त्यांना द्यावा लागतो. उन्हाळ्यांत आज पालखी नाहीं असा दिवस क्वचित असतो. पालख्यांचे वार लागलेले असतात. हें श्रीगुरुदत्तात्रयाचें स्थान आहे. मग शनवारीं पालखी कां निघते? गुरुवारीं कां निघत नाहीं? ह्याचें समाधानकारक उत्तर कोणी दिलें नाहीं. वहिवाट आहे असें सांगतात. आषाढी पौर्णिमेपासून विजया दशमीपर्यंत पावसामुळें पालखी बंद असते. देऊळ व सर्व

घाट पाण्यांत बुडालेले असतात. देऊळ सर्व चुनेगची, लहान देवळीसारखें आहे, यामुळें तें टिकतें. त्यावेळीं पालखींत घालावयाच्या उत्सव मूर्तींचीच वर नियमित ठिकाणीं पूजा करितात. पालखी परत आल्यावर सर्वांस तीर्थप्रसाद देतात. भक्त जनांपैकीं कोणी पालखी काढली असल्यास ते आपआपल्या आवडीप्रमाणें सर्व रात्रभर मंत्र जागरण, भजन, कीर्तन वगैरे करतात. नित्याचा व्यवहार उरकण्यास रोजचे रात्रीचे दहा वाजतात. मग जो तो आपल्या घरीं जातो व श्रींचीं कपाटें बंद होतात.

यात्रेकरूंची पूजा, अभिषेक, पंचामृतपूजा, महापूजा, पालखी काढणें, महानैवेद्य यांतून कोणतेंही दैवी कृत्य अथवा तीर्थयात्रा विधि करणें झाल्यास तेथील उपाध्यामार्फत ह्या सर्व गोष्टी होतात. श्रींचे उत्साह गुरुद्वादशीस ह्मणजे आश्विन वद्य द्वादशीस श्रीदत्त महाराजांच्या उत्सवाची फार मोठी यात्रा भरते. त्या दिवशीं श्रीच्या उत्पन्नांतून येथें मुक्तद्वार अन्नसंतर्पण होतें. ह्या श्रीच्या प्रसादाकरितां फार दूर दूरचे लोक येतात व त्या प्रसंगीं आपला मोठेपणा विसरून अगदीं हलकीं कामें करण्यांतसुद्धां ते आपणास भूषण मानितात. याशिवाय मार्गशीर्ष शुद्ध पौर्णिमा ह्मणजे दत्तजयंती, माघ वद्य पंचमी व दर महिन्याचे पौर्णिमेस श्रीच्या उत्सवाचे सोहळे यथा प्रमाणांत होतात. मंडळी पुष्कळ जमते. त्यावेळीं एवढा मोठा कृष्णेचा घाट, पण माणसांनीं सर्व फुलून जातो. घाटावर जिकडे तिकडे फरशी आहे. जिकडे तिकडे सद्‌गुरू संकीर्तन चाललेलें असतें. वाडीस श्रीगुरुस्वामींच्या महोत्सवाकरितां जाणाऱ्या लोकांकडून तेथील कमेटी दर माणसास एक आणा कर घेते. या कराची मुदत दशमीपासून सुरू होते. दर बारा वर्षांनीं येणाऱ्या कन्यागतीं एक वर्षपर्यंत प्रत्येक यात्रेकरूकडून दोन आणे कर घेतला जातो. कन्यागतीं तीर्थविधीकरितां यात्रेकरूंची नेहमीं गर्दी असते. वाडीस जाण्यास उन्हाळा व हिंवाळा सोयीस्कर असतो.

या क्षेत्रास पूर्वी अमरपूर ह्मणत असत. कारण पूर्वी येथें अमरेश्वर महादेवाचें स्थान होतें. परंतु श्रीनरसिंह सरस्वतींनीं एक तपापेक्षां जास्त येथें वास केल्यामुळें त्यास नरसोबाची वाडी असें नांव पडलें. या अवतारी पुरुषांनीं या क्षेत्रांत जीं अलौकिक अवतार कृत्यें व साक्षात्कार केले त्यांची साक्ष अद्यापपर्यंत अनुभवास येते. त्यावरून या स्थानास लोकांकडून जागृत देवस्थान अशा अर्थी नरसोबाची वाडी हें नांव पडणें स्वाभाविक आहे. श्रीगुरुचरित्रांत हें

सर्व अवतार कृत्यें पूर्णपणें वर्णन केलीं आहेत. अवतार संपूर्ण झाल्यावरसुद्धां ज्यांचा एवढा साक्षात्कार पाहावयास सांपडतो त्यांस महा अवतारी पुरुष ह्मणतात. त्यापैकींच हे होते. शिरोळरोड ष्टेशनपासून ६ मैलावर शिरोळ गांवीं श्रीगुरुस्वामींनीं एका ब्राह्मणाच्या घरीं अनुग्रहार्थ भोजन केलें, तें पवित्र भोजन-पात्र त्या ठिकाणच्या दत्तमंदिरांत आहे; ह्मणून ह्या साक्षीभूत पवित्र स्थानास भोजनपात्र असेंही ह्मणतात. वाडीस श्रींच्या दगडी ओबड धोबड पादुका आहेत, पण त्यांची त्रिकाळ महापूजा होते. त्यांना पंचामृताचा अभिषेक होतो. दहीं, दूध, वगैरे सर्व पंचामृतें हातांनीं चोपडतात व तें मंगल-दायक तीर्थ सर्वजण प्रेमानें वंदन व प्राशन करितात. नुसत्या पादुका पाहून येथें कांहीं विशेष देवस्थान असेल असें वाटतसुद्धां नाहीं. पण धुपारतीचे वेळीं जेव्हां मुर्ते रूदबदून अंगांत संचार करतात तेव्हां श्रींच्या साक्षात्काराचा प्रभाव दृष्टीस पडतो. असो. येथील तीर्थविधी झाल्यावर व श्रींचा अनुग्रह मिळाल्यावर मी

## कोल्हापूर

येथें जाण्यास निघालों. कोल्हापूर ही त्या संस्थानची राजधानी आहे. हें पंचगंगेच्या कांठीं आहे. ह्या पांच नद्या कासारी, कुंभी, तुळशी, भोगावती, आणि सरस्वती अशा आहेत. यापैकीं चार स्पष्ट आहेत व सरस्वती गुप्त रूपानें त्यांत वाहात आहे असें ह्मणतात. सरस्वतीचा प्रत्यक्ष प्रवाह हिमालयांत बदरि-नाथास आहे. त्याचे वर्णन पहिल्या भागांत आलेंच आहे. बाकीच्या ठिकाणीं ती गुप्तरूपानेंच आहे असें मानितात.

सातारचें राज्य शाहूनें घेतल्यावर राजारामाची बायको ताराबाई हिनें आपला मुलगा कोल्हापुरास आणून तेथें स्वतंत्र राज्याची स्थापना केली. हल्लीं शिवाजीचा अस्सल वंश कोठें असेल तर तो कोल्हापुरांतच आहे. ह्मणूनच तेथील राजास छत्रपती ह्मणतात. तेव्हांपासून हें इतिहास प्रसिद्ध शहर झालें आहे. धार्मिक दृष्टीनेंही त्याची प्रसिद्धि फार प्राचीन काळापासून आहे. याला दक्षिण काशी असें ह्मणतात. येथें काशीइतकीं तीर्थें व देवता मंदिरें होतीं असें ह्मणतात. भोगावती ( गंगा ) कासारी ( यमुना ) यांचा संगम करवीरच्या पश्चिमेस सुमारें तीन मैलांवर असून त्या ठिकाणास प्रयाग असेंही ह्मणतात, व तीर्थपर्वणीनिमित्त येथें बरीच मंडळी स्नानास येते. गंगेचें गंगा हें नांव स्वर्गांतलें आहे. मृत्युलोकाचें नांव भागिरथी. ( भगिरथानें आणली ह्मणून )

महालक्ष्मी ( कोल्हापूर. )



( पृष्ठ १६४ )

च पातळचें भोगावती हें नांव आहे. अशी गंगा ही त्रैलोक्य पावनी आहे. त्यापैकीं करवीर क्षेत्र दक्षिणेंत आहे, (पाताळांत आहे) अशा समजुतीनें तीस भोगावती हें नांव मिळालें आहे. कासारी म्हणजे फार बिकट प्रदेशांतून वाहणारी, यमाच्या यमुना बहिणीप्रमाणें कठीण म्हणून तिला येथें कासारी हें नांव पडलें आहे. म्हणजे उत्तरेस जसें गंगा यमुनांचे प्रयाग आहेत तसे हे दक्षिण काशींचे गंगा यमुनांचे प्रयाग आहेत. काशीप्रमाणेंच येथें त्या त्या नांवाचीं सर्व तीर्थें व देवता दर्शनें होतीं. पण अलिकडच्या काळीं येथील राजांना एवढा धर्मभोळेपणा न आवडून त्यांनीं त्यापैकीं बहुतेक बुडवून टाकिलीं व अजूनही तो क्रम चालला आहे असें म्हणतात. काशीस मुख्य देवता काशी विश्वेश्वर आहे. येथें मात्र तो नाहीं. श्रीमहालक्ष्मी आहे. ही ईश्वराची आदिशक्तीच आहे. म्हणजे ईश्वर पार्वतीच्या घराचा काशीपासून येथपर्यंत, एवढा विस्तार आहे.

देवींचीं जीं साडेतीन पीठें आहेत त्यांत कोल्हापूर हें एक पीठ आहे. आदि महाशक्तीच्या सत्व, रज आणि तम प्रकृतीच्या ज्या तीन मूर्ती आहेत त्यापैकीं सत्वगुण विशिष्ट अशी महालक्ष्मी आहे रजोगुणती महासरस्वती हिमालयांत आहे किंवा दक्षिणेंत तुळजापूर येथें आहे, व तमोगुणवती महाकाली कलकत्यांत किंवा दक्षिणेंत माहूर गांवीं आहे असें मानितात. ही त्या त्या देवतेचीं मुख्य स्थानें आहेत. पण प्रत्येक ठिकाणीं तें मुख्य दैवत मानून शिवाय बाकींच्या देवतांचीही स्थापना केली आहे, त्याप्रमाणें येथें महालक्ष्मीचें देवस्थान मुख्य असलें तरी तिच्याच आवारांत महाकाली व महा सरस्वती यांची स्थापना केली आहे. तिघींचीं देवळें निरनिराळीं आहेत. महालक्ष्मीची मूर्ति पूर्ण सत्वगुणात्मक असल्यामुळें सर्व प्रकारच्या राज्यभोगांची येथें रेलचेल आहे. महालक्ष्मीची मूर्ति कृष्णपाषाणाची सुमारें दोड हात उंचीची सुंदर आहे. तिचें मूळ स्वरूप तिच्या स्नानाचे वेळीं दृष्टीस पडतें. परन्तु त्यावेळीं येथें पुजारी ब्राह्मणाशिवाय कोणी नसतो. पडदे लाविलेले असतात. देव जरी निर्गुण, निराकार आहे किंवा त्याची मूळ मूर्ति निरलंकार असली तरी भक्ताकारितां, त्याच्या इच्छेकारितां तो सगुणरूप धारण करतो. अर्थात त्यास मनुष्याप्रमाणें सुख, दुःख, आचार, अनाचार, सोंवळें, ओवळें, लाजलज्या, सर्व कांहीं लागतें. वस्तुतः त्याला सोनें व माती सारखींच असतात. कारण दोन्हीं त्यानेंच उत्पन्न केलीं आहेत. तरी भक्ताकरितां सोन्यामोत्याचे व हिऱ्यामाणकांचे दागिने घालून निय-

मित वेळीं भक्तांच्या दर्शनाकरितां त्यानें वाट पाहात बसलेंच पाहिजे! निजलेंच पाहिजे, हंसलें पाहिजे, जे कांहीं भक्तांना पाहिजेत ते सर्व प्रकार केले पाहिजेत. पण असे प्रकार देव करूं लागला ह्मणजे त्याच्यांत व मनुष्यांत अंतर काय? देव जर निजला तर जगाची व्यवस्था त्यानें कोणाकडे दिली आहे? ह्या अशा गोष्टी ज्ञान दृष्टीनें किती जरी समजल्या तरी भक्तियोगामध्यें त्यांची किंमत कांहींच नाहीं. भक्तियोगांत भाव प्रधान असल्यामुळें देव व भक्त निराळे मानावे लागतात. तोच प्रकार सर्वत्र यात्रेंत असतो. हें दैवत पूर्ण सात्विक आहे. पण रजोगुणी व तमोगुणी मनुष्य जेव्हां यास भजतात त्यावेळीं या देवतेससुद्धां भक्तासाठीं आपल्या रजोगुणी व तमोगुणी रूपांत ह्मणजे महासरस्वती व महाकाळी रूपांत यावें लागतें. त्यावेळीं भक्तांनीं महापराक्रमानें आणलेले बळी किंवा भोग ह्मणजे कोंबडीं, बकरीं, रेडे, वगैरे कितितरी तिला लागतात, याचा अंतच नाहीं. नवरात्रांत या तिन्ही प्रकारांचा कळस होतो. मात्र ते भोग स्थानपरत्वें होतात. ह्मणजे देवीजवळ सात्विक भोग, त्यापुढें दूर राजस व शेवटीं तामस असतात. पूर्ण स्वराज्य असतां त्याचा फार अतिरेक होत असे. हल्लींसुद्धां बराच प्रकार आहे असें ह्मणतात. ब्राह्मण वेदोक्त विधीनीं पूजा करितात. त्यापलीकडे इतर लोकांचें भजन, कथाकीर्तन चालतें. पण तामसी लोकांचें इतकें करूनसुद्धां भागत नाहीं. त्यांना पशूंचे बळीसुद्धां द्यावे लागतातच. फार काय, प्राचीनकाळीं नरमेघ ह्मणजे मनुष्यांचेसुद्धां बळी देण्याची चाल होती. असो. ह्या देवीचे अलंकार व आभरणें फारच प्रेक्षणीय आहेत. अगोदर दैवत स्त्री जातीचें, त्यांत महालक्ष्मी ह्मणजे संपत्तीची पूर्ण अधिष्ठात्री देवता; मग किती जरी आभरणें घातलीं तरी थोडींच! नखशिखांत देवीला नटवतात. फक्त तोंडाचा कांहीं भाग व डोळे मात्र दिसतात. कारण त्यांना काजळाशिवाय लेणेंच नाहीं पण तें कृष्ण पाषाणाचे मूर्तीस असंभाव्य ह्मणून तो मात्र अवयव दिसतो. बाकी जिकडे तिकडे दागिनेच दागिने! एकावर एक वर्गघन झालेले असतात. खरोखर हें रूप फार प्रेक्षणीय असतें. ह्या नऊ दिवसांत रोज देवीची पालखी निघते. तेव्हां नानाप्रकारचीं वाद्यें, दिवाबत्ती, दारूकामाची रोषनाई पाहण्यासारखी असते. सर्व देऊळचसें काय, पण नवरात्रांत देवीच्या स्वागतार्थ शहरचीं सर्व घरें व आबालवृद्ध स्त्रीपुरुषेंही आपआपल्यापरी नटून थटून देवीच्या दर्शनास व सत्काराकरितां सकाळपासून येत असतात. एकंदर नवरात्रांत सर्व कोल्हापूर शहर फुलून

गेलेलें असतें. याशिवाय देवीची पालखी दर मंगळवारीं व शुक्रवारीं निघते. तीही थाट परठिकाणच्या मनुष्यास अवलोकनीयच असतो.

**हें महालक्ष्मीचें देऊळ हेमाडपंती आहे,** ह्मणजे हें हेमाडपंतानें बांधिलें आहे असें ह्मणतात. हेमाडपंताच्या नांवावर विकलीं जाणारीं सर्वच कामें त्यानें केलीं असावीं असें वाटत नाहीं. तीं त्याच्या धाटणीचीं आहेत एव-ढेंच समजावयाचें. हेमाडपंतानें मोडीलिपी लंकेंतून आणली असें ह्मणतात; यांतही तितकें स्वारस्य दिसत नाहीं. हेमाडपंताचें मुख्य गांव हेमाद्री. हा देशस्थ ब्राह्मण. वत्सगोत्राचा यादव जाधव कुळांतील राजांचा दिवाण होता मलिकंबराप्रमाणें ह्याचीही मोठी कीर्ति आहे. ह्या देवळाची रचना कमळासारखी आहे. देऊळ सर्व दगडी आहे व त्यास अतोनात दगडी खांब आहेत. हे दगडी खांब मोजतां येत नाहींत अशी प्रख्याती आहे. खुणा करून मोजतां येणार नाहींत असा त्याचा अर्थ नाहीं. कारण आकाशांत अनंत तारे आहेत, त्यांचीसुद्धां प्रतवार मोजणी केली आहे. मग यांची काय कथा? जे खांब सुटे आहेत ते मोजण्यास कांहींच हरकत नाहीं. परंतु कांहीं भिंतीत अर्धवट कोरले आहेत. कांहीं ठिकाणीं खांबाची खूण ऊर्फ देखावा मात्र दाखविला आहे. खांब ह्या दृष्टीनें त्याचा कांहीं उपयोग नाहीं. अशावेळीं त्यास खांब ह्मणावा किंवा नाहीं याची शंका येते. सबब त्याची गणना खांबांत करावयाची किंवा नाहीं, याची वानवाच आहे. शिवाय हे खांब मोजूं नयेत असें ह्मणतात. ह्मणून खांब मोजण्याचा कोणी प्रयत्नही करीत नाहीं. ज्याच्या घरीं जावयाचें त्याला राग येणारी गोष्ट कां करावी? देवीची इच्छा मानवांनींच कल्पिली असली तरी जोंपर्यंत ती देवीची अशी मानिली असते तोपर्यंत ती वंदनीयच आहे. कोणी ह्मणेल हें झूट आहे, तर तसें नाहीं. राजा कायदे करतो असें ह्मणतात. पण राजा कोठें करितो? त्याचे प्रधानच रयतेच्या संमत्तीनें किंवा खालच्या अमलदाराच्या संमतीनें करितात. पण ते राजाच्या नांवानें विकले जाऊन त्याप्रमाणें अपराध्यास शासन भोगावें लागतें किंवा नाहीं? तोच प्रकार हा आहे. पण हा धार्मिक विश्वासाचा आहे. राजाचे कायदे ह्मणून जे मानिले जातात त्यापैकीं राजाला तरी कोठें सर्व माहीत असतात? असें जरी असलें तरी ते कायदे राजाचे आहेत व ते सर्व प्रजेनें पाळिले पाहि-जेत अशी सक्तीमात्र पाळावी लागते. तोच प्रकार ह्या देवळाच्या खांबांचा आहे. कांहीं खांब केवळ नक्षीकरितां राखिले आहेत. त्यांचा ह्याशिवाय दुसरा उप-

योग नाहीं. ह्या देवळांत चार शिलालेख आहेत, त्यांवरून व आंतील शोभेच्या मूर्तीवरून हें मूळचें जैनांचें असावें असें वाटतें. ह्या शिलालेखांपैकीं सर्वांत जुना शके ११४० आहे. त्यावरून हें देऊळ शिलहार वंशांतील राजांनीं बांधिलें असावें असें दिसतें.

ह्या देवळांत एक विशेष गोष्ट आहे ती ही कीं, महालक्ष्मीच्या मूर्तीपुढें दगडी सभामंडप व त्याचे असंख्य खांब आहेत तरी ह्या देवळाला दिशासाधन केलेलें आहे. ह्मणजे सूर्य वर्षांतून दोन वेळां विषुव वृत्तावर येतो. त्यास विषुव दिन ह्मणतात. त्या दिवशीं सूर्य नेमका पूर्वेला उगवतो व पश्चिमेला मावळतो- त्यादिवशींच फक्त सूर्य मावळतांना त्याचे संपूर्ण किरण महालक्ष्मीच्या तोंडावर व सर्व शरिरावर पडून गाभाऱ्याचा सर्व देखावा विलक्षण तेजानें दैदिप्यमान दिसतो. दुसरे दिवशीं सूर्य फिरला कीं, ती शोभा राहात नाहीं. प्रतिवर्षाच्या मार्च वीसला आणि सपटंबरच्या बावीस तारखेला सूर्य विषुव वृत्तावर येतो. त्यास विषुव दिन ह्मणतात. दोन्हीं वेळां बहुधा दोन्हीं नवरात्रेंचे असतात. मार्च वीसला चैत्रांतील वासंती नवरात्र व सपटंबर बावीसला दिवाळीचे शारदी नवरात्र असतें. दोन्हीवेळां श्रींचे उत्साह चाललेलेच असतात. त्या कृत्रिम शोभेस ह्या सृष्टिशोभेची जोड मिळाल्यामुळें कृत्रिम दागिन्यास अवर्णनीय शोभा येते, याचें प्रदर्शन तें देऊळ बांधणारानें केलें आहे व आपलें नांव अजरामर करून ठेविलें आहे. हा सभामंडप सन १८४० च्या सुमारास बांधला असावा.

ह्या जगदंबेच्या देवळाशिवाय जुन्या राजवाड्यांतही जगदंबेचें एक देवालय आहे. राजघराण्यांतील लोकांना जगदंबेचें दर्शन रोज व्हावें व त्यांचे इच्छेप्रमाणें पूजा अर्चा व्हावी, त्यास इतर लोकांचा संसर्ग नसावा, ह्मणून ही व्यवस्था केली आहे. गांवांतील देऊळ नेहमीं उघडें असतेंच असें नाहीं. शिवाय त्या देवळांत राजघराण्याच्या बायकांना जावयाचें ह्मणजे त्यांच्या इतमामाप्रमाणें जावें लागतें. तितक्या वेळपर्यंत सार्वजनिक लोकांचा संबंध तोडावा लागतो. पण तसें वारंवार करितां येत नाहीं. शिवाय देवीची स्वतःच्या इच्छेप्रमाणें रोषनाई मूळ देवळांत करितां येत नाहीं. या सर्व कारणाकरितां हें देऊळ स्वतंत्र बांधलें आहे. मुख्य देवस्थानचे ठिकाणीं असें सर्वत्र असतें. जगन्नाथास गेलें ह्मणजे सर्वांच्या घरांत जगन्नाथाची मूर्ति असते. त्याप्रमाणें रामेश्वर, अयोध्या, द्वारका वगैरे सर्वच ठिकाणचे

देवस्थानचे देव्हारे प्रत्येक घरीं असतातच. त्याप्रमाणें हें राजघराण्यांतील दैवत असल्यामुळें त्याची प्रतिमा येथें स्थापन केली आहे व उत्साह होत आहेत. बाकी आदिस्थान हें नव्हे. मागें हेमाडपंताचें देवालय सांगितलें तेंच आहे. हें स्वयंभू स्थान आहे. हल्लीं नवा राजवाडा बांधल्यामुळें जुन्या राजवाड्यांत राजघराण्यांतील मंडळी राहात नाहींत. तेथें कांहीं कचेऱ्या आहेत. यामुळें हल्लीं त्या देवीचें महात्म्य कमी झालें आहे. नवीन राजवाड्यांत चालू काळाला अनुसरून देवीची स्थापना केली नाहीं !

हा राजवाडा जुन्या पद्धतीप्रमाणें शहरच्या मध्यभागीं आहे. येथील नगारखान्यावर अद्यापर्यंत मराठ्यांचा भगवा झेंडा फडकत असतो व तो महाराष्ट्रीयांना आपल्या गुणांचें स्मरण देत आहे. या वाड्याला १८ चौक आहेत. सरकारी दरबार ज्या सभामंडपामध्यें भरतात त्या मंडपाच्या भागच्या बाजूस सरकारी देवघर असून तींत भोंसल्यांची कुलदेवता तुळजा भवानी हिची सुवर्णाची मूर्ति आहे. हिच्या कृपाछत्राखालीं आपण राज्यकारभार करितों आहों असें दाखविण्याची ही जुनी रीत आहे. सर्व सभासदांनीं मनांत हिला साक्ष ठेऊन बोलावें व त्याप्रमाणें इमानानें करून दाखवावें. हल्लीं राजवाड्यांत सरकारी कचेऱ्या, खजिना, फरासखाना व शस्त्रागार हीं आहेत. शस्त्रागारांत जुन्या प्रकारच्या सर्व शस्त्रांचा संग्रह असून अजून तो सुस्थितींत आहे, यामुळें पाहाण्यासारखा आहे.

कोल्हापूरपासून पंधरा मैलांवर डोंगरावर

## जोतीबाचें

म्हणून प्रसिद्ध रमणीय स्थान आहे. त्यावर महाजागृत असें शिवाचें स्थान आहे. त्यास केदारेश्वर म्हणतात. बारा जोतिर्लिंगाचीं बारा उपलिंगें पुराणांत सांगितलीं आहेत, त्यापैकीं हें केदारेश्वराचें उपलिंग आहे. हिमालयांतील लिंग हें उत्तर काशीकरितां व हें दक्षिण काशीकरितां आहे. या गिरी शिखराला पूर्वी रत्नाचल हें नांव होतें व या ठिकाणीं कोल्हासूर नामक दैत्य राज्य करीत होता. त्यानें ही संपत्ती देवब्राह्मणांना लुटून आणली होती सबब त्याचे पारिपत्याकरितां महालक्ष्मी निघाली. महालक्ष्मी हें सौम्य दैवत, तिला राग यावयाचा नाहीं. म्हणून तिनें क्रोधाचें आराध्य दैवत जें जमदग्नी त्याजकडून

ती क्रोध घेऊन आली व तिनें त्या राक्षसाचा वध केला. व ह्यापुढें दुसऱ्या कोणीही दैत्यांनीं येथें येऊं नये ह्मणून त्यास भय दाखविण्याकरितां त्याच क्रोधाची येथें स्थापना केली आहे. तें हें जोतीबाचें महा जागृत स्थान आहे. या कोल्हासुराच्या नांवावरून ह्या प्रांताला व ह्या शहराला कोल्हापूर असें नांव पडलें. हें जोतिबाचें शिवस्थान ग्वाल्हेरच्या शिंदांचें कुलदैवत आहे. यास शिंदे सरकारकडून बारा हजाराचें उत्पन्न आहे. ह्या मुख्य देवतावर अर्थातच दुसऱ्या उपदेवतांची व तीर्थांचीही स्थापना झाली आहे. ह्या टेकडीची उंची तीन हजार फूट आहे. ह्याचा जीर्णोद्धार राणोजी शिंद्यानें इ. स. १७३० त केला. हें देऊळ निळ्या रंगाच्या दगडांनीं बांधलें आहे.

कोल्हापूर हें राजधानीचें शहर असल्यानें चांगलें भरभराटींत आहे. पण येथें अलीकडे ब्राह्मण ब्राह्मणेतर पक्ष निघाल्यामुळें त्याची शोभा बरीच कमी झाली आहे. राजांचा—त्यांत आमच्या छत्रपतींचा—पराक्रम गोब्राह्मण रक्षणाकरितां होता. आतां कांहीं छत्रपतींचा पराक्रम याच्या विरुद्ध दिसतो एवढाच दोघांमध्यें फरक आहे. येथें राजाराम कॉलेज, अलबर्ट, एडवर्ड हॉस्पिटल, नवा राजवाडा, ( हा शहरापासून दोन मैलावर आहे. ) टाऊन हॉल, टेकनिकल स्कूल, लायब्ररी, मार्केट, दरबार हॉल, कोर्टें, कचेऱ्या, श्रीमंत लोकांचे बंगले, बागबगीचे, व्यापारी पेठा, वगैरे स्थळें प्रेक्षणीय आहेत. पण त्यांचा यात्रेशीं संबंध नसल्यामुळें त्याचें वर्णन दिलें नाहीं. येथें मला एक, दोन उंटांचा गाडा दृष्टीस पडला. हा विस्तृत उंचच उंच चाकांचा गाडा व त्यावर खंडोगणती चढविलेला माल पाहून हा एक आगगाडीचा मोठा डबाच आहे असें वाटलें ! कोल्हापुरची दसऱ्याची स्वारी विशेष थाटाची असते.

कोल्हापुराहून निघून मी स्टेशनावर आलों व गाडींत बसलों. तेथें एक साधा मराठा मनुष्य आला व तुम्हीं कोण, कुठले, कशाला आलां, वगैरे चौकशी करूं लागला. मी त्याला सहज सांगितलें, तुला ह्या चौकशा कशाला ? तरी तो ऐकेना. तो जरा ठासून अधिकारयुक्त वाणीनें बोलूं लागला. तेव्हां मी त्याला विचारिलें तूं कोणी अधिकारी आहेस काय, किंवा तुला माझ्या चौकशीचा हुकुम सुटला आहे काय ? तरी तो बोलेना व चौकशीचा हट्ट सोडीना. अखेरीस मी यात्रेकरू आहें असें सांगितलें. तेव्हां खरें कशावरून ?

येथें किती दिवस होतां, कोठें होतां? मला तुमचा संशय आहे!' असें ह्मणाला. यावरून तो गुप्त पोलीस असावा असें वाटलें व मग त्याला सर्व हाकिकत सांगितली. व खरेपणाकरितां मजजवळ पोष्टांतून छाप मारून आलेलीं पत्रें दाखविलीं. त्यावर माझा सरकारी हुद्दा होता. तेव्हां त्याची खात्री झाली व त्यानें मला सोडून दिलें! मीं मागें तिसऱ्या भागांत सांगितलें आहे कीं, आपल्यास आलेलीं कांहीं पोष्ट कार्डें घ्यावीं. याचें कारण आपण लबाड नाहीं हें दाखविण्याकरितांच आहे. हा जर पुरावा मिळाला नसता तर विनाकारण निदान ओळख पटण्याकरितां तरी उपाध्याच्या घरापर्यंत धरमधक्के खावे लागले असते. मी गाडींत बसल्यावर मला तो पोलीस ह्मणाला, 'महाराज, कोणी कांहीं विचारील त्याला तावडतोब खरा खुलासा स्पष्ट सांगत जा. नाहींतर विनाकारण फशीं पडाल. तेव्हां त्याला मी ह्मणालों,' शिपाईबोवा! रागाऊं नका. लबाड लोक असतात ते गुप्त पोलिसाच्या बारशाला जेवलेले असतात. तुह्माला फसवायला त्यांना किती वेळ लागेल? आमच्यासारखे प्रामाणिक यात्रेकरू असतात त्यांचेच तुह्मी काळ, दुसरें काय! खरोखर सच्चा कोण व लुच्या कोण हें ओळ-खण्याला फारच धूर्त मनुष्य लागतो. हें महायात्रेचें क्षेत्र आहे. विनाकारण यात्रेकरूंना छळित जाऊं नका, एवढीच तुह्माला विनंती आहे. भामटे, उचले व दगलबाज लोक तुमच्या त्रासाकरितां थर्डक्लासांतून कधींच जात नाहींत. त्यांचा पोषाख व चालचलणूक फार थाटाची असून ते बहुधा पहिल्या वर्गांतूनच प्रवास करतात. ह्मणजे तेथें तुमचें किंवा रेलवे नोकरांचें कांहीं चालत नाहीं. किंवा ते अगदीं भिकाऱ्याच्या वेषांत आपला मूळ वेष पालटून प्रवास करितात हेतु असा कीं, पोलिसांनीं त्याच्या वाटेस जाऊं नये किंवा त्याचा संशयही येऊं नये!!! असो. हें कोल्हापुर प्रकरण येथें संपलें. नंतर मी पुन्हां मिरजेस आलों. सांगलीस जाऊन येणें राहिलें. मिरजेहून मी तासगांव स्टेशनवर उतरून

## औदुंबर

येथें गेलों. औदुंबरास तासगांवाहून गाडीरस्त्यानें भिलवडीस जाऊन तेथून सिध्या मार्गानें जातां येतें. पण रस्ता लांब आहे. आह्मी मधल्या रस्त्यानें आल्यामुळें आह्माला भुवनेश्वरीचें प्रख्यात देवालय लागलें. हें कृष्णेच्या कांठींच आहे. त्याचें प्रथम दर्शन घेऊन होडीनें कृष्णा उतरून पुढें गेलें ह्मणजे एकदम औदुं-बर गांव लागतो. येथें मी एका उपाध्येबोवाचे घरीं उतरलों होतों. यामुळें

देवब्राह्मण यथासांग घडला. प्रथम देवाचे धूळभेटीस गेलों. देऊळ नरसोबाच्या वाडीप्रमाणेंच अगदीं लहान आहे व आंत पादुका आहेत. जवळच कृष्णेला चांगला प्रशस्त घाट आहे. देवळाजवळ उंबराचे वृक्ष फार आहेत. येथें उंबराचे वृक्ष प्राचीन काळापासून असल्यामुळें यास औदुंबरवन असें ह्मणतात. औदुंबर वृक्षास कल्पवृक्षाप्रमाणें प्राचीन काळापासून मान असल्यामुळें श्रीगुरूंनीं अशा पवित्र वनांत वास केला. यामुळें वाडीप्रमाणेंच उत्तरोत्तर हें ठिकाण प्रसिद्धीस आलें. श्रींच्या मंदिराशिवाय या क्षेत्रीं त्यांचा मठ, समाधी, मंदिरें इत्यादि स्थानें दर्शनीय आहेत. वाडीप्रमाणेंच येथेंही सेवा अनुष्ठानाकरितां बरेच लोक येऊन राहतात. येथेंही सायंकाळीं आरतीचा थाट होतो. भुतानें पछाडलेले लोकही येतात. जवळ कृष्णाबाईही आहे, पण काय असेल तें असो, वाडीच्या एक चतुर्थांशहीं या स्थानास महत्व नाहीं! वास्तवीक महत्वाची बाब कांहीं कमी नाहीं. पण लोकांचे समुदाय फार कमी. अर्थात थाट बेताचाच असतो. हें देऊळही कृष्णेच्या अगदीं जवळ असल्यामुळें पावसाळ्यांत कृष्णेला पूर आला ह्मणजे तें बुडून जातें. मग बाहेरील उत्सव मूर्तीची पूजा करून भागवितात.

कृष्णेच्या कांठच्या मिरच्या, वांगीं, बटाटे, व वागवगीच्यांचीं फळें फार स्वादिष्ट व रूचकर असतात, अशी यांची प्रसिद्धी आहे. वाडीप्रमाणें येथेंही कृष्णेचा मोठा डोह आहे. या डोहांतील मासे हे देवाचे आहेत असें समजून कोणी मारीत नाहींत. यामुळें येथील मासा फार मोठा पोसला आहे. हें एका युरोपियन कलेक्टरांस कळलें तेव्हां तो लहान होडी घेऊन मासे मारण्यास आला. गांवकऱ्यांनीं त्यास रीतीप्रमाणें मनाई केली कीं, येथें आमचें देवस्थान आहे, येथें कोणीही मासे मारतां कामा नये! पण तो ह्या दगडाला व त्याचे भक्त अशा माणसांना कसला मानतो! तो ऐकेना, मासे मारूं लागला. पण ईश्वरी साक्षात्कार असा कीं, त्याला एकही मासा सांपडला नाहीं. नदींत मासे नाहींत ह्मणावें तर अतीशय मोठमोठे मासे प्रत्यक्ष दिसत आहेत. होडीला अगदीं खेटून हवे तेवढे जातात, दृष्टीस पडतात, पण गळाला एकही लागत नाहीं! तीन तास मेहनत करून तो थकला. पण त्यास एकही लहानसुद्धां मासा मिळाला नाहीं. तेव्हां त्याचें मन बदललें. कांहींतरी येथें देवाचा साक्षात्कार असावा, असें त्यांस वाटलें. तरी तें बाहेर न दाखवून निराळ्या तऱ्हेनें

त्यानें त्याची प्रचिती पाहण्याची इच्छा केली. त्यानें शिपायाकडून पुजाऱ्या ब्राह्मणास बोलाविलें व तो त्या ब्राह्मणास ह्मणाला, मी उद्यां सकाळीं येथें पुन्हां मासे मारण्यास येईन. तुमचा देव खरा असेल तर मला एकतरी मासा सांपडला पाहिजे. तेव्हां लोक ह्मणाले, त्या माशाचें तुह्मी काय करणार? तर तो ह्मणाला मी घेणार, तर असें उपयोगी नाहीं. तुह्मी जर तो मासा सोडून देण्याचें वचन देत असाल तर मासा सांपडून देण्याची आह्मी देवास प्रार्थना करतों. त्यावेळीं. ठीक आहे. मीं मासा सोडून देईन तुम्ही देवाची प्रार्थना करा. असा उभयतांचा ठराव झाला. त्याप्रमाणें ब्राह्मणांनीं देवाची प्रार्थना केली. प्रत्यक्ष प्रार्थना करायला कशाला हवी? देव तें ऐकत नसेल असें फारच थोडें होतें! पण ब्राह्मणांनीं रीतीप्रमाणें प्रार्थना केली कीं, देवा! ह्या सत्वास जागणार नाहींस तर आमचें ब्राह्मणत्व व भक्तत्व नाहींसें होईल. व तुझा भिन्नधर्मियाकडून प्रत्यक्ष अपमान होईल. तेव्हां याची लाज तुला असावी.

दुसरें दिवशीं सूर्य उदयापूर्वी साहेब ठरल्याप्रमाणें होडी घेऊन आला. पुजारी देवाची पूजा करीत होते. त्याला त्यांनीं बोलाविलें व सांगितलें कीं हा सूर्य उगवला आहे पहा. तुह्मी आपल्या देवाची प्रार्थना केली आहे ना? हा मी गळ टाकतों पहा. त्याप्रमाणें त्यानें गळ टाकल्याबरोबर गळ जड झाला. लगेच साहेब ह्मणूं लागला, मासा लागला! गळ ओढूं लागला तो माशानेंच त्याची होडी ओढून नेण्यास सुरवात केली. इतका मोठा मासा लागला! आतां होडी बुडणार तेव्हां साहेबानें जरा गळाची दोरी सैल सोडून पुन्हा ओढण्यास सुरवात केली याप्रमाणें दोनचार वेळां हसडे मारल्यावर तो मासा नरम आला व त्यानें तो होडीवर काढला. तो भला मोठा होता. तो पाहून साहेबाचे तोंडास पाणी सुटलें. व ह्मणाला, या माशाची तुह्मी सांगाल ती किंमत देतों. ती घ्या. व तिनें देवाची पूजा करा. किंमत दुप्पट चौपट देतों. किंवा वाटेल तितकी देतों नाहींतर हा गळाला लागलेला मासा मरणारच आहे. त्याचा तुह्माला काय उपयोग? परंतु ब्राह्मण कांहीं ऐकेनात. ते म्हणाले, करार पैशाचा नव्हता. मासा सोडण्याचा होता. त्याप्रमाणें तुम्ही करार पुरा केला पाहिजे. आम्हाला तुमचे पैसे नकोत. मासा मारील त्याला देव शासन करील. आमचा मासा नदींत मेला तरी चालेल पण तुम्ही सोडला पाहिजे, असें ब्राह्मणानें त्यास बजाविलें. तेव्हां देवाचीही प्रचिती आल्यामुळें त्यानें दुसऱ्या मार्गास न लागतां ठरल्या-

प्रमाणें मासा गळांतून काढून सोडून दिला. सोडून देण्यापूर्वी तो म्हणाला, हा मासा आतां मेला आहे, हा नदींत टाकून तरी काय उपयोग! पण ब्राह्मणांनीं आग्रह धरला. तेव्हां साहेबानें तो मासा नदींत टाकला. इतक्यांत तो जिवंत होऊन तो नदींत मोठ्या वेगानें गेला व देवब्राह्मणांचा जयजयकार झाला!!! ब्राह्मणांनीं देवाची स्तुती करून पंचारती केली. व साहेबांनीं गव्हर्नमेन्टमध्यें लिहून तेथील पाटलाजवळ सनद करून दिली. व तिचा आपले दप्तरीं दाखला ठेविला कीं, कोणीही इसमानें मग तो हिंदू असो वा युरोपियन असो किंवा कोणत्याही जातीचा असो त्यानें या डोहाचे एक मैलाचे मर्यादेंत मासे मारण्याकरितां गळ टाकतां कामा नये. जो टाकील त्याला शिक्षा होईल. सरकार त्याचेवर खटला करील. असा येथील कायमचा बंदोबस्त झाला. हा येथील साक्षात्कार समजला. यावेळीं भुताखेताचे किंवा व्याधिग्रस्त लोक येथें नसल्यामुळें दुसरे साक्षात्कार दिसले नाहींत. ही वरील गोष्ट आमच्या उपाध्यानें मला सांगितली व दुसऱ्यांनीं त्याचा अनुवाद केला तेव्हां ह्या स्थानाच्या कडकडीतपणाबद्दल व जागृतीबद्दल खात्री झाली. व सद्गुरुंचा वास अद्यापीही येथें आहे अशी पूर्ण भावना झाली. नंतर येथून जवळ कुंडल-रोड स्टेशन आहे त्यालाच हल्लीं किर्लोस्करवाडी असें नांव आहे. येथें उतरून किर्लोस्कर यांचा प्रख्यात लोखंडी कारखाना पहावा. स्टेशनच्या पूर्वेस जवळच तो कारखाना आहे. कारखाना पाहून नंतर

## कऱ्हाड

येथें गेलों. स्टेशनपासून गांव सडकेनें अडीच मैल आहे. गांवाशेजारीं कृष्णा वाहात आहे. कृष्णा उलटून पलीकडे गेलों ह्मणजे गांव लागतो. नदीवर पूल नाहीं. नुसती फरशी केली आहे. उन्हाळीं ती उघडी असते. पण पावसाळीं जेव्हां पूर येतो तेव्हां जाण्याची गैरसोय आहे. होडी आहे पण पुलाइतकें जाणें सोयीचें नाहीं. गांव मोठा, तालुक्याचा आहे. येथें मुख्यतः कृष्णा कोयनांचा प्रीतिसंगम आहे. एका नदीला दुसरी नदी कशीतरी मिळाली ह्मणजे संगम ह्मणतात. पण हा प्रीतिसंगम आहे. ह्मणजे दोन्ही नद्या समोरा समोरून येऊन एकमेकींत मिसळतात. यामुळें संगमाची बहारीची शोभा दिसते. कितीतरी वेळ त्यांचे प्रवाह एकसारखे मिळण्याकरितां खेळत डुलत असतात. हा संगम गांवापासून अगदीं जवळ आहे. असे संगम फारच क्वचित असल्यामुळें या

संगमाचें कृष्णा महात्म्यांत फारच सुरस वर्णन केलें आहे. आणि तें तसें आहे, हें प्रत्यक्ष पाहिलें ह्मणजे समजतें. विशेषेंकरून पावसाळीं जेव्हां दोन नद्यांना पूर येतो, तेव्हां जवळच पिंपळाचा मोठा पार आहे, त्यावरून किंवा उंच मनोऱ्यावरून ही शोभा मजेदार दिसते. गांवांत ब्राह्मणांची वस्ती मोठी आहे. येथील ब्राह्मणास कऱ्हाडे ब्राह्मण ह्मणतात. ह्मणजे कऱ्हाड्यांची उत्पत्ती ह्या गांवापासून झाली. आतां मात्र ह्या गावांत कऱ्हाडेच ब्राह्मण आहेत असें नाहीं. कऱ्हाडे ही आतां जातीविशिष्ट संज्ञा कांहीं ब्राह्मणांस आहे. हे ब्राह्मण बहुतेक शाक्त आहेत, ह्मणजे यांजवर एक प्रकारचा आरोप आहे. ह्मणून जे संशयी आहेत ते यांजकडे जेवीत नाहींत. पाणीसुद्धां पीत नाहींत, यापेक्षां दुसरें काय ? हे देशस्थांत मोडतात. म्हणजे यांचा देशस्थांशीं बेटीव्यवहार होतो. देशस्थांपेक्षां यांची राहाणी व स्वरूप नीटस आहे. येथें पुष्कळ देवळें होतीं परंतु मुसलमानांच्या कारकीर्दीत त्यांचा नाश झाला. हल्लीं शहराच्या मध्यभागीं मोठी मशीद आहे. तिचेसमोर दोन मोठे मनोरे आहेत. ते बरेच उंच ह्मणजे १०६ फूट असल्यामुळें त्यावर जाऊन भोवतालची शोभा चांगली दृष्टीस पडते. हे विजापूरच्या आदिलशाहाच्या काराकिर्दीत इब्राहिमखान या नांवाच्या सरदारानें बांधिले. कऱ्हाडास कृष्णा काठची वांगीं फारच स्वस्त मिळतात. हल्लीं कऱ्हाडास आगपेट्यांचे व दुसरे कारखाने पाहाण्यासारखे झाले आहेत. व व्यापाराची मोठी पेठ झाली आहे. कऱ्हाड स्टेशनचे पूर्वेस जवळच ओगल्यांचा प्रख्यात कांचेचा कारखाना पाहून घ्यावा हल्लीं त्याला ओगलेवाडी असें नांव आहे. येथून पांच कोसावर

## कोळेंनृसिंहपूर

नांवाचें नरसिंहाचें जागृत स्थान आहे. येथें जवळच एका विवरांत नृसिंहाची षोडश भुजांची मूर्ति आहे. सर्व हातांत आयुधें आहेत. इतक्या हातांची मूर्ति व सुबक ध्यान कोठें पाहण्यांत येत नाहीं. ही पराशर ऋषींनीं आपल्या ध्यान-धारणेकरितां केली व येथें स्थापिली, अशी तिजविषयीं आख्यायिका आहे. कऱ्हाडाहून सातारा रोड स्टेशनवर उतरलों. सातारारोड स्टेशनास पाडळी ह्मणतात. स्टेशनवर किर्लोस्कर बंधूप्रमाणें एक बिडाची ओतीव कामें करणारी एका मुसलमानाची फॅक्टरी आहे. तींत नांगर, उसाचे चरक, कढई, सळया, वगैरे कामेंही चांगलीं होतात. तीं पाहण्यासारखीं आहेत. ती रात्रंदिवस चालू असते.

सबब केव्हांही पहावी. ह्या फॅक्टऱ्या नव्याच आहेत. त्या आपल्या लोकांना यांत्रिक शिक्षण घेण्यास उत्तम आहेत. अर्थात नवीन नवीन प्रकारच्या उपयुक्त वस्तु पलंग, पाळणे, झुले, अद्याप येथें होऊं लागले नाहींत. पण त्यांचे प्रयत्न सुरू आहेत. मॅनेजर उत्साही आहेत. या स्टेशनपासून तीन मैलावर

## जरंड्याचा डोंगर

आहे. तेथें गेलों. वाटेंत स्टेशनपासून अर्ध्या मैलावर वसना नदी लागते. तेथें स्नानसंध्या करून मग वर जावें. डोंगरावर पाणी मुळींच नाहीं. अर्ध्या डोंगरावरून पिण्याकरितां मोठ्या शिकस्तेनें पाणी न्यावें लागतें. हें पाणीसुद्धां सांठवलेलें आहे. अर्थात तें फारच अपुरें आहे. गडावर एक ब्राह्मण पुजारी व महंत याशिवाय कोणाची वस्ती नाहीं. रस्ता लहान पायऱ्यांचा व अरुंद आहे. पण अतिशय खडकाळ चढावाचा आहे. असा चढाव सुमारें एक मैल आहे. वर मारुतीचें कडकडीत स्थान आहे व त्याच्यामागें राममंदीर आहे. ह्या देवळाचा सभामंडप मोडलेला पुन्हां बांधीत आहेत. दगड चुनावगैरे सर्व तयार आहे. पण पाण्याच्या अभावीं तें सर्व काम तसेंच राहिलें आहे. आतां पाऊस पडल्यावर बांधण्यास सुरवात होईल. येथें पाऊस फार त्रासाचा नसल्यामुळें त्यानें कामास फारसा प्रतिबंध होत नाहीं. हें स्थान कडकडीत असल्यामुळें येथें महाव्याधीचे लोक देवाची उपासना करून राहतात. ह्या डोंगराची पौराणिक आख्यायिका अशी आहे:—

राम अवतारीं लंकेंत रावणाशीं युद्ध चाललें असतां लक्ष्मणाला इंद्रजिताची शक्ती लागली. तिच्यावर औषध राम सैन्यांतील सुषेणनामक वानर वैद्यानें द्रोणागिरी वरील अमृत संजीविनी नामक दिव्य वनस्पती सांगितली. त्याप्रमाणे मारुती हिमालयावरील द्रोणागिरी नेत असतां त्याचें हें ढेकूळ पडलें. तोच हाच जरंडा. यावर मारुतीचें सन्मानार्थ त्याचें देवालय स्थापन केलें आहे. मारुतीचें देवालय जेथें जेथें असतें, तेथें तेथें तें पहाडावर किंवा निर्जनस्थानीं, गांवाबाहेर पाण्यापासूनही दूर अशा ठिकाणीं बहुधा असतें. कारण तेथें राहणारा किंवा त्याची सेवा करणारा मनुष्य मारुतीप्रमाणें काटक बनलाच पाहिजे. या डोंगरावर द्रोणागिरीप्रमाणें औषधी वनस्पती सांपडतात. ह्मणूनच हा द्रोणागिरीचा खडा अशा लोकांत समजूत पडली आहे. आणि हाच येथील तीर्थ महिमा

आहे. येथें अमृत संजीविनी आहे पण ती माहित नसल्यामुळें येथील महाव्याधींचे लोक सकाळ, संध्याकाळ सर्व डोंगरभर फिरून जी वनस्पती मिळेल तिचें एकेक पान खात असतात. अशा योगानें कधींतरी अमृत संजीविनीचें पान पोटांत जाऊन ते महाव्याधीपासून मुक्त होऊन जातात. कोणाचे दमे, खोकले, पोटदुखी, नानाप्रकारचे वात, कडकी, उष्णता, वगैरे निघून जाऊन श्रीमारुतीचे प्रसादानें ते दिव्य देही होऊन परत गेले आहेत. या प्रवासांत माझ्या अंगांत फार कडकी आली होती ती जाईल काय, असें मी तेथील पुजाऱ्यास विचारिलें. त्यावर तेथील लोक ह्मणाले तुमच्यापेक्षां महाव्याधी कमी की जास्त? तुह्मीच अनुभव पहा. आणि अनुभव पाहतांना एखादी विषारी वनस्पती पोटांत गेली तर? त्यावर उत्तर आलें कीं, या डोंगरावर विषारी वनस्पतीच नाहींत. विष घालविणाऱ्या विषभंजकच आहेत. पण तुमच्यासारख्या सुधारकांचा देवावर विश्वास नाहीं. तुह्मांस त्यानें गुण यावयाचा नाहीं. तुह्मांस बाटलींतील औषधेंच पाहिजेत! मग त्यांनीं मृत्यु आला तरी चालेल! पैसे वाटेल तितके खर्च झाले तरी चालतील. पण अगदीं निरुपाय झालेले लोकच श्रीमारुतीजवळ येऊन रोग-मुक्त होऊन गेले आहेत असें मी ऐकिल्यावरून श्रीमारुतीवर विश्वास ठेऊन मीही जातांना व येतांना तसें केलें. जें जें झाड दृष्टीस पडलें त्या लहान मोठ्या झाडाचें एकेक पान खात होतों. चढतांना श्रम होतात व श्वासोश्वास जोरानें चालतो, यामुळें खाल्लेल्या पानांच्या रसाचें पचन चांगलें होतें. व लवकर गुण येतो. असें माझ्याही अनुभवास आलें. यानें माझेही उष्णतेचे विकार कमी झाल्यासारखे मला भासले. मुख्यत: लघवीची उष्णता कमी झाली मी गेलों तो शिशिर ऋतु होता यामुळें सर्व वनस्पती खराट्यासारख्या झाल्या होत्या. क्वचि-त्च वनस्पतीला पानें होतीं अर्थात तीं अवशिष्ट राहिलेलीं फार जून होतीं. पण चैत्र पौर्णिमेला ( हनुमंत जयंतीला ) यात्रा भरते. त्यावेळीं सर्व वनस्पतीला भर येतो. त्यावेळीं अशा वनस्पती खाण्याची फार सोय असते. मी स्वत: त्या वनस्पतींची चव घेतली ती अगदीं निरनिराळ्या प्रकारची लागली. अशा प्रकारें पानें खातां खातां ज्याचे नशिबीं अमृत संजीवनीचें पान लागेल त्याचा देह दिव्य होईल. अमृत संजीवनीनें कधींही मरण येत नाहीं असें नाहीं. तसें लक्ष्मणाचें मरण कोठें टळलें? आणि तसें मरण टळणें शक्य नाहीं. पण त्या दिव्यौषधीनें मनुष्य व्याधिपासून मुक्त होऊन त्याचें शरीर दिव्य बनून त्याला

इहलोकच्या सर्व सुखांचा अनुभव घेतां येईल. हें काय कमी सुख आहे? सर्व व्याधिष्ट असें अमृत संजीवनीचें पान पोटांत जाईपर्यंत या डोंगरावर रोज निरनिराळ्या ठिकाणीं हिंडून पानें खात असतात. कोणाच्या नशिबीं लवकर लागेल कोणाला उशीर लागेल. पण अमृत संजीवनी ह्या डोंगरावर खास आहे व तिच्या योगानें हे महाव्याधींचे अनुभव येतात. निदान ती मिळेपर्यंत जीं पानें पोटांत जातात त्यांनीं रोग जास्त न होतां त्याचें शमन मात्र होतें एवढी गोष्ट मात्र निश्चयात्मक खरी आहे. असे हजारों रोगी बरे होऊन गेले. पण यावरील अमृत संजीवनी कोठली? याचा अद्यापपर्यंत कोणालाही तपास लागला नाहीं!!! हा दैवी चमत्कार आहे.

वर देवळा सभोंवती धर्मशाळा आहेत. खालून शिधा सामग्री घेऊन श्रीचा अनुग्रह होईपर्यंत राहिल्यास इच्छित फळ खात्रीनें मिळेल यापेक्षां आणखी तीर्थ महिमा कोणता पाहिजे? येथें पुजारी आहेत. त्यांचे मार्फत मी देवब्राह्मण केला नंतर जरंड्याहून सात मैलावर

## माहुली

गांव आहे, तेथें गेलों. हा सडकेनें जरा लांब आहे. पण शेतांतल्या मधल्या वाटेनें जवळ आहे पण ती वाट माहितीशिवाय मिळणार नाहीं. माहुली हे गांव दोन आहेत. एक क्षेत्र माहुली व दुसरी संगम माहुली. क्षेत्र माहुली कृष्णेचे काठीं आहे. हा गांव पेशवाईतील प्रसिद्ध न्यायाधीश रामशास्त्री प्रभुणे या तेजस्वी पुरुषाची ही जन्मभूमी आहे. हल्लीं यांचा येथें वंशही राहिला नाहीं. गांव अगदीं लहान खेडें आहे. हा इंग्लिश हद्दींत आहे. कृष्णाबाईस येथें प्रशस्त घाट असून घाटांवर तीन चार प्रसिद्ध देवालयें आहेत. या कृष्णा घाटावर हल्लीं एका संन्याशानें बदरि नारायणाचें देवालय बांधलें आहे. मूर्ती पांढऱ्या संगमरवरी दगडाच्या मुख्य बदरि नारायणासारख्या चांगल्या आहेत. देवस्थानीं अंधार आहे ह्मणून देवाचे पुढें मोठा आरसा ठेऊन त्याचे योगानें देवावर नीट सरळ प्रकाश पडेल अशी फार उत्तम योजना केली आहे. हा आरसा दिन माना-प्रमाणें फिरवावा लागतो. व तशी फिरविण्याची याची योजना केली आहे. जवळ दत्तात्रयाचें देऊळ आहे. त्यांत त्या संन्याशाचें लहानसें पुस्तकालय आहे. त्यांत आद्य शंकराचार्यांची, वेदव्यासांची व वाल्मिकींची अशा ऑइल पेंटि-

ग्रच्या उत्तम तसबिरी पाहावयास मिळाल्या. तसबिरी ३ × २॥ फूट लांबी रुंदीच्या असून भव्य व प्रेक्षणीय आहेत. मी विचारिलें ह्या तसबिरी तुह्मी कशावरून काढल्या? तर त्यानें सांगितलें, आजपर्यंत या महा पुरुषांच्या जितक्या तसबिरी प्रसिद्ध झाल्या आहेत, त्यांतील दोष काढून ह्या बनविल्या आहेत. दोष कसे काढलेत? तर त्यांचे संबंधानें ग्रंथांत जें वर्णन आहे व त्यांनीं ज्या आश्रमाचा स्वीकार केला होता त्या आश्रमाचे विरुद्ध आचरणाचे जे भाग पूर्वीच्या चित्रांत दाखविले होते ते दुरुस्त करून त्या सांप्रदायाप्रमाणें काढले आहेत. अशा विकत मिळतात काय? तर नाहींत. हे संन्यासी कर्नाटकांतील होते. त्यांनीं माझे स्वागतार्थ आपल्या तुंब्यांतील गंगोदक पिण्यास दिलें व थोडा खजूर खावयास दिला. यांच्या पोथ्या व पुस्तक संग्रह पाहिल्यामुळें आपण वेदकालीन संत ऋषींच्या आश्रमांतच शिरलों आहों असें वाटलें. पुस्तक संग्रहांत अर्थात सर्व धार्मिक ग्रंथ व त्यांचीं भाष्यें आहेत. पण या स्वामींची शिष्यशाखा येथें कोठें दिसली नाहीं व समजलीही नाहीं. यामुळें ही व्यवस्था पुढें कोण चालविणार? त्याबद्दल विचारच पडला. यानंतर मी

## संगम माहुलीस

गेलों. हें ठिकाण सांगली संस्थानांत आहे. हें कृष्णा वेण्या यांचे संगमावर आहे. पहिली माहुली कृष्णेच्या कांठीं व ही माहुली वेण्येच्या कांठीं संगमापर्यंत पसरली आहे. कृष्णा माहात्म्यांत ह्या संगमाचें सुरस वर्णन आहे. या संगमावर संगमनाथाचें शिवस्थान आहे. त्याचें दगडी काम व पुढील दिपमाळीचें काम हा एक उत्कृष्ट कारागिरीचा नमुना आहे. लोक सांगतात नवीन गव्हर्नर आला ह्मणजे तो इकडे येतो व या देवळाचा व दिपमाळेचा फोटो घेतल्याशिवाय जात नाहीं. इतकें तें काम उत्तम आहे. फोटो काढून घेण्यासारख्या दगडी कळाकुसरीच्या या इमारती आहेत खऱ्या. या संगम माहुलीवरच सर्व तीर्थविधी केला जातो. व मीही तसाच केला. श्रीगंगेप्रमाणेंच श्रीकृष्णेचा सोहोळा उगमापासून मुखापर्यंत प्रत्येक ठिकाणीं फारच थाटाचा होतो. याचें वर्णन यथावकाश ठिकठिकाणीं पुढें येईलच. या उत्सवाचें कारण तिचा तीर्थमहिमा हेंच आहे. तीर्थ महिमा असा कीं हिचा प्रवाह फार मोठा नाहीं. अगदीं लहान आहे. व पावसाळाच्या सुमारास तो अगदीं बंदही होतो. तरी तिचे

उगमापासून मुखापर्यंत जीं गावें व शहरें आहेत, त्या प्रत्येक शहरचे सर्व विधी तिचेच घाटावर होतात. त्या गांवीं हिच्याशिवाय दुसरें पाणीच नाहीं. असें जरी आहे तरी पुढील प्रत्येक गांवीं तिचा प्रवाह तरुण व रूपसुंदर कुमारिकेप्रमाणें तेजस्वीच असतो. ह्मणजे पाणी अत्यंत स्वच्छ, आनंददायी, व रोगबीजें नाहींसें करणारें असून गांवची बागबागाईत करून देणारें आहे. खऱ्या संपत्तींत भर टाकणारा असा हिचा प्रवाह असल्यामुळें लोक कृतज्ञता बुद्धीनें हिचा गौरव करितात. यांत जास्त काय आहे? कृष्णा कांठचा भाजीपाला वांगी मिरच्या इतकेंच नव्हे तर सर्व धनधान्य संपत्ती श्रीगंगेप्रमाणेंच विपूल व तेजस्वी असते. अशी हिची सर्वत्र प्रख्याती आहे. हा काय तीर्थ महिमा थोडा आहे? या तीर्थ महिमामुळेंच श्रीगंगा बारा वर्षांनीं कां होईना पण आपल्या बहिणीला कन्यागतीं एकदां तरी भेटीला येते व ती एक वर्षभर राहते. निदान असें मानण्यांत तरी येतें. अर्थात ह्या दोन्हीं नद्या जनतेच्या दृष्टीनें सारख्याच उपयोगाच्या आहेत. यानंतर मी

## सातारा

येथें जाण्यास निघालों. सातारा हा येथून पश्चिमेस तीन मैलांवर आहे. जाण्यास चांगली धोपट सडक आहे. सातारा येथें धार्मिक तीर्थविधी कांहीं नाहीं. पण हें ऐतिहासिक स्थळ आहे. श्रीशाहू महाराजांचे कारकिर्दींत कांहीं वेळ तरी सर्व हिंदुस्थानचीं राज्यसूत्रें येथून हालत होतीं. ह्मणजे आजच्या दिल्लीचा मान याला पूर्वीं होता. ह्मणून ह्या जुन्या वैभव संपन्न राजधानीचें मोडक्या तोडक्या स्थितींत कां होईना पण ऐतिहासिक प्रेमी मनुष्याला हें अत्यंत पवित्र तीर्थ आहे, असेंच वाटेल.

साताऱ्यास मराठे शाहीची मुहूर्तमेढ श्रीशाहूमहाराजानीं रोविली पण तिच्यावर बांधकाम कोणींच केलें नाहीं. बांधकाम होणार तों ती जागा बदलून त्यावेळचे राज्याचे चालक पेशवे यांनीं कांहीं राजकारणामुळें त्यानें ती मुहुर्तमेढ पुण्यास नेली. प्रथम मराठी राज्याची स्थापना शिवाजी महाराजानीं राजगडास केली. तेथून ही राजलक्ष्मी रायगडास गेली. पुढें डोंगरी जंगली राहणें सोडून साताऱ्यासारख्या मैदानी ठिकाणीं ती राजरोस आली. पुढें आपल्या उन्नतीकरितां व वैभव दाखविण्याकरितां भर तारुण्यांत तेथून ती

पुण्यास आली. आणि तेथून ती सार्वभौम पदाकरितां किंवा पांडवाप्रमाणें दिग्विजयी होण्याकरितां पांडवांच्या इंद्रप्रस्थास किंवा नव्या दिल्लीस जाणार होती इतक्यांत तिला क्षयाची भावना होऊन ती दिवंगत झाली!! अशा रीतीनें मराठेशाहीच्या राजधानीला सुखाची किंवा शांततेची किंवा पूर्ण वैभव दाखविण्याजोगी किंवा कर्तृत्व दाखविण्याजोगी संधीच तिला सांपडली नाहीं! यामुळें मराठी राज्याचें एकत्र वैभव कोठेंच दिसत नाहीं. सर्व हिंदुस्थानांत तिचा पादसंचार मात्र दिसतो. हल्लींसुद्धां साताऱ्यास जुना राजवाडा, नवा राजवाडा ह्या इमारती आज पाहण्यासारख्या आहेत. पण त्या पाहूनसुद्धां आजच्या स्थितीच्या राजवाड्याची कल्पना होत नाहीं. जुने राजवाड्याचा विस्तार मात्र मोठा आहे. इतका कीं, हल्लींच्या सरकारच्या सर्व कोर्ट कचेऱ्या, इंग्रजी शाळा, मराठी शाळा, म्युनसिपल ऑफिस हीं सर्व त्यांत प्रशस्तपणें राहिलीं आहेत. पण एखाद्या साधारण सरदाराच्या घरापेक्षां ह्यांत कांहीं विशेष सोयी किंवा वैभव आतां कोठें दिसत नाहीं. आतां वैभव गेलें असलें तरी पण जुनीं कोरींव लेणीं, देवळें, मशीदी, घुमट अथवा दर्गे पाहून त्या काळच्या वैभवाची व कारागिरीची कल्पना होते. त्यासारखी ह्या देखाव्यानें होत नाहीं. फक्त राजवाड्याचें काम मजबूतीच्या दृष्टीनें चांगलें आहे. इतकें कीं, राजवाडा बांधल्यापासून आजपर्यंत त्यांची रिपेर नाहीं! फार काय? चुन्यांत बसविलेलीं त्यांची फुटलेलीं कौलेंसुद्धां दुरुस्त केलीं नाहींत! तरी रंगासुद्धां त्याचें अद्याप नाविन्य व भव्यपणा कायम आहे. शाहूमहाराज फार विलासी होते. जलक्रीडेचा हौस त्यांना फार होती ह्मणून राजवाड्यांत जिकडे तिकडे कारंजीं, पुष्करणी, हौद, यांची रेलचेल आहे. येथें एक जलमंदीर आहे. त्याचे सभोंवती तीन तीन हातावर कारंजीं आहेत. तीं सर्व सुरू होऊन सभोंवती पाणी भरल्यावर ह्या जलमंदीराची शोभा विशेष दिसते.

साताऱ्या जवळ दक्षिणेच्या टेकडीवर अजिंक्यतारा नांवाचा किल्ला आहे. त्यांतही आतां देवी मंगळाई हिचे देवळाशिवाय कांहीं पाहण्यासारखें राहिलें नाहीं. स्वराज्य असतांना हा किल्ला घेण्यास अजिंक्य होता ह्मणून याला अजिंक्यतारा ह्मणत; त्याचाच अपभ्रंश अजिमतारा झाला आहे. औरंगजेबाचा मुलगा अजीमशहा यांच्या कल्पनेनें हा किल्ला मिळाला ह्मणून औरंजेबानें त्याला अजिमतारा नांव दिलें. हल्लीं सातारा हें जिल्ह्याचें ठिकाण झालें आहे. हल्लींच्या काळा-

प्रमाणें पोकळ वैभव व देखावा जिकडे तिकडे पसरला आहे. हल्ली साताऱ्यास दुमजलीपेक्षां जास्त मजल्याच्या इमारती नाहींत. शहराचा विस्तार मोठा आहे व तो अजिमताऱ्याच्या डोंगराच्या पायथ्यापासून खालीं उतरत आला आहे. हल्लीं हें शहर प्लेगमुळें मोडकळीस आलें आहे. ह्या शहरास पाण्याचा पुरवठा पश्चिमेकडील यवतेश्वराच्या डोंगरांतून आहे. त्याचे रस्त्यावर महादर्याचा मोठा तलाव शहरापासून पाऊण मैलावर बांधला आहे. व तेथून नळानें इकडे पाणी शहरांत आणिलें आहे. साताऱ्यास जुनी देवता मंदिरें प्रसिद्ध आहेत. पण त्या देवळांत कांहीं सुधारणा नाहीं. हल्लीं साताऱ्यास प्रवासी मनुष्यास उतरण्याची व राहण्याची मोठी सोय झाली आहे. येथें आतां नव्या पद्धतीच्या खाणावळीच निघाल्या आहेत. यांत जेवणाची व राहण्याची सोय होते. अशा खाणावळींतच मी उतरलों होतों व भोवतालच्या गांवीं हिंडत होतों.

त्याठिकाणीं मी एक ब्राह्मणाची बाई पाहिली तिला एकच पाय होता. दुसरा पाय अगदीं लहानपणापासून देवीनें किंवा इतर कशानें गेला होता. त्याचा कांहीं अवशेषही राहिला नव्हता. तरीही ती वयांत आल्यावर एका पायानेंच चालूं लागली. हातांत काठी किंवा कुबडी न घेतां टुण्टुण् उड्या मारीत चाललेली मी पाहिली आहे! एका पायाच्या मनुष्याला निराधार उभें राहतांसुद्धां येत नाहीं. पण ही तासतास उभी राहते!! इतकेंच नव्हे तर कडेवर घागर घेऊच एका पायानें हातांत कांहीं एक न घेतां किंवा कशास न धरतां जिना चढून जाते असें ह्मणतात. यापेक्षां आश्चर्य कोणतें!! ही बाई ब्राह्मणाची होती. अर्थात ती वयांत आल्यावर तिचें लग्न करून दिलें. तिचा नवरा पोलिसांत शिपाई होता. ती अशी अपंगु होती तरी तिनें अभिमानानें आपला संसार मोठ्या थाटानें मांडिला होता. तिला एक मूल सुद्धां झालें होतें. पण तें मेलें. दुर्दैवानें तिचा नवराही मेला व तिला वैधव्य आलें. इतकेंच नव्हे तर तिला सासरचें कोणी राहिलें नाहीं व माहेरचेंही राहिलें नाहीं. तेव्हां येथील एका वाकिलानें तिची तरफदारी सरकारांत करून नवऱ्याच्या नोकरीचें तिला सात रुपये पेन्शन देवविलें. तरी तेवढ्यावर ती संतोषीत न राहतां महत्वाकांक्षेनें तिनें शिक्षणाला आरंभ केला व मेडिकल स्कूलमध्यें नर्सचें काम शिकण्याकरितां ती जाऊं लागली. रडत बसली नाहीं, किंवा भीक मागूं लागली नाहीं!! प्रयत्नी मनुष्यास काय करितां येणार नाहीं? प्राप्त झालेल्या किंवा खडतर परिस्थितीला सुद्धां ती कंटा-



रामदासस्वामी ( परळी सज्जनगड ) ( पृष्ठ १८२ )

ऊली नाहीं. शाबास तिची, धन्य तिची, पुरुषापेक्षां तिचें धैर्य असामान्य खरें!! प्रवासांत किंवा यात्रेंत, परमेश्वरानें मला असे विलक्षण चमत्कार दाखविले व कर्तृत्वाची मर्यादा कोठपर्यंत नेतां येते याचा चमत्कार दाखविला. त्या परमेश्वराच्या गुणानुवादाकरतांच मी ही गोष्ट मुद्दाम लिहिली आहे.

हल्लीं सातार्‍यास सातारच्या राजवंशांतील महाराज आहेत. पण त्यांससुद्धां त्यांच्या पूर्वजांनीं बांधलेला राजवाडा उपभोगण्यास मिळाला नाहीं. जणु काय ते त्या राजवाड्यांत आतां राहण्यास योग्य नाहींत! कदाचित आपल्या पूर्वजांचें एखाद्यास स्मरण होऊन तो एकटासुद्धां भलतेंच करील! राजवाड्यांत भवानीदेवी ज्या सिंहासनी होती तेथें आतां जज्जसाहेब न्याय करीत बसले आहेत. व ज्याठिकाणीं तिचे भक्त तिची पूजा अर्चा करीत होते, तेथें वकील लोक हल्लींच्या काळच्या खर्‍या खोट्याचा काथ्याकूट करीत आहेत. व भवानीस तेथून काढून एक बाजूस तपःश्चर्या करीत ठेविली आहे! तसेंच हल्लींच्या राजेसाहेबांस एक लहानसें घर दिलें आहे. राजवैभवार्थ देवडी, चौघडा, हत्ती, अंबारी, वगैरे सर्व ऐश्वर्य ठेवावें लागतें. पण उत्पन्न कमी झाल्यामुळें काप जाऊन भोकें राहिल्याप्रमाणें हें होत आहे. पण त्यास इलाज नाहीं. आतां त्यांचा अधिकार राजवाड्याबाहेर किंवा जनानखान्याबाहेर नाहीं. माझ्या समजुतीनें हें नुसतें दुःख देणारें गतवैभव टाकून देऊन जें वेतन मिळत असेल त्याच वेतानें निर्वाह करून उरलेला पैसा देशकार्याकरितां लावावा. ह्मणजे एखादा कारखाना चालवावा. त्या योगें पैसे वाढून होतकरू लोकांस उत्तेजन व गरीब लोकांस मजुरी मिळाल्यामुळें त्यांस उत्तेजन येऊन राजेसाहेबांस ते दुवा देतील. जुनें राजवैभव आतां पाहणेससुद्धां मिळणार नाहीं. सबब त्याचें रक्षण करणें जरूर खरें पण त्यानें पुरें पडत नाहीं. मग व्यर्थ हसूं करून घेण्यांत अर्थ तरी काय? 'कालाय तस्मैनमः' असें ह्मणून समजूत करून घेणें भाग आहे. पण हे विचार राजघराण्यांतील लोकांस पटणार नाहींत. असो. सातार्‍याजवळ पश्चिमेस श्रीसमर्थांचें

## परळी ऊर्फ सज्जनगड

हें समाधीचें स्थान आहे. समर्थांची योग्यता सर्व संतमंडळामध्यें मोठी आहे. तशी ती राजकारणी पुरुषांतही आहे. ह्मणजे त्यांनीं इहलोक व परलोक या दोघां विषयीं विचार केला आहे. ह्मणूनच त्यांस समर्थ ह्मणजे सर्व बाजूंचें यथार्थ

समर्थन करणारे किंवा अधिकारी, किंवा हवें तें देणारे असें नांव मिळालें होतें. सर्व संतमंडळींनीं लोकांस उपदेश केला कीं, प्रपंचांत कांहीं अर्थ नाहीं. परमार्थाचें श्रेष्ठत्व मोठें आहे. जणुकाय सर्वांनींच अंगाला राख फासून गोसावडे व्हावें! खरोखर गोसावडे होणें सोपें नाहीं. जवळ जवळ तें तसें होणें अशक्यच आहे हेंच खरें, पण उपदेशाप्रमाणें सर्व लोक झाले अशी कल्पना केली तर अशा गोसाव्यास हल्लीं खावयास तरी कोण घालील? याचा विचार कोणत्याही साधूनें केला नाहीं. तो रामदासांनीं केला म्हणून त्यांची योग्यता मोठी. त्यांच्या उपदेशाचें सारामृत मुख्यतः खालीं लिहिलेल्या त्यांच्या पद्यांतच आहे.

आधीं प्रपंच करावा नेटका ॥ मग घ्यावें परमार्थ विवेका ॥

---

प्रपंच सांडून परमार्थ कराल ॥ तेणें तुह्मी कष्टी व्हाल ॥

---

प्रपंच सोडूनि परमार्थ घेतां ॥ तरी अन्न मिळेना खावयाला ॥
मग तया करंट्याला परमार्थ कैचा ?

---

एक हरिकथा निरूपण ॥ दुसरें तें राजकारण ॥
तिसरें तें सावधपण सर्व विषयीं ॥

---

श्रेष्ठीं जें जें मिळविलें ॥ त्यासाठीं भांडत बैसलें ॥
मग तेथें फावलें गनिमासी ॥

---

आहे तितकें जतन करावें ॥ पुढें आणिक वाढवावें ॥
महाराष्ट्र राज्य वाढवावें ॥ जिकडे तिकडे ॥

---

राजकारण बहुत करावें ॥ परंतु तें कळूंच न द्यावें ॥

---

हल्लीं राजकारणाची जिकडे तिकडे बडबडच चालली आहे; खरें राजकारण कसें असतें याचा यांना गंधच नाहीं. हे नियम समर्थांनीं खालीं दिलें आहेत.

देव मस्तकीं धरावा ॥ अवघा हल कल्लोळ करावा ॥
मुलुख बुडावा कीं बुडवावा ॥ धर्म संस्थापने साठीं ॥

---

प्रसंग समय ओळखावा ॥ धीर बहुत असावा ॥

---

जो बहुतांचें सोसेना ॥ त्यास बहुत लोक मिळेना ॥

---

धर्मासाठीं मरावें ॥ मरावें परी कीर्तिरूपें उरावें ॥

---

मराठा तितका मेळवावा ॥ महाराष्ट्र धर्म वाढवावा ॥
ये विषयीं न करितां तकवा ॥ पूर्वज हासती ॥
मरण हांक तो चुकेना ॥ देह वांचवितां वाचेना ॥
विवेकीं होउनी समजाना ॥ काय करावें ? ॥

---

एक जाती दोन जाती पावला (बाटला)॥ तो कैसा ह्मणावा भला ? ॥
तुह्मां सकळांसि कोप आला ॥ तरी क्षमा केली पाहिजे ॥

असा बहुमोल उपदेश करून त्यांनीं महाराष्ट्रीयांना कायमचें ऋणी करून ठेविलें आहे. यांचे विषयीं मोरोपंत कवीनांसुद्धां फार उदार उद्गार काढले आहेत.

शिवरायास ज्ञानद जो। जैसा तो याज्ञवल्क्य जनकास॥
तरले भवार्णवीं बहु। दृढतर त्याची धरूनि जनकास॥

(मोरोपंत)

असा निधड्या छातीचा उपदेश त्यांनींच केला व तो राजापासून रंकापर्यंत सर्वांना पटून ठिकठिकाणीं त्यांनीं मठस्थापना करून सर्व देश जागा करून अभिमानी बनविला त्या साधूची योग्यता किती मानावी ?

चतुर्विध पुरुषार्थाचा उपक्रम तरी असाच आहे. प्रथम धर्म नंतर त्यापासून अर्थ नंतर काम आणि शेवटीं मोक्ष ह्मणजे प्रथम स्वधर्मानें वागावें निदान वागण्यास शिकावें. नंतर त्याची जागृती ठेऊन पैसा मिळवावा. घरदार, कुटुंब, गुरेंढोरें यांचें पोषण करावें. स्वदेशाच्या उपयोगी पडावें. पण सर्वस्वाचा लोभ न धरितां त्याचा त्याग करावा. सर्वस्वाचा म्हणजे आपल्या शरिराचासुद्धां प्रसंग आल्यास मनानें त्याचा त्याग करावा. म्हणजे मोक्ष कांहीं लांब नाहीं. ही परंपरा कायम ठेऊन मग मोक्षाकरितां मन संसारांतून काढावयाला शिकावें. संसारांतून मन एकदम निघणार नाहीं. सवव प्रथम परोपकाराकडे लक्ष देत जाऊन स्वार्थ सोडून परमार्थ स्वीकारावा. असें होतां होतां तो मार्ग सुलभ होतो. समर्थांनीं लोकांच्या उपदेशाकरितां दासबोध ग्रंथ केला आहे. त्यांत ह्या सर्व गोष्टींचा खुलासा केला आहे. तो येथें करण्याचें कारण नाहीं. पण महाराष्ट्रांत धर्माभिमान, क्षात्रतेज, आत्मविश्वास, आणि बुद्धिवर्चस्व उत्पन्न करण्याचें सर्व श्रेय रामदासांकडे देणें योग्य आहे. फार काय, महाराष्ट्रास श्रेष्ठता आणण्यास हेच साधु खरोखर कारणीभूत झाले आहेत.

अग्रतः चतुरोवेदाः पृष्टतः सशरंधनुः ।
इदं ब्राह्मं इदं क्षात्रं शापादपि शरादपि ॥

परशुरामाला ब्रह्मतेज व क्षात्र सामर्थ्य हीं मूळ श्री शंकरापासूनच प्राप्त झाल्यामुळें तो मूर्तिमंत अतुल पराक्रमी व सामर्थ्यवान झाला होता ह्मणून हे व्यासानीं परशुरामाविषयीं काढलेले उद्गार, रामदासांनाही जवळ जवळ पूर्ण लागू पडतात. त्यांनीं जिकडे तिकडे मारुतीची स्थापना करून आपल्या सांप्रदायी मठाची स्थापना केली. व धर्म जागृति करून महाराष्ट्र देश खडबडून जागा केला. त्यांनीं धर्माचा पाया मजबूत केला. व त्यावर राजकारणाची इमारत बांधली. हल्लींचे पुढारी तो धर्माचा पाया उखळून नवा कच्चा भरून राजकारणाच्या नुसत्या गोष्टी बोलत आहेत त्या त्यांच्या सिद्धीस कशा जातील? अशा साधूंचे महाराष्ट्रीयांनीं उत्साह करून त्यांचें गुणवर्णन कीर्तन करीत बसणें व त्याप्रमाणें शरीरावर तुळशीपत्र ठेऊन वागणें हें त्यांचें कर्तव्य होय. निदान अशा महापुरुषाच्या समाधीचें तरी एकवार दर्शन घेऊन मन पावन करून घ्यावें. म्हणून मी या दर्शनास आलों. तरवारी शिवाय नुसत्या वाङ्मयानेंसुद्धां राज्यांत उलाढाली करतां येतात हें रामदासस्वामी, नानाफडणवीस, यांनीं

सिद्ध करून दिलें आहे. अर्थात ते अवतारी पुरुष खरे. तेव्हां देवांचे यात्रे-बरोबर यांचीही यात्रा करणें जरूर आहे. आतां रामदासांनीं आपला संसार बुडाविला मग लोकांना संसाराचा उपदेश कशाला केला? असें कोणी ह्मणतील तर रामदास स्वामींचा संसार लोकांच्या प्रमाणें आपआपल्या बायका मुलांच्या इतकाच नव्हता. सर्व महाराष्ट्रभर होता हें त्यांनीं विसरूं नये. समर्थांचे वेळीं धर्मावर सक्रीय हल्ले होत होते. तरी त्यांनीं त्यांत भेद पडूं दिला नाहीं. हल्लीं परके लोक आमचें धर्मरूपी घर खिळखिळें झालें आहे, तें आजच्या समाज-स्थैर्यास असमर्थ झालें आहे, असें सांगतात व आमचे विद्वान तें खरें मानून उंटावरच्या शहाण्याप्रमाणें त्याची मोडतोड करून दुरुस्ती करूं लागले आहेत. कोणी ह्मणतो सोंवळें ओवळें प्रथम सोडून अस्पृश्यता निवारण करा. दुसरा ह्मणतो स्त्रियांना पुरुषांसारखें एके ठिकाणीं बसून शिक्षण द्या. प्रौढ विवाह करा. विधवा विवाह करा. वर योजनेचें कामच त्यांच्याकडे द्या. तिसरा ह्मणतो निर-क्षरता काढूनच टाका. कोणी ह्मणतो जातीभेद काढून टाका. निदान पूर्वीच्या चार तरी जाती करा, कोणी ह्मणतो मांसाहार करा. असा प्रत्येकजण पाश्चा-त्यांच्या शिकवणीचा आधार घेऊन आपल्या विद्वत्तेचें निशाण हातीं घेऊन घरच्या ह्मातारीरूप जनतेपुढें नाचत आहे. पण ह्मातारी ह्मणते, अशा नाच-ण्याचा परिणाम चांगला होणार नाहीं आणि त्याप्रमाणें हल्लीं प्रत्ययही येत आहे व पुढें येईलही. आपल्या धर्मानें कोणता व्यवहार आडविला आहे? प्रसंगार्थ आपद्धर्म सांगितले आहेतच. पण तेच नियम धरून कसें चालेल? धर्मशासन असल्यावांचून किंवा त्याचें बंधन मनानें तरी मानिल्यावांचून धर्म संबंधानें समाज स्थिर कसा राहील? आणि असे नियम वारंवार बदलीत गेल्यास हिंदू-धर्माचें अस्तित्वच राहणार नाहीं. हल्लीं जगांत हवे तेवढे धर्म आहेत. पण त्यांची अशी सुधारणा होत आहे काय? राजकर्त्यांचा खिस्तीधर्म आहे. ते त्याची कोठें सुधारणा करतात? अमेरिकेंत मनुष्याची उत्पत्ती माकडापासून झाली आहे असें नैतिक तात्विक ज्ञान शिकविणाऱ्या शिक्षकाला शिक्षा झाली आहे, हें लक्षांत ठेवण्यासारिखें आहे. वस्तुतः हा शास्त्रीय विषय आहे पण तोसुद्धा त्यांस रुचला नाहीं. समाज हा धर्माप्रमाणें तंतोतंत न वागतां मागें पुढें वाग-तोच पण त्याप्रमाणें नियम करीत गेल्यास समाजाच्या व धर्माच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडाल्याशिवाय राहणारच नाहींत. आमच्या धर्मास पूर्वीप्रमाणें धर्म-

शासन मिळाल्यास किंवा अशा उचापती न केल्यास हाच धर्म पूर्वीप्रमाणें समाज बंधनास सर्वांत श्रेष्ठ आहे, असें प्रत्ययास आल्यावांचून राहणार नाहीं. या संबंधीं पुढील हंसान्योक्ति खरोखर विचार करण्यासारखी आहे.

कस्त्वं लोहित लोचनास्यचरणो हंसः कुतो मानसात्
किंतत्रास्ति सुवर्ण पंकजवनान्यंभः सुधा सन्निभं
रत्नानां निचयः प्रवाल मणयो वैडूर्य लोहः क्वचित्
शंबूकाः किमुतत्र संतिच बकैराकर्ण्य ही ही कृतं ॥ १ ॥

स्वर्गातल्या दिव्य मानस सरोवराच्या राहाणीला कंटाळून हंस सुवर्णभूमीच्या आणि तिची मजा पाहाण्याकरितां हिमालय ओलांडून आले! त्यांना एका डबक्यांत कांहीं बगळे, मासे, मारतांना दिसले ते त्यांच्याप्रमाणें शुभ्र असल्यामुळें हे आपल्या जातीचे असावे असं त्यांना वाटून ते प्रथम तेथें खालीं उतरले. त्यांना पाहून बगळे त्यांना विचारतात, कायहो लालचोंचींचे तुमचे डोळे व पायही सुंदर लाल आहेत; रंग आमच्यापेक्षांही शुभ्र आहे! बरं आपलें नांव काय? आम्हाला हंस म्हणतात. कोठून आलेत? मानस सरोवरांतून. काय तेथें आहे? अमृताप्रमाणें उदक असून त्यांत सुवर्ण कमळें आहेत. पोंवळी वैडूर्य वगैरे नानाप्रकारचीं रत्नें आहेत, वगैरे सांगितलें तेव्हां बगळे एकमेकांकडे पाहूं लागले, कारण त्यांत त्यांच्या ओळखीचें एकही नव्हतें! अगोदर हंस हें नांवच माहीत नव्हतें मग अमृतजल सुवर्णकमळें, रत्नें वगैरे कोठून माहित असणार? तेव्हां निरुपाय होऊन त्यांनीं आपल्या ओळखीचा (खाण्याचा) पदार्थ त्यांनीं विचारला. कायहो तेथें मासे, खेकडे, गोगलगाई वगैरे आहेत काय? असे घाणरडे पदार्थ आमचेकडे नाहींत. तेव्हां सगळे ही ही करून हंसले!

हाच अगदीं प्रकार पाश्चात्यांत व आमच्यांत आहे! अगदीं आरंभी आमच्याकडील एका सुशिक्षिताची एका युरोपीयनाशीं मैत्री जमल्यामुळें त्यांच्या मंडळींत त्याला जाण्याचा प्रसंग आला. त्यावेळीं त्यांचीं पुढील प्रश्नोत्तरें झालीं. तुम्ही कोण?—आर्य. तुमच्या धर्मात काय आहे? श्रमविभागाला योग्य अशा जाती आहेत. श्रेष्ठकुटुंब पद्धती आहेत. लोक पापभीरु व आचार संपन्न आहेत. राजापासून रंकापर्यंत सर्व लोक प्रेमात व आनंदांत आहेत. तेव्हां यापैकीं त्यांना एकही पटलें नाहीं. तेव्हां त्यांनीं त्याला विचारलें कायहो, तुमच्यात व्यक्तिस्वातंत्र्य, स्त्री स्वातंत्र्य आहे काय? आम्ही जसे वाटेल त्याची बायको त्याच्या-

समक्ष घेऊन तिजबरोबर नाचतों तसे तुमच्यांत नाचतात काय? छे छे! आम-च्यांत पातिव्रत्य फार कडक आहे, परस्त्रीकडे पाहावयाचें सुद्धां नाहीं!! तेव्हां सर्व लोक त्याला हंसले. तेव्हां हे श्रेष्ठ राजकर्ते असून आपल्याला हंसले म्हणून त्याला वाईट वाटून त्यानें आपल्या मंडळीला आपले अवनतीची व राज्य मिळविण्याचीही गुरुकिल्ली सांगितली. तेव्हां ते सर्व एकाच प्रकारचे शाळेंत तयार झाले असल्यामुळें ती सर्वांस पटली व सर्वच स्त्रीशिक्षण स्त्रीशिक्षण असा घोष करूं लागले! पण आत्मभाव कायम ठेवणें हें एकंदर शिक्षणाचें खरें तत्व कोणालाच समजलें नाहीं व सर्वजण स्त्रीशिक्षणाचे, स्त्री स्वातंत्र्याचे उपदेश करूं लागले! ही लांड्या कोल्ह्याप्रमाणें स्थिती झाली! पण त्याचा परिणाम पुढील हंसान्योक्तीप्रमाणें झाल्याशिवाय राहणार नाहीं हें लक्षांत ठेवावें. आमचा सुशिक्षित समाज ह्याचप्रमाणें फसून वाहवत चालला आहे यांत शंका नाहीं.

ज्याच्या तीरीं समंतात मधुर फलभरें वाकले वृक्ष भारी
ज्यामाजीं पद्मखंडें फुलुनि विखरती गंधचित्ताप हारी
त्या जेणें मानसातें त्यजुनि वरियलें पल्वला पंकितातें
त्या हंसाच्या बकांनीं जरिपद दिधलं मस्तकीं योग्य त्यातें ॥ १ ॥

सारांश सुशिक्षितांना आपल्या कर्तृत्वाची घमेंड दाखवावयाची असेल तर त्यांनीं धार्मिक बाब सोडून यांत्रिक कला किंवा राजकारण–किंवा राजनीति करून आपल्या बुद्धीचें किंवा कर्तृत्वाचें श्रेष्ठत्व दाखवावें. आम्हांला खरोखर त्याचीच फार जरूर आहे. मुलींचीं लग्नें कितव्या वर्षी करावीं वगैरे सांगण्या-करितां नको आहे. तसें ते न करतील तर कुऱ्हाडीचा दांडा गोताला काळ होऊन, अशानें एकी, उन्नती, सुधारणा किंवा राष्ट्रसामर्थ्यवान न होतां अवनती मात्र होईल व त्याचा आतां प्रत्ययही येऊं लागला आहे. व हा सर्व बिघाड केल्याचें पातक त्यांच्या माथीं पडून ते समाजापासून फुटून त्यांची अप्रतिष्ठा झाल्याशिवाय राहणार नाहीं. सुशिक्षितांना या गोष्टीचा राग येईल पण त्यांना तरी त्याच्या चुका सामान्यजनांच्या दृष्टीनें काय आहेत हें समजल्याशिवाय उपयोग काय? ह्मणून त्या ह्या यात्रांच्या पुस्तकांत दाखविणें भाग आहे. कारण त्यांच्याच मत स्वातंत्र्याच्या दृष्टीनें हें मत यात्रेंतील लोकांकडून मला कळलेलें प्रसिद्ध केलें आहे त्याबद्दल त्यांना राग येणार नाहीं अशी आशा आहे.

परळी साताऱ्च्या पश्चिमेस सात मैलांवर आहे. जाण्यास चांगली सडक आहे. पण ती लोकलफंडी आहे. साताऱ्च्या पश्चिमेस कोल्हापुराकडे जी सडक जाते, तिचा बोगदा उलटून गेलें म्हणजे तेथें दोन रस्ते फुटतात. तेथें रस्त्यांच्या दर्शक खांबावर दोन पाट्या आहेत. डाव्याकडची सडक कोल्हापुरास जाते व उजवीकडची सज्जनगडास जाते. या सडकेनें पांच मैल गेल्यावर ऊरमोडी नांवाची लहान नदी लागते. सडकेवरून तिला पूल आहे. त्याचा पावसाळ्यांत उपयोग होतो. उन्हाळ्यांत लोक मधल्या वाटेनेंच जातात. पुलापुढें परळी गांव लागतो. व सज्जनगडची टेकडी किंवा किल्याचा मार्ग अगोदरच फुटतो. पुलाचे पुढें दोन चार फर्लांग गेलें म्हणजे सज्जनगडचा चढाव लागतो. चढाव सुमारें एक मैल आहे.

महाद्वारांतून वर गेल्यावर प्रथम मारुतीचें दर्शन होतें. तेथें त्याची ध्वजा लावली आहे. यापुढें मैदान आहे. वर पंचवीस तीस घरांची वस्ती आहे. त्यांत एक दोन ब्राह्मणांचीं घरें आहेत. वर दोन तीन पाण्याचे कृत्रिम तलाव आहेत. अर्थात हें पाणी सांचवणी आहे. यांचा उपयोग मात्र निरनिराळे कामाकडे कर-ण्याचें ठरविलें आहे. म्हणजे पिण्याच्या पाण्याचें चांगलें रक्षण होतें. एकांत कपडे धूतात. भांडीं घासतात. जनावरास पाणी पाजतात. दुसऱ्यांत स्नान व तिसऱ्यांतून नुसते पाणी प्यावयास नेतात. ही व्यवस्था फार उत्तम आहे. यापुढें समाधीचें महाद्वार लागतें. आंत गेल्यावर प्रशस्त आवार दिसतें. मधो-मध मुख्य समाधीचें (रामाचें) देऊळ आहे. सभोंवार पटांगण असून त्या पलीकडे सर्व बाजूनें सोपे बांधले आहेत. त्यांतच संस्थानची कचेरी, अन्नछत्र लायब्ररी, वगैरे संस्था आहेत. अन्नछत्रांत दोन तीन दिवस सर्वत्रांस भोजन मिळतें. देवस्थानचा परिवार म्हणजे त्या संस्थानचा परिवार (सेवेकरी वर्ग, नोकरचाकर) यांचा फार मोठा आहे. रोजचें पन्नास साठ माणूस सकाळ संध्याकाळ भोजनास असतें. याशिवाय आला गेला असतो.

मी आल्यावर प्रथम रामदर्शनार्थ गेलों. देवळाचें काम फारच मजबूत आहे. ह्या देवाच्या मूर्तींची स्थापना प्रत्यक्ष रामदासांच्या हातची आहे असें म्हणतात. मुख्य समाधी याच देवस्थानचे खालीं भुयारांत आहे. व भुयारांत जाण्यास रामाच्या गाभाऱ्यांतून मार्ग आहे. स्नान करून कोठेंही न शिवतां सोंवळ्यानें आलें असतां खालीं समाधीच्या दर्शनास जातां

येतें. ब्राह्मणेतरास दर्शन सभामंडपांतून एक दार ठेऊन त्यांतून होतें. ब्राह्मणेतरांपैकीं कांहीं दरपौर्णिमेस गडावर पाहाटेस दर्शन घेऊन उजाडाला सातान्यास येणारी मंडळी अद्याप आहे! यात्रेचे वेळीं स्वयंपाकाकरितां ब्राह्मणाच्या पाण्याची फार गैरसोय होते. सबब पिण्याच्या पाण्याच्या तलावावर एक पंप लाऊन त्याचा नळ स्वयंपाकघरांत आणून ठेविला आहे.

मी तीर्थकुंडांत स्नान करून आल्यावर मुख्य समाधीचें दर्शन घेतलें. व त्यामुळें मन फारच प्रसन्न झालें. सत्पुरुषाच्या दर्शनाचा हाच महिमा आहे. त्याचे दर्शनानें मन निर्विकल्प व कर्तव्यदक्ष होतें. दर्शन झाल्यावर तीर्थ प्रसाद (भोजन झालें) व देवळांत दोन वाजेपर्यंत विश्रांती घेतली. नंतर संस्थानची व्यवस्था व तेथील दुसऱ्या संस्था पाहण्यास गेलों. या संस्थानचे अधिकारी चाफळास राहतात. यात्रेचे व उत्सव प्रसंगीं मात्र ते येथें येतात तोंपर्यंत ह्या संस्थानचे देखरेखीवर मुख्य कारभाऱ्याची नेमणूक असते. संस्थानचे मुख्य कारभारी हे समर्थांच्या वंशजांतील आहेत, खुद्द समर्थांचा वंश नाहींच. कारण त्यांनीं लग्न परिवार केलाच नाहीं. त्यांचें दृश्य लग्न देशकार्य व स्वधर्माचा उद्धार हेंच होतें. व तें त्यांनीं अत्यंत श्रेष्ठ प्रकारें केलें. असा इतिहास साक्ष देत आहे. आजही धर्मजागृती व राष्ट्रजागृतीचें अवशिष्ट स्वरूप दिसत आहे. तें तिचेंच फळ आहे. हल्लीं संस्थानचे अधिकारी त्यांच्या बंधूचे वंशज आहेत. समर्थ शके १६०३ माघ कृष्ण नवमीस आपल्या वयाच्या त्र्याहत्तरावे वर्षी समाधिस्त झाले. त्यांच्या समाधीवर सांप्रत दिसत असलेली चौकोनी शिळा त्यांच्या दहन भूमींतूनच निघाली आणि तिच्यावर राम मंत्राचा ठसा उमटलेला आहे. हा त्यांचा मरणोत्तर साक्षात्कार आहे. याशिवाय त्यांचे साक्षात्कार इहलोकचे दृष्टीनें पुष्कळांच्या अनुभवास आले आहेत. ते वाचण्याची इच्छा असल्यास त्यांनीं समर्थांचें सामर्थ्य हें पुस्तक वाचावें. त्यांनीं कित्येकांच्या विषबाधा दूर केल्या, रोग घालविले. पण राष्ट्रकार्याच्या खालीं यांचा उपयोग आहे. हल्लीं अशाप्रकारचे साक्षात्कार करणारे साधू पुष्कळ आहेत. पण राजकारणाची गोष्ट काढतांच त्यांचा थरकाप होतो. अर्थात हल्लींचे सर्व साधू मतलबी व स्वदेहाचें कौतुक करणारे आहेत. त्यांना देह धर्माचें मोठें कौतुक असून राष्ट्रधर्म ह्मणजे काय हें त्यांचे गांवीही नाहीं. पण स्वराष्ट्र असल्यावांचून स्वधर्माचा बोज कसा राहील? रामदासासारखा प्रवृत्ति निवृत्तीची सांगड घालणारा साधू त्यांचे

मार्गे झाला नाहीं व पुढेही ब्रम्हेंद्रस्वामीशिवाय झाला नाहीं. ब्रम्हेंद्रस्वामींची योग्यता रामदासा एवढी नाहीं, तरी हल्लींच्या साधूपेक्षां पुष्कळपटीनें अधिक आहे. समर्थ ही पदवी रामदासाशिवाय दुसरे कोणास त्यांचे मागें किंवा पुढें मिळाली नाहीं याचें कारण हेंच. हल्लीं लोकांची प्रवृत्ति पैसा मिळविण्याकडे व उपाधीरहित इंद्रियजन्य सुखाकडे किंवा लब्धप्रतिष्ठितपणा मिळविण्याकडे असल्यामुळें हें ज्याच्या योगानें साधेल व आपल्याला सोयीचे पडतील अशा प्रकारचे उद्योगधंदे, व व्यवहार लोक करूं लागले आहेत. मग कोणी साधू होतो; कोणी नोकरी करितो. कोणी हरिदास, पुराणीक होतो. पैसा, सुख व प्रतिष्ठा हेंच केवळ त्यांचें मुख्य ध्येय असल्यामुळें त्यांच्या पंथाला किंवा धंद्याला अयोग्य अशा गोष्टी त्यांच्या हातून प्रसंगीं होतात. पूर्वी हें ध्येयच नव्हतें. पैसा काय रांड मिळवितें, मरण आलें तरी बेहेत्तर; पण कुलव्रत किंवा आपल्या जातीला, आश्रमाला अयोग्य असें वर्तन आमच्या हातून होणार नाहीं. प्रतिष्ठेची आह्माला किंमत नाहीं. असें जुनें ध्येय असल्यामुळें त्यावेळचे वर्णाश्रम धर्म व्यवहार व आचार हे अत्यंत तेजस्वी व सामर्थ्यवान होते. त्यावेळीं आश्रमधर्म पालन हेंच मुख्य ध्येय असल्यामुळें जीव गेला तरी ते सोडीत नसत. यामुळें त्याचें अतिक्रमणच होत नसे. परकियांनीं ह्या सात्विक बुद्धीचा फायदा घेऊन आमचा नाश केला आहे व चालविला आहे ही गोष्ट निराळी, पण त्यामुळें सर्वच आचारधर्म खरे खोटे व ढोंगी होत चालले आहेत व त्यामुळें त्यांचें असें हंसें किंवा थट्टा होत आहे. हल्लींच्या भिन्न स्थितींतसुद्धां साधूंना योग्य राजकारणाचा उपदेश करितां येणार नाहीं असें नाहीं. हल्लींचे नवे हरिदास, पुराणिक व प्रवचनकार यांचीं भाषणें ऐकावीं! सारांश, राजकारणाचें वजन प्रत्येकास आपल्या शक्तीप्रमाणें खचीत उचलतां येण्यासारखें आहे.

ह्या संस्थानचे अधिकारी माघीच्या उत्सवाकरितां आले होते. ते शिमगा होईपर्यंत तेथें राहिले होते. वारकरी संप्रदायांत रामदासांप्रमाणेंच त्यांच्या वंशजांतील मुख्य पुरुषास म्हणजे गादीचे वारसास तितका मान आहे. आपणही ह्या पुण्य पुरुषाचें दर्शन घ्यावें म्हणून मी त्यांचेकडे गेलों. नमस्कार कुशल प्रश्न झाल्यावर त्यांनीं मला प्रसादाचा नारळ देऊन निरोप दिला. रामदासांचें दर्शन व्हावें, निदान त्यांचे खरे वंशजांचें तरी दर्शन व्हावें, म्हणून मी गेलों होतों. त्याप्रमाणें प्रत्यक्ष समर्थांनींच मला दर्शन देऊन पुनीत केलें. या

संस्थानचे कचेरींत रामदास स्वामींनीं स्वतः वापरलेल्या कांहीं वस्तु–पलंग, कुबडी, काठी, दांडा, तांब्या, पंचपात्री वगैरे अद्यापी–जशाच्या तशाच जतन करून ठेविल्या आहेत. भाविकांनीं त्याचें सद्भावानें अवश्य दर्शन घ्यावें. शिवाय श्रीसमर्थ रामदास, शिवाजी, संतमेळा यांच्या भेटीचें चित्र प्रत्यक्ष पाहावयास मिळालें. हें चित्र स्वामी तंजावर येथें रामेश्वराचे यात्रेस गेले असतांना व्यंकोजीच्या दरबारच्या मनुष्यानें घेतलेल्या चित्रावरून घेतलें आहे असें समजलें.

समर्थांचे वेळीं येथें सज्जनगडचे उत्सवाचे वेळीं सर्व स्वामीपंचायतन जमून कीर्तनाचा जलसा चालला होता. त्यांत शिवाजी महाराजांकडूनही समर्थांनीं कीर्तन करून घेतलें होतें!

ह्या उत्साहांत समर्थांनीं व शिवाजी महाराजांनीं सर्वांकडे पण ज्याच्या त्याच्या दर्जाप्रमाणें कामें नेमून दिलीं होतीं, पण त्यांत शिवाजी महाराजांनीं आपलेकडे त्या जागेचें सडासमार्जनाचें काम घेतलें होतें! म्हणजे धर्मराजाचे यज्ञांत कृष्णानें आपल्याकडे ब्राम्हणांचीं उष्टीं काढण्याचें काम घेतलें होतें, तसेंच हें. थोर व्यक्तीला अगदीं हलकें कामसुद्धां भूषणावह वाटतें. रामदासाचेवेळीं १ जयरामस्वामी (वडगांवकर) २ रंगनाथस्वामी (निगडीकर) ३ केशवस्वामी (भागानगरकर) ४ अनंगमूर्ती (ब्रम्हनाळकर) आणि स्वतः समर्थ रामदास स्वामी असें त्यांचें त्यावेळचें स्वामी पंचायतन जमलें होतें. शिवाय रामदास स्वामींचें पंचायतन–उद्धवगोसावी, अक्काबाई, वेणूबाई, सतीबाई (शहापूरकर) व कल्याणशिष्य असें हें त्यांचें पंचायतन होतें. शिवाय तुकाराम महाराज, अशी संत मंडळी ह्या उत्सवास आली होती.

चित्रामध्यें एका आसनावर समर्थ रामदास बसले आहेत. मागें विणा घेऊन तुकाराम महाराज बसले आहेत. त्यांचे मागें रामदास स्वामींचे शिष्य कल्याण व उद्धव आणि शिष्यिणी वेणूबाई, आकाबाई उभ्या आहेत. समोर शिवाजी महाराज वीरासन घालून बसले आहेत. त्यांचे मागें पंतसचिव, तान्हाजी मालुसरे, भालदार चोपदार, असे देखावे असून ते अगदीं आविर्भावपूर्ण आहेत. प्रत्येक व्यक्तीची ओळख पूर्ण पटण्यासारखे त्यांचे फोटो रंगविले आहेत. मी ही तसबीर कितीतरी वेळ पाहात बसलों होतों. नुसती पाहून मनाचें समाधान होईना म्हणून ही कोठें विकत मिळते का असें विचारलें. पण नाहीं असा जबाब मिळाला. पण ती आतां मिळूं लागली आहे

असें समजलें. हिची किंमत बरींच असल्यामुळें तूर्त ती मिळणें कठीण ह्मणून पुन्हां मी ती नीट न्याहाळून पाहूं लागलों. रामदासांचा चेहेरा फार तेजस्वी, गंभीर, निर्भय, कर्तृत्ववान व करारी दिसला. तुकारामाचा चेहेरा, हें सर्व जग तुच्छ असून सर्व लोक व्यर्थ मोहांत गुंतले आहेत, असा बेफिकीरीचा आहे आणि

नम्र झाला भूतां । तेणें कोंडीलें अनंता ।

हें तत्व त्यांच्या चेहेऱ्यावर पूर्णपणें बिंबलें आहे असें दिसलें. शिवाजीचा चेहेरा हात वरतीं करून एकेक राजकारणांचा खुलासा स्वामींजवळ त्यांचा चालला होता व स्वामीं त्यांचें निराकरण करीत होते. पंतसचिवानीं हातांत स्वामींकरितां भेट आणिली होती. तानाजींची व त्यांची नजर शिवाजी महाराज व रामदासस्वामी यांचेकडे अगदीं व्यग्र होती. रामदास स्वामींचे शिष्य व शिष्यिणी ह्या केवळ त्या गप्पा ऐकत होत्या, असें त्यांच्या चेहेऱ्यावरून स्पष्ट खुलासा होत होता. रामदास स्वामी व तुकाराम महाराज यांचे चेहेरे उपलब्ध नाहींत; मग इतरांचे कसे असणार ? पण चित्रकारानें ऐतिहासिक दृष्टीनें आपल्या कौशल्याची कमाल केली आहे असें स्पष्ट दिसत होतें. हा प्रसंग तंजावरचा नाहीं. परंतु तंजावरच्या प्रतींतील चेहेरे लक्षांत घेऊन चित्रकारानें हा प्रसंग साधला असावा. हें कांचेंत बसविलेलें फार मोठें चित्र पाहून प्रत्यक्ष रामदास स्वामींचेंच हें खरें असें वाटून माझ्या मनाचें समाधान झालें व यात्रेचें सार्थक झालें असें वाटलें. कितीतरी वेळ हें चित्र पहात मी बसलों होतों. अखेर चार वाजल्यावर संध्याकाळ झाली तेव्हां निघालों.

सज्जनगडास पूर्वी परळीचा किला ह्मणत. रामदास स्वामी येथें रहाण्यास आल्यामुळें त्यास सज्जनगड ह्मणूं लागले. पूर्वी मुसलमानांच्या कारकीर्दीत येथें मोठमोठ्या मशिदी होत्या. स्वामी आल्यावर तेथें देवळें झालीं. अजून सुद्धां कांहीं मशिदींचे अवशेष येथें दृष्टीस पडतात. याशिवाय या किल्ल्यावर आंगलाई नांवाचें देवीचें देऊळ आहे. ती देवी समर्थांना अंगलापूरच्या नदीच्या डोहांत सांपडली. नंतर ती त्यांनीं ह्या किल्ल्यावर आणून तिची स्वहस्तें स्थापना केली अशी प्रसिद्धी आहे. ह्या देवीची मूर्ति कृष्ण पाषाणाची असून ध्यान फार सुबक आहे. यात्रेकरूंनीं तिचें अवश्य दर्शन घ्यावें. असो. मी चार वाजतां निघून संध्याकाळीं साताऱ्यास आलों. नंतर दुसरे दिवशीं पहांटेस

श्रीब्रह्मेंद्रस्वामी ( धावडशी. )



( पृष्ठ १९५ )

# धावडशी

येथें जाण्यास निघालों. धावडशी हें ब्रह्मेंद्र स्वामींचें समाधी स्थान आहे. हे स्वामी विरमडें येथें समाधिस्त झाले. पण आपली समाधी धावडशी येथें असावी अशी त्यांनीं पूर्वींच इच्छा दर्शविल्यावरून धावडशी येथें त्यांस आणून त्यांचें आराध्य दैवत जें भार्गवराम याची त्यांनीं पूर्वी स्थापना केला होती, त्याचेपुढें त्याची समाधी बांधली आहे. ही मूळ भार्गवरामाची स्थापना व त्या देवळाचे पूर्वेकडील पुष्करणी ही स्वामींनींच बांधली असें म्हणतात. हल्लीं असलेलें देऊळ स्वामींच्या पश्चात श्रीछत्रपती दुसरे शाहूमहाराज ह्यांनीं चार लाख रुपये खर्च करून बांधलें असें म्हणतात. हें पुण्याच्या तुळशीबागेप्रमाणें आहे. त्यावेळचे चार लाख म्हणजे हल्लींचे सोळा लाखच समजले पाहिजेत. यांना इतका पेशव्यांचा राजाश्रय होता. तरी स्वामींनीं भिक्षा मागून महाराष्ट्रांत बऱ्याच ठिकाणीं धार्मिक कृत्यें केलीं आहत. त्यापैकीं कोंकणांतील चिपळुणाजवळील श्रीपरशुरामाच्या देवळाचा त्यांनींच जीर्णोद्धार केला. आणि त भिक्षेवर केला हें विशेष. स्वामींची शिष्यशाखा फार मोठी असून शाहूमहाराज व पहिले बाजीराव पेशवे यांसारखी समर्थ मंडळी त्यांचे शिष्य होती. तरीपण त्यांचेवर भार घालावयाचा नाहीं, भिक्षावृत्तीवरील कामाचा अभिमान जितका असतो तितका एखाद्या मनुष्यानें फारकाय राजानें केलेल्या कामाचा नसतो ही जुनी साधूंची वृत्ती होती.

रामदासस्वामींनंतर राजकारणांत पडणारे हे स्वामी होत. आतां रामदासस्वामींत आणि यांच्यांत फार फरक आहे. रामदासाच्या वेळची परिस्थिति फारच भयंकर होती अशा परिस्थितीला न जुमानतां महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं मठ स्थापना करून धर्मजागृती व राष्ट्रजागृती करणारा मनुष्य असामान्य खरा. तशी स्थिति या स्वामींच्या वेळीं नव्हती. स्वराज्याची स्थापना होऊन विधर्मी शत्रूंच भय कमी झालें होतें. आतां आपसांत एकी ठेवून व शास्त्रोक्त चातुर्वर्ण्य कायम ठेवून आचार धर्माप्रमाणें धर्मस्थापना करावयाची होती. पण त्यापूर्वी आपसांतील कलह प्रथम मिटवावयाचे होते. आणि हे कलह राजकारणांत एकी ठेऊन मिटवावयाचे होते. हें विशेष महत्वाचें कृत्य ह्या स्वामींना केलें. त्यावेळची सातारकर व कोल्हापुरकर यांची दुही; निजाम व पेशवे यांची दुही. तसेंच

दाभाडे, पेशवे, टिपू व मराठे, या सर्व कटकटी स्वामींनीं आपल्या उपदेशानें व आपल्या आशीर्वादानें बाजीरावाकडून शक्तीनें व युक्तीनें मिटविल्या, सर्व महाराष्ट्र समर्थ केला व दिल्लीपतींना हाक मारण्यास व फिरंग्यास तंबी देऊन त्यांची पिछेहाट करण्यास तो समर्थ झाला. त्यावेळीं हिंदुपद पादशाहीची लाट एवढी जोराची होती कीं, त्यावेळचे कसलेले योध्ये रजपूत, जाट, पठाण, मोंगल, रोहिले, शीख व दुसरे मुसलमान ह्या कडव्या जाती महाराष्ट्रियांपुढें दातीं तृण धरून शरण आल्या होत्या! त्यावेळीं मराठ्यांचा वचक आपल्या शत्रूवर फार मोठा होता. ह्मणजे मराठ्यांशीं वांकडें झाल्यास आपल्यावर अचानक धाड केव्हां कशी येईल व ते काय करतील याचा कोणास नेमच नसे! नेपोलियन बोनापार्टनें जें केलें तेंच पहिल्या बाजीरावानें केलें. नेपोलियनाचा अखेर पराभव झाला व त्याचे अखेरचे दिवस वाईट गेले, तसे बाजीरावाचे गेले नाहींत. अपयशाचा स्पर्श त्यांच्या मनाला कधीं शिवलाच नाहीं. भय व अशक्य हें त्याला माहितच नव्हतें. एका आधुनिक कवीनें त्याचें अगदीं शेलक्या शब्दानें खालीं लिहिल्याप्रमाणें वर्णन केलें आहे.

अपयश ज्याला कधीं न ठावें नित्य रणीं जो पुढें ॥
रणकथा ऐकुनी ज्या बळ चढे ॥

हें किती यथार्थ आहे पहा. त्यावेळीं बुंदेलखंडाच्या छत्रसाल राजावर दिल्लीच्या बादशहाचा सरदार महंमदखान बंगश हा चाल करून येत होता. त्यापासून निवारण करण्याकरितां छत्रसालानें बाजीरावाची मदत मागितली व असाल तसे निघून या अशी करुणेची भाक घेऊन सांडणीस्वार आला. त्यावेळीं बाजीराव वाड्यांत स्नानास बसले होते. पण ही चिठ्ठी पोहोचल्यावर कसलें स्नान व कसलें भोजन आणि कसला जीव! सैन्यास कूच करण्याची नौबद एकदम वाजवून आपण घोड्यावर बसून स्नानास नर्मदेस गेले, व बंगशाचा पराभव केला, व छत्रसालाला मुक्त केलें! या कृतज्ञतेबद्दल ह्मणजे हाकेला हांक दिली ह्याबद्दल छत्रसालानें मोहिमेचा खर्च वगैरे दिलाच, पण बाजीरावास आपल्या दोन मुलांप्रमाणें तिसरा मुलगा असें मानून मरतेवेळीं आपल्या राज्याचा तिसरा हिस्सा झांशीजवळ बाजीरावास दिला. तोही बाजीरावानें आपल्या मालकीस न ठेवता त्यावेळीं त्या स्वारींत प्रसिद्धीस आलेले गोविंदपंत यांस बुंदेले असें नांव ठेवून त्यास दिला. अशा पुरुषाचें असामान्य धैर्य, सामर्थ्य व आत्मविश्वासतर खराच;

पण त्यास निर्भयत्व करण्यांत व जय मिळण्यास व त्यांची बुद्धि स्वधर्माकडे रत होण्यास अशा पुरुषांचे प्रयत्न व आशीर्वादच कारणभूत होतात हें विसरतां कामा नये.

या स्वामींना राजकारणांत एकी करण्याकारितां किती व कसे प्रयत्न पडले, याचें दुसरें उदाहरणः— बाजीरावसाहेबांस कांहीं कारणामुळें एक यवनी ठेवावी लागली होती. ती कशी आली व तिला ठेवणें कां भाग पडलें, या गोष्टी इतिहास व आख्यायिका यांत प्रसिद्ध आहेत. त्यावेळीं स्वराज्य असल्यामुळें स्वधर्म भ्रष्टाकाराबद्दल कडक शासन होत होतें. पण बाजीरावानेंच मुसलमानीण राजरोसपणानें आणि तीही आपल्या राजवाड्यांत राजरोस ठेविली ह्याबद्दल ब्राह्मणांनीं प्रथम शाहूमहाराजाकडे तक्रार केली. शाहूमहाराजांनीं स्वामीमहाराजांकडे तक्रार करणेस सांगितलें. तेव्हां ब्राह्मणांनीं ह्या भ्रष्टाकाराबद्दल स्वामीस विचारिलें, तेव्हां स्वामींनीं सांगितलें, आपल्याला प्रथम ब्राह्मणत्वाचें ह्मणजे ब्राह्मणाच्या जानव्याचें रक्षण केलें पाहिजेना ? तें कोणता ब्राह्मण करतो ? तें सांगा. तें जर आज कोणी करणार नाहीं तर एकानें सर्वांच्या हिताकरितां, राष्ट्राकरितां तसें कांहीं केलें तरी हरकत नाहीं. ह्मणजे हें करणें चांगलें आहे असें नाहीं, हा दोष आहे. पण दोष उर्फ डाग कोणाजवळ नसतो ? असा सर्वगुणसंपन्न परमेश्वराशिवाय कोण असणार ? प्रत्यक्ष परमेश्वराचे अवतार असतात त्यांचेमध्येंसुद्धां दोष आढळतात. एका कवीनें तर देवाच्या दाही अवतारांचे दोष दाखविले आहेत. राम अवतार इतका निर्मळ व पापभिरू तरी त्यालासुद्धां त्या कवीनें दोष दिला आहे. रामाची बायको अत्यंत शुद्ध असतां व त्याबद्दल तिनें खात्री करून दिली असतां व ती त्याला पटली असतां तिच्या गरभारपणीं केवळ मूर्ख मनुष्याच्या बोलण्यावरून त्यानें तिला गरभारपणींसुद्धां जंगलांत सोडून दिलें ! हा रामाचा शाहाणपणा झाला काय ? प्रत्यक्ष तेजाची मूर्तीच असा सूर्यनारायण आहे, पण त्याजवरसुद्धां डाग आहेत. तात्पर्य, प्रत्येक ठिकाणीं दोष आहेतच. त्याचा शहाण्यानें विचार न करितां गुण तेवढे घेऊन आपली कार्यसिद्धि करावी. मनुष्यानें कार्यसिद्धीकडे विशेष लक्ष द्यावें. दिवा घासलेट खातो हें पाहावयाचें नाहीं. प्रकाश कसा काय आहे हें पाहावयाचें. त्याप्रमाणें आज आह्माला रणगाजी ब्राह्मण पाहिजे आहेत. केवळ स्नानसंध्या करणारे नको आहेत. आतां ज्यांना हें करण्याची धमक नसेल त्यांनीं राजकारणी लोकांच्या नादीं न लागतां नुसता

तसा देखावा दाखवून आपलें स्वकर्म सोडणें हें मात्र निंद्य आहे. आपल्या घराला शुद्धत्व आल्याशिवाय नुसत्या स्नानसंध्येनें शुद्धता कशी येणार ? परकी सत्तेनें तुमचीं घरें बाटलीं आहेत, तीं प्रथम शुद्ध करा व मग त्यांत यथासांग संध्या करीत बसा. ह्मणजे परदास्य निवारेपर्यंत ब्राह्मणानें स्वधर्मकार्य कदाचित थोडेंबहुत ढिलें ठेवलें तरी हरकत नाहीं. लोकमान्य टिळकांनींसुद्धां ब्राह्मण ह्मणविणाऱ्यास सवाल या महामहोपाध्याय राजारामशास्त्री भागवत यांचे सवालास असाच सणसणीत जबाब दिला आहे कीं, ब्राह्मणजात ही नुसत्या स्नानसंध्या करण्याकरितां निर्माण झाली नाहीं. ब्राह्मण हे वर्णांचे गुरू आहेत. त्यांनीं देशकाल वर्तमान जाणून ज्या वर्णाचें काम चालू परिस्थितींत कमी पडेल व त्या योगानें चातुर्वर्ण्य बिघडेल त्याला उपदेश करून किंवा प्रत्यक्ष मदत करून चातुर्वर्ण्याची समता कायम ठेविली पाहिजे. मग त्याकरितां स्वधर्म व स्वकर्म कांहींवेळ अलग ठेवणें भाग पडलें तरी चालेल. राज्यांत शांतता आल्यावर स्नानसंध्या, जपजाप्य, अध्ययन, अध्यापन आणि यजन याजन हीं ब्राह्मणांचींच कर्तव्यें आहेत. तीं त्याशिवाय कोणास चांगलीं करितां येणार नाहींत. हल्लीं इंग्रजी राज्यांतसुद्धां हाच नियम आहे. सरकारी नोकरांनीं राज्यकारभारांत पडूं नये, असा नियम आहे. पण आमच्या राजाचें स्तोम माजविण्यांत त्यांनीं कमकसर करितां कामा नये. नोकरांनीं राजकारणांत पडूं नये हें खरें असेल तरमग राजस्तुति तरी कां करीत बसावें ? पण ही राजनीति आहे हेंच त्याचें उत्तर आहे. तोच प्रसंग हल्लींही आहे. मिशनरींच्या किंवा परक्यांच्या नादीं लागून इतर वर्ण ब्राह्मणांना राजकारण सोडून स्नानसंध्येचा उपदेश करूं लागले आहेत. पण लोकमान्य टिळकांनीं हल्लींच्या काळीं राजकारणांतील डावपेंच चातुर्वर्ण्यांना सांगून त्याच्याशीं कायदेशीर झगडण्यास त्यांस समर्थ करणें हेंच ब्राह्मणांचें मुख्य कर्तव्य आहे. आणि तें आह्मी करून करीत आहों ह्मणून हल्लींच्या काळचे खरे ब्राह्मण आह्मींच आहों. नुसती स्नानसंध्या करणारे हे आजकालचे खरे ब्राह्मणच नव्हत. घरास आग लागली असतां त्यांना स्नानसंध्या कशी सुचते ? ब्राह्मणांचें हें कृत्य अगदीं परशुराम अवतारापासून आजपर्यंत असेंच चालू आहे. अशी स्वामींनीं तुर्भ ः र ब्राह्मणांची समजूत घातल्यामुळें त्यांनीं तो नाद सोडून तेही राजकारणांत शिरूं लागले.

अशा पुराण पुरुषांचें निदान त्यांचे समाधीचें तरी दर्शन घ्यावें व अशा

सत्पुरुषांना सर्व गोष्टी अनुकूल असतां म्हणजे कर्तृत्वसंपन्न राजे, महाराजे, त्यांचे बंदे शिष्य असतां त्यांनीं आपला मठ त्यावेळीं सुद्धां राजधानींत न स्थापतां राजधानीपासून अगदीं अलग अशा स्थानीं कां स्थापावा? तेथें त्यांना विशेष काय वाटलें, हें पाहावें म्हणून मी धावडशीस जावयास निघालों.

धावडशी सातारचे उत्तरेस आहे. प्रथम साताऱ्याहून वाईस जाणाऱ्या सडकेनें एक मैल जावें. तेथें दोन सडका फुटतात. एक वाईस जाते व दुसरी महाबळेश्वराकडे जाते. त्यांत प्रथम महाबळेश्वराचे सडकेनें जावें. त्या सडकेनें दोन मैल गेल्यावर पुन्हां ती सडक डावीकडे सोडून धावडशीचे लोकलफंडी सडकेनें तीन मैल गेल्यावर धावडशी गांव लागतो व श्रीपरशुरामाचें देवालय दिसूं लागतें. देवळांत गेल्यावर गाभाऱ्यांत प्रथम समाधीचें दर्शन होतें, नंतर मागें परशुरामाचें दर्शन होतें. अशा पुण्यपुरुषांच्या समाधी जेथें जेथें आहेत, तेथें तेथें त्यांच्या सान्निध्य त्यांच्या आराध्य देवतेची स्थापना केली असते. तुकाराम, ज्ञानेश्वर, यांचें आराध्य दैवत श्रीविठ्ठल होतें. त्यांच्या समाधीजवळ श्रीविठ्ठल रखुमाईची स्थापना केली आहे. रामदासांचें आराध्य दैवत श्रीरामसमर्थ, सबब त्यांचे समाधीजवळ श्रीरामाची स्थापना केली आहे. तसेंच ब्रम्हेंद्रस्वामींचें आराध्य दैवत श्रीपरशुराम, सबब त्यांचे जवळही समाधी त्यांच्या इच्छेप्रमाणें केली आहे. रामदासस्वामींचें जसें टाकळी संस्थान आहे तसेंच ह्या स्वामींचेंही हें संस्थान असून त्याचें आजचें उत्पन्न दहा हजारांचें आहे. त्याची व्यवस्था स्वामींचे पट्ट शिष्य कोणी भागवत म्हणून होते, त्यांच्या वंशजाकडे चालत आहे. या संस्थानांतून देवास रोज पंचामृती अभिषेक, पूजा, अर्चा चालू असतात. परशुराम जयंतीचा मोठा उत्सव होतो. त्यावेळीं चारी प्रहर चौघडा वगैरे चालतो. ह्या संस्थानांतसुद्धां आल्यागेल्यास भोजन मिळतें. सभामंडपाची नुकतीच दुरुस्ती केली आहे एकंदर देऊळ व येथील पुष्कळशा गोष्टी पाहण्यासारख्या आहेत. ह्या संस्थानांतही श्रीब्रम्हेंद्रस्वामींची रंगीत तसबीर पाहावयास मिळाली. स्वामी पूर्ववयाचे असून त्यांचें तेज असामान्य दिसलें. आणि तसें असल्याशिवाय शाहू महाराज व बाजीरावसारख्या तेजस्वी पुरुषावर छाप पडणें व त्यांची पूर्ण श्रद्धा बसणें अशक्य आहे. ही तसबीर सज्जनगडाप्रमाणें अतिरम्य, भव्य व पाहाणाऱ्या मनुष्याचें मन आकर्षण करणारी आहे. नुसत्या तसबिरींत जर एवढें सामर्थ्य तर प्रत्यक्ष आवेशकारी

पुरुषाचें दर्शन झाल्यावर मनावर काय परिणाम होतील हें कोणी काय सांगावें? ही तसबीरही कोठें मिळत नाहीं असें ह्मणतात.

धावडशी गांव अगदीं लहान आहे. ह्मणजे निव्वळ खेडें आहे. गांवाच्या बाहेर शेजारीं एक टेकडी आहे. कदाचित् हा गांव पूर्वी फार मोठा असावा असें ह्मणावें तर तसें दिसत नाहीं. गांवाला किंवा त्या स्थानाला कसलीही शोभा नाहीं. तशीच स्थिती सज्जनगडची आहे. तेथें रम्यता कांहीं नाहीं. असें असतां हींच गावें त्या सत्पुरुषांनीं आपल्या राहण्यास पसंत कां केलीं? याचें उत्तर त्यांच्या दृष्टीनें शोधिलें पाहिजे. त्यांच्या दृष्टीनें इहलोकचें वैभव त्याज्य आहे. परंतु सर्व जगाच्या आधाराकरितां त्याची फार आवश्यकता आहे. सबब सर्व जगाच्या हिताकरितां त्यांत विशेषतः गृहस्थ लोकांच्या हिताकरितां व धर्म रक्षणाकरितां मनापासून प्रयत्न करणें आणि गृहलक्ष्मीला दुसऱ्यांच्या त्रासांतून सोडवून तिचा उपयोग आपल्या लोकांस यथेच्छ घेऊन देऊन आपला देश स्वर्गतुल्य नंदनवन करणें, परंतु स्वतः आपण मात्र मोक्ष साधनाकरितां त्यापासून अगदीं अलिप्त राहणें व आपलें मन त्यांच्या द्रव्यानें दूषित न करतां तें तेजस्वी ठेवणें हीच त्यांची दृष्टी होती. संपत्तीवर ऊर्फ लक्ष्मीवर सर्वांचा डोळा असतो. आज जरी आपण तिला बंदोबस्तांत ठेवली तरी कधींतरी परचक्र येऊन तिचा नाश व्हावयाचाच. सबब राजांना व त्यांच्या राजधान्यांना फार भीति असते. अशा राजधान्यांचा नाश झाला तरी त्यावरोबर आपल्या धार्मिक संस्थांचाही नाश होऊं नये, ह्मणून कोणाच्याही मनांत कशाही बाबतींत कांहीं मोह येऊं नये ह्मणजे त्या जागेचा अभिलाष करण्याचें मनांत येणार नाहीं अशी रुक्ष जागा ब्रह्म चिंतनाला व राजकारणापासून कांहीं काळ तरी दूर राहण्यास योग्य असें समजून त्यांनीं ह्या जागा पसंत केल्या असाव्या; व त्यावर कांहीं वैभव ठेविलें नसावें. हल्लीं जें तेथें थोडें बहुत वैभव दिसतें तें त्यांच्या पश्चात त्यांच्या शिष्यांनीं त्यांच्या स्मारकाप्रीत्यर्थ ठेविलें आहे. त्यांनीं मागितलें असतें तर त्यावेळीं त्यांना वाटेल तें मिळालें असतें. पण तें देत असतां मनःपूर्वक ह्यांनीं तें नाकारलें इतकी कडकडीत विरक्तता त्यांची स्वतःची होती. अलिकडच्या साधूंत ती क्वचित दृष्टीस पडते. हल्लींचे साधु दुःखाला सुख मानीत नाहींत. शिवाजीनें आपलें सर्व राज्य रामदासांच्या चरणीं ते मागत नसतां अर्पण केलें हें इतिहास प्रसिद्ध आहे. अलीकडचे साधु

हे आपल्या प्रख्यातीकरितां प्रयत्न करतात. पण पूर्वीचे साधु आपली प्रख्याति होईल ती न व्हावी म्हणून जपत असत. दुसरें कारण त्यावेळीं साधूंची श्रीमंतीची किंवा विद्वत्तेची कसलीही सिद्धि झाली असतां मोंगलांचा त्यावर केव्हां हल्ला येईल व त्याचा कसा नाश होईल याचा नेम नसे. पण असा हल्ला होऊन आपल्या धर्मसंस्थापनेचा नाश होऊं नये, ह्या संस्था राहिल्यास असे धोरणी व राजकारणी पुरुष सहज उत्पन्न होऊं शकतील, पण ह्याच संस्था नाहींशा झाल्या तर झाडाचें मूळच निघून गेल्यावर तें जगणार कसें? सबब त्यांनीं ऐहिक वैभवाचा पूर्ण त्याग करून आपल्या ब्रह्मचिंतनांत त्याचा अडथळा येऊं न देण्याकरितां ह्या रुक्ष जागा शोधिल्या असाव्या असें वाटतें. रामदास स्वामींच्या वेळीं खालीं राहणें मोंगलांच्या हल्ल्यामुळें जरा धोक्याचें होतें. सबब समर्थांनीं आपलें वास्तव्य गडावर ठेविलें. पण शाहू महाराजांच्या कारकीर्दींत तो काळ जाऊन जरा स्वास्थ्य आलें. राजधानी गडावरची मैदानांत आली सबब ब्रह्मेंद्र. स्वामींनींही मैदानावरची जागाच पसंत करून ठेविली असें दिसतें. अशा रीतीनें जातां येतां स्वामींचे गुण गौरव गात होतों. अनायासें त्यांचें फोटोच्या रूपानें दर्शनही होऊन माझी यात्रा सुफळ झाली. नंतर मी तेथून तीन वाजतां निघून संध्याकाळीं सातान्यास आलों. व दुसरे दिवशीं मोटारीनें

## वाई

मुक्कामीं आलों. वाई हें अति प्राचीन काळापासून नाशकाप्रमाणेंच प्रख्यात शहर आहे. याला पूर्वी वैराजक क्षेत्र म्हणत असत. महाभारतांतील प्रख्यात विराट राजाची ही राजधानी होती. येथेंच पांडव अज्ञान् वासाकरितां आले होते. कृष्णेच्या पवित्र कांठामुळें ह्या क्षेत्राची विशेष प्रसिद्धी आहे. त्याप्रमाणें वाईचा अलिकडच्या काळाचा इतिहासही प्रसिद्ध आहे. पण तो देण्याचें हें स्थान नसल्यामुळें देत नाहीं.

हें शहर अति प्राचीन असल्यामुळें या शहरची रचना वर्णव्यवस्थेप्रमाणेंच आहे. काशीप्रमाणें येथें कृष्णेला प्रशस्त घाट आहेत. मूळ कृष्णेच्या प्रवाहाचे

काठीं ब्राह्मणाची वस्ती आहे. पुढें बाजार व त्यापुढें इतर वस्ती अशी हिची रचना आहे. मुसलमानी कारकीर्दीत येथें त्यांनीं बाटविल्यामुळें मुसलमान वस्तीही आहे. नदीच्या काठीं देवळांची संख्याही बरीच आहे, आणि मुसलमानानंतर पेशवाई झाल्यामुळें त्या देवळांचा जीर्णोद्धार चांगल्या रीतीनें झाला आहे. ह्मणजे सर्व देवळें पुन्हां दगडी झाल्यामुळें तीं लेण्याप्रमाणें काळाच्या जवळ्यांतून अद्याप अभंग राहिलीं आहेत, व त्यांची व्यवस्थाही उत्तम राहिली आहे. त्यांतील महालक्ष्मीच्या देवळाची मांडणी मात्र कोल्हापूरसारखी हेमाडपंती आहे. येथेंही दिशा साधन केलें आहे. ह्मणजे सूर्य विषुववृत्तावर ज्या दिवशीं येईल त्या दिवशींचे अस्ताचे किरण श्रीमहालक्ष्मीचे मुखावर पडून तो सर्व देखावा एक दोन मिनिटेंपर्यंत अगदीं सुवर्णमय दिसून अवर्णनीय शोभा दिसते व कारागिरीच्या कौशल्याची तारीफ वाटते, हें मी प्रत्यक्ष पाहिलें आहे. याशिवाय पुष्कळ देवळें प्रेक्षणीय आहेत. बाकी, त्या देवळांचे उत्साह मृतवत आहेत. ह्मणजे देवाला दिलेलें उत्पन्न ज्यांचेजवळ आहे त्यांचे पोट भरून शिल्लक राहिलें तर त्यांत देवाचा निर्वाह करावयाचा ! अर्थात तो कितीसा होणार ? हें समजतच आहे. पण ह्याशिवाय येथें एक जिवंत ह्मणजे अद्याप सुस्थितींत व चढाओढींत असलेला एक उत्साह होत असतो. तो श्रीगंगेचा ह्मणजे कृष्णाबाईचा होय ! कृष्णेच्या योगानें तिच्या काठास सुसंपन्नता आल्यामुळें लोकांनीं उतराई होऊन तिचा स्तव व उपकारपूर्वक तिचे उत्साह करावे. हें त्यांचें कर्तव्यकर्म असून त्यांस भूषणही आहे. उत्सवाला उत्पन्न नसून ते उत्साह केवळ वर्गणीवर चालतात, आणि ते एकमेकांचे चढाओढीनें चालतात हें विशेष आहे.

कृष्णाबाईला वाईच्या बाजूस श्रीगंगेप्रमाणें घाट बांधले आहेत व वस्ती नदीशीं केवळ समांतर नसून घाटाशीं काटकोनांत निरनिराळया आळया केल्या आहेत. यामुळें प्रत्येक आळीला नदीच्या घाटाचा उपयोग करून घेतां येतो. नदीला घाटही असेच निरनिराळ्या मंडळीनें बांधले आहेत व त्याप्रमाणें त्यांना नांवेंही दिलीं आहेत. या प्रत्येक घाटावर प्रत्येक आळीचा उत्साह मोठ्या थाटाचा व चढाओढीचा होत असतो. उत्साहास आरंभ माघ शुद्ध पौर्णिमेपासून होऊन फाल्गुन शुद्ध पौर्णिमेपर्यंत ते उत्साह होत असतात. प्रत्येक उत्साह पांच दिवस होतो. उत्साहांत कथा, कीर्तन, पुराण, भजन, आरती व शेवटीं ब्राह्मण

भोजन असा क्रम ठरलेला असतो. असे उत्साह अनुक्रमें होतात. ह्मणजे माघ-वद्य प्रतिपदेपासून पंचमीपर्यंत पहिल्या आळीनें करावा. त्याच्या पुढल्या आळीनें पुढल्या पांच दिवशीं करावा असा अनुक्रम ठरलेला असतो.

उत्साहाची वेळ आली ह्मणजे त्या त्या आळींतील लोक आपसांत पंच नेमतात. व त्या पंचांमार्फत वर्गणी जमा करणें व तिचा खर्च करणें हें त्यांच्यावर असतें. वर्गणी त्या आळीशिवाय इतर आळींची व इतर जातींचीही सहसा घेत नाहींत. त्या आळींतील ब्राह्मण व इतर लोकच त्यांस मदत करतात. एका आळीचा उत्साह चालला असतां दुसऱ्या आळींतील लोक त्यांच्या मदतीस जात नाहींत. व उत्साहवाले त्यांस बोलावीतही नाहींत. दुसऱ्या आळींतील लोकांनीं परगांवच्या मनुष्याप्रमाणें उत्साहाचे शोभेस फारतर यावें.

उत्साहाचे वेळीं प्रत्येक घाटावर मोठा मांडव घालतात. मग तो कापडून त्यांत हंड्या, झुंबरें, व नानाप्रकारचे दिवे लावून व तसबिरी लावून तो शृंगारतात. मधोमध योग्य स्थानीं श्रीकृष्णाबाईची मूर्ती मांडतात. कृष्णाबाईच्या मूर्ती, मांडवाचें सामान, व उत्साहाच्या इतर वस्तुसुद्धां प्रत्येक आळीचें सामान निरनिराळें असतें. कोणी कोणाला सामान देऊं नये. फुटतुटीचा कोणी जबाबदार नाहीं. ज्याचें जितकें सामान असेल तितक्यांतच त्यानें उत्साह करावा. उत्साह करून जास्त शिल्लक राहिल्यास त्याचें सामान बैठका वगैरे जें पाहिजे असेल तें विकत घ्यावें. सर्व सामान नेमलेल्या पंचांचें ताब्यांत असतें. पंच बदलल्यास सामान बिनहरकत दुसऱ्या पंचांच्या ताब्यांत जातें. सर्व पंच एकाच दिलाचे व उत्साहाचे असतात. अर्थात उत्साहही फार मोठ्या थाटाचे, कौतुकाचे व अगत्याचे होतात. पण पैशांची अनुकूलता असेल त्याप्रमाणें ब्राह्मण भोजन होतें. ह्मणजे साधें, किंवा पक्वानांचें होतें. तसेंच भोजनाचें आमंत्रण आळीपुरतें असतें किंवा यथासंभव असतें. या उत्साहापैकीं शेवटचा उत्साह गंगापुरी आळींतील होतो. त्या आळींतील लोक जास्त सुखी असल्यामुळें हा उत्साह मोठ्या थाटाचा होतो. त्यावेळीं सर्व आळयांस बोलावतात. मी हाच तेवढा उत्साह पाहिला आहे.

कृष्णाबाईची उत्सव मूर्ति सुमारें तीन साडेतीन फूट उंच असून फारच सुबक आहे. ह्या आळीनें ह्या उत्सवाकरितां घाटावर एक कायम सिंहासन

बांधलें आहे त्यावर हिची स्थापना करतात. तिला अलंकारांनीं सजवतात-दागिने सर्व खरे सोन्याचे आहेत. मोत्यांचें व हिऱ्यांचें कमी आहेत. ह्या दागिन्यांमुळें व मूळ मूर्तीच सुंदर असल्यामुळें तिला अतिशयच सौंदर्य प्राप्त झालें आहे. एकसारखें तिच्याकडे पाहावेंसें वाटतें. मूर्ती मूळची गारवर्ण व चतुर्भुज अत्यंत सुरेख आहे. आणि त्यांत उत्सवाचे वेळीं ज्या त्या मूर्तीला असेंच विशेष तेज येतें असें दिसतें. मूर्तीप्रमाणें मांडवही, हंड्या, झुंबरें, गोळे, दिवे, तसबिरी यांनीं उत्तम व व्यवस्थित पालें लावून शृंगारिला असतो. कथा-कीर्तनाला समाजही भरपूर येत असतो. त्याप्रमाणें ब्राह्मण भोजनही असेंच टोलेजंग सर्व आळी मिळून होतें. मी गेलो त्यावेळीं स्वयंपाक चांगला होऊन शिऱ्याचें पक्वान्न केलें होतें. सर्व बेत ठाकठिकीचा होता. पण सर्व कामाची अव्यवस्था होती. कथेच्या ठिकाणीं जमलेल्या मंडळींत किंवा ब्राह्मण भोजनांत व्यवस्थितपणा मुळीं नव्हता. याबद्दल हरिदासांनीं कितीतरी वेळां कथेत बजावलें. पण समाजाकडून त्याचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. उत्साह थाटानें व चढाओढीनें करतात याबद्दल ते स्तुतीस पात्र आहेत, पण त्यांनीं ही अव्यवस्था घालविल्यास मोठं भूषण आहे. असाच हा कृष्णाबाई गंगेचा उत्साह अगदीं सर्वप्रकारें उत्तम प्रकारचा साताऱ्याजवळ निंबगोंव्यास होतो असें हरिदासांचे ह्मणण्यांत आलें. हे गंगेच्या उत्साहाचे दिवस शास्त्रोक्त नसून कसे पडले? तर ह्याबद्दल वहिवाटीशिवाय दुसरें कारण सांगत नाहींत. वहिवाट तरी पडण्याचें कारण हेंच दिसतें कीं, ह्यावेळीं शेतीसंबंधाचीं सर्व कामकाजें आटोपून लोकसमूह उत्साहास अगदीं मोकळा झालेला असतो. कसेंही असो. देवाचें नांव घेण्यास मुहूर्त नको, दिनशुद्धि नको, कांहीं नको, मनांत आलें मात्र पाहिजे. वामन पंडितही तेच ह्मणतात.

अहो येतां जातां उठत बसतां कार्य करितां ॥
सदा देतां घेतां वदनिं वदतां ग्रास गिळितां ॥
घरीं दारीं शय्येवरि रति सुखाचे अवसरीं ॥
समस्तांची लज्जा त्यजुनि भगवत् चिंतन करी ॥ १ ॥

हे उत्साह वाईतच होतात असें नाहीं. खुद्द महाबळेश्वरापासून बेजवाड्या-पर्यंत ह्मणजे कृष्णेच्या अगदीं मुखापर्यंत प्रत्येक गांवीं पण निरनिराळ्या वेळीं

मात्र हे होतात. अगदीं गंगेप्रमाणें हिचा थाट आहे. बारा वर्षांनीं कन्यागता-मध्यें गंगा हिच्यांत येते, त्यावेळीं हिचे उत्साह विशेष थाटाचे होतात.

हा गांव प्राचीन काळापासून वैदिक ब्राह्मण वस्तीचा असल्यामुळें ब्राह्मणाच्या स्नानसंध्येची व देवदर्शनाची येथें उत्तम सोय आहे. नदीकांठीं सकाळ संध्याकाळ ब्राह्मणांची स्नानसंध्या व ब्रह्मकर्म चाललेलें पाहून ही काशीप्रमाणें धर्मपुरी आहे असा भास होतो. रेलवेपासून व पुण्यामुंबईपासून हें ठिकाण बरेंच लांब असल्यामुळें घाणेरडी सुधारणा किंवा अमंगलपणा येथें बोकाळला नाहीं. ज्यांना आजकाल स्वधर्माप्रमाणें राहण्याची इच्छा असेल त्याला वाई हें ठिकाण उत्तम आहे. वाईच्या निसर्गसिद्ध सौंदर्यामुळें पुष्कळ श्रीमंत सरदार व वतनदारांनीं आपले वाडे येथें बांधले आहेत. पण प्लेगपासून या शहराची भरभराट कमी झाली. या क्षेत्रामध्यें उपाध्यामार्फत सर्व सोयी मिळतात. पण त्यास अमुक करावयाचें आहे, असें सांगावें लागतें. इतर क्षेत्राप्रमाणें ते आपण होऊन यात्रेकरूच्या पाठीस लागत नाहींत, व अमुक करा असें सांगत नाहींत. हें येथें विशेष आहे. ते खरे गृहस्थाश्रमी व अलिकडच्या काळाचे भिक्षुक आहेत. शिवाय तितकें हें मुख्य क्षेत्रही नाहीं. येथून दुसरे कोठें माल फारसा जात नसल्यामुळें सर्व मालाचा येथें पुरवठा पडून सुबत्ता आहे. प्लेगपासून या शहराला थोडी अवकळा आली आहे. तालुका असल्यामुळें पेन्शनर लोकांना ही केवळ दक्षिण काशीच आहे.

वाईजवळ पांडवगड नांवाचा डोंगर आहे. पांडव अज्ञात वासाकरितां येथें राहिले होते. ते दिवसा ह्या विराट नगरींत राजाकडे कामाला येत. रात्रीं ह्या पर्वतावर राहण्याकरितां जात. कौरवांच्या राजधानीपासून फार लांब त्यांना ओळखतांही येणार नाहीं, व कल्पना येणार नाहीं अशी ही विराटनगरी पांडवांनीं अज्ञातवासाकरितां शोधून काढली होती. या राजाचा सेनापती कीचक हा होता. त्याचें सैरध्रीवर ( पांडवांच्या द्रौपदीवर ) विशेष लक्ष असल्यामुळें त्याचा भीमानें खून केला. ज्या गुहेंत त्याचा वध झाला ती गुहा येथें दाखवितात. त्याचें स्मारक ह्मणून हल्लीं तेथून एक ओढा वाहात येत आहे. त्या ओढ्याचें पाणी कोणत्याही ऋतूंत कमजास्त होत नाहीं हें यांत विशेष आहे. हा ओढा कीचकाचे वधामुळें त्याच्या हृदयांतून रक्त निघालें त्याचा अद्यापपर्यंत वाहात

आहे असें सांगतात! आपल्या कानांत बोटें घातलीं असतां धडधड असा आवाज होतो तो कसला? तर, रावण जळत आहे त्याचा! ही जशी ह्मण पडली आहे तसेंच हें!! पण ह्या गोष्टींत थोडा जास्त अर्थ आहे. ह्मणजे रावणाची त्यावेळीं लोकांना एवढी भीति पडली होती कीं, तो त्यांना त्यांच्या प्रत्येक व्यवहारांत दिसत होता. तसेंच ह्या ओढ्याला कीचकाच्या रक्ताच्या प्रवाहाचें नांव ठेवल्यामुळें ही गोष्ट येथेंच कोठें तरी घडली असें लोकांचे स्मरणांत कायमचें राहील.

याच पांडवांचे संरक्षणार्थ व प्रसंगीं त्यांस योग्य सल्ला सांगण्याकरितां त्यांच्या बरोबर त्यांचे गुरु धौम्य मुनी हिंडत होते पण ते त्यांच्यांत राहात नसत, त्यांची मठी निराळी असे. अज्ञातवासांत त्यांनां व पांडवांना ओळखूं नये व यांचीं ब्रह्मकर्मे यथासांग व्हावीं ह्मणून त्यांनीं आपला मुक्काम याच कृष्णेच्या कांठीं महाबळेश्वराचे डोंगराचे खालचे बाजूस ठेविला होता. यास हल्लीं

धोम

असें ह्मणतात. या गांवांत त्यांचा तेथें आश्रम होता. त्यांचें स्मारक ह्मणून तेथें मोठें शंकराचें दगडी उत्कृष्ट देवालय बांधलें आहे व जवळच त्याला लागून नरसिंहाचें कडकडीत देवस्थान आहे. नरसिंहाचे देवळाचा चौथरा सुमारें वीस फूट व्यासाचा व दीड पुरुष उंचीचा असा आहे. त्यावर देऊळ असून त्यावर दोन्ही बाजूंस दोन नरसिंहाच्या दगडी मूर्ती आहेत. एक स्मार्तांची व एक भागवतांची. स्मार्तांची मूर्ति शंख चक्रगदा पद्मधारी अशी चतुर्भुज सौम्य आहे. जवळ लक्ष्मी आहे. पण भागवतांची मूर्ति कडक स्वरुपाची ह्मणजे हिरण्यकश्यपूला आडवा मांडीवर घेऊन नखानें त्याचें विदारण चाललें आहे, व चहरा अत्यंत उग्र आहे. जवळ लक्ष्मी त्यांची प्रार्थना करीत आहे. जसा भक्त येईल त्याप्रमाणें त्या त्या देवतेची उपासना किंवा पूजा करितात. या बुरुजांत सर्व शालिग्राम भरलेले असून त्यांना विटाळ होऊं नये ह्मणून त्यांची एकदां यथासांग पूजा करून त्याचें तोंड अगदीं बंद करून ठेविलें आहे, व वर ह्या पाषाणमूर्ती भक्त जनांच्या सेवेकरितां ठेविल्या आहेत. त्यावरसुद्धां अगदीं कडकडीत सूतवस्त्रानें किंवा ओलेत्यानें जाईल त्यालाच वर जाण्याची परवानगी मिळते. नाहींतर इतरांना अगदीं बाहेरून किंवा खालून दर्शन घ्यावें लागतें! बायका

तर मुळींच जात नाहींत. दोन्ही मूर्ती ओबडधोबड अशा जुन्या पाषाणाच्या आहेत. धौम्य ऋषीचें हें आराध्य दैवत होतें. शंकराचे देवळांत किंवा कोठेंही धौम्य ऋषींची प्रतिमा नाहीं. त्याऐवजीं शंकराची स्थापना केली आहे. या शंकरास धौमेश्वर ह्मणतात. या धौमास कृष्णेच्या कांठीं गुलाब, मोगरा, वगैरे चांगल्या व सुंदर फुलांच्या बागा असून तीं फुलें ह्या धौम्य ऋषींचे (शंकराचे) पूजेस येतात. देवळासमोरचें दगडी कांसव फारच प्रेक्षणीय आहे. देवस्थानच्या बहुतेक पटांगणांत कांसवें असतात, पण ह्या कांसवांत व इतरांत फार फरक आहे. याची आकृती चांगली व प्रशस्त असून तें एका अष्टकोनी कमलाकृति मैरपी कुंडांत त्याची स्थापना केली आहे. देवळाचें व या कासवाचें दगडी काम अत्यंत उत्कृष्ट आहे. हें कुंड छातीइतकें खोल असून तें जेव्हां जलाशयानें पूर्ण भरतें, तेव्हां हें एवढें मोठें कांसव त्यांत पोहत आहे असा भास होतो. ह्या देवळाला खालूनच कृष्णानदीचा लहानसा पण खोल प्रवाह वाहात आहे. नदीला घाट बांधले आहेत. ह्या नदींत वरून एका गायमुखांतून एक झरा वाहात आला आहे. हा नेहमीं बारा महिने सारखा वाहात असतो कमजास्ती होत नाहीं. हा कोठून आला आहे हें समजत नाहीं. तो वाहण्याचा बंद झाला तेव्हां येथील लोकांनीं तो खणून पाहिला व त्या प्रवाहाचे आड वड पिंपळाच्या पारंब्या आल्या होत्या त्या कापून काढल्यामुळें तो पुन्हां जोरानें वाहूं लागला. उगमापर्यंत खणून पाहिलें तों त्याचा उगम मागें सांगितलेल्या नरसिंहाच्या बुरुजा खालून आहे असें दिसलें. धौम हें अगदीं लहान गांव आहे खरें. पण निसर्गाचें त्याच्यावर फार प्रेम आहे. आपणही येथें राहिल्यास आपणही त्याच्या कृपेस पात्र होऊं असें वाटलें, पण असें करण्यास वेळ नव्हता.

धौम हें गांव वाईच्या पश्चिमेस चार मैलांवर असून सकाळीं जाऊन देव ब्राह्मण करून संध्याकाळीं परत वाईस येतां येतें. देव ब्राह्मण करण्यास येथें उपाध्यांचीं घरें आहेत. त्यांचे मार्फत सर्व विधी होतात. रस्ता साधारण सडकेचा आहे. त्याच्या अर्ध्या वाटेवर नाना फडणविसांचा

## मेणवली

गांव आहे. त्यांचा वाडा कृष्णेच्या कांठीं आहे. त्यांनीं कृष्णेला घाट व घाटावर

विष्णू मंदिर हीं बांधिलीं आहेत. तीं चिकित्सक बुद्धीनें पाहण्यासारखीं आहेत. नुसतें पहाणाराला त्यांत फारसें कांहीं दिसणार नाहीं. पण नाना फडणविस सारख्या कल्पक व दूरदर्शी मनुष्याच्या अकलेची तारीफ करण्यासारखें हें बांधलें आहे कीं नाहीं अशा दृष्टीनें तें पाहिलें ह्मणजे त्यांत त्यांची योजना व सुखसोयी यांची कल्पना येते. नाना फडणविसांचा वाडा अगदीं साधा दुमजली आहे. किंबहुना नवीन पद्धतीच्या वाड्यांत व ह्या वाड्यांत कांहीं फरक दिसणार नाहीं. पण ही नवीन पद्धती ह्मणजे मुख्यतः उजेडाची सोय प्रत्येक खोलीस स्वतंत्र असावी. कोणाचा कोणासही उपद्रव होऊं नये इतकेंच नव्हेतर शब्दही एकमेकांचा एकमेकांस ऐकूं येऊं नये. स्त्रीपुरुषांचे जाण्या येण्याचे दरवाजेही एक नसावेत पण नियमित ठिकाणीं हाक मारली असतां ती सर्वांस ऐकूं जाऊन सर्वांनीं एकदम एका ठिकाणीं जमावें, अशी योजना त्यांत आहे. स्वयंपाकघर, माजघर, दिवाणखाना, स्नानगृह व शौचकूप सर्वांस सारख्या अंतरावर पडावें. एका खोलींतूनही येणाऱ्या जाणाऱ्या स्त्रीच्यापुढें पुरुष कधींही येणार नाहीं. स्वयंपाकघरांत, माजघरांत व स्नानघरांतल्या व पाणी उदक, गच्चीच्या सोयी जनानी व मर्दानी निरनिराळ्या केल्या आहेत. तसेंच विधर्मी लोक भेटीस येत त्यांची सोय अगदीं अलग असावी, पण ती त्यास अलग तर वाटूं नये—द्वेषतर वाटूं नये—अशा पद्धतीची केली आहे. वाड्याच्या बाहेर काय चाललें आहे हें समजावें. पण वाड्यांत काय चालले आहे, हें समजूं नये असा त्या भोंवती कोट घातला आहे. व त्याचे विशिष्ट भागीं दरवाजे, खिडक्या व गव्हरें, ठेविलीं आहेत. एक दरवाजा त्यांनीं बांधिलेल्या कृष्णा घाटावर गेला आहे. सर्वत्र घाटावर अगदीं सपाट व प्रशस्त अशी फरसबंदी केली आहे. वगैरे अवर्णनीय सोयी नानांच्या बुद्धी चातुर्याच्या साक्षी देत आहेत. हाच नमुना अलीकडील मंडळींनीं घेऊन त्याप्रमाणें ते घरें बांधूं लागले आहेत. ह्मणजे मूळ कित्ता हा याचा आहे. याच्या नकला मागून झाल्या जुनी कोंदट घरें टाकून नवा कित्ता या घरानें लोकांस दाखविला. याबद्दल लोकांनीं त्यांचे ऋणी असलें पाहिजे. या वाड्यांत हल्लीं त्यांचे वंशज राहतात. ते असले ह्मणजे वाडा पाहण्यास मिळतो. नाहींतर मिळत नाहीं. वाड्याचा बराच भाग पडून गेला आहे. पण कांहीं अवशिष्ट राहिला आहे. त्यावरूनसुद्धां वरील कल्पना येतात.

नानांनीं कृष्णाबाईला घाट बांधला आहे. तोही असाच अपूर्व बुद्धिवैभवाचा आहे. नदीला घाट ह्मणजे उतरत्या पायऱ्यांचा बहुधा असतो. पण हा केवळ तसा नाहीं. भोंवतालच्या जमिनीपासून नदीचा प्रवाह फारसा खोल नसल्यामुळें वाड्यामागील सर्व पटांगण चिरेबंदी बांधून काढून नदीचा प्रवाह एके बाजूनें खेळविला आहे. आणि त्यांत समुद्रांत बोटी घेण्याकरितां जसें गोदीमध्यें धक्के बांधतात त्याप्रमाणें घाटाला धरून समोरासमोर पायऱ्यांचे धक्के बांधले आहेत व मध्यें पाणी खेळविलें आहे. असें तीन चार ठिकाणीं केलें असल्यामुळें नदींत जलविहारास, स्नानास व सकाळ संध्याकाळ हवें तिकडे तोंड फिरवून स्नानसंध्या करण्यास फारच सोय झाली आहे. तसेंच कपडे धुतांना एकाचे तुषार दुसऱ्यावर उडून स्पर्शास्पर्श दोषाचा फारच बंदोबस्त झाला आहे. शिवाय स्त्रीपुरुषांच्या विभागाचीही सोय झाली आहे. नदीचा प्रवाह या मधल्या भागांत बराच संथ आहे. पण मुख्य प्रवाह बराच वाहाता आहे. जशी ज्यास जरूर पडेल तसा त्यानें त्या घाटाचा उपयोग करून घ्यावा. घाटाच्या उपयोगाच्या सर्व बाबी ह्मणजे धार्मिक आणि व्यवहारिक, यांची त्यांत योजना केली आहे. उन्हाळ्यांत चांदण्या रात्रीं या घाटावरील प्रशस्त मैदानांत मोकळे हवेंत धार्मिक किंवा व्यवहारीक कृत्य करण्यास किती तरी आनंद वाटेल. प्रत्यक्ष एका बाजूला गंगा वाहात आहे तिचें दर्शन होतें. पलिकडच्या बाजूला फलपुष्पांचें उद्यान आहे. समोर विष्णु मंदीर आहे व एका बाजूला रस्ता धोमाकडे जात आहे. अशा सर्वप्रकारच्या सोयी पाहून कितीतरी आनंद होतो. हें प्रत्यक्ष अनुभव घेतल्याशिवाय समजणार नाहीं. राजकारणांतील किंवा कोणतेंही मानसिक दुःख झालेला मनुष्य येथें येऊन बसला तर ह्या निसर्गसिद्ध देखाव्यानें त्यास समाधान वाटून त्याचें मन प्रसन्न झालेंच पाहिजे. संसारताप दग्धांना हें केवळ विश्रांतिस्थानच आहे. येथेंही बरेंच दिवस राहावें असें माझे मनांत आलें. पण तशी अगाऊ व्यवस्था केली नव्हती ह्मणून तो बेत तसाच राहिला. सकाळ संध्याकाळ स्नानसंध्या केल्यावर लगेच श्रीविष्णु मंदीरांत जाऊन श्रीविष्णूचें दर्शन घेऊन किंवा संध्याकाळीं येथील आरतीचा सोहोळा पाहून मनुष्य घरीं गेलें असतां खरोखर सुखानें निद्रा घेईल. विष्णुमंदीर अगदीं लहान पण सर्व पाषाणमय असून मंदीरापासून वाड्यापर्यंत सर्व पटांगणांत फरसबंदी केली आहे. रात्रींच्या वेळीं मध्यें दोन तीन कंदील खांबावर ठेवून फुलपुष्पांच्या कुंड्या मधें धमें

ठेविल्यास शोभेला कांहीं कमतरताच नाहीं ! यात्रेंतून अशीं रम्य ठिकाणें पाहून आल्यावर शक्य असल्यास आपल्या परिस्थितीप्रमाणें आपण पाहिजे तेथें राहण्यास जावें. किंवा हें वर्णन वाचून ज्यांना तेथें राहण्याची जरूर वाटेल त्यांनीं तेथें जावें किंवा आपल्या घरीं तशी सोय होण्यासारखी असल्यास करून घ्यावी. ह्याच अशीं वर्णनें लिहिण्याचा हेतू असतो. असो. कांहीं वेळ येथें राहिल्यानंतर मी संध्याकाळ झाल्यामुळें वांईस परत गेलों.

वांईची रचना काशीसारख्या गल्यागल्यांची किंवा आळीआळीची आहे. काशीच्या गल्या अरुंद व दोन्ही बाजूचे वाडे उंचच उंच गेले आहेत, तसें येथें नाहीं. एथील गल्या रुंद असून दोन्हीं बाजूचीं घरें उंच नाहींत. घरांची शोभाही काशी इतकी मनोवेधक नाहीं. तरीपण काशीपासून रामेश्वरापर्यंत सर्व मुख्यमुख्य देवतांचीं देवालयें येथें असून काशीप्रमाणेंच त्यांचे उत्साहही होतात. त्यामुळें काशीपुरीप्रमाणेंच वांईपुरीही कोणत्याना कोणत्यातरी देवाचे उत्साहानें बहुतेक गजबजलेली असते. वांईस मोठमोठ्या इमारती नाहींत. पण काशीस जसें पंडित मदनमोहन मालवीय यांचें हिंदु युनिव्हर्सिटीचें कॉलेज व शाळा आहे, तशी येथें

## प्राज्ञपाठशाळा

आहे. महात्मा गांधींच्या उपदेशानें ज्या राष्ट्रीय शाळा निघाल्या त्यांसारखीच ही एक राष्ट्रिय शाळा आहे. पण ही त्यांच्या उपदेशाच्या पूर्वीची आहे. यांत ब्राह्मण धर्मविधींचें व त्यांच्या उपदेशक वर्गाचें मुख्यतः शिक्षण दिलें जातें. ही शाळाही लोकाश्रयावर चालली असून येथील शिक्षण फुकट दिलें जातें. कांहीं अनाथ मुलांचा सर्व खर्चही चालविला जातो. यांत धार्मिक विधींनें. धार्मिक उपदेशक वर्गच तयार करावयाचा असल्यामुळें या शाळेंत तूर्त ब्राह्मण विद्यार्थीच घेत आहेत.

सदर्हु शाळेंत धार्मिक शिक्षणाशिवाय मॅट्रिकपर्यंत इंग्रजी शिक्षण देण्याचाही विचार आहे. ह्मणजे या शाळेंतून निघून मुलगा मॅट्रिक क्लासांत बसण्यास योग्य होईल अशा प्रकारचें संस्कृत, बीजगणित, इतिहास, भूगोल व भौतिक शास्त्रेंही शिकविलीं जातात. औद्योगिक शाळाही हीस जोडावयाची आहे असें ह्मणतात. सर्व मुलांकडून स्नानसंध्या, ब्रह्मकर्म, रोज योग्यवेळीं यथासांग करून

घेतलें जातें. याशिवाय या शाळेतून सर्व वेदांचे भिक्षुक (याज्ञिक), शास्त्री, नव्या-जुन्या पद्धतीप्रमाणें पुराणिक, हरदास, प्रवचनकार व उपदेशक तयार होतील अशी योजना चालली आहे. याबद्दल तिचे चालक वे. शा. सं. नारायणशास्त्री मराठे हे खरोखर स्तुतीस पात्र आहेत. आणि हेंच काम त्यांजकडून निर्विघ्नपणें केलें गेलें असतें तर या शाळेच्या योगानें जुन्या व नव्या विद्येचें पुष्कळ कार्य होऊन वेद पुरुषांनीं त्यांस वेदोक्त आशिर्वाद दिला असता. पण वेद व आचार-धर्म विघातक अशीं येथील कांहीं मतें ऐकलीं म्हणजे इष्टाच्या ऐवजीं अनिष्टच या शाळेपासून उत्पन्न होऊन खिस्ती मिशनऱ्याप्रमाणें ही आर्य संस्कृती बाटविणारी एक संस्था आहे कीं काय अशी भीति वाटते. येथील कांहीं मतें अशीं आहेतः—

१ अंत्यजांना किंवा विधर्मी लोकांना असमजुतीशिवाय मुद्दाम शिवलें असतां स्नान केलें नाहीं तरी ब्रह्मकर्मास बाध येत नाहीं! म्हणजे पूर्वजांनीं वेद हे आज-पर्यंत पवित्र मुखामध्यें व आचारामध्यें ठेविले तो पवित्रपणा कोठेंच राहिला नाहीं! हल्लींच्या नोकरवर्गाच्या स्त्रिया हल्लीं सोंवळें नेसून स्वयंपाक करीत नाहींत. कारण त्या म्हणतात, आमचे यजमानांस सोंवळ्याची जरूर नाहीं. मग आम्ही सोंवळें कोणाकरितां करावयाचें? तसेंच उद्यां म्हणतील आमचे यजमान आम्हांलाही घेऊन चांभाराचे दुकानीं जातात, व त्या चांभाराकडून आमचे पायांत जोडा घालवितात, भंग्यासही स्पर्श केला असतां चालतें, मग आम्हीं विटाळशा बसून तरी काय करावयाचें आहे? आम्ही विटाळशा असलों तरी भंग्यापेक्षां पुष्कळ स्वच्छ असतों. ते सर्व जगाच्या मलमूत्र विसर्जनाचा धंदा करतात त्यापेक्षां अस्पृश्यपणींसुद्धां आमची स्वच्छता पुष्कळ आहे. म्हणजे अशा रीतीनें बायकाही विटाळ धरणार नाहींत. आर्यस्त्रिया अद्याप खालच्या मानेच्या आहेत. पण नूतन विद्येच्या अशा संस्कारानें त्यांची मान वर झाली म्हणजे पुरुषांच्या बुद्धिवादाला त्या आटोपणार नाहींत. व तसा अनुभवही येत चालला आहे! बायकांच्या शुद्धतेमुळें आमचीं घरें आज पर्यंत स्वच्छ व शुद्ध राहिलीं होतीं पण तीं ह्यापुढें राहणार नाहींत हें खास. ही सुधारणा काय? म्हणून अशा गोष्टी करून जी आर्यसंस्कृति आजपर्यंत विधर्मी हल्ल्यानेंसुद्धां बिघडली नाहीं ती आमच्यांतीलच वेदोनारायणाच्या उपदेशाकडून व उपदेशक वर्गाकडून परकियांच्या चिथावणीनें बिघडली जाईल व धर्मावर ही एक आपत्तीच येईल

असें वाटतें. असें करणें हें कांहीं अस्पृश्यता निवारण नव्हे. अस्पृश्य हे अस्पृश्य राहिले म्हणजे आम्ही त्यांचा द्वेष करतों, किंवा तिरस्कार करतों असें नाहीं. ते आमचे भाऊबंदच आहेत. पण हिंदुधर्म संस्कृति कायम राहाण्याकरितां व वेद-विधींच्या पावित्र्याकरितां ही योजना आहे, हा अभिमान त्यांनीं बाळगला पाहिजे. फार काय आमच्या शरिरांतील मलमूत्र विसर्जन करणारीं इंद्रियेंसुद्धां आम्ही अस्पृश्यच राखतों. त्यांना योग्य वेळीं धुऊन पुसून कपड्याच्या वेष्टनानें सर्व शरीरापासून त्यांना अलग राखतों. म्हणजे आम्ही त्यांचा द्वेष करतों असें नव्हे. अस्पृश्यतेला द्वेषाची चिथवणी परकीयांच्या चिथावणीनें उत्पन्न झाली आहे. याचा आमच्या अस्पृश्य बंधूनीं व सुशिक्षितांनीं विचार करावा व सलोख्यांनीं वागावें. निदान ती अस्पृश्यता अशा धार्मिक संस्थांस तरी नसावी, निदान तसा मुद्दाम उपदेश तरी करूं नये. इतरत्र ठिकाणची गोष्ट निराळी आहे. अस्पृश्य आपण होऊन मी अस्पृश्य आहें, जरा दूर बसतों असें आर्यसंकृतीच्या अभिमा-नाकरितां म्हणून तो दूर बसूं लागला तरी आमचे हे श्रेष्ठ म्हणविणारे पुढारी ब्राम्हणच त्याचा हात धरून आपल्या मांडीशीं त्यास बसावितात, याला काय म्हणावें? म्हणजे चातुर्वर्ण्याचा किंवा स्वच्छतेचा धडा अस्पृश्य हा ब्राम्हणास शिकावितो तरी तो ते मानीत नाहींत. मग ब्राम्हणाचा श्रेष्ठपणा कोठें राहिला? मग ब्राह्मणेतरांनीं ब्राम्हणांची पायमल्ली केली तर त्यांत दोष कोणाचा? ब्राम्ह-णांनीं अशा प्रकारानें आपला आचार व शुचिर्भूतपणा घालविला म्हणजे ते अंत्य-जांपेक्षांही अंत्यज होतील. कारण मग इतर कोणत्याही जातीपेक्षां ब्रह्मणांत श्रेष्ठ-पणा किंवा सामर्थ्य राहिलें कोठें? ह्मणून ब्राह्मण्याचें रक्षण ब्राह्मणांनी करावें व इतरांनींही सद्बुद्धीनें त्यांना मदत करावी, यांतच सर्वांचें कल्याण आहे. व हिंदु-धर्माचें खरें रहस्य आहे. आज अनंत काळापासून ब्राह्मणांचा शुद्धाचार राहिला आहे. तो केवळ ब्राह्मणानींच राखला नाहीं. सर्वजातींनीं, विशेषतः रामकृष्णा-सारख्या अवतारी क्षत्रियांनीं व शिवाजीसारख्या अलीकडल्या राजांनीं राखिला म्हणूनच तो टिकला आहे. म्हणून ह्या ब्राम्हण्याचा अभिमान हिंदुमात्रासच असावा. यासंबंधें ठिकाठिकांणीं खुलासा आहेच.

२ दुसरी गोष्ट चातुर्वर्ण्य हें हिंदूधर्माचें वैशिष्ठ्य आहे. पण त्याचें पुनरूज्जीवन देशकालाप्रमाणें करावें. ह्मणजे सर्व हिंदु स्त्रीपुरुषांचें एक प्रकारचें ऐक्य व साम्य उत्पन्न होण्याकरितां सर्वांचे निदान चार तरी संस्कार करावेत ते १ जातकर्म, २ उप-

-नयन, ३ विवाह, ४ अंत्येष्टी म्हणजे आर्यांनीं उपनयन हा संस्कार वेदाधिकारा-कीरितां केला आहे. तरी तो सर्व स्त्री शूद्रांनीसुद्धां करावा. कशाकरितां ? तर ऐक्य वर्धनाकरितां! शास्त्रीबोवांची ऐक्यवर्धनाची ही अजब युक्ति नाहीं असें कोण म्हणेल ? आमच्यांतीलच विद्वान लोकच असें म्हणूं लागले म्हणजे स्त्रीशूद्रांना-दुजोरा मिळून एकीच्या ऐवजीं बेकीच उत्पन्न झाल्याशिवाय राहणार कशी ? आणि असें केलें म्हणजे जाती जातींचें वैशिष्ट्य राहिलें कोठें ? हल्लींच्या मतांतराच्या बडबडीनें एकी वाढते आहे किंवा तिचा क्षय होतो आहे हें कोणास सांगावयास नको.

३ तिसरी गोष्ट. हिंदु विधवांच्या वपनाची चाल ही वाईट, तशांत स्त्रीनापित मिळत नाहींत, पुरुष नापीत मिळतात. आणि त्यांचा हा विधी लज्या रक्षणाकरितां एकांतात होतो हें तर अत्यंत गैर आहे. कारण अंधारांत कसे काय प्रकार होत असतील कोणी सांगावें ! सबब त्यांचा विधी भर चवाठ्यावर निदान ओटीवर तरी करावा नाहींतर केस राखावे ! पण विधवांचे केस राखले म्हणजे पुरुषांची नजर अशा स्त्रियांकडे विशेष लागते. सबब त्यांस कुंकूं लावण्याचा अधिकार द्यावा. म्हणजे सुवासिनी समजून पुरुष त्यांकडे पाहणारसुद्धां नाहींत व अशा अखंड सौभाग्यानें त्यांचे अब्रूचें रक्षण होऊन त्यांच्यावर पुरुषांचा हल्ला होणार नाहीं ! स्त्रिया विघडविण्यास कारण पुरुष आहेत ! ! अशाप्रमाणें शास्त्रीबोवांचा निरुत्तर कोटीक्रम आहे ! ! ! त्याचें उत्तर देण्याचें कारणच नाहीं. कारण स्त्रियांची अब्रु जाऊन गोंधळ होतो तो थांबविण्यास त्यांस स्वातंत्र्य देऊन सुरूप व वैभवांत ठेवाव्या किंवा कुरूप व एकांतांत ठेवाव्या हेंच ज्यांना समजत नाहीं त्यांस काय बोलावें ? वस्तुतः सौभाग्यवतींनेंच कुंकू कां लावावयाचें याचें शास्त्रीबुवासारख्यांस शास्त्रोक्त कारण सांगण्याचा प्रसंग यावा हें दुर्दैव आहे. हल्लींच्या विद्वानांना याशिवाय दुसरे विषयच राहिले नाहींत. हेंच विद्वत्तेचें लक्षण आहे, अशी त्यांची समजूत आहे, हें दुर्दैव आहे. यामुळेंच हल्लीं विद्वान ह्मटला ह्मणजे सामान्य जनसमुहाच्या पायाची तिडीक मस्तकाला पोहोचते. कारण तो आपल्या अकलेच्या व विद्वत्तेच्या जोरावर काय सांगेल व काय सिद्ध करील व कसा फसवील याचा नेमच राहिला नाहीं. त्यांच्या उदार स्त्रीशिक्षणानें व स्त्री स्वातंत्र्यानें हल्लीं समाजावर काय प्रसंग ओढवताहेत हें हल्लींचीं वर्तमानपत्रें रोज सांगतच आहेत. वडिलांचा,

धर्माचा, किंवा निदान समाजाचा तरी स्त्रियांवर अधिकार नसेल तर समाजाचे तुकडे तुकडे झाल्याशिवाय राहणार नाहींत. त्याचे डोहाळे आतां होऊं लागले आहेत. खान पाणदीकरासारखे विवाहास मुळींच अडचण नाहीं अशी तरुण-मिढी स्पष्ट ह्मणूं लागली आहे. सबब आतांतरी शहाण्यानें जागें व्हावें. व असले उपदेश करण्याचें सोडून द्यावें. पुनर्विवाह करण्याचें स्त्रियांनींच नाकारिलें ह्मणून. नाहींतर आतां समाज कांहीं निराळाच दिसला असता. प्रवाहपतित कार्ये जनसमुहाकडून होतातच. पण सुधारकांच्या अशा घिसाड घाईमुळें पुढाऱ्यांचें पुढारीपण मात्र जातें. समाजाला घेऊन जो पुढारी जाणार नाहीं तो पुढारीच नव्हे, हें लो. टिळकांनीं आमच्या पुढाऱ्यांस स्पष्टपणें बजाविलें आहे. हें ते विसरतात. हल्लींच्या सुधारकांबद्दल किंवा पुढाऱ्यांबद्दल जनता काय ह्मणते तें ऐका.

आर्या.

ते देशोद्धारक? कीं, सवगोलंकार अत्यंजोद्धार
निर्मूलन जातींचें, समताकर्तव्य हेंचि ज्या सार १
संभावित भिक्षेकरि, कोणी नवि टूम फंड जो काढी
देवांच्या राष्ट्रांच्या, नांवावर पात्र आपुलें वाढी २
कोण ब्राह्मण? ज्यांना आचार न एक जानवें मात्र
कोण क्षात्रिय? धैर्योदार्याविण जो पराक्रमा पात्र ३
कोण अशिक्षित? ज्याचा, साधा पोषाख इंग्रजी येन
कोण सुशिक्षित? अपटूडेट रहाणी स्वधर्म मानीन ॥४॥

खरोखर अलीकडच्या सुशिक्षितांनीं समाजाला उपयुक्त असें कांहींएक न सांगतां ज्या धर्मतत्वावर समाज स्थिर झाला होता तीं तत्वेंच ते उखळून टाकीत आहेत. आणि मतमतांतराचा वणवा लावून जिकडे तिकडे भांडणें, वैरद्वेष वाढवून समाज फोडीत आहेत. पाश्चात्यांप्रमाणें आमचा समाज अधोगतीला जावा हाच सर्वत्र शिक्षण देण्याचा हेतु दिसतो. कोणतीही सुधारणा सद्भावानें किंवा खरोखर लोककल्याणाकरितां असेल तर त्याचा लोक कृतज्ञतेनें गौरव करतीलच पण हल्लींच्या पुढाऱ्यांत भीपणा, अपमतलब व पाश्चात्यांचें गुण न घेतां अंधदृष्टीनें

अनुकरण, याशिवाय त्यांत कांहीं दिसत नाहीं. सामान्य जनता बोलत नाहीं किंवा त्यांच्या तोंडीं लागत नाहीं. पण अशांची योग्यता काय आहे हें ती पूर्णपणें समजते. पुढाऱ्यांना ह्याबद्दल राग येईल पण तात्विक किंवा स्थूल दृष्टीनें किंवा निरभिमानानें विचार केल्यास त्यांना हें आमचें ह्मणणें पुष्कळसें पटेल असा अदमास आहे. कोणाच्या द्वेषबुद्धीकरितां हें लिहिलेलें नाहीं.

४ बाटलेल्यांना हिंदुधर्मांत घ्यावें, त्यांची पूर्वीची जात त्यांना यावी हें सरळ आहे. पण त्यांना पश्चाताप झाला असेल तर हें ठीक आहे. नाहींतर आज हिंदु व उद्यां मुसलमान असें होईल. अशा मंडळीनें धर्माची उन्नति कशी होणार? परिस्थिति बदलल्यास यांचें पुन्हा रूपांतर होण्यास वेळ लागणार नाहीं. आतां राजकारणाची गोष्ट निराळी आहे! परधर्मियांना हिंदू करून घेण्यासंबंधानें टीका करण्याचें मुख्य कारण असें कीं, जे लोक हल्लीं धर्मांतर करीत आहेत, त्यांत फारशी तत्वदृष्टि नसून ते ऐषआरामाचे, चैनीचे चोचले करण्याकरितां ते तीं करीत आहेत. हिंदु लोकांतील श्रीमंत व राजेरजवाडे यांच्या पैशांचा मनसोक्त उपभोग घेऊन आपल्या कामवासना पूर्ण कराव्या हाच त्यांचा मुख्य उद्देश आहे. आतां एकच सुख निरंतर टिकत नाहीं. कालांतरानें त्यांत बदल होतो. तो बदल झाला ह्मणजे तत्वदृष्टि जाऊन अशा बायकां पुरुषांचें मूळ स्वरूप दिसून येतें. त्या बायका नव्या नवऱ्याला सोडून जातात. मग अशा बायकांचे अन्नवस्त्राचे दावे चालू होतात. व त्या युरोपांत किंवा अमेरिकेंत चैनीनें राहतात!!! अर्थात पुन्हां धर्मांतर होतेंच. हल्लींच्या तरुणांचें मनसोक्त वागण्याचें हेंच धोरण आहे. असें धर्मांतर काय उपयोग? अशांची खोगीर भरती काय कामाची. हें भूषण कसलें? व यांत अभिमान तरी कसला? आतां मुसलमान व ख्रिश्चन मिशनरी यांच्या हल्यामुळें हा प्रश्न धशीस लागला आहे, ही गोष्ट निराळी आहे. पण हा आपत्धर्म समजावा. परधर्मियांवर वचक बसण्यास मात्र हा क्रम तूर्त ठीक आहे.

तेथील दिवेकर शास्त्री हल्लीं ही शाळा सोडून राष्ट्रकार्याला लागले आहेत. तेव्हां त्यांचीं हीं मतें त्या शाळेंत आतां चालू आहेत किंवा नाहीं हें समजत नाहीं.

अशा प्रकारच्या सुधारणा करणारीं तेथील मतें दिसलीं आणि तीं ते येथें आपले उपदेशक वर्गाला शिकवणार व ते दुसऱ्यांना उपदेश करणार. अर्थात

जुनी संकृति बदलून नवी तयार करणार ह्मणजे हे नवे मनु याज्ञवल्क्यच झाले! हिंदुधर्माला शास्ता कोणीच नाहीं. त्यावर स्वकीयांनीं व परकीयांनीं कांहीं विचार न करितां वाटेल तसे हल्ले चढवून, छाटाछाट करून किंवा नव्या हव्या-तशा पुस्त्या लावून त्याची सुधारणा करावी. व अशी छाटाछाट करतां करतां मूळ खुंट तरी शिल्लक राहील कीं नाहीं याची शंकाच वाटत आहे. आज या गोष्टी मनांत येत आहेत, कृतींत आल्या नाहींत. पण याचाच जप करीत गेल्यास कृतींत येण्यास वेळ लागणार नाहीं. बुडत्याचा पाय खोलांत ह्मणतात तें हेंच.

हल्लीं ज्या राष्ट्रीय शिक्षणाच्या ह्मणून शाळा निघाल्या आहेत त्यांपैकीं एकींतूनही राष्ट्रकार्यास योग्य असे विद्यार्थी निघण्याचा संभवच नाहीं. कारण त्यांत शिक्षणाचा जिवंतपणा कोठेंही दिसत नाहीं. हल्लीं त्यांत राष्ट्रीय शिक्षणास योग्य असे कोणतेंच विषय शिकवीत नाहींत. सरकारी शाळांतून जीं पुस्तकें चालतात त्यापेक्षां कांहीं निराळीं पुस्तकें त्यांत चालवितात येवढेंच. शिक्षण देण्याचा क्रम सुव्या वगैरे बहुतेक सारख्याच. अशानें काय फायदा होणार? मुख्यतः आपल्या हिंदुस्थानांत ज्या त्या जातीच्या उन्नतीकरितां त्यांच्या धंद्याचें नवीन सुधारलेले त्यांचें त्यांचें धंदे शिक्षण दिल्यास त्याचाच आपल्या हिंदुराष्ट्राला फार उपयोग होईल. ह्मणजे ब्राह्मणांनीं प्राचीन व अर्वाचीन विद्या शिकाव्या व राष्ट्रीय धोरण आपल्या पूर्व परंपरेला धरून ठरवावें. क्षत्रियांनीं त्यांतलीं मुख्य प्रमेयें शिकून आपलें सामर्थ्य लष्करी शिक्षणानें किंवा निदान कृषीनें तरी वाढवावें. जुन्या व नव्या युद्धशास्त्राची व त्यांच्या साधनांची माहिती करून घ्यावी. व एकंदर जगामध्यें आपल्या देशाचें स्थान काय आहे व तें आपल्या परंपरेला अनुसरून कोठें असलें पाहिजे यांचा विचार सुचविणाऱ्या तत्समान गुरुंची योजना त्यांना पाहिजे आहे. हल्लींचे क्षत्रिय बी. ए. एल्. एल्. बी. होऊन जातिद्वेषानें शुष्क राजकारण हलवीत बसले आहेत. त्यापेक्षां त्यांनीं तो पैसा जिवंत राष्ट्रांत जाऊन तेथून चालू पद्धतीच्या ललितकला व नवीं रण-साहित्यें, विमानें, टार्पेडो, बिनधुराची व बिनअवाजाची दारु व ग्यास यांची माहिती करून घेऊन त्याचा राष्ट्राला व आपल्या जातीला फायदा करून द्यावा. तसेंच वैश्यांना प्रचलित विद्यांची नुसती तत्वें शिकवून जगांतील व्यापारांची घडामोड व व्यवहार शिकविणाऱ्या शाळा व तसे गुरु पाहिजेत. अर्थात तशीं

पुस्तकेंही तयार झालीं पाहिजेत. या सर्व जातींना ब्राह्मणांनीं व सर्व राष्ट्रानें बुद्धिवर्धक सहाय्य करावें व श्रीमंतानीं उदार आश्रय द्यावा. हल्लींच्या काळीं हिंदुस्थानचा व्यापार सर्व पृथ्वीवरील देशांत आहे. तेथें आपले एजंट नेमून तिकडील माल इकडे व इकडील तिकडे पाठवून नुसती त्याची दलालीही आज युरोपियन लोक हजारों रुपयांची घेतात तिचाही फायदा आपल्या देशाला झाला पाहिजे. अशानें वैश्यांना हिंदूस्थानच्या व जगांतील इतर व्यापारांचें रहस्य समजेल व अनंत फायदा होईल; तो हल्लींचेप्रमाणें वैश्याश्रम काढून होणार नाहीं. सारांश ब्राह्मणांनीं आपला शुद्धाचार व धर्मरहस्य जाणणें, क्षत्रियांनीं आपला क्षत्रियबाणा व वैश्यांनीं आपला व्यापार तेजस्वी ठेवणें हीच खरी सुधारणा आहे. अन्य व्यवसायांनीं हिंदुस्थानची उन्नति शक्य नाहीं.

असें शिक्षण मिळत गेल्यास तें खरोखर राष्ट्रीय शिक्षण होऊन हिंदुराष्ट्राचा खरा उदय होईल. पण असा दिवस परराज्यांत येईल किंवा नाहीं याची जबरदस्त शंका आहे. हीं कामें मुख्यतः राष्ट्रीय सभेनें आपण होऊन आपले तरूण लोक पुढें करून त्यांच्या करवीं अनुभवून पाहण्यासारखीं आहेत. पण आमच्या पुढाऱ्यांच्या तीं ध्यानांत येतील तेव्हां खरें ! गंमत अशी आहे कीं पाश्चात्य आमच्या चुका दाखवितात व त्या आह्मी सुधारण्याचा अट्टाहास करितों पण आपण त्यांच्या चुका दाखविल्यास ते तिकडे मुळींच लक्ष देत नाहींत ! हेतु हा कीं आमच्या चुका कधीं संपावयाला नकोत व आमची उन्नति कधीं व्हावयाला नको ! चुका काढणारास त्या कोणाच्याहि दिसणारच ! हल्लींच्या परराज्यांत जातीभेद, वंशपरंपरा, वय व शिक्षण यांचा कांहीं विचार न करितां स्त्री-पुरुषांनासुद्धां सारखें एकच शिक्षण दिलें जातें व तेंही पाश्चात्य पद्धतीनें दिलें जातें व त्याकरितां हयात व पैसा फुकट जातो ही दुर्दैवाची कमाल आहे. ह्या उष्ण प्रदेशांत आयुष्य फार थोडें असल्यामुळें केवळ अशा निरुपयोगी शिक्षणांत असें आयुष्य घालविणें व आपल्या स्वधर्माच्या व वंशपरंपरागत सहज येणाऱ्या धंद्याला व कलाकौशल्यास मुकणें हीच दुर्दैवी स्थिति आमच्या देशाच्या पाठीस लागली आहे. यांतून सुटका होणें कठीण दिसतें. याबद्दल परमेश्वराचीच करुणा भाकली पाहिजे. कारण आमचे पुढारी आह्मांला पाश्चात्यांची सबगोलंकाराची भलतीच वाट दाखवीत आहेत ! असें ज्ञातिविषयक शिक्षण हल्लीं बंद

झाल्यामुळें व्यर्थ जीवनकलह मात्र माजला आहे. ब्राह्मणांचीं कामें क्षत्रियांनीं करण्याची इच्छा धरावी. त्याप्रमाणें वैश्यांनीं व शूद्रांनीं वाटेल त्यानें वाटेल त्याचें काम करण्याची इच्छा धरावी इतकेंच नव्हे तर बायकांनींसुद्धां पुरुषांचीं कामें करावीं व पुरुषांनीं बायकांचीं करावीं अशी वेळ येत चालली आहे. अशानें कोणाचींच कामें खरीं पद्धतशीर व सोईनें न होतां व्यवस्थित असलेला पूर्वीचा समाज अगदीं विस्काळित झाला आहे. जो तो आपल्या वंशपरंपरागत धंद्याला अगदीं कंटाळला आहे पण हंसान्योक्तिप्रमाणें नवीन व्यवस्थेंत कांहीं अर्थ नाहीं, आपली जुनीच पद्धत हितपरिणामी आहे अशी आतां हल्लींच्या सुशिक्षितांची खात्री होत चालली आहे. पण या शिक्षणानें विस्कटलेली घडी पुन्हा तशी बसविण्याचें त्यांचें अंगीं सामर्थ्य नाहीं ह्मणून तेही हळहळत आहेत. स्वयंशासित पद्धति नसली ह्मणजे सद्गुण मिळण्याचे बाजूस राहून दुर्गुणांचा मात्र फैलाव होतो इतकेंच नाहीं तर असलेले सद्गुणही निघून जातात !

राष्ट्रीय शिक्षणाच्या शाळांत आमच्या देशाच्या निरनिराळया ठिकाणच्या भाषा व निदान आपल्या लोकांच्या तरी चालीरीतींची माहिती पाहिजे ह्मणजे त्यांजवळ संगनमत करून प्रसंगीं एकी तरी करितां येईल. निदान वितुष्ट पडलें असतां तें मिटवितां येईल. आज जी इंग्रजींतून समजूत करून द्यावी लागते ती तरी टळेल. सवड असेल त्यांनीं ह्मणजे वरचे वर्गांतील लोकांनीं आपल्या देशाचे राजकर्त्यांचें राजकारण समजण्याकरितां व जगांत इतर पुढारी देशांची खरी स्थिति समजून तीवरून आपल्या देशाची स्थिति समजण्याकरितां इंग्रजीबरोबर रशियन, जर्मन, फ्रेंच, जपानी, चिनी ह्या भाषाही आपले लोक तेथें पाठवून अवश्य शिकाव्या. त्याशिवाय नुसत्या इंग्रजी भाषेवरून जगाचें खरें ज्ञान होणार नाहीं. सर्व हिंदू लोकांविषयीं मनांत आदर असला पाहिजे. व तशा परक्यांविषयीं अनादर दाखविला पाहिजे. इतर धर्मी लोक त्यांच्या धर्माच्या मनुष्यास इजा झाली असतां त्यांचा जसा एकदम संघ जमतो त्यापेक्षां आमचा जास्त झाला पाहिजे. या कामीं चातुर्वर्ण्य थोडेंसें आड येत आहे असें वाटत असेल तर तेवढ्यापुरतें तें ढिलें करावें. पण सर्वस्वीं त्याला वाहून घेऊं नये. तें कार्य सरतांच पुन्हां पूर्वपदावर यावें. कर्ण अश्वथाम्याला ह्मणाला तूं ब्राह्मण आहेस ह्मणून तुला मारतां येत नाहीं. तेव्हां अश्वथामा ह्मणाला ठीक आहे. हें पहा जानवें तोडून टाकिलें. आतां काय पराक्रम आहे

तो दाखव. ह्मणजे त्यानें कायमचें जानवें तोडलें असें नाहीं. तें त्या प्रसंगाकरितां त्याचें उत्तर होतें. धर्मराजानें सुद्धां हें सांगितलें कीं, जेंव्हां कुरूवंशावर प्रसंग येईल तेव्हां ते शंभर व आह्मी पांच हें एक आहों. नाहींतर आह्मी वेगळेच आहों हें पूर्ण लक्षांत ठेवा. हक्क संरक्षणाकरितां व आपलेपणाकरितां फार प्रयत्न करावे. या कामीं ज्यानां अडचण येईल त्यांना सर्व प्रकारें मदत करावी. हिंदुधर्म हा प्रायः शांतताप्रिय धर्म आहे. तसे सर्व धर्महीं आहेत. परंतु इतर धर्मियांनीं शांततेचें सोंग दाखवून तें एका बाजूला ठेवून इतर धर्मियांवर हल्ला करण्याचा पेशा उचलला आहे. त्याप्रमाणें इतर धर्मीय जर आपल्यावर विनाकारण हल्ला करतील तर जशास तसें याप्रमाणें हिंदुधर्माचें तेज दिसलें पाहिजे. या विलक्षण शांततेस आमच्या साधूंनीं त्या काळाच्या धारेणास अनुसरून मोठें प्रोत्साहन दिलें होतें. हल्लीं महात्मा गांधी तेंच करीत आहेत. पण अशा निर्जीवपणामुळें या प्रगतीचे काळांत आमचें अतोनात नुकसान झालें आहे व होत आहे हें आह्मी पाहात आहों. सबब आमचे मुख्य पुढारी लोकमान्य टिळक यांनीं स्पष्ट सांगितलें आहे कीं आपण होऊन कोणाची कुरापत काढूं नये. पण विनाकारण कलागत उत्पन्न झाली असतां त्याचा प्रतिकार आत्मसंरक्षणाकरितां तरी ठोशास ठोसा देऊन कराल तरच तुमचें अस्तित्व चालू काळांत राहील नाहींतर तुह्मी आपोआप नामशेष व्हाल. आत्मसंरक्षणाचा हक्क अनादि कालापासून आजपर्यंत चालत आलेला आहे व तो इंग्रज सरकारच्या राज्यांतही कायद्यानें स्पष्टपणें दिला आहे. मात्र त्याची अंमलबजावणी आमचे भित्रेपणामुळें होत नाहीं हा आमचा वेडेपणा आहे. कोणाच्याही संकटकाळीं उडी घेणें, संकट निवारणाचे उपाय सुचणें, पोहणें, डोंगरावर चढणें, उन्ह, तहान, वारा, पाऊस, यांची क्षिती न बाळगणें, उघडें व उपाशीं राहून धैय न सुटणें, हिंदुस्थानची बारीक सारीक माहिती असणें वगैरे राष्ट्रवीराचे गुण किंवा तप एकही शाळेंत शिकाविलें जात नाहीं मग हें राष्ट्रीय शिक्षण कसलें व यापासून राष्ट्रास उपयोग तरी काय होणार ? हेंही दिसत आहे. जपानांत ह्याच शिक्षणाला प्राधान्य आहे. वस्तुतः खरें पाहिलें असतां आह्माला दर्यावर्दीपणाचें, कलाकौशल्याचें, विमानाविद्येचें व नवीन युद्धकलेचें असें चालू काळचें जिवंत राष्ट्राचें शिक्षण मिळालें पाहिजे. निदान मोठमोठ्या संस्थानिकांनीं तरी ह्याबद्दल प्रयत्न केले पाहिजेत. पण ते जर कोणाकडून होत नसतील तर दुसऱ्या मृत कला-

कौशल्याकरितां किंवा एखादी मडम बायको करून आणण्याकरितां साता समुद्रापलीकडे विलायतेस जाऊन एवढा खटाटोप न करितां स्वतः तेजस्वी राहून दुसऱ्यांतही तो गुण उत्पन्न करतां येईल तरच तें राष्ट्रीय शिक्षण होय. तसेंच आमच्या अनुवंशिक कलांचें व धंद्यांचें शिक्षण, तें हल्लींच्या पद्धतीप्रमाणें सुधारून त्या त्या जातींना दिलें पाहिजे. लोकांनीं राष्ट्रीय शाळांच्या सर्टिफिकिटास मान देऊन त्यास काम दिलें पाहिजे. राष्ट्रफंड निर्माण करून त्यांतून तळेगांवच्या काच कारखान्याप्रमाणें लहान मोठे कारखाने काढून ते राष्ट्रानें चालविले पाहिजेत व त्यांत राष्ट्रीय विद्यार्थ्यांस काम दिलें पाहिजे व बेकारी घालविली पाहिजे. नुसत्या राष्ट्रीयसभा काढण्याकरितां जे पैसे खर्च होतात त्यापेक्षां या फंडाला दिले तर किती तरी कार्य होईल व देशांतून बेकारी जाईल. खुद्द राष्ट्रीयसभेनेंच हा कार्यक्रम हातीं घेण्याजोगा आहे. ज्याला घरीं पोटभर अन्न मिळत नाहीं त्यानें भीक मागून तरी त्याला काय मिळणार ? धार्मिक शिक्षणांत जातींची संस्कृति व योग्य आचार पाळण्याचें ध्येय पाळलें पाहिजे. कोणाही इतर जातीबद्दल द्वेष न बाळगतां आत्मभाव राखणें हीच राष्ट्रीय नीति समजली पाहिजे. सर्व वर्णांना व जातींना राष्ट्राभिमान उत्पन्न करून शत्रूचा प्रतिकार करण्यास शिकविलें पाहिजे. तसेंच उपयुक्त पदार्थांची परदेशची राहिली तरी हिंदुस्थानची मागणी हिंदुस्थाननें पुरविली पाहिजे. त्याकरितां त्याला परदेशच्या तोंडाकडे पाहाण्याचा प्रसंग येऊं नये आणि ही गोष्ट हिंदुस्थानला मुळींच अशक्य नाहीं. हेंच राष्ट्रीय शिक्षणाचें तत्व असलें पाहिजे. राजा विधर्मी असल्यामुळें आमच्या उन्नतीकरितां हें राष्ट्रीय शिक्षण आमचें आह्मींच दिलें पाहिजे. स्वधर्मी राजा असता तर आर्यधर्माप्रमाणें आमची उन्नति सर्व बाजूंनीं झालीच असती व याकरितांच मुख्यतः स्वराज्याची जोराची मागणी होत आहे; परक्यांच्या द्वेषाकरितां नव्हे. हा पोटापाण्याचा प्रश्न आहे. हा ज्याचा त्यानें सोडविला नाहीं तर तो उपाशी मरेल. यापेक्षां राष्ट्रीय शिक्षणाचा जास्त विचार येथें करितां येत नाहीं.

सारांश आमच्या धर्मांत आजकाल कांहीं सुधारणा करावयाची असेल तर ती विधवांनीं कुंकू लावूं नये किंवा लावावें. अशा सारख्याची जरूर नसून थोडासा मवाळपणा जाऊन कडवेपणा अंगीं येईल व परक्यांचे स्वीकारलेले चोचले नष्ट होतील अशा प्रकारचें स्वाभिमानाचें शिक्षण मिळालें पाहिजे. पण तिकडे कोणतीही राष्ट्रीय शाळा लक्ष देत नाहीं. तें देईपर्यंत हा देशांतील पैशाचा व मुलांच्या

आयुष्याचा अपव्यय आहे असें साधरण लोकांचें मत आहे. हल्लीं कांहीं महाराष्ट्रीय विद्यार्थी परदेशची स्वतंत्रतेची हवा खाऊन विमानविद्या, कृषी वगैरेंत प्राविण्य मिळवून महाराष्ट्राचा व ब्राह्मणत्वाचा अभिमान राखून परत येऊन राष्ट्रजागृति करीत आहेत ही फार अभिमानाची गोष्ट आहे. यानंतर मी वाईहून

## महाबळेश्वर

येथें मोटारीनें गेलों. वाईवरून महाबळेश्वर येथें जाण्यास उत्तम सडक आहे. चढावही बेताचा आहे. वाईपासून महाबळेश्वर वीस मैल आहे. याला धौममहाबळेश्वर ह्मणतात. वाईहून महाबळेश्वरीं जाण्यास मोटारी मिळतात. वाईचा कृष्णेचा पूल ओलांडून गेलें ह्मणजे पसरणीचा घाट लागतो. घाट फारसा चढावाचा नसतो. पण मोटार वर जात असतां कृष्णेच्या खोऱ्याची व त्यांत असलेल्या वाई, धौम, मेणवली व इतर गांवची विहंगम दृष्टीनें शोभा पाहात पाहात आठ मैल गेलें ह्मणजे

## पांचगणी

नांवाचें हवा खाण्याचें ठिकाण लागतें. येथून पुढें बारा मैलांवर महाबळेश्वराचें मुख्य हवा खाण्याचें ठिकाण आहे. पांचगणीची उंची महाबळेश्वराच्या उंचीपेक्षां सरासरी २०० फुटांनींच कमी आहे. यामुळें हवा पाण्यासंबंधानें हें प्रतिमहाबळेश्वरच आहे. महाबळेश्वरास झाडीमुळें व पश्चिम किनाऱ्याकडून अती पाऊस येतो, तशी पावसाची झोड पांचगणीस नसते. पांचगणी हें मोठें मैदान असून महाबळेश्वरापेक्षां थोडें सखल आहे. चारी बाजूंनीं डोंगर आहेत यामुळें वाऱ्याचा उपद्रव कमी आहे. व थंडीच्या दिवसांत कहारी थंडीही येथें पडत नाहीं. यामुळें येथें बाराही महिने वस्ती असते. येथें लायब्ररी, पोष्ट, हायस्कूल, दवाखाना, मार्केट यांची चांगली सोय आहे. व्यापारी रहदारी चांगली आहे. पांचगणीस सुरूंच्या झाडांची व जंगली लता पल्लवांची बरीच गर्दी आहे. पाण्याचाही चांगला पुरवठा आहे. बंगले बरेच आहेत. येथून पुढें महाबळेश्वर रस्त्याला मैल दीड मैल गेलें ह्मणजे साताऱ्याकडचा भाग, जावळीचें खोरें, साताऱचा अजिमतारा किल्ला, व यवतेश्वर डोंगर दिसूं लागतो. साताऱ्याहून महाबळेश्वरचा रस्ता याच खोऱ्यांतून आला आहे. येथून पुढें चढउतार घेत घेत रस्ता महाबळेश्वराचे शिखरावर गेला आहे. वाटेंत वेण्या नदीचें खोरें लागतें. तेथील बागायतीची शोभा

फार मजेची दिसते. ह्या वेण्या नदीला बांध घालून त्याचें एक सरोवर केलें आहे. व त्यावर पुष्कळ बागायती होत आहेत. येथें नाना प्रकारच्या भाज्या उत्पन्न होतात. मुख्यतः महाबळेश्वरी बटाटे फार प्रख्यात आहेत. इतर बटाट्यांपेक्षां हा मोठा रुचकर, तांबूस व पुष्कळ दिवस टिकणारा असतो. याशिवाय येथील मुख्य उत्पन्न स्ट्रॅाबेरी नांवाच्या विलायती फळांचें आहे. याचा येथें मोठा व्यापार चालतो. सदर्न मराठा रेल्वेची येथें कार्टिंग एजन्सी आहे. येथें त्यांचीं लहान लहान पार्सलें मुंबई, पुणें व हिंदुस्थानच्या इतर भागांत जेथें जेथें युरोपियन वस्ती आहे, तेथें तेथें जातात. या फळांचा आकार व स्वरूप आपल्या इकडील कुरडू नामक फुलासारखा किंवा बोरा एवढ्या अननसासारखा असतो व रुचीही अननसासारखीच असते. हें युरोपियन फळ असल्यामुळें याची महती युरोपियन लोकांत विशेष आहे. याचें पार्सल धाडलें असतां युरोपियन लोक आपला सन्मान केला असें समजतात. याला येथें गांवढळ लोक इष्टापुरी ह्मणतात ! याशिवाय या रानांत मध मिळतो. तोही फार चांगला आहे. महाबळेश्वरी मधाची प्रसिद्धी सर्वत्र आहे. याशिवाय येथें दुसरी महत्वाची वस्तु दिसत नाहीं.

महाबळेश्वर ही सह्याद्री पर्वताच्या शिखराची फार मोठ्या रुंदीची सपाटी आहे. इतकी शिखराची रुंदी सह्याद्रीचीं कोठेंही नाहीं. महाबळेश्वराची उंची ४५५८ फूट आहे. त्यापेक्षां सह्याद्रीचीं उंच शिखरें पुरंदर, ४५६४, तोरणा, ४५९९ व कळसूबाई ६४२७, फूट उंच आहे. पण त्यांच्या शेंड्यावर एवढें मोठें विस्तृत मैदान नसल्यामुळें व जाण्यायेण्याची गैरसोय असल्यामुळें तीं ठिकाणें हवा खाण्यास योग्य ठरलेलीं नाहींत. सह्याद्रीचें सर्वांत उंच शिखर कळसूबाई हें मात्र एक मैलापेक्षां उंच आहे. बाकी सर्व एक मैलाचे आंत आहेत. महाबळेश्वर येथेंही माथेरानप्रमाणें सर्वत्र झाडी आहे. पण ती फार मोठी ह्मणजे उंच व इमारती लाकडांची नाहीं. या ठिकाणीं थंड हवेशिवाय मला विशेष कांहीं दिसलें नाहीं. पाण्याची टंचाई आहे. महाबळेश्वराची उंची समुद्रसपाटीपासून सुमारें एक मैलभर आहे. येथें सर्वत्र झाडी असल्यामुळें खुली मैदानें कोठेंही दिसलीं नाहींत. तसेंच मोठमोठे पॅाइन्टही दिसले नाहींत. या पर्वताच्या पश्चिमेस प्रतापगड किल्ला व त्याचा डोंगर आड येत असल्यामुळें पश्चिमेकडील समुद्रप्रदेशाची शोभा पार गेली ! वस्तुतः खरी शोभा पश्चिमेकडीलच. कारण तिकडे अपरंपार खोल जमीन समुद्रापर्यंत पसरलेली दिसावयाची ती मुळींच

दिसत नाहीं. त्या ऐवजीं प्रतापगडचा डोंगर जिकडून तिकडून दिसतो. प्रतापगड किल्ला गव्हर्नरसाहेबांच्या बंगल्याजवळील मुंबई पॉइन्टवरून चांगला जवळ दिसतो. गव्हर्नर साहेबांच्या बंगल्याजवळूनच वरंध्या घाटाची सडक खालीं गेली आहे. या सडकेनें प्रतापगड दहा मैल आहे. पण ह्या पॉइन्टवरून तो केवळ अर्धा पाऊण मैल अंतरावर दिसतो. ज्याला सवड असेल त्यानें महाबळेश्वर याच बाजूनें उतरावा. ह्मणजे त्याला प्रतापगड ह्या ऐतिहासिक पुण्य भुमीचें दर्शन होऊन बाहारींचें सृष्टिसौंदर्य दिसेल. पुढें महाड दासगांवकडून मार्ग जरा गैरसोयीचा आहे. तरी ज्याला सवड असेल त्यांनीं रायगड पाहून जावें. रायगडाचें वर्णन मागें दिलेंच आहे.

या महाबळेश्वरापासून क्षेत्र महाबळेश्वरास जात असतांना डावे बाजूला ब्रह्मारण्यांतून आर्थर पॉइन्टकडे रस्ता जातो. एकंदर महाबळेश्वरावरून पाहण्यासारखीं तीन खोरीं आहेत. एक कृष्णेचें, वाईकडल्या बाजूला आहे. दुसरें वेण्येचें सातार्‍याकडच्या बाजूला आहे. आणि तिसरें सावित्रीचें कोंकणच्या बाजूला आहे. कृष्णेचें खोरें उथळ व पसरट आहे. वेण्येचें उथळच आहे. पण कमी पसरट आहे. सर्वांत उत्तम व पाहण्यासारखें सावित्रीचें आहे. पण सगळ्या महाबळेश्वरावर हा एकच सुंदर देखावा आहे आणि तोही मुख्य महाबळेश्वरापासून ह्मणजे हवा खाण्याच्या महाबळेश्वरापासून फारच लांब ह्मणजे दहा मैल असून क्षेत्र महाबळेश्वरापासूनच फार जवळ तरी तीन मैल आहे. यावरून सृष्टिशोभेचे खरे भोक्ते आमचे पूर्वजच ठरतात. महाबळेश्वराचे सर्व शोभेचे देखावे, ह्मणजे सावित्रीचें खोरें; ब्रह्मारण्य व कृष्णेचें खोरें हें सर्व, क्षेत्रमहाबळेश्वरापासूनच जवळ आहेत. सबब हवा खाणारांनीं सुद्धां क्षेत्र महाबळेश्वरास अवश्य जावें. तेथील कृष्णा नदीचा उगम व हीं स्थानें पाहून जसें त्याचें समाधान होईल व महाबळेश्वरास आल्याचें सार्थक होईल, तसें नव्या महाबळेश्वरानें होणार नाहीं. नव्या महाबळेश्वरास नहर ह्मणतात. महाबळेश्वरास मुंबईच्या गव्हर्नरसाहेबांचें उन्हाळीं वास्तव्य असल्यामुळें त्याला विशेष महत्व आहे. पण याशिवाय जुन्या महाबळेश्वरापेक्षां ह्या हवा खाण्याच्या सफरीस मी पसंत करीत नाहीं येथें उन्हाळ्यामध्यें उष्णता सरासरी पंचाहत्तर अंश असते. गव्हरनर साहेबांचा येथें संबंध असल्यामुळें येथील तारांचा जगांतील सर्व तारायंत्राशीं संबंध आहे. खुद्द गव्हरनरच्या बंगल्यांत पंचवीस तारा परभारें गेल्या आहेत. व शिवाय

तार ऑफिसांत पन्नासांपेक्षां जास्त तारायंत्राच्या व टेलिफोनच्या तारा आहेत. मोठमोठ्या बंगल्यांतही टेलिफोन घेतलें आहे. येथील पॉइन्टवर पाहण्याकरितां बाकें फारशीं ठेविलीं नसून अपघात होऊं नये ह्मणून फक्त कांहीं ठिकाणीं दग-डांचीं कुसें घातलीं आहेत. या महाबळेश्वरापासून

## क्षेत्रमहाबळेश्वर

येथें जाण्यास अगदीं पश्चिमेकडून रस्ता आहे. येथून हें सहा मैल उत्तरेस आहे. चांगली सडक आहे. सडकेवर मैल मांडलेले नाहींत. रस्ते फारसे फुटलेले नाहींत. तरी हा रहदारीचा रस्ता नाहीं. ह्मणून माहितगार मनुष्याशिवाय सहसा जाऊं नये. निदान संध्याकाळचें तरी निघूं नये. नाहींतर अपार जंगलांत कोणिकडे-तरी मनुष्य जावयाचा ! महाबळेश्वरापासून तीन मैलांवर एक पुढें आलेला डोंगर लागतो. तो उलटून गेल्यावर ह्मणजे चौथा मैल लागल्यावर श्रीमहाबळेश्वराचे देवालयाचें पांढरें शिखर दिसूं लागतें. मग त्या धोरणानें सडकेनें जावें, म्हणजे महाबळेश्वर लागतें. टांगा केला तर दीड दोन रुपये मागतात. नुसता मजूर केला तर तोही रुपाया मागतो. ह्या क्षेत्रमहाबळेश्वरास बाजार नहरचाच आहे. त्याशिवाय दुसरा नाहीं. सबब महाबळेश्वराचे लोक सकाळीं गाडी घेऊन येऊन संध्याकाळीं सामान घेऊन परत जातात. सबब आपण वाटेवर उभें राहून एखाद्या जाणाऱ्या येणाऱ्या बरोबर जावें. रस्ता चांगला आहे. भय काय तें ब्रम्हारण्याचें आहे. कारण पुढें तोच रस्ता ब्रम्हारण्याकडे जातो. जर मनुष्य चुकून तिकडे गेला आणि संध्याकाळ झाली तर मात्र पस्तावा होईल. कारण सूर्य अस्तानंतर ह्या अरण्यांत राहणें हें हल्लींच्या काळांतसुद्धां निर्भय नाहीं. इतकें येथें भयंकर जंगल आहे.

क्षेत्रमहाबळेश्वरास रमणीय ठिकाण कृष्णेच्या उगमाचें आहे. आजपर्यंत बऱ्याच नद्यांचे उगम मी पाहिले पण कृष्णेच्या उगमाचा जसा लोकांनीं सोहाळा केला आहे, तसा कोणत्याही नदीचा केला नाहीं. हिचे पर्वतावरून सात निर-निराळे झरे येत आहेत. हे गंगेप्रमाणेंच आहेत. ते सर्व निरनिराळ्या रस्त्यानें वाहून येऊन पुढें त्यांचें एकीकरण केलें आहे. खुद्द मूळ उगमावर पर्वतांत फारच मोठें देवालय बांधलें आहे. यांत पश्चिमेकडून सात प्रवाह घेतले आहेत. व त्यांचे एकीकरण करून गायमुख केलें आहे. त्यापुढें एकाखालीं एक दोन कुंडें करून

शेवटचा प्रवाह देवळाबाहेर काढला आहे. या कुंडांच्या दोन्ही बाजूस मोठमोठ्या पडव्या काढल्या आहेत, तेथें लोक पूजेला व तपश्चर्येला बसतात. देवळावरील भाग मोकळा ठेवून उजेड व उन्ह साधलें आहे, ह्यामुळें हा देखावा विशेष रमणीय दिसतो. हे साती प्रवाह एक करून त्यांचा गायमुखानें प्रवाह ज्या एका कुंडांत सोडतात, त्यास ब्रह्मकुंड ह्मणतात. यांत स्नान केल्याचें पुण्य विशेष आहे. पण उन्हाळीं मध्यान्हींसुद्धां हें पाणी बोट बुडवत नाहीं, इतकें गार असतें! सबब तांब्यानें कसेंतरी अंगावर घेतात किंवा मार्जन करितात. त्याखालीं दुसरें कुंड आहे, त्यांत कपडे धुण्याचें काम करितात. त्याचा प्रवाह पुढें त्र्यंबकेश्वरांतील गोदावरीप्रमाणें बांधून नेला आहे. हे सर्व प्रवाह उन्हाळ्यांत थोडे बहुत चालू असतात. पुढें कांहीं बंद होतात. एक किंवा दोन मोठ्या कष्टानें चालू असतात. उन्हाळीं गायमुखांतून धार फार तर दोन तीन आंगठ्याएवढी चालू असते व अगदीं अखेरीला करंगळीएवढी पडते; पण अजीबात बंद होत नाहीं. पावसाळीं सर्व झरे मोठ्या वेगानें वाहतात व सर्वत्र जलमय होतें. या सात प्रवाहांपैकीं, कृष्णा, वेण्या, कोयना, गायत्री आणि सावित्री यांचे पाणी बारा महिने कसें तरी वाहतें, असें ह्मणतात. मी पाहिलें तेव्हां तीनच प्रवाह वाहात होते, बाकी कोरडे होते. डावीकडील भागीरथीचा प्रवाह दर बारा वर्षांनीं ह्मणजे कन्यागतीं वाहूं लागतो व उजवेकडील सरस्वतीचा प्रवाह दर साठ वर्षांनीं कपिला षष्ठीचा योग येतो तेव्हां वाहतो, अशी पुराणप्रसिद्धी आहे. पण यांत बरीच कृत्रिमता दिसते. कन्यागत किंवा कपिलाषष्ठी अशा सृष्टिक्रमानें दिसूं लागली तर यापेक्षां पंचांगांना दुसरा पुरावाच नको होता! या दृश्य प्रवाहाचे भिंतीचे मागें दुसरी एक भिंत आहे. व तींतून हे प्रवाह येत आहेत. येथें जाण्याकरितां दीड फूट लांबी रुंदीचा एक कोनाडा आहे. त्यास दगडी दार आहे. तें बहुधा लागलेलें असतें. त्या कोनाड्यांतुन दिवा घेऊन आंत गेलें असतां मूळ प्रवाह दिसतात. आंत गेल्यावर अंधार गडप आहे. दिव्याशिवाय कांहीं दिसत नाहीं. तेथेंही असेच कोनाडे आहेत. त्या पलीकडे एक प्रवाह असून त्या प्रवाहाचे हे सात प्रवाह उत्पन्न केले असून जसा जसा काळ येईल त्याप्रमाणें हे प्रवाह पुजारी लोक सुरू करीत असावेत असें वाटतें! वस्तुतः हा फक्त कृष्णेचाच उगम आहे. मागें सांगितलेल्या दुसऱ्या नद्यांचे उगम अगदीं भिन्न भिन्न ठिकाणीं आहेत.

परंतु सर्व तीर्थांमध्यें परम तीर्थ कृष्णाबाईचें ह्मणून सर्व तीर्थें यांत आलीं आहेत, अशी भाविकांची भावना होण्याकरितां हा देखावा तयार केला असावा असें दिसतें.

खुद्द महाबळेश्वराचें देवालय खालीं अगदीं निराळें आहे. याचें लिंग ह्मणजे एक चार हात व्यासाचा वाटोळा ओबडधोबड खडक सरासरी एक वीतभर उंच आला आहे. व त्यांत पांच सात वाटीएवढ्या आकाराचे त्या खडकांत खळगे आहेत. त्यांतून नेहमीं पाण्याचा प्रवाह वाहात असल्यामुळें हें लिंग नेहमीं पाण्यानें डबडबलेलें असतें. ह्या वाट्या ह्याच कृष्णा, वेण्या, कोयना, गोदावरी, भागीरथी यांचे उगम. ह्या शंकराच्या ह्या जटेपासून उत्पन्न झाल्या आहेत. कोणी ह्मणतात सर्व महाबळेश्वराचा डोंगर हा शिवरूप असून त्यांच्या जटेपासून ह्मणजे या ठिकाणापासून त्या सर्व नद्यांचा उगम झालेला आहे. आणि हेंच ह्मणणें जरा सयुक्तिक दिसतें. कारण ह्या पर्वताचे पूर्व बाजूस कृष्णा, वेण्या यांचा उगम असून पश्चिम बाजूनें कोयना, सरस्वती व सावित्री यांचा आहे. आणि सर्वांचा उगम एकाच ब्रह्मारण्यापासून जवळजवळ ह्मणजे ह्या तीन स्थानापासून आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. ब्रह्मारण्य हेंच ह्या शिवाच्या जटा आहेत व ह्या शिवाच्या जटेपासूनच ह्या निघाल्या आहेत, असें ह्मणण्यास काय हरकत आहे? आणि विराट रूपाच्या दृष्टीनें हें ठीक आहे. त्र्यंबकेश्वराचा जसा ब्रह्मगिरी तसाच हा महाबळेश्वर. ह्मणजे महाबळेश्वराचें देऊळ हें शंकराचें मुख. ब्रह्मारण्य ह्या जटा व त्यापासून या नद्यांची उत्पत्ति झाली. या प्रवाहांच्यामुळें मात्र महाबळेश्वराच्या विहिरींना मुबलक पाणी असतें. इतक्या उंचीवर इतकें मुबलक पाणी हा सृष्टिशोभेचा मोठा चमत्कार आहे. हा लोकांनीं पाहण्यास यावें व येथें कांहीं दिवस राहून सर्व डोंगर सकाळ संध्याकाळ हिंडून या आरोग्यदायी हवेचा परिणाम आपल्या शरिरावर व मनावर करवून घ्यावा ह्मणूनच येथें देवस्थानाची योजना झाली असावी.

जवळच प्रतापगडचा डोंगर आहे. येथील हवाही अशीच अप्रतिम आहे. तेथेंही पाण्याची सोय आहे. ह्मणूनच शिवरायानें या प्रांताचें हेंच ठिकाण मुख्य केलें. जुने लोक डोंगर चढून डोंगरी पाणी पिऊन व अशी सकस हवा खाऊन तेजस्वी बनले. डोंगर चढल्यानें श्वासोश्वास जोरानें चालतो व त्यावेळीं फुफ्फुसांत अशी स्वच्छ व जोमदार हवा गेल्यानें सर्व लोक तेजस्वी जन्मले, व सर्वांचें

वीजेच तेजस्वी झाले. आतां हल्लीं लोक हवा खाण्यास जातात. ते पायीं न जातां माळ्यांतून जातात, यामुळें पैसा खर्च करून हवेचा जसा शरिरावर परिणाम झाला पाहिजे, तसा होत नाहीं. तेंच युरोपियनांकडे पाहिलें तर ते टांग्यांतून न जातां पायीं जातात. निदान घोड्यावर बसून तरी जातात व आपली ताकद वाढवितात. आणि आमचा असा हा पोषाखीपणा असतो. बुडत्याचा पाय खोलांत ह्मणतात तो हाच. ह्मणजे पाश्चात्यांचे गुण घेण्याऐवजीं आपण दोषच घेतों. जित जेत्यांचे अवगुण घेऊन ह्मणजे बाह्य स्वरूपाचें अनुकरण करून आपलें जितत्व कायम राखण्याचा प्रयत्न करितात, त्यापेक्षां स्वत्व राखिलें तरच त्यांची उन्नति होण्याचा संभव आहे हें त्यांनीं लक्षांत ठेवावें. त्यांचें अनुकरण करून तसे बनण्यांत स्वत्व कोठें राहिलें ?

या प्रवासांत ब्रह्मारण्याची शोभा विशेष आहे. हें अरण्य ह्मणजे हिंस्र पशूंचें, जंगल आहे. आणि तें थोडें थोडकें नाहीं तर तीन मैल लांबीचें आहे. आंतून जाण्यास पायवाटेशिवाय रस्ता नाहीं. जंगल मोठें व भयंकर असल्यामुळें हिंस्र पशूंकडून दगा होण्याचा संभव आहे, सबब यामधून सडक नेलेली नाहीं. ह्या बाहेरून डोंगराचे कांठाकाठांनीं ती नेलेली आहे. पण ज्यांना ह्या अरण्याची खरी शोभा किंवा देखावा पाहणें असेल, त्यानीं येथील एक माहितगार गडी करून सूर्योदय झाल्यावर निघावें. ह्मणजे हिंस्रक पशूंपासून अपाय न होतां भयाण व शून्य जंगलाचा भयंकर देखावा दिसेल! यात्रेकरूंनीं तरी या अरण्यांतून मुद्दाम जावें व आपलीं नजर धाडशी करावी, ह्मणून त्यांत ब्रह्मदेवानें यज्ञ केल्याचें ठिकाणाची योजना केली आहे. या यज्ञांतील भस्म सर्वांनीं न्यावें. म्हणजे एकदां तरी येथें जावें व त्या पुण्य भूमीचें दर्शन घ्यावें, असा स्पष्ट अर्थ दिसतो. मला या ठिकाणांतून जातांना वाघ, सिंह, वगैरे हिंस्र पशू प्रत्यक्ष दिसले नाहींत. तरी ते असले पाहिजेत ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. याचें वर्णन पुढें आहे. ह्यांतून जातांना ठिकठिकाणीं गुहा, तपश्चर्येचीं व यज्ञाचीं ठिकाणें लागतात. हल्लीं यांत कोणी राहात नाहीं. पण पूर्वींचे तपस्वी हे हिंस्र पशूंचे मित्रच झाले असले पाहिजेत आणि ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. यःकश्चित माकडें किंवा वानर पांढर-पेशाचे वाटेस जसे जातील तसे कोळ्यांचे आणि त्यांत ज्यांचेजवळ तिरकमठा असेल त्यांच्याकडे बघणारसुद्धां नाहींत. तोच प्रकार येथें. हा संगतीचा किंवा परिचयाचा परिणाम आहे. लोकांची नजर एकदां मेली, म्हणजे झालें. या कामीं

त्यांची तपश्चर्या नाहीं, असें नव्हे; ती तर मुख्य आहे. आणि त्या तपश्चर्येनेंच हिंस्र पशू आपल्या शत्रूंशीसुद्धां त्यांच्या आश्रमांत गुण्यागोविंदानें राहिले आहेत अशीं वर्णनें आहेत. तपश्चर्येनें सर्वभूतीं समभाव झाल्यावर त्यांना शत्रू कोणता राहिला !

ह्या जंगलांत झाडें फार मोठीं व उंच आहेत असें नाहीं. सर्व जंगल खुरटें आहे पण अतीशय दाट आहे, व तें अविच्छिन्न अगदीं जसेंच्या तसेंच राखिलें आहे. यामुळें भर दुपारींसुद्धां येथें उन्ह लागत नाहीं. या जंगलांतून मनुष्याची वरदळ फारशी नसते. यामुळें हिंस्र जनावरें आपलें भक्ष्य मिळविण्यासाठीं दिवससुद्धां बाहेर जातांना कधीं कधीं दृष्टीस पडतात. व त्यांस मारण्याकरितां शिकारी लोक उंच उंच वृक्षावर माळे बांधून व हिंस्र पशूंनीं शिकारीस भूलून जरूर यावें म्हणून झाडास एक दोन दिवस रेडा किंवा बकरें बांधून ठेवतात. त्यांचा त्यांनीं फन्ना उडविल्यास पुन्हां असेंच बांधतात व त्यांना दिवसा बाहेर निघण्याची सवय करितात, व संधी साधून त्यांचा वध करितात. ह्या जंगलांत अशा मारलेल्या जनावरांचे अर्धे सांगाडे, झाडें व त्यांजवळच व्याघ्रादि श्वापदांचीं पावलें व त्यांनीं केलेला मूत्र पुरीषोत्सर्जनविधी इत्यादि भयंकर देखावा पाहण्यास मिळतो. व अशा हिंस्र प्राण्यांची व आपली भेट झाली तर काय परिणाम होईल असें वाटून मन जरा गोंधळून जातें ! या सबबानें वाटाड्याला प्रश्न विचारिल्यास तो म्हणतो आम्हाला हा नित्य परिचय आहे. पण आम्ही जवळ असतां असे हिंस्र पशू तुमच्या नादीं लागणार नाहींत. अशा जनावरास भाविक लोक हे पशू शंकराचे परिचारक आहेत, हे दृष्टीस पडणें हा श्रीशंकराचाच प्रसाद आहे असें समजतात व मनोभावें त्यास नमस्कार करितात ! या जंगलांतून पुष्कळ लोक गेले आहेत. पण अद्याप कोणास अपघात झालेला नाहीं तेव्हां ही परमेश्वराचीच करणी आहे, यांत शंका नाहीं. या जंगलच्या पलीकडे रस्ता आर्थर–सीटकडे म्हणजे सावित्रीच्या प्रसिद्ध खोऱ्याकडे वळतो.

हा देखावा मात्र पाहाण्यासारखा भयंकर आहे. हा भिमाशंकराच्या नागफडीप्रमाणें एक मैल एकदम खोल असून पलीकडे अती विस्तृत मैदान आहे. इतकी खोल दरी व तुटलेला कड सह्याद्रींत दुसरा नाहीं. ऑर्थर सीटच्या

टोकावर नीट विचार करून व तोल संभाळून जावें. सकाळ संध्याकाळ या टोकावर वारा सुटतो. पायांखालची जमीन भुसभुशीत असून म्युनिसिपालटीनें येथे बंदोबस्त केलेला नाहीं. खालीं जमिनीचा चित्रविचित्र रंगाच्या सोंगट्यांचा पट असून त्यावर कांहीं घरांत लहान मोठे, तांबडे, पिवळे, काळे, हिरवे असे डोंगर आहेत. तांबडी माती असलेले तांबूस दिसतात, वाळलेले गवत असलेले पिवळे दिसतात, वणवा लागून डोंगर जळल्यास काळा दिसतो, व जंगल असलेले हिरवे दिसतात. याच खोऱ्यांतून सावित्री नदी उत्पन्न झाली आहे. त्या नदीचें पात्र जलशुष्कच दिसतें. पण तिची वाकडी तिकडी गती व तिच्या कांठचीं गांवें मनुष्याचें चित्त आकर्षण करतात. एकंदर देखावा पाहाण्यासारखा आहे. पण अशीं वर्णनें मागील भागांत बरींच आल्यामुळें येथें जागा आडवीत नाहीं. महाबळेश्वराचें पार्वतीबरोबर खेळण्याचें हें क्रीडांगण आहे. हा पार्वतीला गंगेच्या ऐवजीं येथें श्रीसावित्री वाकड्यातिकड्या गतीनें खेळांतील डावपेंच सुचवून श्रीभोळ्या शंकराला फसवीत आहेत. !

येथें महागाईचें मान भयंकर आहे. ह्मणजे येथील सर्व सामान नहराहून ह्मणजे हवा खाण्याच्या महाबळेश्वराहून आणावें लागत असल्यामुळें महाबळेश्वरापेक्षां येथें फार महाग विकावें लागतें. रोजच्या साध्या जेवणास महाबळेश्वरास एक वेळचे आठ आणे घेतात, तर येथें बारा आणे घेतात. आणि ते यात्रेकरूपासून घेतातच. सबब देव ब्राह्मण करणारांनीं आपली शक्ति पाहून नीट चौकशी करून खर्च करावा. भलत्याच नादीं लागूं नये. हवा खाण्याच्या महाबळेश्वरास एक ब्राह्मणाची खाणावळ आहे व जवळ राममंदीर आहे, तेथें राहाण्यास जागा मिळते. क्षेत्र महाबळेश्वरास पंड्यांकडून सर्व व्यवस्था होते.

हें क्षेत्र महाबळेश्वर असल्यामुळें याचें थोडेसें पौराणिक महात्म्य सांगतों. या महात्म्याचा उद्देश यात्रेकरूंनीं येथें येऊन भाविकपणानें दर्शन घ्यावें हाच आहे. याशिवाय हल्लींचीं इंग्रजी वर्णनें व हीं सारखींच. धार्मिक गोष्टी सांगून भाविकांची श्रद्धा बसावी हाच त्या वर्णनांचा उद्देश आहे.

## पौराणिक माहिती

ब्रह्मा, विष्णु, महेश यांनीं अनादिकाळीं ह्या सह्याद्रि शिखरावर येऊन मानवी सृष्टि उत्पन्न करण्याकरितां मोठी तपश्चर्या केली. नंतर विश्व निर्माण

आले. हें वर्णन ठिकठिकाणांप्रमाणेंच आहे. याचा अर्थ येथें प्राणी व मनुष्ये
यांची वस्ती प्रयत्नानें करविली असा दिसतो. तपःसांगतेकरितां ब्रह्मदेवानें
येथें ब्रह्मारण्यांत यज्ञ केला. पुण्याहवाचनाच्यावेळीं ब्रह्मदेवाची मोठी स्त्री
सावित्री वेळेवर आली नाहीं. ती नट्टापट्टा करण्यांत गुंग झाली होती. मुहूर्त
जाऊं लागला म्हणून ब्रह्मदेवानें आपली दुसरी पत्नी गायत्री हिच्या सान्निध्यानें
यज्ञ करण्यास सुरवात केली, इतक्यांत सावित्री नटून थटून आली. पण तिच्या-
वाचून यज्ञास आरंभ झाला आहे असें तिनें पाहून तिची निराशा झाली.
तेव्हां तिनें जमलेल्या सर्व देवांस व विशेषतः पुढारी अशा हरिहरांस तुम्ही
यापुढें येथून जलरूपानें संचार कराल असा शाप दिला. यामुळें विष्णु, कृष्णा
नदी झाले, शिव वेण्या नदी व ब्रह्मा ककुत्मती म्हणजे कोयना नदी झाले. सर्व
देवांनींही सावित्रीला: तूंही जलरूप होऊन अधोगतीला जाशील असा शाप
दिला. तेव्हां सावित्री तेथून कड्यावरून उडी टाकून जलरूपानें कोंकणांत वाहात
जाऊन समुद्रास मिळाली. हिच्या कांठीं समुद्रापर्यंत बारा शिवलिंगें आहेत.
त्यांपैकीं शेवटलें समुद्राजवळील श्रीहरिहरेश्वराचें क्षेत्र फार प्रसिद्ध आहे. या
ठिकाणीं ह्या यज्ञाची समाप्ति झाली म्हणून येथें शुक्रतीर्थांत सर्वांनीं अवभृत
स्नान करून यज्ञाची सांगता केली. म्हणजे यांचे दर्शनास हा डोंगर प्रताप-
गडाच्या रस्त्यानें उतरावा लागतो. या योगानें ही सृष्टिशोभा विशेष दिसावी
हाच त्याचा हेतु दिसतो. हा यज्ञ राक्षसशाही घालवून मनुष्य वस्तीकरितां
चाललेला आहे असें येथील स्थानिक दैत्य महाबळ व अतीबळ यांस समज-
तांच त्यांनीं यास विघ्न केलें. परंतु विष्णूंनीं अतिबळाचा नाश केला. महाब-
ळाचा पराभव होईना, सबब आदिमायेस प्रसन्न करून त्यास हतवीर्य केलें.
नंतर त्यास मुक्ति दिली व राक्षसशाहीचें येथून उच्चाटण करून हा प्रांत
म्हणजे कृष्णाकांठ सर्व मानवांच्या म्हणजे आर्यांच्या वस्तीस खुला करून दिला.
महाबळानें व अतिबळानें शेवटीं त्रिगुणात्मक देवाची—आदिमायेची व शंकराची
स्तुति केली, तेव्हां त्यांनीं त्यांचे इच्छेप्रमाणें त्यांस वर दिला. तो वर असा कीं,
माझें नांव आपण घेऊन येथें वास करावा म्हणजे ही भूमि मूळची माझी आहे
असें माझें नांव अजरामर राहील. तेव्हां शंकर महाबळेश्वर व अतिबळेश्वर असें
नांव घेऊन त्या लिंगामध्यें प्रविष्ट झाले.
त्यांचीं दोन्ही जुनीं देवळें येथें आहेत तीं पहावीं. आपलें नांव अजरामर

राहावें अशी प्राचीन काळापासून सर्वत्रांची इच्छा दिसते. येथील कृष्णा, वेण्या व कोयना ह्या अनुक्रमें विष्णु, शिव व ब्रह्मदेव या स्वरूपी सावित्रीच्या शापामुळें झाल्या आहेत. यांपैकीं विष्णूरूपी कृष्णा व शिवरूपी वेण्या यांचा संगम श्रीक्षेत्र माहुली येथें झाला आहे. व याच नद्यांचा पुढें कऱ्हाड क्षेत्रीं ब्रह्मदेवरूपी कोयना नदीचा प्रीतिसंगम झाला आहे. हरिहर एक रूप झाले व मला वेगळा टाकला कीं काय ? असा ब्रह्मदेवास संशय आला. परंतु अखेर हरिहररूपी झालेली ही कृष्णा, कोयनेला ह्मणजे ब्रह्मदेवाला भेटायला आली, तेव्हां ब्रह्मदेवाला अत्यानंद झाला. कृष्णा कोयनांचा संगम अत्यंत प्रेमानें झाला आहे. ह्मणजे ह्या नद्या अगदीं समोरासमोर येऊन कडकडून भेटतात. त्यामुळें या ठिकाणीं यांचे पाणी फार मोठ्यानें उसळतें. यास प्रीतिसंगम ह्मणतात. असा संगम क्वचित दृष्टीस पडतो. याचें वर्णन कऱ्हाड क्षेत्रीं आलें आहेच. सावित्रीच्या शापाबद्दल देवांनीं उःशाप मागितला तेव्हां तिनें उःशाप दिला कीं, श्रीविष्णूला म्हणजे कृष्णा नदीला इतर नद्या मिळाल्या म्हणजे सर्वजण मुक्त होतील. त्याप्रमाणें त्या मिळून देव मूळ स्वरूपाप्रत गेले. पुढें सावित्री मुक्त होणें राहिली होती तिच्याकरितां तिच्या मुखाजवळ हरिहर देव पर्वतात्मकरूपानें जाऊन त्यांनीं तिचाही उद्धार केला. अशा रीतीनें या भांडणाचा शेवट गोड झाला ! अलीकडील भौगोलिक वर्णनापेक्षां हें वर्णन धार्मिक गोष्टींमुळें गोड लागतें व स्मरणांत राहतें हाच पुराणांचा उद्देश आहे. हें शिक्षण हलीपेक्षां सुद्धां कितीतरी उत्तम आहे ! स्वराज्य असतें तर भूगोल हा विषय असा धार्मिक रीतीनें शिकविला गेला असता. कदाचित् अशींच पुस्तकें इयत्तेच्या शिक्षणक्रमांत चालू केलीं गेलीं असतीं. कारण यानें धर्म, राजकारण, व्यवहार व भूगोल यांचे स्वाभाविक ज्ञान होतें. आतां राष्ट्रीय शाळांनीं हा क्रम घ्यावा.

ह्या वर्णनावरून हें क्षेत्र आर्यांनीं वस्तीस योग्य केलें व भागीरथी, गोदावरी, यांप्रमाणें या कृष्णेचाही उगम मानवी कर्तृत्वापैकींच आहे असें स्पष्ट दिसतें. कृष्णा महात्म्यामध्यें ह्या सर्व संगमांचीं सुरस वर्णनें आहेत तीं वाचून यात्रेकरूंनीं आपला भाविकपणा वाढवावा व मन पवित्र करावें. यानंतर मी

## जेजुरी

येथें गेलों. हें गांव स्टेशनपासून जवळच आहे. गांवाशेजारीं टेकडीवर मार्तंड

मल्हारीचें मोठें देवालय आहे. गांवापासून टेकडीवर जाण्यास चांगल्या प्रशस्त पायऱ्या आहेत. टेकडी फार उंच नाहीं. टेकडीवर गेलें म्हणचे देवालय लागतें. देवळाच्या गाभाऱ्यांत शके १३०७ मध्यें लिहिलेला शिलालेख आहे. हें होळकर घराण्याचें कुलदैवत आहे मल्हारराव होळकरानें ह्या देवळाचा तट बांधिला. यांत गाभारा मोठा प्रशस्त आहे. त्यांत शंकराची पिंडी व पुढें फार मोठें कासव असून, पिंडी व कासव दोन्ही पितळेच्या पत्र्यानें मढाविलेलीं आहेत. शिवलिंगाचे मागें म्हाळसाकांताची मूर्ति आहे; यालाच खंडोबा असें म्हणतात हा शंकराचा अवतार आहे. या बाजूला घाटावर मणिमल्लारी असुरांची वस्ती होती. व त्यांपासून आर्यांना फार त्रास होऊं लागला होता म्हणून त्यांनीं शंकराची प्रार्थना केल्यावरून शंकर पार्वतीनें मल्लारीम्हाळसारूपानें अवतार घेऊन घोड्यावर बसून त्यांनीं त्यांचें निर्मूलन करून आर्यांच्या वस्तीस जागा खुली करून दिली. या उपकाराबद्दल या प्रांताचे ब्राम्हण ( देशस्थ ) सुद्धां कृतज्ञपणें या देवाचे आभारी आहेत. बहुतेक देशस्थांचें हें कुलदैवत आहे. कोंकण परशुरामानें खुलं करून दिलें, म्हणून सर्व कोंकणस्थांचे दैवत परशुराम व सर्व देश खंडोबानें खुला करून दिला म्हणून सर्व देशस्थांचे कुलदैवत खंडोबा झालें आहे. खंडोबानें दैत्यांना मारिलें, म्हणजे विशिष्ट माणसांशींच झगडा दिला. पण परशुरामानें सृष्टीशीं झगडा देऊन समुद्र मागें फिरविला. अशा प्रकारें दोन्हीं जाती आपआपल्या कुलदेवतासंबंधानें पूर्ण अभिमानी आहेत. पण देवासंबंधी हा त्यांचा अभिमान व्यर्थ आहे. कोंकणस्थांपेक्षां देशस्थांचे देवतोत्सव जास्त प्रमाणांत आहेत. लग्न कारण झालें असतां कोंकणस्थांत देवीचें बोढण भरतात व देशस्थांत गोंधळ घालतात. शिवाय वार्षिक नैवेद्य हीं असतातच. खंडोबाचे पौष व चैत्र महिन्यांत मोठे उत्सव होतात. त्यांनिमित्य येथें मोठी यात्रा जमते. शिवाय नवीन लग्नसमारंभ झाल्यानंतर पुष्कळ देशस्थांत ओहरयात्रा करण्याचा संप्रदाय आहे. ओहरयात्रा म्हणजे नव्या नवरा नवरीला देवाला भेटवून त्यांकडून त्याची पूजा करावयाची असते मल्हारीनें घोड्यावर बसून विजय संपादन केला त्या घोड्याचें स्मारक एक घोडा देवळामध्यें आहे. त्याचेंही दर्शन व स्पर्श यात्रेकरू भक्तिभावानें घेतात. या देवळापासून दीड मैलावर कडेपठार नांवाचें गिरीशिखर असून त्या ठिकाणीं म्हाळसाकांताचें मुख्य ठिकाण आहे. हे शिखर चढण्यास थोडें अवघड

आहे. अशी आख्यायिका सांगतात कीं, देवाची वारी करणाऱ्या एका भक्ताच्या भक्तीसाठीं या मूळ ठिकाणचें दैवत खालीं आलें. ह्या देवस्थानाचे खर्चास बरेंच उत्पन्न आहे व यात्रेकरूंकडूनही बरेंच होतें. या सर्वांची व्यवस्था पंचमार्फत चालते. गांवच्या पश्चिमेस मोठा तलाव आहे. त्याचें पाणी गांवांत पिण्यास आणतात.

गोंवें प्रांतांत जसा नायकिणींचा बाजार आहे, त्याचसारखा येथें ब्राह्मणेतरांत वाघ्या मुरळ्यांचा आहे. वाघ्या मुरळ्या ह्मणजे देवाला वाहिलेलीं स्त्री-पुरुषें! इकडे असा नवस करण्याची चाल आहे कीं, देवा माझें अमुक एक कार्य होऊं दे किंवा मूल होऊं दे, मी आपला मुलगा किंवा मुलगी तुला वाहीन. याचा अर्थ हा आपमतलबीपणा कीं आपल्या सुखाकरितां त्या मुलांच्या संसाराचें वाटोळें करावयाचें !! कारण अशा वाहिलेल्या स्त्री–पुरुषांनीं लग्न करितां कामा नये, संसारी होतां कामा नये. त्यानें देवाच्या भजनपूजनांत यांच्याकरितां सर्व आयुष्य घालविलें पाहिजे. पण मनांत इच्छा नसतां देवाच्या भक्तीची सक्ति कां? शिवाय ही सक्ति सृष्टिनियमाच्या व मनाच्या विरुद्ध असल्यामुळें तिचा कांहींही उपयोग होत नाहीं. व त्याचें पर्यवसान व्यभिचारांत होतें! एकदां मुरळी ह्मणून ठरली ह्मणजे तिची इच्छा लग्न करण्याची असली तरी तिच्याशीं लग्न करणें, ह्मणजे मोठें पाप आहे. कारण ती देवीची बायको झाली! देव तिचा नवरा. मग देवाची बायको आपण कशी करावी! पण लग्न न करण्यापेक्षां पूर्णपणें अव्याहत व्यभिचार होणें तरी बरें का? पण हा लौकिकाचार पडला. मुंबई सरकारनें याबद्दल कायदाही केला आहे कीं, यापुढें देवाला अशी मुलें वाहून वाघ्यामुरळ्या करूं नये. पण लोकांची प्रवृत्ति पडली ती एकदम बंद कशी होणार? वस्त्राआड जग नागवेंच आहे, पण त्याचा असा परिपाठ होणें योग्य नाहीं. या स्त्रीपुरुषांचा उदरनिर्वाह यात्रेकरूंपासून भिक्षा घेऊन चालतो. व यात्रेकरूही सरळ व सढळ हातानें त्यांना मदत करतात साधूप्रमाणें व्याघ्रचर्म धारण करणारे ह्मणून यांस वाघ्या ह्मणण्याचा सांप्रदाय पडला. या यात्रेसंबंधानें सर्व धार्मिक कृत्यें उपाध्यामार्फत होतात. येथूनच पांच कोसांवर अष्ट विनायकांपैकीं मुख्य गणनायक व गजमुख, या मुख्य गणपतीचें स्थान आहे. देऊळ उंचवट्यावर आहे. वर जाण्यास चांगल्या पायऱ्या आहेत. जेजुरीपासून सडक नाहीं. आतां झाली आहे असें ह्मणतात, पायऱ्यांशीं आरंभीं उंदीर आहे व पुढें नंदी

आहे. या नंदीची हकीगत अशीः—येथून पांच कोसांवर असलेल्या भुलेश्वर शंकरापुढें स्थापण्यासाठीं हा नंदी घेऊन जात होते. परंतु येथें येतांच मला या ठिकाणीं मोरेश्वरापुढेंच बसवा असें त्या नंदीनें स्वप्नांत सांगितल्यावरून त्याची येथें स्थापना केली आहे. गांवांत ब्राह्मण वस्ती आहे. वाघांचे घराणें प्रसिद्ध आहे. गांवांत अन्नछत्र आहे. या प्रसिद्ध गणपतीवरून या गांवालासुद्धां

## मोरेश्वर ऊर्फ मोरगांव

ह्मणतात. गांवाजवळ जातांना कऱ्हा नदी लागते. देऊळ मठ प्रशस्त असून दर महिन्याच्या चतुर्थीचे ह्मणजे संकष्टीचे व विनायकीचे उत्साह मोठ्या प्रमाणांत होतात. दोन्ही चतुर्थ्यांचे उत्साह बहुतेक सर्व अष्टविनायकांचे ठिकाणीं होतात.

या देवाची पौराणिक कथा अशी आहेः—ब्रह्मदेवाला सिद्धी देण्याकरितां गणपतीनें ह्या मयूर क्षेत्रांत मयुरेश्वर अवतार घेतला. कमलासूर दैत्याशीं युद्ध करून ब्रह्मकमंडलू नदीच्या तीरीं गणपतीनीं विश्रांति घेतली. व गणेश भक्तांना तारण्याकरितां कमंडलू नदीमध्यें ह्मणजे कऱ्हा नदीमध्यें गणेश तीर्थाची स्थापना केली. या कमंडलू ऊर्फ कऱ्हा नदीची उत्पत्ति अशीः—कमलासूर दैत्याला त्याच्या इच्छेप्रमाणें स्वानंद मुक्ति दिल्यावर सर्व देवांनीं ब्रह्मदेवाला पुढें करून श्रीगणेशाचें अर्चन केलें. त्यासमयीं सर्व देवांनीं आपआपल्यापरी आनंदानें आणलेलीं अनंत तीर्थें ब्रह्मदेवानें आपल्या कमंडलूंत घातलीं. व पूजेकरितां बसले असतां श्रींचा पाय कमंडलूला लागून तो सांडला तेव्हां ब्रह्मदेव तो भरूं लागले. तेव्हां देवानें सांगितलें कीं, हें महातीर्थ जगत् उद्धाराकरितां असेंच वाहूं दे. आजपासून इजला करजा ऊर्फ कऱ्हानदी ह्मणतील ( करजा पापनाशिनी अशी प्रसिद्धी आहे ). ह्या कऱ्हा नदींत पाणी क्वचित असतें. याठिकाणीं गणपतीला आवडणारा रुईमांदार मिळतो. गणपतीचें वाहन मोर कसें झालें व मयूरेश्वर नांव कसें झालें त्याची हकीगत अशी.

पार्वतीनीं तप केल्यावरून विनायकानें तिचा पुत्र होण्याचें कबूल केलें व तो गुणेश या नांवानें तिचा मुलगा झाला. कश्यप ऋषींच्या बायका कद्रू आणि विनता यांचें भांडण झालें. त्यामुळें कद्रूचे मुलगे काद्रव ह्मणजे सर्प यांनीं गरूडादिक विनतेच्या पुत्रांना बंदींत घातलें, तेव्हां विनता रडूं लागली. कश्यप मुनि ह्मणाले तूं रडूं नको. तुला आणखी एक मुलगा होईल व तो गरूडादिकांना मुक्त

करील. नंतर विनता एक विशाल अंडें प्रसवली. तो तें फार जपून बाळगीत असे. आठ वर्षांचा गुणेश खेळत हिंडत होता. त्यानें तें अंडें फोडलें. त्यांतून महाबलिष्ट मोर निघाला व गुणेशाशीं लढूं लागला. गुणेशानीं त्याचा पराभव केला, इतक्यांत विनता तेथें आली. तिनें झालेला प्रकार पाहिला, व म्हणाली कश्यप मुनीनें मला सांगितलें होतें कीं, जो हें अंडें फोडील त्याचा हा मुलगा सेवक होईल. गुणेश म्हणाला बरें. गुणेश मोराला म्हणाला, तुझा पराक्रम पाहून मी खुष झालों, तूं वर माग. मोर म्हणाला, तुझ्या नांवाआधीं माझें नांव येईल असें तूं नांव धारण कर. तेव्हां गुणेशानें मयुरेश हें नांव घेतलें, अशी मयुरेश्वराची आख्यायिका आहे. मोरानें सर्पांचा पराभव करून विनतेचे गरूड वगैरे मुलगे मुक्त केले.

त्याचवेळीं कमलासूर नांवाचा दैत्य फार बलिष्ट होऊन त्यानें गोत्राह्मणांना अतोनात उपद्रव दिला. श्रीशंकरांची आज्ञा घेऊन मयुरेशानें कमलासुरावर चाल केली, परन्तु कमलासुर पराभूत होईना. इतकेंच नव्हें, तर त्याच्या रक्ताच्या थेंबा-गणिक नवीन कमलासूर उत्पन्न होऊं लागले, तेव्हां मयुरेश्वर चिंतेंत पडले. अशा समयीं सिद्धी बुद्धी त्यांच्यापुढें आल्या व म्हणाल्या आम्ही तुझ्या बाजूनें लढतों, परंतु आधीं आम्हाला कांहीं खावयाला दे. बुद्धिवान गणेश म्हणाला रक्तापासून उत्पन्न होणारे कमलासूर खा. त्यांनीं तसें केलें. त्याबरोबर मोरेश्वराला कमला-सूर ताबडतोब मारतां आला. भीमा नदीचे दाक्षिणेस व कृष्णा नदीच्या उत्तरेस हल्लीं जेथें मोरगांव ठिकाण आहे, तेथें कमलासूर पडला. तेव्हां सर्व देवांना व ऋषींना आनंद होऊन ते मोरेश्वराला म्हणाले, आतां तूं याच ठिकाणीं कायम रहा व भक्तांचीं संकटें अशींच दूर कर. मोरेश्वरांनीं तथास्तु म्हणून आपण येथें राहिले. त्याला प्रथम मयुरेशपुर नांव होतें. त्याचाच हल्लीं मोरगांव हा अपभ्रंश झाला आहे. अशी येथील स्थानाची उत्पत्ति आहे. येथें माघी व श्रावणी चतु-र्थीला गणेशभक्तांचे मोठे मेळे जमतात व थाटाचा उत्साह होतो.

माहुरास आईची क्रिया दत्तांनीं सांगितल्याप्रमाणें केल्यावर याच मोरेश्वर क्षेत्रांत त्यांनीं सांगितल्यावरून श्रीपरशुरामानें क्षत्रियवधार्थ आपणांस यश यावें, मातापितरांचे मनोरथ पूर्ण करण्याचें सामर्थ्य यावें म्हणून या ठिकाणीं मोरेश्वराची स्थापना करून आराधना केली. तेव्हां मोरेश्वर प्रसन्न होऊन त्यांनीं आपल्या

हातांतील अस्त्र ह्मणजे परशू त्याला देऊन, यांनीं तूं अजिंक्य होशील. याबर कोणाचेंही शस्त्र चालणार नाहीं, असा आशीर्वाद दिला व ते गुप्त झाले. त्याचें स्मारक ह्मणून ही मूर्ती परशुरामानें येथें स्वहस्तें स्थापन केली. यामुळें परशुराम अवतारी झाले. येथील देवकृत्यें पंड्यामार्फत ( पुजाऱ्यामार्फत ) होतात. यानंतर पुण्यास येण्यापूर्वी भाटघरचें धरण अवश्य पहावें. हें भोर संस्थानांत भाटघर येथें निरा नदीस बांधून एक प्रचंड तलाव केला आहे. त्याची उंची १९० फूट आहे व लांबी एक मैल आहे. यांत २४०० कोटी घनफूट पाणी राहतें! जगांत हें सर्वांत मोठें आहे. याचें क्षेत्रफळ १५ चौरस मैल आहे. याचेपासून दोन कालवे निघतात व त्यानें दोन लक्ष एकर जमीन भिजते. या धरणाचें बांधकाम, रचना, विस्तीर्णपणा, मजबुती वगैरे गोष्टींमुळें हें फारच प्रेक्षणीय झालें आहे. व्हाइसरायसुद्धां हें पाहण्यास येतात. वेरूळचीं लेणीं, ताजमहाल, गेरसप्याचा धबधबा, हिमालय, व भाटघरचें धरण हीं हिंदुस्थानांतील दृश्यें जगांत अप्रतीम आहेत. हें पाहून नंतर मी पुण्यास आलों व तेथून भोंवतालचीं सर्व क्षेत्रें पाहिलीं. त्याचें वर्णन खालीं लिहिल्याप्रमाणें:—

प्रथम इतिहास प्रसिद्ध पुण्याजवळील

## सिंहगड किल्ला

पाहण्यास गेलों. हा सह्याद्रीच्या रांगेंत आहे. या पलीकडेही पश्चिमेस सह्याद्रीची एक रांग असून ती पलीकडे कोंकण आहे.

पुण्यापासून सडकेनें बारा मैल गेल्यावर गडाचा पायथा लागतो. उन्हाळे दिवसांत येथें जाण्यास भाड्याच्या मोटारी नेहमीं मिळतात. वाटेनें विठ्ठलवाडी, खडकवासलें व डोणजें हे गांव लागतात. डोणजें गांवापुढें सडक थेट सिंहगडच्या पायथ्याशीं जाते. येथपर्यंत मोटारी जातात व यापुढें चढाव लागतो. सिंहगडची उंची ४३०० फूट ह्मणजे सुमारें एक मैल आहे. पायथ्याशीं वस्ती नाहीं. एक आंब्याचें झाड आहे. आसपास कांहीं कुणब्यांचीं घरें आहेत, त्यास डोणज्याचा वाडा ह्मणतात. वर चढण्यास पहाडी लोकलफंडी सडक आहे. ती अरुंद व बऱ्याच चढावाची असल्यामुळें डोली खुर्च्यांशिवाय कोणतेंही वाहान जात नाहीं. डोल्या खुरच्या पायथ्यांशीं मिळतात. लोक तयारच असतात. ही डोंगरी सडक सुमारें तीन मैलांची आहे. येथें वर गेलें म्हणजे जिकडे तिकडे पाण्याची

टाकीं सदैव भरलेलीं असल्याचें दिसून येतें. हल्लीं ह्या किल्याचा उपयोग हवा खाण्याकरितां फार करतात. याची उंची ४३१६ फूट म्हणजे महाबळेश्वरापेक्षां थोडीचशी २५० फुटांनीं कमी आहे, तरी येथील हवापाणी अती उत्तम असल्यामुळें श्रीमंत लोकांनीं येथें राहण्याकरितां बंगले बांधले आहेत. त्यांना वर मोटारीसुद्धां जातां यावें, म्हणून मोटारी जाण्यास योग्य अशा रस्त्याची तयारी चालली आहे. हा रस्ता बहुधा लवकरच तयार होईल. ही सडक झाल्यावर बहुधा येथली वस्ती वाढेल. येथें कसलेंही दुकान नाहीं, यामुळें सर्व सामान खालून आणावें लागतें. खडकवासलें हा गांव जरा मोठा असल्यामुळें तेथें कांहीं दुकानें आहेत. किल्यावर धर्मशाळेंत पुजाऱ्याकडून डाळ, तांदूळ वगैरे सिधा व भांडें कुंडें मिळतें. पण हा उतारूचा हक्क नव्हे, सवड आहे.

हल्लीं येथील ऐतिहासिक इमारतींपैकीं राजाराम महाराजांची छत्री मात्र अद्याप सुस्थितींत आहे. साताऱ्याचे महाराजांकडून या छत्रीस वर्षासन असल्यामुळें या छत्रीवर जी शंकराची पिंडी आहे, तिची पूजा, अर्चा व नैवेद्य याकरितां एक ब्राम्हण व एक मराठा असे दोन पुजारी येथें रात्रंदिवस सहकुटुंब असतात. त्यांना राहण्याकरितां येथें एक धर्मशाळा साताऱ्याच्या संस्थानांतून बांधून दिलेली आहे. त्यांतच बहुधा आला गेला उतरतो. राजाराम महाराजांचे समाधीचे उत्साहाचे वेळीं ह्या छत्रीची रंगरिपेअर करितात व ब्राम्हणभोजनही होतें. या डोंगरावर अद्यापही कधीं कधीं वाघोबाची स्वारी येत असल्यामुळें रात्रीं निवाऱ्याच्या जाग्याची महती मोठी आहे. खालची नवी व जुनी सडक जेथें मिळते, तेथें पुराणवस्तु—संरक्षण कायद्याचे नियमांची डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटच्या सहीची पाटी लाविलेली आहे. पण वर सरकारनें जुन्याचें नवें काय दुरुस्त केलें, हें पाहूं लागल्यास क्वचितच पत्ता लागतो!

मी पुण्याहून संध्याकाळीं पांच वाजतां मोटारीनें निघालों. जाण्यायेण्याचें रिटर्न टिकिट घेतल्यास भाडें थोडें कमी पडतें. अर्थात हें टिकीट दुसऱ्या दिवसापर्यंत चालतें, म्हणून मी तसेंच घेतलें होतें. खडकवासल्याजवळ मुळामुठेचें धरण लागतें. याच्या काठानेंच सिंहगडला सडक गेली आहे, यामुळें तलावाची शोभा अनायासें पाहावयास मिळते. धरणाच्या बंदोबस्तास व कालव्यांत नियमित पाणी सोडण्यास इंजनीअरींग खात्याचें जवळ ऑफीस आहे. तळ्याच्या

भोंवतालची शोभा पहात असतां सहा वाजण्याचे सुमारास आमची मोटर पायथ्याशीं आली. अजून एक तास सवा तास दिवस राहिला होता, म्हणून मी लगेच डोंगर चढण्यास सुरवात केली. हे दिवस मे महिन्याचे असल्यामुळें मनुष्यांप्रमाणेंच कांहीं किडे सडकेवर हवा खाण्यास येतात. त्यांत फुरसें म्हणून एक लहान जात आहे, ती धुळींत बसलेली असते, यामुळें तें तशा स्थितींत ओळखूं येत नाहीं. एकदां एका उतारूचा पाय त्यावर पडून वेळींच उपाय न झाल्यामुळें तो प्राणास मुकला, असें मला पुण्यास समजलें होतें. म्हणून मी पाहून नीट जरा जपून चाललों होतों, इतक्यांत तसें एक लहान फुरसें धुळींत लपलेलें माझ्या दृष्टीस पडलें. आम्हाला पाहिल्याबरोबर ते तेथेंच दगडाच्या खबदडींत लपून राहिलें. जनावरें मनुष्यास भितात व मनुष्यही जनावरास भितो; दोघांची दृष्टादृष्ट झाली तर किंवा एकानें दुसऱ्यास पाहिलें तर तीं एकमेकांच्या वाऱ्यासदुद्धां उभीं राहात नाहींत. कदाचित् एकानें दुसऱ्यास पाहिलें तरी तो दुसऱ्यापासून दूर सरतो. पण दोघांचें लक्ष भलतीकडे असतां त्यांच्या जाण्याच्या गतीनें जर एकमेकांस चुकून धका लागला तर मात्र त्याचा परिणाम वाईट होतो. मी त्याचे नादीं न लागतां पुढें गेलों. दीड दोन मैल गेल्यावर एका बाजूला सुमारें तीन चार खोपटांची वस्ती लागली. ही वस्ती बरोबर रस्त्याचे मध्यावर आहे असें म्हणतात. यापुढें बराच चढाव आहे यामुळें रस्ता वळणावळणांनीं गेला आहे. यापुढें जात असतां एक बाई व तिची मुलगी डोक्यावर भरलेला हंडा घेऊन वरून येतांना मी त्यांस पाहिलें. मी त्यांस विचारिलें हंड्यांत काय आहे? तर पाणी आहे. हें कोठून कोठें चाललें? तर गडावरील देवटाक्याचें हें पाणी आम्हांस पिण्यास न्यावें लागतें. हें किंवा खालील धरणाचें पाणी याशिवाय आमच्या मधल्या वस्तीला उन्हाळ्यांत पाणी नाहीं. खालून भरून वर हंडा आणण्यापेक्षां वरून भरलेला हांडा खालीं नेणें सोपें म्हणून आम्ही गडावरून पाणी आणतों; शिवाय धरणाच्यापेक्षां हें पाणी अती उत्तम आहे. मग अशा बिनपाण्याच्या ठिकाणीं तुम्ही वस्ती कां केली? वगैरे प्रश्न विचारणार तों तिच्या डोक्यावर ओझें असल्यामुळें ती सहज खालीं निघून गेली. वर गेल्यावर किल्ल्याचा दरवाजा लागला. तेथे खडकांत एक कपार आहे. त्यांतही एक विहीर आहे पण त्यांत पाणी नाहीं. वर गेल्यावर एका उंच ठिकाणीं उभे राहून एकदां खालची शोभा पाहिली.

संध्याकाळ झाल्यामुळें विशेष शोभा दिसली नाहीं. वर वारा फार. धर्मशाळेचा शोध करतां मागें सांगितलेली पुजाऱ्याची इमारत दिसली. त्यांनीं आह्मांस हांक मारून आमचें यथाकाल स्वागत केलें. ही धर्मशाळा नाहीं, पण आल्या गेल्यास आह्मी येथें उतरूं देतों असें ते ह्मणाले. ओसाड धर्मशाळेपेक्षां वस्तीचें व बंदोबस्ताचें घर मिळालें, यामुळें विषेश आनंद झाला. जागा निवाऱ्याची, जवळ पाण्याचें टाकें, यामुळें माझी सर्व सोय झाली. मी तेथें हातपाय धुऊन संध्या करून जवळच असलेल्या राजाराम महाराजांच्या छत्रिवरील शिवदर्शन घेऊन घरीं आलों. रात्र झाल्यामुळें गडाखालचे पुण्याचे खडकीचे विजेचे दिवे झळकूं लागले व त्यांची विलक्षण शोभा दिसली. येथें ब्राह्मण पुजारी आहे तो जरा अर्धवट होता, पण मराठा मोठा समंजस होता त्याचीं व माझीं औपचारीक प्रश्नोत्तरें झाल्यावर शिष्टाचाराप्रमाणें तो ह्मणाला, तुह्मी आलां फार आनंद झाला. आतां आपण निजू. हंतरापांघराला हवें तर देतों. पण मजजवळ सर्व होतें. सकाळीं उठल्यावर शौचविधी झाल्यावर मी तुह्माला सर्व किल्ला त्याचें वर्णनासुद्धां दाखवून आणीन.

दुसरें दिवशीं मी पाहाटें उठलों, पण थंडी व वारा जास्त असल्यामुळें बाहेर पडवलें नाहीं. चांगलें उजाडल्यावर शौचविधी केला. नंतर बराच वेळपर्यंत तो मराठा पुजारी उठला नव्हता. त्याची चौकशी करून त्याला उठविलें. त्याचा शौचविधी झाला तों सात वाजले. आह्मी किल्ला पाहण्यास आरंभ केला. त्यांचा शौचविधी आटपेपर्यंत मी भोंवतालची सृष्टि शोभा पाहिली. सूर्य नुकताच उगवून तो आपल्या कामाकरितां लागून लोकांनाही लागण्याची सूचना करित होता. त्याचे प्रभेनें सर्वच गुलाबी छटा किंवा कुंकुमाचे सडे जिकडेतिकडे पसरल्यामुळें सर्व सृष्टि सुवर्णमय वस्त्र पाघरलेली सुरम्य दिसली. उत्तरेकडे खडकवासल्याचें धरण सर्पाकार पसरून शेवटीं त्याची धरणाची वर मान केलेली अजस्र फडा दिसली. त्याचें शेंपूट ऊर्फ मूळचा उगम पार डोंगरांत अगदीं कृश होत गेलेला होता. आसपासचे डोंगर आपआपल्या डोक्यावर किल्याच्या लहान लहान गढी घेऊन गत वैभव दाखवित उभे होते. हा सिंहगड किल्ला सर्व बाजूंनीं अधांतरी तुटलेला असा विमानासारखा दिसत होता. सर्व डोंगर हालूं नये ह्मणून ते वाटांनीं व सडकांनीं अगदीं गच्च बांधून टाकलेले होते! ही मजा पाहून होते तों, तो मराठा पुजारी आला व आह्मी दोघे दक्षिणेकडून किल्ला पाहण्यास सुरवात केली.

किल्यावर जिकडे तिकडे इमारतींचे अवशेष, पडक्या भिंती, विटा, घरांच्या खांबांचे चौथरे दिसत होते. त्यांचीं नांवें तो सांगत होता. येथें नगारखाना होता, येथें तोफखाना, येथें दारूचीं कोठारें तशींच धान्याचीं कोठारें हीं सर्व निरनिराळ्या ठिकाणचीं त्यानें दाखविलीं. पाणी सर्वच आहे. पण त्यांत देवटाक्याचें पाणी मात्र फार उत्तम आहे; म्हणजे रूपानें अगदीं स्फटिकाप्रमाणें व गुणानें अत्यंत वरिष्ट आहे. येथलें पाणी पुण्यास व खडकीस कांहीं श्रीमंत लोकांकडे अद्याप रोज जातें असें म्हणतात. इतकें तें पाणी हल्लींसुद्धां परिक्षेंत श्रेष्ट ठरलें आहे. भाड्यांत भरून नेलेल्या पाण्याला ताज्या पाण्याची सर कशी येणार? तें तेथूनच प्यालें पाहिजे. उत्तम हवा व हें पाणी यामुळें शिवाजीचें डोंगरी सैन्य नेहमीं उत्साही असे. सर्व ठिकाणचें पाणी गार, काळेंभोर पाहतांच समाधान होऊन तोंडांत घालतांच सर्व इंद्रियांना संतोष होत असे. इतकें तें तेजस्वी व तरतरीत होतें. किल्यांत सर्वांत उंच जागीं किल्याचा मुख्य अधिकारी रजपुत सरदार उदेभान याचा बंगला होता. दक्षिणेकडे कल्याण दरवाजा आहे. कल्याण म्हणजे कोकणांतील ठाणें जिल्ह्यांतील नव्हे. तर तेथें तळाजवळ कल्याण नांवाचें एक लहानसें खेडें आहे तें. किल्यांत येण्याचा पूर्वीचा मुख्य दरवाजा हाच. होता. असें दिसतें. पुण्याची सडक झाल्यावर पुणें दरवाजास प्राधान्य आलें. कल्याण दरवाजानें जन जनावरेंसुद्धां येणें सोपें आहे. किल्यावर घोड्यांची मोठी पागा होती. तींत हजार दीड हजार घोडा सहज राहील इतकी ती मोठी आहे. हाच रस्ता पुढें शिवापूर, कात्रज, भोर, भाटघरचें धरण व बनेश्वर येथें जातो. याला जुना रस्ता म्हणतात. हा थोडा लांब व कठीण आहे. आणि पुण्याहून येणारास तो सोयीचा नसल्यामुळें हल्लीं बहुतेक बंदच आहे. हा पाहिल्यानंतर आम्ही पश्चिमेकडे वळलों. तेव्हां सह्याद्रीच्या पश्चिम रांगेंतील तोरणा, रायगड, वगैरे किल्ले दिसूं लागले. पुढें गेलों तों तानाजी ज्या गडावरून चढून आला तो गड दिसला. त्याचें मी नीट निरिक्षण केलें. सिंहगडावरून पावसाच्या पाण्यास जाण्याला एका पऱ्ह्याला एक मोरी केली होती त्याच्या खोऱ्याच्या तोंडाला एक प्रशस्त, रुंद व उंच बंधारा बांधला आहे आणि पाणी जाण्यास मार्ग सांगितलेली येथें तळाशीं एक मोरी ठेविली आहे. ह्या पऱ्ह्याचें पाणी वरून एका लहानशा कड्यावरून खालीं जातें, तेथून शिडी लावून तानाजीचें सैन्य वर येऊन या मोरीवाटे आंत आलें व तें या पऱ्ह्याचें खोऱ्यांत आल्यामुळें कोणाला दिसलें

नाहीं. शिवाय हा रस्ता बिकट आहे. येथून मनुष्य येणें शक्य नाहीं अशी त्यावेळीं-ही सर्व लोकांची खात्री असल्यामुळें या बाजूला बंदोबस्त कमी होता. पण पुढें हें सैन्य घोरपड लावून एक जुटीनें वर पठारावर येऊन हल्ला व कापाकापी करूं लागलें. त्यानें प्रथम पहारेकरी कापले तेव्हां जिकडे तिकडे गवगवा झाला, त्यावेळीं उदेभानाचें भान जाऊन हा निर्वाणीचा समय पाहून त्यानें आपल्या नायकांचीं केशरी करून (ठार मारून) तो तानाजीशीं लढण्यास आला. लढतांना तानाजीला वार लागून जिथें त्याचा हात पडला तेथें त्या हाताचें स्मारक म्हणून एका कोनड्यांत दगडी हात दाखविला आहे. हात तुटला तरी दुसऱ्या हातानें तान्हाजी लढत लढत पुढें लोक कापीतच चालला पुढें त्याचें शीर तुटलें तरी त्याचे सर्व शरिरांत रणमदाचा संचार झाल्यामुळें त्याचे कबंधतच रणांत नाचत होतें!! शेवटीं एका हाकेवर ते पडलें!!! तेथें त्याची समाधी पुढें शिवाजीनें बांधून त्यावर एक ढाल तलवार घेऊन युद्धाचें विरासन घातलेल्या वीराचें चित्र दाखविलें आहे, तें दगडी आहे. येथेंच हल्लींची मंडळी तान्हाजीची पुण्यतिथी साजरी करितात. तानाजी पडला तें ठिकाण उदेभानाच्या बंगल्याजवळ आहे इतका तो लढत लढत तेथें गेला होता!!! उदेभान पडला तेथें त्याचेंही थडगें आहे. तानाजी पडल्यामुळें त्याचे लोक पळूं लागले व किल्याचें सैन्य वीरश्रीनें त्यांचे पाठी लागलें तोंच तानाजीचा भाऊ सूर्याजी पुणें दरवाजानें त्यांचे पाठीवर येऊन त्यानें त्यांची कत्तल व दाणादाण केली व आपल्या पळणाऱ्या तानाजीच्या वीरांना धीर देऊन दोन्हीं सैन्यें एक होऊन किल्ला सर केला! हें वर्णन इतिहासांत आम्ही कितीवेळां तरी वांचलें आहे; नव्हे पाठ करून परीक्षाही दिल्या आहेत. परंतु हें स्थान पाहून त्याचा जो ठसा मनांत उमटला आहे, तो मात्र कधीं जाणार नाहीं. मुलांस किंवा इतिहास प्रेमी मनुष्यास पुष्कळ इतिहास वाचून जें ज्ञान होईल, त्याच्या शतपट अशीं थोडॉबहूत ऐतिहासीक स्थळें पाहून होईल. पण जेते जितांच्या ऐतिहासिक स्थळांचा नाश करतात किंवा कालांतरानीं तो होतोही आणि तसा झाला म्हणजे ऐतिहासिक स्फूर्ति होण्याचा संभवच राहत नाहीं. नाटक वाचणें व तें रंगभूमीवर प्रत्यक्ष प्रयोगरूपानें पाहणें यांत जें अंतर आहे, तें इतिहास वाचणें व हीं स्थळें प्रत्यक्ष पाहणें यांत आहे. इतिहासांत अफझुलखानाचा वध, पानपत, वसईसारख्या ज्या प्रख्यात घनचक्कर लढाया झाल्या त्यांसारखीच तान्हाजीची ही सिंहगडची स्वारी आहे. ही मराठ्यांच्या शौर्याची,

धाडसाची, व रणझुंझारपणा दाखविणारी शर्तीची लढाई झाली. अश लढायांची स्थानेंसुद्धां खऱ्या महाराष्ट्रीयास आज हुरूप व तेज आणतील यांत शंका नाहीं.

या किल्याला पूर्वी कोंडाणें नांव होतें तें तानाजीच्या मरणानंतर त्याचें स्मारक असें सिंहगड नांव शिवाजीनें ठेविलें. यानंतर मी उत्तरेकडचे बाजूनें ह्मणजे खडकवासल्याचे बाजूनें धरणाचें खोरें पाहात पाहात मूळ ठिकाणीं आलों तों अकरा वाजले. कळवंतीण महाल, हवा खाण्याचीं ठिकाणें वगैरे दुसरीं ठिकाणें यांचे महत्त्व नसल्यामुळें त्याचें वर्णन देत नाहीं. नंतर घरीं येऊन जवळच्या टाक्यांतून स्नान करून येत होतें. तों पुजाऱ्यानें सांगितलें देवटाक्यांत गंगा आहे. अनायासें गंगेचें स्नान करा. इतकी देवटाक्या- विषयीं त्या मंडळींची अजून पूज्यबुद्धि आहे. त्याच्या ह्मणण्याप्रमाणें मी देवटाक्यावर स्नानसंध्या केली. त्यानें शरीर व मन पवित्रही झालें. हें टांकें खडकाच्या आंत कपारींत आडवें खोल गेलें आहे. तें एक पुरुष खोल असें खडकाच्या आच्छादनासुद्धां स्वयंसिद्ध बनलें आहे. ह्मणूनच त्याला मुख्यत्वें देवत्व आलें आहे. या टाक्याचें पाणी नेहमीं गार राहातें. लोक याची मनोभावानें पूजा करून त्याला सुवासीक फुलें वाहतात. मीही संध्यावंदन करून घरीं येत होतों तों सिंहगडची सफर करण्याकरितां निघालेली कांहीं तरूण मंडळी भेटली. ही हायस्कूल कॉलेजांतील मंडळी सर्व जातीची आठरा- वीस वर्षांची होती. ती ह्या धर्मशाळेचा शोध करीतच आली. त्यांची हकीकत हल्लींच्या तरुण मंडळींस बरीच बोधप्रद होईल ह्मणून मी देतों.

ह्या मंडळींत प्रवासाचा अनुभवी एकही नव्हता. फक्त तारुण्याच्या घमेंडींत कांहीं विचार न करितां त्यांनीं प्रवासास आरंभ केला होता. प्रत्येक मनुष्य आपलें फराळाचें व बाडबिछाईतीचे गाठोडें पाठिशीं बांधून पायांत बूट हातांत काठी घेऊन सैनिक शिपायाप्रमाणें निघाला होता. ही मंडळी पुण्याहून पहाटेस पायीं निघाली. डोणज्यास येण्यास त्यांना अकरा वाजले. उन्ह झालें पण आश्रयास जागा नाहीं. पाणीसुद्धां नाहीं. तहान लागली, जीव अगदीं सोखावला. वैशाखाचें उन्ह अशा स्थितींत वर सिंहगड दिसत होता. जवळ आहे असें समजून ते चढूं लागले! रस्ता चढावाचा व उन्ह मी ह्मणत होतें तहानेनें व श्रमानें प्राण अगदीं व्याकूळ झालेले, अशा स्थितींत कांहीं मंडळी मागें सांगितलेल्या मधल्या ठिकाणच्या झोंपड्यांच्या जागीं आली व तेथें अगदीं नाउमेद होऊन

ते बसलेच ! ! पाणी प्यावयास मागूं लागले तर पाणी नाहीं. कारण इतक्या मंडळींना पाणी कोण देणार ? मग मोठ्या मिनतवारीनें एक आणा घेऊन एक तांब्याभर पाणी घराच्या मालकानें ( कोळ्यानें ) दिलें व दुसरा तांब्या रुपाया दिलात तरी मिळणार नाहीं असें त्यांनीं बजावून सांगितलें. तेव्हां मंडळींनीं यथाप्रमाण तें अमृतमय पाणी घोटघोट पिऊन व डोळ्याला लावून त्यांचा निरुपाय होऊन ती मंडळी तेथून निघाली. पण यापुढें ओझें त्यांच्यानें घेववेना, तेव्हां त्या वाडींतील एक मजूर करून ते बसत बसत वर आले व येथें येऊन पडलेच !.! ! थोडी विश्रांति घेतल्यावर फराळ करून पाणी प्यायल्यावर त्यांचा जीव ठिकाणावर आला, तों दोन वाजले ! पुढें ते एका झाडाखालीं खडकाच्या कपारींत जेवावयाचें करूं लागले. अनुभव कोणासच नाहीं. त्यानीं चूल मांडली ती अगदीं गैरसोयीच्या ठिकाणीं वाऱ्यांचा विचार करून घातली नव्हती. एक तास झाला तरी पाण्यास आधण येईना. मग कढ कुठला ! कारण चोहोंकडून गार वारा येऊन जाळ फांकतो व भांडें थंड होत जातें! प्रत्येक मनुष्य चूल फुंकून फुंकून धूर व जाळ यांनीं गुदमरून जाई. व तेथून निघून जाई, मग दुसरा येई, असें चाललें होतें! ह्यांचा हा वेडेपणा पाहून मी पुढें झालों. भोंवताली कपडे बांधून वारा जरा आडवला-बंद केला—तेव्हां पंधरा मिनिटांत कढ येऊन अर्ध्या तासांत भात झाला ! ! मग त्यांना घरांत बोलावून जेवावयास सांगितलें. नाहींतर वाऱ्याच्या योगानें पानांत माती जाऊन एक घासही त्यांना खाववला नसता. घरून त्यांनीं भाज्या चटण्या आणिल्या होत्या. श्रमामुळें थकवा फार आला होता. भूक पुष्कळ लागली होती. यामुळें त्यांचें यापुढें जेवण फार समाधानकारक होऊन थोडी विश्रांती घेतल्यावर ते तरुणच असल्यामुळें लगेच टवटवीत झाले ! !

त्यांची अशी करुणास्पद स्थिति पाहून व ऐकून मला फार वाईट वाटलें. मग मी त्यांना म्हटलें,तुमचा कार्यक्रमच चुकला. मी मोटारीनें संध्याकाळीं आलों. तसे तुम्ही येऊन वस्ती केली पाहिजे होती. ते म्हणाले आम्हाला पायीं प्रवास करावयाचा होता. मी म्हटलें तर तुम्हीं दुपारीं तीन वाजतां निघून खालीं डोणजे येथें वस्तीस यावयास पाहिजे होतें. व सकाळीं येथें यावयाचें होतें. आपल्या सर्व उड्या शरीर सामर्थ्यावर आहेत. आपलें शरीर जर आपण नीट वापरलें नाहीं—तर

दुरुस्ती ठेवली नाहीं—तर आपल्या हातून कांहीं होणार नाहीं. इष्ट ध्येयाकरितां शरीराचा त्याग करावयाची पाळी आली तरी कांहीं हरकत नाहीं. शरीर हें कधींतरी जावयाचें आहेच. पण तान्हाजी मालुसऱ्यासारखा त्याचा सदुपयोग तरी करावा, ह्मणजे त्याची अजरामर कीर्ति तरी होईल. व्यर्थ शरीर खर्च करणें किंवा त्याचा दुरुपयोग करणें; हें आत्मघातकीपणाचें लक्षण आहे. आत्मघात हा इहलोकीं व परलोकीं, तसेंच पूर्वी व हल्लींसुद्धां निंद्य मानिला आहे. जो आत्मघाताचा प्रयत्न करील त्याला पिनलकोडांतसुद्धां शिक्षा सांगितली आहे. ह्मणून देहाचें शक्य तितकें रक्षण व पोषण करावें पण त्याचें व्यर्थ कौतुक करीत मात्र बसूं नये, तसेंच त्याचा दुरुपयोगही करूं नये. तुह्माला वाटेंत एक तांब्याभर पाणी मिळालें ह्मणून बरें झालें; नाहीं तर काय झालें असतें ? त्यानें एक आणा घेतला हा फार कमी घेतला. कारण त्यांना पाणी ह्या गडावरून उरापोटावरून खालीं न्यावें लागतें. अशा स्थितींत तुम्हीसुद्धां एक आण्याला तांब्या दिला नसता. तेव्हां त्यांनींसुद्धां तें कबूल केलें. सारांश कोणतेंही कृत्य करतेवेळीं फार विचारपूर्वक त्याला आरंभ करावा, ह्मणजे तें युक्तीनें थोडक्यांत व उत्तम होतें. नाहींतर जीव घेतें, पण होत नाहीं. प्रवासाची तयारी कशी करावी, हें मी माझी तीर्थयात्रा भाग १ ला या पुस्तकांत तुमच्यासारख्या तरुण मनुष्यांकरितां मुद्दाम लिहिलें आहे. तें नीट वाचा, ह्मणजे तुमची अशी फजिती होणार नाहीं. त्यानें प्रवास सुखावह होऊन त्याची गोडी लागते. नाहींतर कोणत्या ह्या वेड्या हौसेच्या नादीं लागून आह्मी आपला सुखांतला जीव दुःखांत घातला असें वाटूं लागतें. प्रवासाच्या ठिकाणची माहिती अनुभविकाकडून किंवा ग्रंथोक्त पाहून त्याचा नकाशा, वेळ, साधनें, तपश्चर्या यांची अनुकूलता मिळाल्यावांचून कितीही नेटाचें कार्य असलें तरी अविचारानें साहस करून आपला घात करूं नये. तान्हाजीला हा किल्ला सर करावयास मातोश्री जिजाबाईनीं व धनी शिवाजी यानें निकडीचा हुकूम दिला होता. तरीपण त्यानें प्रथम भेद काढून शत्रूच्या मर्माची चौकशी करून वेळ ठरवून अचुक छापा घातला तरी त्याससुद्धां जिवानिशीं मुकावें लागलें. पण अशा रीतीनें प्रयत्न करून जीव गेला तरी बेहेत्तर आहे. पण त्यानेंसुद्धां अविचारानें साहस केलें नाहीं. तान्हाजीला हा निकडीचा हुकूम मिळाल्याची ऐतिहासिक दंतकथा अशी आहे.

शिवाजीला रायगडावर राज्याभिषेक करण्याची तयारी चालली होती, त्यावेळीं शिवाजी प्रतापगडावर होता. सिंहगड घेतल्याशिवाय राज्याभिषेक होणें बरोबर नाहीं,-असें जिजाबाईचे मनांत येऊन तिनें शिवाजीस बोलावणें पाठविलें त्याप्रमाणें शिवाजी आला. तेव्हां जिजाई त्यास ह्मणाली, शिवबा सिंहगड घेतल्याशिवाय तुझा राज्यारोहणाच्या समारंभाचें मला कौतुक वाटणार नाहीं! शिवाजीनें तिला पुष्कळ विनवून सांगितलें कीं, ही गोष्ट माझ्या लक्षांत आहे व सिंहगड घेतल्याशिवाय मी राहणार नाहीं. पण आज ती गोष्ट होणें शक्य नाहीं. तेथील रजपूत सरदार फार भारी आहे, व तो मुळींच वळत नाहीं व किल्ल्याचा भेद निघत नाहीं. याला काय करूं? तरी ती आपला हट्ट सोडीना. ती म्हणाली तुम्ही आतांच प्रयत्न करा, आतांच यश येईल! शिवाजी तर मातृभक्त होता. तेव्हां त्यानें तान्हाजीला बोलावणें पाठविलें. त्यावेळीं त्याचे मुलाचे लग्नाची अक्षत निघाली होती. शिवाजींचें आमंत्रण पोहोचलें कीं, असशील तसा निघून ये. तेव्हां लग्नाची कामगिरी दुसऱ्यावर टाकून तो तीरासारखा धांवत आला. तेव्हां जीजाबाईनीं त्यास हा निरोप दिला व आपल्या गळ्यांतील मोत्यांचा कंठा त्याच्या गळ्यांत घातला व आपली स्वतःची पालखी दिली. व यशस्वी झाल्यावर आणखी देईन असें सांगितलें. तो ह्मणाला आईसाहेब आपल्या आज्ञेपेक्षां मला माझा जीव कधींच अधिक नाहीं. आपल्या आशीर्वादानें काम फत्ते करून येईन पण प्रसंग कठीण आहे. फासा उलटल्यास माझ्या मुलांचें रक्षण करावें. त्याबद्दल तिनें अभिवचन दिल्यावर तो तिच्या पायांवर डोकें ठेवून व शिवाजीची आज्ञा घेऊन निघाला व पालखींत गोंडा धरून बसूं लागला तों गोंडा तुटला पण उडी पालखींतच पडली. तेव्हां त्या अपशकुनानें त्याचें मन थोडें कचरलें, पण उडी पालखींतच पडली आहे. हें पाहून त्यानें आपला धीर सोडला नाहीं. प्रसंगार्थ त्यानें आपला धाकटा भाऊ सूर्याजी यास बरोबर घेऊन निवडक मावळे घेतले व किल्ल्याजवळ जाऊन हेटकरी घेतले किल्ल्यांतला भेद काढण्याच्या प्रयत्नास तो लागला तों एक चौकीदार भेटला. त्याला पहातांच तान्हाजीनें आपल्या गळ्यांतील जिजाईनें दिलेला बहुमोल हार त्याच्या गळ्यांत घातला व स्वराज्याचें तोरण बांधण्यास मदत कर, असें फार मोठ्या विनवणीनें सांगितलें तेव्हां त्यानें किल्ल्याचा भेद सांगितला. त्याप्रमाणें तान्हाजीनें आपल्या लोकांच्या दोन तुकड्या केल्या. एक

तुकडी सूर्याजीबरोबर देऊन पुणें दरवाज्यावरून हल्ला चढविण्यास सांगितलें व आपण पश्चिमेकडून हल्ला चढविला. त्या कड्यावर त्याची फार नामांकित चढणारी यशवंती घोरपड होती तीसुद्धां चढेना. दोनदां ती परत आली, इतका तो कठीण होता. पण आतां जर परत आलीस तर तुला कापून काढीन असें तान्हाजी तीस बोलल्यावर निरुपायानें तिनें शिडी लावली! यापुढील ऐतिहासिक भाग सर्व प्रसिद्धच आहे व त्याचें दिग्दर्शन मागें आलें आहेच. त्यावेळीं माणसांप्रमाणें कर्तबगार जनावरांस सुद्धां यशापयशाची वेळ समजत असे. किल्ला सर झाल्याची होळी पाहून शिवाजीला व जिजाईला परमानंद झाला, पण त्यांत तान्हाजी पडल्याची वार्ता दुसरे दिवशीं ऐकून त्यांना महत् दुःख झालें. नंतर जिजाईनें तान्हाजीच्या मुलांचें कल्याण केलें हें सांगणें नकोच. पण सिंहगड घेतल्यावरच दुसऱ्या दिवशीं यथासांग राज्यारोहण झालें हें विशेष आहे. सारांश

आत्मानं सततं रक्षेत । दारैरपि धनैरपि ॥

हें तत्व लक्षांत ठेवा, ह्मणजे तुमची तेजस्विता कायम राहून तुह्मी सर्वत्र यशस्वी व्हाल. हें तत्व ह्या यात्रेपासून ह्मणजे प्रवासापासून किंवा माझ्या उपदेशापासून शिकण्यासारखें आहे हें लक्षांत ठेवा. पाश्चात्याच्या संगतीनें व भौतिक सुखानें शरिराचे चोचले करूं नयेत. तसें तें उगीच काटयांवरही घालून नव्या वस्त्राप्रमाणें मुद्दाम फाडण्याचा प्रयत्न करूं नये; तर तें ध्येयाकरितांच खर्च करावें. कारण त्याच्याकरतांच त्याचें रक्षण करावयाचें आहे, वगैरे गोष्टी त्यांना पटल्या व आह्मीं असें पुन्हां करणार नाहीं असें सांगून माझे संगतीचा त्यांना अशा रीतीनें लाभ झाल्याबद्दल त्यांनीं शिष्टाचाराप्रमाणें माझे आभार मानले. माझें पुस्तक अनुभवाचें आहे, तरी त्यांत कांहीं शंका आल्यास त्यांचें समाधान करण्याचें अभिवचन देऊन मी खालीं उतरण्यास निघालों व त्यांस वजावून सांगितलें कीं आतां तुह्मी हा सर्व किल्ला या पुजाऱ्याचे संमतीनें आर्ता पहा आणि रात्रभर वास्ती करून पहाटेस निघा आतांच पाहून निघूं नका. हें त्यांनीं कबूल केल्यावरून मी खालीं येण्यास निघालों व ते आपल्या मार्गास लागले.

नंपर मी परत मोटारीनें पुण्यास आलों व दुसऱ्या दिवशीं पहाटेस पुण्याचे उत्तरेस

## पाषाण

आहे तेथें जाण्यास निघालों. पुण्याहून गणेशखिंडीच्या रस्त्यानें गव्हर्नर साहे- बांच्या बंगल्याच्या गेटावरून डावे बाजूकडे जी सडक जाते तीच थेट पाषा- णास जाते. पाषाण वाटरवर्कसच्याकरितांच तेथपर्यंत ही सडक बांधलेली आहे. व तशा अर्थाची पाटी, रस्ता फुटल्याबरोबर तेथें लावली आहे. पुण्याहून लकडी पुलापासून हें ठिकाण सहा मैल लांब आहे.

मी पुण्याहून पाहाटेस फराळाचें घेऊन निघालों तो मजा पाहात पाहात आठ वाजतां वॉटर टँकवर आलों. इंद्राणीचे उगमाला येथें धरण बांधून नळानें त्याचें पाणी चार पांच उघड्या अशा प्रशस्त कुंडांत नेऊन शुद्ध करून तें एका खजिन्यांत नेलें आहे. तेथून पाण्याचा पुरवठा गव्हरनरसाहेबांचे बंगल्यांत व खडकीच्या युरोपियन कँपमध्यें केला आहे हें पाणी केवळ युरोपियनाकरितांच जावयाचें असल्यामुळें त्याचेविषयीं विशेष काळजी घेतली आहे. त्याकरितां येथें स्पेशल ऑफिसही नेमलें आहे. शिवाय मूळ पाणीही अति तेजस्वी असें शोधिलें आहे.

येथें पांच टाकीं आहेत, त्यांतील एक टाकें नेहमीं धुण्यास काढतात, टाकें धुवावयाचें ह्मणजे त्यांतील नुसता मळ काढून टाकावयाचा असें नाहीं. टाक्यांत फारसा मळ नसतोच. प्रत्येक टाकें धुतांना त्याच्या भिंती चांगल्या घांसून धुतात. आंत रेती असते, ती काढून नवी रेती घालतात. मूळ तलावांतील पाणी कमी झाल्यास यंत्रानें हपसून टाक्यांत. सोडतात. याकरितां येथें एक इंजीन ठेविलें आहे. सारांश युरोपियनाकरिता जें पाहिजे आहे, त्याला पैशाचा प्रतिबंध नाहीं. त्याकरितां हिंदुस्थानची तिजोरी अगदीं हात जोडून उभी आहे. पण ह्या सर्व सोयी झाल्या तरी तें बांधून नेल्यामुळें त्यांत ताजेपणाची तेजस्विता येणें शक्य नाहीं. पण या ठिकाणीं युरोपियनांना पाण्याची खरी परीक्षा आहे किंवा नाहीं हें स्पष्ट दिसतें. त्यांनीं खडकवासल्याचें पाणी घेतलें नाहीं, इंद्राणीचें घेतलें हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. इंद्राणी नदी अशी वर अडविल्यामुळें उन्हाळ्यांत धार्मिक विधीकरितां नदींत खालीं पाणी राहत नाहीं त्याला राज्यकर्त्यांचा नाइलाज आहे ! हा खजिना गांवाच्या अगदीं बाहेर आहे. गांव अगदीं लहान आहे, तरी गांवांतलि लोकांनीं इकडे पाहतां-

कामा नये. मग उपयोगाची गोष्ट बोलावयासच नको. या खजिन्यांतून जें पाणी झिरपून बाहेर पडतें, तें मात्र इंद्राणीस मिळतें. इंद्राणीचे कांठीं गांवाजवळ एक अमृतेश्वराचें स्वयंभू स्थान आहे. पुण्यपावनी भूमी, आरोग्यदायक उदक, अखंड वाहणारा झरा हें पाहून येथें शिवलिंगाची स्थापना झाली. देऊळ उत्तम पाषाणी बांधिलेलें आहे. पण आतां हा झरा अडविल्यामुळें नदी अगदीं जलशून्य होऊन तिनें देवाचें तोंडही सुखविलें आहे! आतां लोक फक्त शिवरात्रीस दर्शनास येतात. हा काल महिमा आहे! आतां या पाण्याचा तेजस्वीपणा सांगावयाचा राहिला.

मी गेलों त्यावेळीं धरणाखालीं थोडा पाण्याचा प्रवाह वाहात होता. तेथें स्नान वंदन केलें व मग गांव व देवळें पाहावयास आलों तों अमृतेश्वराचीही हीच अवस्था दिसली. दुसरें एक गांवाजवळ शंकराचें स्थान पाहिलें. त्याच्या आवारांत एक बंद व उतरत्या पायऱ्यांची विहीर दिसली. तिचे तळास पाण्याचें कुंड सुमारें दोन हात व्यासाचें होतें व तें गुडघाभर खोल होतें त्या कुंडांतून सकाळपासून दुपारपर्यंत एकसारखे हंडे भरून पाणी नेत होते, पण त्या कुंडांतलें पाणी मुळींच खालीं गेलें नाहीं हें मी प्रत्यक्ष पाहिलें! लोक सांगतात पावसाळा आला तरी याचें पाणी फारसें वाढत नाहीं फारतर एक दोन विती वाढतें. जास्त आलेलें नदींत झिरपून जातें. तसेंच तीन वर्षें पाऊस मुळींच पडला नाहीं तरी ह्याचें पाणी आजपर्यंत कमी झालें नाहीं, मग याचा अंत कोण पाहणार! आमच्या गांवावर हा इंद्राणी गंगेचा प्रसाद आहे. नंतर मीही त्या पाण्याची चव घेतली. ती रूपाप्रमाणें चांगली आहे असें दिसलें. नंतर मी तेथें शंकराचे देवळांत फराळ केला. भूक फार लागल्यामुळें, मी जास्त फराळाचें घेतलें होतें तरी तें संपलें. आतां संध्याकाळीं भूक लागणार नाहीं असें ठरविलें व पाणी पिऊन देवळांत विश्रांति घेतली. उठलों तो दोन वाजून गेले पण पुन्हां भुकेचा प्रादुर्भाव झाला! तेव्हां त्या पाण्याचा प्रत्यक्ष श्रेष्ठ गुणही समजला.

कोणत्याही ठिकाणचें पाणी आरोग्यदायक आहे किंवा नाहीं, हें ठरविण्याचें दुसरें मुख्य साधन असें कीं, तें पाणी जे पीत असतील त्यांची, त्यांच्या मुलांची व जनावरांची प्रकृति कशी आहे? भाजीपाला, झाड झाडोरा तेजस्वी आहे किंवा नाहीं, याचें निरीक्षण केलें पाहिजे. या संबंधानें विचार करितां येथील सर्व

बायकामुळें सशक्त व तेजस्वी दिसलीं. पुरुष उन्हा तान्हांत खपतात तरी तें त्यांना बाधत नाहीं. योग्यकाळीं बायका गरोदर राहून सुप्रजा निर्माण झालेली दिसली. गांवांत रोगराई बिलकूल नाहीं. जनावरेंही सकस होतीं. उन्हाळा अगदीं वैशाख महिना होता तरी गाई म्हशी पूर्ण दुधाळ होत्या. गांवाला दूध पुरून येथून निदान दहावीस हंडे दुधतरी पुण्यास विकावयास जातें असें मला जाता येतां प्रत्यक्ष दृष्टीस पडलें. हें सर्व दूध कावडीवर जातें. या तेजस्वी दुधावरून मी ज्यांच्याकडे पुण्यास उतरलों होतों त्यांना ह्याच दुधाचा उकाडा लावावयास सांगण्याचा संकल्प केला होता. पण त्यांच्याकडेच ह्मैस असल्यामुळें तो बेत राहिला. येथें पुष्कळ अजारी लोक येऊन बरे होऊन जातात. असें येथील लोक ह्मणाले. व मीही तें ऐकिलें होतें ह्मणूनच मी या यात्रेला आलों. हा त्या इंद्राणी गंगेचा प्रसाद नाहीं असें कसें ह्मणावें ? याप्रमाणें मी अनुभव पाहून संध्याकाळीं पुण्यास आलों. पुण्यास जाणारांनीं सवड असल्यास याचा अनुभव घ्यावा. पुण्याहून मी

# रांजणगांव

येथें जाण्यास निघालों. रांजणगांवें दोन आहेत. एक केडगांव जवळ आहे. आणि दुसरें शिरूर ह्मणजे घोडनदीचे रस्त्यावर घोडनदीचे अलीकडे जवळच आहे. तेंच गणपतीचें स्थान आहे. याला गणपतीचें रांजणगांव असें ह्मणतात. हा गणपती अष्ट विनायकांपैकीं आहे, ह्मणून येथें आलों.

पुणें स्टेशनवरून घोडनदीपर्यंत टपालाच्या मोटारी रोज सकाळीं जातात. व संध्याकाळीं घोडनदीहून दोन वाजतां निघून पांच वाजतां पुण्यास परत येतात. मी त्याचप्रमाणें सकाळीं नऊ वाजतां स्नान करून निघालों व अकरा वाजतां पोहोचलों. सडकेपासून देऊळ अगदीं जवळ आहे. गांव अगदीं खेडेगांव आहे. देऊळ मात्र चुनेगच्ची व सुंदर कळसाचें आहे. मी गेलों तों देवाची मध्यान्हीची पूजा सुरू करण्याकरितां पुजारी तयार झाले होते. लगेच मी आपली गणपती अथर्वशीर्षाची एकादष्णी करावयास सांगितली. एकादष्णी चालली असतां मीही आवर्तन चालविलें होतें. पूजा झाल्यावर येथें श्रीगजाननास जो शमीचा हार महापूजेच्यावेळीं बांधतात तो फार प्रेक्षणीय असतो. त्याचें कौशल्य खरोखरी पाहण्यासारखें असतें. हा महापूजेच्या वेळीं दररोज

गुरवाकडून गुंफून मिळतो. येथील मूर्तीचें गणपती असें अष्टविनायकांपैकीं नांव आहे. मी पुजाऱ्यामार्फत देव ब्राह्मण करून परत मोटारीनें पुण्यास आलों.

ह्या देवासंबंधानें पौराणिक कथा अशी आहे. गृत्समदाचा पुत्र त्रिपुरासुर याला मारण्याचें सामर्थ्य प्राप्त व्हावें ह्मणून श्रीशंकरानें ह्या ठिकाणीं गणपतीची आराधना केली. व श्रीगणपती प्रसन्न झाल्यावर त्याची येथें स्थापना केली. या गणपतीपुढें उंदीर आहे. येथेंही चिंचवडच्या देवाचे वंशज पुजारी आहेत. यांना सालाचे आठशें रुपये मिळतात. त्यांत ते देवाची पूजा, नैवेद्य व अन्नछत्र चालवितात. यावरून व्यक्त शक्ति किंवा प्रत्यक्ष परमेश्वरानें घेतलेलें व्यक्तरूप कितीही कर्तृत्ववान असलें तरी त्याला आपल्यापेक्षां श्रेष्ठ अशा अदृश्य शक्तीचा आशीर्वाद घ्यावाच लागतो. मग ती शक्ति गणपती नांवाची असो किंवा वाटेल त्या नांवाची असो. येथें जी हल्लीं दृश्यमूर्ति आहे, ती मुख्य नव्हे. तिच्याखालीं तळघरांत एक लहान मूर्ति आहे. तिला दहा सोंडा व वीस हात आहेत व तिचें ध्यान अत्यंत रमणीय आहे असें पुजाऱ्यानें सांगितलें. ती मला प्रत्यक्ष पाहण्यास मिळाली नाहीं. ती कधींकाळीं काढतात. मुसलमानांच्या भयानें पूर्वींचे लोक असे देव लपवीत असावे असें दिसतें. शंकर या मूर्तीची पूजा ध्यान करीत असतां त्रिपुरासुराच्या भयानें त्रासलेले देव ज्या गुहेंत लपून बसलेले होते, ती गुहा जवळच आहे. ही पौराणिक गोष्टीची साक्ष म्हणून दाखवितात. या दहा सोंडेच्या व वीस हातांच्या गणपतीच्या ध्यानास महागणपतीचें ध्यान म्हणतात. यापैकीं दहा हस्तांच्या गणपतीचें ध्यान पुढें लिहिल्याप्रमाणें आहे.

बीजापूर, गदेक्षुकार्मुकरुजा, चक्राब्ज पाशोत्पल
व्रीह्यग्र स्वविषाण, रत्नकलश, प्रोद्यत् करांभोरुहः
ध्येयो वल्लभया सपद्मकरया ऽऽश्लिष्टोज्ज्वलत् भूषया
विश्वोत्पत्ति, विपत्ति संस्थितिकरोऽविघ्नो विशिष्टार्थदः ॥१॥

**शब्दार्थः**—बीजापूर—महाळुंग. गदा—एक आयुध. इक्षुकार्मुक—उसांचें धनुष्य. रुजा—त्रिशूळ. चक्र—विशिष्ट आयुध. अब्ज—कमळ. पाश—यमपाश. उत्पल—उमललेलें. व्रीह्यग्र—भाताचें कणीस. स्वविषाण—आपले दांत. रत्नकलश—अमृतकलश. करांभोरुह—हस्त (सोंड) रूपी कमल. सपद्मकरया—कमल हस्ती. ज्वलत्भूषया—तेजस्वीदागिन्याची. अविघ्न—विघ्नहर्ता. विशिष्टार्थदः—इछित पुरविणारा.

हें ध्यान विशिष्टार्थद—असामान्य कामना पुरविणारें आहे. वर लिहिल्या प्रमाणें दहा हातांत दहा अशीं आयुधें असून त्याच्या मांडीवर महालक्ष्मी अत्यंत तेजस्वी दागिने घालून बसली आहे. जगाची उत्पत्ति, स्थिति आणि नाश करणारें असें हें महागणपतीचें तेजस्वी ध्यान आहे. संकट प्रसंगीं अगदीं विशिष्ट कार्या-शिवाय याचें असें ध्यान करूं नये असें सांगितलें आहे. श्रीशंकरांनीं मदनाला जाळला त्यावेळीं तो अनंग झाला, म्हणून रतीनें अपार शोक करून शंकराला आळविलें, तेव्हां त्यांनीं मदनाला व रतीला गणपतीचा षडाक्षरी मंत्र देऊन तप करण्यास सांगितलें. त्याप्रमाणें रतीनें व मदनानें नाशकास पंचवटींत, तपोवनांत गणपतीचें ध्यान व तपःश्चर्या केली. तेव्हां त्यांना हें दशभुजात्मक गणपतीचें दर्शन झालें. ह्यावेळीं गणपतीचें वाहन सिंह होतें. या गणपतीच्या प्रसादानें मदनाचा पुन्हा प्रद्युम्न ह्या नांवाचा अवतार झाला व गणपती अदृश्य झाले. या गणपतीला महोत्कट असें नांव देऊन त्याची स्थापना मदनानें लोकहितार्थ याच तपोवनांत केली आहे. अशा प्रकारें आपल्या अवताराच्या जरूरीप्रमाणें गणपतीनें दोन, चार, सहा, दहा, वीस असे हात व निरनिराळीं वाहनें व रूपें धारण केलीं आहेत. जास्त हातानें त्या अवताराची तीव्रता मात्र वाढली आहे. अशा प्रकारचा प्रत्यक्ष दशभुज गणपतीची मूर्ति पेशवाईतील प्रसिद्ध कारभारी हरिपंततात्या फडके यांच्या पुण्याच्या वाड्यांत त्यांच्या वंशजाकडे मला पाहावयास मिळाली. तेही गाणपत्यच होते.

या गणपतीचा प्रसाद घेतल्यावर एका पुजाऱ्यानें माझा यात्रेचा उद्देश जाणून मला सांगितलें कीं, तुम्हीं इतकें करितां तर त्यांत सर्व अष्टविनायकांचीं दर्शनें अवश्य घ्या, आणि तीं तुम्हाला आतां अनायासें होतील व या गणपतीची साक्ष पटेल. नंतर त्यानें प्रत्येक गणपतीला कसें कसें जावयाचें तें सर्व सांगितलें व तें मला पटलें. त्याप्रमाणें मी दुसऱ्या गणपतीच्या दर्शनास जाण्याचा विचार केला. त्यांच्या सांगण्याचा माझ्या मनावर एवढा परिणाम झाला कीं, त्यामुळें मला माझा कार्यक्रम बदलावा लागला. प्रत्यक्ष गणपतीच ह्या ब्राह्मणाचें रूप घेऊन माझी भक्ति पाहून बोलावणें करणेस आला होता असें मला वाटलें. देवाच्यावर विश्वास ठेवला म्हणजे आपला कार्यक्रम चुकत असला तर अशी अदृश्य शक्ति मदत करते, ही गोष्ट माझे वारंवार नजरेस आली आहे. मी जर यावेळीं हा प्रयत्न केला नसता तर इकडील गणपतींचें दर्शन अंतरलें असतें. पण मी ह्या उपदेशानें

लागेच प्रयत्नास लागलों व माझें कार्य झालें. मी संध्याकाळीं पुण्यास येऊन दुसऱ्या दिवशींच

## लेण्याद्री.

येथें जाण्याचा निश्चय केला.

सकाळीं जुन्नरास जाणारी मेल मोटार स्टेशनवरून सात वाजतां सुटते. तींत बसून पुण्याहून निघालों, तों जुन्नरास पोहोचलों. पुण्याहून जुन्नर पंचावन मैल आहे. वाटेंत खेड, मंचर वगैरे मोठे गांव लागतात. तसेंच भिमा, भामा या नद्या लागतात. मोटार फार मोठी म्हणजे पाउणशें ऐशीं माणसांची लारी होती, सडक लहान, कांहीं रस्ते गांवच्या कोटाच्या लहानशा वेशींतून गेले आहेत. त्यांतून ही अजस्र मोटार कोठेंही न लागतां सुरक्षित न्यावयाची व वाटेंत दुसरी मोटार आली असतां तिला अशा लहान मार्गांतून मार्ग द्यावयाचा, हें मोठें कौशल्याचें काम आहे. हें हांकणाराचें कौशल्य मला बरेंच ठिकाणीं दिसलें. असें होतां होतां आमची मोटार बारा वाजतां जुन्नरास पोहोंचली. नंतर एका गृहस्थानें सांगितलेल्या घरीं देवब्राम्हण करण्याच्या हेतूनें गेलों. कारण जुन्नर हें क्षेत्र नाहीं पण ब्राम्हण वस्ती बरीच आहे. मी ज्या भिक्षुकाकडे उतरलों होतों त्याचें कुटुंब गत झालें होतें. तशांत त्यावेळीं त्यांचीं जेवणेंही झालीं होतीं. तरी रीतीप्रमाणें त्यांनीं माझ्या भोजनाची चौकशी केली. मी आपल्या यात्रेचा उद्देश त्यांना कळविला. तेव्हां ते म्हणाले, तर तुम्ही भलत्याच ठिकाणीं आलांत. मला आतां बायको नाहीं तेव्हां देवब्राम्हण माझे हातून होणें नाहीं. बरें आतां कांहीं हरकत नाहीं. लेण्याद्रीचे पुजारी जवळच राहतात त्यांची तुमची भेट करून देतों म्हणजे सर्व जुळेल. प्रथम भोजन करा. त्या ब्राह्मणाकडे जेवण करण्यास कोणीच नव्हतें, पण त्यांचेकडे त्याच दिवशीं त्यांची एक नातेवाईक बाई आली होती. तिनें त्यावेळीं मीठ भात कां होईना पण तो गोड बोलून चांगल्या रीतीनें करून वाढला याबद्दल मी तिचे फार उपकार मानले. पण अंतर्यामी परमेश्वराचें स्तवन केलें. मी कोण, त्या बाई कोण ? हे गृहस्थ कोण ? यांचा हा संबंध कोणी जुळविला ? तर श्रीगणपतींनेंच. कारण मी स्वतःच्या कामाकरितां आलों नव्हतों. केवळ गणपतींचें दर्शनाकरितां व पुजेकरितां निरपेक्ष बुद्धीनें आलों होतों. अर्थात ह्या जाण्याचा परमेश्वरावर भार पडला व त्यानें हा सर्व व्यूह जुळून आणिला असें मला वाटलें. घरांत अडचण व अवेळ असल्यामुळें त्या गृहस्थाकडे जेव-

णाचा व उतरण्याचासुद्धां मला फार संकोच वाटला. ह्मणून मी जाऊं लागलों, पण त्यांनीं मला जाऊं दिलें नाहीं हा त्यांचा फार मोठा थोरपणा होय. त्यांच्या थोरपणाला मान देऊन मी तेथें निरुपायानें राहिलों.

जेवण होऊन बाहेर येतों, तो चार वाजले. बाहेर लेण्याद्रीचे पुजारी येऊन बसले होते. माझा यात्रेचा उद्देश व प्रवासाचा क्रम सांगितला. त्यानें सांगितलें कीं,

## शिवनेरी किल्ला व शिवाई

यांचें दर्शन अती वेळ झाल्यामुळें यापुढें होणें कठीण आहे, उद्यां होईल. उद्यां लेण्याद्रिवर जावयाचें आहे आणि परवांचे दिवशीं राहण्यास वेळ नाहीं त्यामुळें ह्या इतिहास प्रसिद्ध पुण्यभूमीचें दर्शन घेतल्याशिवाय जाणें अवघड वाटलें. मग कसें करावें! मजूर मिळेना ह्मणून आमचे व्यवसाय बंधूंकडे (शाळा मास्तर यांजकडे) तपास केला. पण कोणीच कबूल होईना. तेही ह्मणाले, हल्लीं पांच वाजून गेले आहेत. आतां जाऊन येणें धोक्याचें आहे. धोका हिंस्र पशूंचा आहे काय? तर नाहीं. तरीपण त्या निर्मानुष जागेंत अवेळीं जाणें बरें नाहीं, असें त्यांनीं सांगितलें; तेव्हां निराश झालों व घरीं परतलों. पण वाटेंत एक उत्साही गृहस्थ भेटला, त्याला सहज विचारलें कीं, शिवनेरीस जाण्याला मजूर मिळेल काय? तो म्हणाला या वेळीं गडी मिळणार नाहीं. पण गड्याची आवश्यकताच नाहीं. तुह्मी मनांत आणाल तर गडावर थेट जातां आलें नाहीं तरी मुख्य शिवाई देवीचें दर्शन तुह्मी करून खचीत याल. वेळ लावूं नका मी, सांगतों या रस्त्यानें जा, ह्मणजे थेट तुह्मी शिवाईचे देवळांत जाल. तेथें ब्राह्मणवस्ती आहे. तुह्मी खात्रीनें तेथें पोहोंचालच पण परत येण्यासारखा वेळ नाहीं असें वाटल्यास तेथें वस्ती करा व सकाळीं इकडे परत या ह्मणजे झालें! गडावर पडक्या भिंताडांशिवाय पाहण्यासारखें आज दुसरें कांहीं नाहीं. शिवजन्माची जागा कर्झनी कायद्याप्रमाणें दुरुस्त केलेली दाखवितात पण याशिवाय दुसरें कांहीं नाहीं. मुख्य दर्शन शिवाईचें; तें तुह्मांस झालें, ह्मणजे दुसरें कांहीं नाहीं. ह्मणून तुह्मी माचीवर गेलां नाहीं तरी चालेल. रायगडास शिवाजीच्या समाधीचें दर्शन घेण्यास ऐतिहासिक प्रेमी मोठ्या हौसेनें जातात. ह्मणून कुलाबा डिस्ट्रिक्ट लोकल बोर्डानें तेथें धर्मशाळा बांधली आहे. तसेंच शिवजन्मस्थानाचें दर्शन घेण्यासही बरेच लांबलांबचे लोक येतात. सबब येथेंही पुणें डिस्ट्रिक्ट लोकलबोर्डाकडून एक

धर्मशाळा व्हावी असा लोकांचा प्रयत्न आहे व तो लवकरच सिद्धीस जाईल असा अदमास आहे. वर पाण्याचीं लहान मोठीं ५२ टाकीं आहेत. पण आतां दोन चार टाक्यांतच पाणी साधारण भरपूर असून बाकीचीं पडीत आहेत. सर्व टाक्यांत गंगा, जुम्ना टाक्यांचें पाणी निर्मळ व स्वच्छ असून पिण्याच्या उपयोगाचें आहे. तेथेंच धर्मशाळा बांधणें सोईचें होईल. कारण जन्मस्थानापासून तें दीड दोन फर्लांगा वरच आहे. या त्याच्या बोलण्याच्या योगानें मला उमेद आली व लगेच चालूं लागलों. त्यानें सांगितलेल्या रस्त्यानें गांवाबाहेर मी एक मैल गेलों व तेथून डोंगर चढण्यास सुरवात झाली. वर गेल्यावर देवळाचें शिखर व देऊळही दिसूं लागलें. देवळांतली मंडळी दिसूं लागली. त्यांनीं तेथूनच विचारिलें, कोणीकडे चाललां? दर्शनास येतों असा जबाब दिला. त्यांनीं वर येण्याचा रस्ता दाखविला, त्यामुळें त्या रस्त्यानें अनायासें वर गेलों. रस्ता फार वळणावळणाचा होता तरी अर्ध्यातासांत मी वर गेलों.

देवीची प्रतिमा सुव्या अवयवांची असून ती महिशासुरमर्दिनीच्या पद्धतीची सायुध अशी आहे. उंची सुमारें दीड फुटीची असून ती सिंदुरचर्चित आहे. ध्यान तेजस्वी व गंभीर आहे. ही मूर्ति पाहात मी कितीतरी वेळ उभा होतों. मनांत नाना प्रकारचे विचार येत होते. जिजाबाईनें या देवीस नवस केल्यामुळें तिला शिवाजीसारखा पराक्रमी पुत्र झाला. शिवाजीला शिवाजी हें नांव याच देवीच्या नांवावरून ठेविलें. शिवनेरी किल्यांत जन्मला ह्मणून नाहीं इतकेंच नव्हे, तर खुद्द शिवनेरी किल्याला शिवनेरी हें नांवसुद्धां या शिवाई देवीच्या नांवावरूनच पडलें. ह्मणजे प्राधान्य ह्या देवीचें, किल्याचें नव्हे. हिच्या प्रसादानें शिवाजी मोठा पराक्रमी होऊन राज्य मिळवून दिगंत कीर्ति मिळवून महाराष्ट्रावर, हिंदुधर्मावर व परंपरेनें हिंदुस्थानावरसुद्धां अनंत उपकार करून गेला, तरी ही शिवाई जशीच्या तशीच आहे! त्यावेळीं ही देवी, शिवाई ह्मणजे कल्याण करणारी अशा अर्थानें जिजाबाईला पावली. मग आतां कां पावत नाहीं? ती देवी व ही देवी निराळी आहे कीं काय? तर नाहीं. तर याचें उत्तर येवढेंच दिसतें कीं, परमेश्वरासमुद्धां अवतार घेण्यास काळ लागतो. वाटेल तेव्हां व वाटेल तें ईश्वरासमुद्धां करतां येत नाहीं हें लक्षांत ठेवावें. याचें प्रत्यक्ष उदाहरण श्रीकृष्ण भगवंताचेंच आहे. श्रीकृष्णांनीं युद्धारंभीं अर्जुनास जी गीता

सांगितली, त्यावेळीं तो गडबडींत असल्यामुळें युद्ध संपल्यानंतर अर्जुनानें तीच गीता आतां स्वस्थपणें कृष्णाकडून ऐकावी असा विचार करून कृष्णास ती गीता सांगण्यास विनंती केली, पण त्यास ती सांगतां आली नाहीं- मी त्यांतलें कांहीं थोडें सांगतों, असें ह्मणून त्यानें अनुगीता सांगितली. पण खरी गीता गेली तीं गेली. याचें कारण भगवंतानींच स्पष्टपणें सांगितलें कीं, मी त्यावेळीं पूर्ण योगी होतों. त्यावेळीं वाटेल तें करण्याचें माझे आंगीं सामर्थ्य होतें. कितीही कठीण व अवघड काम असतें तरी मी तें सिद्धीस त्यावेळीं नेलें असतें. यामुळें त्यावेळीं मला कसलीच अडचण भासली नाहीं. ह्मणून प्रसंगीं सर्व गोष्टींची युक्ति सुचून त्या समरंगणाचे प्रसंगांतून मीच मुक्त झालों असें नाहीं, तर माझ्या इच्छेप्रमाणें मी सर्व पांडवांनासुद्धां वाचविलें. त्यावेळीं माझे तोंडून जे शब्द निघाले त्यांची योग्यता असामान्य होती व ते शब्द आकाशवाणीप्रमाणें अकृत्रिम होते. आतां कृत्रिमांत सौंदर्य नाहीं व सामर्थ्यही नाहीं. वेदांचे कर्ते माहीत असून वेद अपौरुषेय आहेत असें ह्मणतात तें याच धोरणानें होय. वगैरे अनुकूळ काळाचें महत्व सर्वत्र महशूर आहे. यावरून कोणी काळालाही महत्व देतात.

अनुकूळ काळ होतो तेव्हां बल बुद्धि तेज यश देतो।
प्रतिकूळ तोचि होउनि माघारें दत्त सर्वही नेतो ॥ १ ॥

हें सर्व खरें असलें तरी काळ अनुकूळ आहे किंवा नाहीं हें तरी प्रयत्नाशिवाय कसें समजणार ? ह्मणून प्रयत्न केलाच पाहिजे. इतकेंच नाहीं, तर जरूर पडल्यास परमेश्वरावर विश्वास ठेवून भगीरथ प्रयत्नही केलेच पाहिजेत. तसें नसतें तर कोळ्याचे प्रयत्नाचे कोणी गोडवे गाईले नसते. वगैरे विचार मनांत येत होते परंतु वेळ बराच झाला होता सूर्य अस्तास जाऊं लागून तो लवकर निघा असें सांगत होता तेव्हां सर्व विचार बाजूस सारून तिची मूर्ति ध्यानांत ठेवून विचार करीत करीत घरीं आलों तों आठ वाजले. पण शिवाईचें दर्शन झालें ह्मणून मनाला फार आनंद झाला.

दुसरे दिवशीं पहांटे उठून शौचविधी, मुखमार्जन करून मी लेण्यादीचे भटजींची वाट पहात बसलों. सूर्योदय झाला तरी भटजींचा उदय झाला नाहीं ! पहाटे निघून उजाडाला वर जावयाचें असा आदल्या दिवशीं संकेत

होऊन त्यांप्रमाणें भटजी मला उठवावयास येणार होते. परंतु त्यांना अजून उजाडलेंच नव्हतें ! सबब मी त्यांचे घरीं गेलों. तेव्हां ते नुकतेच घाईघाईनें गडावर जाण्याकरितां ह्मणून पहाटेस उठले होते !! आतां उशिर झाला आहे लेण्याद्री लांब असल्यामुळें त्यांचें दर्शन घेऊन किंवा होण्यासारखी असल्यास त्याची पूजा करून प्रसादाकरितां खालीं येऊं असें मी भटजीस सुचविलें. परंतु भटजी ह्मणाले, गडावर देवळांत माझी भांडीं आहेत तेथें दर चतुर्थीला आमचें ब्राह्मणभोजन होतें तेव्हां आपणास जेवण करण्यास अडचण पडणार नाहीं. सामानही तेथेंच आहे. निदान पिठलें भातास अडचण पडणार नाहीं. मी ह्मटलें ठीक आहे, तुह्माला सोयीस येईल तसें करा. नंतर घरून वर जाण्याच्या तयारीनें पुन्हां भटजींकडे गेलों तों ते ह्मणाले, वर सामान सरलें आहे असें मुलानें मला आतांच सांगितलें आहे तेव्हां आपणांस सर्व सामान बरोबर घेऊन गेलें पाहिजे. तेव्हां आम्ही सामानाकरितां बाजारारांत गेलों. या दुकानांत चौकशी करून सामान घे, त्यों, दुकानांत चौकशी करून घे, असें भटजी सामान घेत होते व मी त्याचे पैसे देत होतों. पिठलें भात व नैवेद्याकरितां गूळ असा प्रथम बेत होता. पण ज्यापेक्षां इतक्या लांब तुम्ही यात्रेकरितां आलेत तेव्हां मोदक केल्याशिवाय प्रसाद घेणें योग्य नाहीं, मला मोदक करतां येतात ते मी करीन, असें भटजी ह्मणाले. मी ह्मटलें बरें आहे, माझी कांहीं हरकत नाहीं. त्याप्रमाणें त्यांनीं आणखी कणीक, गूळ, खोबरें वगैरे सर्व सामान घेतलें. वाटेंत येतांना एका वाडींत जाऊन भटजींनीं दुर्वा, फुलें, शमी घेतली. असें होतां होतां सर्व सामान घेण्यास दहा वाजले. आतां गडावर जावयाचें पण तेथें लांकडें नव्हतीं असें त्यांच्या मुलानें निघतांना सांगितलें होतें. तीं घेण्याकरितां आम्ही एका जंगली माणसाच्या घरीं गेलों. पण त्याचेजवळ लांकडें फोडललीं नव्हतीं. त्याना तीं फोडून द्या असें सांगितलें तर ते ऐकेनात. ते म्हणाले आम्ही आतांच रानांतून आलों आहों, आतां आम्हीं कांहीं करणार नाहीं. तेव्हां हें विघ्नच आलें !! कारण लांकडाशिवाय कसें चालणार ? तेव्हां तेथें एक युक्ति योजिली. तेथें मी रावसाहेब बनलों व भटजींनीं बतावणी केली कीं, हे रावसाहेब आले आहेत, त्यांचे ब्राह्मण बर घालावयाचे आहेत, तुम्ही बऱ्या बोलांनीं लांकडें दिलींत तर ठीक; मी तुह्माला भाऱ्याचे पैसे देईन. नाहींतर रावसाहेबांचे शिपाई येतील

व सक्तीनें त्यांना फुकट भारा द्यावा लागेल व तो गडावर न्यावा लागेल, विचार पहा ! ! त्यांनीं एकदां मजकडे पाहिलें तेव्हां त त्यांना खरेंही वाटलें व ते भारा देण्यास कबूल झाले. अशा रीतीनें हें नसतें विघ्न नाहींसे होऊन लांकडें फाडून भारा गडावर तर रवाना झाला ! लांकडे असंतोषानें दिल्यामुळे तीं बारीक फोडलेलीं नव्हतीं तशांत तीं लांकडें खैराचीं असल्यामुळें पेट घेण्यास फार कठीण पण तें कसेंतरी कबूल करावें लागलें. अज्ञान जातीला असें ठकविणें बरें नाहीं हें खरें, पण प्रसंग जाणून मला तसें करणें भाग पडलें. मात्र गरिबाचे पोटावर पाय देऊं नयेत म्हणजे त्याचे श्रम फुकट घेऊं नयेत. त्यांना त्यांच्या श्रमाचा मोबदला दिला होता तेव्हां परमेश्वर ठिकाणीं आम्ही दोषी नाहीं. आतां सक्ति केली पण प्रसंगार्थ तसें वागावें लागतें, नाहीं तर प्रवास सुखावह होणार नाहीं. इतकेंच नव्हे तर तो प्रसंगीं झेपणारही नाहीं. असो, गडावर गेलों तो अकरा वाजले. उन्ह फार झालें. जरा विश्रांति घेतली. ठिकाण मात्र अती रम्य आहे. जवळ टाकी लावून खोदलेली विहीर आहे. तेथील जागा पाहून व श्रीगजाननाचें दर्शन घेऊन मनाचें समाधान झालें व श्रम परिहार झाला.

थोडी विश्रांति घेतल्यावर भटजी सामान व भांडीं काढण्यास त्यांचें खोलीचें दार उघडण्यास गेले, तों किल्ली घरीं राहिली असें त्यांस समजलें ! आतां काय करावें ? हा मोठा विचार पडला. घरीं पुन्हां जावें तर जाऊन येण्यास एक तास तरी जरूर लागेल. उन्ह मी म्हणत होतें तेव्हां विचारच पडला ! ! खोलीचें दार उघडल्याशिवाय पाणीसुद्धां मिळावयाचें नाहीं. कारण पोहरा त्यातच होता. अशा अडचणींत पडलों इतक्यांत श्रीगजाननाचे कृपेनें एक मनुष्य आला व त्यानें दुसरीकडच्या फळया उचकटून खोली उघडून दिली व भटजींनीं भांडीं तर काढलीं. तीं तरी सोयीचीं असावीं पण तशीं नव्हतीं. तीं फार मोठा म्हणजे दहा दहा इसमांचें जेवण करण्या जोगीं होतीं. लहान भांडीं नाहींतच असें ते शेवटीं म्हणाले. मी म्हटलें ह्या भांड्यामध्यें वरण भात कसे शिजतील ? तुम्हाला काय म्हणावें ? मी घरून लहान भांडीं व स्टोव्ह प्रवासाकरितां म्हणून मुद्दाम घेतला होता. तो आणीत असतां तुम्ही मला घेऊं दिलात नाहीं. आणि भांडीं तेथें आहेत म्हणून मला प्रतिबंध केलात व येथें भांडीं पाहातों तो अशीं. तेव्हां आतां काय करावें ? तुम्हाला काय ? स्वयंपाक झाला म्हणजे

झालेंना. डाळ अगदीं उत्तम लवकर शिजणारी आणिली आहे. अगदीं पांच मिनिटांत शिजेल. मी ह्मटलें ठीक आहे, चालू द्या, असें ह्मणून मी स्नानास गेलों. धोतर धुवून वाळत घातलें व मी आपलें ब्रह्मकर्म करीत होतों. भटजींनेंही स्नान केलें, विस्तव पेटविला, व पूजा साहित्य तयार केलें. एका पातेल्यांत डाळ शिजत लावली व ते श्रीगजाननाचे पूजेस लागले. मधून मधून डाळ शिजली किंवा नाहीं हें झांकण उघडून ते वारंवार पाहात होते ! हें मी पहात होतों. माझें ब्रह्मकर्म आटपलें. दोन वाजले पण भटजींची अजून डाळ देखील शिजली नाहीं ! ह्मणून मी सोंवळें नेसून पाहातों तो डाळ दाठरली. खालीं दगड गार लांकडें एक जात खैराचीं त्यांत लहान तुकडे नाहींत. यामुळें जाळ न होतां जिकडे तिकडे धूरच धूर झाला. शिवाय भटजी वारंवार झांकण काढून पाहात असल्यामुळें ती मुळींच शिजली नाहीं. इतका वेळ मन मी अगदीं शांत ठेवलें होतें पण आतां भटजींचे नादीं लागल्यास आज जेवावयास मिळेल अशी आशा वाटली नाहीं. तेव्हां त्यांना निक्षून सांगणें भाग पडलें कीं, भटजी ! तुह्मी कांहीं तरी एक पत्करा. पूजा करा किंवा स्वयंपाक करा. तुह्मी स्वयंपाक करीत असल्यास मी तुमच्या समक्ष देवाची यथासांग पूजा करतों व दक्षणा तुह्मांस देतों. नाहींतर तुह्मी पूजा करा मी जेवायचें करितों. तेव्हां भटजींनें पूजा पत्करली व जेवायचें करणें त्यानीं माझ्यावर टाकलें व तें मी आतां आनंदानें पत्करलें. कारण सर्वच गोष्टी उलट्या होत आल्या तर ही सुलटी कशी होईल ? पण मग मात्र दोघांचे काम सुरळीतपणें चाललें. त्या दिवशीं आह्माला जेवणाला पांच वाजले पण श्रीगणपतीनें माझ्या हातून सक्तीनें मोदक करवून आपले पूजेची सांगता करून घेतली यामुळें समाधान झालें. आजपर्यंत सर्व यात्रा मी हिरण्यद्वारा केल्या ह्मणजे स्वयंपाक व सांगतेबद्दल पैसे देत गेलों. पण ह्या गणपतीला ती गोष्ट कबूल झाली नाहीं. त्यानें माझ्याकडून सक्तीनें स्वयंपाकच नव्हे तर मोदकही करवून घेतले. दुसऱ्या कोणाच्या हातचें त्यांस आवडेना असेंच दिसलें! तसें नसतें तर असा मांड मांडून शेवटीं निकरावर गोष्टच त्यानें आणली नसती. मला ह्या भटजींचा स्वभाव पूर्वींच कळता तर मी नुसतें दर्शन घेऊन खालीं ब्राह्मणभोजन केलें असतें. पण तो नैवद्य देवाला आवडला नसता. हाच आवडला असे ह्यावरून स्पष्ट दिसतें ! यात्रेचें कर्तृत्व देवाला दिलें ह्मणजे वाटेंत कशा अडचणी आल्या तरी त्याबद्दल राग न येतां प्रभूकृपेनें ‘ ही देवाची

करणी आहे, ' असें समजून समाधान होतें हेंच विशेष आहे. नाना प्रकारच्या मनुष्यांचे स्वभाव समजावे ह्मणूनच हा सारनामक अलंकाराचा अनुभव मुद्दाम दिला आहे.

जेवण झाल्यावर थोडी विश्रांति घेऊन आम्ही घरीं येण्यास निघालों. अन्न जास्त केलें होतें यामुळें तेथें लोकलबोर्डाचें काम करणारे मजूर, ज्यांनीं युक्तीनें खोली उघडून दिली व लांकडें फोडण्यास मदत केली त्या सर्वांस हा प्रसाद मिळाला व यामुळें विश्वकुटुंबी गणपतीची खरी सांगता झाली.

ह्या गिरिजात्मक गणपतीच्या अवताराची पौराणिक कथा अशी आहे:— गंडकी नदीवर गंडकी नगरचा एक राजा होता. त्याला सिंधूदैत्य नांवाचा मुलगा झाला. हा राजाचा मुलगा होता, तरी दैत्यासारखें आचरण करी, दैत्यमंडळींशीं स्नेह करी, ह्मणून त्यास दैत्य ह्मणूं लागले. दैत्यगुरू शुक्राचार्यांनीं सूर्याचा मंत्र त्याला दिला. तो जपल्यानें त्यास सूर्य प्रसन्न झाला व त्यानें एक दिव्य खड्ग दिलें. त्यामुळें त्यानें सर्व त्रैलोक्य जिंकलें व सर्व देव बंदींत घातले. देवांचे अग्रभाग तोच घेऊं लागला. व गोब्राम्हणास त्रास देऊं लागला. यामुळें सर्व देवांनीं त्रासून माघ वद्य ४ चतुर्थीला उपोषण केलें व गणेशाचें आराधन केलें. त्यानें तो प्रसन्न झाला व पार्वतीच्या घरीं मी अवतीर्ण होतो व तुमचा त्रास नाहींसा करतो, तुम्हीं सर्वांनीं माझी अशी स्तुति करीत असावें जसा वर देऊन श्रीगजानन गुप्त झाले.

इकडे पार्वती महादेवाला विचारूं लागली कीं, आपणास पुत्र नाहीं तेव्हां ज्या गणेशाची आपण उपासना करतां तो गजानन माझा मुलगा कसा होईल, हें मला सांगा. नंतर शंकरांनीं पार्वतीस ॐकाराचा मंत्र दिला. व पार्थिवाचें विधान सांगितलें. त्याप्रमाणें ती आपल्या सख्यांसह लेण्याद्रीवर येऊन बसली. तेथें तिनें मृणमय मूर्तीची स्थापना करून तपश्चर्या केली. व त्यास पुत्र भावानें आळवूं लागली त्याप्रमाणें भाद्रपद शुद्ध ४ थींच्या दिवशीं मध्यान्यसमयीं ती पार्थिव मूर्ती सचेतन होऊन तिनें पुढें देवकार्य केलें. प्रथम गणपती युद्धास जाईना. तेव्हां त्याला जाण्याकरितां देवांनीं युक्ती केली ती अशी?—ब्रह्मदेवानें ऋद्धी, सिद्धी अशा दोन सुंदर कन्या निर्माण केल्या व त्यांचा पण लाविला कीं, जो सिंधू दैत्याला मारील त्याला ह्या द्यावयाच्या. तेव्हां गणपतींनीं त्याला

मारून त्या कन्या प्रणांत जिकल्या यामप्रमाणें भाद्रपद शुद्ध ४ थीला गणपतीचा येथें जन्म झाला त्याचें हें दृश्य स्मारक आहे. विनायक आपला पुत्र व्हावा ह्यासाठीं पार्वतीनें ज्या गुहेंत तप केलें व विनायक प्रकट झाल्यावर त्याची स्थापनाही तिनें जेथें केली त्या मूळ गुहेचें द्वार डोंगराच्या दुसऱ्या बाजूस आहे ह्मणतात पण तेथें आंत जाऊन पार्वतीनें स्थापिलेल्या गणपतीचें दर्शन घेतां येत नाहीं. नाना फडणवीसांनीं आंत जाऊन दर्शन घेण्याची खटपट केली होती, परंतु कांहीं दैविक साक्षात्कारामुळें त्यांना आपला बेत रहीत करावा लागला असें सांगतात. ही गुहा हल्लीं जी गणपतीची जागा आहे. तिच्या दुसऱ्या बाजूस पाठीमागें भयंकर कड्याच्या ठिकाणीं असावी असें सांगतात. ह्यावरून लेण्याद्रीस गणपतीचें पाठीचें दर्शन होतें असें ह्मणण्याचा प्रघात आहे. मूळ गणपतीचें दर्शन होत नाहीं. ह्मणून ह्या सर्व डोंगरालाच गणपती मानून त्याची पूजा करूं लागले आहेत. बौधांचें प्राबल्य कमी झाल्यावर कोणीं सत्पुरूषानें त्या मूर्तीच्या सुमारानें या लेण्यांत दगडी भिंतीवर विनायकाची प्रतिमा खोदवली, तोच हल्लींचा गणपती आहे. तेव्हां पासून ह्याची पूजा सुरू झाली. त्यालाच पुढें गिरिजात्मक गणपती ह्मणूं लागले.

याप्रमाणें या यात्रेचें पौराणिक महत्व आहे. नंतर श्रीगजाननानें गिरिजेला आपले विश्वरूप दाखविलें. व सर्व करता करविता मीच आहे. व माझीच जगांत अनंतरूपें आहेत. असें त्यानें तिला आपलें विराट स्वरूप नेत्रांत दाखविलें. ह्मणून ह्या गणपतीचे नेत्र इतर गणपतीपेक्षां फार मोठे आहेत. ह्मणजे मारुतीं एवढे फार मोठे व तेजस्वी आहेत. असे तेथील पुजारी ह्मणाले. गणपतीची दृष्टी अगदीं लहान असते. कोणी मनुष्य लहान डोळ्याचा असला ह्मणजे त्याला गजनेत्री ह्मणतात.

सामान्यतः गणपतीचें स्वरूप बेढब, त्याचें वाहान उंदीर व खाणें मोदक वगैरे गोष्टी परधर्मीयांना थट्टेच्या वाटतात. आणि ज्या देवाचें शरीर त्याला स्वतःला देखील उचलत नाहीं. त्याच्या भजनानें व भक्तिभावानें तुह्माला काय मिळेल असें ह्मणतात. परंतु गणपतीचे हें वर्णन ज्ञानदृष्टीनें आहे, तेव्हां त्यादृष्टीनें त्याचा विचार केला पाहिजे. गणपती ही ज्ञानदायक देवता आहे. सबब तिची भक्ती विशेषतः विद्यार्थ्यानें करावी. चतुर्थ्या कराव्या. ह्मणजे चतुर्थीचे दिवशीं प्रहर रात्रपर्यंत उपास करून अभ्यास करावा. नंतर पारणें करून निजावें. मोठ्या

मनुष्यास तिच्या भजनानें ज्ञान मिळेल. पण हें बाह्य स्वरूप ज्याबद्दल लोक हसतात, त्यांचा थोरांनीं ज्ञानदृष्टीनें विचार केल्यास तेंही त्यांस समजण्यासारखें आहे. त्याचें थोडेसें दिग्दर्शन करतों. गणपती ही साम्राज्य देवता आहे. या दृष्टीनें तिचे स्वरूपाचें वर्णन आहे. गणपतीचे पाय आंखूड पण फारच मजबूत असतात, तसें राज्याचें सैन्य किंवा मनुष्याचें सामर्थ्य हे विराट पुरुषाच्या पायाच्या ठिकाणीं आहे. अर्थात हें सैन्य, लहान थोडें, बेताबाताचें पण सुटसुटीत असून फार मोठें सामर्थ्यवान पाहिजे. त्यांना सर्व राज्याचा भार तोलण्याचें सामर्थ्य पाहिजे. शिवाजी महाराजांचें सैन्य असेंच सुटसुटीत पण सामर्थ्यवान होतें; ह्मणूनच त्यानें मोंगलांच्या मोठ्या अफाट सैन्याशीं टक्कर दिली व त्यास दाद दिली नाहीं. गणपतीचें पोट मोठें असतें तसा राष्ट्राचा परिवार म्हणजे विस्तार फार मोठा असावा. तसेंच मनुष्याचें पोट मोठें असावें, म्हणजे अन्तःकरण थोर असावें. गणपतीप्रमाणें राष्ट्राची किंवा मनुष्याची दृष्टि सूक्ष्म असावी, म्हणजे त्याचे दृष्टीपासून लपून कांहीं राहूं नये. कान मोठे असावे म्हणजे ते लोक किंवा राष्ट्र बहुश्रुत असावें. राज्यांत गुप्त हेरांचे जाळें पसरलेलें असावें. गजाननाचें कान नेहमीं फडफडत असतात. त्याप्रमाणें यांचा संचार सर्व पृथ्वीभर चौकशी करण्याकरितां अव्याहत असावा. गजाननाचें मस्तक फार मोठें आहे, म्हणजे राष्ट्राच्या पुरुषांचे विचार फार मोठे असावेत. गजाननाचें तोंड अदृश्य आहे, त्याप्रमाणें कर्त्या पुरुषांची किंवा राष्ट्राची खाद्य किंवा झडप घालण्याची वस्तू किंवा हेतु अदृश्य असावा. गणपतीचे दांत बाह्यात्कारी मोठे आहेत, म्हणजे राष्ट्राचा किंवा पुरुषांचा दरारा मोठा असावा. गणपतीचें वाहन उंदीर आहे, तसें सर्व राष्ट्राचें किंवा कर्तृत्ववान पुरुषाचें साधन अगडबंब नसून दृश्य स्वरुपानें अगदीं लहान असावें. त्याचा कोणाला पत्ताच नसावा. गणपती हें नांवसुद्धां गणांचा पती म्हणजे सर्व संघशक्तीचें व विद्या, कल्पना, धोरण यांचें एकीकरण करणारी देवता असा आहे. याला चार हात आहेत व प्रसंगीं ते दहाही होतात. (दशभुजात्मक गणपती पुराणांत प्रसिद्ध आहे. त्याचें ध्यान मागें वर्णन केलें आहेच.) कोणी हे हात युगपरत्वें होते असें मानतात. म्हणजे कृतयुगांत दहा, त्रेतायुगांत सहा, याप्रमाणें द्वापारांत चार म्हटले तर कलींत दोन येतात ! पण हल्लीं कलीयुग असून दोन हातांचा गणपती कोठेंच मानण्यांत येत नाहीं. गोकर्णाचे यात्रेंत मात्र दोन हातांचा गणपती दाखविला आहे, पण तें

गणपतीचें रूप नसून गोवाऱ्याचें आहे. सहाभुजांचा गणपती रावबहादूर चिंता-- मणराव वैद्य यांनीं पंजाबांत कांग्रा व्हालीमध्यें पाहिला. तेव्हां गणपतीचे भुज कार्याच्या महत्वाप्रमाणेंच त्या त्या अवतारीं होत असत हेंच म्हणणें सयुक्तिक दिसतें. त्याप्रमाणें राष्ट्राचें किंवा मनुष्याचें सामर्थ्य सर्व प्रकारचें असावें; व प्रसंगीं त्याची वाढ हवीतेवढी करतां येण्यासारखी असावी. अशा दृष्टीनें श्रीगणपतीचें ध्यान करणाराला म्हणजे तत्व समजणाराला कर्तृत्व, ज्ञान, सामर्थ्य व सर्व कार्यांत सिद्धि कशी प्राप्त होणार नाहींत ? गणपतीच्या पूजनाची फलश्रुतीही अशाच अर्थाची सांगितली आहे व अशाच अर्थाचीं त्याचीं बारा नांवें आहेत. तीं म्हणवींत म्हणजे त्या गणपतीच्या ह्या गुणांचें स्मरण करावें व कोणत्याही कार्यास लागावें. मनुष्याची मुख्य महत्वाची मोठी कार्यें खालीं दिलीं आहेत. त्यांचे आरंभीं याचें स्मरण करावें, म्हणजे विचार करावा म्हणजे तीं निर्विघ्नपणें पार पडतील.

> विद्यारंभे विवाहेच प्रवेशे निर्गमे तथा ।
> संग्रामे संकटेचैव विघ्नतस्य न जायते ।
> सर्वदा सर्व कार्येषु नास्तितेषाममंगलम् ।
> येषां हृदिस्थो भगवान् मंगलायतनम् हरिः ॥ १ ॥

वरील प्रकारच्या कोणत्याही कार्यामध्यें अशी दृष्टि ठेवून म्हणजे गण-- पतीचें पूजन करून म्हणजे त्याचे गुण लक्षांत ठेऊन जो वागेल व तयारी करील त्याच्या कार्यांत ऋद्धि सिद्धि ह्या उभ्या आहेतच, व हा मंगल देणारा हरी त्याचें सर्वदा मंगल करीलच.

पार्वती नग्न होऊन स्नानाला बसली असतां द्वार रक्षणाचें काम तिनें आपल्या मळापासून उत्पन्न केलेल्या गणपतीकडे दिलें होतें. शिवालासुद्धां त्याचा प्रतिबंध सहन होईना, तेव्हां त्यानें त्याचें गर्दन उडविलें. तेव्हां पार्वतीला वाईट वाटलें व त्यास जिवंत करण्याचा तिनें दृढ धरिला. पण त्याचें मस्तक कोठें सांपडेना. सबब पशूंमध्यें मोठा सामर्थ्यवान व बुद्धिमान असा जो हत्ती त्याचें डोकें कापून त्यास लाविलें. तें तावडतोब बसलें आणि हा गजपतीचा किंवा गणपतीचा अवतार झाला. तेव्हांपासून तिची ज्ञान देवता म्हणून प्रसिद्धि झाली. पार्वतीनें द्वार रक्षणाकरितां याची योजना केली होती. हें काम त्यानें

अति उत्कृष्ट रीतीनें केलें. जिवाचीही पर्वा ठेविली नाहीं. तेव्हांपासून द्वार रक्षणाकरितां दरवाजावर गणपतीची स्थापना सुरू झाली. तसेंच प्रत्येक कार्यारंभीं मंगल करण्याचें काम गणपतीकडे आलें. हल्लीं घराच्या व देवळाच्या कोणत्याही शुभ इमारतीच्या मुख्य दरवाजावर याची स्थापना होऊं लागली. हा प्रकार मुंडकटा गणेश येथें घडला. या यात्रेचें वर्णन (भाग १ ला) हिमालयाचे यात्रेंत केदारेश्वराकडे जाणाऱ्या रस्त्याचे ठिकाणीं आलें आहे. ह्या गणपतीचें शिर नर्मदेंत पडलें असें पुढें समजलें. त्या योगानें त्या ठिकाणीं जे तांबडे दगड झाले तेंच नर्मदे गणपती आहेत. म्हणून गणपतीच्या धातू, पाषाण किंवा मृणमय मूर्तीपेक्षां नर्मदा गणपतीचें श्रेष्ठत्व पूजेच्या दृष्टीनें मोठें मानिलें जातें. अशा प्रकारें गणपतीचे निरनिराळे कामाकरितां व प्रसंगाकरितां निरनिराळे अवतार झाले आहेत. गजाननाचें हें पौराणिक महत्व अर्थात व्यवहाराला सोडून नाहीं, धरूनच आहे. तसेंच सर्व देवतांची पूजा करतांना व्यवहारांत यश मिळावें, अडथळा येऊं नये एवढ्याकरितांही हें प्रथम गणपती पूजन आहे.

आतां येथें ही गणपतीची यात्रा ठेवण्याचें कारण मुख्यतः हें एक लेणें आहे, व तें खरोखर पाहण्यासारखें आहे. यासारखीं दुसरीं लेणींही येथें पाहण्यासारखीं आहेत, पण त्यांत हें आरंभींचें असावें असें वाटतें. हें लेणें म्हणजे एक फार विस्तृत अधांत्री असा स्वयंसिद्ध एका दगडाचा सभामंडपच आहे. याची लांबी सत्तर ७० फूट व रुंदीही तेवढीच आहे. उंची सुमारें दहा बारा फूट आहे. भोंवतीं बसण्याकरितां दगडी खडकाच्या आंगचे ओटे आहेत व त्या सभोंवार लहान लहान खोल्या राखल्या असून त्यांतसुद्धां दगडी ओटे आहेत. हें सर्व काम अगदीं एका दगडाचें आहे. खालीं जमीनसुद्धां याच दगडाची आहे. सांधा किंवा मध्यें खांब, धिरा वगैरे कोठेंही नाहीं. याच लेण्यांत खडकांत हा गणपती कोरला आहे. छतावर हंड्या लावतां याव्या म्हणून आतां छताच्या दगडाला खोबणी करून त्यांत तारा बसवून आंत हंड्या लावितात. हा पूर्वीचा बौध्यांचा विहार असावा. भोवतीं खोल्या आहेत. त्यांत जोग्यांनीं तपःश्चर्या करीत बसावें व मध्य भागांत संमिती भरण्याची किंवा विचार विनिमय करण्याची जागा ठेवली असावी. संमितीचेवेळीं भोंवतालच्या योग्यांनीं येऊन मध्यें विचार करीत बसावें असें दिसतें. ही जागा पाहून मनाला फारच समाधान झालें. जागा ऐसपैस, उजेड पुष्कळ. कोणत्याही

ऋतूमध्यें ही जागा अत्यंत सुखावह आहे. सर्व जागा दगडी असल्यामुळें ती नेहमीं गार असते. पावसाळ्यांत व हिंवाळ्यांत ही बेताची उबदार असते. जागेची रीपेअर जन्मांत कधीं करावयास नको. जागा टेकडीवर उंच ठिकाणीं असल्यामुळें जरा बाहेर येतांच सर्व ठिकाणची सृष्टिशोभा व भोंवतालचा विस्तीर्ण प्रदेश पाहून मनाला फार समाधान वाटतें. येथें दगडांत एक आंगची विहीर खोदली आहे. तिला नेहमीं पाणी असतें व तें उत्तम असतें. सारांश, ही जागा जुन्या पद्धतीप्रमाणें तपःश्चर्येकरितां किंवा नव्या पद्धतीप्रमाणें हवा खाण्याकरितां, कांहीं दिवस येऊन राहण्याकरितांसुद्धां अति उत्तम आहे. रपेटी-करितां सर्व डोंगरावर हिंडावें म्हणजे झालें. एकदां खालून वर सामान नेऊन ठेवावें म्हणजे झालें. ह्या जागेंत एक मात्र दोष आहे. तो हा कीं, येथें धूर झाल्यास तो बाहेर जाण्यास मार्ग नसल्यामुळें आंत कोंडतो व जिकडे तिकडे काळें होतें. ह्यामुळें ही जागा स्वयंपाक करण्यास अगदीं नालायक आहे. येथें स्वयंपाक करावयाचा असल्यास तो स्टोवर करावा. पण याशिवाय हिला रंग-विली, निदान सफती दिली तरी बहुमोल आहे यांत शंका नाहीं. त्यांत क्षणोक्षणीं श्रीमोरयाचें दर्शन होतें हें विशेष आहे. बौद्धांची या प्रांतांतून उचल-बांगडी झाल्यावर येथील जागेची रमणीयता पाहून आचार्यांनीं किंवा एका सिद्धानें येथें गणपतीची स्थापना केली असावी.

आतां विशिष्ट ठिकाणीं विशेष देवतेची स्थापना कां करितात, याविषयीं मला असें वाटतें कीं, एकदां जागा उत्तम ठरली म्हणजे भोंवतालची परिस्थिती पाहून म्हणजे त्या प्रांतांतील लोकांचा ज्या देवतेविषयीं आदर किंवा उपयुक्तता असेल तिचीच तेथें स्थापना करितात. म्हणजे त्याच्या योगानें त्या जागेचा व देवतेचा आदर राहून त्यांचें चांगलें संरक्षण होतें. यावरून प्राचीन काळा-पासून येथें गणपती उपासक असावे. रामदास स्वामींनींसुद्धां सर्व ठिकाणीं मारुतीची स्थापना केली, ती बलवर्धनाकरितां केली. रामदास स्वामींचा संचार ब्राम्हणापेक्षां इतर जातींमध्यें फार होता. त्यांची संघशक्ति मिळविण्या-करितां त्यांनीं ठिकठिकाणीं मारुतीची स्थापना केली. ज्या ठिकाणीं ब्राह्मणाची वस्ती त्यांस वाटली तेथें त्यांनीं आपलें आराध्य दैवत श्रीरामचंद्र यांची स्थापना केली. त्याप्रमाणें जुन्नर हें जोतिषांचें स्थान असल्यामुळें येथें गणपतीची स्थापना झाली असावी.

या ठिकाणीं मला तिसऱ्या भागांत वर्णिलेल्या पक्षितीर्थावर ज्याप्रमाणें पक्षी पाहण्यास मिळाले त्याप्रमाणें अगदीं हुबेहूब एक पक्षी मला आढळला. यावरून हे पहाडांत राहणारे पक्षी असावेत असें दिसतें. पण यांची दुर्मिळता खरी. या गणपतीनें नुकतेंच वैशाख शुद्ध एकादशी शके १८४६ रोजीं कवच टाकिलें. तें दीड फूट जाडीचें होतें. यावरून तें निदान पांचशें वर्षांचें तरी असावें असा अजमास आहे. हें कवच टाकल्यामुळें मूळ गणपतीच्या मूर्तीचें आतां दर्शन होऊं लागलें आहे. तेंही विन्मुख तोंडाचें म्हणजे पाठीकडचें होतें. श्रीगणपती, मारुती व देवी या शिंदूर चर्चित देवतांचीं मूळ दर्शनें ह्या शेंदुराच्या कवचामुळें अदृश्य असतात.

यानंतर आह्मी खालीं उतरलों तों बरीच संध्याकाळ झाली. गांवांतील सर्व देवळांत दर्शनास जाण्याची भटजींची रीत होती त्याप्रमाणें ते देवळांत जात होते. मीही त्यांचे मागून गेल्यामुळें मला जुन्नरांतील सर्व देवतांचीं अनायासें दर्शनें झालीं व त्या देवळांची स्थिती समजली. नंतर भटजी घरीं जाऊं लागले ह्मणून शिष्टाचाराप्रमाणें आभार प्रदर्शक उभयतांचे नमस्कार चमत्कार झाले.

अशा प्रकारच्या भिक्षुकांशीं तंटाच व्हावयाचा कारण, बोलण्यांत व करण्यांत मुळींच मेळ नाहीं! आवडत्या कामांत अडचणी फार असल्यास कामास सुरुवात होण्याचा संभवच नसतो. ह्मणून धूर्त मनुष्य आपमतलबाकरितां त्या अडचणींचें दिग्दर्शन करीतच नाहीं. सर्व कांहीं यथास्थित आहे, हें अत्यंत उपयुक्त व फायदेशीर असून सहज होण्याजोगें आहे असें सांगून कार्याला सुरवात झाल्यावर त्यांचे एकेक नवें नव पिलूं बाहेर निघतें व अखेर त्या धूर्तांच्या ह्या आचरटपणाचा तिरस्कार व वीट येतो. पण मग आरंभलेलें कार्य मध्येंच टाकितां येत नाहीं. कारण, त्यांत आरंभ करणाराचें अतोनात नुकसान होतें. ह्या भटजींनाच हंसाला नको. सरकारच्या बॅंकवेच्या कामाचा व त्याच्या धोरणाचा अनुभव जगापुढें आहेच!! ह्या भटजींनीं तीर्थप्रसाद घरीं करण्याचें कां नाकारिलें याचें कारण त्यांनीं येतांना सांगितलें कीं, आतां मला बायको नाहीं. घरांत वितुष्ट आहे. तें तुह्माला सांगून काय उपयोग? सांगितल्यास तुह्मी दुसरेकडे जाल किंवा कांहीं करणार नाहीं. ह्मणून हा बेत केला!! ही भिक्षुक मंडळी आपल्या क्षुल्लक स्वार्थासुद्धां यात्रेकरूला किती त्रास देण्याला

तयार असतात याचें स्पष्ट दिग्दर्शन व्हावें ह्मणून हें स्पष्टपणें लिहिलें आहे. शेवटीं भटजींनां स्पष्ट बजावलें कीं ह्या तुमच्या वृत्तीनें तुमची अपकीर्ति होऊन तुमच्या हेतूचा नास होईल. माझें भांडण झालें नाहीं ह्मणून याची कसोटी पहाण्याची इच्छा करूं नका.

घरीं आलों तों आठ वाजले. यानंतर दुसरे दिवशीं मी जुन्नरास सुडाचे कागद कसे करतात तें पाहण्यास गेलों. येथें कारखाने मोठ्या प्रमाणांत नसतात. एकाच घरांत एकाच मनुष्याच्या मालकीचा हा रोजगार असतो. स्वित्सर्लंड, जर्मनीप्रमाणें ह्या ठिकाणीं हा एक घरघुती धंदा आहे. येथील एका कारखान्यांत कागद करण्याची कृति पाहिली तीं अशी आहेः— प्रथम फाटक्या तुटक्या चिंध्या पाण्यांत भिजत घालून जवळ नदी आहे तींत त्या साफ धुतात. नंतर त्यांत रासायनिक द्रव्य घालून उकलून त्या सर्व पुन्हा धुऊन कुटून त्यांचा पांढरा स्वच्छ लोण्यासारसा लगदा करून त्याचे गोळे, करितात. नंतर एका चुनेगच्ची पक्क्या कुंडांत त्यापैकीं एक किंवा अनेक गोळे जसा कागद जाड किंवा पातळ करावयाचा असेल त्याप्रमाणें ते विरवून व जरूर तो रंग घालून त्याचें चांगलें घुसळण करून ताक करतात. नंतर कागद काढणारा मनुष्य एक बांबूच्या खड्याची विणलेली एक चाळण घेऊन येतो. ही चाळण तीन फूट लांब व अडीच फूट रूंद असते. ही करण्यांत मात्र फार कौशल्य आहे. जपानां चिकाचे पडदे असतात त्याच्या अष्टमांशाइतका हिचा खडा असतो. हे सर्व खडे एका अतीशय बारीक दोरीनें किंवा सुतानें अगदीं जवळ जवळ जोडून हा पडदा तयार केला असतो. याचे खडे इतके जवळ जवळ असतात कीं, त्यावर सोडलेल्या त्या ताकांतून फक्त पाणी खाली पडतें व वर सारवा मात्र राहातो. नंतर हा पडदा एका लाकडाच्या चौकटींत पक्का गच्च बसवितात. अशा बनविलेल्या चौकटीस दहा रुपये पडतात. ही चौकट येथील कारागिरच करून देतात. यानंतर कागद काढण्यांत येतो. तो असाः—ही चौकट पाण्यांत एकदां किंवा दोनदां बुडवून बेताचा साखा धरून वर काढतात. ह्मणजे तिच्यावर सारखा. साखा बसतो व पाणी निथळून जाई-पर्यंत तो तसाच अडकवून ठेवितात. साखा कमी आल्यास चाळण पुन्हां बुडवि-तात. चौकट लाकडाची असल्यामुळें ती नेहमीं तरते. बुडत नाहीं. तिला मुद्दाम बुडवावी लागते. अशा रीतीनें त्यावर साखा जमला ह्मणजे तो एका मोठ्या

पाटावर ती सारी चाळण उपडी करून काढून घेतात. अशा रीतीनें त्या साळ्यांची रास करितात. त्यांतून पाणी गळतच असतें. असे हे कागद येथील कारागीर फार जलद काढतात. चांगले कारागीर एका मिनिटांत चार पांच तरी काढितात. यांत साखा सारखा बसविण्याचें फार कौशल्य आहे. सर्वांत पातळ कागद काढणें फार कसबाचें आहे. पण त्यास किंमत जास्त द्यावी लागते व विलायती कागद त्या मानानें फार स्वस्त मिळतो. पण हा कागद जितका टिकाऊ असतो, तितका विलायती नसतो. येथील सर्व कामें हातानें करावीं लागतात व विलायतेंत तीं यंत्रानें होतात. ह्मणून विलायती कागद वजनांवर विकतां येतो, व किंमतींत फायदेशीर पडतो. त्याची वजनावर किंमत ठेवितां येते तशी याची वजनावर ठेवितां येत नाहीं.

त्या ढिगाचें पाणी पाझरून गेल्यावर एकेक कागद काढून तो उतरत्या भिंतीवर उभा वाळत लावतात. तो येथें वाळला ह्मणजे पुन्हां उन्हात वाळवितात. ह्मणजे तो चांगला स्वच्छ पांढरा बनतो. नंतर दुसरे दिवशीं तो मऊ झाला ह्मणजे घोटणाऱ्या बाया असतात त्या ते सर्व कागद दगडाच्या घोटणीनें घोटून त्यास झिलाई देतात. अशानें कागद इस्तरी केल्याप्रमाणें पांढरा किंवा पाहिजे त्या रंगाचा घोटीव तयार होतो. नंतर त्याच्या चारी बाजू कापून रिमें बांधतात. सरकारी नकाशास, सुडाला व व्यापारी लोकांच्या वह्याला बहुधा हेच कागद वापरतात. ह्यांतील कामें करणारे लोक निरनिराळे असतात. चिंध्या कुटून धुऊन लगदा करणारे वेगळे, कागद काढणारे वेगळे व ते घोटून त्यास सफाई करणारे वेगळे त्यांची मजुरीही वेगवेगळी असते. सर्वांत कागद काढणाराला मजुरी जास्त द्यावी लागते.

हे सर्व कारखाने मुसलमान लोकांचे आहेत. या जातीचा परदेशचा कागद पूर्वी येत नव्हता तेव्हां या कारखान्यांची भरभराट होती. पण आतां यापेक्षां सरस असा विलायती कागद येऊं लागून व स्वस्तही मिळूं लागला यामुळें हे कारखाने बसत चालले आहेत. पूर्वीं ह्या गांवीं असे वीस पंचवीस कारखानें होते. आतां चार पांचच राहिले आहेत व तेही डबघाईसच आले आहेत. हिंदुस्थानाच्या सर्व कलांचा असा नाश होत आहे, त्याप्रमाणें हिचाही होईल असें वाटतें. कालांतरानें हे कारागिरही नाहींसे झाल्यामुळें ही सर्व कला आपलेकडून नाहींशी होईल हें फार वाईट आहे. स्वदेशी हुन्नर कलांनीं व त्यांच्या पुरस्कर्त्यांनीं याकडे लक्ष द्यावें.

या ठिकाणीं एका देवळांत मला एका साधूचें दर्शन झालें. त्याची कीर्ति मुख्यतः त्यास बऱ्याच सिद्धी साधल्या आहेत, याविषयीं आहे. नदींमध्यें कितीही पाणी असलें किंवा कितीही वेग आला तरी ते वरून चालत जातात, असें लोक सांगतात. मनोभावानें त्यास नमस्कार करून नंतर मी जुन्नरापासून तीन कोसावर

## ओझर

ह्मणून गांव आहे तेथें जाण्याचें ठरविलें. हें अष्टविनायकापैकीं विघ्नेश्वर गणपतींचें स्थान आहे. अष्टविनायकांच्या स्थानांत ओझरचें स्थान विशेष रम्य आहे. येथील देऊळ व भोंवतालचें काम उत्तम आहे. चिंचवडच्या देवाचे वंशज येथें पुजारी आहेत. त्यांना ह्या देवस्थानानिमित्त दोन हजारांचें उत्पन्न आहे. या ठिकाणीं श्रीगजाननांनीं विघ्ननायक राक्षसाचा पराभव केला, ह्मणून येथल्या गणपतीला विघ्नेश्वर हें नांव प्राप्त झालें. तेथें जाण्याकरितां गाडी केवढ्याला मिळेल ह्मणून, मी उतरलों होतों तेथें ह्मणजे जुन्नरास तपास केला. कोणी ह्मणे तीन रुपये घेतील, कोणी ह्मणे चार घेतील ! वगैरे वाटेल तसें सांगत. स्वतः गाडीवाला काय, जास्त पैसे सांगणारच. पण कबूल करणाऱ्यानें देशकाल वर्तमान पाहून ठरविलें पाहिजे. शेवटीं मी गाड्यांच्या अड्ड्यावर जाऊन तपास केला. तेव्हां रुपाया दीड रुपायाला गाडी मिळेल असें समजलें. आणि ते तीन कोसांचे ह्मणजे जाऊन येऊन सहा कोसांचे हिशोबाला सरासरी योग्य आहे असें वाटलें. रस्ता सडकेचा नाहीं. कोणीतरी सोबतीकरतां गडी घ्यावयाचा, त्यापेक्षां गाडी करणें बरें ह्मणून गाडी केली. शिवाय मजूर केला तरी तो बारा आणे रुपाया मागणारच. त्यापेक्षां हें बरें ह्मणून गाडी केली व ती जरूर लागल्यास परतीच्या बोलीची केली होती.

मी गाडीकरून सकाळीं दहा वाजतां निघालों. त्या दिवशीं संकष्टी चतुर्थी असल्यामुळें उपासच होता. गाडीवान व त्याची गाडी चांगली होती. बारा वाजतां जाऊन मी तेथें पोहोंचलों. तेथें पोहोंचल्यावर उपाध्येबोवास विचारिलें कीं, गाडीवानास ठेऊन घेऊं किंवा जाऊं देऊं. कारण चतुर्थीचें पारणें रात्रीं अकरा वाजतां सुटणार यापुढें निघणें बरें नाहीं. तेव्हां ते ह्मणाले, गाडी जाऊं द्या, उद्यां जुन्नरचा बाजार आहे. येथून पुष्कळ गाड्या जातील त्यांपैकीं

कोणाच्याही गाडींत तुमची सोय फारच सवडीनें करतां येईल. तेंव्हां या गाडी-वानास एक वेळचे ठरलेले पैसे देऊन रजा दिली.

नंतर प्रथम मी श्रीविघ्नेश्वराचे दर्शनास गेलों. दर्शन रम्य आहे. उपाध्ये-बोवांच्या एकादष्ण्या चालल्याच होत्या. त्यांत मीही एक सांगितली. देऊळ दगडी असून भोंवतालीं प्रशस्त फरसबंदीचें पटांगण आहे व त्यासभोंवतीं किल्ल्यासारखा फारच उंच व भव्य कोट आहे. व त्याचें आंत उतरण्याला चांगल्या जागा राखिल्या आहेत. देवळाखालीं जवळच एक लहान नदी वाहात असल्यामुळें चांगली सोय झाली आहे नदीला गांवच्या बाजूनें घाट आहेत: नदी लहान खरी पण तिला नेहमीं थोडेंबहूत वाहतें पाणी असतें गांव लहानच आहे व त्या गांवांत मोठें घर काय तें इनामदाराचेंच आहे. हे ब्राह्मण असून गण-पती संस्थानचे अधिकारी आहेत. हें चिंचवडच्या देवांचे वंशज आहेत. उपाध्ये-बुवा व हे यांशिवाय ब्राह्मणांचें घर मुख्यतः नाहीं. मीही नदीवर स्नान करून एकादष्णी करूं लागलों.

अशा विशिष्ट ठिकाणच्या देवस्थानांमध्यें हा विशिष्ट गुण दिसतो कीं येथें येऊन दर्शन घेतल्यानें किंवा त्याचा सहवास केल्यानें मनाला एक प्रकारचें विशेष समाधान होतें. एकादष्णी करण्याचा तरी हाच हेतु दिसतो कीं, निदान संसारिक किंवा व्यवहारीक कृत्यें दोन घटका तरी थांबवून अशा ठिकाणीं देवा-संन्निध त्याचे गुणवर्णनपर मंत्र ऐकत वास्तव्य घडावें. पण लोक काय करतात. हा सर्व विधी उपाध्यामार्फत हिरण्यद्वारा उरकतात ! आणि उपाध्ये देवावर पाण्याची धार ठेवून देवापासून बरेच लांब तों दिसणार नाहीं इतक्या अंतरावर मंत्र ह्मणत बसतात. मग देवावर धार पडते आहे किंवा नाहीं हें पाहातो कोण ? सगळाच बाजार! यामुळें इष्ट हेतु जावा तसा सिद्धीस जात नाहीं. मी जरी उपाध्येबुवांना एकादष्णी करावयास सांगतों तरी स्वतंत्रपणें स्वतः पद्धतशीर मी ती त्यांचेबरोबर करतों. निदान मी तेथें ती चालेपर्यंत बसतों. उपाध्याला सांगण्याचें कारण त्यास आपले हातून कांहींतरी मिळावें व त्यांच्या चालीरीती कळाव्या यापेक्षां दुसरा नाहीं. ब्राह्मणद्वारा पूजा करावी असें सांगण्यांत तरी हाच हेतु आहे. ब्राह्मणास आपले-पासून कांहीं पैसे मिळावे व त्यानें ब्राह्मणाचें रक्षण करावें. ह्मणून ब्राह्मणाचें हें उदरनिर्वाहाचें साधन केलें आहे. त्यांचा जर त्यावर निर्वाह होणार नाहीं तर ते

हा धंदा करणार नाहींत व त्यामुळें वेदसंस्कारांचा व धर्मकर्मांचा लोप होऊन जाईल. पण असें जरी असलें तरी स्वतः एकादष्णी केल्याचें पुण्य विशेष आहे. आपणांस येत नसेल तर उपाध्येबुवा करीत असतील ती पाहात तरी देवासन्निध बसावें. खुद्द अभिषेकपात्र यजमानानें आपले हातांत घ्यावें असें शास्त्रवचन आहे. ह्मणजे श्रीच्या दर्शनाचा व सान्निध्याचा लाभ होऊन त्याचें पुण्य मिळेल, तसें हिरण्यद्वारानें मिळणार नाहीं मी संध्याकाळपर्यंत सुमारें दोन तास देवळांतच होतों.बाहेर कडक उन्ह पडलें होतें.पण देऊळ दगडी असल्यामुळें आंत फारच गार होतें धूपदीप अर्चन चालू असल्यामुळें त्याचे सुवासिक परिमाणु श्वासोश्वासाबरोबर नाकांत जातात यामुळें पूजा करण्यास सांगण्याचा उद्देश सिद्धीस जातो. नाहींतर लोक एकादष्णी करण्यास सांगतात, उपाध्येबुवा त्यांस तीर्थ व अंगारा देतात कीं झालें काम ! ही शुद्ध कवाईत आहे. अशानें कोणासही फायदा होत नाहीं. पण सर्व ठिकाणीं हें असेंच आहे ! देवाजवळ धूपदीप लावतात, सुंदर सुवासिक फुलें कशीं तरी वाहतात व आपण फार लांब जाऊन बसतात किंवा घरीं जातात अशानें त्यांना कांहीं फायदा होत नाहीं. कोणचीही धार्मिक वस्तु किंवा विधी मनुष्याच्या उपयोगाकरितां असतो. पण ती देवाला देऊन घ्यावी यांत सुखाचा दाता देव आहे ही जागृति रहावी हाच मुख्य उद्देश आहे. देव त्या वस्तूचा निःशेष उपभोग घेतो व ती निसत्व होते असा अर्थ कोठेंच नाहीं. त्या वस्तूचा उपयोग मनुष्यांनीं घेतला पाहिजे. पण तो देवाच्या प्रसादद्वारा ह्मणजे पूजेच्या रूपानेंच घ्यावा हाच उद्देश आहे. तो उपभोग जर घेतला नाहीं तर एवढा खटाटोप कशाला केला ? देवाला त्या वस्तु वाहिल्यानें त्यांचा उपयोग कुटुंबांतील सर्व मंडळीस होतो. एका मनुष्याजवळ असल्यास त्याच्या सहवासानें ती वस्तु बिघडते व निरूपयोगी होते. ह्मणून गंधपुष्पें धूपदीप देवालाच अर्पण करावीं. व सर्वांनीं तेथें देवाची स्तुति–स्तोत्रें किंवा आरत्या ह्मणत बसून उपभोग घ्यावा, प्रौढ मन होण्याचें हें एक साधन आहे देव खात नाहीं अथवा पीत नाहीं हें सर्वांना माहीत आहे तरी असें करण्याचें कारण दुसरें काय असणार ?

एकादष्णी संपल्यावर मी इकडेतिकडे फिरून देऊळ, गांव व नदी व तिच्या भोवतालची शोभा पाहिली. नदी लहानच अगदीं ओढवजा आहे. पाणीही अगदीं उथळ आहे. घाटही लहानच बेताचा आहे, यामुळें तेथें सकाळीं

व संध्याकाळीं स्नानसंध्या करीत बसण्याची मजा वाटली. संध्याकाळीं पुन्हा गणेपतीची पूजा सुरू झाली. रात्रीं सांगता झाली. सांगतेला बरीच मंडळी आली होती. ही सांगता देवळांत झाली नाहीं. उपाध्येबुवाचे घरीं झाली. बहुतेक अष्टविनायकांचे ठिकाणीं संकष्टी चतुर्थीचा प्रसाद देवळांत असतो. मग येथें कां नाहीं ? अशाबद्दल लोकांचा विचारूनसुद्धां नीटसें उत्तर मिळालें नाहीं. ही कारभाऱ्यांची इच्छा असें ह्मणतात. कोणी जागा सोयीची नाहीं. ब्राह्मण मंडळी नाहीं अशीं कारणें सांगतात. पण तीं पटण्यासारखीं नव्हतीं.

मला परत नेण्याकरितां गाडी पाहाटेस निघणार होती, ह्मणून पांच वाजतां उठून नदीवर स्नानसंध्या उरकून घेतली. सकाळीं उजाडलें, दिवस पुष्कळ वर आला तरी गाडीचा पत्ता नाहीं. तपास करतां गाडी अजून गेली नाहीं, तो गाडीवान लवकर येईल असें समजलें. नंतर गाडीवान आला. तेव्हां उपाध्येबुवांनीं मला सांगितलें याचा कांहीं गाडीचा धंदा नाहीं, मोहबतीखातर हा नेत आहे. याला दस्तुरी पडेल, सबब तुह्मी जें येतांना दिलें त्यापेक्षां दोन आणे याला जास्त द्या. मी ह्मटलें हे काय ? आणि त्यांत मग मोहबत कसली ? मला स्वल्पांत गाडी देणार होतां ती हीच का ? शेवटीं गाडी पाहिली तीही विचित्रच. ती वरपर्यंत धान्याच्या गोणांनीं भरलेली होती. रस्ता वाईट, वर छप्पर नाहीं, बैलांना वेसणी नाहींत, अशा गाडीवर उंटाप्रमाणें मला आपल्या भरलेल्या पाकिटासुद्धां तोल संभाळून बसावें लागलें ! हें कसें काय निभतें याची मला शंका होतीच, ह्मणून प्रत्येक उताराचे वेळीं मी खालीं उतरतों ह्मणून ह्मणत असें. परंतु गाडीवान ह्मणाला दादा घाबरूं नका, हे बैल नेहमीच्या परिचयाच्या रस्त्याचे आहेत, असें ह्मणून दोन तीन साधारण उतरणी गेल्या. शेवटीं एक ओढ्याचा कठीण उतार आला त्यावेळीं मी उतरूं लागलों पण गाडीवानानें गाडी उभी न करितां बैल हांकले आणि वळणाच्या उतारावर तिचें एक चाक झाडाच्या मुळावर चढून गाडी उलटी झाली, मी खालीं पडलों, पाकीट माझ्यावर पडलें, आणि तें फाटून आंतील सामान अस्ताव्यस्त चोहोंकडे पसरलें ! ! त्याच्या गोणीही खालीं पडून त्या फुटल्या. धान्याचा नाश झाला. बैल उधळले. थोडक्यांत चुकलें नाहींतर त्या गोणी माझ्याच अंगावर पडल्या असत्या; पण तसें झालें नाहीं हा परमेश्वरी प्रसादच समजावयाचा किंवा दुःखांत सुखच समजावयाचें दुसरें काय ? मी पडल्यावर गाडीवाल्यानें

बैल थांबवून प्रथम गाडी उभी केली व मजजवळ मला उठविण्याकरितां आला. तो मनांत फार ओशाळला. मी त्याची पक्की खरडपट्टी काढली कीं आह्मी प्रवासांत गाडी कशाकरितां करतों ? आमच्या जिवाला इजा अगर त्रास होऊं नये ह्मणून. नाहींतर एवढी तीन कोस जमीन आमच्यानें चालवत नाहीं इतके आह्मी पांगळे आहों काय ? पण तुझ्या गाडींत बसण्यानें मात्र मला पांगळेपणा आला ! माझ्या मनांत त्याच्या गाडीवर पुन्हां बसावयाचेंच नव्हतें. पण पडल्यांमुळें ढोपा दुखावला होता, शिवाय सामानाकरितां ह्मणून मी पुन्हां गाडींत बसलों. माझ्या पाकिटाच्या सामानाची आफरातफर होऊं नये ह्मणून तें मी एका धोतरांत बांधून घेतलें. दुसऱ्यावर विश्वास धरला, विशेषतः क्षेत्रस्थ उपाध्ये व देवाचे भक्त यांच्यावर विश्वास ठेवला ह्मणजे नेहमीं असा प्रसंग येतो. हें लोकांना समजावें ह्मणून अशा प्रकारचे प्रसंग मी आपल्या वर्णनांत देत असतों. उपाध्येबुवा काय व गाडीवाले काय त्यांना आपमतलबाशिवाय दुसरें कांहीं दिसत नाहीं. मग याकरितां यजमानाचें किती नुकसान झालें किंवा आपली अपकीर्ति पसरली तरी त्यांना त्याची लाज वाटत नाहीं. यजमानाजवळून पाठवणी झाली आहे, आतां तो मेला तरी हरकत नाहीं, ही त्यांची नीच वृत्ति सुधारली पाहिजे. उपाध्यानें यजमानाचें असें अनिष्ट चिंतिल्यावर त्याला पैसे मिळाले असले तरी तें यशालाभास कसे येणार ? ही त्यांची सुधारणा व्हावी व यात्रेकरूंनीं सावध राहावें, ह्मणूनच असे उल्लेख ठिकठिकाणीं केले आहेत. असो. या गणपतीचें नांव विघ्नेश्वर, त्याप्रमाणें यानें विघ्न आणून त्याचें निवारणही केलें व आपला प्रत्यक्ष प्रभाव दाखविला. नंतर मी सकाळीं दहा वाजतां जुन्नरास अड्यावर आलों, तों पुण्यास जाण्याकरितां मोटार तयार होतीच. तींत बसून चार वाजतां पुण्यास आलों. लगेच पांच वाजतां लोणी स्टेशनवर जाणेंकरितां गाडी तयार होती तींत बसून

## थेऊर

येथें गेलों. त्या दिवशीं सर्व दिवसभर उपास काढून रात्रीं आठ वाजतां भोजन मिळालें ! प्रवासामध्यें असें निरूपायानें होतें.

लोणी स्टेशनपासून थेऊर सुमारें पांच मैल लांब आहे. स्टेशनपासून सोलापूर सडकेनें दोन मैल सोलापूरकडल्या मार्गानें गेल्यावर डावीकडे दुसरी सडक

रेल्वेलाईन उलटून पलीकडे गेली आहे. तेथून पुढें थेऊर तीन मैल आहे. स्टेशनवर व येथेंसुद्धां गाडीचा तपास केला पण गाडी मिळेना व मजूरही मिळेना. गांवढे गांवामध्यें हीच अडचण असते, ह्मणून बोजा घेऊन लोकांस विचारीत विचारीत चाललों होतों इतक्यांत एक गाडी त्याच मार्गानें जाणारी दिसली. गाडीवानाला थेऊरास येतोस का ह्मणून विचारलें. मी परका मनुष्य आहे असें पाहून त्यानें भाडें दीड रुपाया सांगितलें! न करत्याचा वार शनवार ह्मणतात त्यासारखेंच हें. पण त्याच गाडींत एक पुण्याचा मनुष्य होता, त्यानें सांगितलें सहा आणे द्या आणि बसा. मी कबूल केलें. पण गाडीवान ह्मणाला, माझी गाडी थेट थेऊरपर्यंत जाणार नाहीं. आमचे घराकडे वाट फुटते तेथें मी जाईन. तेथून थेऊर एका हाकेवर आहे. इतकें जवळ असल्यास चालेल असें मी ह्मटलें व गाडींत बसलों. त्याचें ठिकाण आल्यावर त्यानें उतरण्यास सांगितलें व मला रस्ता दाखवून दिला व गांव दाखविला ह्मणून मी त्यास पैसे दिले. पण त्यानें दाखविलें तें थेऊर गांव नसून तेथून थेऊर गांव दीड दोन मैल लांब आहे असें समजलें! संध्याकाळची वेळ, काळोखी रात्र, अनोळखी रस्ता, सडक नाहीं. वाटेंत कोणी भेटत नाहीं. तेव्हां कोठें दिवा दिसला ह्मणजे रस्त्याची चौकशी करावी. रस्ता फुटल्यापासून सडक नाहीं. अशा रीतीनें कसातरी लोकलफांडी रस्त्यानें मी रात्रीं आठ वाजतां थेऊरास पोहोंचलों!! फार त्रास झाला. ह्मणजे गाडीवाल्यानें एक दीड मैलाचे सहा आणे घेऊन मला असें फसवलें. तेव्हां आतां कोणावर विश्वास असा ठेवावयाचा नाहीं असें ठरविलें. असा विश्वास कोणीही ठेवीत नाहीं, पण अडचणींत सांपडल्यामुळें असें कधीं कधीं करावें लागतें एवढेंच!

मी थेऊरास पोहोचलों त्यावेळीं देवाचा चौघडा संपून आरती व मंत्रपुष्पही संपलें होतें. अनायासें देवाचे दर्शनाचे वेळीं गेलों होतों. यथासांग दर्शन व तीर्थप्रसाद मिळाला. देवाची मूर्ती सुमारें दीड दोन फूट सिंदूरचर्चित बसलेली अशी साधी पण तेजस्वी व दर्शनीय आहे. नंतर मी एका पंड्याकडे ह्मणजे उपाध्याकडे गेलों. तेथें रात्रीं नऊ वाजतां भोजन झालें. उपाध्येबोवास यात्रेचा उद्देश सांगून त्यास एकादष्णी करण्यास सांगून त्यांनीं दिलेल्या जागीं निजलों व दुसरें दिवशीं गांव पाहिला.

थेऊर गांवामध्यें हल्लीं थोडी ब्राह्मण वस्ती आहे. थोरल्या माधवराव पेशव्यांचें हें आराध्य दैवत होतें. त्यांनीं आपला देह येथें श्रीचरणीं ठेविला. देऊळ दगडी असून सभामंडप लांकडी आहे व त्यांत संस्थानच्या कचेरीच्या जागा आहेत. देवळाभोंवतीं ओऱ्या व सोपे आहेत, त्यांपैकीं ज्या सोप्यांत श्रीमंतांचा अंत झाला तो सोपा लोकांनीं दाखविला. पेशवे या गांवीं कधीं कधीं राहत असत. त्याकरितां या ठिकाणीं पेशव्यांनीं एक लहान वाडाही बांधला होता, तो आतां नामशेष झाला आहे. त्यावर इमारत नाहींच पण त्याच्या जोत्याची जागा दाखवितात. ती गणपतीच्या देवळाजवळच आहे. हरिपंत फडक्यांच्या बहादुरीबद्दल पेशव्यांनीं त्यांना वंशपरंपरेनें चौघडा बक्षीस दिला होता. तो चौघडा त्यांनीं न घेतां तो आपल्या उपास्य देवास दिला असें तेथले पुजारी ह्मणतात आणि त्यामुळें त्यांचें नांव चिरकाल राहिलें. आपल्या वंशजाकडे त्यांनीं तो ठेविला असता तर अनेक राजकारणांमुळें तो राहिला नसता. पण तो या देवस्थानाकडे कायमचा राहिला. कारण देवाला शत्रु कोणी नाहीं. या चौघड्यावर ११ माणसें असून त्याबद्दल सरकारांतून वर्षाचे आठशें रुपये मिळतात. या देवळांत एक मोठी घंटा आहे ती पेशव्यांनीं पोर्तुगीज लोकांपासून घेतली असें ह्मणतात. देवळापासून नदीपर्यंत एक लहान फरसबंदीची सडक बांधलेली आहे. नदी गांवाबाहेर सुमारें दोन फर्लांग अंतरावर आहे. नदीवर प्रशस्त घाट बांधले असून त्यांत श्रीमंतांचें ज्या घाटावर दहन झालें व जेथें त्यांची स्त्री प्रसिद्ध रमाबाईसाहेब पेशवे ह्यांनीं त्यांचेबरोबर सहगमन केलें त्या ठिकाणीं त्या सतीचें वृंदावन आहे. ही ऐतिहासिक गोष्ट ह्मणून विशेष प्रसिद्ध आहे. रावसाहेब माधवराव पेशवे यांची प्रकृति चांगली चालत नसल्यामुळें त्यांचा ओढा राजकारणापेक्षां देवाधर्माकडे विशेष लागत असे. प्रसिद्ध निस्पृह न्यायाधीश रामशास्त्री प्रभुणे यांनीं त्यांची एकदा या कामीं कानउघाडणी केलेली इतिहासप्रसिद्ध आहेच. परंतु प्रकृतीच्या अस्वस्थतेमुळें तिचा व्हावा तसा उपयोग झाला नाहीं. यापुढील पेशव्यांचें लक्ष राजकारणाकडे कमी होऊन देवधर्म, विलास व चैन यांकडे जास्त लागलें, हें त्यांच्या शत्रूंना कळलें. हें पेशवाईच्या नाशाला जीं अनेक कारणें झालीं त्यांपैकीं एक आहे. आणि ह्या गोष्टीचा दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दीत कळस झाला! राजकारण मूर्ख व अगदीं नालायक मनुष्यांच्या हातांत गेलें. प्रसिद्ध मुत्सद्दी नाना

फडणवीस व बापू गोखले यांसारखे थोर मोहरे इरेस पडून नाहींसे झाले. हें पाहून त्यावेळच्या राजकारणी सरदार लोकांनीं मूळ दौलतीचें संरक्षण न करितां आपल्या पोटाकडे लक्ष दिलें. यामुळें इतिहासांत मराठेशाहीस कायमचा कलंक लागून दौलतीचा नाश झाला. असाच प्रसंग संभाजीच्यावेळीं कलुशा ब्राह्मणामुळें आला होता, पण त्यावेळीं सरदारांना मुख्य दौलतीचा अभिमान होता. त्यामुळें त्यांनीं औरंगजेबासारख्या कडव्या मुसलमानासद्धां जर्जर करून पैगंबरवासी केलें. मनुष्याचा स्वार्थ व द्वेष प्रसंगीं किती नाश करील याचा नेम नसतो. ते सरदार ज्या वृक्षाच्या आश्रयास राहिले होते तो वृक्षच आपल्या मतलबाकरितां त्यांनीं पाडण्याचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष तरी प्रयत्न केलाच आणि आतां त्यांचे वंशज विचार करीत बसले आहेत !!!

हा प्रदेश मुळामुठा नदीच्या योगानें समृद्ध झाला आहे. याशिवाय येथील स्वाभाविक सृष्टिसौंदर्य दिसलें नाहीं. मग काय कारणानें येथें देवस्थानाची स्थापना झाली असेल तें समजत नाहीं. कदाचित् त्यावेळीं कांहीं विशेष कारण घडलें असेल. येथें नदीचा घाट मात्र रम्य आहे. या थेऊरला जी नदी आहे तिला बारमाही पाणी असतें. या डोहाला कदंबतीर्थ किंवा चिंतामणी तीर्थ ह्मणतात. इंद्रानें अहिल्येशीं केलेल्या व्यभिचाराच्या दोष व शाप निवृत्यर्थ त्यानें विनायकाला येथेंच प्रसन्न करून घेतलें व आपलें इंद्रपद पुन्हा मिळविलें. हल्लींची चिंतामणीची प्रतिमा इंद्रानें स्थापन केली आहे किंवा वरेण्यपुत्र विष्णूनें स्थापन केली आहे, हें निश्चित नाहीं. इंद्रानें स्थापल्याबद्दल गणेश पुराणांत उल्लेख आहे. चिंचवडच्या मोरया गोसाव्यांना येथेंच सिद्धी प्राप्त झाली. त्यांनीं ज्या ठिकाणीं अनुष्ठान केलें, तेथें चौथरा बांधिला आहे. विनायक त्यांचेपुढें व्याघ्ररूपानें आला. त्याच्या स्मारकाचा एक दगड तेथें असून त्याला वाघ ह्मणतात.

येथील उत्सवाची व अन्नसत्राची व्यवस्था चिंचवड संस्थानांतून चालते येथील चौघडा पेशव्यांकडून आहे व हरिपंत फडक्यानीं दिलेला चौघडा सिद्धटेकला आहे, असेंही कांहीं ह्मणतात. जुनें थेऊर नदी लगत होतें; हल्लीं तेथें कांहीं घरांचे चौथरे व कांहीं देवळेंही आहेत, पण तेथें वस्ती नाहीं. नवें थेऊर चिंतामणीचे देवळाभोंवतीं आहे.

परत स्टेशनवर येतांना मी गाडी न करितां उपाध्येबुवांनीं मला एक

ओझ्याकरितां मोलकरीण पाहून दिली होती. तिनें जवळच्या वाटेनें मला स्टेशनवर लौकर आणलें, कारण तिला स्टेशनवरून लौकर परत आपल्या घरीं यावयाचें होतें. यामुळें तिचा जलदींचा लकडा मोठा होता. ही बाई मराठ्याची असून मोठी सात्विक दिसली. आह्मी प्रामाणिकपणें आपली उपजीविका करतों, यामुळें आमच्या घरांत नेहमीं शांति व समाधान आहे, असें ती ह्मणाली. दारूचा प्रभाव तुमच्या घरांत आहेना, असें मीं तिला सहज विचारिलें. तेव्हां ती रागावून ह्मणाली, छे! आमचेकडे दारूचें नांव काढतां कशाला? विडीचासुद्धां संबंध नाहीं. आणखी जास्त काय सांगू? मी ह्मटलें, तूंसुद्धां तशीच आहेस काय? तर अभिमानानें ती हो असें ह्मणाली. तूं माहेरीं गेलीस ह्मणजे काय होतें.? तर मी आपला हा नियम माहेरींसुद्धां मोडीत नाहीं असें ती ह्मणाली. बरें तुमचेकडे पाहुणे आले किंवा तुमच्या जातीच्या जमातीमध्यें तुह्मीं गेलां ह्मणजे काय होतें? अशी मी तिची बरीच छाननी केली. पण तिनें एकच जबाब दिला व तो अगदीं एकनिष्ठेचा दिसला. तिचा व तिच्या नवऱ्याचा आपल्या गांवच्या ह्मणजे थेऊरच्या चिंतामणी मोरयाच्यावर फारच मोठा विश्वास आहे. अशा प्रकारच्या शुद्धांतःकरणाच्या व सत्वगुणविशिष्ट मंडळीला शूद्र कसें ह्मणावें? पूर्व संस्कारानें त्यांना शूद्र योनी आली एवढेंच. बाकी ते खरे ब्राह्मण आहेत. रामदास, तुकारामाबद्दल असेंच ह्मणाले.

**जयाची वदे पूर्ण वेदांत वाणी ।**
**ह्मणावें कसें हो तयालागीं वाणी ।**

**आणि हेंच खरें आहे. मला जातांना सहवास लबाडाचा मिळाला तर परत येतांना सात्विक वृत्तीचा मिळाला, हेंच ईश्वरानें येथील समाजाचें वैशिष्ट्य दाखविलें. नंतर मी**

## केडगांव

येथें जाण्यास निघालों. केडगांव येथें स्वधर्म व विधर्म यांचा मोठा झगडा चालला आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. प्रसिद्ध पंडिता रमाबाई या खिस्ती होऊन आपल्या स्वदेशी मंडळीस कुऱ्हाडीच्या दांड्याप्रमाणें काळ होऊन बाटविण्याचा त्यांनीं येथें आखाडा घातला आहे. व त्यामुळें हिची विद्वत्ता आमच्या

नाशाला कारणीभूत झाली आहे. हा तिचा आखाडा अगदीं स्टेशनवर आहे. पण पुढें पांच सहा मैलांवर अलीकडील प्रसिद्ध साधु नारायणमहाराज यांचा संस्थानी आश्रम आहे. येथें हा आश्रम जागता असल्यामुळें रमाबाईच्या खिस्ती कोंडवाड्याचा फार बंदोबस्त आहे. आंत येण्यास कोणास परवानगी नाहीं. तसेंच आंतल्या माणसासही बाहेर जाण्याची परवानगी नाहीं. आपल्या कळपांत मेंढरांनीं यावें ह्मणून बायबलांतील कांहीं उपदेशपर वाक्यें तिच्या कोटाबाहेर ठळक अक्षरांनीं लिहिलेलीं आहेत. खिश्चयन लोकांना आमच्या समाजांत देवळापुढें हिंदुधर्माची टर उडविण्याचा अधिकार आहे. पण आह्मी त्याचा नुसता प्रतिकार केल्यास मॅजिस्ट्रेटकडून सूचना होतात किंवा शिक्षा होते. पण आह्मी खिश्चयन समाजांत जाऊन त्या धर्माचा उणेपणा दाखविला तर आमचेवर त्यांचेकडून हल्ला होतो व त्याबद्दल मॅजिस्ट्रेटपुढें तक्रार केल्यास तुह्मी आपल्या समाजांत उपदेश करा. त्यांच्या समाजांत कशाकरितां गेलांत ? त्यांनीं तुह्माला मारलें तें बरोबरच झालें, असें नेहमीं सांगण्यांत येतें ! पर, राष्ट्राचे हे सुखसोहाळे परराष्ट्र असेपर्यंत असेच भोगावे लागणार !

नारायण महाराजांचा आश्रम स्टेशनपासून सहा मैलांवर आहे. थेट आश्रमापर्यंत सडक नाहीं. शेवटीं एक मैल शेतांतून जावें लागतें, पण आतां मोटारी स्टेशनपासून थेट दत्त मंदिरापर्यंत जातात. हे अलीकडील काळांतील एक प्रसिद्ध साधु असून त्यांची शिष्यशाखा फार श्रीमंत आहे. कित्येक राजेरजवाड्यांनींसुद्धां त्यांना गुरु केलें आहे. महाराजांनीं त्यांस चमत्कार करून दाखवून त्यांच्या ऐहिक दुःखांचें परिमार्जन केलें असल्यामुळें किंवा करीत असल्यामुळें त्यांची त्यांच्यावर विशेष श्रद्धा आहे. याशिवाय अलीकडच्या काळीं साधूवर श्रद्धा बसणें शक्य नाहीं.

नारायण महाराजांचे बाह्य स्वरूप केवळ राजयोग्याप्रमाणें एखाद्या वैभवशाली श्रीमंताप्रमाणें किंवा राजाप्रमाणें आहे. त्यांना स्त्री व कुटुंबपरिवार मात्र नाहीं. त्याशिवाय बाकी सर्व सुखसोहाळे त्यांस आवडतात. व यामुळें त्यांचे भक्त त्यांस ते मनोभावानें अर्पण करतात. हे साधू अजून मध्यम वयाचे असून त्या ठिकाणच्या ब्राह्मण ब्राह्मणेतर लोकांसही ते पूज्य आहेत. पुष्कळ भाविक लोक अरिष्ट नाशार्थ किंवा शांत्यर्थ किंवा इष्ट कामना सिद्ध्यर्थ त्यांचे दर्शनास

जातात व श्रींचा आशीर्वाद होईपर्यंत राहून मनोरथ पूर्ण झाल्यावर परत जातात. स्टेशनपासून चार मैल सडक आहे. पुढें तीन मैल शेतांतून रस्ता आहे, सडक नाहीं. पण ती करण्याचा तयारी चालली आहे. सडक सोडल्यानंतर संस्थानचीं मंदिरें व इमारती दिसूं लागतात. मी सकाळीं स्टेशनवरून बेटावर म्हणजे या साधूंच्या आश्रमास जाण्यास निघालों, तों रस्ता विचारीत विचारीत दहा वाजतां तेथें पोहोंचलों. महाराजांचें दर्शन झालें नाहीं. ते कोठें भक्तजनांचे आग्रहावरून संचारार्थ गेले होते, सबब त्यांनीं स्थापलेल्या दत्त दर्शनार्थ गेलों. पण पाहारेकऱ्यानें स्नान केल्याशिवाय दर्शन होत नाहीं म्हणून सांगितलें, म्हणून स्नान करण्याच्या तजविजीस लागलों. माझ्या रीतीप्रमाणें धूळभेट झाली नाहीं. परमेश्वरी इच्छा ! प्रथम संस्थानामध्यें बिऱ्हाडाची व्यवस्था लावली.

येथील व्यवस्था फार उत्तम आहे असें ऐकिलें होतें, ती पाहण्याकरितांच मुद्दाम मी येथें आलों. बाकी महाराजांचें दर्शन मला मार्गेच झालेलें होतें. ही साधूची मठी नसून श्रीमंताचा व राजेरजवाड्यांचा राजवाडाच आहे, असें मला वाटलें. या संस्थानाकरितां निदान नऊ दहा एकर जमीन तरी अडलेली असेल ! या सर्व जमिनीला तारांचे मजबूत कंपाऊंड आहे. आंत निरनिराळे कामांकरितां निरनिराळ्या पण पक्क्या इमारती आहेत. एक चौसोपी मोठी धर्मशाळा, ज्यांत हजार दोन हजार मंडळींचा समावेश होईल एवढी मोठी आहे. तिचे एका भागांत संस्थानचें ऑफिस आहे. ऑफिसावर देखरेख व कमजास्त संबंधानें अखेरचा निकाल देणें खुद्द महाराजांचे हातीं आहे. त्याशिवाय नोकराचाकरांवर देखरेख महाराजांचे चुलतभाऊ, पुतणे, वगैरे नातलगांची आहे. सोपे बाहेरच्या बाजूनें बंद असून आंतले बाजूनें उघडे आहेत. मधल्या चौकांत रात्रीं एक कंदील लावला म्हणजे सर्व सोप्यांत धर्मशाळेभर उजेड पडतो. ह्या धर्मशाळेच्या एका भागांत भोजनाची व्यवस्था आहे. आंत मोठमोठीं भोजनपात्रें, पाण्याचे हौद व चुलीकरितां मोठमोठे हाळ किंवा चर खणले आहेत. जेवावयाचेवेळीं हीं सर्व दालनें पानें मांडण्याकरितां रिकामीं होतात. जागा पुरली नाहीं तर मधल्या चौकांतही पानें मांडितात. मोठ्या यात्रेच्याविळीसुद्धां ब्राह्मण-ब्राह्मणेतरांचे भाग निरनिराळे करतात. वर्णव्यवस्थेचा येथें चांगला बंदोबस्त आहे व तशा जिकडे तिकडे पाट्या मारलेल्या आहेत. व त्यांवर ती कशाकरितां आहे तें लिहून त्याखालीं " आज्ञा " असा शब्द लिहिलेला असतो.

यात्रेकरूंनीं प्रथम ऑफिसमध्यें यावें. त्याला जी जागा नेमून देतील तेथें त्यांनीं राहावें. कोणालाही तीन दिवस राहण्याला परवानगी आहे. याशिवाय कोणी कांहीं उद्देशानें आला असल्यास त्यानें तशी महाराजांची परवानगी घेऊन ते सांगतील तितके दिवस खुशाल राहावें. कोणी कांहीं अनुग्रहाकरितां येतात. कोणी विकलांग झालेले, आपले सर्व ऐहिक उपाय करून थकल्यावर केवळ ईश्वरी प्रसादाकरितां किंवा सद्गुरु प्रसादाकरितां आलेले असतात. त्यांना श्रींचा प्रसाद मिळेपर्यंत राहण्याची मुभा असते. मी गेलों त्यावेळीं असा एक सुशिक्षित मनुष्य रेल्वेमध्यें दोनशें रुपयांचा नोकर होता. त्याचे डोळ्यास कमी दिसूं लागलें ह्मणून त्यानें ऐहिक औषधोपचारांची सुरवात केली, तों त्याचे डोळेच गेले ! सर्व उपाय थकले. मिरजेस डॉक्टराकडे जाऊन पाहिलें. शवटीं डॉक्टरांनीं सांगितलें हे आतां सुधारणार नाहींत. जवळचे पैसे गेले. नोकरीही अर्थात गेलीच. तेव्हां एका भक्तानें त्यास येथें येण्यास सांगितलें त्यावरून ते येथें दोन वर्षे सुश्रुषेकरितां व प्रसादाकरितां येऊन राहिले. त्यांनीं आपली व्यवस्था करणेकरितां आपली वायको बरोबर आणली होती. तेथें राहिल्यानें कांहीं गुण आला आहे काय, ह्मणून मी त्यांस विचारिलें, तेव्हां त्यांनीं होय ह्मणून सांगितलें. औषध काय तर कांहीं नाहीं. पंक्तीला दोन वेळां जेवावें आणि महाराजांचें नामस्मरण करीत राहावें. त्यांच्या वाड्यांत भजन, पूजन, पुराण, कथा, कीर्तन होत असतें तेव्हा त्यांत बसून तें ऐकावें !

येथील जेवणाचा बेत अगदीं साधा असतो, ह्मणजे भात, ज्वारीची भाकरी आणि कांहींतरी पातळ आमटी. आमटीमध्यें डाळ, मीठ, तिखट अगदीं बेताचें असतें ती आंबट गोड वगैरे रसवर्ज्य अशी अगदीं पातळ साधी असते. या तीन वस्तू मात्र विपूल असून थोडा कण्यांचा भात प्रसादाकरितां ह्मणून खावा लागतो. ह्या प्रासादिक वस्तूकरितां तांदूळ, जोंधळे, डाळ यांच्या पोत्यांच्या ठिक्याच्या ठिक्या धर्मशाळेंत कोठारांत लागलेल्या असतात. लाकडें व त्यांचे ओंडे यांच्या राशी तर पर्वतप्राय आहेत. तसेंच पत्रावळींचे पुडेही पोटमाळ्यावर खचून भरलेले आढळले. हे पत्रावळींचे पुडे दर सालांत किती लागतात असें मी एका पंचास विचारिलें. तर आगगाडीच्या मालाचे चाळीस टनांचे नऊ डबे लागतात असें ते ह्मणाले ! एवढ्या पत्रावळीं कोठून आणतात, ह्मणून विचारिलें तर त्या गोव्याहून येतात असें ते ह्मणाले. येथें येणारा कोणताही माल

विकत घेतला जात नाहीं ! भक्तजनांकडून त्यांचा पाहिजे तेवढा पुरवठा होत जातो असें ह्मणतात. या पत्रावळीवरून येथील अन्नसंतर्पणाची व यात्रेची कल्पना येईल.

महाराज संस्थानांत असले ह्मणजे त्यांच्या दर्शनास बरीच मंडळी येत असते. चातुर्मास सुरू झाला ह्मणजे महाराज बाहेर कोठें कितीही महत्वाचे किंवा कोणीही भक्तानें आग्रहानें बोलाविलें तरी आपले संस्थानची मर्यादा उल्लंघून गांवांतसुद्धां जात नाहींत. ह्यावेळीं बरीच मंडळी दर्शनास व इष्ट कामना सिध्यर्थ येतात. येथें यात्रा व उत्सव असतात, त्यावेळीं हजारों यात्रा जमते. त्यावेळीं बसायलासुद्धां जागा मिळत नाहीं इतका समुदाय जमतो. त्यावेळची भोजनपात्रें, मोठमोठ्या कढया, भात करण्याचे बत्ते वगैरे मोठ्या कणग्याएवढाले आहेत. अन्नाच्या राशींच्या राशी पडलेल्या असतात. त्यावेळीं असा समारंभ सकाळीं नऊपासून रात्रीं नऊ वाजेपर्यंत चाललेला असतो असें ह्मणतात. ह्मणून अशा प्रकारच्या एका समारंभाचें थोडें वर्णन करूं, ह्मणजे त्यावरून इतरांची कल्पना होईल.

हा समारंभ नुकताच ज्येष्ठ शुद्ध १ शके १८५० तारीख २० मे १९२८ रविवार रोजीं करण्याचें महाराजांनीं ठरविलें होतें. रुद्र ह्मणणारे कमी मिळत असल्यामुळें हा अतिरुद्राचा अभिषेक एका दिवसांत व एका बैठकीस सहसा होत नाहीं. परंतु तो एका बैठकींतच करून टाकण्याचा महाराजांचा संकल्प झाल्यामुळें रुद्र ह्मणणारे १३३१ ब्राह्मण जमवावे लागले. याकरितां ऋग्वेदी व आपस्तंभ शाखेचे गृहस्थ व भिक्षुक ब्राह्मणांस केसरी वर्तमानपत्रांत आमंत्रण दिलें होतें. पण त्यांची विशेष सोय केल्याशिवाय इतके ब्राह्मण केडगांवीं एका बाजूला मिळणें शक्य नाहीं. तशांत हल्लीं धर्मग्लानी फार झाली आहे, तेव्हां एवढा शिकलेला ब्राह्मणसमुदाय मिळणें दुरापस्तच आहे, असें पुण्यांतील सुशिक्षित व पुढारी मंडळीनें आपल्या अनुभवानें महाराजांस सांगितलें होतें. त्यांना वाटलें, आह्मी जसें डोक्यानें चालतों व तसें चालण्याचा उपदेश करितों त्याप्रमाण सर्व जग फिरत आहे ! पण तो त्यांचा समज चुकीचा ठरला. अगदीं १३३१ नाहीं, तरी १२०० चे वर मंडळी मिळाली. आणि जाहिरात एकदोन आठवडे अगोदर दिली असती तर यापेक्षांही जास्त मंडळी जमण्याचा संभव

होता असें लोक ह्मणाले. हे ब्राह्मण केवळ पुण्यांतील नसून, ठाणें, पुणे आणि कुलाबा जिल्ह्यांतील कांहीं गांवचे आले होते. नारायण महाराजांचें अनायासें दर्शन होईल, आणि हें कृत्य निष्काम असून जाण्यायेण्याची विशेष सोय आहे, असा समारंभ कधीं पाहावयाला सहसा मिळणार नाहीं ह्मणून पुष्कळ मंडळी जमली होती. त्यामुळें महाराजांच्या कृपेनें हा समारंभ उत्तम रीतीनें पार पडला. मी ही यात्रा पूर्वीं केली होती. हा अपूर्व योग आहे असें पाहून त्याकरितां मुद्दाम पुण्यास येऊन या समुदायांत सामिल झालों होतों. त्याची संक्षिप्त हकीकत अशीः—

रुद्र येणारे जे भिक्षुक किंवा गृहस्थ ब्राह्मण या समारंभाला येतील त्यांना पुण्यास पास द्यावयाचें ठरलें होतें. त्या पासाच्या पाठीमागें या समारंभाचा कार्यक्रम लिहिला असून त्याप्रमाणें मंडळींनीं तयारींत असावें अशी सूचना दिली होती. समारंभाच्या आदल्या दिवशीं शनिवार तारीख १९ रोजीं सर्व मंडळींनीं शनवारवाड्याच्या दिल्ली दरवाज्यापाशीं मोटार स्टँडवर संध्याकाळीं ७॥ वाजेपर्यंत आपलें सोंवळें भांडें व पास घेऊन यावें. पास नेहमीं जवळ ठेवावा व विचारतील तेव्हां दाखवावा. पुण्यापासून भांबुर्ड्या स्टेशनपर्यंत मोटार, भांबुर्ड्यापासून केडगांवपर्यंत रेल्वे स्पेशल आणि केडगांवापासून बेटापर्यंत पुन्हां मोटार. त्याचप्रमाणें परत येण्याचीही व्यवस्था केली आहे, असें पासाच्या कार्यक्रमामध्यें लिहिलेलें होतें. त्याप्रमाणें पुण्यास मोटार स्टँडवर शनवारीं संध्याकाळीं ७। वाजेपर्यंत फारशी मंडळी जमली नाहीं. पण पुढें १०।१५ मीनिटांतच तें सर्व पटांगण अगदीं गच्च भरून गेलें ! प्रत्येकाचे खाकेंत सोवळें भांडें असलेले असे लहानापासून थोरापर्यंत सर्व ब्राह्मण जिकडे तिकडे दिसूं लागले. चारपांच मोटारी प्रत्येकींत पंधरा वीस माणसें भरून शनवारवाड्यापासून भांबुर्ड्यांचे स्टेशनपर्यंत ही मंडळी घेऊन एकसारख्या धांवत होत्या. दोन दोन मिनिटांत मोटार येई व लगेच भरून धांवत जाई. असा एकसारखा प्रकार दोन तासपर्यंत सारखा चालला होता. मोटार आली कीं आंत बसणारांची चेंगराचेंगरी होई. यामुळें वृद्ध माणसें व लहान मुलें यांना गर्दी सरल्यावर जावें लागलें !

अशा रीतीनें भांबुर्डा स्टेशनवर सर्व मंडळी गेली तेव्हां १०।१२ मोठ्या बोगी थर्डक्लास डब्यांची स्पेशल गाडी उभी होती. तींत प्रत्येकाचा पास पाहून

मंडळी भरावयाची होती, पण गर्दीमुळें तसा निर्बंध राहिला नाहीं. शेवटीं सर्व मंडळी गाडींत बसल्यावर तिकिटें तपासतात त्याप्रमाणें पास तपासले व जे पासाशिवाय सांपडले त्यांपैकीं ज्यांना पासाची मंडळी बसून बसण्याजोगी जागा होती त्यांजवळून डबल भाडें घेऊन त्यांना बसूं दिलें. पण पासाचा एकही इसम शिल्लक ठेविला नाहीं. ज्यांना जागा सांपडली नाहीं. त्यांना अर्थात खालीं उतरावें लागलें. पण आपली व्यवस्था याच मंडळींत व्हावी ह्मणून पुष्कळ प्रेक्षक या समुदायामध्यें मिळाले होते. अशा रीतीनें तपासणी झाल्यावर रेलवेच्या अधिकाऱ्यांनीं गाडी तपासली. त्यांनीं प्रत्येक डब्यात डब्याच्या मानानें मंडळी बसली आहे कीं नाहीं हें पाहिलें नाहीं. पण एकंदर किती मंडळी आहे एवढेंच मोजून पाहिलें. याचें कारण स्पेशलवाल्यांनीं ठरावापेक्षां गाडींत जास्त मनुष्यें भरून कंपनीचें नुकसान केलें आहे कीं काय? पण तसें कांहीं नव्हतें. याप्रमाणें सर्वांची तपासणी झाल्यावर गाडी सुटली. पेशवाईंत गाडी झाली असती तर ब्राह्मणाकरितां ती अशीच निराळी सोंवळी झाली असती! निदान ब्राह्मणाकरितां निराळे डबे तरी केले असते, असें कांहीं लोक ह्मणाले. कोणी ह्मणाले, ही सगळी ब्राह्मणांची स्पेशल भरली आहे, कुलपें ठोकून सगळ्यांना लढाईवर न्या! असा परोपरीचा विनोद चालला होता. असें होतां होतां स्पेशल केडगांवला रात्रीं ११॥ ला आली. मंडळी उतरल्यावर पुन्हां मोटारींची जा, ये जारीनें सुरू झाली. पंधरा वीस पॅसेंजरची एक एक मोटार अशा आठ मोटारी तयार ठेविल्या होत्या. रात्र अंधारी, रस्ता वाईट व अशा धांगडधिंग्यामुळें त्यांपैकीं एक दोन खिळखिळ्या होऊन बिघडल्या व यामुळें सर्व मंडळी येण्यास सकाळचे आठ वाजले!

मंडळी उत्तर रात्रीं ह्मणजे २॥ चे पुढें येऊं लागल्यामुळें त्यांच्या शौचविधीची व स्नानाची तयारी ठेविली होती. शौचविधी मुखमार्जनाकरितां बाहेर सर्व पटांगण मोकळें होतें व एक प्रशस्त हौद भरून ठेविला होता. त्यानंतर मुख्य विहिरीकडे स्नानाची सोय करून ठेविली होती. ज्यांना थंड पाण्याचें स्नान करावयाचें होतें त्यांच्याकरितां एक मनुष्य तयार होता. तो जवळच्या मोठ्या भरलेल्या काहिलींतून लहानसें बकेट भरून येणारे मनुष्याचे अगांवर ओतीत होता व त्याच काहिलींत एक मनुष्य नळानें विहिरींतील पाणी पंपानें खेंचीत होता. ज्याचें स्नान होई तो बाहेर पडे व दुसरी मंडळी येई. ऊन पाण्यानें

स्नान करणारांना एकाच दावणींत बांधलेलीं १५।२० बकेटें विहिरीच्या फरशी-सभोंवती ठेविलीं होतीं व तीं उन्ह पाण्यानें भरलेलीं होतीं व रिकामी झालेलीं पुन्हां भरत होतीं. अशा रीतीनें थंड पाणी व उन्ह पाणी स्नानाकरितां मुबलक मिळण्याची सोय केली होती. रिकाम्या झालेल्या बकेटांत थंड पाणी ओतणारे एक दोन असामी होते, त्याच्या योगानें जो तो आपलें धोतर धुऊन घेई. अशा व्यवस्थेमुळें कोणालाही रहाटावर जाऊन पाणी काढण्याचा प्रसंग आला नाहीं. स्नान करून शुद्ध झालेल्या मनुष्याला संध्येकरितां स्वच्छ पाणी मिळण्याची अशीच व्यवस्था केली होती. बकेटें एकाच दावणींत बांधण्याचें कारण तीं हरवूं नयेत, काम सुरळीत चालावें, सर्वांची सोय बिनचूक व बिनतक्रार व्हावी हेंच आहे. व त्याप्रमाणें ती झाली.

स्नान करून आलेले ब्राह्मण धर्मशाळेंत येऊन आपआपलें ब्राह्मकर्म व देव-तार्चन करीत होते. त्यांचीं धोतरें वाळत घालण्याकरितां धर्मशाळेंत जिकडे तिकडे उंच तारा मारल्या होत्या व कपडे वाळत घालण्याकरितां काठ्या व स्टुलें होतीं. आपलें सामान व कपडे याचें प्रत्येकानें गाठोडें बांधून त्यावर आपल्या नांवची चिठ्ठी बांधून तें नियमित ठिकाणीं ठेवावें अशी योजना केली होती. अशा चिठ्या देण्याकरितां एक मनुष्य नेमला होता व त्या सामानाचें रक्षण करण्याकरितांही एक स्वतंत्र मनुष्य ठेविला होता. या सर्व आवारांत ब्राह्मण मंडळी सुखरूपपणें अगदीं जेवून बाहेर जाईपर्यंत कोणालाही येण्याची सक्त मनाई होती. या व्यवस्थेमुळें कोणाची कपड्यालत्याची किंवा कसलीही अफरातफर न होतां सर्व व्यवस्था उत्तम झाली.

ब्रह्मकर्म आटोपल्यावर उजाडतांच कांहीं मंडळी त्या संस्थानची व्यवस्था पाहाण्याकरितां निघाली. कांहीं नारायण महाराजांचे दर्शनास निघालीं, कांहीं दत्ताचें दर्शनास निघाली, पण तीं दोन्हीं कपाटें बंद होतीं. नारायण महाराजांचे तपःश्चरण चाललें होतें व देवाची पूर्व पूजा चालली होती. एवढा मोठा ब्राह्मण-समुदाय निरनिराळ्या रंगाचीं उंची वस्त्रें नेसलेला व शालजोडी वगैरे पांघरलेला, कांहींनीं भस्माचे पट्टे ओढलेले आहेत, कांहींच्या किंचित शेंड्या तर कांहींच्या दीर्घ शेंड्या व कांहींनीं तर माथेरान राखलेलें! त्याप्रमाणें कांहीं मुलांना मिशा आल्या नव्हत्या, कांहींनीं किंचित राखल्या होत्या, कांहींनीं अर्ध्या कापलेल्या

च कांहींनीं साफ कापलेल्या व कांहींनीं तर भरघोस कल्ले राखले होते. कांहींच्या डोळ्यास आरशा होत्या. अशा प्रकारचा अलीकडील पद्धतीचा भरघोस समुदाय सुर्योदय झाल्यावर सर्वांच्या दृष्टीस पडला व सर्वांना साश्चर्य कौतुक वाटले!

कांहीं वेळानें नारायण महाराजांचा दरवाजा उघडला व मंडळीनें सद्भावानें त्यांचें दर्शन व वंदन करून कांहीं वेळ त्यांच्या सहवासांत घालविला. नंतर महाराजांसुद्धां सर्व मंडळी दत्त मंदिराकडे निघाली. तेथें देवाच्या सभामंडपापुढें मोठा प्रशस्त मांडव घालून त्यांत जिकडे तिकडे दर्भासनें ठेविलीं होतीं. व दरवाज्यावर एक महामहोपाध्याय उभे होते. एकेक ब्राह्मण त्यांच्या समोर दरवाज्यांतून येत होता. त्याला रुद्र येतो किंवा नाहीं याची ते परिक्षा करीत होते. हे शास्त्री रुद्रांतील कोणत्यातरी ऋचेचा आरंभ करून किंवा मधूनच आरंभ करून त्या पुढचें त्या ब्राह्मणास ह्मणावयास सांगत. तें जर त्यानें बिनचूक व स्वरशुद्ध ह्मटलें तर तो पास झाला व नंतर त्यास त्या रमण्यांतील आसनावर बसण्यास सांगत असत. ज्यांना रुद्र पाठ येत नव्हता ते आह्मी पोथीवरून ह्मणून दाखवितों असें ह्मणत. पण तें तरी स्वरशुद्ध असून त्याला गुरुमुखाचा योग्य संस्कार घडला आहे किंवा नाहीं ह्मणून पोथी उघडून वाटेल तेथून ह्मणावयास सांगत व त्याचा स्वरशुद्ध उच्चार होत आहे कीं नाहीं हें पाहात व त्यास बजावीत कीं ह्मणतेवेळीं पोथीकडे नीट पाहून ह्मणा; चूक झाली तर त्याचें पातक तुह्माला लागेल!

अशा रीतीनें ब्राह्मणत्वाची खरी कसोटी पाहिल्यामुळें हल्लींच्या काळची ब्राह्मणांत घुसलेली कृत्रिम मंडळीं त्यांत येऊं शकली नाहीं. सर्व मंडळी स्वासनीं येऊन बसण्यास नऊ वाजले. या मंडळीपैकीं ज्यांना रुद्र उत्तम वाखाणण्यासारखा येत होता, अशी पांच पन्नास भिक्षुक मंडळी निवडून काढून त्यांपैकीं दोघे दोघे ठिकठिकाणीं उभे केले होते. नंतर मुख्य आचार्यांनीं ब्राह्मणांची प्रार्थना केली कीं, सर्वांनीं सर्व जगाच्या कल्याणाकरितां ही उभी असलेली मंडळी आतां रुद्र ह्मणण्यास सुरवात करतील त्यांत आपला सूर मिळवावा. कोणींही ह्मणण्यांत कसूर करूं नये. फार मोठ्यानें किंवा फार लहान्यानें ह्मणूं नये. सर्वांचा एक सूर व्हावा अशी महाराजांची आज्ञा आहे. महाराजही त्या ठिकाणीं देवळांत उभे होते व हें ऐकत होते. त्याप्रमाणें एकसुरानें प्रथम न्यासा-

सुद्धां आरंभ होऊन सुरवात झाली. एक नमक होऊन चमकाचा एक अनुवाक होईपर्यंत उभी राहिलेली मंडळी मोठ्यानें ह्मणत. पुढें दुसऱ्या अनुवाकाला ती जाऊन दुसरी येई व पुन्हा सुरवात होई. प्रत्येक मनुष्य पद्धतशीर रीतीनें ह्मणत आहे कीं नाहीं, हें मुख्य शास्त्री चोहोकडे हिंडून लक्षपूर्वक पाहात असत व ह्या सर्वांवर महाराजांची नजर होती. दत्ताच्या पुजाऱ्याचा दत्तावर अभिषेक चालला होता. अशा रीतीनें सर्वांची एक एकादष्णी झाली ह्मणजे जितके ब्राह्मण तेथें जमले होते तितक्या एकादष्ण्या झाल्या हें उघड आहे.

अभिषेक संपूर्ण झाल्यानंतर तिकडे दत्ताची पुढची पूजा सुरू झाली. व इकडे ब्राह्मणांची पूजा सुरू झाली. हा वेदघोष पाहण्याकरितां व ऐकण्याकरितां कोटासभोंवती भाविक स्त्री–पुरुषांचा मोठा समाज जमला होता व तो उन्ह तान सहन करीत अगदीं अखेरपर्यंत तसा होता हें आश्चर्य आहे. त्यांना कंटाळा आला नाहीं. ही भाविकपणाची कमाल आहे. तेथें या ब्रह्मवृंदाचे निरनिराळ्या वेळचे फोटो घेणारे फोटो घेत होते. सिनेमा कंपनीचा चित्रपटही तयार होत होता. अशा रीतीनें प्रत्येकास हा प्रसंग केवळ धार्मिक भावनेनें चित्ताकर्षक वाटला. ह्या मंडळींत कोणी धार्मिक भाटे, वाणी, आले होते. त्यांनीं सर्व ब्रह्म-वृंदास कोणी हार घातले, कोणी उत्तम पेढे. वांटले. नारायण महाराजांनीं स्वतः प्रत्येकाला एक एक प्रसादाचा आंबा दिला. पुष्कळांनीं सर्व ब्राह्मणांस मनोभावानें प्रदक्षिणा घातली व वंदन केलें. अशा रीतीनें सर्वांची संभावना झाली तों ११॥ वाजले. पुढें या रमण्यांतून एक एक ब्राह्मण बाहेर सोडीत होते. दारवाजाजवळ नारायण महाराज रुपयांचें मोठें ताट भरून बसले होते.त्या दक्षणेची पूजा तुळशी-पत्रानें वगैरे झाली होती. जे जे ब्राह्मण बाहेर जात त्यांस नारायण महाराज एक एक रुपाया दक्षणा देत होते.

सर्व मंडळी पुन्हा धर्मशाळेंत गेली तों तेथें भोजनसमारंभाची तयारी होतीच. त्यावेळीं रुद्र ह्मणणारे ब्रह्मणासच बसण्याची परवानगी होती तरी एकावेळीं बाराशेंवर पान झालें ! बाकीची मंडळी मागून बसली. बेत जिलबीचा केला होता भोजनदक्षणाही महाराजांनीं चार चार आणे दिली. यथासांग भोजन झाल्यावर मंडळी स्टेशनवर नेण्याकरितां पुन्हां मोटारी तयार होत्याच. त्यांनीं मंडळी जसजशी आली तसतशी रात्रीं दहा वाजेपर्यंत स्टेशनावर पोहोचती केली व स्पेशलमध्यें बसून ती सुटण्यास रात्रीं पाऊण वाजला ! ही स्पेशल भांबुर्ड्याला

रात्रीं दोन वाजतां आली. अवेळ झाल्यामुळें मोठारींची वाट न पाहतां जो तो आपआपल्या मार्गाला लागला. तिकडे ब्राह्मणभोजन झाल्यावर रात्रीं आठ वाजेपर्यंत पंक्तीवर पंक्ती चालल्या होत्या. असा हा अपूर्व समारंभ व त्याची व्यवस्था, टापटीप हीं पाहण्यासारखीं होतीं. हा सर्व महाराजांचा प्रसाद आहे व ही त्यांच्या साधुत्वाची साक्ष आहे, असें सर्व लोकांनीं मानलें व तीं सर्वांना पटली.

पाश्चयात्यांच्या बुद्धिभेदानें आमच्याकडील सुशिक्षितांचा बुद्धिभ्रंश होऊन आतां समाजांत ब्राह्मणांचें कांहीं महत्व राहिलें नाहीं, असा समज झाला आहे. याला कारण कांहीं अंशीं समाज व कांहीं अशीं ब्राह्मणही आहेत. असें जरी आहे तरी हल्लींच्या साधुवर्गानें देव ब्राह्मणाची योग्यता अद्यापसुद्धां कमी मानली नाहीं.

जरी झाला ब्राह्मण भ्रष्ट । तरी तिहीं लोकीं श्रेष्ठ ॥१॥

या तुकारामाच्या उक्तीप्रमाणें हल्लींचे खरें साधुसुद्धां सद्भावानें त्यांना अद्याप मान देतात व त्या सद्भावाचें फळ त्यांना मिळतेंही. तुकारामाच्या या उक्तीचा खरा अर्थ त्या त्या काळामध्यें ब्राह्मणाचें श्रेष्ठत्व व सन्मान आजपर्यंत अबाधित राहिला खरा. मात्र भिन्न काळांतील ब्राह्मणांची तुलना करितां कामा नये. तशी ती कोणाही देवादिकांचीसुद्धां जमत नाहीं मग ब्राह्मणांची तरी कशी जमेल ? असो. साधूंच्या आशीर्वादानें जगाचें कल्याण होतें पण तें त्यांचें साधुत्व कायम राहण्यास त्यांना तरी देव ब्राह्मणांची अशी जनीं जनार्दन या सद्भावानें पूजा करावीच लागते. साधू निर्लेप असल्यामुळें जगाकडून त्याला जें द्रव्य मिळतें तें ह्या कार्मींच खर्च करून त्यांना आपलें तेज राखावें लागतें. गंगेत स्नान केल्यानें सर्व जगाचें पाप नाहींसे होतें, पण त्या योगानें गंगा दूषित होते. ती तिची शुद्धी किंवा पवित्रता साधू तींत स्नान करतील तेव्हांच होते, असा व्यवहार, अनुभव व शास्त्रवचनही आहे. तोच नियम साधूंनाही लागू आहे. साधू हे गंगेप्रमाणेंच आहेत. जगाचा पातकाचा पैसा ते आपल्या उपभोगाकरितां लावतील तर त्यांचें साधुत्व नष्ट होण्याला मुळींच वेळ लागणार नाहीं. पण ते जर तो परोपकाराकरितां व धर्माचरणाकरितां लावतील तर त्यांची तेजस्विता कमी न होतां ती उत्तरोत्तर वाढेल. भिक्षुकी, वैद्यकी, सामुद्रिक व ज्योतिष यांचीही अशीच गत आहे. प्रवृत्तीप्रमाणें कांहींतरी त्याची निवृत्ति नसेल तर ती

कर्मे त्यांना बाधक झाल्याशिवाय खचित राहणार नाहींत. प्रत्येक संस्काराची निवृत्ति कशी करावी ह्याबद्दल शास्त्रवचन आहे. त्याप्रमाणें केल्यास घेतलेलें दान घेणारास बाधक होत नाहीं.

परान्नं दशगायित्र्यः श्राद्धे दशगुणं जपेत
गर्भाधाने सहस्रं तु अयुतं प्रेतभोजनम्॥

नुसतें परान्न ( संस्काराशिवाय ) घेतल्यास नित्यकर्मापेक्षां दहा गायत्री तरी जप केलाच पाहिजे. श्राद्धाचा क्षण घेतल्यास शंभर गायत्री जपाव्या. गर्भाधानाबद्दल एक हजार आणि और्ध्वदेहिकाबद्दल दहा हजार गायत्री जपल्या पाहिजेत. याचप्रमाणें सर्व प्रवृत्तींचा विचार केला आहे त्याप्रमाणें केलें पाहिजे. दान घेण्याचा अधिकार ब्राह्मणांचाच आहे, इतरांचा नाहीं. पण त्यांनासुद्धां तें केवळ ब्राह्मण ह्मणून घेतां येत नाहीं. हल्लीं भिक्षुकीच्या पैशांत यश नाहीं असें ह्मणतात, याचें कारण हेंच आहे. ते निवृत्तीकरितां दानधर्म किंवा ब्रह्माचरणही करीत नाहींत. उदरनिर्वाहाकरितां किंवा प्रपंचाकरितां जे भिक्षा मागतात त्यांना ह्याप्रमाणें केलेंच पाहिजे. परमेश्वराचें नामस्मरण करून केवळ परमार्थाकरितां जे भिक्षा मागतात, त्यांनीं घेतलल्या दानाबद्दल त्यांना दोष नसतो. जेवण ओकून न पडतां पचलें तरच अन्नदानाचें पुण्य मिळतें; तसेंच दिलेलें दान घेणारास पचलें तरच तें देणारास व घेणारास तारक होतें, नाहींतर दोघांसही मारक होतें याचें कारण हेंच. नारायण महाराजांचें अगदीं असेंं आहे. त्यांना जें मिळतें तेंच ते त्याला प्रसाद ह्मणून परत करतात. पण परत करतां येण्यासारखें नसलें तर ते त्याचा परोपकाराकरितां असा उपयोग करतात. मात्र तो अगदीं व्यवस्थित असतो. ह्मणजे त्यांना पैसा मिळाला तर तो कशा कामीं खर्च करावयाचा याचा ते विचार करून खर्च करितात. हवा त्याला हवा तसा देऊन टाकीत नाहींत किंवा खर्चही करीत नाहींत. ते त्याचा उपभोग घेतात असें सामान्य लोकांस वाटतें खरें, पण ते स्वतः अंतःकरणानें सर्व सुखोपभोगांपासून अगदीं अलिप्त आहेत. ह्मणूनच त्यांच्या हातून अशीं धार्मिक परोपकाराचीं व अन्नसंतर्पणाचीं कामें होतात. अशीं कामें राजे किंवा असे साधू ह्यांशिवाय कोणालाही करितां येणार नाहींत. राजाला खर्चाची कदर किंवा हिशोब तरी बाळगावा लागतो पण साधूंना पैशाची कांहीं परवा वाटत नाहीं! हाच त्यांचा

माहिमा आहे. कनक कांतेविषयीं किंवा इंद्रिय सुखावरून मन काढल्याशिवाय साधुत्वाचा अनुभव येत नाहीं.

**भृंगार कांता द्वय कातरा. या । केल्या विधीनें नर कातराया ॥**
**जो सांपडेना नर कातरा या । तो योग्य होतो नरका तराया ॥**

कनक व कांता ह्या दोन कातरी ब्रह्मदेवानें मनुष्याला कातरण्याकरितां जगामध्यें उत्पन्न केल्या आहेत. जो मनुष्य ह्या कातरींत सांपडत नाहीं तोच ह्या भवसिंधु तरण्यास योग्य होतो. यांत आणखी स्तुति, कीर्ति किंवा महत्वाकांक्षा ह्याही आणखी कातरी घातल्या असत्या तर फार बरें होतें. कारण कनक कांतेच्या आमिषानें जसा मनुष्य फसतो तसा तो स्तुतीनें व महत्वाकांक्षेसहीं भुलतो किंवा तिच्या नादानें फसतो. संसाराच्या गाड्याचीं कनक व कांता हीं दोन चाकें आहेत. तीं जर नसतील तर ह्या जगांत व्यवहारच चालणार नाहीं हें खरें आहे, पण त्यांत अडकूं नये असें साधु सांगतात. अडकला कीं तो कापला गेलाच इतक्या त्या तीक्ष्ण आहेत. त्यांत अडकावयाचें ह्मणजे त्यांच्या नादीं लागून आपलें कर्तव्यकर्म विसरावयाचें किंवा टाकावयाचें. अथवा अन्यायानें त्या मिळविण्याचा किंवा उपभोगिण्याचा प्रयत्न करावयाचा व त्याकरितां धशीस लागून वाटेल तशीं बेहोषपणानें कृत्यें करावयाचीं हें वर्ज्य करावें. न्यायानें ह्या वस्तू मिळवून त्यांचा उपभोग घेणें हेंच संसाराचें रहस्य आहे. अशीच साधूंची स्पष्टोक्ति आहे. संसार करून जाण्यास किंवा तरून जाण्यास हाच जिना किंवा होडी अवश्य आहे, पण तो जिना किंवा होडी फुटकी नसावी; नाहींतर तींच त्याच्या नाशाला कारणीभूत होतात. गृहस्थ व साधू हे दोघेही या नियमाला अपवाद नाहींत. साधू, संन्याशी किंवा कोणीही स्वार्थ सोडून केवळ परमार्थाकरितां कोणतेंही कृत्य करितील तर तें उभयतांना सुखावह व अत्यंत पुण्यकारक आहे. तो प्रसादच आहे, ह्मणूनच परान्न वर्ज्य केलेलेंसुद्धां या प्रसादाला मुद्दाम आले होते. अशा रीतीनें ह्या समारंभानें सर्वांस आनंद झाला.

याशिवाय या संस्थानचे कायमचे सेवेकरी आहेत त्यांना राहण्याकरितां कायमच्या खोल्या करून दिल्या आहेत. अशी सेवेकरी मंडळी पन्नास साठ तरी आहेत. यांपैकीं शिपाई गडी यांना मात्र पगार आहे. बाकीच्या मंडळींना पगार वगैरे कांहीं नाहीं. त्यांनीं फक्त पंक्तीस दोन वेळां जेवून राहावें. याप्रमाणें मंडळी राहिली आहे. या मंडळींत कांहीं मंडळी सहकुटुंबही आलेली आहे. त्यांच्या

मुलांकरितां व गांवांतील लोकांकरितां आवारांत एक लोकलबोर्डानें शाळा दिली आहे. गांव अगदीं लहान आहे. तसेंच या संस्थेकरितां पोष्ट ऑफिसानेंही सोय केली आहे. ह्मणजे हें संस्थान चांगल्या एका गांवाएवढें मोठें आहे. या संस्थानाशिवाय गांवचीं अशीं पांच सहा झोंपडीं आहेत. सेवेकऱ्यांचीं पुढील-प्रमाणें खातीं आहेत. दत्ताचे त्रिकाळ पुजारी, आवाराचें झाडलोट करणारे व नारायण महाराजांचे आश्रमांत रात्रंदिवस नामस्मरण करणारे ब्राह्मण, तसेंच स्वयंपाकाचे आचारी व ऑफीसचें काम करणारी मंडळी वगैरे. येथें स्नाना-करितां एक मोठी ह्मणजे पन्नास फूट व्यासाची चांगली बांधीव विहीर आहे. तिला मुबलक पाणी आहे. त्या विहिरीला लोखंडी राहाट पुष्कळ आहेत शिवाय बागेकरितां मोटही चालते. बागेमध्यें केळीं, नारळ, व इतर फळफळावळ, यांचीं झाडें असून, भाजी व फुलझाडांचा भरणा विशेष आहे. फुलझाडें निरनिराळ्या ऋतूंत फुलें उत्पन्न होणारीं अशीं लाविलीं आहेत. या योगानें संस्थानाला भाजीपाला, व पत्रपुष्पांचा तोटा पडत नाहीं. प्रत्येक राहाटाला दोरीच्या ऐवजीं लोखंडी साखळ्या लाविल्या आहेत. पुरुषांकरितां रहाट निराळे, बायकांकरितां निराळे, शूद्राकरितां निराळे व ब्राह्मणेतराकरितां निराळे अशी त्यांची व्यवस्था आहे. ऊन पाण्याकरितां एक मोठी भट्टी आहे. तींत कृत्रिम तऱ्हेनें तें तापते ह्मणजे आगगाडीच्या बंबांतून पुष्कळ उष्ण नळया नेल्यामुळें पाणी हवेतेवढें व फारच जलद तापतें, त्याचप्रमाणें याही भट्टीची सोय आहे. इच्छा असेल त्याला उन्ह पाणी मिळतें. ही भट्टी चालविण्याकरितां एक स्वतंत्र मनुष्य आहे, तो तें देतो. स्नानाकरितां निरनिराळ्या जागा आहेत. पुरुषांकरितां निराळ्या, बायकांकरितां निरनिराळ्या अशा बंदोबस्ताच्या जागा असून शूद्राकरितांसुद्धां निराळ्या जागा आहेत. स्वयंपाकाकरितां संस्थानचे आचारी पाणके आहेत. शिवाय कांहीं सेवेकरी बायका पुरुषही मदतीला येतात.

याशिवाय नारायण महाराजांचे मठांत नामसप्ताह चातुर्मास रात्रंदिवस चालू असतो. इतर दिवशीं महाराजांचे इच्छेप्रमाणें होत असतो व त्याकरितां ब्राह्मण मंडळी अगदीं निराळी असते. या ब्राह्मणांची जागा नारायण महाराज बसतात तेथें आहे. नारायण महाराज झोंपाळ्यावर तेथेंच एका बाजूस बसतात. हा झोंपाळा बेताचाच लहान असून त्याच्या कड्या पितळेच्या आहेत. त्या नेहमीं इतक्या स्वच्छ असतात कीं, त्या सोन्याच्या आहेत असा भास होतो. ह्या

पूर्ण खिळवल्या नसून सुख्या होण्यासारख्या आहेत. कळ्या लहान लहान असल्यामुळें झोंपाळ्याची उंची हवी तितकी कमीजास्त करितां येते. दुसरे बाजूस त्यांची मोठी तसबीर मांडून व भोंवतालीं मोठमोठ्या फुलझाडांच्या कुंड्या ठेवून मध्यें दोन ब्राह्मण सोंवळ्यानें बसतात. त्यांचा

**श्रीनारायण । जयनारायण । जयजय नारायण । नारायण ॥**

असा नामघोष सतत चालला असतो. हा नाममंत्र किंवा असाच दुसरा महाराज सांगतील तो मंत्र आळीपाळीनें दोन ब्राह्मण सावकाश ह्मणत असतात. जवळ एक मोठें थोरलें घड्याळ आहे. प्रत्येक जोडीनें एक एक तास काम करावयाचें असतें. अर्थात तें अगदीं खड्या व तालसुरांत करावें लागतें. पुढचा तास आला कीं, दुसरी जोडी तयार असते. तिला बोलावणारे निराळे आहेत. कोणी कोणत्या तासाला यावें, कोणी बोलवावे याचें वेळापत्रक देवळांत एका फळीवर लावलें आहे. हें सर्व काम ठरलेल्या पद्धतीनें चाललें आहे कीं नाहीं याचेवर देखरेख करणारा मनुष्य आहे. महाराज असोत वा नसोत हा नामघोष रात्रंदिवस त्या ठिकाणीं अखंड चाललेला असतो. याशिवाय ठिकठिकाणीं प्रत्येक भक्त आपल्यापुढें नारायण महाराजांची लहान मोठी तसबीर ठेऊन त्यांची अशीच नामघोषाची जपमाळ चाललेली असते. महाराज चातुर्मास्यानंतर जे जे भक्तजन बोलावतील त्यांजकडे जातात. लग्नकार्यांत सुद्धां जातात. मात्र त्यांच्या लवाजम्याची जे व्यवस्था ठेवतील त्यांचेकडे जातात. गरीबाकडे जाण्याची सोय नाहीं! यांचा छात्रवर्ग श्रीमंत, सधन, राज घराण्यांतला आहे, त्यांजकडे हे जातात. यांचा लवाजमा शंकराचार्यांच्या सारखा आहे. नेहमीं हे रेल्वेच्या फर्स्टक्लास रिझर्व डब्यांतून प्रवास करतात. छात्रवर्गाकडे त्यांस राजभोग मिळतात व ते आनंदानें त्याचा स्वीकार करतात. घरीं आश्रमांतही त्यांची हीच रीत आहे. हे पाहुणे ह्मणून गेले ह्मणजे त्यांचे स्वागत श्रीमंती थाटाचें होतें. तसेंच त्यांचेकडेही श्रीमंत राजेरजवाडे आले तर त्यांचेही स्वागत महाराजांकडून त्यांच्या वैभवास योग्य असेंच होतें. विश्वामित्र वसिष्ठांच्या आश्रमांत गेला असतां वशिष्ठानें कामधेनूच्या सहाय्यानें त्याचें जसें ससैन्य राजवैभवाचे थाटाचें स्वागत केलें तसेंच येथें त्यांचे होतें. त्या ठिकाणीं कामधेनू होती, येथें महाराजांच्या तपःश्चर्येनें हें होतें! प्रत्येक श्रीमंतास त्याच्या दर्जाप्रमाणें जागा, बंगले व सेवक वर्ग यांची तरतूद येथें आहे.

खुद्द नारायण महाराजांचे आश्रमाचें काम फारच सुरेख आहे. सर्व आश्रम सुंदर दगडांचा असा दुमजली आहे. जिकडेतिकडे आरासपान खुर्च्या, मेजें, पलंग, गाद्या, गिरद्या, हंड्या, झुंबरें, दिवेबत्ती यांची चैन आहे. हा सर्व ऐषआराम दुसऱ्या मजल्यावर आहे. मोठमोठे विल्लोरी आरसे, हंड्या, झुंबरें, यांची तरतूद आहे आंत जिकडे तिकडे लहान मोठी निरनिराळ्या रंग रूपाचीं घड्याळें लाविलीं आहेत. तळ मजल्यावर मागें सांगितलेला नामसप्ताह सुरू असतो व ती जागा पवित्र राखण्यांत येते. नारायण महाराजांचें दर्शन अगदीं लंगोटी लावल्या पासून राजविलासी श्रीमंती थाटापर्यंत पाहिजे त्या पेहरवांत जसचसा भक्त येईल त्याप्रमाणें होतें. नारायण महाराजांची राहाणी मात्र अगदीं शुचिर्भूत, विरक्त व स्वधर्माप्रमाणें आहे.

सर्व संस्थानावर देखरेख ठेवण्याकरितां त्यांनीं आपली योग्य आप्त मंडळी आणली आहे. रोज ब्राह्मणभोजनाचें उदक हेच सोडतात व दक्षणा देऊन प्रार्थना करतात. भोजन प्रसंगीं बायका पुरुष निरनिराळ्या पंक्तींत पण एकाच ठिकाणीं बसतात. क्वचित त्यांच्या पंक्ती निरनिराळया असतात. कदाचित एकच पंगत असली तर तींत बायका पुरुष निरनिराळे बसतात, ह्मणजे थोडें अंतर ठेवून बसतात. भोजनाची वेळ झाली ह्मणजे जेवावयास चला, असें आमंत्रण होतें. भोजनास भाकरी, भात, आमटी मात्र पाहिजे तेवढी व पाहिजे तितके वेळ मिळते. मागाहून भात मिळतो, पण ताक वगैरे गोरस नसतें. फक्त प्रथम थोडी अन्नशुद्धि मिळते. एकंदर वैभवाला हें कदन्न अगदीं विसंगत आहे, पण तेंच बरोबर आहे असें वाटतें. कारण तें जर चांगलें असतें तर पुष्कळ भोजनभाऊ तेथें जमले असते. हें अन्न येथील राहणाऱ्या मंडळींतही कोणास आवडत नाहीं. सबब जो तो आपआपल्या परी कोणी चटणी, भाजी निराळी करून आणितो. येथें आमटीकरितां द्रोण मिळत नाहींत, ह्मणून पुष्कळ लोक आमटीकारितां वाटी बरोबर आणितात व बरोबर घेऊन जातात. आमटी वाढायला पाहिजे तितके वेळां येते, पण भाकरीचा तुकडा बुडवून खातां येत नाहीं. भाताप्रमाणें ती कुसकरून त्यावर आमटी घालून कालवून खावी लागते. सर्वांचें भोजन होईपर्यंत कोणीही उठतां कामा नये. सर्वांचें भोजन झाल्यावर

**सदा सर्वदा योग तूझा घडावा ॥**
**तुझे कारणीं देह माझा पडावा ॥**

उपेक्षूं नको गुणवंता अनंता ॥
श्रीनारायणा मागणें हेंचि आतां ॥१॥

हा रामदासी श्लोक शेवटचा चरण वृत्ताला जमत नाहीं तरी तसाच ओढून ताणून ह्मणून सर्व मंडळी उठते. या श्लोकास आरंभ यजमानाकडून होतो व मग सर्व मंडळी त्यांत सूर मिळवून त्याचा शेवट करतात. नारायण महाराजांची जेवणाची व्यवस्था निराळी आहे. तरी तेसुद्धां हा कण्यांचा भात, आमटी व भाकरी यांचा प्रसाद घेतात. दत्तालाही याचाच नैवेद्य जातो. हें जेवण ज्याचे पचनीं पडेल त्याचेकडे रोग ढुंकून कसा पाहील ? अर्थात अशा रीतीनें राहिल्यानें सर्व रोग नाहींसे होऊन तो निरोगी होतो, हेंच खरें. पण हें सर्व महाराजांचे कृपेनें होत आहे, असें ह्मणतात. आणि तें खरेंही आहे. कारण कोणी असें सांगितलें असतें तर तें रुचलें नसतें !

या संस्थानांतील इमारती सर्व नव्या अगदीं इंजनीअरिंग प्लॅनप्रमाणें शाश्वत टिकतील अशा चुनेगची दगडी आहेत. मागें धर्मशाळेचें वर्णन केलें आहेच. श्रीदत्तमंदिराचें काम चुनेगची दगडी असून पूर्वपरंपरेला अनुसरून त्यावर व आंत छतावर रंगीत सुंदर देवादिकांचीं व दश अवतार यांचीं चित्रें चुन्याचींच रंगीत केलीं आहेत. श्रीदत्तात्रेयाची मूर्ति लहान पण फारच सुबक असून ती उंच स्थानीं आहे. गाभाऱ्यांत पुजाऱ्याशिवाय कोणासही जाण्यास परवानगी नाहीं. सभा मंडपाच्या थोड्या भागांत एक लाकडी कठडा केला आहे. सर्वांनीं दर्शन घेणें तें. कठड्यापासून घ्यावें पण तेंही स्नानसंध्या करून शुचिर्भूत होऊन घ्यावें लागतें. देवळाभोंवतीं बरेंच आवार आहे. देवळाभोंवतीं थोडी फरसबंदी आहे व त्याभोंवतीं मोठें आवार आहे व त्यांत आंब्यांचीं कलमें औदुंबर वगैरे सुबक झाडें आहेत. सर्व आवाराभोंवतीं मोठा उंच कोट आहे. आवारांत एका ठिकाणीं औदुंबराचा एक लहानसा वृक्ष आहे व त्याखालीं पादुका आहेत. ज्याला देवाची प्रत्यक्ष पूजा करण्याची इच्छा असेल त्यानें त्या पादुकांची यथासांग पूजा करून औदुंबरासुद्धां त्याला प्रदक्षणा घालाव्या. प्रदक्षणेला फरशी केली आहे. देवळाच्या आवारांत स्नान केल्याशिवाय कोणीच जावयाचें नाहीं, हें मागें सांगितलें आहेच. पण अशा शुद्ध स्थितींत गेल्यावरसुद्धां कोठें थुंकावयाचें किंवा नाक शिंकरावयाचेंही नाहीं ! मग लघवीची गोष्ट कशाला ! इतकी ही जागा स्वच्छ व पवित्र राखलेली आहे. देवाला सकाळ संध्या-

काळ गुलाब, चमेली, मोगरा, तुळशी वगैरे ऋतुमानाप्रमाणें फुलणाऱ्या फुलांच्या माळा, दागदागिने व कपडालत्ता चढवतात, ह्मणून त्याचें केव्हांही दर्शन रम्यच असतें. व जिकडे तिकडे घमघमाट सुटतो. सभामंडपांत एक मोठें घड्याळ असून त्याच्या तासाप्रमाणें बाहेर चौकीदार ठोके मारतात. घड्याळें जिकडे तिकडे आहेत, तोटा मुळींच नाहीं.

या पुढची प्रेक्षणीय इमारत ह्मणजे नारायण महाराजांची. हिचें थोडें वर्णन मागें आलें आहेच. ही इमारत फारच प्रेक्षणीय आहे. निदान आजपर्यंत कोणत्याही साधूला अशी मिळाली नसेल. ही इमारत फार मोठी नाहीं पण दुमजली असून तिचीं दारें, कड्याकोयंडे, सुंदर पितळी—अगदीं चालू सुधारलेल्या पद्धतीचीं अगदीं चक्क आहेत. जिकडे तिकडे आरासपान ( दगडी संगमरवरी निरनिराळ्या रंगाचें) केलेंआहे.हंड्या,झुंबरें,लाविलेलीं असून काचेच्या तावदानाच्या निरनिराळ्या रंगाचे मोठमोठे तुकडे बसवून सुंदर नक्षीच्या खिडक्या केल्या आहेत. सभोंवार देवादिकांच्या तसबिरी असून रामराज्याभिषेक, रामाचा लग्नसोहळा व समारंभ वगैरे धार्मिक प्रसंगाच्या भव्य तसबिरी व चित्रें आहेत. खुद्द नारायण महाराज जेथें बसतात तेथें वर निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान व मुक्ताबाई हीं भिंतीवर बसून त्यांची व चांगदेवाची भेट झाल्याचें चित्र भिंतीवर काढलें आहे, तें फारच प्रेक्षणीय आहे. त्या चित्रावरून त्यांचे मनोधर्म चांगले दृष्टोत्पत्तीस येतात. ज्ञानेश्वर महाराजांचा सात्विक, शांत व गंभीर चेहेरा व इतरांचे सत्वरज गुणधर्माप्रमाणें कमजास्त उच्छृंखळ झालेले चेहेरे व वैराग्यपरवृत्ति काढणाराची तारीफ करण्यासारखी आहे. आंतले सामानही इमारतीप्रमाणें व महाराजांच्या योग्यतेप्रमाणें सुरेख आहे. वरच्या मजल्यावर निरनिराळ्या प्रकारच्या खुर्च्या, टेबलें, मोठमोठे आरसे, निरनिराळ्या प्रकारचे दिवे, गादीनें मढविलेलीं निरनिराळ्या प्रकारचीं कोचें असून आंत सुंदर भांडीं व सर्व सामान अगदीं स्वच्छ व नीटनेटकें आहे. खालच्या मजल्यावर देवपूजेचें व धार्मिक विधींचें सामान आहे. प्रेक्षकांना किंवा भक्तांना दर्शन घेण्याकरितां किंवा बसण्यास चांगली जागा आहे. जिकडेतिकडे बिल्लोरी आरसे व घड्याळें आहेत. मागले बाजूस नारायण महाराजांच्या स्वयंपाकाची व्यवस्था असून एके भागांत एका खोलींत महाराजांना निजण्याची जागा केली आहे. निजण्याकरितां पलंग, गाद्या, गिरद्या, आरसे, दिवे, खुर्च्या,टेबलें, घड्याळें संगत-

वार मांडलेलीं आहेत. स्वयंपाक घराचे जवळ स्वतंत्र विहीर व तीवर दोन तीन राहाट आहेत. विहिरीच्या सभोंवार बोकलावर सुंदर फुलझाडांच्या कुंड्या आहेत. त्या फुलांचे परोपरीचे सुवास खिडकी उघडी टाकली ह्मणजे निजण्याच्या खोलीमध्यें येत असतात ! खरोखर ही इमारत साधूला शोभण्यासारखी नसून राजाला शोभण्यासारखी आहे. साधूला न शोभण्यासारखी ह्मटलें आहे याचें कारण साधू इहलोकच्या वैभवाची परवा करीत नाहींत, इतकेंच नव्हे तर तें मिळालें असतां त्याचा त्याग करतात. पण तसें ह्या नारायण महाराजांचें नाहीं. हे नेहमीं आंतून तापसवृत्तीनें राहून स्त्रीसुखाशिवाय इहलोकच्या सर्व सुखांत निमग्न असतात. हीच त्यांची तपश्चर्या आहे. या घरांत नारायण महाराजांशिवाय दुसरें दैवत नाहीं. नारायण महाराज नसतां माडीवर जाण्यास कोणासही परवानगी नाहीं. या बंगल्याशिवाय दुसऱ्या लहान लहान इमारती येणाऱ्या जाणाऱ्या राजे लोकांच्या व श्रीमंताच्या स्वागतार्थ ज्यांनीं त्यांनीं आपल्या खर्चानें व आवडीनें बांधिल्या आहेत. तरी त्यांची योग्यता यापेक्षां पुष्कळच कमी आहे. बाकी त्या श्रीमंतांच्या झोपड्याच आहेत !

आतां नारायण महाराजांसंबंधानें लौकिक रीतीनें चार शब्द लिहून ही यात्रा पुरी करूं. वस्तुतः साधूंचीं चरित्रें अगम्य असतात व त्यांच्या दृश्यावरून त्यांचीं चरित्रें ठरवावीं लागतात. तसाच हा प्रयत्न आहे. नारायण महाराज मूळचे बागलकोट तालुक्यांतील शिंदगी गांवचे. लहानपणीं आईबाप निवर्तल्यावर असहाय स्थितींत ते पुष्कळ गांवें हिंडले. अखेर पुणें जिल्ह्यापैकीं बोपगांवास ते आले असतां त्र्यंबकराव कुळकर्णी नामक एका तपस्वी नवरा बायकोला (जोड्याला) ते एका औदुंबराच्या झाडाखालीं ह्याच बेटांत सांपडले. तीं उभयतां पुत्राकरितां आषक झालीं होतीं, तेव्हां त्यांनीं यांचेंच पुत्राप्रमाणें पालनपोषण केलें व महाराजांनींही त्यांना वडील व मातोश्रीप्रमाणें मानलें. महाराजांना आईबाप नसून सख्खें असें कोणीही नव्हतें, ह्मणून अनाथाप्रमाणें हें पोरकें पोर औदुंबराखालीं तपःश्चर्या करीत बसलें होतें. एखाद्याला विद्येचें स्वयंभू किंवा जन्मांतरींचें ज्ञान असतें व पुढें शिकण्याचें निमित्त मात्र होतें. त्याप्रमाणें त्यांना तपःश्चर्येचें स्वाभाविक ज्ञान असून तें या परिस्थितीनें ध्रुवाप्रमाणें उदयास आलें असें वाटतें. हे महाराज त्या जोडप्याला ज्यावेळीं सांपडले, त्यावेळीं त्यांचें वय चार पांच वर्षांचें होतें. त्या जोडप्याला कांहीं साक्षात्कार

झाल्यावरून त्यांना हा मुलगा मिळाला, पुढें या महाराजांचे तप संपूर्ण होऊन त्यांना कांहीं सिद्धीही प्राप्त झाल्या होत्या. हे पूर्वी ह्या बेटांतच नदीचे कांठीं औदुबराचे झाडाखालीं असत. यांचेजवळ गुराखी लोक बोलत बसत असत त्यावेळीं हे कधींकधीं आपला प्रसाद म्हणून मुलांना दगडाचे चार खडे देत. ते खडे हातांत घेतल्यावर खडीसाखरेचे होत ! अशा रीतीनें सिद्धिद्वारा हे पुढें लौकिकांत येऊं लागले. यांच्या मानलेल्या घरीं हे आईजवळ दळणास बसले असतां यांच्या दळण्याच्या योगानें पीठ वाजवीपेक्षां जास्त होत असे ! फार काय, जात्यांत धान्य न घालतां नुसतें दळूं लागलें तरी खालीं पीठ पडे ! ! बायकांच्या कहाण्यांत सांगितल्याप्रमाणें यांच्याकडे अशा प्रकारें धनधान्याची समृद्धि होत असे. त्याच्या जोरावर हे आल्यागेल्याला जेऊं घालूं लागले. यांच्या तपःश्चर्येनें कांहीं नियमीत मंडळींचा केलेला स्वयंपाक कितीही जास्त मंडळी आली तरी त्यांना पुरेसा होई ! ! ! एकदां समाराधनेमध्यें तूप सरलें असतां, महाराजांच्या सांगण्यावरून पाण्याच्या डब्यांतील पाणी वाढलें तर तें-सुद्धां तूप झालें ! त्यांच्या हल्लींच्या आश्रमांतील विहिरीस, ती बांधिली तेव्हां फारसें पाणी नव्हते, पण पुढें याच्या प्रसादानें तिला विपुल पाणी झालें. शिवाय आधुनिक कालांतील लोकांस थक्क करून टाकणारी गोष्ट म्हणजे, महाराज मद्रास मेलमध्यें फर्स्टक्लासांतून जात असतां केडगांवला मद्रासमेल थांबावयाची नसतां ती स्टेशन आल्याबरोबर थांबली ! तेव्हां गार्डानें गाडी कां थांबली म्हणून इंजिनड्रायव्हरला विचारलें तर तो म्हणाला, कां थांबली हें मला पण समजत नाहीं ! ! इंजिन बिघडलें असें वाटतें. शेवटीं महाराज उतरल्यावर गाडी पुन्हा सहज चालूं लागली. तेव्हां सर्वांना महदाश्चर्य वाटलें ! ! ! पुढें ही गोष्ट कंपनीचे वरिष्ट अधिकाऱ्यांस समजल्यावर महाराज गाडींत असल्यास केडगांवास कोण-तीही गाडी थांबवीत जावी, असा कंपनीनें ठराव केला. ही गोष्ट त्यावेळीं धोंड स्टेशनवर जे टिकिट कलेक्टर ( मोरो अनंत ब्रह्मे ) होते त्यांच्या सांगण्यावरून मुद्दाम लिहिली आहे. ज्ञानेश्वर महाराजांनीं चांगदेव भेटीस आले असतां आत्मसाक्षात्कारानें भिंत चालविली त्या गोष्टींत व ह्या गोष्टींत तत्वदृष्टीनें काय फरक ? कांहीं नाहीं. दोघांनीं जड सृष्टीवरच अधिकार चालविले आहेत. अशा चमत्कारामुळें त्यांचा लौकिक वाढला. व त्यांचेभोंवतीं भाविकांची गर्दी जमूं लागली. व ज्याच्या त्याच्या भावनेप्रमाणें त्याचें फळही त्यांस येऊं लागलें.

त्यांच्या दर्शनास जे लोक येतात व त्यांचे पुढें जे ठेवतात तेंच ते त्याला प्रसाद ह्मणून परत करतात. कोणी नारळ, फळें, कोणी दिडकी, चवली, रुपया, साव्ह-रिन् दिला तर तोही परत होतो. कोणी हें नाणें आपल्याजवळ ठेवावें असा आग्रह केला तरी तो परत होतो. हे जेथें जातात तेथें लोक त्यांचें भजन करतात. भजन झाल्यावर हे आपल्या करंगळींतून किंवा माळेंतून गंगा काढतात किंवा असा कांहीं चमत्कार करतात. कांहीं संसारी लोक आपल्यावरच्या संक-टाच्या निवारणार्थ त्यांना प्रश्न विचारितात. त्यांच्या प्रतिकारार्थ हे उपाय सुचवितात. हे उपाय केवळ धार्मिक असतात. ह्मणजे औदुंबराला प्रदक्षिणा घाला, ब्राम्हण जेवूं घाला, तुळशीला प्रदक्षिणा घाला, गुरुचरित्राचें पारायण करा, वगैरे ज्याला च्याला ते स्वतः करतां येण्यासारखे असतात असेच ते सांगतात. सद्भावनेनें कोणाला त्यानें गुण येतो. अंजनी नांवाच्या मुंबईच्या एका वारंगनेचा आवाज एकाएकीं बसला. अर्थात ती निरुपयोगी झाली. परंतु नारायण महाराजांचे प्रसादानें तिचा तो आवाज पूर्वस्थितीवर आला, ह्मणून तिची बुद्धि याचे ठिकाणीं स्थिर झाली. तिनें आपलें घर नारायणमहाराजांच्या मार्गे जवळच बांधलें आहे. असे पुष्कळांना गुण येत आले व येत आहेत. तसेंच ऐहिक उपाय करून थकल्यावर रोगी येथें येऊन राहतात किंवा आपत्ति टाळण्याकारितां प्रयत्न करून थकल्यावर यांच्या प्रसादा-कारितां लहान थोर मंडळी येथें येते व बहुधा कृतकार्य होऊन परत जाते. यांपैकीं कांहीं मंडळींना तुह्मी येथें सेवा करीत राहा, असेंही ते सांगतात. तो त्याप्रमाणें राहि-ल्यास कृतकार्य होऊनही जातो. हे महाराज कोणाजवळ कांहीं मागत नाहींत पण कोणी कृतकार्य होऊन देऊंच लागला तर परोपकार बुद्धीनें ते त्याचा संग्रह करतात व मागें सांगिल्याप्रमाणें त्याचा विनियोग करितात. काहीं असलें तरी इहलोकींच्या कनककांतेविषयीं हे निरपेक्ष असून परोपकारार्थ देह झिजविणारे आहेत. यांच्या हातून जितकें अन्नसंतर्पण व नामसंकीर्तन झालें आहे व होत आहे इतकें आजपर्यंत कोणत्याही साधूच्या हातून झालें नाहीं व पुढेंही होणें कठीण दिसतें. कारण दानधर्माकडे लोकांचे लक्ष यापुढें कमीच होईल. हें त्यांच्या अंगीं असामान्य पुण्य आहे. ह्यानींच हें संस्थान स्थापन केलें आहे. अर्थात हें जिवंत आहे. ह्मणजे ह्यांची देखरेख प्रत्यक्ष असल्यामुळें त्याची व्यवस्था अगदीं रेखल्याप्रमाणें आहे. ही महाराजांच्या चातुर्याची साक्ष आहे ही व्यवस्था

त्यांच्या गैरहजेरींतसुद्धां पाहावयास मिळते. आणखी काय पाहिजे ! मेलेल्या संस्थानचे लोक अनुत्साही, भाड्याचे व केवळ आपमतलबी असतात. तसा प्रकार अजून येथें नाहीं. जिवंत व मेलेलें संस्थान ह्यांमधला हा फरक येथें स्वच्छपणें पाहणेस मिळतो. तो एकवार यात्रेकरूंनीं जरूर पाहून जावा, अशी शिफारस आहे. या संस्थानांत वस्तूची देवघेव प्रत्यक्ष पैशानें होत नाहीं, यामुळें चोराचिलट्यांचा उपद्रव नाहीं.

नारायण महाराजांचें स्वरूप शामवर्ण व राहणी गृहस्थाश्रम पद्धतीची असून आज ते ( १९२८ ) मध्यम ह्मणजे सुमारें ४० वर्षें वयाचे आहेत. शरीरयष्टी व नजर तेजस्वी आहे.

यानंतर मी दौंडवरून बोरीब्बेल स्टेशनवर उतरून

## सिद्धटेक

येथें येण्यास निघालों. स्टेशनवर रात्रीं आलों होतों. स्टेशनवर तपास करतां येथून सिद्धटेकला जाण्याला गाड्या मिळतात पण भाडें फार घेतात, येथून सिद्धटेक तीन कोस आहे, गाडीभाडें रुपाया दीड रुपाया घेतील, उद्यां पहाटे तपास करा, असें स्टेशन मास्तरांनीं सांगितलें. त्याप्रमाणें पहाटे उठून मी जवळच्या गांवीं तपास करून पाहिला. लोक भाडें जास्त सांगू लागले पण एके-ठिकाणीं जाण्यायेण्याची गाडी दीड रुपायांस मिळाली. पहाटे निघालों तो दहा वाजतां सिद्धटेकला पोहोंचलों. हें भिमेच्या कांठीं आहे. गांवाजवळ नदीचें पात्र फारच विस्तृत आहे. पण त्यांत नांवाला पाणी वाहात होतें.

प्रथम मी श्रीसिद्धिविनायकाचे दर्शनास गेलों. देऊळ दगडी उत्तम बांधलें आहे. दर्शनानंतर उपाध्येबुवांचा तपास केला. ते बाहेर शेतावर गेले होते, ते कांहीं वेळानें आले. त्यांना एकादश्णी व देवब्राह्मण करण्याची व्यवस्था सांगि-तली ती त्यांनीं कबूल केली. हें सिद्धिविनायकाचें स्थान आहे. सिद्धी कोणास नको ? सर्वांस पाहिजे, ह्मणून बहुतेक महाराष्ट्रीय संस्थानिकांचे पूजा नैवेद्य व नंदा-दीप येथें असतात. ह्या नैवेद्यानें पुजाऱ्यांचें व त्यांच्या घरच्या मंडळींचें सकाळ संध्याकाळ पोट भरतें. घरांत जेवण क्वचितच होतें. माझे देवब्राह्मणाकरितां आजच त्यांचे घरीं अन्न शिजावयाचें होतें. या गृहस्थाचे घरीं वृद्ध आई, बायको, दोन मुलें असून इतक्यांचे दोन वेळचें पोटाला मिळतें. चार पांच नैवेद्यानेंच इतकें काम होतें इतके सकस नैवेद्य येथें असतात. त्याकरितां त्या संस्थानिकांनीं येथें ब्राह्मण, कारकून व आचारी ठेवेले आहेत. माझी पूजा, नैवेद्य यथासांग झाल्या-

वर त्यांच्या नैवेद्यापैकीं मला त्यांनीं कांहीं पदार्थ वाढले, तेही उत्तम लागले. कांहीं लोकांनीं पुजाऱ्याबरोबरच नैवेद्याचा उक्ता ठराव केला आहे. नैवेद्य नुसते वरणभाताचे नसून रोज मोदक, पोळी, लाडू, यांचेही कांहीं असतात.

गणपतीचें पोट मोठें पाहिजे, पण ह्या गणपतीचें अतिशय लहान आहे. डोकें मात्र त्या मानानें मोठें आहे. कार्यसिद्धीला मोठ्या पोटापेक्षां मोठ्या डोक्याची–पोक्त विचाराचीच–आवश्यकता असते. डोकें वाजवीपेक्षां मोठें करितां येत नाहीं; सबब याचें पोटच लहान केलें आहे असें दिसतें.

सिद्धटेकची पौराणिक कथा अशी आहे—विष्णू निद्रिस्त असतां त्याच्या दोन्हीं कानांतील मळापासून मधु आणि कैटभ या नांवाचे दैत्य प्रगट होऊन सर्वत्र पीडा करूं लागले. विष्णू जागा झाल्यावर त्यांच्याशीं पांच हजार वर्षें लढला. तरी ते मेले नाहींत, तेव्हां विष्णूंनीं श्रीशंकराला गायनानें तृप्त केलें. व मधु कैटभाच्या नाशाचा उपाय विचारिला. शंकर ह्मणाले, तूं विनायकाची पूजा केल्याशिवाय युद्धाला प्रवृत्त झालास ह्मणून तुला जय मिळाला नाहीं. आतां तूं ॐ या एकाक्षरी मंत्रानें विनायकाची आराधना कर. याप्रमाणें शंभर वर्षें झाल्यावर विनायक प्रसन्न होऊन उभा राहिला व पाहिजे तो वर माग असें ह्मणाला. विष्णू, मधु कैटभ राक्षस मारण्याचें सामर्थ्य दे असें ह्मणाला. विनायक तथास्तु ह्मणून अंतर्धान पावले. आपणाला सिद्धि झाली ह्मणून या ठिकाणीं विष्णूनें विनायकाची स्थापना केली, व त्यालाच सिद्धिक्षेत्र ह्मणूं लागले. नंतर विष्णूनें मधु कैटभाशीं पुन्हां मल्ल युद्ध आरंभिलें. परंतु बराच काळपर्यंत मधु कैटभांचा पराभव झाला नाहीं. तेव्हां विष्णूनें विनायकाचें स्मरण केलें. तेव्हां त्याला युक्ति सुचली आणि तो मधु कैटभांना ह्मणाला, तुमचें सामर्थ्य पाहून मी तृप्त झालों आहें, तर वर मागा. ते ह्मणाले, आम्हीं तुझ्यापेक्षां जास्त पराक्रमी आहों. तुलाच हवा असेल तर आमचेपाशीं माग. विष्णू ह्मणाला ठीक आहे. तुम्ही माझ्या हातून मरावें असा मला वर द्या. अशा रीतिनें गणपतीच्या वरप्रसादानें फसून चुकून ठीक आहे असें ह्मणाले. मग विचारांत पडले. पण मग उपयोग काय? मग ते ह्मणाले, सर्व सोडूं पण सत्य सोडणार नाहीं. यासाठीं तुला कबूल केल्याप्रमाणें वर दिला. आह्मी तुझ्या हातून मरण्यास तयार आहों. तुझ्या हातून मेल्यानें आमचें कल्याण होईल. असें बोलतांच जिकडे तिकडे पाणी दिसलें. तेव्हां त्यांनीं विनति केली कीं,

ज्या ठिकाणीं पाणी नसेल त्या ठिकाणीं आह्मांस नेऊन मार. यावरून विष्णूनें त्यांचीं शिरें तेथें असलेल्या उंचवट्याच्या टेकडीवर तोडलीं. तेथेंच हें देऊळ बांधलें आहे.

हें क्षेत्र भीमेच्या कांठीं आहे. ह्या ठिकाणीं नदीचें पात्र रुंद आहे. पाणी बारमहा थोडेंसें असतें. नदीला हरिपंत फडके यांनीं लहानसा घाट बांधिला आहे. देऊळ अहिल्याबाईनें बांधिलें आहे. सभामंडप गोपाळराव मैराळ यांनीं बांधिला. पेशव्यांनीं नंदादीप दिला. हरिपंत फडक्यांनीं चौघडा दिला. हरिपंताची शिबंदी व जरिपटक्याचें निशाण, येथूनच मोहिमीवर निघे. येथें विष्णूनें तप केलें, विनायक प्रगट झाले व विष्णूनें यज्ञ केला हीं सगळीं ठिकाणें श्रद्धाळूनें अवश्य पहावीं.

या यात्रेनंतर मी पुण्याहून

## चिंचवड

येथें आलों. गांव स्टेशनपासून दीड मैलावर आहे. गांवांत मोरया गोसावी हे २५० वर्षांपूर्वी होऊन गेले, यांची समाधी आहे. त्यांचें आराध्य दैवत मोरया हें होतें. मोरया गोसाव्यांनीं जिवंत समाधी घेतली. हे मोरगांवीं जन्मले होते व त्यानीं येथें येऊन तपश्चर्या केली. हे दर चतुर्थीला मोरगांवीं चालत जात असत. पुढें हे वयोवृद्ध झाल्यावर यांचा भाव पाहून गणपतीचा साक्षात्कार होऊन त्यांनीं, यापुढें माझ्या दर्शनास तुम्ही येऊं नये. मीच तुमच्या भक्तीकरितां येतों असें सांगून ते जवळच्या पवना नदींत स्नान करीत असतां मोरयाचें नामस्मरण करून त्यांनीं बुडी मारली, तों त्यांच्या हातामध्यें सुमारें एक वितीची एक गणपतीची मूर्ति आली. हीच त्यांची प्रासादिक मूर्ति होय. ही आपल्या वाड्यांत ठेवून तिच्या पूजा अर्चेमध्यें ते निमग्न असत. त्यांच्या भक्तीनें गणपती प्रसन्न झाले. पण यांच्यापुढें यांचा वंश नाहीं. कारण त्यांनीं अद्याप लग्नच केलें नाहीं. हें गणपतीला न आवडून ते त्यांच्या स्वप्नांत गेले व त्यांना साक्षात्कार होऊन निरुपायानें त्यांनीं आपल्या वयाच्या अठ्ठ्याण्णाव्या वर्षी लग्न केलें ! त्याकाळच्या प्रमाणें अर्थात त्यांना मोठ्यांत मोठी अशी दहा वर्षांची बायको मिळाली असावी. तरीसुद्धां गणपतीच्या प्रसादानें त्यांचा वंशविस्तार मोठा झाला. ते सवाशेंच्या वर वर्षें जगले असें ह्मणतात. आपल्या तपःसामर्थ्यानें ते अखेरपर्यंत तरुणच राहिले. यांनीं मुसलमान बादशहासमुद्धां ईश्वरी

साक्षात्कार करून दाखविले होते. समाधीच्या सनावरून औरंगजेब बादशहा असावा, विजापूरचा बादशहा असावा असें वाटतें. ह्या बादशहांनीं त्यांना मोठें उत्पन्न करून दिलें होतें, परंतु त्यांनीं तें नाकारलें. पुढें त्यांच्या नातवांनीं तें अति आग्रहावरून घेतलें. तें साठ हजार रुपयांचें आहे. याबद्दल गांव तोडून दिले आहेत. हें उत्पन्न मोंगल, मराठे व इंग्रज या तीन सरकारांकडून अद्याप अव्याहत चालू आहे. यापैकीं निम्में उत्पन्न त्यांच्या वंशजास मिळतें. व निम्में देवस्थानाकडे खर्च करावें, असा शाहू महाराजांनीं निकाल करून दिला होता. त्यास अनुसरून ह्या संस्थानचा कज्जा हायकोर्टांत चालला असतां हायकोर्टानेंही तसाच निकाल दिला आहे. हल्लीं गांवचे धारे व उत्पन्नही नवीन जमाबंदीप्रमाणें वाढून हें संस्थान एक लाखाचें झालें आहे. त्याच्या निम्मेंपैकीं तीस हजारच देवकार्याच्या उत्साहाकरितां खर्च करावे व बाकी राहील ते आपत् प्रसंगाकरितां रक्षण करावे, अशी व्यवस्था केल्यामुळें सर्व पैशांचा खर्च न होतां देवळाची डागडुजी व देवस्थानाच्या सामानसुमानाची चांगली व्यवस्था राखतां येते व नवेंही घेतां येतें. या संस्थानांतूनच थेऊर, ओझर, लेण्याद्री, मोरगांव, रांजणगांव या गांवच्या अष्टविनायकाची व्यवस्था होते.

यांच्या वंशजांना देव असें ह्मणतात. हल्लीं ही हक्कदार मंडळी दोनशांच्यावर झाली आहे व वाडाही भव्य मजबूत बांधला असून तो हंड्याझुंबरें व तसबिरी ह्यांनीं उत्तम श्रृंगारला आहे व त्यांत मागें सांगितलेली प्रासादिक गणपतीची स्थापना केली आहे. सर्व संस्थानची देखरेख पंचामार्फत होते. त्यांत देव मंडळीपैकीं एक पंच असतो. देव मंडळीमध्यें भांडण झाल्यामुळें ही व्यवस्था आतां सरकारमार्फत होते. येथून भाद्रपद शुद्ध चतुर्थीला पालखी मोरगांवास जाते व घोड्यावर माघ शुद्ध चतुर्थीला जाते. मार्गशीर्ष शुद्ध चतुर्थीपासून षष्ठीपर्यंत चिंचवडास मोरया गोसाव्यांच्या समाधीचा मोठा उत्सव होतो. उत्सवांत कथा कीर्तन, पुराण व शास्त्री, वैदिक, भिक्षुक, वगैरे यांच्या हजेऱ्या होतात. उत्साह दोन्हीं ठिकाणीं ह्मणजे समाधीच्या ठिकाणीं व वाड्यांतही होतो समाधीच्या ठिकाणीं श्रीगणपतीची मंगलमूर्ति स्थापन केली आहे. व वाड्यांत प्रासादिक मागें सांगितलेल्या चल मूर्तीची स्थापना करून तीवर वस्त्र, अलंकार, भूषणें घालून उत्सव फार थाटाचा करितात. उत्सवांत सकाळपासून रात्रीं आठ दहा वाजेपर्यंत एकसारखे कार्यक्रम आंखलेले असतात. मार्गशीर्ष वद्य ४

चतुर्थीला रात्रीं भोजन होतें. पंचमीला दिवसा अकरा बारावाजतां व षष्ठीला मुक्तद्वार सहस्र भोजन होतें. तें सकाळपासून रात्रीं दहा वाजेपर्यंत चालतें. त्या दिवशीं पांच सहा हजार पात्र होतें. भोजनाकरितां येथें दोन फार प्रशस्त मंडप घातलेले असतात. भोजनाची व्यवस्था समाधीजवळ पवना नदीचे कांठीं करितात. ह्या समाधीच्या आंत एक शिला लेख आहे, त्यावरून ती इ. स. १६५९ ह्या वर्षी बांधली असें दिसतें येथील भोजन समारंभ प्रेक्षणीय असतात. त्याचें थोडें दिग्दर्शन करूं.

दोन मांडव दोन हजार मंडळी जेवाला बसतील इतके मोठे असतात. एका मांडवांत बायका व एका मांडवांत पुरुष बसतात. या यात्रेला जितके पुरुष येतात तितक्याच सुमारें बायका येतात. बायकांत सवाष्णी, सकेशा, विधवा, मुली वगैरे नानाप्रकारच्या येतात. विधवास कोणत्याही मंगलप्रसंगीं जातां येत नाहीं. ह्मणून त्या ह्या मंगलप्रसंगीं प्रसादाकरितां अवश्य येतात. या समारंभाकरितां मांडव, दिवाबत्ती, सामान, आचारी, पाणके, यांचीं कंत्राटें दिलेलीं असतात. मांडवाकरितां पांचशें रुपयांचें, आचाऱ्याकरितां पावणे-तीनतिनशेंचीं अशीं कंत्राटें दिलेलीं असतात! आचारी सुमारें तीस चाळीस लागतात. दोन दिवस तूपसाखर, पोळी व षष्ठीला बुंदीचा एक एक लाडू, वरण, भात, भाजी व सार इतके पदार्थ असतात. आचारी वाढीत नाहींत. त्याकरितां अनाथ विद्यार्थीगृहाचे संस्थेपैकीं पन्नास साठ विद्यार्थी आणितात किंवा पुष्कळ स्वयंसेवक येतात. त्या दिवसांत त्या घाटावर पवना नदीवर फार कडक बंदोबस्त ठेवतात. ह्मणजे पाणी पिण्याची जागा निराळी ठेवतात. त्यांत लोकांना पायसुद्धां बुडवूं देत नाहींत. दुसरी स्नानाची व धुण्याची वगैरे जागा निरनिराळ्या ठेविल्या असतात.·या गांवाला ह्या नदीचा वेढा असल्यामुळें या सर्व सोयी करितां आल्या आहेत. येथें भोजनपात्रें व स्वयंपा-काची तयारी पाहण्यासारखीं असते. खंडोगणती अन्न जेथें तयार होते, तेथें व्यवस्था कशी असते हें येथें पाहण्यास मिळतें. स्वयंपाकाचा मांडव असतो, त्यांत चूलीऐवजीं मोठमोठे चर असून ते छातभिर खोल असतात. आंत मोठमोठे ओंडे पेटत असतात. भाताचे मणामणाचे बत्ते, वरण भाज्यांचीं पंचपात्रें, पोळ्या-करितां तव्याऐवजीं मोठमोठे जाड लोखंडी पत्रे ठेवतात. खंडोगणती तांदूळ टोपल्यांनीं नदीवर धुतात व ते जाजमावर पसरतात. तांदूळ धुतात त्यावेळीं सर्व नदी पांढरीच

होऊन जातें! भाज्यांचे ढीग असतात. पोळ्यांची कणीक कितीएक लोक हाता-पायांनीं नाचून तिंबवीत असतात. भाताच्या राशी पडलेल्या असतात. हें अन्न मोठ्या परातींत किंवा भांड्यांत घालून तीं भांडीं छोट्या गाड्यावर ठेवून समाराधनेकडे वाहून नेतात. पातळ भाजी, आमटी वाढण्यास बकेटें असतात. इतकें अन्न तयार होतें तरी तें कधीं विघडत नाहीं. अमृततुल्य लागतें. हाच त्या साधुपुरुषाचा अद्याप महिमा आहे असें ते आचारीसुद्धां सांगतात. यांत आमचें कर्तृत्व नाहीं. षष्ठीला महाराजांची पुण्यतिथी होते. तिला पंचवीस तीस विद्वान ब्राह्मण सांगून त्यांना पंचपक्वान्नी भोजन घालतात व दोन दोन रुपये दक्षणा देतात. हा एकंदर थाटमाट फारच अवलोकनीय असतो. आळंदीस नृसिंहसरस्वतीचा उत्साहही अशाच थाटाचा होतो. तेंही वर्णन करण्यासारखें आहे. त्याचा एक संग्रह होईल पण बरेच लोकांच्या नजरेखालून गेलेलें असल्यामुळें व येथें थोडेंबहूत वर्णन केल्यामुळें पुन्हा तें करून जागा अडवीत नाहीं. एकंदरींत ही यात्रा पुण्याच्या रस्त्यावर असल्यामुळें यात्रेकरूंनीं अवश्य पहावी.

मोरया गोसाव्याच्या वंशजांपैकीं, त्यांच्यासुद्धां सात पिढ्यांपर्यंत त्यांचे जे पुण्यपुरुष दहन झाले त्यांच्या दहनभूमींतून गणपतीची शिळा निघत आली. ती त्यांच्या त्यांच्या दहनभूमीवर स्थापन केली आहे. अशा सात समाधी मोरया गोसाव्यांच्या समाधीजवळच आहेत. यापुढें हे गणपती निघण्याचें बंद झालें. याचें कारण असें सांगतात कीं आपले वंशज मोरया गोसावी काय करीत आहेत, तें पहाण्याचें त्यांच्या एका सुनेनें मनांत आणून त्यांच्या समाधीचें द्वार उघडून आंत प्रवेश केला, त्यायोगें त्यांचा समाधी भंग होऊन त्यांनीं तिला शाप दिला व तुझा निर्वंश होईल असें सांगितलें. तेव्हांपासून हे गणपती येईनासे झाले. हा उत्साह आज सुमारें चारशें वर्षे अव्याहत चालू आहे. व त्याविषयीं जुने, नवे, सुधारक, दुर्धारक, यांची पूज्यबुद्धि आहे व ते श्रीमंत गरीब, असले तरी तेथील वरणभाताच्या प्रसादास अवश्य येऊन भक्तिभावानें दर्शन प्रसाद घेऊन जातात. हाच ह्या देवाचा जागृत महिमा आहे. त्याशिवाय अलीकडच्या काळांत इतक्या सर्वांची पूज्यबुद्धि होणें शक्य नाहीं. या चार दिवसांच्या उत्साहामध्यें सर्व वेळ. याच कार्याकडे खर्च केला तरी कितीतरी पाहण्यासारखें असतें. स्नान करून आठ वाजतां वाड्यांत बसावें तों रात्रीं दहा वाजतां जावें. करमणूक होऊन मन चांगलें तल्लीन होतें व कौटुंबिक

दुःखाचा परिहार होतो. प्रत्येक भाविकानें ही यात्रा अवश्य पहावी असा या पुण्यपुरुषाचा महिमा आहे. चिंचवडहून निघण्यापूर्वी मुळशीपेठ्याचें टाटाचें धरणही पाहून यावें. यानंतर मी

## आळंदी

ला गेलों. हिला देवाची आळंदी ह्मणतात हिला पूर्वी अलकावती ह्मणत असत. ही इंद्राणीचे कांठीं आहे. येथें श्रीज्ञानेश्वरांची समाधी आहे. देऊळ ३०० वर्षांपूर्वीं बांधिलेलें असून वेळोवेळीं राजेरजवाड्यांनीं त्यांत सुधारणा केली आहे. देवळाचें आवार फार मोठें आहे. मध्यभागांत श्रीज्ञानेश्वर महाराजांची दगडी समाधी आहे. शेजारीं त्यांचेमागें त्यांचें आराध्य दैवत जें विठोबा–रखमाई यांच्या मूर्ती आहेत. श्रीज्ञानेश्वराची पालखी दर आषाढीला पंढरपुरास जाते, म्हणून आषाढी एकादशीचा उत्साह पंढरपुरास होतो. व कार्तिकीला देव पंढरपुराहून आळंदीला भक्तांच्या परतभेटीला येतात. असा भक्तांचा अपार महिमा व सोहळा आहे. वारकरी संप्रदायांत ही भावना दृढ आहे. ज्ञानेश्वराचे प्रासादिक ग्रंथ अमृतानुभव, पांसष्टी व ज्ञानेश्वरी यांचा महाराष्ट्रांत मोठा लौकिक आहे. येथें कार्तिकीचा सोहोळा फार मोठा होतो. यात्रा लाख दिडलाख येते. त्यावेळीं माणशीं तीन चार आणे म्युनिसिपालटीचा कर असतो.

याशिवाय गांवांतील प्रेक्षणीय स्थळें, गोपाळपुऱ्यांतील नरसिंहसरस्वतीचा मठ व त्यांचें देवालय सिद्धेश्वराचें स्थान व पुंडलिकाचे देऊळ हीं आहेत. तसेंच चांगदेव महाराजांचा गर्व नाहींसा करण्याकरितां ज्ञानेश्वरांनीं भिंत चालविली तीही इथें दाखवितात. ती पूर्वींचीच भिंत आहे असें नाहीं. तिचे स्मरणार्थ आतां त्या जागी लोकांनीं चुनेगची दगडी फरसबंदीची भिंत बांधिली आहे व त्यावर निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान आणि मुक्ताबाई अशा चार मूर्ती बसविल्या आहेत. चांगदेव मोठे योगी होते व योगसामर्थ्यानें ते चौदाशें वर्षें जगले अशी प्रसिद्धी आहे. त्यांनीं ज्ञानेश्वर महाराजांची आपल्यापेक्षां जास्त प्रख्याति ऐकिली ती त्यांना सहन न होऊन त्यांचा समाचार घेण्याकरितां त्या स्वारीनें गोरखनाथासारखें कानफाड्याचें सोंग घेतलें, आणि वाघावर बसून हातीं सर्पाचा चाबूक घेऊन स्वारी आली. हें आपलें भयंकर रूप पाहून त्यांनीं पुढें अगोदर श्रीज्ञानेश्वराकडे आपला शिष्य पाठविला कीं, चांगदेव महाराज तुमचे भेटीस अशा रूपानें येत आहेत, काय तुमचा प्रभाव असेल तो दाखवा, नाहींतर शरण या, व त्यांचे चेले व्हा !!

ज्ञानेश्वरांस हा त्याचा गर्व समजला. त्यावेळीं हीं भावंडें सकाळीं ऊन खात एका भिंतीच्या मातीच्या ओव्यावर बसलीं होतीं. हा निरोप पोहोचतांच श्रीज्ञानेश्वरांनीं भिंतीस आज्ञा केली कीं, हे भिंती! महासाधु चांगदेव तुझ्या भेटीस येत आहेत, तर तूं त्यांच्या सन्मानार्थ आम्हाला घेऊन पुढें चल! काय करते बिचारी. आपला उद्धार व्हावा म्हणून तीसुद्धां चालूं लागली!! हें चांगदेवांनीं पाहून गर्वहीन होऊन त्यांनीं श्रीज्ञानेश्वरांस साष्टांग नमस्कार घातला व शेवटीं त्यांसच शरण गेले. शरण जाण्याचें कारण श्रीचांगदेवांस आपल्या तपाचा अधिकार सर्व प्राणिमात्रावर अव्याहत चालतो असें दाखविण्याचा होता. त्याचें उत्तर श्रीज्ञानदेवांनीं भिंत चालवून दिलें. म्हणजे प्राणिमात्रावर म्हणजे सजीवावर अधिकार चालविणें सोपें आहे, परंतु निर्जिवावरसुद्धां तसाच अधिकार चालवून त्यांचेकडून सजीवाप्रमाणें कार्य करून घेणें हेंही मला अशक्य नाहीं. तात्पर्य, ह्या सिद्धी आहेत. सिद्धी मनुष्याला आत्मज्ञानापासून दूर नेतात. सबब हे असले लोकांना फसवून आत्मप्रतिष्ठा करण्याचे प्रकार सोडून देऊन तूं आत्ममार्गाला लाग, म्हणजे मुक्त होशील हा ज्ञानेश्वराचा हेतु होता. त्याप्रमाणें उपदेश घेऊन श्रीचांगदेव महाराज आत्मज्ञानी होऊन मुक्त झाले. मुक्ताबाईनें ह्यांना आत्मज्ञानाचा उपदेश केला अशी प्रसिद्धी आहे. श्रीज्ञानेश्वर महाराजांचे चमत्कार असेच जगविख्यात असल्यामुळें त्यांचे वर्णन केलें नाहीं. हे सर्व साधू आत्मज्ञानी होते. तरी आपला मृत्यु कोठें आहे व केव्हां आहे हें त्यांसही फारसें आगाऊ समजलें नाहीं. ह्यामुळें निवृत्तीची समाधी त्रिंबकेश्वरास, सोपानाची सासवडास श्रीज्ञानेश्वरांची आळंदीस याप्रमाणें त्यांस ठिकाणें मिळालीं. सारांश, मनुष्य योगी, ज्ञानी व ध्यानस्थ झाला किंवा पूर्ण ईश्वरनिष्ठ झाला तरी ईश्वरी नेमोत्तर उर्फ त्याचें कर्तृत्व त्यास कळत नाहीं. कांहीं थोडें कळतें एवढेंच ज्ञानेश्वरांचे देवळाजवळ ज्ञानेश्वरांनीं आपला वाळलेला सोटा पुरलेला होता! त्याचाच त्यांनीं पुढें वृक्ष बनविला आहे. याला अजानवृक्ष म्हणतात. याचीं वाळलेलीं पानें प्रसाद म्हणून लोक घेतात. हीं पानें कोणत्या झाडाचीं आहेत हें ओळखतां येत नाहींत म्हणून यास अजानवृक्ष म्हणतात.

येथें असलेलें रनसिंहसरस्वतीचें स्थान हें अवाचीन आहे. गुरुचरित्रांतील नृसिंहसरस्वती निराळे. ते हे नव्हत. यांच्या समाधीकालाला सुमारें तीस चाळीस वर्षेंच झालीं असावींत. धुळ्यास यांचा बरेच दिवस वास होता म्हणून

धुळें व आळंदी येथें त्यांचे थाटाचे उत्सव होत असतात. हेही दत्ताचे अवतार होते. यांची पुण्यतिथी पौष शुद्ध पौर्णिमेला फार थाटाची होते. त्यावेळीं सुद्धां चिंचवडप्रमाणें मुक्तद्वार ब्राह्मणभोजन होतें. हजारों पान होतें. पण व्यवस्था चिंचवडपेक्षां उत्तम असते असें ह्मणतात. सर्व. सद्गुरूंचा व त्यांच्या उत्साहांचा कार्यक्रम बहुधा एकसारखाच असल्यामुळें त्यांचें फक्त दिग्दर्शन मात्र केलें आहे. विशेष वर्णन करून जागा अडविली नाहीं. आतां ज्ञानेश्वर महाराजांच्या अवतारासंबंधानें सदाशिव कवीचा एक अभंग सांगून ही यात्रा पुरी करतों.

## अभंग.

विष्णु मूर्ती हा अवतार । धरिला भूमीवर ।
कीर्ती फांकली महिवर । केला जगदोद्धार ।
भाविकावर धेनू पान्हवली । ज्ञानराज महाराज ॥
तुकाराम ज्ञानेश्वर माऊली । ज्ञानराज महाराज ।
जयजय ज्ञानेश्वर माऊली । ज्ञानराज महाराज ॥ धृ. ॥
चांगदेव महायोगी विख्यात । प्रेमें गर्व डुल्लत ।
स्वारि व्याघ्रावर हातिं सर्पातें । पुढें पाठवि शिष्यातें ।
देखुनि निर्जिव भिंती चालविली । ज्ञानराजमहाराज॥२॥
निवृत्ति त्र्यंबकीं समाधिस्त । सोपान सासवडांत ।
मुख्य ज्ञानेश्वर आळंदींत । संन्निध पंढरिनाथ ।
मुक्ताबाई ब्रह्मीं मिळाली । ज्ञानराजमहाराज ॥ ३ ॥
बाविस झालीया संवत्सर । समाप्त हा अवतार ।
निरंतर पाठीशीं जगदीश्वर । कार्तिकि उत्सव थोर ।
सदाशिव दास पाऊलें वंदिलीं । ज्ञानराज महाराज ॥४॥

असें ज्ञानेश्वर महाराजांचें भजन करीत करीत मी मधले वाटेनें

## देहू

येथें गेलों. येथें तुकाराम महाराजांची समाधी आहे. हा गांवही इंद्राणीचे कांठीं आहे. इंद्राणी येथूनच आळंदीकडे वहात गेली आहे. आळंदीपासून

मधल्या रस्त्यानें हें पांच मैल आहे. येथेंही इंद्राणीचे कांठीं विठोबाचें देवालय आहे. हें तुकारामाचे पूर्वज विश्वंभरबुवा यांनीं बांधिलें यावरून विठोबा हें त्यांचें कुलदैवतच दिसतें. गांवांत एका देवळांत तुकारामाची मूर्ती उभी असून तिला तांवडें पागोटें घालतात. देहू गांवामध्यें तुकारामाचे वंशज आहेत. त्यांच्या घरापैकीं ज्या खोलींत तुकारामाचा जन्म झाला तेथें आतां श्रीविठ्ठलाची मूर्ती बसविली आहे. त्यांचे वंशज शेलारवाडी स्टेशनावर यात्रा घेऊन जाण्याकरितां येतात. ब्राह्मण किंवा कोणीही यात्रिकरूला त्याच्या इच्छेप्रमाणें जागा, भांडेंकुंडें देतात. किंवा त्यांना कबूल असेल तर त्यांची जेवाची वगैरे व्यवस्था ते स्वतः करतात.

देहू गांवीं इंद्रायणीला मोठा डोह आहे. त्यांत मासे मारण्याचा प्रतिबंध आहे. या डोहांतील मासेसुद्धां माणसांप्रमाणेंच यथाक्रम आळंदीची व देहूची यात्रा करतात. ह्मणजे भाद्रपद महिन्यांत आळंदीस जातात. तेथें उत्साव होई-पर्यंत पंधरा दिवस राहतात व नंतर पुन्हां या डोहांत येतात, असें ह्मणतात ! भाद्रपद महिना आला, यात्रेचे दिवस आले, हें त्यांना कसें समजतें ? हा काय त्या पुण्य पुरुषाचा प्रभाव आहे, किंवा हवापाण्याचा गुणधर्म आहे ? पण तें कांहीं असो, त्यांच्या पश्चात प्राणिमात्रसुद्धां त्यांची मनोभावानें अशी पूजा करि-तात हेंच खरें. वस्तुतः त्यांना भूलोक सोडून दोन शतकें होऊन गेलीं आहेत तरी ज्ञानरूपानें त्यांचा वास अद्याप येथें आहेच व त्यांचा हा महिमा आहे. नदीला चांगले घाट आहेत. देखावा सुंदर व तपःश्चर्येला अगदीं लायक आहे. पण अशा प्रकारचे देखावे पुष्कळ पाहिले असल्यामुळें व त्यांचीं वर्णनें मागील भागांत बरेच वेळां आल्यामुळें पुन्हां येथें केलें नाहीं. बाकी हें ठिकाण प्रसादयुक्त आहे. या माशांनासुद्धां हे तुकारामाचे परम भक्त असें समजून त्यांना यात्रेकरू चणेफुटाणे टाकतात. याच डोहांत तुकाराम स्नान करीत व याच डोहांत त्यांनीं आपले अभंग बुडविले होते पण ते पांडुरंगाच्या कृपेनें कोरडे निघाले. यात्रिकरू मनोभावानें येथ स्नान करतात. स्नान करतांना मासे त्यांना अगदीं खेटून जातात. कांहीं भीत नाहींत. यामुळें मासा फार पोसला आहे. जसें कांहीं कलियुग त्यांना माहितच नाहीं ! कलियुगांत हें धर्मराज्यच आहे, असें त्यांना वाटतें. या नदीचें कांठीं एक पिंपळाचें झाड आहे. तेथूनच तुकाराम सदेह वैकुंठास गेले आहेत. ते फाल्गुन वद्य द्वितीयेला वैकुंठास गेले त्या दिवशीं त्यांचा तेथ उत्सव करतात. त्यावेळीं ह्या पिंपळाचें पानसुद्धां हालत

नाहीं, इतकीं झाडेंसुद्धां त्यांच्याकरितां तपःश्चर्या करितात. अशी समक्षा अद्यापपर्यंत तेथें आहे व ती वृक्ष पाषाणाचे वंशजसुद्धां अद्याप पाळतात ! ! तेव्हां या सत्पुरुषाचे महिम्याला सीमा आहे काय ? खरोखर ज्ञानेश्वर व तुकाराम हे मात्र खरे अद्वैतवादी झाले होते. प्राणिमात्राचे ( जिवांचे ) फार काय निर्जिवांत व आपले जिवांत त्यांनीं बिन-कूल भेद ठेविला नाहीं. यामुळें सर्व प्राणिमात्रांची यांचेविषयीं अगदीं पूज्य बुद्धि अभेद भावना अद्यापपर्यंत आहे. ह्मणून ते खरे अजातशत्रु व निर्भय झाले. इतकी समता त्यांचेमध्यें आली ह्मणूनच दगडाचा विठोबा त्यांचे हातून जेवूं लागला व त्यांचे कीर्तनाचे वेळीं नाचूं उडूं लागला व त्यांचीं सर्व कामें शेणः गोव्यासुद्धां करूं लागला. या अपार सामर्थ्यामुळें तुकारामाचे अभंग अद्यापपर्यंत अभंग राहिले आहेत, व वेदाप्रमाणें त्यांची मान्यता सर्व विद्वान, अविद्वान, स्वधर्मी व विधर्मी यांमध्यें अगदीं सारखीच मानितात. प्रस्तुत यांच्या यात्रा करण्यांत हेंच विशेष आहे कीं, यांच्या पुण्यभूमींच्या दर्शनानें मन एकदम पवित्र होऊन जातें. साधु समागमानें आपल्याप्रमाणेंच कांहीं वेळ ते त्या मनुष्यास-करतात यांत शंका नाहीं. आपला भाव असेल त्याप्रमाणें आपली समजूत होते, हें खरें असलें तरी पण आपल्यांत व त्यांच्यांत जमीन अस्मानाचें अंतर आहे. तुकारामाचे अभंग व ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी ( ज्ञानदेवी ) यांची महति वारकरी संप्रदायांत मोठी असेल यांत नवल नाहीं. पण भिन्नधर्मीय असे विद्वान युरोपियन लोकसुद्धां त्याच प्रेमानें हे अभंग गातात. व याप्रमाणें खिस्ताचे अभंग रचावे, असें त्यांना वाटतें. रेव्हरंड टिळकांनीं असे खिस्ताचे अभंग केलेही आहेत हें विशेष आहे. बाकी ह्यांत विशेष काय आहे ? जी शक्ति प्राणिमात्रावर किंवा अचेतनावरसुद्धां अधिकार चालविते, ती माणसावर, तशांत विद्वानावर चालविणार नाहीं काय ? त्याकाळीं सर्व लोकांनीं त्यांचा द्वेष केला पण त्यांनीं कोणाचा केला नाहीं. यामुळें यांचे शत्रूसुद्धां शरण येऊन ते यांस पूज्य मानीत आहेत. यामुळें तुकारामाच्या अभंगांचें कथापुराणांतही अगदीं वर्चस्व मानून ते शिरसा वंदनीय समजतात, व वेदश्रुतीप्रमाणें त्यांचा आधार मोठ्या भक्तिभावानें देतात.

या नदीच्या पलीकडे जवळच भामनाथाचा डोंगर आहे. तेथें तुकाराम दगडाचा टाळ करून भजन करीत बसत असत तेथें जावें. आपल्यालाही

तसेंच भजन करून तल्लीन व्हावें असें वाटतें व तेथून जाऊंच नये अशी मनाची भावना होते. तुकारामाला कोणत्याही जातींत वैगुण्य दृष्टीस पडलें कीं, त्याच्यावर त्यांचा ताशेरा आलाच! मग ती जात श्रेष्ठ ब्राह्मण असो किंवा हलकी असो. पण याशिवाय बाकी भक्तिरसाच्या दृष्टीनें ते आपणांस सर्वांचा दासच ह्मणवून घेत असत.

नम्र झाला भूतां। तेणें कोंडिलें अनंता।

अशी त्यांची वागणूक असे. यामुळें त्याचे अभंग कोठें कोठें परस्पर विरुद्ध असे आढळतात. कांहीं असलें तरी तुकारामाचे अभंग प्रसादवाणी ह्मणून ह्मटले जातात. कवींनींही त्यांची तशीच महति वर्णिली आहे व यामुळें त्यांची वाणी अद्यापही अभंग आहे.

जातीकडे न बघतां वंदावा हा भला तुका वाणी।
संतोषवी समस्तां ज्याची अमृताधिका मधुर वाणी॥ १॥
जयाची वदे पूर्ण वेदांत वाणी।
ह्मणावें कसें हो तयालागीं वाणी॥ १॥ मोरोपंत

देहू, आळंदी हीं गांवें अनुक्रमें शेलारवाडी व पुणें स्टेशनपासून जवळच आहेत. आळंदीला पुण्याहून मोटारीनें सहज जातां येतें. मुमुक्षूंनीं एकवार साधुसंतांच्या समागमानें पवित्र झालेलीं हीं स्थानें पाहून व इंद्रायणींचें स्नान करून आपल्या शरिरास व मनास पवित्र करून घ्यावें. नंतर मी शेलारवाडीवरून

## तळेगांव दाभाडे

येथें आलों. येथें समर्थ विद्यालय व पैसाफंडाचा कांच कारखाना हीं पाहण्यासारखीं आहेत. या समर्थ विद्यालयांत क्रांतिकारक विद्यार्थी तयार होतात असा त्यावेळीं सरकारला संशय येऊन त्यांनीं तें बंद केलें होतें पण क्रांति होते ती प्रचलित साधनांनीं किंवा जेथला बंदोबस्त फार कडक आहे तेथून बहुधा होत नसून ज्यांत कांहीं अर्थ नाहीं अशा साधनांनीं व प्रसंगीं अशा लोकांकडून होते किंवा इतर कारणांनीं होते असा क्रांतीचा इतिहास सांगतो. अर्थात ह्या शाळेंत कांहीं अर्थ नाहीं, अशी सरकारची समजूत त्यांच्या खात्रीच्या मनुष्यानें घालून दिली व ती सरकारला पटली, तेव्हां नवीन समर्थ विद्यालय उघडण्यास सरकारनें परवानगी दिली. तें हें नवीन समर्थ विद्यालय व तेथील व्यवस्था

पाहून यावें. देशाच्या उन्नतीकरितां चालू काळांत कशा प्रकारच्या शिक्षणाची अवश्यकता आहे, नव्या पिढीला कशा प्रकारचें शिक्षण द्यावें अशा प्रकारची तळमळ लागलेल्या पुरुषांपैकीं प्रो. विजापूरकर यांची ही कृति आहे. सुटीमुळें मला ही संस्था पाहातां आली नाहीं ! स्टेशनवरून कांचेचा कारखाना व गांव एक दीड मैल लांब आहे. रेल्वेचे दुसरे बाजूस समर्थविद्यालय आहे. मी गेलों त्यावेळीं रजा असल्यामुळें कारखाना चालतांना मला प्रत्यक्ष दिसला नाहीं. पण त्याच्या चालकांनीं त्याचें साहित्य, मोठमोठ्या मुशी, कांच करण्यास लागणाऱ्या कच्या मालाच्या राशी दाखविल्या. त्यावरून ह्या अशा हलक्या मालापासून इतका सुंदर माल निघत असेल असें वाटतसुद्धां नाहीं ! हा केवळ कारखाना नाहीं. ही ह्या शिक्षणाची शाळाही आहे. येथें वीस विद्यार्थी नेहमीं शिक्षणाकरितां घेतलेले असतात. कांचेस लागणारी वाळू व गारगोटी येथें विपुल असल्यामुळें हा कारखाना येथें चालला आहे. या कारखान्याचे जे मॅनेजर आहेत त्यांच्या जवळ कारखान्याच्या स्वामित्वाचे पैसे याकरितां कमी मिळाले तरी चालतील पण निदान वीस मुलांना तरी मोफत शिक्षण दिलें पाहिजे, अशा अटीवरच त्यांस मदत केली जाते. त्याप्रमाणें येथें शिक्षण मिळत आहे. या कारखान्यांत चालकत्व पूर्वीं जपानी लोकांकडे होतें, तें आतां नाहींसें होत आलें आहे. आपल्याकडेही तसे लोक निघत चालले आहेत. पण जगांत त्या त्या धंद्यांत ज्या नव्या नव्या सुधारणा होत आहेत त्या, परदेशचे लोक कांहीं तरी आपल्याकडे घेतल्याशिवाय समजणारच नाहींत. सबब तितक्यापुरते तरी ते लोक अवश्य घ्यावे. नाहींतर नवीन सुधारणा न होतां धंदे डबघाईस येतील !

येथें उंची कांच तयार होत नाहीं. शिवाय हा धंदा जगांत सुधारत असल्यामुळें त्यांत धंद्याचे व मालाचे नवीन नवीन शोध लागत आहेत. त्या सर्वांचा समावेश ह्या लहानशा कारखन्यांत होण्यास फारच विलंब लागेल. तरीपण निघालेल्या मालावरून अगदींच निराश होण्याचें कारण नाहीं. निघालेला माल हंड्या, ग्लासें, पेपर वेट्स, निरनिराळ्या रंगाच्या दिव्यांच्या कांचा, फ्लॉवर पॉट्स हीं सुबक निघत आहेत. यापुढें सूक्ष्मदर्शक यंत्रांच्या किंवा दुर्बिणीच्या, चष्म्याच्या, घड्याळ्याच्या कांचा, बिन सांध्याच्या बांगड्या, झुंबरें, गोळे, असा यांचा उतरत्या प्रमाणांत क्रम आहे. ह्या दृष्टीनें पाहिलें तर हा कारखाना केवळ प्रयोगावस्थेंतच आहे. ह्या कारखान्याचें धोरण पाहून आगल्यांनीं स्वतंत्र व भव्य

कारखाना काढिला आहे, व बिल्लोरी कांचेचा व उंची बिनसांध्याच्या बांग-ड्यांचा कारखाना जवलपुरास होत आहे. असे ल्हास सहान उद्योगधंद्याचे कारखाने नवीन धर्तीचे निघत आहेत हें देशाचें भाग्य आहे. पण हे निरंतर चालत नाहींत. कारखान्यांतलि पुढारी गेला ह्मणजे तो डबघाईस येतो हा आप-ल्यांत मोठा दोष आहे. यामुळेंच व्यापारी धोरण आपणास नाहीं असें ह्मणणें भाग आहे. हें गुजराथी लोकांपासून शिकण्यासारखें आहे. यानंतर मी

## कार्लें

येथें कोरीव लेणी व रविवर्म्याच्या चित्रांचा कारखाना पाहण्यास गेलों. कार्लें स्टेशनला हल्लीं मळवली हें नांव मिळालें आहे. स्टेशनपासून तीन मैलांवर उत्तरेकडील डोंगरांत हीं लेणीं आहेत. जाण्यास सडक आहे. यांत एकच लेणें चांगलें सुस्थितीमध्यें असून पाहण्यासारखें आहे. इतर व ह्या लेण्यांत थोडा फरक दिसला. इतर लेणीं एका दगडाचीं दिसतात, पण ह्याला सांधे असून चुन्याचें काम केलेलें आहे असें वाटतें. ह्यावरून हें अलीकडचें असावें ! पण शिल्प-कलेच्या दृष्टीनें ह्या कृत्रिम बांधकामाची योग्यता फार श्रेष्ठ आहे असें तज्ज्ञ समजतात. येथील शिलालेखांवरून हीं लेणीं इ. स. पूर्वीं ८० च्या सुमारास कोरलीं असावीं असें दिसतें.

येथें एक मोठा सभामंडप आहे. त्याची रुंदी व उंची सारखी असून ती सुमारें चाळीस पन्नास फूट आहे. लांबी याच्या दिढीनें आहे. वर मोठी कमान आहे. ती इतके दिवस राहिली आहे यावरून ती एका दगडाचीच असावी ! व मध्यें फूट तूट झाल्यामुळें चुना बसविलेला आहे. आरंभीं मोठमोठे जयविजय, हत्ती हीं दर्शनीं चित्रें फार मोठीं आहेत. अगदीं पाठीमागें एक भरींव स्तूप आहे. बुद्धाची मूर्ति कोठेंही नाहीं. याच स्तूपामध्यें बुद्धाचा कांहीं अवशेष ठेवून त्यावर हा बांधलेला असतो. हा कृत्रिम बांधलेला आहे, केवळ कोरलेला नाहीं असें दिसतें. याशिवाय दुसरीं चार पांच लेणीं आहेत. पण तिसऱ्या भागांत वेरुळ-सारखा कोरीव लेण्यासंबंधानें विस्तृत लेख दिल्यामुळें व त्या दृष्टीनें हीं पाहण्या-सारखीं नसल्यामुळें त्यांचें वर्णन इतकें विस्तृत केलें नाहीं. बाकीं ज्यांना सवड असेल त्यानें हें एकदां पाहून येण्यासारखें आहे. तसेंच जवळ भाजेगांव आहे, तेथील लेणीं पाहून यावीं. हीं सर्वांत जुनीं ह्मणजे इ. स. पूर्वीं दुसऱ्या शतकां-

तील असावीं असें त्यांचें मत आहे. यावरून प्राचीन काळाचे कारागिरीचा नमुना कळेल.

हीं लेणीं पाहिल्यावर मी रविवर्मा प्रेस पाहण्याकरितां आलों. येथें रंगीत चित्रें निघतात. तीं भिन्न रंगांमध्यें अगदीं बिनचूक कशीं निघतात याची कल्पना मला नव्हती. कारण शिळेवर निरनिराळे रंग वेळोवेळीं लावून चित्र छापून निघणें अशक्य होतें. मग चित्रें निरनिराळ्या रंगांचीं कशीं निघतात, ह्यांतलें इंगित मला येथें समजलें. चित्रांमध्यें जितके रंग असतील तितक्या रंगांत तें पुन्हां छापावें लागतें. मात्र चित्र अगदीं बरोबिर ठेवावें लागतें, नाहींतर चित्र बिघडतें. भलताच रंग भलतीकडेच जातो. त्यांत डोळे व कुंकू यांच्या चुका अक्षम्य असतात. चित्रें छापून निघाल्यावर त्यावर रोगण लावतात, ह्मणजे चित्र तयार झालें. हे मिश्र रंग कसे तयार करतात व ते कसे पक्के होतात ही क्रिया गुप्त राखिली जाते. हीं कामें फक्त दोन तीन युरोपियन मात्र करतात. रंगांचें मिश्रण कसें करावें, कसें उकळावें, आंच किती द्यावी हें ते कोणास दाखवीत नाहींत. कारण हें कसब आहे. हिंदुस्थानांतील कसब युरोपियनांनीं त्यांना छळून छळून घेतलें व गुप्त राहिलेलें फ्रीट्रेडसारख्या खुल्या व्यापाराचीं तत्वें सांगून त्यांजपासून शिकून घेतलें, पण आतां तें सर्व विसरून जाऊन प्रत्येक गोष्टींत आतां प्रतिबंध घालून आपल्या सर्व विद्या त्यांनीं गुप्त ठेविल्या आहेत. ह्मणजे अथपासून इतीपर्यंत सर्वच लबाडी आहे. हा जीवनकलह आहे. आह्मी जगावें इतकेंच नव्हे तर चैनीनें दिवस काढावे व तुह्मी उपाशी राहून ब्रह्मज्ञानाच्या, तत्वज्ञानाच्या, नीतिच्या गोष्टी सांगून किंवा देवावर भरंवसा ठेवून ह्मातपाय ताणून खुशाल मरावें, हाच नियम त्यांचे प्रत्येक कृत्यांत दिसतो ! दांडगाई करूं लागले कीं बंदूक आहेच !! आमच्या पुढाऱ्यांचा सुद्धां असाच वृद्ध नीतीचा उपदेश आहे !!! यानंतर

## खंडाळें

येथें येऊन लोणावळ्याच्या मार्गानें टाटाचीं वीज उत्पन्न करण्याचीं भव्य तळीं व खालीं घाटांतून उतरून खोपवलीचा विजेचा कारखाना व त्याची अवाढव्य रचना हीं पाहून घ्यावीं. तेथून जवळच मी मग

# महड

गांवीं आलों. महड हें अष्टविनायकांपैकीं वरद विनायक गणपतीचें स्थान आहे. खोपवलीपासून डोलवली स्टेशनावर यावें. तेथून तीन मैलांवर महड आहे. रस्ता सडकेचा नाहीं, पायवाट आहे. किंवा परस्पर खोपोलीवरून यावें. येथें आल्यावर प्रथम देवाचे दर्शनास गेलों. एवढें मोठें अष्टविनायकाचें स्थान असून देऊळ मोठें नाहीं. गांव मध्यम वस्तीचा आहे. कांहीं देशस्थ ब्राह्मणांचीं घरें आहेत. ते उपाध्येपणाचें काम करितात. रीतीप्रमाणें मी देवब्राह्मण करण्यास उपाध्येबोवांपाशीं पैसे दिले व तीर्थप्रसाद घेतला.

महडच्या विनायकाची पौराणिक कथा अशी:— रुक्मांगद नांवाचा तरुण, सुंदर व पवित्र आचरणी राजा वनांत गेला असतां त्याला एक ऋषीचा आश्रम लागला. तेथें मुकुंदा नांवाची एक अति रूपवान ऋषिकन्या होती. ती रुक्मांगदाचें मोहक स्वरूप पाहून कामातुर झाली व तिनें त्यास आपली इच्छा पुरी करण्याविषयीं प्रार्थना केली. रुक्मांगदानें तिची या पापवासनेबद्दल निर्भत्सना केली व तो रागानें निघून गेला. मुकुंदा त्याच्या विरहानें तळमळत राहिली. हें पाहून इंद्र रुक्मांगदाचें रूप घेऊन तिचेपाशीं आला. इंद्रापासून मुकुंदेला एक पुत्र झाला, त्याचें नांव गृत्समद. हा फार तेजस्वी ब्राह्मण झाला. त्याला एका राजानें यज्ञाकरितां बोलाविलें. तेथें वसिष्ठादि महामुनी आले होते. तेथें वरिष्ठ मानाविषयीं गृतसमदाचा त्यांच्याबरोबर वाद झाला. ते ह्मणाले, तूं जार पुत्र आहेस, तूं आमच्याहून वरिष्ठ नाहींस. गृत्समदानें याबद्दल आपल्या आईस विचारिलें, माझा बाप कोण? तिनें सर्व हकिकत सांगितली व तुझा बाप रुक्मांगद राजा असें सांगितलें.

गृत्समदानें तें ऐकून आपल्या आईला शाप दिला. तिनेंही त्याला उलट शाप दिला कीं, मी तुझी आई असून मला तूं शाप दिलास त्यासाठीं तुला त्रैलोक्यपीडक असा पुत्र होईल. इतक्यांत आकाशवाणी झाली कीं, गृत्समदा, तुझा बाप इंद्र आहे. यामुळें तर गृत्समदाला फार वाईट वाटून तो पुष्पक वनांत बसून विनायकाची आराधना करूं लागला. हजारों वर्षें तप होतांच विनायक प्रसन्न होऊन पुढें उभा राहिला व ह्मणाला, वर माग. गृत्समद ह्मणाला, मी सर्वत्र प्रसिद्ध होऊन माझी श्रेष्ठता वाढेल, मला सर्वत्र अग्रमान

मिळेल असें कर व या पुष्पक वनांत राहून माझ्याप्रमाणें भक्तांच्या इच्छा पुऱ्या कर. विनायक ह्मणाला, "गणानां त्वा" या मंत्रानें तूं माझें अनुष्ठान केलेंस यासाठीं आजपासून तूंच मंत्राचा द्रष्टा ऋषी होशील. आजपासून माझ्या ह्या मंत्राच्या अगोदर तुझें नांव घेतील तरच वैदिक कार्यें सिद्धीस जातील. ह्मणून "गणानां त्वा" या मंत्राच्या पूर्वीं गृत्समदाचें नांव घ्यावें लागतें. या वनाला कृतयुगीं पुष्पक वन, त्रेतायुगीं मणिपूर, द्वापारीं भानक व कलीयुगीं भद्रक ह्मणतील. हल्लीं येथें लहानसें जंगल आहे. या ठिकाणीं स्नान व दान केल्यास भक्तांच्या सर्व इच्छा पूर्ण होतील व श्रीशंकराशिवाय सर्व देवांना जिंकणारा पराक्रमी असा तुला मुलगा होईल. असें ह्मणून विनायक अंतर्धान पावले. गृत्समदानें त्या ठिकाणीं विनायकाची मूर्ति स्थापन करून त्याला वरदविनायक असें नांव दिलें. सांप्रत ह्या स्थानाला अनुक्रमें भद्रक—मढक—किंवा मढ असें ह्मणूं लागले आहेत. मढ येथील हल्लींच्या देवळांतील प्रतिमा तेथील तळयांत सांपडली. ती ज्या दगडी देव्हाऱ्यांत होती तो देव्हारा देवळाजवळच ठेविला आहे. देवाला सरकारांतून पूजा व नंदादीपाबद्दल अठरा रुपये मिळतात!

ह्या ठिकाणीं दोन उत्सव होतात. पहिला भाद्रपद शुद्ध प्रतिपदेपासून पंचमीपर्यंत व दुसरा माघ शुद्ध प्रति पासून पंचमीपर्यंत. हें दैवत कांहीं लोकांचें कुळदैवत असल्यामुळें त्यांची येथें ूजा अर्चा सदैव चालते. याशिवाय प्रत्येक संकष्ट चतुर्थीस अभिषेक पूजा, व संध्याकाळीं ब्राह्मणभोजन यथाशक्ति पक्वान्न करून निरनिराळया भक्तांचें चाललें असतें. वर्षाच्या बारा महिन्यांच्या संकष्ट चतुर्थ्या निरनिराळया भक्त मंडळींनीं वांटून घेतल्या आहेत. त्याप्रमाणें उत्साव होतात. या ठिकाणीं अष्ट विनायकांची संपूर्ण माहिती संपली. चिंतामणि विजयांत सांगितल्याप्रमाणें मढच्या गणपतीनें कोणत्या दानवानाला मारून ऋषींचें रक्षण केलें तें समजलें नाहीं.

अष्ट विनायकांच्या यात्रा यांची, बारा जोतिर्लिंगें, चार धाम, याप्रमाणें महायात्रांत गणना होत नाहीं. ह्यामुळें उत्तर हिंदुस्थानांतील व दक्षिणेकडील यात्रेकरूही प्रायः या यात्रा करीत नाहींत. पण प्रत्येक मंगलप्रसंगीं गणनायकाचें आवाहन निदान स्मरण तरी कार्य निर्विघ्न होण्याकरितां करावें लागतें असा आर्यांचा सांप्रदाय आहे. मग त्याच्या यात्रा कां करीत नाहींत हें समजत

नाहीं. अष्ट विनायकांचीं स्थानें फक्त महाराष्ट्रांत आहेत आणि तींही पुणें प्रांतांत म्हणजे त्याच्या आसपास आहेत, यावरून या यात्रा पेशव्यांनीं निर्माण केल्या असें कांहीं लोक म्हणतात पण ही त्यांची चूक आहे. नुकतेंच लेण्याद्रिचें कवच पडलें, तें दीड फूट जाडीचें होतें. तो गणपती निदान पांचशें वर्षांच्या पूर्वींचा तरी असावा, असा विद्वानांनीं अदमास केला आहे. याचप्रमाणें सर्व गणपतींची माहिती समजते. आतां प्रत्येक प्रकारच्या यात्रा सर्व हिंदुस्थानांत पसरल्या आहेत, तशा ह्या नाहींत. ह्मणून उत्तर हिंदुस्थानांत गणपतीचें महत्व नाहीं व गणेशचतुर्थीचा सणही करीत नाहींत. तेव्हां हें दैवत महाराष्ट्रीयांचेंच असें सांप्रदायिक दिसतें.

अष्ट विनायकांची संक्षिप्त माहिती चिंतामणिविजय ग्रंथांतील अध्याय त्रेचाळीसमध्यें पुढील ओंव्यांत दिली आहे.

निर्गुण सगुण प्रणवाकृती । एक असे हा गणपती ।
रक्षावया भक्तांप्रती । अष्टस्थानीं प्रगटला ॥ १४८ ॥
मयूर क्षेत्रीं उद्धरिला कमलासुर । सिद्धटेकी हरीनें तप
केलें घोर । बल्लाळ भक्ताचा केला उद्धार । मुरुड क्षेत्रीं
प्रगटोनी ॥ १४९ ॥

महड क्षेत्रीं विनायक । प्रगटोनियां भक्तपालक ।
दुष्ट दानव वधोनी सकळिक । मुनी द्विजांशीं रक्षिलें ॥१५०॥
विधीनें तप करितां स्थावर । भुवनीं प्रगटला चिंतामणी ।
भ्रांती गेली निरसोनी । स्वसामर्थ्यांशीं लाधला ॥१५१॥
लेण्याद्री दिव्य पर्वतीं । पार्वत्यात्मज झाला श्रीगणपती ॥
दानव मर्दोनी पापमती । रक्षण केलें नगजेचें ॥१५२॥
ओझर क्षेत्रीं विघ्नहर । प्रगट झाला सर्वेश्वर ।
भक्तांचीं संकटें केलीं दूर । समूळ विघ्नें वारोनी ॥१५३॥
रांजणगांवीं श्रीगणपती । प्रगट झाली श्रीब्रह्ममूर्ती ।
आश्वासूनी सुरांप्रती । स्थापिलें स्वपदीं सर्वांतें ॥१५४॥

या भूवरी छपन्न विनायक। स्थानें असती पृथक् पृथक्।
स्थान महिमा अलौलिक। मुक्तता होत दर्शनानीं ॥१५५॥

याप्रमाणें ५६ विनायक व १०८ विनायकांची माहिती त्यांच अवतार-चरित्रासुद्धा एका ठिकाणीं चांगलीशी मुद्देसूद मिळाली नाहीं. कोणास ठाऊक असल्यास कळवावी किंवा ग्रंथ कळवावा.

हीं अष्ट विनायकांचीं स्थानें मी पाहिली. पण त्या ठिकाणीं सृष्टिसौंदर्य किंवा विशेष पाहाण्यासारखी गोष्ट किंवा आख्यायिकाही प्रसिद्ध नाहींत. कांहीं असो, ह्या यात्रा एकदेशीय दिसल्या तरी पुढें आर्यांनीं ह्याचें मंगलकार्यारंभीं विद्याप्राप्त्यर्थ व यशाकरितां आरंभींच स्तवन करण्याचें ठरविल्यामुळें आणि महाराष्ट्रीयांचें हें आराध्य दैवत असल्यामुळें आणि लोकमान्य टिळकांनीं संघ-शक्तीकरितां ही राष्ट्रियदेवता केल्यामुळें तिचे उत्साह सर्व महाराष्ट्रीयांनीं तरी अवश्य करावे.

यानंतर मी डोलवली स्टेशनावर येऊन कर्जतला आलों. कर्जतपासून खोपवलीपर्यंत रेलवेचा फाटा नेण्यांत प्रथम ही रेलवे बैलगाडीच्या घाटानें पुण्यास जावयाची होती. परंतु बैलगाडीप्रमाणें ती इतक्या चढावानें जाणें शक्य नाहीं असें ठरून तो फाटा कर्जतपासून नेला व त्यामुळें कर्जत खोपवली ब्रँच बंद झाली. आतां खोपवलीवर टाटाच्या इलेक्ट्रिसिटीचें काम असल्यामुळें त्यांच्या सामानाकरितां रोज एक गाडी कर्जतहून सुमारें दहा वाजतां निघून खोपवलीस जाऊन तीच परत कर्जतला दोन वाजतां परत येते. या गाडीला थर्डक्लासचा एक डबा लावतात. कर्जतपासून पळसदरी पुढें केळवली, डोलवली, अशी नांवाला स्टेशनें आहेत. स्टेशन बांधलेलें नाहीं, चौकी नाहीं, सिग्नल नाहीं. तेथें एक झाड आहे, त्या ठिकाणीं ही गाडी उभी करतात. गाडींत गार्ड असतो तो गाडींत बसल्यावर तिकिट देतो. हें तिकीट कर्जत किंवा खोपवलीपर्यंतचेंच असतें. सारांश ही व्यवस्था ट्रामप्रमाणें आहे. टाटा कंपनीपूर्वी ही लाईन फक्त उन्हाळीं चाले व पुढें पावसाळीं बंद राही. पण आतां टाटाच्या कारखान्यामुळें नेहमीं चालते. यानंतर कर्जतवरून

## भिमाशंकर

येथील यात्रा करण्यास मी निघालों. भीमाशंकर हें बारा ज्योतिर्लिंगांपैकीं एक

लिंग आहे. कर्जतवरून खांडसपर्यंत लोकलफंडी सडक झाली आहे. नेरळहून सुद्धां रस्ता आहे पण सडक नाहीं. रस्ता फार वाईट आहे. कर्जतची सडकही त्याच पद्धतीची आहे, पण ती सडक आहे एवढेंच! नेरळपासून खांडस दहा कोस आहे व पुढें दोन तीन कोस घाट चढावा लागतो. खांडस येथें गाडींतून जाण्यापेक्षां पायीं जाणें बरें! पण एवढा रस्ता चालून गेल्यावर पुढें घाट चढावयास शक्ति राहात नाहीं, ह्मणून वाहनाचा आश्रय करावा लागतो. कर्जतहून खांडस सडकेनें एक दोन कोस नेरळपेक्षां जास्त लांब आहे. वर घाटावर चढण्यास डोल्याही मिळतात. खांडसाहून घाटांत पायवाटेची सडक केली आहे, पण ती लांबची आहे. जवळूनही रस्ता आहे पण तो फार बिकट आहे. त्यांत करवती घाटाचा रस्ता तर फारच कठीण आहे. खांडसापासून सडकेनें सहा मैल बैल घाट चडावा लागतो. सबब आदल्या दिवशीं खांडसास येऊन पहाटेस घाट चढण्यास आरंभ करावा. मंडळी त्याचवेळीं निघते. त्यावेळीं निघाल्यास व फारसें कोठें बसलें नाहीं तर मनुष्य आठ नऊ वाजतां भिमाशंकरला जाऊन पोहोंचतो. भिमाशंकरला गेल्याशिवाय वाटेंत मध्यें कोठेंही पाणी नाहीं, ह्मणून उन्ह होण्याचे पूर्वीं जावें लागतें. हा त्रास चुकविण्याकरितां पुष्कळ लोक घाटावरून तळेगांव स्टेशनवरून भिमाशंकरास जातात. ही सडक थेट भिमाशंकरच्या देवळापर्यंत जाते. सडक चांगली, चढाव फारसा नाहीं, पण पल्ला फार लांबीचा आहे. ह्मणजे हाही प्रवास तसाच त्रासाचा आहे. महाशिवरात्रीच्यावेळीं ही यात्रा असते. त्यावेळीं नेरळ, कर्जत, खंडाळें, तळेगांव व पुणें येथून वाहनांची सोय असते. तळेगांवाहून त्यावेळीं मोटारी मिळतात. कर्जत नेरळवरून बैलगाड्या मिळतात पण त्या बिनछपराच्या व बारदानी असतात.

भिमाशंकरच्या माथ्यावर गेल्यावर मनाला फारच समाधान होतें. व आपण केलेल्या श्रमाचा मोबदला संतोषाच्यारूपानें तावडतोब मिळतो. भिमाशंकर हे सह्याद्रीचें एक उंच शिखर असल्यामुळें हवा फार आल्हादकारक आहे, यामुळें मन सुप्रसन्न असतें. नेरळ किंवा कर्जतकडून वर चढून गेल्यावर प्रथमच एक देवीचें देऊळ लागतें. ह्या देवीच्या दर्शनास बायका बहुधा प्रथम जात नाहींत. कारण हिचें दर्शन घेतल्यानें त्या अवेळींसुद्धां अस्पृश्य होतात, अशी हिची प्रख्याति आहे. सबब सर्व यात्रा आटोपल्यावर बायका हिचें दर्शन घेऊन खालीं उतरूं लागतात. ह्मणजे घाटांत किंवा खांडसास कोठें तरी त्यांना

बसण्याचा प्रसंग येतो. मीही सहकुटुंब गेलों होतों. तेव्हां मलाही हा अनुभव आला, ह्मणून मुद्दाम ही गोष्ट लिहिली आहे. देवाचें दर्शनानंतर भिमा नदीचा जेथून खरा उगम आहे, तें कुंड दाखवितात. तें पावसाळीं वाहातें, पण उन्हाळीं कोरडेंच असतें. त्या ठिकाणीं पंचायतनाची स्थापना केली आहे. तेथून प्रवाह निघतो, तो गोदावरीप्रमाणें बांधून नेला असून तो गुप्त रूपानें त्र्यंबकेश्वराच्या कुशावर्ताप्रमाणें देवळाजवळील मोव्या कुंडांत उतरतो असें मानितात. या जवळच्या बांधीव दोन तीन कुंडांत मात्र पाणी बारा महिने असतें तींच येथील तीर्थें आहेत. या तीर्थांत स्नान करून भिमाशंकराच्या पूजचें फार महात्म्य आहे. यानंतर पुढें भिमाशंकराचें देवालय लागतें. हें देऊळ नाना फडणवीसानें बांधलें आहे असें ह्मणतात. हें देऊळ मूळ नानावटी नांवाचे कोणी गृहस्थ होते त्यांनीं बांधिलें होतें नंतर नाना फडणिसांनीं त्याचा जीर्णोद्धार केला. ह्याची पूजा गुरवाकडे आहे, त्यास पूजा नैवेद्य व नंदादीप वगैरे करितां ३५० रु. सरकारांतून मिळतात व शिंदेसरकारांतून अन्नसत्राकरितां कोडिलकर ह्या आडनावाचे ब्राह्मणास ६०० रुपये मिळतात. देऊळ लहानच आहे. साळुंका पिंडी वगैरे लहानच आहेत. येथें जाऊन दर्शन घेतलें व क्षणभर देवळांत बसलें ह्मणजे यात्रेचा उद्देश जो मनाचें समाधान तें येथें तत्काळ प्राप्त होतें. मनुष्य कसाही गेलेला असो त्याचें समाधान येथें झालेंच पाहिजे, असा येथील महिमा दिसतो. मी मे महिन्यांत गेलों होतों त्यावेळीं मला तर फार मजा वाटली. देवाची धूळभट घेतल्यानंतर जवळ धर्मशाळा आहेत त्याठिकाणीं उतरावें. वर एक दोन ब्राह्मणांची घरें आहेत व ते देवाचे पूजारीच आहेत. सडे गेल्यास त्यांच्याकडे देव ब्राह्मणाची सोय करावी.

त्रिपुरासुराचा नाश केल्यानंतर शंकरांनीं ह्या पर्वतावर वास केला. त्रिपुरासुराचा नाश करण्यास शंकर प्रवृत्त झाले, त्यावेळीं त्यांना राग आला. त्यामुळें त्यांच्या मस्तकांतून गंगेचा श्राव निघूं लागला, तीच ही भिमानदी आहे. व येथील पर्वत हा शिवस्वरूपी आहे. त्रिपुरासुराचा नाश करण्याकरितां शंकरांनीं या पर्वतचा रथ केला होता, ह्मणून याला.. रथाचल ह्मणतात. भिमाशंकराची पौराणिक कथा अशी आहेः—पूर्वी कुंभकर्णाचा मुलगा भीम आपल्या मातेसह येथें सह्य पर्वतावर असतां त्यानें आपल्या पित्यास मारणाराचा सूड घेण्याच्या इरायानें उग्र तप आरंभिलें. त्यांयोगानें एक

ज्वाळा उत्पन्न होऊन ती तिन्ही लोक जाळूं लागली. तेव्हां सकळांच्या विनंतीवरून ब्रह्मदेवानें त्यास तुला अपरिमित बल प्राप्त होईल असा इच्छित वर दिला. तो मिळतांच तो दैत्य सेना जमवून सर्वत्रांस पिडा देऊं लागला. एकदां तर त्यांनीं विष्णूसही जर्जर केलें. एके दिवशीं त्यानें तेथील प्रियधर्म राजास कैद केलें. हा राजा परम शिवभक्त होता. तो पार्थिव पूजा करीत असतां त्याची निंदा करून दैत्य त्यास मारावयास धांवला त्यावेळीं शंकरांनीं त्या लिंगांत प्रकट होऊन हुंकार करतांच तो जळून भस्म झाला. त्या भस्मापैकीं कांहीं त्यांचे (शंकरांचे) श्वासानें उडून इकडे तिकडे पडलें तेंच हें येथील जंगल झालें. व त्यांत सकलदेवांचे विनंतीवरून शंकर भिमाशंकररूपाने येथें राहिले. ह्या पर्वताच्या आजूबाजूसही फार मोठें जंगल आहे. अर्थात येथें क्रूर जनावरांची वस्ती आहे. त्यांनीं प्राण्यांची शिकार केल्यामुळें त्यांचे अवशिष्ट राहिलेले भाग शिंगें, खूर, हाडें, जिकडे तिकडे दृष्टीस पडतात. वाघाचीं पावलें, त्याची लीद वगैरे दृष्टीस पडते. हा सर्व प्रयार पाहून अंगावर काटा येतो, व प्रत्यक्ष ह्या यमदूताचें दर्शन घडल्यास काय होईल असें मनांत येतें. पण प्रत्यक्ष वाघाचें कोणास दर्शन होत नाहीं, मग मनुष्यास इजा कोठून होणार !

शिवरात्रीस लक्षावधी यात्रा जमते. सर्व डोंगर फुलून जातो. पण खांडसाहून वर येतांना किंवा खालीं जातांना किंवा वर अरण्यांत कोणास कसलाही अपघात आजपर्यंत झाल्याचें एकही उदाहरण नाहीं. तसेंच हा कठीण पर्वत अगदीं अशक्त व बोजड माणसें कशीं चढून जातात हाही येथील तीर्थमहिमा किंवा भिमाशंकराचा साक्षात्कार आहे.

येथें सृष्टिसौंदर्य बहारीचें आहे. येथील वनश्रीच्या शोभेचीं निरनिराळीं ठिकाणें पहावीं म्हणून त्या त्या ठिकाणीं देवस्थानांची योजना केली आहे. त्या सर्वांत नागफडीचा देखावा हा फार रौद्र व भयंकर आहे. नागफडी हा सह्याद्रीचा कडा तुटलेला एक लांबलचक प्रचंड नागफडीसारखा पर्वताचा भाग आहे. येथून खालीं तुटलेला कडा अपरंपार खोल आहे. अर्थात शेवटीं उभें राहून पाह्याण्याची सोय नसते. ह्मणून लोक हा देखावा निजून पडून नुसतें डोकें पुढें करून पाहातात. घेरी येऊं नये ह्मणून पाठीमागें एकानें पाय धरावे लागतात. येथून कोकणची शोभा विमानांतून पाहिल्याप्रमाणें फार मजेची

दिसते. व आपण कोकणचा नकाशा पाहातों आहों, खालीं निरनिराळे बाळ डोंगर, वांकड्या तिकड्या मार्गानें गेलेल्या नद्या, रेल्वे रस्ते व त्यांचीं स्टेशनें, घरें, गांवें वगैरे यांची फारच मजा दिसते, व विमानांतून पाहिल्याचा प्रत्यक्ष अनुभव मिळतो ! हें किती वेळ पाहिलें तरी पहावेसें वाटतें, समाधान ह्मणून होत नाहीं. हें देवस्थान करणेचा हेतु हा प्रदेश रमणीय तर खराच पण ह्या पर्वतावरून कोकणांतून घाटावर जाण्यास सोयीचा मार्ग आहे. कोकण व देश यांचें दळणवळण वाढविण्याचीं हीं पूर्वींचीं साधनें होतीं. आतां रेल्वे झाली ह्मणून ह्याचें महत्व गेलें, ती गोष्ट निराळी. पण रेल्वे कांहीं जन्माची नाहीं ती नाहींशी होईल, पण हें देवस्थान व त्याचा रस्ता कायमच राहाणार ह्मणून येथें देवस्थानची योजना केली आहे. कामरूप म्हणजे आसाम देशांत कामाक्षी देवीजवळ भिमाशंकराचें मुख्य स्थान असून तेंच खरें ज्योतिर्लिंग असें कांहीं ह्मणतात परंतु तेथें भिमानदी नाहीं सबब तें खरें नाहीं.

या शिखराची उंची चौतीशें चौपन फूट ३४५४ ह्मणजे समुद्रसपाटीपासून जवळ जवळ पाऊण मैल आहे. अर्थात येथील हवा थंड आहे. शिवरात्रीला तर फारच थंडी असते. पण यात्राच फार असल्यामुळें व जिकडे तिकडे चुली पेटल्यामुळें किंवा परमेश्वरी प्रसादामुळें थंडीपासून कोणास फारशी इजा होत नाहीं. हा गिरी प्रदेश पाहण्यात मे महिनाच उत्तम आहे. ह्या दिवसांत पाणी जरा खराब असतें पण बाकी आराम असतो. येथून पुन्हां घाट उतरून खांडसास यावें व तेथून नेरळकडे येतांना मार्गानें थोडें वळून

## वैजनाथ

येथें यावें. वैजनाथ हें शिवस्थान अद्यापपर्यंत जागृत आहे. येथें शंकरावर तेथील अकरा धारांच्या अभिषेकपात्रानें रुद्रावर्तन किंवा पूरुषसूक्त आवर्तनें सुरू केल्यास किंवा नुसती धार धरल्यास अद्याप येथें सिंहनाद निघतो, तो गुंऽऽऽ गुंऽऽ असा गोड, प्रेमळ व प्रसंगीं निरनिराळया आवाजाचा असतो. दिवसाच्या निरनिराळ्या प्रहरीं तो आवाज अतिशय मंजूळ व मोहक वाटतो. हा आवाज प्रसंगविशेषीं भिन्न स्वरामध्येंही होतो. हा पूर्वीं कोणी कसेंही त्या अभिषेक पात्रानें पाणी घातलें असतां नित्य होत असे. परंतु त्या देवाला कोणी आग्रहानें एका बाईनें विटाळ केल्यामुळें तो मध्यें बंद झाला होता, पुन्हां

त्याची शुद्धता केली तेव्हां तो सुरू झाला. पण आतां त्याचा जोर पूर्वीसारखा राहिला नाहीं व तो सर्व माणसांच्या अभिषेकानें होतो असेंही नाहीं. हा सिंहनाद होण्यासाठीं कांहींनीं मुद्दाम पुष्कळ पाणी घालूनही प्रयत्न केला परंतु तो झाला नाहीं, ही लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. हा सिंहनाद शंकराच्या पिंडी-वरच्या पाण्यानेच होतो असें नाहीं. त्यापुढें देवळांत मारुती आहे त्यावर अभिषेक पात्र धरिलें असतांसुद्धां कमजास्त प्रमाणानें सिंहनाद होतो. नदीवरून देवळांत येण्याच्या सर्वांत वरच्या पायरीवर धार धरल्यानेंही होतो. हे भिन्न-भिन्न स्वराचे असतात. तसेंच नदीच्या एका ठिकाणीं उभें राहिलें असतां तेथें प्रतिध्वनी फार स्पष्टपणें व सतत ऐकूं येतो.

हा सिंहनाद अनियमितपणें होतो आणि तो भिन्न स्वरांत होतो. तसेंच हा प्रतिध्वनी होतो याची हल्लींच्या प्रचलीत शास्त्रीय कारणांवरून मीमांसा लागत नाहीं, कारण देवळांत गाभाऱ्याला दगडी घुमट नाहीं व तेथें शब्द केला असतां त्याचा प्रतिध्वनी होत नाहीं. देऊळ अगदीं साधें विटा कौलांनीं बांधिलेलें आहे. मारुती तर अगदीं उघड्या जागेवर आहे. आणि पायऱ्या तर देवळाच्या पागोळ्या ठिकाणीं आहेत. तेव्हां कोणा शास्त्रज्ञाला याची उपपत्ति लावण्याची हौस किंवा अभिमान असेल तर त्यांनीं येथें येऊन ह्या देवकार्याची कारणमीमांसा किंवा संगती लावावी. नाहींतर हें देवकार्य आहेच ! साधे आणि देवभोळे लोक याला देवकार्य ह्मणतात व विद्वान सुशिक्षित लोक अशाना सृष्टिकार्यें म्हणतात, व त्याची उपपत्ति लावण्याचा प्रयत्न करितात. परंतु अशा जिज्ञासूनें येथें येऊन आपली इच्छा परिपूर्ण करून घ्यावी किंवा देवाचा महिमा तरी गात बसावें !!!

येथें दुसरा एक आणखी असाच चमत्कार होत होता परंतु तो आतां नाहींसा झाला आहे. हें देऊळ पेज नदीच्या कांठी आहे. ही नदी व देऊळ यांचे-जवळ एक नियमीत जागा होती. तेथें वैशाखी पौर्णिमेस सकाळीं भात पेरून संध्याकाळीं कापून झोडून त्या भाताचा नैवेद्य संध्याकाळीं प्रदोष पूजेच्यावेळीं देवाला मिळत असे ! हल्लीं ती जागा अज्ञात आहे. कोणी ह्मणतात त्या जागेवर नदी आली आहे व आतां त्याठिकाणीं कोणी साधूनें कुंड बांधलें आहे यामुळे ती वहिवाट बंद पडली. हल्लीं नदींत एक पाण्याचें कुंड आहे. हें हंड्या बुडे इतकेंच

सुमारें लांब रुंद व खोल आहे, यांतलें पाणी कधींही कमी होत नाहीं. कितींही उपसा झाला तरी हंड्रा भरून निघतो ! मग कसाही दुष्काळ पडलेला असो. नदीला पाणी नसल्यामुळें ती अगदीं कोरडी पडली तरी कुंडांतलें पाणी कमी होत नाहीं ! कोणी ह्मणतात एकदां हत्ती लागला होता तरी त्यालासुद्धां तें पाणी हटलें नाहीं ! !

ह्या पुरातन गोष्टी ह्या वैजनाथाच्या आरतींत पूर्वीपासून गोंविलेल्या आहेत. ती आरती खालीं लिहिल्याप्रमाणें—

मस्तकीं ओंकार विराटरूप । सिंहनादें समयीं रघुवीरजप ।
शेजारीं भैरव पातामळ एक । नंदी भृंगी दोन्ही नाचति सन्मुख ।
जयदेव जयदेव जय वैजनाथा । पंचप्राण आरती स्वामीसमर्था ।। धृ० ।।
पेज गंगेच्या तीरीं धरिला रहिवास । राका साळी पीक वैशाख मास ।
तूर्या उन्मनी आनंदें घोष । स्वानंदें भूवन प्रत्यक्ष कैलास ।।२।।
तेहेतीस कोटी देव येती दर्शना । सनक सनकादिक गीत गाति नाना ।
नारद तुंबर नाचति कीर्तना । माधवसुत नारायण वंदीतो चरणा ।।३।।

यांत सिंहनाद, राका, साळीपीक हें वर्णन मागें सांगितलेंच आहे. आतां वैशाखी पौर्णिमेला तें भात उत्पन्न होत नाहीं परंतु उत्साह होतातच.

येथें उत्साह खालीं लिहिल्याप्रमाणें तीन होतात.

१ कार्तिक शुद्ध दशमीपासून वद्य प्रतिपदेपर्यंत सात दिवस फक्त रात्रौ कीर्तन व शेवटीं अन्नसंतर्पण होतें. पौर्णिमेला त्रिपूर लागतो. याबद्दल खर्चाकरिता सरकारी इनाम जमीन आहे व तिची व्यवस्था पंचांमार्फत होते.

२ माघ वद्य एकादशीपासून अमावास्येपर्यंत पांच दिवस फक्त रात्रौ कीर्तन, शिवरात्रीला यात्रा येते व दुपारीं कीर्तन होतें. हा गांवकीचा उत्सव आहे.

३ वैशाख शुद्ध एकादशीपासून वद्य प्रतिपदेपर्यंत सहा दिवस रात्रौ कीर्तन. पौर्णिमेच्या दिवशीं त्रिपूर लागून पालखी निघते. दुसरे दिवशीं सकाळीं मैदानांत कुस्त्यांचा समारंभ होतो. दोनप्रहरीं समाराधना व रात्रीं तीर्थ-प्रसाद, ललीत वगैरे होतें. हाही गांवकीचाच उत्सव आहे.

येथें वामन हरी परांजपे या नांवाचे तेजस्वी ब्रह्मचारी होते. त्यांचा उत्साह माघ शुद्ध त्रयोदशीपासून पौर्णिमेपर्यंत तीन दिवस सकाळीं नऊ ते अकरा उपनिषदें, भाष्यें वगैरे तात्त्विक पुराण चालतें. संध्याकाळीं तीन ते पांच भजन, पुराण किंवा कीर्तन होतें. कीर्तन व पुराण जुनें पद्धतीचें असतें. ह्या तीनही दिवस दोन्ही वेळां बाहेर गांवच्या लोकांस भोजन मिळतें व शेवट दिवशीं सर्व पंचक्रोशीचें ब्राह्मणभोजन असतें. हा उत्साह सार्वजनिक वर्गणीनें व भिक्षेनें होतो. त्याचे व्यवस्थापक वेणगांवचे वैद्य आहेत. हे ब्रह्मचारी फारच चमत्कारिक रीतीनें समाविस्त झाले आहेत. त्यांना आपला काळ आला असें समजल्यावर एके दिवशीं संध्याकाळीं ते आपल्या शिष्यास ह्मणाले मला आज गाडींत बसावेसें वाटत आहे. तत्काळ शिष्यानें गाडी जोडून आणली व तींत हे बसले. गाडी कोठें न्यावयाची ? ह्मणून त्यानें त्यांस विचारिलें. बैल हाकला, जातील तिकडे जाऊं द्या, त्यांना प्रतिबंध करूं नका असें ते ह्मणाले. तों बैल नेमके स्मशानांतच गेले व तेथें उभे राहिले! तेथें हे उतरले. सर्व मंडळीस तेथें नदीवर स्नानसंध्या करण्यास त्यांनीं सांगितलें. संध्या झाल्यावर सर्व मंडळी जमल्यावर गप्पा सांगत असतां तेथें आपल्या शिष्याच्या मांडीवर डोकें ठेवून निजून ते हुकारे देत होते. कांहीं वेळानें हुकारा बंद झाला, ह्मणून मंडळीनीं हाक मारून पाहिलें तों कांहीं नाहीं. सर्व संपलें!! आपले मरणाचें स्थळ काळ इतक्या रीतीनें बिनचूक समजणें व त्याला सृष्टिदेवतेकडून अनुमति मिळणें व त्याप्रमाणें मनाची तयारी ठेवणें हें खऱ्या तपश्चर्येशिवाय किंवा आत्मज्ञाना-शिवाय होणार नाहीं. मनुष्यानें जन्मास येऊन जीं कांहीं ज्ञात किंवा अज्ञात बरीं वाईट कृत्यें केलीं असतील तीं त्याला किंवा परमेश्वराच्या चित्रगुप्तांना माहीत असतात, त्यांची वजावाट होऊन त्याला अखेर काय शिक्षा किंवा बक्षीस मिळावयाचें तें मिळतें व त्याची बऱ्या वाईट रीतीनें अखेर होते असा सर्व धर्मांचा सिद्धांत आहे. त्या दृष्टीनें इतक्या लायकीचें सरटिफिकेट तुकारामाशिवाय कोणासही मिळालें नाहीं. तुकारामाचा देह पापी माणसांनीं पाहिला नाहीं तसा यांचाही नाहीं. हेही दिव्य रथांतूनच गेले आणि ह्मणूनच त्यांचे एवढे भाविक-पणानें उत्साह होतात. ज्या पुण्याची फेड देवालासुद्धां जिवंतपणीं करितां येत नाहीं त्याची फेड अशी श्राद्धरुपानें, कीर्तनें किंवा उत्साह रुपानें तो करितो असें वाटतें.

ही यात्रा झाल्यावर जवळच भिवपुरी गांव आहे. तेथें तलाव व दत्तमंदीर पाहण्यासारखें आहे. पूर्वी रेल्वे नव्हती तेव्हां पुण्यास जाण्याचा याच कुसुर घाटांतून मार्ग होता. पण रेल्वे झाल्यामुळें तो आतां बंद पडला, इतकेंच नव्हे तर गांवही नाहींसा होत चालला आहे. हल्लीं जवळच्या चिंचवली स्टेशनाला भिवपुरी रोड असें नांव दिलें आहे व तेथें आतां टाटावर्क चाललें आहे. व एवढ्यावरूनच त्याचें नांव राहिलें आहे. पण मूळची पांढरदेशाची वस्ती आतां राहिली नाहीं.

हें पाहिल्यानंतर परत चिंचवली स्टेशनावरून किंवा परभारें नेरळ येथें यावें. व तेथून

## माथेरान

येथें जाण्याकरितां छोटी गाडी आहे, तींत बसून माथेरानास जावें.

माथेरान हें हिलस्टेशन ऊर्फ हवा खाण्याचें ठिकाण आहे, तेव्हां याची खरी शोभा उन्हाळयांतच दिसेल एरवीं दिसणार नाहीं. हवा खाण्याचे ठिकाणीं श्रीमंतांचीं विलास मंदिरें व उपभोगांचीं ठिकाणें असतात, ह्मणून त्यांचे विलास अशा ठिकाणीं हल्लींच्या पद्धतीनें कसे असतात, त्यांचेंच ह्या यात्रेंत मुख्यतः वर्णन करावयाचें आहे.

मुंबई इलाख्यांत पहिल्या नंबरचें हवा खाण्याचें ठिकाण महाबळेश्वर व दुसऱ्या नंबरचें माथेरान आहे. महाबळेश्वराची उंची समुद्र सपाटीपासून पंचे-चाळीसशें अठ्ठावन ४५५८ फूट ह्मणजे सुमारें एक मैल आहे व माथेरानची २६७८ फूट ह्मणजे सुमारें अर्धा मैल आहे. मुंबईपासून माथेरान नजीकच असल्यामुळें मध्यम स्थितीचे व थोडा वेळ रजा असलेले श्रीमंत लोक किंवा ऑफिसर महाबळेश्वरापेक्षां माथेरानास फार येतात. नेरळपासून माथेरान साध्या सडकेनें सात मैल आहे. त्यापैकीं चार मैल चढाव बराच अवघड आहे. ही चढावाची सडक सुमारें पंचेचाळीस अंशाच्या कोनाएवढी आहे असें ह्मटलें तरी चालेल! पुढें एक मैल सपाट आहे. नेरळहून छोटी रेल्वे माथेरानपर्यंत गेली आहे. हिला स्टीम ट्रामवे ह्मणतात. ही तेरा मैलांची आहे. ही रेल्वे पंच-वीसास एक याप्रमाणें सारख्या उंचीनें वर गेली आहे. रेल्वे नेतांना या डोंगराची सीनसीनरी किंवा सृष्टिशोभा उत्तम राखिली आहे. यामुळें गाडी

वळणावळणांनीं जातांना रस्त्यांतील भिन्न भिन्न ठिकाणच्या दऱ्या खोऱ्यांची शोभा फारच बहारीची दिसते व आपण विमानांतूनच वर जातों आहों असें वाटतें. ही गाडी आसपासच्या डोंगरांतील वैचित्र्य दाखविण्याकरितां निरनिराळे देखावे, छोटेपूल व बोगदे यांमधून मुद्दाम नेली आहे, सबब जातांना तरी या गाडींतून जाऊन येतांना पायीं यावें, ह्मणजे दोन्ही रस्त्यांतील सृष्टिशोभा अनुभवास येईल.

माथेरान ही एक टेकडी नाहीं. दोन तीन स्वतंत्र समांतर लांबलचक टेकड्या असून त्या मध्यभागावर एकमेकींशीं जोडल्या गेल्या आहेत, त्यामुळें वर मोठें मैदान झालें असून पंचपाळ्याप्रमाणें त्यांचीं शेवटें दूरवर पसरलीं आहेत त्यामुळें यांचे हे पॉइंट किंवा टोकें होऊन त्यापासून खालच्या खोऱ्यांची बाहारीची शोभा दिसते. हीं शेवटें उतरत उतरत जमिनपिर्यंत खालीं न येतां एकदम खालीं उतरलीं आहेत, यामुळें खोल दऱ्या, खोरीं, तुटलेले कडे, यांचा भिन्न ठिकाणांहून भिन्न शोभा दिसते. तेथून पक्षी, ढग, आपले पायांखालीं तरंगतांना दिसतात. अर्थात पाऊससुद्धां ढगांतून खालीं पडतांना दिसतो. माथेरानच्या टेकड्या तांबड्या दगडमातीच्या आहेत यामुळें सर्व सडका कुंकुममंडित दिसतात व त्यांवरून चालणारांचे कपडेहि कुंकुममयच होतात.

सर्व माथेरानभर सुमारें तीस चाळीस फुट उंचीचीं जंगली झाडें पसरलेलीं आहेत. व हें सृष्टिसौंदर्य कायम राखण्याविषयीं कडक कायदा केला आहे. झाडाची जिवंत फांदी जो कोणी तोडील त्याला कडक शिक्षा ठेविली आहे. जें झाड आपोआप मरेल किंवा वाऱ्यानें पडेल त्याचीं लांकडें जंगलखात्याकडून तोडून त्याचा डेपो उघडला आहे व त्या डेपोंतूनच जाळण्याकरितां सर्वांनीं लांकडें नेलीं पाहिजेत, असा कायदा आहे. कधीं काळीं सर्पणाचा तोटा आला तर खालून नेरळहून कातकरी किंवा जंगली लोकांकडून त्यांच्या मोळ्या वर नेववितात, पण वरील जिंवत जंगल तोडीत नाहींत ! यामुळें सडकेशिवाय पाऊलभर जागासुद्धां माथेरानास सुटी नाहीं, इतकें जंगल जिकडे तिकडे पसरलें आहे. उन्हाळीं भर दुपारींसुद्धां माथेरानास रस्त्यांतून हिंडतांना उन्हाचा त्रास होत नाहीं. सदा सर्वकाळ कोठेंही बसलें तरी आपण एका मोठ्या सावलीच्या बगीच्यांत बसलों आहों असा भास होतो. त्या झाडीमध्यें इमारती लांकडाचीं झाडें किंवा फुलांचीं फळांचीं किंवा गगनचुंबित वृक्ष नाहींत. केवळ रानटी झाडें आहेत.

मात्र तीं अगदीं दाट व सारख्या उंचीचीं आहेत. ह्मणून वरून पाहाणाराला हा एक अपूर्व हिरवा गालिच्याच पसरला आहे, असें वाटतें. इतकीं झाडें असून सामान्यतः कोणण्याही झाडाला कोणत्याही काळीं फुलें फळें विशेष येत नाहींत हें एक आश्चर्यच आहे. क्वचित याला थोडे अपवाद आहेत पण ते जमेंत धरण्यासारखे नाहींत. तसेंच कोणताही ऋतु असला तरी झाडांचीं पानें खरडून तीं खरंव्यासारखीं होत नाहींत. हिंवाळ्यांत कडक थंडी पडली ह्मणजे झाडांचीं दानें खरडतात. पण तेथें कोणत्याही झाडाचा खराटा होत नाहीं. हा येथील हवेचा विशेष परिणाम आहे. असें होण्याचें कारण येथील हवा सर्व प्राणिमात्र व वनस्पती यांना सर्व ऋतूंतही सारखीच मानवते असें दिसतें. उष्ण प्रदेशांत वर्षाचे सहा ऋतु दिसतात; समशीतोष्ण प्रदेशांत तीन व शीत प्रदेशांत दोनच ऋतु दिसतात. तोच प्रकार माथेरानास आहे.

माथेरानास उन्हाळ्यांत सीतोपचार केले असतां ते बाधत नाहींत तसेंच कडक थंडींत उष्णोपचार केले तरी बाधत नाहींत. हिंवाळ्यांत खालची थंडी जशी विषारी असते व ताप येतो तशी वरची विषारी नसते. केवळ शुद्ध थंडी असते. यामुळें केवळ थंडीपासून संरक्षण करण्यापुरते कपडे असले ह्मणजे झालें. तेथें मलेरिया नसतो, अर्थात कोणताही रोग नाहीं. कारण मलेरियापासूनच बहुतेक सर्व रोग होतात. यामुळें आजारी मनुष्याससुद्धां ही हवा फार मानवते, ह्यामुळें श्रीमंत, व्यापारी, राजेरजवाडे, मोठमोठे ऑफिसर, केवळ विश्रांतीकरितां व मनःस्वास्थ्याकरितां चार दिवस येथें येऊन राहतात. ही हवा समशीतोष्ण असल्यामुळें कोणत्याही ऋतूसंबंधानें येथें त्रास होत नाहीं. ह्मणजे उन्हाळ्यांत उन्हाळा किंवा हिंवाळ्यांत हिंवाळा फारसा त्रासदायक होत नाहीं. पावसाळ्यांत पृथ्वीवर सर्वत्र ठिकाणीं हवा सारखीच असतें, ह्मणून पावसाळ्यांत माथेरानीं कोणी येत नाहीं. येथें पाऊसही फार ह्मणजे दोनशें अडिचशें इंचावर पडतो, तरी हवेपासून त्रास होत नाहीं. मन नेहमीं प्रसन्न असतें व जास्त श्रम केले, तरी थकवा येत नाहीं. इतकेंच नव्हे येथें जास्त मेहनत केली नाहीं तर मात्र मनुष्यास शैथिल्य येईल. निदान इकडे तिकडे गाडींत बसून फिरलेंच पाहिजे. यामुळें ज्यांना जास्त कर्तृत्वाची जरूरी आहे ते सर्व लोक येथें येतात. आमच्या पूर्वजांनासुद्धां सृष्टीच्या घडामोडीचा व ईश्वरविषयक अतींद्रिय

गोष्टींचा मानासिक विचार करावा लागत असल्यामुळें त्यांनींसुद्धां जंगलांत डोंगरावर आसमंतांत राहणें पत्करलें. या हवेच्या फरकामुळें हल्लीं हें ठिकाण श्रीमंतांचे राहणीचें झालें आहे. श्रीमंतांना जिवाच्या सुखाकरितां पैशाची परवा नाहीं, ह्यामुळें मुख्यतः हें ठिकाण महागाईचें झालें आहे. मध्यम स्थितींतील गरिबांना येथें राहण्याचा उपाय नाहीं. श्रीमंत लोक चैनीकरितां असे पैसे उधळतात त्यापेक्षां त्यांनीं गरिबास मदत केली तर काय हरकत आहे ? असें गरिबांचें ह्मणणें आहे. पण तें साफ चूक आहे. कारण गरिबांचा ज्यांच्यावर चरितार्थ चालतो असे उद्योगधंदे व व्यापार श्रीमंतांच्या बुद्धिमत्तेवर, कर्तृत्वावर व त्यांच्या श्रीमंतीवर अवलंबून असतात. त्यांची बुद्धि जशी तीव्र राहील, त्याप्रमाणें त्यांची भरभराट होऊन गरिबांस काम मिळून त्यांचें उपजीवन होईल. बुद्धि तीव्र राहण्याला पोषक हवा पाहिजे, शारीर स्वास्थ्य पाहिजे, याकरितां त्यांना अशा ठिकाणीं यावें लागतें. त्यांना येण्याकरितां त्यांच्या दर्जा-प्रमाणें विलासाच्या जागा, बंगले करावे लागतात. त्याशिवाय त्यांचें मनरंजन होऊन बुद्धि व्यवहारक्षम होणार नाहीं. ह्मणून श्रीमंत लोक किंवा शहाणे अति-शय विचारी किंवा राजेरजवाडे, केवळ चैनीकरितां किंवा विलासाकरितां विनाकारण पैसे उधळतात हें ह्मणणें खोटें आहे. श्रीमंतानें केवळ आपल्याकरिता पैसे उधळले तरी कोणत्याही रूपानें परदेशांत जाणाऱ्या पैशापेक्षां ते पुष्कळ-पटीनें बरे आहेत. ताटांतून वाटींत सांडलें काय किंवा वाटींतून ताटांत सांडलें काय एकच. गरिबाकडून पैसा श्रीमंताकडे जातो, तसा श्रीमंताकडून चैनी-करितां कां होईना पण गरिबाकडे तो आला पाहिजे. त्याशिवाय देशाचें पोषण होणार नाहीं. पण परदेशच्या व्यापारानें पैसा तिकडे जाऊन परदेशचें पोषण होतें ही गोष्ट गरिबांनीं पूर्ण लक्षांत ठेविली पाहिजे. राजे लोक काय किंवा श्रीमंत लोक काय यांना पैसा खरोखरच गरिबांकडून मिळतो. त्यांत राजा हक्कानें घेतो व त्यांचे चैनीकरितां तो परदेशांत जातो. अर्थात त्यानें परदेशचें पोषण होतें. परदेशची सुधारणा पाहून त्याप्रमाणें तो आपल्या राज्यांत करील तर तो रयतेचा फायदाच आहे. पण श्रीमंत व्यापारी गरिबांना त्यांच्या प्रापंचिक जिन-सांच्या रूपानें मदत करून गरिबांकरितां देशांत कारखाने काढतो व सर्व बाजूनें बऱ्या वाईट काळीं त्यांचें पोषण करितो. कर्तृत्ववान श्रीमंत चैनी निघाला तर त्याचे योगानें देश भरभराटीस येतो व देशांत त्याचे चैनीकरितां

कां होईना, कलाकौशल्य वाढतें. गुणी लोकांना आश्रय मिळून त्यांची वाढ होते. मुसलमानी राजांनीं येथेंच राज्य केल्यामुळें त्यांच्या चैनीनें देशाला हीन स्थिति आली नाहीं. पण आतां चैनीच्या वस्तु वापरल्या कीं, पैसा परदेशात जातो, हें त्या वस्तूंची चैन करणाऱ्यानें लक्षांत ठेविलें पाहिजे. ज्या श्रीमंत लोकांना किंवा व्यापाऱ्यांना आपला उद्योगधंदा सोडून अशा चैनीच्या किंवा विश्रांतीच्या ठिकाणीं राहण्याची सवड होत नाहीं त्यांचा निरुपाय होऊन बुद्धीही चालेनाशी झाली व आजारी पडूं लागले ह्मणजे ते येथें येतात. कांहीं दिवस राहून ताबडतोब परत जातात. त्यांना व्यापारामुळें राहण्यास सवडच नसते. पण तेवढ्याकरितां त्यांनीं येथें किती तरी उत्तम वैभवशाली बंगले बांधले आहेत! खरोखर माथेरानचा प्रत्येक बंगला पाहण्यासारखा आहे.

माथेरानची वस्ती एके ठिकाणीं नाहीं. एकेक बंगला एकेक फर्लांगावर किंवा त्यापेक्षां जास्त अंतरावर आहे! जुळलेली किंवा एकत्र वस्ती फक्त बाजारांत आहे. बाजारापासून मार्केटपर्यंत ह्मणजे सुमारें एक फर्लांग दोन्ही बाजूंचीं सुमारें पन्नास घरें मात्र जवळजवळ आहेत, बाकी सर्व वस्ती पांगलेली आहे. असे बंगले येथें सुमारें पाचशेंच्या पेक्षां जास्त आहेत! हे बंगले बहुधा बोहरी, मुसलमान, पारशी यांचे आहेत. एक दोन युरोपियनांचे आहेत. हे बंगले मालकानें स्वतः आपल्याला राहण्याकरितां बांधिले आहेत. पण मालक नसेल तेव्हां हे बंगले भाड्यानेंही देतात. यांचें भाडें हंगामावर असतें. आक्टोंबरपासून जूनपर्यंत मोसम असतो. त्यांत एप्रील, मे व जून या महिन्यांत माथेरान पूर्ण भरलेलें असतें. या महिन्यांत चांगल्या बंगल्याचें भाडें महिना हजार किंवा दीड हजार रुपयेपर्यंत सुद्धां असतें! या भरमसाट खर्चामुळें माथेरानास लोक फार दिवस मुक्काम करीत नाहींत. ह्मणजे माथेरान हें राजेरजवाड्यासुद्धां महाग जातें. इतके लक्षाधीश येथें येतात! या बंगल्यांत टाटा, कासममिठा वगैरेंचे पांच सात बंगल खरोखरीच प्रेक्षणीय आहेत. बंगल्यावर कोणी नसून बंगला रिकामा असेल तर त्याचें रक्षण करणारा, जवळ भोंवतालच्या बागेच्या रक्षणाकरितां बागेंत माळी ठेवलेला असतो. त्यास कांहीं चार सहा आणे दिले ह्मणजे तो हा बंगला उघडून दाखवितो. ह्या माळ्याला बंगल्याच्या भोंवतालच्या बागेचें काम दिलें असतें.

बागेंत पाश्चात्य व पौरस्त्य जातींच्या पुष्पवटिका, लतापल्लवांचे कुंज, रंगीत पानांचीं झाडें व कुंड्या असून शिवाय त्यांची निरनिराळी रचना केलेली असते. कुंड्याही चिनीमातीच्या निरनिराळ्या रंगाच्या, नक्षीच्या व भिन्न स्वरूपाच्या असतात. मे महिन्यांत ज्यांना सुंदर फुलें येतील व त्यावेळीं जीं टवटवीत होतील अशीं नाना प्रकारचीं तेरड्यांचीं व इतर विलायती झाडें मुद्दाम डिसेंबरमध्यें दरवर्षी लावितात. पूर्वी येथें पाण्याचें दुर्भिक्ष होतें, तरि अतीशय खर्च करून ह्या नाना प्रकारच्या पुष्पवटिका तयार करीत असत. येथें माथेरानला जिवंत पाणी नाहीं. एका खोऱ्याला बांध घालून एक कृत्रिम तळें केलें आहे, त्यांतून मुख्यतः पाणी आणावें लागतें अर्थात तें फार महाग विकतें. एका पखालीला ह्मणजे सुमारें आठ हांड्यांना चार आणे किंवा लांब अंतर असल्यास मोसमाचे वेळीं आठ आणेसुद्धां पडतात. पण इतकें महाग पाणी घेऊन ते अशा बागा करितात. त्यांचा विलास काय सांगावा? हल्लीं माथेरानास पाण्याचे नळ झाले आहेत, तेव्हां आतां माथेरानची शोभा अवर्णनीय होईल.

बंगल्यांतील सुखसोयी व रमणीयता फारच अवर्णनीय असते. बागेंत नाना प्रकारचीं कारंजीं असतात. बंगल्यांतील जमीनसुद्धां आरासपानाची असून आंत भिंतीला मोठमोठे बिल्लोरी आरसे, बिल्लोरी काम, तसविरी, पुतळे आपापल्या आवडीप्रमाणें ठेविले असतात. फार काय, कांहीं ठिकाणची जमीनसुद्धां नाना प्रकारचे रंगीत खडे बसवून रमणीय केलेली असते! अशा जमिनीवरून जोड्यांनीं किंवा बुटांनीं पाय ठेवणारास काय, पण नुसता पाय ठेवणारासुद्धां अवघड वाटतें! बाहेरचे खांब लांकडी असतात पण त्यांनासुद्धां कांचेचें रंगीत गिलीट असतें. त्याप्रमाणें वरील छत हंड्याझुंबरांनीं शृंगारलेलें असून छतावरील व भिंतीवरील नक्षीकामेंही खरोखर पाहण्यासारखीं असतात. सर्व वस्तु सोने, चांदी व रत्नें यांची कृत्रिम शोभा देऊन सुशोभित केलेल्या असतात. भिंतींवर पुरुष दीड पुरूष बिल्लोरी आरसे, हरणें, वाघ वगैरे जनावरांचीं तोंडें व प्रख्यात स्त्रीपुरुषांचे पुतळे व कांहीं ठिकाणीं शृंगारिक पुतळेही ठेवलेले असतात. त्यांत करमणुकीकरितां युरोपियन बायकांचीं निरनिराळ्या प्रसंगाचे नग्न पुतळे व चित्रें सुद्धां ठेविलेलीं असतात! ठिकठिकाणीं वाटोळीं, चौकोनी लाकडी किंवा दगडी टेबलें व त्यांवर फ्लावर पॉटस ह्मणजे पुष्पपात्रें ठेविलेलीं असतात. भोंवतालीं नाना प्रकारच्या खुर्च्या असतात. कित्येक खुर्च्या निर-

निराळ्या प्रकारांनीं जोडप्यांना बसण्यासारख्या, झुलत्या, फोटो काढून घेण्यासारख्या किंवा समोरासमोर तोंडें दिसण्यासारख्या अशा असतात. त्याप्रमाणें आराम खुर्च्या (इझी चेअर) असून भिंतीशीं कायमचे प्रशस्त बांक असतात. बांकांवर व खुर्च्यांवर रेल्वेंतील फर्स्ट क्लासाप्रमाणें उंच व मऊ गाद्या असतात. टेबलावर नाना प्रकारच्या दिवेबत्त्या व सुबक पेपरवेट्स व चित्रें असतात. खिडक्याही दुहेरी असतात. एक झांकण निरनिराळ्या रंगीत काचांचें व दुसरें बंद करण्याचें असें असतें. कांहींना बाहेरचा प्रकाश मात्र आंत यावा परतु आंत काय चाललें आहे तें दिसूं नये अशा प्रकारच्या कांचा असतात. तिसऱ्या किंवा चवथ्या मजल्यावर प्रशस्त गच्च्या असतात व शेवटीं आगाशी असून प्रत्येक मजल्यावर प्रशस्त गॅलेऱ्या किंवा सज्जे असतात. प्रत्येक कामाकरितां निरनिराळ्या जागा असतात. जुन्या राजवाड्यांत जशीं स्नानगृहें, सुखशयनगृहें, आभरणगृहें, विलास गृहें, भेटण्याच्या जागा वगैरे असतात, त्याप्रमाणें येथेंही असतात. हें सामान्यतः दिवाखान्याचें वर्णन झालें. सुखशय्यागृहें, आभरणगृहें व विलासगृहें यांचें वर्णन देतां येत नाहीं. शिवाय ही केवळ कादंबरी नाहीं. मुखमार्जन व स्नानगृहांत जरूरीप्रमाणें ऊन थंड पाण्याचे नळ, निरनिराळ्या प्रकारचे साबू, प्रशस्त आरसे, टॉवेल व नळाखालीं कायमच्या कुंड्या ठेविलेल्या असतात. या कुंड्यांना मधोमध भोंक असून ते एका खिटीनें बंद करतात. यामुळें ही कुंडी हवी तेव्हां वरील नळानें भरतां येते व खिटी काढली ह्मणजे तें पाणी निघून जाऊन कुंडी अगदीं स्वच्छ होते. पाण्याचा एक थेंबही तींत राहात नाहीं. ह्या कुंड्या सर्व चिनीमातीच्या निरनिराळ्या रंगाच्या सुबक असतात. शौचशुद्धी व मुखमार्जन यांचीं गृहेंसुद्धां फारच प्रेक्षणीय असतात. त्या ठिकाणीं शौचशुद्धी करण्याससुद्धां सामान्य मनुष्यास लाज वाटेल! तीं गृहें ऊर्फ संडासही निरनिराळ्या प्रकारचे व इकडून तिकडे हालवण्यासारखे सुद्धां असतात. सृष्टिक्रमाप्रमाणें सर्व मनुष्यांच्या शरीराची आंतील सर्व रचना सारखीच असावयाची व मनुष्यांनीं निरनिराळें बरें वाईट उत्तम भक्ष्य खाल्लें तरी सर्वांचा परिणाम एकच व्हावयाचा! पण अभिमानानें मनुष्य या नाशवंत तनूचें कितीतरी कौतुक करितो व त्यांत भिन्नता मानितो, याचें हें दृश्य स्वरूप आहे. इतकें करूनसुद्धां श्रीमंताचें मन रममाण होत नाहीं तें नाहींच!! सारांश मनाचा संतोष कदाचित् कातकऱ्याच्या झोंपडींतही सांपडेल, पण तो श्रीमंताच्या अगर अशा ऐषआरामाच्या बंग-

ल्यांतही सांपडणार नाहीं. मग त्याची एवढी प्रतिष्ठा कशाला? ही साधूंची उक्ति चिंतनीय आहे. पण सुखलोलुप मनुष्यास ती कशी पटेल? हें खरें आहे. पण त्यामुळें संतोषाचीं साधनें प्रकृतिभावाप्रमाणें भिन्नभिन्न असणें स्वाभाविक आहे. त्याप्रमाणें हें आहे. हे साधारण बंगल्यांचें वर्णन झालें. पण विशिष्ट बंगले खरोखर विशिष्टपणाकरितां प्रसिद्धच आहेत. त्यांचें वर्णन देतां येत नाहीं पण तेथें जाणारानें ते जरूर पाहावे ह्मणजे गरीब व श्रीमंत यांमधील कृत्रिम अंतर समजेल.

माथेरान पूर्णपणें भरलें ह्मणजे ज्याचा बंगला त्याला पाहिजे असतो, कांहीं बंगले निव्वळ भाड्याकरितांही केलेले असतात पण असे थोडे. सबब दुसऱ्या उपरी उतारूंच्या सोयीकरितां मोठमोठीं हॉटेलें केलीं आहेत. या हॉटेलांत राहण्याची, जेवणाखाण्याची व ऐषआरामाची सर्व प्रकारची सोय केलेली असते. राहण्याच्या घरांत सर्व प्रकारच्या जरूरीच्या वस्तु, अंथरुण, पांघरूण, भांडींकुंडीं असून तैनातीकरितां हारकाम्याही दिलेला असतो. याशिवाय प्रत्येक हॉटेलांत माथेरान पाहण्यास कोठें जावयाचें असल्यास घोडा, गाडी, वाहनें, व मजूर यांची तरतूद केलेली असते. हे मजूर माथेरानास कोठें फिरावयास जावयाचें असेल तेथें बिनचूक नेऊन नियमित वेळांत परत आणितात. माथेरानचें वर्णन इंग्रजींत केलेलीं पुस्तकें आहेत. त्या पुस्तकांच्या व नकाशाच्या आधारानें ज्याची जिकडे जाण्याची इच्छा असेल त्यांनीं तिकडे जावें. सदर बुकांत कोठें काय पाहाण्यासारखें आहे हें सांगितलेलें असतें व सर्व प्रकारची माहिती दिलेली असते. पुस्तकाची किंमत रुपाया दीड रुपाया असून तीं सर्व हॉटेलांत व बाजारांत विकत मिळतात. सर्व हॉटेलांत रग्बी हॉटेलचा नंबर पहिला आहे. पण त्या हॉटेलांत युरोपियनांशिवाय कोणाला घेत नाहींत. तसें निव्वळ हिंदूकरितां महालक्ष्मी हॉटेल आहे. तेथें ब्राह्मणापासून सर्व हिंदूंची राहण्याची, जेवणखाण्याची, व कपड्यालत्त्याची सोय केलेली असते. माथेरानला येणारानें पैशाकडे पाहिलें नाहीं ह्मणजे त्याची सर्व प्रकारची सोय धार्मिक दृष्टीशिवाय अगदीं त्याच्या इच्छेप्रमाणें होते!!!

माथेरानला शारीरिक श्रम आवश्य करावे लागतात, त्याशिवाय चैन पडत नाहीं. तेथें कितीही श्रम केले तरी बाधत नाहींत व त्यानें मन प्रसन्न

होतें. याकरितां पुष्कळ लोक पायीं रपेटीकरितां जातात, कोणी घोड्यावर बसून जातात व कोणी रिक्षांमधून फिरतात. रिक्षा ह्मणजे एका माणसाला बसण्यापुरती गाडी असते. ही दोन चाकी असून चाकाला रबरी धावा बसविलेल्या असतात. हिला ओढण्यास व लोटण्यास माणसें लावितात. जनावरांच्या गाड्या येथें बंद आहेत. ह्या गाडीला एक मनुष्य पुढें ओढतो व बाकीचीं दोन मनुष्यें मागून लोटतात. उतरणीवरून गाडी घसरून अपघात होऊं नये ह्मणून दोन्हीं बाजूंस ब्रेक असतात व ते वर बसणाऱ्या मनुष्याच्या ताब्यात असतात. त्यांनें ब्रेक दाबल्यास गाडी कोणत्याही स्थितींत हालत नाहीं. माथेरानच्या सडका अरुंद, आणि चढण उतरणीच्या असून डोंगरावर आहेत यामुळें जनावर बुजलें किंवा त्यानें वेगानें जाऊन हुशी घेतली तर अपघात होण्याचा संभव असल्यामुळें जनावरांच्या गाड्या वर फिरवण्याची सक्त मनाई आहे. मालाची गाडी असली तरी ती माणसांनींच ओढून नेली पाहिजे असा कडक कायदा आहे. तसेंच या सडकांवरून मोटार किंवा सायकलसुद्धां चालविण्याची याच कारणांकरितां मनाई आहे. या सडकांना वांकणें असल्यामुळें घोड्यावर बसणारानें घोडा तुफान सोडतां कामा नये, अशा ठिकठिकाणीं पाट्या मारिल्या आहेत. माथेरानास रिक्षा गाडींत बसणारांनीं आपला तोल सांभाळून बसलें पाहिजे. अशा गाड्या सुरक्षीत ठेवण्याबद्दल मालक जबाबदार आहेत. शिवाय पोलिसांचासुद्धां पहारा असतो. गाडी जरा ढिली झाली तर त्याचा परवाना ताबडतोब रद्द होतो.

याशिवाय शारीरिक श्रमाच्या सोयीकरितां जाती जातीचे तालीमखाने आहेत. युरोपियन जिमखाना, पारशी जिमखाना, माहामेडन व हिंदू जिमखाना असे निरनिराळे जिमखाने आहेत. त्यांत ज्या त्या जातीच्या वर्गणीदारांचा मात्र समावेश होतो. वर्गणीदारांशिवाय कोणासही आंत येऊं देत नाहींत. प्रत्येक जिमखान्यामध्यें ज्याच्या त्याच्या आवडीच्या खेळांची सोय केलेली असते. याशिवाय माथेरान येथें एक मोठें ऑलिंपिया या नांवाचें क्रीडांगण आहे. तसेंच केवळ मुलांकरितांसुद्धां निराळें क्रीडांगण आहे. तेथें लहान मुलांकरितां लांकडी घोडे, झोपाळे, पाळणे, टांगलेले आहेत. त्यांत मोठाल्यास बसण्यास हरकत नाहीं पण त्यांनीं झोपाळ्यावर मात्र बसतां कामा नये. कारण अशानें ते मोडतील. मोठ्या क्रीडांगणांत संध्याकाळीं बरीच मंडळी खेळखेळण्या-

करितां व मजा पाहण्याकरितां जातात. या क्रीडांगणाभोंवतीं तीस चाळीस फूट रुंदीचा व सुमारें एक मैल लांबीचा रस्ता आहे, त्यांत घोड्यांच्या व माणसांच्या पळण्याच्या शर्यती लागतात. जवळ एक हॉटेल आहे, त्यांत खाद्य-पेयांची रेलचेल आहे. येथें श्रम करावे व जरूर लागल्यास हॉटेलांत खाऊन पिऊन विश्रांति घ्यावी. अशी मजा आहे !

माथेरानचा मोसम जून पंधराला खलास होतो. त्याच्या आधीं १५ दिवस माथेरानास येऊन कोणी किती शक्ति कमावली याचें प्रदर्शनाकरितां या क्रीडांगणावर सार्वजनिक शर्यती होतात व त्यांत जो जिंकील त्यांस बक्षिसें देतात. हें बक्षीस खेळाच्या व मनुष्याच्या ऐपतीप्रमाणें असतें. त्यांत घोड्यांच्या शर्यतीला जास्त असतें अगदीं लहान पांच वर्षांच्या मुलांपासून साठ वर्षांच्या म्हाताऱ्यापर्यंत जात किंवा धर्म मनामध्यें न आणतां त्यांस या शर्यतींत भाग घेतां येतो. मुलगे, मुली, बायका, पुरुष यांचें समान वय, शक्ति व स्त्री पुरुष भेद पाहून चढाओढीनें पळण्याच्या व खेळण्याच्या शर्यती लागतात. त्यांत जातीचा कांहीं संबंध नाहीं. मुसलमान, पारशी, ख्रिस्ती, युरोपियन हिंदू, ब्राह्मणसुद्धां यांचीं समान दर्जाचीं व समान वयाचीं मुलें माणसें असलीं ह्मणजे झालें. समान दर्जाचीं ह्मणजे साधारण समान शरीरस्थितीची असें समजावें. श्रीमंत गरीब हा भेद नाहीं. ह्या शर्यती आठ दहा दिवस होतात. शेवटीं एका थोर मनुष्याकडून बक्षिस समारंभ होतो, तो पाहण्याकरितां स्त्री पुरुषांचा व मुलांचा फार मोठा समुदाय जमतो व फार मजा वाटते. ही येथील मोठी जत्राच आहे. याशिवाय अखेरच्या महिन्यांत ह्मणजे मे महिन्यांत येथें निरनिराळ्या ठिकाणीं संध्याकाळीं उत्तम नामांकित बँडचें वादन चालू असतें. हें सुमारें दीड दोन तास होतें. जे बँड वाजविणारे नामांकित ह्मणून ठरले असतील, त्यांनाच बोलावण्यांत येतें. आज बँड कोठें व किती वाजतां सुरू होणार आहे, ह्याजबद्दल म्युनिसिपालटीकडून मुख्य मुख्य रस्त्यावर जाहिराती लागतात. त्याप्रमाणें तेथें स्त्रीपुरुषांचा समुदाय येतो. व्यवस्था म्युनिसिपालटी-मार्फत असत. तेथें बाकें, खुर्च्या, म्युनिसिपालटीमार्फत नेल्या असतात. कोणी आपल्या खासगीही नेऊन ठेवितात. हा बँड मोठा ह्मणजे सोळा माण-सांचा असून आज कोणत्या गीतांचें वादन होणार आहे, याचा कार्यक्रम अगोदर प्रसिद्ध होत असतो. पण तीं गीतें युरोपियन संगितांपैकीं असल्यामुळें

आपणांस त्यांत गोडी लागत नाहीं. या ठिकाणीं बँडवाल्यांनीं प्रवीणता किंवा शाबासकी मिळविली असतां, यावेळीं येथें मोठमोठे लोक येत असल्यामुळें त्यांची कीर्ति जिकडे तिकडे पसरते. व त्यांस मोठमोठ्या घरचीं व राजेरजवाड्यांच्या दरबारचीं आमंत्रणें येतात. यामुळें बँडवाले अगदीं काळजीपूर्वक काम करितात. प्रत्येकाच्या पुढें तें गीत त्या यंत्रावर कसें वाजवावयाचें याबद्दलचा कागद समोर त्यांचेपुढें धरलेला असतो. हा बँड ह्या महिन्याचे पांच सहाशें रुपये देऊन आणलेला असतो. या शिवाय त्यांच्या जाण्यायेण्याचा व भोजनाचा खर्च देतात. शर्यतींच्या व खेळांच्या बक्षिसांचे पैसे असेच हजारों रुपये जमतात. हे सर्व पैसे बंगलेवाले व्यापारी यांच्या वर्गणीनें जमतात. त्यांत सरकारचा किंवा म्युनिसिपालटीचा कांहींएक संबंध नाहीं. मात्र ही व्यवस्था म्युनिसिपालीटी मार्फत होते.

माथेरानास पाण्याची मोठी गैरसोय होती. पण आतां रग्बी हॉटेलजवळ विहीर खणली असून तिला थोडें पाणी लागलें आहे. तें पाणी बंबांनीं हपसून वर एक खजिना केला आहे त्यांत सोडलेलें आहे. व त्या खजिन्यांतून सर्व माथेरानभर पाण्याचे नळ चालू केले आहेत. त्या विहिरीनें पाण्याचा पुरवठा न झाल्यास मागें सांगितलेला चार्लोटी तलावाचा बांध आणखी हवा तितका वाढवून त्याचें पाणी इंजिननें त्या खजिन्यांत नेलें आहे. रग्बी हॉटेल सर्व माथेरानांत उंच ठिकाणीं असल्यामुळें ती योजना सिद्धीस गेली असून माथेरानचें पाण्याचें दुर्भिक्ष गेलें आहे असें ह्मणतात. सर्व माथेरानास पाण्याचा भरपूर पुरवठा एका चार्लोटी तलावापासूनच होतो. हा तलाव ह्मणजे खरा नसून कृत्रिम आहे. दोन टेकड्यांमधून एक ओहोळ वाहात येत होता, तो पुढें पन्नास साठ फूट उंच बांध घालून अडवून त्याचा हा तलाव केला आहे. याशिवाय दुसरे ठिकाणीं पाण्याचे झरे व असे लहान कृत्रिम तलाव आहेत. पण अखेरपर्यंत त्यांचें पाणी पुरत नाहीं, याचें मात्र पुरतें. दुसरें एक असेंच कृत्रिम तळें आहे. पण तें लहान आहे. ह्या दोन्हीं तळ्यांचें पाणी पिण्यापासून इमारती, कारखानें व बागा करण्यास जातें. ह्या तलावांचा बंदोबस्त फार कडक आहे. तेथें तलावांत कोणी बोटही बुडविता कामा नये. खालीं ज्या कामाकरितां जो नळ ठेविला आहे त्याच कामाकडे त्याचा उपयोग झाला पाहिजे. यांचें पाझरलेलें पाणी खालीं मोठमोठ्या कुंड्या आहेत, त्यांत जातें. तेथें परीट लोक आपलें काम करितात.

यांतून झिरपून गेलेलें पाणी येथील बागाइतास जातें. येथें सर्व प्रकारच्या मुख्यतः कोबी, अलकोल अशा देशी व विदेशी भाज्या करितात. येथील भाजीलाहि विशेष चव असते.

याशिवाय ठिकठिकाणीं डोंगरांत स्वच्छ पाण्याचे झरे लागले आहेत, पण ते जसजसा उन्हाळा येईल तसतसे आटत जातात. पाणी असेपर्यंत प्रत्येक झऱ्याचा बंदोबस्त चांगला असतो. ह्मणजे झऱ्याजवळ एक टांकी करून त्यांत झऱ्याचें पाणी सांठवून ठेवितात व बाहेर लोकांना नेण्याकरितां तोट्या ठेवितात व त्यावर शिपा यांचा बंदोबस्त असतो. नळावर भांडीं घांसू किंवा कोणत्याही प्रकारची घाण करूं देत नाहीत. सर्व झऱ्यांत ॲलेटर्स्प्रिंग ह्या झऱ्याचें पाणी फारच उत्तम आहे. व तें विपुलही आहे. पण येथें पखाली भरून देत नाहींत. डोकीवरून पाहिजे त्यांनीं न्यावें. ह्या झऱ्याचे एका हंड्यास नेणावळ चार आणे घेतात. जवळच्या रग्बी हॉटेलांत सर्व युरोपियन वस्ती असल्यामुळें येथें सर्व ह्याच पाण्याचा उपयोग करितात. कारण येथें पैशाचा प्रश्नच नसतो. बाकी माथेरानाचें सुख घेणारानें पैशाकडे फारसें लक्ष देतां कामा नये. आपली शक्ति किंवा वजन, शारिरिक व बौद्धिक तरतरी किती वाढली याचा तपास केला ह्मणजे झालें. औषधें घेऊन प्रकृति सुधारत नाहींशी झाली ह्मणजे लोक हवा खाण्याकरितां माथेरानास येतात व बरे होऊन जातात. ज्यांना आपल्याला शरीरापेक्षां पैशाची योग्यता जास्त असेल त्यांनीं माथेरानीं येऊं नये! माथेरानचा परिणाम आपल्या शरिरावर होण्यास निदान पंधरा दिवस तरी तेथें राहिलें पाहिजे. पंधरा दिवसांत प्रकृतींत फरक समजतो. हवेचा परिणाम मुख्यतः मुलांवर फार लवकर होतो, यामुळें युरोपियन व श्रीमंत लोक आपलीं बायकामुलें या ठिकाणीं मुद्दाम पाठवितात. बाळपणचें त्याचें आयुष्य असें पहाडी हवेंत पोसलें गेलें ह्मणजे त्याचा फायदा मोठेपणीं मिळतो.

माथेरानचा डोंगर हा एक डोंगर नसून तीन समांतर डोंगर मध्यभागीं एका डोंगरानें जोडून झालेला आहे. आणि प्रत्येकाचीं शेंवटें लांबवर पसरून त्यांचा पंचपाळयासारखा आकार झाला आहे. त्या प्रत्येक टोंकाला इंग्रजींत पॉइन्ट ह्मणतात असे मागें सांगितलें आहे. असे पॉइन्ट येथें पंचवीस तीस आहेत. ह्या पॉइन्टवरून समुद्रापासून सह्याद्रीपर्यंतच्या निरनिराळया ठिकाणची सभोंवतालची सृष्टिशोभा फारच चांगली दिसते. गावें अगदीं लहान दिसतात. नद्यांची नाग-

मोडीं पात्रें. पश्चिमेकडे समुद्रोदकाच्या राशी व त्याचे फांटे जमिनीवर पसरून झालेल्या खाड्या यांचा एक पट होऊन त्यांवर लाहान मोठे डोंगर सोंगट्याप्रमाणें ठेवलेले दिसतात. जमिनीवरील शेतें पटावरील घरांप्रमाणें दिसतात. सारांश आपण विमानांतून निरनिराळ्या सृष्टीचा देखावा पाहात आहों असें वाटतें. हा नकाशा खुशाल त्या पॉइन्टवर ठेविलेल्या खुर्चीवर किंवा बाकावर बसून डोळे भरून विशेषतः सकाळीं किंवा संध्याकाळीं पाहतां येतो. माथेरानच्या मध्यभागीं फार दाट झाडी असल्यामुळें हवा कोंदट वाटते, परंतु ह्या पॉइन्टवर हवा अगदीं मोकळी असते. अशा मोकळ्या हवेवर जावें अशी प्रत्येकाला इच्छा होतेच, यामुळें सर्व लोक सकाळ संध्याकाळ ह्या पॉइन्टवर फिरण्यास जातांना दिसतात. कोणी घोड्यावर बसून जातात, कोणी रिक्षामध्यें जातात, पण बरीच मंडळी चालत जातात. प्रत्येक पॉइन्टवर म्युनिसिपालटीचे एक दोन बाक बसण्याकरितां ठेविलेले आहेत. त्यांवर बसून मोकळ्या हवेचा व सृष्टिशोभेचा अनुभव घेतां येतो. या पॉइंटवरून निरनिराळ्या ऋतूंत निरनिराळी सृष्टिशोभा दिसते. अगदीं पावसाळ्यांत येथें फारशी वस्ती नसते तरीसुद्धां या पॉइन्टवर आल्यास खालच्या व वरच्या मेघांची इकडे तिकडे अचातरीं फिरण्याची धांदल, पावसांच्या सरींचा देखावा, विजांचा कडकडाट, नद्यांच्या पाण्याचे तांबडे लाल व मोठे लोट हे सर्व देखावे अगदीं आपल्या खालीं, वर, सभोंवती अगदीं स्पष्ट दिसतात. पण त्यावेळीं येथें वारा जास्त असल्यामुळें हें सुख पाहणें जरा भयानक आहे. हा चमत्कृतिजनक देखावा माथेरानखाळून क्वचितच् दृष्टीस पडतो. प्रत्येक पॉइन्टची शोभा निरनिराळी आहेच. पण त्यांत मौंट बॅरी, पानोरमा, लुशिया, डेंजर, चौक, वन् ट्रीपॉईन्ट, मलंगड पॉइन्ट यांची शोभा विशेष आहे. वन् ट्री पॉइन्ट ह्मणजे एका अगदीं सुळ्या टेकडीवर एकच झाड आहे, तेथें जाणें अमळ अवघड आहे. लुशिया पॉइन्टवरून व या पॉइन्टवरून पश्चिमेकडील प्रबळ किल्ला दिसतो. याच बाजूला नेताजी पालकराची गुहा आहे. महाराष्ट्राच्या आंगणांत शिवाजी महाराजांना तानाजी मालुसऱ्यासारखीं जीं नररत्नें सांपडलीं त्यापैकींच नेताजी-पालकर हा होता. याची कामगिरी इतिहास प्रसिद्ध आहे. हा कर्जतजवळ किरवलीचा राहणारा. तेथील जागृत जोगेश्वरीनें त्यास तूं शिवाजी राजाला जाऊन मीळ ह्मणजे योग्यतेस पावशील असा दृष्टांत दिला. यामुळें तो चौक माथेरान प्रबळची खोरीं सोडून शिवाजीला भेटला. शिवाजीला मनुष्याची परीक्षा होतीच.

त्यानें पाहिल्याबरोबर त्याला सैन्यांत घेतला व त्याचा शिवाजीला या प्रांताची माहिती देण्यालाहि पुढें फार उपयोग झाला. किरिवलीच्या जोगेश्वरीच्या देवळांत अद्याप सुद्धां सर्प किंवा विषारी प्राणी चावलेला आणून ठेवल्यास कांहींएक औषधावाचून तो बरा होतो. मी गेलों त्यावेळीं असाच एका १५ वर्षे वयाचा चांभाराचा मुलगा बाहेर आवारांत खोपटें बांधून राहिला होता तोही औषधावाचून बरा होत आला होता. जनावर चावल्याबरोबर त्यास कांहींएक उपचार न करतां घरींसुद्धां न जातां या देवळांत आणून ठेवल्यास गुण लवकर येतो. मी घरीं जाऊन आल्यामुळें मला ११।१२ दिवस लागले असें तो ह्मणाला. मी अस्पृश्य असल्यामुळें देवाच्या आवारांत झोंपडें करून राहिलों आहें स्पृश्य लोक देवाजवळ सभामंडपांत राहतात. अशी या देवाची अद्याप समक्षा आहे. तसेंच मनोरमा पॉईन्टवरून पेप किल्ला दिसतो तोही पहावा. येथून दोनी बाजूंची शोभा अत्यंत मनोहर दिसते. प्रत्येक रस्त्यावर रस्त्याच्या नांवच्या सुंदर पाट्या इंग्रजींत मारिल्या आहेत. मुख्य रस्त्यावर ह्मणजे रेलवे स्टेशनपासून म्युनिसिपालटी ऑफीसपर्यंत म्युनिसिपालटीचे दिवे आहेत. इतर ठिकाणीं नाहींत.

माथेरानास कॅथोलिक चर्च, प्रॉटेस्टंट चर्च हीं दोन ख्रिस्ती लोकांचीं देवळें आहेत. पारशांचे दफन करण्याचें एक बगीच्याचें ठिकाण आहे. मुसलमान व हिंदू यांच्या दफन करण्याच्या व जाळण्याच्या जागा नेमून दिल्या आहेत. त्यांत वरिष्ट व कनिष्ट असे भाग ठेविले आहेत. त्यांच्या जवळच एक महाव्याधिष्टांकरितां किंवा देवीसारखा स्पर्शजन्य रोग झाल्यास त्यास ठेवण्याकरितां स्वतंत्र घर आहे. हिंदुलोकांकरितां शंकराचें व रामाचें अशी दोन देवळें मुंबईच्या हिंदूनीं—भाट्यांनीं बांधिलीं आहेत. त्यांत रामाचें देऊळ अगदीं बाजारांत स्टेशनजवळच आहे. दोन्ही देवळांत पुजारी दाक्षिणी ब्राह्मण आहेत, सबब प्रत्येक हिंदूस तेथें क्षणभर विश्रांतीला व घोंटभर पाणी मिळण्याची सवड आहे. माथेरानास धर्मशाळा नाहीं, ही मोठी गैरसोय आहे. मुसलमानांची एक मशीद आहे. हीं सर्व देवळें अलीकडेसच बांधिलेलीं आहेत. पण सर्वांत जुना असा येथें एक देव आहे, त्याचें नांव पिशनाथ हें आहे. हा चार्लोटलेिक ह्मणून पाण्याचा जो मोठा पुरवठ्याचा तलाव आहे ह्मणून मागें सांगितलें, त्याचे दक्षिण बाजूस जवळच आहे. हा देव जंगलांत उघड्या जागेवर आहे. त्याचें देऊळ नाहीं. देऊळ बांधूं नये असाच त्याचा

साक्षात्कार आहे. अथवा कोणास बांधावयाचें असेल तर त्यानें एका रात्रींत एका झाडाचें व एकट्यानें बांधलें पाहिजे! ह्मणजे जवळजवळ हें होणें अशक्यच आहे. या देवावर माथेरानच्या सर्व मंडळींची फार भक्ति आहे. हें शंकराचें स्थान मानतात. पण त्याला शेंदूर लावतात. देवाचा साक्षात्कार ह्मणजे तो नवसाला पावणें. त्याप्रमाणें हा बरेच लोकांच्या नवसाला आजपर्यंत पावला आहे व अद्याप पावत आहे असें वाटतें. कारण, ज्याचें कार्य होईल तो ह्या देवाजवळ झाडाला आपल्या ऐपतीप्रमाणें घंटा टांगतो. अशा घंटा आजपर्यंत बऱ्याच टांगलेल्या आहेत व अजून नेहमी टांगिल्या जात आहेत. यावरून हें दैवत अद्यापपर्यंत जागृत आहे असें दिसतें. हा देव प्रसिद्धीला कसा आला याची पुढीलप्रमाणें हकीकत सांगतात. माथेरानास पूर्वी ह्मणजे अलीकडचें हवा खाण्याचें ठिकाण होण्यापूर्वी तेथें एक धनगरवाडा होता. त्यांतील एक गाय सकाळ संध्याकाळ दुधाचा पाना चोरून ह्या देवाजवळ येऊन पान्हा सोडून त्याला दुधाचा अभिषेक करी. गाय कोठें जरी चरावयास सोडली तरी ती नित्यनेमानें डोळा चुकवून येथें येत असे. अगदीं विरुद्ध बाजूला ढोरें नेलीं तरी ठरलेल्या वेळीं ती इकडे येई. अर्थात ही दररोज नित्य नेमानें इकडे कोठें जाते ह्मणून गौळी चौकशी करूं लागले व त्यांनीं तिजवर पाळत ठेवली तेव्हां हा प्रकार त्यांना समजला. व तेव्हांपासून लोक त्या देवाला भजूं लागले. देवही रीतीप्रमाणें त्यांच्या भक्तीप्रमाणें पावूं लागला.


माथेरानास एक स्वतंत्र गव्हर्नमेन्ट म्युनिसिपालिटी आहे. ही म्युनिसिपालटी मुंबईप्रमाणें श्रीमंत मनुष्यांची आहे. तिला पैशाचा तोटा नाहीं. हिचें ऑफिस व त्यालगत चांगला दवाखाना, शाळा, पोलिस ऑफीस, एक मोठें पोष्ट ऑफीस व तार ऑफीस व चांगलें मार्केट बांधलें आहे. त्यांत दर रविवारीं सकाळीं मोठा बाजार भरतो. त्या बाजाराकरितां आसपासच्या गांवचा भाजीपाला, धान्य वगैरे विकावयास येतें. बाजार सकाळपासून दुपारीं दोन वाजेपर्यंत चालतो, पुढें नाहीं. या बाजाराकरितां माथेरान रेलवेची स्पेशल ट्रेन नेरळहून निघून माथेरानास उजाडतांना येते व दुपारीं दोन वाजतां परत जाते. येथील सर्व सरकारी व म्युनिसिपालटीचीं ऑफिसें दगडी चांगलीं सुंदर बांधिलीं आहेत. माथेरानच्या मुख्य अधिकाऱ्याला सुपरिन्टेंडन्ट ह्मणतात. हा लेफ्टेनंट कर्नल व सिव्हिल सर्जन असतो. त्याला दुसऱ्या वर्गाच्या मॅजिस्ट्रेटचा अधिकार असतो.

दुसऱ्यावर्गाच्या मॅजिस्ट्रेटप्रमाणें याच्या हातीं सरकारी कचेरी आहे. याला मॅजिस्ट्रेटचें दवाखान्याचें व म्युनिसिपल प्रेसिडेन्टचेंही काम करावें लागतें. हें हवा खाण्याचें ठिकाण असल्यामुळें याचा अधिकार-येथील कडक बंदोबस्ताकरितां--मोठा ठेविला आहे. त्याला एखाद्याची वर्तणूक गैरशिस्त आढळल्यास त्यास तावडतोब माथेरानच्या खालीं हो, असें ह्मणण्याचा अधिकार आहे, व त्यावर अपील नाहीं; यामुळें याचा वचक मोठा आहे. तसेंच यामुळें येथें चोरांचें बंड अगदीं नाहीं. सर्व वस्तु रात्रीं अपरात्रीं बाहेर पडल्या तरी फारशी धास्ती नसते.


येथील पारशांचें स्मशान निराळें आहे. पारशांचें स्मशान ह्मणजे एक विहीर असते पण तसें येथें नाहीं. येथें मृतांचें दफन करतात व त्यावर मुसलमान किंवा खिश्चनाप्रमाणें थडगीं बांधून त्यावर त्यांचे नांवाचा दगड बसवितात. त्यांनीं या ठिकाणीं सुंदर फुलांची बाग केली आहे. माथेरानला पूर्वी पाण्याचा तोटा तेव्हां बाग करणें कठीण; सबब ह्या पारशी मंडळीनें उंचावर एक मोठा रेलवेसारखा पाण्याचा लोखंडी खजिना बांधला आहे. तो चाळीस फूट लांब चाळीस फूट रुंद व पांच फूट उंच आहे. पावसाच्या पाण्यानें तो भरतो व त्याचें पाणी नळानें आणून त्यावर ही बाग चालविली आहे. येथें बसण्यास ठिकठिकाणीं बांक आहेत. येथें रात्रीं कंदील लावतात. असें पारशींचें हें शांतिनिकेतन केवळ आनंदभुवन आहे. पारशांच्या स्मशानांत ह्मणजे त्यांचे विहिरीकडे ( सायलेंट टावरवर ) कोणासही जाऊं देत नाहींत व नियमित पारशांशिवाय पारशीही जात नाहींत. पण ह्या आनंदभुवनांत सर्वांस जाण्याची मोकळीक आहे.

माथेरान हें श्रीमंतांचें आहे, गरिबांचें नाहीं. मी महाबळेश्वर पाहिलें आहे, परंतु त्यापेक्षां माथेरानची ठेवण व व्यवस्था मला विशेष आवडली ह्मणून या जातीचें महाबळेश्वराचें विशेष वर्णन न देतां माथेरानचें दिलें आहे. ही यात्रा संपवून पुन्हां नेरळवर पायीं यावें ह्मणजे घाटाची दुसरी शोभा दृष्टीस पडेल. नंतर नेरळवरून वांगणी स्टेशनवर यावें. तेथून तीनचार मैलांवर पश्चिमेस डोंगरांत स्वयंसिद्ध असे दोन बोगदे अगदीं आरपार आहेत. व तसाच आणखी एक मलंगडाच्या डोंगरांत आहे. हेही पाहून येण्यासारखे आहेत. हे स्वयंभू कसे झाले याची कल्पना होत नाहीं. याच्या दोन्हीं बाजूकडेस अगदीं तुटलेले कडे

## बाबा मलंगचा दरगा. (पृष्ठ ३३९)



बाहेरील देखावा.



आंतील देखावा.

ह्या दरग्याचे वर बालेकिल्ल्याला जाण्याचा मार्ग फार अवघड आहे वर डोंगरावर जीं एकावर एक भिताडं दिसतात त्यांचे साध्याचे कपारींतून जावें लागतें खालीं अपरंपार खोल आहे. वर मैदान असून खडकांत सुरुंग लावून खोदलेले सात हौद आहेत व एका बाजूला किल्ल्याचीं भिताडें आहेत उंबराच्या झाडाशिवाय दुसरीं कसलींही झाडें नाहींत वरून सृष्टि शोभा व सभोंवार दृष्टि फार लांबवर पोंचते यावर बाबा ( साधु ) घोड्यावर बसून जात असत हल्लींही बायका लहान मुलांना घेऊनसुद्धां जातांना दृष्टीस पडतात. पण हा दैवयोगाचा प्रश्न आहे खात्रीचा नाहीं. मनोधैर्यांचा सुटसुटीत मनुष्य जाऊं शकेल. मी गेलों होतों.

आहेत. खालीं पहावत नाहीं. कल्याणचे अलीकडे अंबरनाथ स्टेशनपासून एक मैलावर पश्चिमेस अंबरनाथचें शिवस्थान फार प्राचीन असें बौद्ध धर्माच्या वेळचें पाहण्यासारखें आहे. हें देऊळ वेरुळाजवळील घृष्णेश्वर देवळासारखें लेण्याचें आहे. याचा घुमट पडला आहे. आंत पिंडी आहे पण साळुंका नाहीं. येथें महाशिवरात्रीस यात्रा भरते. पुष्कळ युरोपियन प्रवासी ह्या देवळाचे फोटो काढून घेतात, इतकें तें काम सुबक आहे. अंबरनाथास हल्लीं मोठमोठे कारखाने व गिरण्या सुरू झाल्या आहेत. त्यांत आगपेट्यांची व रासायनीक द्रव्याची अशा दोन गिरण्या मुख्य आहेत. आतां अंबरनाथ हा मुंबईचा भागच केला आहे. यानंतर कल्याणास यावें व तेथून

## मलंगड

येथें जावें. बाबा मलंग या नांवाचा मुसलमान साधू होऊन गेला त्याचें हें स्थान आहे. भिन्न धर्मियांनासुद्धां पूज्य अशा ज्या यात्रा आहेत त्यापैकीं ही एक आहे. या साधूचें थडगें ह्या डोंगरावर आहे. अगदीं वर जाण्यास वाट फार बिकट आहे. याशिवाय जवळचे डोंगरास एक स्वतंत्र सुळका आहे. त्यावर कोणास जातां येत नाहीं. हा डोंगर कल्याणच्या दक्षिणेस कल्याणपासून दहा मैलांवर आहे. ह्या साधूची राहाणी फारच स्वच्छ होती. हा जातीचा मलंगपंथी मुसलमान साधु होता खरा, परंतु मुसलमानी संस्कृति त्याला आवडत नसे. तो आचारानें ब्राह्मणाप्रमाणें वागे. हा साधु पैगंबरवासी झाल्यावरसुद्धां त्याच्या थडग्याला मुसलमानानें स्पर्श केलेला त्याला चालत नाहीं! अजूनसुद्धां त्याची पूजाअर्चा ब्राह्मणाकडून होते, इतका तो सोंवळा आहे! या साधूची महती मुसलमानांत फार आहे. त्याच्या दर्शनास हिंदुस्थानांतून लांबलांबचे मुसलमान येतातच, पण काबूल, कंदहार वगैरे परदेशाकडून सुद्धां येतात. या साधूच्या थडग्याची पूजा केल्यानें त्याच्या पुजारी ब्राह्मणाचें ब्राह्मणत्व जात नाहीं, कारण ती वेदोक्त विधीनें होत नाहीं. तसेंच त्या साधूचें मुसलमानत्वही जात नाहीं. प्रसिद्ध साईमहाराजांचेंही असेंच होतें पण कांहीं विद्वान ब्राह्मणसुद्धां साईमहाराजांची वेदोक्त विधीनें पूजा अगदीं मशिदींत जाऊनसुद्धां करीत व मंत्रपुष्प वहात! पण हें गैर आहे. आतां साईमहाराज समाधिस्त झाले आहेत; परंतु ते जिवंत होते तेव्हां त्यांचा असा

प्रकार होत असे. साधु हा निर्लेप आहे. त्यास जात धर्म नाहीं. ह्मणजे त्याचे मनास त्याचा स्पर्श नाहीं, ही गोष्ट कबूल आहे. पण त्याचा देह मात्र तसा नाहीं. त्याचें बाह्य स्वरूप त्या धर्माप्रमाणेंच असतें. देहधर्माप्रमाणें व स्थानाप्रमाणें तो ज्या धर्मात उत्पन्न झाला असेल किंवा दैवयोगानें त्याला जो देह मिळाला असेल व तो जेथें असेल त्या स्थानाप्रमाणें त्याचे जन्मापासून आतांपर्यंत किंबहुना अंत झाल्यावरसुद्धां त्याच्या देहाचे तो ज्या धर्माचा राहिला असेल त्याप्रमाणेंच सर्व विधी केले पाहिजेत व तसे होतातही. त्या देहाला नांवही त्याच्या धर्माचेंच द्यावें लागतें. त्याला पूज्यभावानें कां होईना पण अन्य धर्मीयांचे विधी करणें गैर आहे. अशा योगानें त्या विधींची व त्या साधूंचीही थट्टा केल्यासारखी होते. सर्व विधींचा अर्थ जरी एकच आहे तरी यथाविधी पूजा न करितां अन्य विधीनें केल्यास त्यानें इष्टाच्या ऐवजीं अनिष्ट उत्पन्न होतें. बाबा मलंगाची पूजा ब्राह्मणाकडून फक्त स्वच्छतेकरितां होते. वेदोक्त विधीनें होत नाहीं. गाईची पूजा करून नैवेद्य दाखवावयाचा असेल तर तो श्रीखंड-पुरीचा किंवा साखरभाताचा काय कामाचा? तो शोभेकरितां असला तरी तिच्या प्रेमाच्या खाण्याचे दृष्टीनें त्याचा काय उपयोग? ओला कोंवळा चारा, ताजा कोंडा, पेंड यांचाच तो तिला दाखविला पाहिजे. कारण हींच तिचीं पक्कान्नें आहेत. वस्तुतः मनुष्यामध्यें जी ज्ञानशक्ति, योगसामर्थ्य व त्यांच्यामुळें उत्पन्न झालेलें किंवा त्यांच्यामुळें त्यास आलेलें देवत्व हीं पूज्य आहेत. शरीर पूज्य नाहीं. शरिराचा व त्यांचा कांहींएक संबंध नाहीं. कारण विशिष्ट प्रकारचा बुद्धिमान विशिष्ट स्वरुपाचा असतो असें मुळींच नाहीं. उलट ज्ञानी मनुष्य बहुधा कुरुप व अजागळच दिसतो. त्याच्या ज्ञानाची पूजा खरोखर ज्ञानानेंच केली पाहिजे. ह्मणून खरे ज्ञानी ह्या बाह्योपाधींचा तिरस्कार करितात. रामदास व ब्रह्मेंद्रस्वामी याच दृष्टीनें राजधानींत व राजसोहाळ्यांत राहिले नाहींत. ज्ञान्यांची नजरानजर झाल्याबरोबर त्यांच्या ज्ञानाची त्यांना मनोमय साक्ष पटते. पण अज्ञानांना ही ज्ञान दृष्टि नसल्यामुळें निरुपायानें व भक्तीच्या अतिरेकानें ते त्याच्या पार्थिवाची ह्मणजे शरिराची पूजा करितात व त्यांत आनंद मानितात, हें त्यांच्या दृष्टीनें ठीक आहे. आणि तसेच जे गुरु असतात. ते त्यानें संतोषही पावतात व आपल्या कृपेची किंवा सामर्थ्याची त्यांना त्याबद्दल देणगीही देतात. दोघेही तसलेच !!!

मलंगडच्या पिराजवळील सर्व उत्पन्न त्याच्या ब्राह्मण पुजाऱ्यास मिळतें. अर्थात पुजाऱ्यास, त्याचे दर्शनास आलेल्या मुसलमानास किंवा फकिरास खिचडी, सिधा वगैरे द्यावा लागतो. ह्याचा उरूसही हिंदु पंचांगाप्रमाणें माघ शुद्ध पौर्णिमेसच भरतो, मुसलमान कालगणणेप्रमाणें भरत नाहीं. कल्याणच्या पिराचाही असाच वैशाखी पौर्णिमेलाच भरतो.

सुमारें ७०० सातशें वर्षांपूर्वी मलंगड येथें नळ नांवाचा हिंदु राजा राज्य करीत होता. त्यावेळीं अरबस्थानांतून हाजी अब्दुर्रह्मान नांवाचे एक मुसलमान अवलीया येऊन ते इकडील ऋषीप्रमाणें ह्या मलंगडच्या एका भागावर राहूं लागले. राजानें त्यांच्या साधुत्वाची अनेक प्रकारें परीक्षा करून ते जेव्हां राजाच्या कसोटीस उतरले तेव्हां त्यांस हजरत बाबा मलंग असें ह्मणूं लागले. गडावर कबरीं शेजारीं त्यांच्या पत्नीचीही कबर आहे. हा किल्ला मराठ्यांच्या ताब्यांत असतां इंग्रजांनीं तो जिंकून घेतला, परंतु तेथें इंग्रज दोनच वर्षे होते. पुढें त्यांनीं तो सोडला. तो हजरत बाबा मलंग या साधूच्या दैवी सामर्थ्यामुळें इंग्रजांना सोडावा लागला अशी समजूत होऊन पेशव्यांनीं त्या साधूच्या कबरीवर घालण्यास एक बहुमूल्य चादर पाठविली ती कल्याणचे काशीनाथपंत केतकर यांनीं त्याचेवर घातली. तेव्हांपासून कबरीची सर्व व्यवस्था सदर केतकरांचे वंशजाकडेसच चालू आहे. आपल्या पिराला हिंदू पुजारी, त्यांत ब्राह्मण कशाला पाहिजे ? अशी लाट कांहीं दिवसांपूर्वी हिंदू मुसलमानांच्या भांडणाच्या आरंभीं उत्पन्न झाली होती. परंतु त्या साधूचा मुसलमान पुढाऱ्यांस साक्षात्कार झाला कीं, असें करूं नका, मला तुमच्या हातचें पाणी चालणार नाहीं. तुह्मी ह्यानें केल्यास माझा तुमच्यावर कोप होईल. तेव्हां त्यांची समजूत होऊन पूर्वीप्रमाणें सर्व व्यवस्था आजपर्यंत बिनबोभाट चालली आहे. येथील पूजा ब्राह्मण करतात खरी, पण ती मुसलमानी धर्माच्या उच्चाराप्रमाणें होते. हिंदूंच्या पद्धतीनें सोवळें नेसून किंवा वेदोक्त विधीनें होत नाहीं. असाच ब्राह्मण पुजारी कर्नाटकांत धारवाड जिल्ह्यांत यमनूर येथें एक प्रख्यात पिराचें ठाणें आहे त्याचा आहे. तें ठिकाण मूळचें हिंदूंचें असून मुसलमानांच्या चढत्या काळांत तें बाटलें असावें असें ह्मणतात. अशा रीतीनें त्याला पिराचें स्वरूप आलें तरी त्या देवाविषयीं हिंदूंची भावना कमी झाली नाहीं. हा मलंगडचा डोंगर या प्रांतामध्यें फार उंच आहे. दर्यांत जाणारे मछिमार कोळी ह्मणतात कीं, समुद्रांत गेल्यावर

आह्माला किनारा दिसत नाहीं पण मलंगड दिसतो. इतकें आह्मी दर्यांत लांब जातों पण मलंगड दिसेनासा झाला ह्मणजे आह्मी पुढें जात नाहीं. यानंतर पुन्हां कल्याणास येऊन नाशिक लायनीनें अडगांव स्टेशनवर उतरून तेथून वानसा वॉटर नांवाचा प्रसिद्ध तलाव पाहून यावें. या तलावाचें पाणी मुंबईला जाऊन मुंबई पोसली जाते. जगांतील प्रख्यात तलावांपैकीं हा एक आहे. जवळ शहापूर, माहुली, एक किल्ला व कोरीव लेणी आहेत तीं पाहून घ्यावीं.

ह्याप्रमाणें या भागांतीस सर्व यात्रा बहुतेक संपूर्ण झाल्या. आतां शेवटीं नारायण सरोवरांत स्नान करून व सोमनाथाचें दर्शन घेऊन आपली यात्रा पुरी करूं. प्रथम

## नारायण सरोवर

याची यात्रा करण्याकरितां ह्मणून मी मुंबईस आलों, व बॉबे स्टीम नॅव्हिगेशन कंपनीचें कराची बाजूचें वेळा–पत्रक मागविलें. त्यावरून समजलें कीं, कराची बाजूला आठवड्यांतून दोनदां बोटी जातात आणि त्या प्रिन्सेस डोकवरून सुटतात. त्यांस एक फास्ट सेलिंगची ह्मणजे जलद चालणारी व दुसरी स्लो सेलिंगची ह्मणजे सावकाश चालणारी अशा दोन बोटी जातात. स्लो सेलिंगची अर्थात सर्व बंदरें करीत जाते, व फास्ट सेलिंगची मुख्य मुख्य बंदरें घेत जाते. दोघींचें भाडें सारखेंच असतें. याशिवाय ब्रिटिश इंडिया स्टीम नॅव्हिगेशन कंपनीची ह्मणजे जींतून टपाल जातें ती आणि दुसऱ्या आणखी एक दोन कंपन्याच्या बोटी कराची बाजूकडे जाणाऱ्या आहेत, असें समजलें. मी बॉबे स्टीम नॅव्हिगेशन कंपनीच्या फास्ट सेलिंगच्या बोटीनें जाण्याचें ठरविलें. ती बोट बुधवारीं सकाळीं दहा वाजतां प्रिन्सेस डॉकवरून एल् शेडमधून निघावयाची होती. दिवस एप्रिल महिन्याचे आरंभींचे होते तरी जरा वारा जास्त सुटल्याबरोबर बोट निघण्याचा नियम नाहीं, अशी दौंडी पिटली व तशी पाटी लागली. पण अखेरीस वादळ हाण्याचा संभव नाहीं असें सरकारमार्फत प्रसिद्ध झालें व त्याप्रमाणें पुन्हां बोट निघण्याची दौंडी पिटली व व्यापारी लोकांस बोटीवर माल चढविण्यास परवानगी दिली. त्याप्रमाणें व्यापाऱ्यांचा माल गोदींत येऊन दाखल झाला. तो सकाळपासून चढविण्यास सुरवात झाली ती अकरा वाजेपर्यंत चढत होता. यापुढें उतारूंचीं तिकिटें मिळालीं !

बोट खचित निघणार म्हणून पुन्हा बोर्ड लागला होता म्हणून उतारू दहा वाजतां आले होते व आणखीही येत होते. आधीं बोट निघणार नाहीं असें प्रसिद्ध झाल्यामुळें बरीच आलेली मंडळी परत गेली, ती पुन्हां परत आली नाहीं. कारण बोट जरी निघणार असली तरी वेळ धोक्याची आहे असें समजून जे परत गेले, ते आलेच नाहींत ! यामुळें बोटीला भरपूर माणसेंच नव्हतीं. बोट निघणार किंवा नाहीं हा गोंधळ बराच वेळ चालला होता. कोणी निघणार म्हणे, कोणी निघणार नाहीं म्हणे. ऑफिसांतील कारकून व शिपायास विचारावें तेही तसेंच म्हणत. तेव्हां याचा पत्ता कसा लागणार ? धक्याला पुष्कळ बोटी लागलेल्या असतात व त्या मालासुद्धां भरलेल्या असतात. त्यांत आपली बोट कोणती हें कसें समजावें ? तेव्हां तेथल्या एका गेटवरील हवालदारानें सांगितलें कीं, तिकिट ऑफिसाजवळ जा. तुम्हाला इंग्रजी येत आहेच; तेथें पाटी लावली आहे ती वाचा म्हणजे सर्व कळेल. त्याप्रमाणें गेलों व पाहिलें तों तेथें आजच्या तारखेचा बोर्ड लागला होता. त्यावर कोणत्या धक्यावर कोणती बोट, ( तिचें नाव ) कोणीकडे जाणारी, किती वाजतां निघणार, मध्यें कोठें कोठें थांबणार, कॅप्टन कोण, वजन किती, पॅसेंजर किती घेणार, वगैरे सर्व तपशील लिहिलेला होता. त्याप्रमाणें त्या धक्यावर जाऊन पाहिलें तों त्या नांवाची बोट धक्याला लागून तींत यारीनें माल भरीत होते. पॅसेंजर मात्र माल भरीपर्यंत घेत नव्हते. मी त्यांस विचारिलें तेव्हां ही बोट कराचीस जावयाची आहे असें ते म्हणाले. तेव्हां खरी माहिती मिळाला म्हणून धीर आला.

मी प्रथम रेलवेंतून मशीद बंदर या स्टेशनावर उतरल्यावर बोजा नेण्याकरितां एक हमालीण पाहिली. ती म्हणाली मला कराचीच्या बोटीचा धक्का माहीत आहे, मी तुम्हास बिनचूक पोहाचवीन. मला कोकणांत जावयाचें नाहीं. कराचीस जावयाचें आहे असें बजाविलें तरी ती तसेंच म्हणाली. अखेर बोजा देऊन तिजबरोबर गेलो तेव्हां तिनें अखेरीस कोकणच्या धक्यावर म्हणजे अलेक्झॉंड्रा डॉकवर नेलें ! कराचीच्या किंवा मंगलोर लायनीच्या बोटी प्रिन्सेस डॉकवरून सुटतात तेव्हां तूं चुकलीस, प्रिन्सेस डॉकवर चल म्हणून सांगितलें. पण तिनें बोजा टाकला व ती चालती झाली. तेव्हां आतां मला दुसरी गोदी माहीत नाहीं, मला दुसरीं कामें आहेत, तुमचें एवढेंच काम नाहीं, मग मजुरी देणार नाहीं ती देऊं नका असें म्हणाली व चालती झाली. वाटेंत दुसरा मजूर

मिळेना. एक मजूर ह्मणाला रुपाया घेईन! ह्मणजे सर्वच घोटाळा!! शेवटीं पाकीट खाकेंत मारून पोलिसला विचारीत विचारीत प्रिन्सेस डॉकवर गेलों. याकरितां आपला बोजा उचलण्याची व तो निदान एक मैल तरी नेण्याची आपल्यास ताकद पाहिजे, नाहींतर अशी फजीती व्हावयाची! प्रिन्सेस डॉक मला माहीत नव्हती ह्मणून हा घोटाळा झाला. ही मशीद बंदराच्या पूर्वेस अगदीं जवळच आहे.

मी कच्छ मांडवीचें तिकीट घेऊन अकरा वाजतां बोटीवर चढलों. कच्छ हें संस्थान आहे, आणि त्याचे बंदरीं ह्मणजे मांडवी बंदरीं बोट जावयाची होती. सबब तिचें तिकिटही निराळें हिरवें तांबडें असें होतें. ब्रिटिश हद्दींतील तिकीट तांबडेंच असतें. असें करण्याचें कारण ह्या तिकिटाचा हिरवा भाग संस्थानी मंडळी घेते व अर्धाभाग कंपनीचे नोकर घेतात. ह्या तिकिटांवरून संस्थानांत कोणत्या ठिकाणाहून किती मंडळी आली त्याचा हिशोब समजतो व कष्टमच्या तपासणीचा हिशोब लागतो.

ही बोट लांबच्या प्रवासाची आहे. एकेक दिवस किनाऱ्याचें दर्शन होत नाहीं. सबब धक्क्यावर नाना प्रकारचीं फळें, ऊंस, उलटी येऊं नये ह्मणून औषधें, गरम दूध, चहा वगैरे तयार असतात. शिवाय बोट चालू होईपर्यंत तीं बोटीवरही विकावयास येतात. तीं जरूर घ्यावीं. त्यांचा फार उपयोग होतो. याशिवाय पुष्कळ लोक आपले बरोबर पाणी भरलेल्या कळशा त्यांचीं तोंडें बांधून घेतात, ह्मणजे बोटींतील पाणी पिण्याचा प्रसंग त्यांना फारसा येत नाहीं. बाकी बोटीवर गोडें पाणी स्नान करण्यासुद्धां बहुतेक मिळतें. तरी स्वतःच्या पाण्याची स्वच्छतेच्या दृष्टीनें महती मोठी आहे हें उघड आहे. या तयारीकरितां मी डिंकाचे लाडू व साबुदाण्यांचा चिवडा, सुंठ कुटून साखर, तूप घालून तयार करून घेतली होती. याशिवाय सुपारी, लवंग, वेलची वगैरे साहित्यहि घेतलें होतें. पण याशिवाय पोहे वगैरे धान्यवजा पदार्थ घ्यावे.

सर्व तयारी झाली. धक्क्यावरील विक्रीकरितां आलेले लोक परत गेले. बोटीला लावलेली शिडी काढली व बोट बरोबर बारा वाजतां धक्क्यावरून सुटली. तिचें पहिलें बंदर द्वारका हें होतें. अर्थात तें बरेंच लांब होतें. बोट सुटल्यावर ती मुंबईला वळसा घालून गुजराथेकडे जाते. यामुळें मुंबईचा सर्व देखावा लाईट हाऊस, कुलाब्याची दांडी, राजाबाई टॉवर, ताजमहाल हॉटेल,

बंदरांतील निरनिराळ्या बोटींचा देखावा हे पाहाण्यांत सुमारें दोन तास गेले. नंतर वांद्रे, वसईचा देखावा पाहिल्यावर बोटीनें किनारा सोडला व ती अखंड समुद्रांतून जाऊं लागली. त्याबरोबर खालीं पाणी व वर आकाश अशी स्थिति झाली. वादळाच्या कल्पनेमुळें या बोटीचें सर्वच टाईम-टेबल चुकलें होतें. ही जलद चालणारी बोट असतां अगदीं सावकाश चालत होती. तरी तिचा वेग ताशीं दहा बारा मैल होताच. कोकणच्या बोटीच्या दुप्पट मोठी ही बोट असते. बोटींत स्थिरस्थावर झाल्यावर बोटीची रचना, आंतील लोकांची ओळख करण्यांत संध्याकाळपर्यंत वेळ गेला. या बोटीला दोनच क्लास होते. एक अप्पर क्लास व दुसरा लोअर क्लास. अप्पर क्लासांत बसावयास बाकें होतीं पण लोअर क्लासांत नव्हतीं. कोकणच्या बोटींतील थर्ड क्लास व सेकंड क्लास यांमध्यें जसा विशेष फरक असतो, तसा या दोन क्लासांत नसतो. कोकणच्या बोटींत थर्ड क्लासांत जरा मोठी लाट आली कीं पाणी आंत येतें तसें या बोटींत येत नाहीं तसेंच ही बोट मोठी असल्यामुळें फारशी डोलतही नाहीं, आणि जरी डोलली तरी समुद्राचें पाणी फार खालीं असतें त्यामुळें बोटीवर लाट येण्याचा बिलकूल संभव नसतो.

ह्या बोटीवर फळफळावळ व मेवामिठाईचें दुकान नव्हतें. हीवर केबिनची सोय होती. अप्पर क्लासचें जो तिकीट काढील त्यावर केबिनचा चार्ज दहा रुपये जास्त होता. ह्या केबिनमध्यें रेलवे फर्स्टक्लासप्रमाणें सर्व सोई असतात. केबिनचें तिकीट काढल्यावर पॅसेंजरजवळ पैशाचें पाकीट असलें ह्मणजे झालें. त्याच्या सर्व सोयी कंपनीकडून होतात. अंथरूण, पांघरूण, खाणेंपिणें, टिफीण याची सोय कंपनीकडून होते. मात्र त्यावद्दल निराळे पैसे द्यावे लागतात. कांहीं कंपन्यांत तर केबिनच्या तिकिटांतच हे पैसे वसूल केलेले असतात यामुळें अप्पर क्लासभाड्यापेक्षां जसजसें अंतर लांब असेल त्याप्रमाणें बोर्डिंगचा चार्ज त्यांत आकारलेला असतो. हें तिकिट काढलें ह्मणजे तुह्मी कांहीं खा किंवा खाऊं नका. रीतीप्रमाणें कंपनीचें जेवणाचें व फराळाचें आमंत्रण दररोज येत जाईल व तुह्मी खाल्लें नाहीं तरी त्यावद्दल पैसे परत मिळणार नाहींत. या बोटीवर दोन प्रकारचें खाणें ठेवेलेलें असतें. मांसाहारी लोकांकरितां एक व शाकाहारी लोकांकरितां एक. शाकाहारी लोकांकरितां गुजराथी, मारवाडी किंवा कोणता तरी ब्राह्मण स्वयंपाकी ठेवलेला असतो. व मांसाहाराकरितां मुसलमान किंवा खिस्तीही ठेवलेला

असतो. त्याला जें खाणें पाहिजे असेल तें त्यांनीं तसें लिहून द्यावें ह्मणजे त्या-प्रमाणें त्यांची सोय होते. केबिनशिवाय बाकीच्या क्लासांची सोय ज्याची त्यांनीं करून घ्यावी. त्यांनीं कंपनीच्या दुकानदाराकडे कांहीं मिळाल्यास घ्यावें पण त्याबद्दल कंपनी जबाबदार नाहीं. पण केबिनच्या लोकांकरितां मात्र कंपनी जबा-बदार आहे.

एका केबिनमध्यें ( खोलीमध्यें ) चार माणसांची बहुधा सोय असते. फॅमिली केबिनही मिळते. तिच्यामध्यें एका कुटुंबांतील मनुष्येंच राहतात. पण अशीं माणसें निदान चार तरी असावीं लागतात, किंवा कमी असल्यास चार माणसांचा चार्ज भरावा लागतो, असा कंपनीचा नियम आहे. पण केबिन रिकाम्या असल्या ह्मणजे कुटुंबवत्सल मनुष्याची कंपनी होतां होईतों गैरसोय करीत नाहीं. त्याला एक दोन माणसांकरितां सुद्धां स्वतंत्र कॅबिन मिळते. तसेंच कुलीन पॅसेंजरही त्याच कॅबिनमध्यें मला जागा द्या असा आग्रह धरीत नाहींत. फॅमिली केबिनमध्यें दुसऱ्या कोणाचाही प्रवेश होत नाहीं. ती रिझर्व असते.

सर्व कॅबिनकरितां ह्मणजे पंचवीस तीस उतारूंकरितां एक केबिनबॉय ठेविलेला असतो. हा बहुधा हिंदु असतो. निदान हिंदूकरितां हिंदू व ख्रिस्ती मुसलमानाकरितां त्यांच्यापैकींच एकादा ठेविलेला असतो. त्यांचें काम केबिनच्या उतारूनें हाक मारिली असतां जाणें, त्याला वाटेल ती वस्तु आणून देणें, सांगेल त्यास बोलावून आणणें, खोली नेहमीं स्वच्छ ठेवणें वगैरे गडी चाकर मनुष्याप्रमाणें त्याचें काम असतें. तो बोटीवरील सर्व माहिती देतो. ह्याचे विरुद्ध केबिनच्या पॅसेंजरची कॅप्टनकडे तक्रार होतां कामा नये. ह्या सर्व केबिनच्या पॅसेंजरांना एके ठिकाणीं बसण्याकरितां एक स्वतंत्र ड्राइंग रूम ह्मणजे दिवाणखाना असतो. त्यांत कोचें, टेबलें, वर्तमानपत्रें दिवे वगैरे लायब्ररीप्रमाणें थाट असतो. शिवाय बोटीसंबंधानें माहिती देण्याकरितां एक मनुष्य असतो. बोटींचीं टाईम टेबलें, जाण्यायेण्याचे मार्ग, प्रत्येक बोटीनें करावयाचीं बंदरें, तसेंच चालू बोटीचें नांव, कॅप्टनचें नांव, खलाशी व ऑफिसर्स किती, अप्पर क्लासचे पॅसेंजर किती घ्यावयाचे, लोअर क्लासचे किती घ्यावयाचे, आंत ओझें किती घ्यावयाचें त्यांत लगेज किती, गुड्स किती, यांची माहिती लागलेली असते. तसेंच बोटीवरील सर्व सामान, इंजिन व यंत्रसामग्री दुरुस्त आहे, अशा-

बद्दल गव्हर्नमेन्ट इंजिनिअरांचें सर्टिफिकिट असतें. याशिवाय या बोटीनें कोठ-पासून कोठपर्यंत फेऱ्या कराव्या, फेअरसीझन ह्मणजे स्वच्छ हवेचा काळ कोणता व फाउल सीझन ह्मणजे वादळी हवेचा काळ कोणता, तसेंच ते किती दिवस असतात, त्यांच्या तारखा दिलेल्या असतात, आणि हें सर्टिफिकेट किती दिवस चालेल, हेंही सांगितलें असतें. यापुढें बोट पुन्हां तपासून पुढील मुदतीचीं सर्टि-फिकिटें पुन्हां घ्यावीं लागतात. या परवान्यावर स्थानिक सरकारची (गव्हर्नरची) सही लागते. या दिवाणखान्यांत लोअर क्लासच्या उतारूंना येण्याची मनाई असते. ह्या केबिनवाल्यांची स्नानाची सोय, संडास, पाणी, वगैरे अगदीं पृथक असतें. पृथक असतें ह्मणजे प्रत्येकाची वेगळी असते अशी नाहीं. तेथें सर्व अपर क्लासची मंडळी यावयाची. लोअर क्लासची नाहीं.

बोटीवरील प्रत्येक ऑफिसराची सोय निराळी असते. त्यांचा उतारूंशीं संबंध नसतो. इंजिनीअर, डॉक्टर, कप्तान यांचीं ऑफिसें स्वतंत्र असतात. जो तो आपल्या कामाचा जबाबदार असतो. प्रत्येकाची सहा किंवा आठ तासांची ड्यूटी असते. ड्यूटीवर असतांना प्रत्येकानें आपले कायदेशीर फुल ड्रेसनें हजर असलें पाहिजे. यांत इतरांचे ड्रेस फारसे निराळे नसतात, पण इंजन ड्रायव्हरचा ड्रेस मात्र गंमतीचा असतो. ह्मणजे त्याचा कोट व विजार हीं एकत्र शिवलेलीं असतात व तीं बहुतेक अंगाबरोबर असतात, घोळका नसतो. याचें कारण इंजि-नमध्यें सर्व चाकें व यंत्ररचना गिरणीप्रमाणें अगदीं जवळजवळ फिरत अस-तात; त्यांत कपड्याचें एक टोंक सांपडलें ह्मणजे मोठा अनर्थ व्हावयाचा! या कपड्याशिवाय दुसरा कोणताही कपडा ते वापरीत नाहींत. कॅप्टनचे खोलीमध्यें होकायंत्र, व हिंदी महासागरांपैकीं, प्रत्येक समुद्राचे नकाशे, त्यांचे काठचीं बंदरें, त्यांच्या भोंवतालच्यां स्थानिक खुणा, दिवे, निशाणें, तसेंच त्याच्या रस्त्यांतील दर्याची खोली, भाटी बेटें दाखविणारे असे नकाशे, खलाशी लोकांकरितांच मुद्दाम तयार केलेले फारच सुरेख व पूर्ण माहितीनें भरलेले असतात. ह्या नकाशा-शिवाय अज्ञात समुद्रांत बोट निघाल्यापासून एका दिशेनें किती मैल चालत आली, हें दाखविण्याचें एक यंत्र असतें. रेलवे रस्त्यावर मैल मांडलेले असतात व मध्यें स्टेशनें असतात, गाडी मध्येंच कोठें उभी केली असतां आपण कोठें आहों हें समजतें. तसें ह्या यंत्रांचे द्वारें अखंड समुद्रांत आपली बोट कोठें आहे, हें निश्चयानें समजतें. ह्या मैल मोजण्याच्या यंत्राची माहिती मागें दिली आहेच.

इंजिनरूममध्यें व बॉयलर ह्मणजे आगीच्या जागेंत कोणालाच जाऊं देत नाहींत. त्यांत अशिक्षित मनुष्याला तर मुळींच जाऊं देत नाहींत. आंत पाहण्यासारखी मोठी मजा असते. बोटीच्या सर्वांत पुढें व उंचावर बोट मार्गदर्शक मनुष्य हातांत दुर्बीण घेऊन बसलेला असतो. तो बोट कशी चालवावयाची याबद्दल वेळोवेळीं विजेच्या घंटांच्या साधनानें खालच्या इंजन ड्रायव्हरला सूचना करतो. त्याप्रमाणें ड्रायव्हर बोट चालवितो. त्याचे योगें बोट पुढें मागें दोन्ही बाजूला वरील मनुष्याच्या इच्छेप्रमाणें पंख्याच्या जोरानें चालते. हे पंखे जरुरीप्रमाणें लहान मोठे व निराळ्या ठिकाणीं असतात व ते फिरण्यास त्याच-प्रमाणें वाफेची शक्ति लाविलेली असते. बोटींतील सर्व कामें मुख्यतः वाफेच्या शक्तीनें होतात. बोटीचा माल चढविण्या उतरविण्यास यान्त्र्या असतात. त्याप्रमाणें त्या यान्त्र्यांनीं माल गलबतांत येऊन पडतो व गलबतांतून बोटींतील गोदामांत जाऊन पडतो. हें कसें होतें हें पाहण्याची मोठी मजा असते. प्रत्येक गोदामाजवळ एक यारी असते. कोठें आरडा नाहीं, ओरडा नाहीं. एवढीं मोठीं राक्षसी कामें पण अगदीं बिनचूक यंत्राप्रमाणें होतात. बोटीचें सुकाणूं वरच्या मनुष्याच्या हातीं असतें. त्याप्रमाणें फिरवून बोट त्याला हवीतशी वळवितां येते. बोट तुफानांत सांपडून क्वचित् कोठें भडकली आणि गोडें पाणी सरलें तर खाऱ्या पाण्याची वाफ करून ती थंड करून गोडें पाणी करण्याचेंही एक यंत्र असतें. बोट चालविण्याचा मुख्य पंखा व तो फिरविण्याचा दांडा कधीं कधीं सहा इंच व्यासाचाही असतो ! आणि त्या मानानें त्याचा पाणी कापण्याचा पंखा असतो. हा दांडा दोन तीन यंत्रांचे सहा-य्यानें गरगरा फिरून पंख्यानें पाणी तोडतो व एवढी मोठी बोट पुढें ढकलली जाते. पंख्याचा एवढा जोर आहे कीं, बोट वारा व लाटा यांच्या तडाक्यांत सांपडली तरी त्यास न जुमानतां ती इच्छिल्या ठिकाणीं हक्कानें नेली जाते. वारा व तुफान याचा जोर समुद्राच्या पाण्याच्यावर चालतो. आंत चालत नाहीं! आणि पंखा पाण्याच्या आंत फिरत असतो. यामुळें तो वरच्या प्रतिबंधाला मुळींच जुमानीत नाहीं !!

याशिवाय बोटीवर रात्रीं विजेचे दिवे लावावे लागतात. तें विजेचें यंत्र सूर्यास्त झाला, ह्मणजे सुरु करतात. त्या योगानें जिकडे तिकडे दिवे लागतात. दिवे घर्षणजन्य विजेच्या योगानें लागतात. व ठोके रसायनजन्य विद्युल्लतेनें पडतात.

इतका बंदोबस्त असतो तरी हें पाण्याचें घोडें केव्हां दगा देईल याचा नेम नाहीं, ह्मणून प्रत्येक बोटीवर चार किंवा जास्त लाईफ बोटी ठेविलेल्या असतात. तसेंच लाईफ जाकिटें, कडीं, हीं सर्व ठिकाणीं ठेविलेलीं असतात. प्रत्येक वस्तूवर त्या त्या बोटीचें नांव असतें. नांव नाहीं अशी एकही वस्तु मिळावयाची नाहीं. एवढीं कडीं व संरक्षणाची व्यवस्था ठेवण्याचें कारण हेंच कीं, बोटीला क्वचित् अपघात होऊन बोट बुडाल्यास किंवा बुडण्याचा प्रसंग आल्यास लाईफ बोटींत बसून शक्य तितकीं माणसें सुरक्षित निघावीं. प्रत्येक कड्यानें व जाकीटानें एक एक मनुष्याचें-रक्षण होतें. तरी पण पाण्यांत याच्या योगानें फार वेळ मनुष्य तरूं शकत नाहीं. कारण ही वेळ बहुधा तुफानाची असते. ज्या तुफानांत मोठ्या बोटीचें चाललें नाहीं, ह्मणून तिची अशी व्यवस्था झाली तेथें लहान बोटी, व लहान कडीं, जाकिटें यांचें काय चालणार? पण हा अपायाला उपाय आहे एवढेंच. न जाणो थोडक्या वेळांत दुसऱ्या बोटीची मदत आली किंवा किनारा जवळच असला तर तिचा कांहीं थोडासा उपयोग होतो. पण मनुष्य बिन पोहणारा किंवा बिन धैर्याचा असला, तर ह्या साधन सामुग्रींतसुद्धां बुडून जाईल. कारण तुफान झालें ह्मणजे एक एक लाट पर्वतप्राय उचलून कोसळते. तेथें मनुष्याचा काय पाड? याचकरितां प्रथम समुद्र प्रवासाची तपश्चर्या कशी करावी, हें मागें मुद्दाम सांगितलें आहे. हा तरी एक अपायाला उपाय ह्मणूनच आहे. तिचा अशा वेळीं बराच उपाय होईल. पण याशिवाय दुसरा उपायच नाहीं. हीं कडीं व जॉकिटें कशीं वापरावयाचीं याची बोटीवरील अधिकारी माहिती देतात.

ह्या इंजिन रूमशिवाय दुसरी एक बॉयलर रूम असते. त्यांत बोट लहान मोठी असेल त्याप्रमाणें एक ते चार बॉयलर किंवा फारच मोठी असल्यास अशा दोन किंवा तीन बॉयलर रूम असतात व तितके धुराचे बंब असतात. हा प्रत्येक बॉयलर आपल्या मोठ्या आगगाडीच्या चौपट मोठा असतो आणि असे चार बॉयलर आमच्या बोटींत होते. सर्व बॉयलरांत पाणी व कोळसे घालून वाफ नेहमीं ठराविक शक्तीची तयार ठेवावी लागते. वाफेची शक्ति मोजण्याचें एकेक यंत्र प्रत्येक बॉयलरवर असतें. बोटीच्या खालच्या बाजूस दोन्हीं भागाला कोळसा, पाणी, याशिवाय दुसरें कांहीं नसतें. ह्या बॉयलर रूममध्यें भयंकर आग जळत असते. तीस शुद्ध हवेचा पुरवठा वरून मोठमोठ्या नळांनीं होत असतो. ह्या नळांचीं तोंडें वर फार मोठीं असून जिकडून वारा वाहील तिकडे त्यांचीं

तोंडें वळवितात. बोट सुरु झाली ह्मणजे. वारा पुढूनच वाहातो सबब, हीं तोंडें पुढेंच करून ठेवितात. यामुळें त्यांत जोरानें वारा भरला जातो व तो खालीं जातो. इतका वाऱ्याचा पुरवठा होतो, तरी कोळसा घालणारे खलाशी घामानें नेहमीं डबडबलेलेच असतात. ह्या खलाशांचें काम इंजनांत कोळसा घालून आग चालू ठेवावयाची व वाफेचा जोर कायम ठेवावयाचा ह्मणजे आग, पाणी, वाफ यांकडे लक्ष देऊन बाकीच्या वेळांत इंजनमधील राख काढून समुद्रांत फेकून देणें चाललेलें असतें. ही राख लोखंडी दांड्यानें वेळोवेळीं काढली नाहीं तर विस्तव जोरानें पेटत नाहीं. त्या सर्व बॉयलरांचे वाफेचे नळ इंजनरूममध्यें आणून ते ड्रायव्हरचे ताब्यांत दिलेले असतात. डायव्हरचे ताब्यांत प्रत्येकाकडून गेलेली वाफ किती शक्तीची आहे हें मोजण्याचेंसुद्धां प्रत्येक नळाला यंत्र असतें. या वाफेच्या शक्तीची योजना ड्रायव्हर कप्तानाच्या सुचनेप्रमाणें ती निरनिराळ्या यंत्रांत सोडून तीं यंत्रें चालावितो व त्यायोगें बोट चालून योजलेली सर्व कामें होतात. बॉयलरमध्यें पाणी किती राहिलें आहे, हें दाखविण्याकरितां कांचेच्या नळ्या असतात. कितीही उष्णतेनें त्या फुटत नाहींत. त्यावरून पाणी कमी असल्याचें आढळल्यास बंबाच्या जोरानें तें घालतात.

या बोटीमध्यें कछी, काठेवाडी व सिंधी लोक असून बोटीनें द्वारकेस जाणारे कांहीं महाराष्ट्रीय यात्रेकरू व गोसावीही होते. आतां बेट द्वारकेपर्यंत रेलवेही झाली आहे, व ती बोटीनें प्रवास न करणारास सोयीची आहे. फक्त बेट द्वारकेला पडावांतून जावेंच लागतें. पण तें अंतर फारसें नाहीं. त्या बोटींत मलाच कायतें नारायण सरोवरास जावयाचें होतें. त्या बाजूचा कोणी यात्रेकरू आहे काय ह्मणून तपास करूं लागलों, पण कोणी मिळाला नाहीं. कारण त्या यात्रेची ही वेळ नव्हती. आमची बोट टाईमटेबलाप्रमाणें सकाळीं द्वारकेस जाणार होती. पण वादळाच्या धास्तीनें सावकाश चालून तिला दीव बेटाचा किनारा मात्र सकाळीं दिसूं लागला, इतकी ती उशिरां गेली व संध्याकाळीं द्वारकेस गेली! बोट अवेळीं गेली असतां बंदरांत घेण्याची गुजराथ सरकारची मनाई आहे. सबब रात्रभर बोट दर्यांत नांगर टाकून उभी होती. मुंबईस कुलाबा दांडीचा दिवा जसा थांबून सुरू होतो, तसा द्वारकेच्या लाईट हाऊसचा दिवा होता. तो एकदम मोठा होई नंतर लहान होतां होतां अगदीं नाहींसा होई. पुन्हां सुरू

होई व अशी त्याची काजव्याप्रमाणें रात्रभर चमक चालली होती. पहाट झाल्यावर बोटीची शिटी होऊन गेली, त्याबरोबर बंदरांतून उतारू घेऊन मचवे निघाले व लोक बोटीवर आले. द्वारकेस जाणारे बेळगांवकडील यात्रेकरू होते. त्यांचा आमचा बोटींत बराच परिचय झाला होता. त्यांत एक अल्पवयी पंचवीस तीस वर्षांचे गृहस्थ बी. ए. एल्. एल्. बी वकील होते. मेची कोर्टाला सुटी असल्यामुळें ते यात्रेला निघाले होते. पण ही यात्रा करून पुढें हिमालयाची सुद्धां त्यांस करावयाची होती. त्यांत जमल्यास गंगोत्री जमनोत्रीचीही करावयाची आहे असें ते ह्मणाले. ते ह्मणाले, हिमालयाचे यात्रेसंबंधानें जितकीं पुस्तकें उपलब्ध झालीं आहेत तितकीं मी वाचलीं आहेत. तुमचे चित्रमय जगतांतील लेखही वाचले आहेत. ते असें नुसते बोलत, पण तशी त्यांच्या हातून कृति होत नव्हती. हिमालयाचे यात्रेला ज्येष्ठ महिना पाहिजे. चैत्र महिना काय उपयोग? ते ह्मणाले, मला दिल्ली, आग्रा, अजमीर करून जावयाचें आहे. आणि परत केव्हां यावयाचें? तर जूनमध्यें कोर्ट सुरू होण्याचे वेळीं. ह्मणजे सर्वच काळ गैरसोयीचा होता. मी ह्मटलें, हिमालयाच्या यात्रेची अशी घाई करूं नका. तुमचें अजून वय गेलें नाहीं, तुह्मी मुलांबाळांचे धनी आहां. एखादेवेळीं कोणाच्या नादीं लागून फसाल, अविचार करूं नका. माझें हिमालयाच्या यात्रेचें पुस्तक लवकरच प्रसिद्ध होईल तें नीट वाचून विचार करून मग जा. असें त्यांना ते द्वारकेच्या मचव्यांत उतरल्यावरसुद्धां बजाविलें होतें. ते बरें ह्मणाले. त्यांची यात्रा संपल्यावर त्यांचें पत्र मला यावयाचें असें ठरलें होतें, पण तें मात्र आलें नाहीं!

द्वारकेचे यात्रेकरू गेल्यावर निव्वळ कछी व सिंधी लोक बोटीत राहिले. त्यांत मलाच, दक्षिणी मनुष्यास असा पाहिल्यावर जो तो मजकडे पाहूं लागला व हंसूं लागला कीं, हे पुण्याचे तात्या आमचे कच्छांत किंवा सिंध प्रांतांत कोठें चालले! यांना आमची भाषा पण समजणार नाहीं! तेव्हां त्यांना मी नारायण सरोवराचे यात्रेस जात आहें असें सांगितलें. तेव्हां ते ह्मणाले, ही यात्रा कार्तिकी पौर्णिमेला भरते. यावेळीं तुह्माला तेथें जाणारा कोणी भेटणार नाहीं. कछ मांडवीपासून हें सरोवर सुमारें चार कोस लांब आहे असें मी एका गोसाव्याच्या तोंडून ऐकिलें होतें. एका ग्रंथांतही तसेंच लिहिलेलें वाचलें होतें. पण मुंबईकडचे बोटीवरील कछी लोक ह्मणूं लागले कीं तें मांडवीपासून निदान चाळीस कोसापेक्षां जास्त आहे, कमी खात्रीनें नाहीं! मी आपली सामुग्री चार कोसांच्या

अंतराची घेतली होती. तेव्हां ही यात्रा आतां राहिली असें वाटलें. बोटीवर एक पारशी वृद्ध गृहस्थ इंजिनीअर होते. त्यांचा स्वभाव त्यांच्या जातीप्रमाणें थट्टेखोर असल्यामुळें त्यांनीं तर माझी टरच उडविली. ते ह्मणाले, अहो तात्या. यात्राबित्रा एकीकडे राहतील. परदेश, परमुलूख, परभाषा समजणार नाहीं. जाऊन व्यर्थ पस्ताव्यांत पडाल, त्यापेक्षां द्वारकेची यात्रा करून परत फिरा ह्मणजे झालें. एकदा तसेंच करावें असें मनांत आलें. पण त्या मंडळींत मांडवीच्या एका देवस्थानचा पुजारी एक व्यापारी होता. त्यानें मला धीर दिला व ह्मणाला, तुह्मी घाबरूं नका. तुह्मी आणलेल्या पैशांत तुमची ही यात्रा नक्की होईल. असें त्यानें मला सांगितलें व पुढें कसें करावें तें त्यानें सांगितलें. मांडवी बंदरांत उतरल्यावर मी तुमची सर्व व्यवस्था लावून देतों असेंही तो ह्मणाला. त्याप्रमाणें द्वारकेस न उतरतां मनाचा धीर करून मी मांडवीकडे तर निघालोंच !

बोटींत स्नान केल्याशिवाय राहण्याचा मला हाच प्रसंग येणार होता. आमचे बेळगांवचे कानडी यात्रेकरूंमध्यें एक वल्लभाचार्य संप्रदायाचे वैष्णव गृहस्थ होते व एक बाई होती. त्यांनीं ह्या दीड दिवसपर्यंत तोंडसुद्धां हालवलें नाहीं. मी बोटीवर नळाच्या गोड्या पाण्यानें स्नान करून देवाचें नामस्मरण करून अगदीं स्वतंत्र जागीं जाऊन बरोबर घेतलेल्या वस्तूंचा फराळ केला. त्या बाईला मात्र ओकून पुरेसें झालें व प्राण कासावीस झाला. तेव्हां तिला मी सांगितलें, बाई स्नान करा व मी हीं फळें देतों तीं खा, ह्मणजे तुह्माला बरें वाटेल. प्रथम ती कांहीं ऐकेना. पण मागें सांगितलेल्या आमच्या वकिलांनीं तिची कानडींत समजूत घातली, तेव्हां तिनें स्नान केलें व संत्री, सफरचंद व डाळिंब खाल्यावर तिला जरा हुशारी आली. असे कांहीं लोक आग्रही असतात व विनाकारण आपण संकटांत पडून लोकांनाही पाडतात. त्यांचें ह्मणणें असें कीं काय होईल ? फार झालें तर जीव जाईल. गेला तरी कांहीं हरकत नाहीं. हें बोलणें ठीक आहे आणि अशा रीतीनें अक्लेश जीव गेला तर खरोखरच कांहीं वाईट नाहीं. पण जीव न जातां व्यर्थ आपल्याला व दुसऱ्याला यातना भोगाव्या लागतात हेंच वाईट.

असो. द्वारकेची मंडळी गेली व मग बोट बहुतेक रिकामीच झाली. नंतर मांडवी बंदरासंबंधानें व पुढें जाण्याचा रस्ता कसा आहे, सरोवर कसें आहे,

तेथें कोण राहतात, वस्ती कशी आहे, वगैरे हकीकत मी त्या पुजाऱ्याला विचारूं लागलों. त्याच्या बोलण्यांत आणखी नाण्याचा प्रश्न निघाला. ब्रिटिश नाणीं तिकडे चालत नाहींत. कोडी म्हणून सुमारें आठ आणे वजनाचें शुद्ध चांदीचें नाणें त्या राजाचें आहे. हें नाणें नीटस नाहीं. आपले कडील पूर्वी शिवराई, ढब्बू, मोहोरा वगैरे ज्याप्रमाणें असत त्याप्रमाणें हें जाड असून त्यावर उर्दू लिपीचीं अक्षरें आहेत. याच नाण्याचें पांच कोडी म्हणून दोन रुपयांपे । जास्त वजनाचें शुद्ध चांदीचें नाणें आहे व तें मात्र रुपयासारखें पातळ पत्र्याचें व नीटस आहे. पण ह्या पांच कोडीच्या नाण्यानें मोजदाद चालत नाहीं; कोडीच्या नाण्यानें हिशोब व व्यवहार चालतो. या नाण्याखालचें ढब्बू पैशाएवढें दोन दिडक्यांच्या नाण्याएवढें व त्यापेक्षां थोडें मोठें असें तांब्याचेंही नाणें आहे. हीं तीनच नाणीं ह्या संस्थानामध्यें चालतात. ब्रिटिश नाण्यापेक्षां निजामाचें नाणें कमी किंमतीचें. पण कच्छचें हें नाणें जास्त किंमतीचें आहे. चांदीचा भाव बदलतो त्याप्रमाणें त्याची देवघेव होते. साधारणपणें रुपायाला दीड कोडीपासून दोन कोडी भाव असतो. हा भाव जास्त असण्याचें कारण तें नाणें शुद्ध चांदीचें आहे हें आहेच, पण नाण्याची दुर्मिळता हेंही एक कृत्रिम साधन आहे. सर्व कच्छच्या राज्यांत हें नाणें चालतें, पण बोटीवर व ब्रिटिश पोष्टांत मात्र ब्रिटिश नाणेंच चालत. त्याचप्रमाणें पोष्ट व टेलिग्राफ यांजवर अधिकार ब्रिटिश गव्हर्नमेन्टचाच आहे. मनिऑर्डरी करणें झाल्यास किंवा कार्ड तिकीटें घेणें वगैरे पोस्टाचा कोणताही व्यवहार करणें झाल्यास त्या गोष्टी ब्रिटिश नाण्यांतच कराव्या लागतात व पैसा देतांना तो ब्रिटिश नाण्यांतच देतात. नाण्याच्या वटावाची सराफीचीं दुकानें ठिकठिकाणीं असतात. कच्छामध्यें सिंधप्रमाणें पाऊस कमी पडतो, यामुळें त्यांत पाण्याचा दुष्काळच असतो. सर्व प्रदेश वाळूचा असून पाणी नाहीं. जें थोडें कोठें असतें तेंही मचूळ असतें. अशा गोष्टी बोलतां चालतां दुपारीं दोन वाजण्याचे सुमारास आमची बोट मांडवी बंदरांत आली. पडाव आले व आह्मी बंदरावर उतरलों.

कच्छ हें संस्थान स्वतंत्र आहे. पण ब्रिटिशांचें तें मांडलीक आहे. तरी ब्रिटिश मुलखांतून आलेल्या प्रत्येक मनुष्याची व त्यांनीं आणलेल्या चीजवस्तूंचीं येथें तपासणी होते. प्रथम आलेल्या मनुष्यांची डॉक्टरकडून शारीरिक तपासणी करितात. त्यांत कोणी स्पर्शजन्य-प्लेगचा किंवा दुसऱ्या सांथीचा रोगी आढळल्यास त्यास कारन्टाईनमध्यें ठेवतात. जो मनुष्य पास केला जातो त्याच्या

हातावर छाप देतात. अशा रीतीनें शारीरिक तपासणी झाल्यावर आलेल्या मनुष्याची माहिती विचारून टिपून ठेवितात. त्यांत नांव, गांव, जात, वय, धंदा येण्याचें कारण, किती दिवस राहणें होणार वगैरे चौकशा होतात. वस्तुतः ह्या चौकशा लबाड मनुष्य पकडण्याकरितां व कोणत्या प्रांतांतील व कोणत्या जातीची पैरवी आपले राज्यांत आहे हें समजण्याकरितां असतात. यापैकीं लबाड यांच्या बारशाला जेविलेले असतात. ते आपला कसलाच थांग लागूं देत नाहींत ! ह्या माहितीनें संस्थानचा कोठें व कसला संबंध आहे हेंही कळतें. हा विधि झाला ह्मणजे प्रत्येक मनुष्याचा बोजा पूर्णपणें तपासला जातो. त्यांत जकातीचा माल आणला असला तर त्याची चोपून जकात घेतात. संस्थानची मंडळी आपआपली पातड्यों ( लांबड्या वह्या ) व दौतलेखण्या घेऊन बसलेले असतात. अशा रीतीनें सर्वांच्या सामानाची तपासणी व जकात वसूल झाली ह्मणजे गांवांतील गाडीवाले, टांगे-वाले, उंटवाले असे निरानिराळे वाहनवाले उतारूंना नेण्याकरितां आलेले अस-तात. पेढीवाले व्यापारी मालाकरितां व आप्तस्नेही बायका मुलें यांच्या भेटी-करितां आले असतात. केवळ यात्रेकरितां व अनोळखी असा मी एकटाच दक्षिणी असल्यामुळें माझेभोंवतीं बरीच मंडळी जमली ! नाशिकच्या भटांप्रमाणें प्रत्येक जण मला विचारी, तुह्माला कोठें जावयाचें ? आमच्या पुजाऱ्यानें सांगितलें होतें कीं, कोणासही रुकार देऊं नका, मी तुमची सर्व व्यवस्था लावीन. त्याप्रमाणें मी कोणास कसलाच रुकार दिला नाहीं, पण तपास मात्र चालविला होता !

येथील गाड्या मारवाडांतील वाळूंतून जाणाऱ्या गाड्यांप्रमाणेंच लहान व कंबरभर उंचीच्या लहान चाकच्या होत्या. ह्या गाड्यांना बैल मात्र मोठे व मजबूत लावतात. ते त्या गाड्यांना शोभतसुद्धां नाहींत. असे बैल लावण्याचें कारण वाळूंतून गाडी ओढणें याशिवाय अशक्य झालें असतें. या गाडीवानांत एक दलाल होता. तो ह्मणाला, माझ्यामार्फत तुह्मीं गाडी किंवा उंट केलात तर तुह्माला स्वस्त पडेल. दगा फटक्याची भीति राहाणार नाहीं. भाड्याचें काय ? तर उंटावर जाऊन येण्यास पंधरा सोळा कोडी लागतील व गाडीला भाडें वीस बावीस कोडी लागतील. उंटावरून गेल्यास वेळ कमी लागून पसाही कमी लागेल पण उंटाचा प्रवास फार दगदगीचा आहे. एकतर भर उन्हांतून जावें लागतें, उन्ह वारा यांचा बंदोबस्त नाहीं, उंटावर बसलें असतांना मनुष्य एकसारखा व उंटाच्या चालीनें जोरानें मागेंपुढें हालत असतो ह्यामुळें

कंबर मोडून जाते. मला वेळ नव्हता व पैसेही कमी होते सबब आपण उंटावरचे शहाणे व्हावें असें एकदां मनांत आलें! पण आमच्या व्यापाऱ्यानें तसें करूं दिलें नाहीं. तुह्माला तो प्रवास झेंपणार नाहीं, असें तो ह्मणाला. नंतर मी जाऊन येऊन वीस कोडीला गाडी ठरविली असतां यांनीं तीस कोडीला जाऊन येऊन ठरविली! मी त्याला ह्मटलें, मला वीस कोडीला गाडी मिळते आणि तुह्मी तीस कोडीला कबूल करतां याचा अर्थ काय? तेव्हां तो ह्मणाला, पल्ला लांब आहे. निदान चार दिवस जावयाला व चार दिवस यावयाला लागतील. बैल व माणूस यांचें खाणें व मजुरी एवढ्याला इतके पाहिजेतच. मी पाहिलेला मनुष्य माझ्या खात्रीचा आहे. तो तुह्माला निर्धास्त नेईल व आणून पोंहचवील. दुसरे लोक वीस कोडीचा ठराव करतील व रस्त्यांमध्यें गोंधळ घालतील. हा गाडीवान माझे परिचयाचा आहे. दग्याफटक्याबद्दल मी जबाबदार आहें. तुह्मी अपरिचित व नवखे आहां, तेव्हां हा नाद सोडा. तेव्हां त्याचा सल्ला मी ऐकिला व एकोणतीस कोडीला अखेरीस गाडी ठरविली!

मला ही सगळी लबाडी दिसली. कांहींतरी त्यांचा आपसांतील दलालीचा प्रकार असावा असें स्पष्ट दिसलें. कारण ह्याच मनुष्यानें पूर्वी बावीस कोडीला गाडी मजबरोबर ठरविलेली होती व तोच आतां एकोणतीस कोडी मागतो तेव्हां ती स्पष्ट लबाडी आहे असें मी त्या व्यापाऱ्यास सांगितलें. तेव्हां तो ह्मणाला, एवढ्यांत गाडी मिळणें शक्य नाहीं व पुढें तो घोटाळा घालील. माझ्यावर विश्वास ठेवा. तेव्हां मी आपला हेका सोडला. आमचें जुळलें असें पाहिल्यावर तो उंटवाला दलाल आला आणि ह्मणाला, माझी दलाली द्या. मी ह्मणालों, तूं दलाली काय केलीस व आह्माला काय जुळवून दिलेंस? कांहीं नाहीं. मग तुला कसलें द्यावयाचें! तेव्हां आमचा व्यापारी ह्मणाला, द्या त्याला दोन आणे. हा येथील रिवाज आहे. ह्मणजे सगळेच उजळमाथ्याचे ठक!!! मीही विशेष आग्रह न धरितां निरुपायानें दोन आणे दिले!

गाडींत दुसरा कोणी घेऊं नये, गाडीला छप्पर व बुरखा पाहिजे, बैल व गाडीवाला यांच्या खाण्यापिण्याचा किंवा कसलाही खर्च आपणाकडे नाहीं. प्रथम पांच कोडी द्याव्या, नंतर आणखी पांच त्यानें मागितल्यास वाटेंत कोठें तरी द्याव्या व येथें आल्यावर बाकीच्या द्याव्या असा त्या व्यापाऱ्यासमक्ष तोंडी

करार झाला. लेखी नाहीं. व्यापाऱ्यांनींसुद्धां लेखाची जरूर नाहीं असें सांगितलें. लेख घेऊन तरी काय उपयोग होणार होता ! दिलेला लेख कितपत खरा आहे, त्यांचीं नांवें गांवें तरी खरीं आहेत कीं नाहींत वगैरे सर्व गोष्टीची फारशी वाच्यता न करितां मी तें सर्व कबूल केलें ! गाडीवाल्यानेंसुद्धां कबूल केलें कीं, मी तुह्माला फुलासारखा नेऊन आणीन. आपण आनंदानें जाऊं व येऊं, कांहीं काळजी करूं नका. वगैरे सर्व विधि यथास्थित झाले. पण मला हे सर्व सोहाळे माहीत होते. मी त्यावेळीं कांहीं बोललों नाहीं. त्यानें आपली गाडी व बैल दाखविले. गाड्या अगदीं वाईट असतात, त्यांना साठी मुळींच नसते. कशीतरी चार लांकडें बांधिलेलीं असतात व नवारीनें तीं कशी-तरी विणलेलीं असतात ! त्यांत भोसका पडून मध्यें पाकीटसुद्धां पडून जाईल मग जोड्यासारख्या लहान वस्तूची सोय कशाला पाहिजे ! गाडीचे बैल हत्तीसारखे व चाकें अगदीं ढोपराएवढ्या व्यासाचीं असतात. आसांवरील पेटीही मोठी नाहीं ह्यामुळें गाडीची साठी अगदीं उतरती असते. तींत धड बसतां सुद्धां येत नाहीं. तिचें बैलाकडील टोंक उंच व दुसरेकडचें टोंक बहुतेक जमिनीस लागलेलें असतें. इकडे गोषाची चाल असल्यामुळें गाडीभोंवतीं बुरखा मात्र चांगला असतो. अशी बुरख्याची गाडी असेल तीच घ्यावी ह्मणजे उन्ह, थंडी, वारा यांपासून संरक्षण होऊन प्रवास सुखावह होतो.

याप्रमाणें ठराव झाला. आमच्या व्यापाऱ्यानें प्रथम मजजवळून वीस रुप-यांच्या नोटा घेऊन त्याच्या कोडी करून मला दिल्या. त्या त्यावेळच्या भावानें बत्तीस आल्या आणि, इतक्यांत तुह्मी जाऊन याल असें तो ह्मणला. कदाचित् लागल्यास एक दोनरुपये मोडा असें ह्मणाला. असा ठराव होऊन गाडीवाला जेवायला गेला व त्यानें संध्याकाळीं निघावयाचें असें ठरविलें. मीही तेथल्या एका भिशींत (खाणावळींत) उतरून स्नानसंध्या, भोजन उरकून घेतलें तों पांच वाजले. लगेच गाडीवाला आला व निघावयाचें ना असें ह्मणाला. मी ह्मटलें, ठीक आहे, निघावयाचें. तेव्हां त्यानें बैलाची व आपली दाणा वैरणीची सोय करून घेतली व आह्मीं संध्याकाळीं सूर्यास्ताच्या सुमारास निघालों.

बोटींतून आह्मी मांडवी बंदर पाहिलें, तों तेथें कांहीं नसून जिकडे तिकडे पांढऱ्या वाळूचे ढीगच ढीग दृष्टीस पडले. हे ढीग एवढे मोठे होते कीं, त्यांत कांहीं इमारती गडप झाल्या होत्या व कांहीं अर्धवट गडप झाल्या होत्या. तेव्हां

हा काय चमत्कार आहे? ह्मणून तपास केला. तर ह्या कच्छ प्रांतांत डोंगर, पर्वत नाहींत. अर्थात अरण्य नाहीं व नदी नाहीं. सर्व प्रदेश वालुकामय आहे. एकदां वारा सुटला ह्मणजे वाळू भुरभुर वाहात जाते. तिला थोडा जरी प्रतिबंध झाला, मग तो घराचा कां होईना, तेथें तिचा ढीग जमत जातो. इतका कीं त्याला ती इमारत अगदीं थोड्या वेळांत बुडवून टाकितां येते! व मनुष्यांवर प्राण-संकट ओढवतें !! यावरून सहारा वाळवंटांत वाळूचीं वादळें कशीं उत्पन्न होत असतील आणि ठिकाठिकाणीं एकाएकीं पर्वतप्राय वाळूचे ढीग कसे उत्पन्न होत असतील याची कल्पना आली! आतां सहारा वाळवंट अपरंपार मोठें आहे. त्यावरून वाहणाऱ्या वाऱ्याला प्रतिबंध मुळींच नसतो, पण वारेच परस्पर विरुद्ध वाहून त्यांचे भोंवरे उत्पन्न होऊन त्यायोगें वाळूचेही भोंवरे कणग्याप्रमाणें नाचत असतात व वादळ बंद होतांच त्यांचे ढीग जेथच्या तेथेंच कायम राहातात. ह्मणून अशा ठिकाणीं उंटावरून जावें लागतें. पायीं जाण्याचा उपाय नसतो. पण असे उंटाचे काफलेसुद्धां या भोंवऱ्यांत कधींकधीं गडप होतात! पाण्याच्या समुद्राप्रमाणेंच हा वाळूचा समुद्र आहे. कसल्याही वादळाचे परिणाम दोहोंकडे असेच अनिष्ट होतात.

या मांडवी बंदरांत कछ सरकारचीं कस्टम, पब्लिक वर्कस, ( इंजिनीअरिंग ) वगैरे ऑफिसें आहेत. अगदीं बंदरांत प्रथम किल्लेवजा घर आहे. त्या किल्ल्यावर मुंबईसारखा थांबून सुरू होणारा लाईटहाऊस आहे व वर कछ सरकारचें निशाण आहे. कछ हें पहिल्या प्रतीचें संस्थान असल्यामुळें त्यास स्वतंत्रपणें नाणें पाडण्याचे वगैरे बरेच स्वतंत्र रीतीचे हक्क आहेत. बंदरावर निरनिराळ्या दोन तीन बोट कंपन्यांच्या एजंटाचीं तिकिट ऑफिसें आहेत. पुढें देशी, इंग्रजी शाळा, पोष्ट ऑफिस, तार ऑफिस व मोठमोठ्या व्यापाऱ्यांचीं दुकानें ऊर्फ पेढ्या आहेत. या मांडवी बंदराशिवाय मांडवी शहर अगदीं स्वतंत्र आहे व तें यापासून नजीकच आहे. त्या सभोंवतीं फार मोठा ताडाएवढा उंच कोट आहे. ह्यामुळें या गांवचें वाळू-पासून रक्षण झालें आहे. गांव मोठा व लोक संपत्तीमान आहेत. भिकार घर मला एकही दिसलें नाहीं. सर्व तीन तीन चार चार मजलीं घरें चुनेगच्ची पक्कीं पहिल्या पद्धतीचीं मजबूत बांधिलीं आहेत. गांवची रचना मात्र अगदीं जुन्या पद्धतीची आहे. ह्मणजे घरांची मांडणी व्यवस्थेशीर नाहीं. वाटेल त्यानें वाटेल तशीं घरें बांधिलीं आहेत. मोठे रस्ते मुळींच नाहींत. काशीसारख्या जिकडे तिकडे

गल्ल्या आहेत. गांवांत सर्व प्रकारचे कारखाने, मोठमोठ्या पेढ्या, व सराफीचीं दुकानें आहेत. गुजराथी व कछी लोक व्यापारांत मुरलेले, तेव्हां जिकडे तिकडे दुकानेंच दुकानें आहेत. पण एकंदरींत गांव घाणेरडा असून संडासाची सोय कोठेंही नाहीं. सर्वांनीं, बायकामुलांनींसुद्धां वेळीं अवेळीं गल्लीकुचीला जरा आडोशाचे जागीं शौचास बसावें. ढोरें मोकळीं असतातच, तेव्हां जागा पुन्हां स्वच्छ होतेच! संडासांच्या घाणीपेक्षां ही एक प्रकारची स्वच्छताच आहे. आतां मर्यादा अमर्यादा हा एक देशरिवाजाचा प्रश्न आहे आतां नवीन वस्ती कोटाबाहेर झाली आहे व होत आहे. ती मात्र प्रशस्त होत आहे. तेथें सर्व प्रकारचीं वाहनें गाड्या, घोडे, बैल, उंट वगैरे गांवाबाहेर असतात. गांवांत रस्ते अरुंद ह्मणून वाहनें नेण्याची सोय नाहीं.

रोजचा भाजीपाल्याचा बाजारही गांवच्या कोटाबाहेर भरतो. अजूनपर्यंत कोट सर्व प्रकारें सुरक्षित आहे. त्याच्या वेशीही सुरक्षित आहेत. जमीन रेताड ह्मणून एवढ्या मोठ्या उंच कोटाचा पायातरी किती खोल खणला असेल याची कल्पना करवत नाहीं! निदान अर्धा ताडतरी खोल असावा, असा अजमास आहे!! वाळूमुळें हें खणणेंसुद्धां जोखमाचेंच आहे. कारण ती एकसारखी कोसळते!!! कोटाबाहेर वस्ती चांगली आहे. पण त्यांना हें वाळूचें मात्र संकट अनिवार्य आहे. येथील इंजिनीअर लोकांना हें मोठें दररोजचें कामच आहे. त्यांनीं नेहमीं रस्त्यावरील वाळू ओढून काढीत असावें. या कृत्यामुळें रस्त्याच्या दोहों बाजूस वाळूचे ढीग पडलेले असतात. असें केलें नाहीं तर हे रस्ते केव्हां बुजून जातील याचा नेम नाहीं. प्रथम सांगितलेलें वर्णन कोटाबाहेरचेंच आहे. येथील गाड्या अगदीं वाईट. गाडी लहान, जमीन वाळूची, यामुळें तींत फार ओझें भरतां येत नाहीं. थोडे ओझें भरलें तरी तें ओढण्याकरितां बैल फार मोठे पुष्ट लावावे लागतात. येथें उंटाचीही मी एक गाडी पाहिली! तिचें चाक मात्र छातीभर उंच होतें व माल बराच भरला होता.

आह्मी प्रवासास निघालों. गाडीवान रजपूत तरुण वयाचा होता. त्याला हिंदुस्थानी थोडेंबहुत येत होतें. त्याची जन्मभाषा कछी होती. आमची गाडी गांवांतून जात असतां त्यानें मांडवी शहरची व बंदरची सर्व प्रकारची स्थानिक माहिती सांगण्यास सुरवात केली. हें देऊळ आहे, ही इमारत अशाकरितां आहे, ही धर्मशाळा आहे वगैरे सांगतां सांगतां हें घर एका नाटक शाळेचें

( वेश्येचें ) आहे असें ह्मणाला. बाई फार उत्तम देखणी व निर्दोष आहे. तुह्माला यावयाचें आहे काय ? असें त्यानें विचारिलें ! मी ह्मणालों, तूं मूर्ख आहेस. मी यात्रेस निघालों कीं अशीं कामें करावयास निघालों ! मी कांहीं व्यापारी नाहीं. तेव्हां तो ह्मणाला, तुह्मी सर्व प्रकारच्या चौकशा व्यापाऱ्यापेक्षांसुद्धां जास्त प्रकारच्या करतां; अर्थात तुह्मी सर्व प्रकारची चव घेणारे आहां ह्मणून हें मी ह्मणालों. राग येऊं देऊं नका ! मी तुमच्यासारख्या मनुष्याला वाईट स्थळ कधीं सांगणार नाहीं. स्थळ पाहण्यासारखें आहे. निदान पाहून तरी या. वगैरे बोलला ! ! तुह्माला जावयाचें नसल्यास मला पैसे द्या, मी जातों असेंही तो ह्मणाला. मी ह्मटलें तुला जावयाचें असेल तर तूं जा. पण तुह्मी बरोबर चला. कशाला ? तेथील देखावा पहा तर खरा ! असें तो ह्मणाला. मला हें कांहीं नको, तुझ्या पैशापैकीं तुला कांहीं खर्च करावयाचे असतील तर कर, असें मी सांगितलें. तो ह्मणाला, नाहीं. तुह्मी मला खुशीनें बक्षीस द्या ! तेव्हां मी ह्मणालों, मी एवढा शहाणा नाहीं. तेव्हां तो उगचि बसून आमची गाडी चालू लागली ! !

पुढें तपास करतां ह्या रजपूत लोकांचीं लग्नें करण्यास पैसा फार लागतो, मुलीला फार पैसे भरावे लागतात, यामुळें दोन चार भाऊ असले तर एखाद्याचें लग्न होतें. मुली फार मोठ्या वीस वीस वर्षांच्या करतात. पण नियमीत पैसे मिळाल्याशिवाय देतच नाहींत. यामुळें ज्यांना आपलें लग्न होणेचा संभवच नाहीं, असें लोक, त्यांना जी मजुरी मिळते त्यापैकीं आपलेकडील लोक जसे दारूंत पैसा उडवितात तसे हे लोक या कामांत उडवितात असें समजलें. त्याला अनुसरून हें त्याचें बोलणें होतें ! कदाचित् हा त्या बाईचा दलाल किंवा कुंटण नसेल कशावरून ? सारांश, यात्रेकरूला किती जपलें पाहिजे हें यावरून ध्यानांत येईल. तो यात्रेकरू दिसला ह्मणजे लोक कसकसे फसवूं पाहातात याचें दिग्दर्शनार्थ हें लिहिलें आहे. रीतभात समजण्याकरितां ह्मणून कदाचित तेथें गेल्यावर काय अनर्थ झाला असता, कोणी सांगावें ? बोलून चालून परदेश व परराज्य. पण अशा रीतीनें मी त्याचा पूर्ण निषेध केला तेव्हां आमची गाडी पुढें चालूं लागली.

भोंवतालचा प्रदेश अगदीं वैराण दिसला. ज्या ठिकाणीं पाणी त्या ठिकाणीं मात्र बागबगीचा दृष्टीस पडे. पिण्याच्या पाण्याच्या विहिरींचा बंदोबस्त फार चांगला ठेवितात, कारण इकडे पाण्याचें दुर्भिक्ष. मी गेलों त्याच्या आधीं पंधरा

दिवस थोडा पाऊस पडला होता ह्मणून बरें, नाहींतर या यात्रेंत या दिवसांत पिण्याचें पाणी कोणाकडचें घ्यावें लागलें असतें हें सांगतां येत नाहीं! जमीन वाळवंट तर खरी परंतु चांगली पिकाऊ आहे. थोडा पाऊस पडला कीं, पीक उत्तम व विपुल येतें. हें संस्थान असल्यामुळ ज्यावेळीं पीक येतें, त्याचवेळीं धारा भरावयाचा व तो उत्पन्नाच्या कांहीं हिशाप्रमाणें द्यावयाचा. पीक उत्पन्न झालें नाहीं, तर धारा नाहीं. धारा पिकांतच घेण्याचा ठराव आहे. ही जुन्या काळची रीत अद्याप येथें चालू आहे. शेतकीचें उत्पन्न कमी ह्मणून लोकांस पोटापाण्याकरितां मुंबई पाहावी लागते. आतां सक्करचें मोठें धरण झाल्यामुळें त्याचा एक कालवा कच्छमध्यें येऊन सुबत्ता होण्याचा संभव दिसत आहे.

ह्या बाजूला ब्राह्मण कमी. क्षत्रिय, लमाणें, कुणबी व मुसलमान लोक जास्त. येथील मुसलमान आणि क्षत्रिय यांचा संबंध होता. अकबर बादशहाच्या वेळीं हिंदु आणि मुसलमान ह्याच्या शरीरसंबंधाची जी चाल पूर्वी होती तिचा अवशेष अद्यापपर्यंत येथें राहिला होता. अगदीं अलिकडे दहा वीस वर्षें हा संबंध बंद झाला असें समजतें. ह्यांत हिंदूच्या मुली मात्र मुसलमानास दिल्याच्या गोष्टी ऐकू येतात. खुद्द कच्छच्या रावाच्या राजघराण्याचा शरीरसंबंध जामनगरच्या नबाबाच्या घराण्याशीं झाला होता असें ह्मणतात! पण मुसलमानांच्या मुली हिंदूंनीं केल्याचा इकडे दाखला मिळत नाहीं; यामुळें रजपूत बाटले नाहींत. मुसलमानाकडे दिलेली मुलगी माहेरी आली ह्मणजे काय करितां? ह्मणून मी गाडीवानाला विचारिलें, तर तो आपलें जेवावयाचें निराळें करते असें ह्मणाला. कांहीं जातींत रोटी व्यवहारास मोकळीक असते, पण बेटी व्यवहारास नसते. पण येथें बेटी व्यवहार चालतो, पण रोटी व्यवहार चालत नाहीं, असा उलटा प्रकार आहे! हल्लीं हिंदू लोक मुसलमानाला मुली देत नाहींत. हल्लींच्या येथील राजानेंसुद्धां असा कडक निर्बंध केला आहे कीं, जो जहागीरदार हिंदु ह्मणविणार नाहीं त्याची जहागीर जप्त केली जाईल! येथील बहुतेक हिंदु लोक राम व रहीम (पीर) या उभयतांस भजतात, ह्मणजे दोन्हीकडचे आचार पाळतात. आतां हिंदु संघटनाची लाट उसळल्यामुळें हा प्रकारही कमी होत चालला आहे.

इंग्रजी राज्य होण्यापूर्वी येथें मारामाऱ्या, खून, एकमेकांवर स्वाऱ्या–हल्ले फार होत असत; पण हल्लीं सरकारचा बंदोबस्त फार झाला आहे. जिकडे तिकडे

तार, पोष्ट, पोलीस यांचा बंदोबस्त होऊन गुन्हेगाराचा तपास होऊन ताबडतोब शिक्षा होते. प्रत्येक गांवाशेजारीं लाकडाच्या घोडेस्वाराच्या मूर्ती व त्यावर शेंदूर लावलेला असे. मी विचारिलें ह्या देव कोण ? तेव्हां गाडीवानानें सांगितलें कीं, हे ह्या गांवचे वीर या ठिकाणीं लढाईत पडले त्यांच्या स्मारकांचीं हीं थडगीं आहेत. आतां मारामाऱ्या होत नाहींत. वीर नाहीसे झाले, अर्थात वैर थंडावलें ! तेव्हां आतां स्मारकेंही संपलीं ! ! सर्व क्षत्रिय नामशेष झाले ! ! ! त्यांचीं हत्यारेंसुद्धां गंजलीं व वीरत्व जाऊन त्यांच्या कपाळीं शेतकी व मजुरी ह्यांचे काबाडकष्ट आले ! शेती पावसाच्या हातीं, त्याची कृपा इकडे नाहीं ह्मणून सगळ्यांनाच दास्यत्व आलें ! !

वाटेंत एक बडा गांव लागला. तो शहरवजा होता. त्या गांवच्या राजाचें अनायासें दर्शन झालें. अशा प्रकारचे गांवचे राजे कछाच्या राजाचे मांडलीक असत. भूजच्या राज्यावर जें संकट येईल तेव्हां ह्या मंडळींनीं त्यास ससैन्य आपल्या पदरच्या खर्चासुद्धां मदत करावी, याशिवाय हे राजे आपल्या प्रांतांत स्वतंत्र असत. जसे तालुक्यांत मामलेदार तसेच हे राजे ! पण हे राजे व ते नोकर, ह्मणजे यांचें राज्य वंशपरंपरेनें चालावयाचें, तसा नोकरांच्या वंशाचा नोकरीवर हक्क नाहीं. त्यावेळीं अशा राजाला खूनसुद्धां करण्याचा अधिकार असे! आतां हा प्रकार बंद झाला आहे. खुद्द भूजच्या राजालासुद्धां खून करण्याचा अधिकार नाहीं. त्यानें फार झालें तर न्यायासनासमोर आणून त्यास फांशीची शिक्षा द्यावी त्याबद्दल वरिष्ठ सरकार विचारणार नाहीं. पण खून केला कीं, पोलिटिकल एजंटचा ससेमिरा आलाच !

अशा स्थानिक राजाचा राजवाडा मी मुद्दाम पाहिला. तो अगदीं मोडकळीस आला होता. जो भाग पडे त्याची दुरुस्ती होत नसे. लाकडी किंवा दगडी भाग पडला ह्मणजे त्यांतली वस्ती दुसरीकडे जाई ! राजेसाहेबांचें दर्शन झालें. राजेसाहेबांची दाढी मिशा पोक्त व चेहेरा भव्य होता. ते माडीवर फाटक्या गोधड्या पांघरून बसले होते ! जवळ मोठी थोरली धुनी पेटली होती व सभोंवती मंडळी बसून गांजा, अफिणीचा हुक्का ओढण्याचा समारंभ चालला होता ! राजेसाहेब वयानें उतार वयाचे ह्मणजे साठीपलीकडचे होते. त्यांचा अधिकार फक्त आतां त्यांच्या केसांवर मात्र राहिला होता ! कुटुंबावरसुद्धां नाहीं ! केस व

मिशा मात्र चित्रांत दाखविलेल्या राजाप्रमाणें कल्लेदार व ढबदार दिसल्या. त्यना फाटकीं तुटकीं फडकीं बांधून कल्यांना व मिशांना वळण देणें चाललें होतें. गांजा व चरस ह्यांना पौष्टिक खावयास पाहिजे; परंतु आतां पौष्टिकपणा गेला, हुक्का मात्र कायम राहिला. ह्मणजे काप गेलें आणि भोकें राहिलीं ! ! मी ज्याचेबरोबर राजदर्शनास गेलों होतों त्यानें माझी व राजेसाहेबांची ओळख करून दिली. तेव्हां मी त्यांच्या पोषाखाकडे पाहून जरा सलगीनें त्यांस विचारिलें तुह्मी राजे आणि तुमचें वैभव फाटक्या गोधड्यांपर्यंत कां आलें ? तेव्हां ते हंसले माझ्याबरोबर जो मनुष्य आला होता त्यानें सांगितलें ह्या वाड्यांत जितकीं शे दिडशें कुटुंबें होतीं त्या सर्वांचा निर्वाह ह्या राजाश्रयावरच होता. यांचें उत्पन्न चांगलें होतें, पण गांजा आफिणीनें सर्वांचा धूर झाला ! सर्व सावकारांच्या घरांत गेलें. सावकारांनीं फिर्यादी मांडल्या तेव्हां त्यांची जहागिरी कछ सरकारनें जप्त केली. आतां कछ सरकारकडून त्यांच्या फक्त पोटाला मिळतें. तें राजेच्या दोनशें कोडी ह्मणजे सुमारें दोनशें रुपये मिळतात. परंतु तेवढ्यांत त्यांचें कसेंतरी जेवण व हुक्का पाणी मात्र होतें ! यावरून एकदां खर्चाची व व्यसनाची चकट लागली ह्मणजे मग ती कमी होत नाहीं ह्मणतात तेंच खरें. शिवाय खानदानीचा मनुष्य व हलका मनुष्य कोणत्याही परिस्थितींत आपल्या आश्रितांना टाकीत नाहीं, तसे ते आश्रितही त्यांना सोडीत नव्हते. पण हल्लींचा प्रकार अगदीं निराळा झाला. स्वतःचीं बायका मुलेंसुद्धां लोक टाकीत आहेत व तींही त्यांना सोडीत आहेत. हा कालमहिमा आहे ! हा राजा वयातीत आहे. त्याचें सर्व वैभव गेलें आहे तरी त्याचा चेहेरा खानदानी मनुष्यासारखा मोठा रुबाबदार दिसतो. त्याचें पूर्वी कोणास नखसुद्धां दिसत नसे. पण त्यानें आतां कोणास हाक मारिली तर कोणी ढुंकूनसुद्धां पहात नाहीं. काय हें राजवैभव ! राजाला दिलेल्या पोटगींतून काटकसर काढून आफीण, चंडोल वगैरे तीव्र मादकपदार्थ भोंवतालीं सर्व मंडळीं जमून ओढण्याची त्यांची संवय अद्याप गेली नाहीं. लोकांकडून राजेसाहेब घ्या गुडगुडी ! ! एवढाच ह्मणण्याचा मान त्यांस राहिला आहे.

ह्याच ठिकाणीं एका मोडक्या पेटाऱ्यांत मला चिलखतें दृष्टीस पडलीं. बाकी सर्व ठिकाणीं बदुका, तरवारी, भाले तसेंच राजवाड्याच्या कोटाभोंवतीं तोफा वगैरे हत्यारें दृष्टीस पडलीं, पण तीं जिवंत नसून मेलेलीं होतीं. जणूं काय तीं

आपल्या राजाचेंच अनुकरण करीत होतों ! जुनीं चिलखतें कशी असत हें मीं येथें प्रत्यक्ष पाहिलें. अशीं हजार मनुष्यांना पुरेशीं चिलखतें, ह्या वाड्यांत होतीं. तसेंच शिरस्त्राणें, नासिका त्राणें बाहूरक्षणें वगैरे सर्व पाहिलीं. एवढें लोखंडी ओझें शरिरावर बाळगून शंभर शंभर कोस मजल मारून अन्नपाण्यावांचून आठ-बारा दिवस लढाई मारणाऱ्या पूर्वजांचें सामर्थ्य कोठें, आणि आतां पागोट्याचें ओझें डोक्याला सहन होत नाहीं ह्मणून टोपी घालणारी त्यांची प्रजा कोठें ! ! ! त्यांचेच हें वंशज असतील असें कोणाला सांगितलें तर तें खरेंही वाटणार नाहीं !

चिलखत हें लोखंडी चपट्या कड्या मिळून केलेलें असतें. ह्या कड्यांचीं हीं चिलखतें कोठें व कोणीं केलीं असें मी त्यांस विचारिलें. तेव्हां अशीं चिलखतें करणारे लोहार ह्या आपल्या शहरांत हल्लीं लोहार आहेत त्यांचेच पूर्वज होते, असें त्यांनीं सांगितलें. लोखंड कोठलें ! तर येथलेंच. यावरून पूर्वी विशेष यंत्र-रचना नसतां ज्यांनीं इतकी कुशलता दाखविली त्यांचे कसबाची धन्यच ह्मटली पाहिजे. आतां अशीं हत्यारें येथें करितां येतील काय ? तर नाहीं. ह्मणजे तो काळच गेला ! असें ह्मटलें पाहिजे. अर्थात त्या राजवाड्यांतसुद्धां हे राजे राह-ण्यास लायक नाहींत हेंच खरें. असें तेथील सर्व प्रकारचें दुर्दैवी वैभव पाहून मनाला फार वाईट वाटलें. पण या दुर्दैवीपणाबद्दल त्यांच्या मनांत खंतीचा लवलेशही नव्हता. खुशाल घ्या गुडगुडी घ्या गुडगुडी अशी धुंदी चालली होती. हा हुक्का जसा वाकडा तसेंच त्यानें आपल्या संगतीस असणारांचें सर्वतोपरी वांकडें केलें आहे, तरी त्याला हे सोडीत नाहींत ! अर्थात त्यांच्या नीच कृतींचीं फळें भोगण्याकरितांच परमेश्वरानें त्यांना ही दशा आणली, असेंच ह्मटलें पाहिजे. भिकाऱ्याला मदत करूं नये, परमेश्वराचे आपण गुन्हेगार होतों असें कांहीं विद्वानांचें विशेषतः पाश्चात्यांचें ह्मणणें आहे, तेंच खरें असें वाटू लागतें अशा मनुष्यांना मदत केल्यानें आळसाला व निरुद्योगाला उत्तेजन दिल्या-सारखें होतें. त्यांच्या गुन्ह्यांकरितां परमेश्वरानें ही शिक्षा दिली आहे. तिच्या आड आपण आलों असतां परमेश्वराचा आपणावरही कोपच होईल असें ह्मणतात तेंच खरें. असो. राजेसाहेबांस आह्मी रीतीप्रमाणें नमस्कार केला व त्यांच्या दर्जास शोभणार नाहीं अशा प्रकारचें आपल्या तोंडून कांहीं शब्द निघाले असल्यास त्याबद्दल क्षमा असावी, असें ह्मणून त्यांची क्षमा मागून आह्मी राजवाड्याच्या खालीं आलों !

कछ हा प्रांत अगदीं मैदान आहे. समुद्रासारखीच जमीन आकाशाला लागल्यासारखी दिसते. हें मैदान एकदां तापलें ह्मणजे मृगजल दिसूं लागतें. खरें मृगजल मी आजपर्यंत कधींही पाहिलें नव्हतें, तें ह्या ठिकाणीं प्रत्यक्ष दिसलें. हें मृगजळ आहे असें मलासुद्धां वाटलें नाहीं. खाडीचा एक फाटा इकडे आल्यामुळे त्याच्या लाटा उसळत आहेत असा मला खराच भास झाला. ह्मणून मी गाडीवाल्यास विचारिलें हें येथें पाणी कोठलें? नकाशावरून येथें समुद्राचा किंवा कसलाही पाण्याचा संबंध नाहीं. तेव्हां तो ह्मणाला, हें पाणी नव्हे मृगजल आहे. मी नीट निरखून पाहूं लागलों तों वाऱ्यामुळें पाण्याच्या लाटा उसळत आहेत, त्यावर सूर्यकिरणें पडल्यामुळें तें चकाकत आहे, आंत बेटें दिसत आहेत. आंतल्या झाडांचीं त्यांत प्रतिबिंबें उलटीं दिसत आहेत, वगैरे प्रकार प्रत्यक्ष पाहून पाणी नाहीं अशी माझी खात्री होईना. अखेर जेथें पाणी आहे असें वाटत होतें, तेथें कांहीं वेळानें आमची गाडी गेली आणि पाहातों तों तेथें पाण्याचा एक थेंबही नाहीं! ओहोटीमुळें पाणी गेलें असेल असें ह्मणावें तर पाण्याच्या ओलाव्याचा तेथें स्पर्शही दिसेना! तेव्हां हें मृगजळ खरें अशी माझी खात्री झाली! ह्या प्रांतांत उन्हाळा होत होता त्यापेक्षां कितीतरी कडक उन्हाळा मी पाहिला आहे पण मला मृगजळ कोठेंही दृष्टीस पडलें नाहीं. खरोखर हा सृष्टिचमत्कार पाहण्यासारखा असतो. ज्याच्या नशिबीं असेल त्यालाच तो दिसतो. विलक्षण मोठें वाळूचें मैदान असल्याशिवाय हें दिसत नाहीं. येथें कडक उन्हाळा होतो, पण तो तसा भासत नाहीं. कारण जसजसा उन्हाळा होऊं लागतो तसतसा त्याबरोबर आरबी समुद्रांतून थंड व जोराचा वारा सुटूं लागतो. व तो मृगजळ दिसण्याला मदत करतो. आपल्याकडे जवळ डोंगर तापला ह्मणजे उन्हाळा कडक भासतो, पण त्या योगानें असें मृगजळ दिसत नाहीं. येथें सारखें मैदान असल्यामुळें हवेच्या थराच्या सारख्या लाटा निघतात, ह्मणून हा चमत्कार दिसतो. त्यांत आरबी समुद्राच्या वाऱ्यानें त्या सारख्या हालत असतात व त्यामुळें पाण्याचें सादृश्य स्पष्टपणें दिसतें.

इकडे उन्हाळा कडक खरा पण तो प्राणिमात्राला मुळींच बाधत नाहीं. दुभतीं जनावरेंसुद्धां दूध चांगलीं देतात. येथील लोकांनाही हा उन्हाळा त्रासदायक वाटत नाहीं. कोठेंही वैशाख महिना ह्मणजे कडक उन्हाचे दिवस, आठ वाजले ह्मणजे कडक उन्ह भासूं लागतें. अकरा वाजल्यापासून तीन चार वाजे-

पर्यंत कोणालाही बाहेर पडवत नाहीं. गाडीचीं जनावरेंसुद्धां हाकीत नाहींत. जो तो सावलीच्या आश्रयानें स्वस्थ असतो. पण ह्या ठिकाणीं ह्यावेळींसुद्धां गाडी हांकतात व जनावरें खुशीनें चालतात ! व गाडिवान गाडीच्या धुराणी-वर उन्हांत खुशाल निजून राहतात. त्यांना वरच्या उन्हाच्या तापाबद्दल कांहींच वाटत नाहीं ! तसेंच अशा वेळीं एखादें सावलीचें झाड सांपडल्यास कोणासही सावलीचा आश्रय करून बसावेंसें वाटेल पण येथील लोक व जनावरें अशा वेळीं देखील खालची वाळू तापली असतां व जवळ झाडाची सावली असतां तिकडे न जातां खुशाल तप्त वाळूमध्यें कडक उन्हांत बसतात व जनावरें रवंथ करीत असतात. इतकेंच नाहीं तर मनुष्यांससुद्धां सावलींत निजण्यापेक्षां उन्हांत निजणें बरें वाटतें ! ह्मणजे येथील उन्ह त्यांस बाधत नाहीं. याचें मुख्य कारण सवय ही आहे व असें आहे तरी त्याचा शरिरावर परिणाम व्हावयाचा तो होतोच. ह्मणजे सर्व लोक काळे ठिक्कर पडलेले असतात. तसेंच येथें पाण्याचें दुर्भिक्ष असल्यामुळें मारवाडाप्रमाणें येथें स्नान करण्याची व कपडा धुण्याची आवश्यकताच नाहीं ! वाळू पांढरी असल्यामुळें कपडे काळे होत नाहींत, पांढरेच राहातात हें त्यांतल्या त्यांत विशेष आहे. दुसरें येथें इतका कडक उन्हाळा होतो तरी घाम येत नाहीं ह्मणून कपड्यांची फारशी खराबी होत नाहीं.

कछी पोषाख ह्मणजे एक सैल विजार, अंगांत एक कंबरेपर्यंत आडबंदी व डोक्यास पागोटेंवजा फेटा. तो कछी पद्धतीप्रमाणें बांधलेला असतो. कपडे खादीच्या कापडासारखे जाड कापडाचे असतात. बायकांचा पोषाख ह्मणजे खालीं जाड कापडाचा परकर, अंगांत कांचोळी (पाठीमागें बंद बांधावयाची चोळी ) व एक पदर घेण्याकरितां ओढणी इतकाच असतो.

मांडवी बंदरापासून दहा बारा मैलपर्यंत थोडें थोडें पाणी सांपडतें, परंतु पुढें पाण्याचें दुर्भिक्ष आहे. ज्या ठिकाणीं पाण्याची विहीर आहे, त्या ठिकाणीं चार चार पांच पांच कोसांवरील जनावरें केवळ दिवसांतून एकदां पाणी पिण्याकरितां येतात. ह्या कछ प्रांतांत नद्या आहेत पण त्याही खाऱ्या ! प्रत्यक्ष खारी नदी कोठें दृष्टीस पडत नाहीं. पण ती येथें दृष्टीस पडते. ह्या नद्यांचे उगम डोंगरांतून नाहींत. कारण डोंगरच नाहींत मग गोड्या नद्या कोठल्या ? ह्या नद्या उत्तरे-कडील रणांतून उत्पन्न होऊन दाक्षिणेकडे समुद्रास मिळाल्या आहेत. ह्या नद्या

-समुद्रास मोठ्या भरत्या येतात - त्यावेळीं किंवा पावसाळीं सुरू होतात. जसजसें नारायण सरोवर जवळ येत चाललें, तसतसें पाणी नाहीं. नारायण सरोवरा-पासून दहा कोसांचे आसपास पाणी मुळींच नाहीं. सर्वत्र गांव पसरले आहेत, घरें चुनेगच्ची चांगलीं आहेत, व्यापार दुकानें आहेत, पण पाण्याची बोंब आहे. प्रवाशांला पाणी मिळावें ह्मणून कित्येक गांवांत सावकारांनीं ठिकठिकाणीं मोठ्या प्रयत्नानें पाणी मिळवून रांजण भरून ठेवलेले असतात, ही एक मोठी समाधानाची गोष्ट आहे.

आमच्या गाडीवानाच्या मोठ्या भावाचें एका मुलीशीं लग्न जमलें होतें. लग्न जमलें ह्मणण्यापेक्षां जमविलें होतेंच खरें. कारण इकडे लग्न पैशाचें आहे. त्या मुलीचा गांव आमच्या प्रवासाच्या मार्गावरच होता. त्याच्या जवळच एक मोठें शहर होतें. पण त्या शहरांत वस्ती करावयाची टाकून आमचा गाडीवान त्या खेड्यांतच वस्तीला गेला. याचें कारण मग असें समजलें कीं, हा गाडीच त्या घरच्या बाईच्या मालकीची होती. ह्या प्रांतांत बायकांना विशेष प्राधान्य असतें. त्यांत नवरे थोडे अर्धवट असले ह्मणजे मगतर त्यांचें चांगलेंच फावतें. सर्व पैसा व कर्तृत्व त्यांचेजवळच असतें. ही गाडी त्या बाईची होती व तिनें ह्याला नोकरीवर ठेविला होता. मला सर्व पैसे हिलाच द्यावे लागले. येथें येई-पर्यंत चार दिवसांची गड्यानें आपली व बैलांची खावटी घेतली होती ती येथें आल्यावर सरली. येथें आल्यावर गाडीची पुन्हां मरामत केली, बैलांना विश्रांती मिळाली व ताजे दमानें आह्मी पुन्हां निघालों. येथें गाड्यांना वारंवार तेल लावावें लागत नाहीं. आंसाला नव्या नवारीचे तुकडे गुंडाळून त्यावर चांगलें डांबर चोपडून ठेवतात ह्मणजे निदान चार पांच दिवस तरी तेल लावावें लागत नाहीं.

हे लोक क्षत्रिय आहेत. यांचा आचार विचार चांगला आहे. यात्रेकरूला राहण्यास त्यांच्याजवळ स्वतंत्र जागा असते. त्यांचेकडे कोणी जेवावयास कबूल असल्यास ते जेवायला घालतात. आपल्या पवित्रपणाबद्दल त्यांना भरंवसा आहे. ती बाई ह्मणाली आमचेकडे काशीचे ब्राह्मणही जेवतात, मग तुह्मांला जेवायला काय हर-कत आहे ! पण माझ्याजवळ स्टोव्ह होताच मी त्यांच्या नादीं लागलों नाहीं. ब्राह्मण त्यांचेकडे जेवतील असें नाहीं. पण कोणी मी ब्राह्मण आहे असें सांगून

जेवलेही असतील. पण तें खरें नाहीं. स्वतंत्र जेवण करण्याची इच्छा असल्यास ते सिधा देतात. भांडीं कुंडी, जमीन वगैरे स्वच्छता चांगली असते व माणसेंही सुस्वभावाचीं असतात. पण त्यांचे सर्व लक्ष पैशाकडे! जो जास्त पैसा देईल त्याची व्यवस्था ते उत्तम ठेवतील, नाहींतर कांहीं ठेवणार नाहींत. ज्या दिवशीं मी पैसे दिले त्या दिवशीं मला साजूक तूप, कणीक, वगैरे पदार्थ मिळाले पण दुसऱ्या दिवशीं लगेच सर्व सरलें!! मी त्याजवळून फुकट घेत होतों असें नाहीं, पण जितके पैसे मजजवळून मिळावे अशी त्यांची अपेक्षा होती, तितके त्या गाडीबद्दल मिळाले नाहींत यामुळें त्यांचा लगेच सर्व माल सरला! पैशाचा लोभ मोठा कठीण आहे, याला कोण पुरे पडणार? माझे जवळून जितके पैसे निघावयाचे तेवढे निघाल्यावर गाडीवानानें गाडीचा बुरखा काढून घेऊन गाडी उघडी केली आणि ह्मणाला, आतां बसा गाडीवर! मी ह्मणालों, हें रे काय? गाडीच्या साठीला तर आधार नाहीं, वर शाकारणी नाहीं, मग बसूं कसा? तर लोक जसे बसतात तसे बसा! मंडपीचा तुमचा आमचा करार नाहीं. मग इतके दिवस कशी ठेवलीस? तर ती माझी खुषी होती. आतां मंडपी हवी असेल तर पांच कोडी जास्त पडतील. कारण आह्मी ही भाड्यानें आणली आहे, तिचें भाडें आह्मी कोठून द्यावें! ह्मणजे कोठून तरी पैसे उकळावयाचे दुसरें कांहीं नाहीं. पण मी मंडपीशिवाय बसत नाहीं असें सांगितलें व रागावलों तेव्हां त्यांनीं मंडपी बांधली. यावेळीं मात्र मंडपी त्याची झाली!

मंडपीचें काम झाल्यावर नारायण सरोवरावर प्रत्येक गाडीमागें दीड कोडी सरकारचा कर आहे, तो द्या असें तो ह्मणाला. परंतु तो देण्याचेंही मी नाकारिलें कारण कर गाडीवर आहे तो गाडीवाल्यानें भरावा. पण तुह्मी गाडी केली ह्मणून तुह्मी द्या. पण भाड्याचा करार झाला तेव्हां जाऊन परत येईपर्यंत एकूणतीस कोडीचा ठराव आहे, त्याप्रमाणें पैसे मिळतील जास्त मिळणार नाहींत असें मीं सांगितलें, व पैसे दिले नाहींत तेव्हां तेथेंही निरूपाय झाला. यापुढें कोणा गाडीवाल्याशीं ठराव करतांना जकात धरून भाडें असा ठराव करावा. ह्मणजे पुढें अशी तक्रार होणार नाहीं. थोड्याशा पैशाकरितां घासाघीस घालूं नये हें खरें, पण घासाघीस घालण्याची मजूरवर्गास संवयच पडून गेल्यामुळें तसें करणें भाग पडतें. नाहींतर किती लोकांस पैसा पुरे पडणार! मधून मधून गाडीवान बिडीला पैसे द्या, आगपेटीला द्या, चहाला द्या असे तेव्हां जेव्हां पैसे मागून घेतच

असे. तेव्हां काय करावें? पैशाच्या कामी फार सावध असावें, वारंवार ते काढूं नयेत व किती आहेत यांचा कोणास थांग लागूं देऊं नये वगैरे सावधगिरीच्या गोष्टी ठिकठिकाणीं सांगितल्याच आहेत.

येथलि लोकांस मराठी भाषा येत नाहीं तरी ह्या प्रांताचा मुख्यत्वेंकरून मुंबईशीं व्यापारसंबंध असल्यामुळें मुंबईस जाऊन आलेल्या बायका पुरुषांना मराठी हें येतेंच. त्यांना दाक्षिणी लोकांची राहाणी माहिती असल्यामुळें प्रापंचिक अडचणी त्यांच्या पुढें नेल्यास ते त्या प्रामाणिकपणें सोडवितात. यामुळें मला भाषेची फारशी अडचण पडली नाहीं.

या रस्त्यांत मला मोर, मुंगुस फार दृष्टीस पडले. वाळुकामय प्रदेशांतच हे उत्पन्न होतात असें दिसतें. येथील सरकारची मोर मारण्यास सक्त मनाई आहे. याशिवाय वाटेंत जातांना मला जंगली उंटांचा व पाळीव उंटांचा असें दोन्हीं प्रकारच्या उंटाचे तांडे दृष्टीस पडले. जंगली उंटांबरोबर लहान लहान पोरांपासून मोठ्यापर्यंत कित्येक एक मदारीचे व कित्येक दोन मदारीचे असें सर्व प्रकारचे उंट प्रत्येक तांड्यांत मला दृष्टीस पडत व ती एक प्रकारची मौज वाटे! जणूं काय मजप्रमाण हे यात्रेकरूही आपलें अन्नपाण्याचें स्वयमेव गाठोडें आपल्या पाठिवर घेऊन ह्या वैराण मुलुखाची यात्रा करीत आहेत!! उंटाच्या मदारींत मुख्यतः पाण्याचा सांठा असतो, यामुळें तो कित्येक दिवस पाण्यावाचून राहतो. तसाच अगदीं प्रसंग आल्यावर उंट मारून त्याचा पाण्याचा कोथळा फोडून पाणी पिऊन जगल्याचीं येथें वर्णनें ऐकिलीं. तसेंच मृगजळानें हरीण फसतात तसे उंट फसत नाहींत तर जेथें खरें पाणी असेल त्याच बाजूस पाण्याची तहान त्यास लागते तेव्हां तो जातो. उंटाला पाण्याचा वास फार लांबून येतो असें ह्मणतात! अशा रीतीनें मजा पाहात पाहात मी नारायण सरोवरास आलों.

नारायण सरोवर ह्मणजे फार विस्तृत, सुंदर व रमणीय असें सरोवर असेल असें मला प्रथम वाटलें होतें, पण तसें कांहीं नाहीं. आह्मी येथें पोहोंचलों तेव्हां रात्र होती. त्यावेळीं आमची गाडी नारायण सरोवरांतूनच चालली होती. सरोवरांतून गाडी कशी चालली? त्याचा अर्थ बहुतेक सरोवर कोरडें ठणठणींत पडलें होतें. सरोवर चांगलें पायऱ्याचें बांधलेलें होतें. पण उपयोग काय! पाण्याशिवाय त्याला शोभा कसली? त्याच्या एका बाजूला मात्र पाणी राहिलें होतें व तें तेथें

सुमारें एक पुरुष खोल होतें. आंत चांगल्या विहिरी बांधलेल्या आहेत. त्या विहिरींचें पाणी पिण्यास घेतात व बाकीचें बाहेरचें पाणी कपडे धुण्याचे वगैरे कामास उपयोगी पडतें.

हें सरोवर कृत्रिम दिसतें. ह्मणजे जमिनीवरून समुद्रांत जाणारें पाणी एका बाजूनें मजबूत व लांब रुंद बांध घालून तें अडविलें आहे, यामुळें हें लहानसें तळें झालें आहे. भोंवतालीं बहुतेक समुद्र आहे व मध्यें खडक लागला यामुळें हें करतां आलें. या बांधापलीकडे लगेच समुद्र आहे. हा समुद्राचा फांटा सिंधू नदीच्या नारा काल्व्याची खाडी आहे. सर्व जमीन वाळवंट आहे. या सरोवराच्या कांठावर वस्ती असून लहान मोठीं घरें आहेत. याचे कांठीं एक मोठें नारायणाचें मंदीर व विष्णु मंदीर अशीं दोन मंदिरें आहेत. मांदिरांचा थाटमाट साधारण बरा आहे. आह्मास येण्यास रात्र झाल्यामुळें आह्मी एका धर्मशाळेंत उतरलों होतों.

या प्रांतामध्यें धर्मशाळा मात्र उत्तम असतात. अशा धर्मशाळा मला दुसऱ्या कोणत्याही प्रांतांत दृष्टीस पडल्या नाहींत. कांहीं ठिकाणच्या धर्मशाळा इतक्या उत्तम आहेत कीं, त्यांना धर्मशाळा हें नांवसुद्धां शोभत नाहीं. अगदीं श्रीमंतापासून गरीबापर्यंत त्या धर्मशाळेंत राहाण्याची त्यांची सोय केलेली असते. ह्मणजे गरीबास उघडी जागा, श्रीमंतास जेवण्याकरितां निराळी, राहण्याकारितां निराळी व निजण्याकरितां निराळी, अशा निरनिराळ्या खोल्या असतात. ह्या धर्मशाळा अगदीं बंदोबस्ताच्या असून प्रत्येकानें आपलें कुलूप स्वतंत्रपणें लावण्यासारख्या असतात. शिवाय भोंवतीं मोठा उंच कोट असतो. कोटाचा दिंडी दरवाजा एकदां लावला ह्मणजे पूर्ण बंदोबस्त झाला. ह्या धर्मशाळा सुरक्षित रहाव्या, उतारूला योग्यतेप्रमाणें त्याच्या जागा मिळावी व इमारत सुरक्षित राहावी, ह्मणून त्याच्यावर देखरेख करण्यासाठीं एक शिपाई किंवा रखवालदार ठेविलेला असतो त्याच्याजवळ लहान मोठी भांडींही देण्याजोगीं असतात. हीं भांडीं त्याच्या स्वतःचीं नसून धर्मशाळेच्या मालकाचीं असावीं असें वाटतें, कारण एवढीं मोठीं भांडीं गाडग्या मडक्यांत स्वयंपाक करणाऱ्या रखवालदारास कशीं मिळावीं? पण त्या भांड्यांवर तो हक्क सांगून त्याबद्दल प्रवाशाजवळून एक दोन आणे भांड्यांबद्दल उकळल्याशिवाय राहात नाहीं! पण उतारू आपल्या सोयीकडे पाहून त्याला तें देण्याला कांकूं करीतही नाहीं.

ह्या धर्मशाळा सरकारी नसून, मुंबईहून पैसे मिळवून गेलेल्या मोठमोठ्या धनाढ्य भाट्यांनींच आपल्या आप्ताच्या, मृताच्या स्मरणार्थ बांधलेल्या असतात. मृतासंबंधानें और्ध्वदेहिकाकरितां जास्त पैसे व्यर्थ खर्च करण्यापेक्षां असें त्यांचें स्मारक करणें हें फार पुण्यप्रद खरें आणि ह्याला धर्मशास्त्राचा सुद्धां आधार आहेच. मृतासंबंधानें अन्नसत्रें, पाणपोया घालणें किंवा अनाथाला दान धर्म करणें हा अगदीं श्रेष्ठ प्रतीचा धर्म समजला असला तरी अशा प्रकारच्या धर्मशाळा बांधून सर्व उतारूंचे क्लेश कमी करणें ही कांहीं सामान्य गोष्ट नव्हे. ह्या धर्मशाळा बहुधा पाण्याजवळ बांधिलेल्या असतात. ह्या चांगल्या चुनेगची, व्हाईटवॉश केलेल्या, जिकडे तिकडे फरशा केलेल्या अशा असून वरतीं छप्परही मंगलोरी कौलांचें मजबूत केलेलें असतें. अशा ह्या सुंदर इमारती असतात.

नारायण सरोवर हा एक गांव आहे. गांवांतील घरांवरून व देवळाचे स्थितीवरून तो गांव पूर्वी चांगल्या स्थितींत असावा असें वाटतें. येथें व्यापारी माल कोठून येतो असें मी विचारिलें. कारण मी ज्या रस्त्यानें आलों, त्या रस्त्यानें माल येणें शक्य नव्हतें. कारण अगोदर गाड्या अगदीं वाईट, गाडीचा आंस ह्मणजे तो लहानशा पहारी एवढा असतो; शिवाय जिकडे तिकडे पुळण, गाडी एकदां पुळणींत रुतली ह्मणजे ती निघण्याची पंचाईत! सारांश मांडवी बंदरांतून माल जाणें अशक्य. तेव्हां त्यांनीं सांगितलें, या ठिकाणीं माल कराची बंदरांतून येतो. कराचीहून मोठ्या होड्यांतून व मचव्यांतून जवळच्या लखपत बंदरीं माल येतो व तेथून येथें येतो. लखपत हें मोठें बंदर आहे. हें बंदर चातुर्मास बंद असतें. तें येथून दोन तीस कोसांवर आहे.

दुसरे दिवशीं उजाडल्यावर एका पंड्याकडे गेलों. या पंड्याचा आचार व स्वच्छता फार चांगल्या प्रकारची होती. राहणी गुजराथी ब्राह्मणासारखी होती, पण तो आपणांस कोंकणस्थ ह्मणवी. कदाचित् मी यावें ह्मणून तो ह्मणाला असेल!! आह्मी इकडे आलों यामुळें आमची राहाणी अशी झाली असें त्याचें ह्मणणें पडलें. घरीं आलों तो बायकांचा पेहेराव गुजराथणीप्रमाणें होता. पण त्यांना मराठी चांगलें येत होतें. त्यांचीं नांवेंही गुजराथी होतीं तरी भाषेची तऱ्हा व शुद्ध आचार पाहून मी त्यांचेकडे उतरलों. या ठिकाणीं एक चाल मात्र मला निराळी दिसली. येथील बायका सुवासिनी असल्या तरी दुःखी कष्टी असल्या (त्यांचा आप्तइष्ट मेला असतां अशौच्यावस्थेंत) ह्मणजे

तितक्या दिवसपर्यंत कुंकू लावीत नाहींत. यात्रेशिवाय, गांवांत उद्योगधंदा कांहीं नाहीं. पण येथें यात्रा मोठी येत असावी, व त्या वार्षिक यात्रेवर या मंडळीचें पोट भरत असावें असें दिसलें. येथें पंड्यास गौर ह्मणतात.

येथील यात्रेंत पंचतीर्थी स्नान कोटेश्वर महादेवाचें दर्शन व पूजन व नारायणाचें दर्शन व त्याची पूजा हीं मुख्य आहेत. हीं पंचतीर्थें समुद्र कांठीं होतीं. पण आतां समुद्र वाढल्यामुळें भरतीचे वेळीं तीं बुडतात व त्यांचें पाणी आतां गोड्याच्या ऐवजीं खारें झालें आहे. ह्या पंचतीर्थांचा घेर सुमारें दोन मैलांचा आहे. मी सकाळीं पहांटेस नारायण सरोवराचें संकल्प युक्त यथासांग स्नान करून नारायणाचें दर्शन घेऊन पंचतीर्थांचें दर्शन वंदनास निघालों. प्रत्येक ठिकाणीं उपाध्येबुवा कोठें स्नान करा, कोठें नमस्कार करा, कोठें वाळूंत लोळा, कोठें क्षणभर निजून राहा, कोठें तर्पण करा, असे तीर्थयोजिनेप्रमाणें विधी सांगतच असत. मी आपल्याजवळ एक पंचा ठेविला होता व त्याप्रमाणें करीत असें. स्नानाचेवेळीं तो नेसावा, स्नान झाल्यावर सोडून टाकावा. प्रत्येक ठिकाणीं तर्पण व दक्षणा द्यावी लागत असे. मला हीं पंचतीर्थी केवळ पैशाकरितांच दिसली. एका ठिकाणीं मात्र कसरतीची वेळ होती त्या ठिकाणीं एका शिवस्थानीं खालची जमीन व वरची खडकाची कपार यांचेमध्यें सुमारें वीत दीड वीत इतकेंच अंतर होतें, त्यांतून निजून गेलें पाहिजे असें होतें. असें केल्यानें काय होतें ? तर सर्पापासून भय होत नाहीं ! वगैरे कोठें कांहीं, कोठें कांहीं अशी फलश्रुति सांगत असत. कारण त्याशिवाय अशा बिकट व त्रासदायक यात्रा कोणीही करणार नाहीं. पण मी या सर्व यात्रा कितीही कठीण असल्या तरी करीत असें. यांचा उद्देश कांहींही असला किंवा फलश्रुति कशीही असली तरी प्रत्यक्ष काटकपणा यावा हेंच त्याचें रहस्य. याकरितां हें करण्यांत कंटाळू नये. या पंचतीर्थांत कोटेश्वर महादेवाचें स्थान मात्र दर्शनीय आहे व तेंच मुख्य आहे. आमची यात्रा व दानधर्म यथाविधी झाल्यावर व यात्रा संपूर्ण झाल्यावर आह्मीं धर्मशाळेंतून जाऊं लागलों असतां तेथील नोकरानें आह्माला अडविलें. कां, तर रात्रभर तुह्मी व तुमचे बैल येथें राहिले, आह्माला त्रास झाला सबब चार आणे भाडें द्या. धर्मशाळा बांधणारानें त्या धर्मार्थ बांधिल्या आहेत. तरी चोरावर मोर असाच जिकडे तिकडे प्रकार होतो, तरीपण त्यास उपाय नाहीं.

त्यांनीं आणखी असें सांगितलें कीं, येथें तुह्मी जेवाचें केलें नाहीं, सबब चार आणेच द्या. जेवाचें केलें असल्यास जास्त कर द्यावा लागतो. अशी अडवणूक करितात. येथील राजाचासुद्धां यात्रेकरूंवर कर आहे. असे हे यात्रेचे सक्तीचे कांहीं दानधर्म असतात !

ही यात्रा संपून पुढें कराचीस जावें असें मनांत आलें. कराचीच्या पुढें

## अंगलाई

नांवाची गोसाव्याची देवी आहे. ती कराचीपासून शंभर कोस लांब बलुचिस्थानाकडे आहे. सर्व वालुकामय प्रदेश आहे. वाटेंत पाण्याची फारच टंचाई, मुक्कामाचे ठिकाणीं मात्र पाणी मिळतें. ही यात्रा करून यावयास निदान कमींत कमी एक महिना लागतो. ह्या एका महिन्यांत स्नान, कपडे धुणें वगैरे कांहीं नाहीं अशी ही अमंगल यात्रा आहे. उंटावरून प्रवास करावा लागतो. या यात्रेला फक्त गोसावीच जातात. सबब मी ही यात्रा केली नाहीं. या यात्रेची माहिती एका कराचीच्या ब्राह्मणानें मला खुलासेवार सांगितली. त्यांत त्यानें ही यात्रा आपली नव्हे असें स्पष्ट सांगितलें. आमचे गाडींत दुसरे कोणास घ्यावयाचें नाहीं, असा आमचा ठराव होता पण हे गृहस्थ गाडीवाल्याचे उपाध्ये, सुशिक्षीत व आचारसंपन्न ब्राह्मण पाहून मी त्याचे सांगण्यावरून त्यास गाडींत बसूं दिलें.

हिमालयाच्या यात्रेमुळें थंडीचा काटकपणा अनुभवास येतो तसा ह्या यात्रेमुळें सहारासारख्या उष्ण प्रदेशाचा अनुभव येतो. आणि तो तसा यावा याकरितांच ही यात्रा आहे. एकदां ही यात्रा करावी असें वाटे. पण येथून गलबतें कराचीस जाण्यास दहा दिवस लागतात. कारण वारा व भरती उलटी असते. येण्यास एक वेळ पुरते. ह्मणजे जाणेंच असेल तर मांडवीवरून बोटीनेंच कराचीस गेलें ह्मणजे हें त्रासाचें जाणें कांहीं अंशीं टळतें. पण असें करण्यास मला वेळ नव्हता, व पैसाही नव्हता ज्याला जाणें असेल त्यानें प्रथम कराचीस जाऊन नंतर नारायण सरोवरास यावें व नारायण सरोवरावरून मांडवीस यावें. पण नारायण सरोवरावरून मांडवीस येण्यास गाडी क्वचित मिळते. ही जरी अडचण आहे.

आमच्या गाडींत गाडीवानाचा उपाध्या घेतला होता. हा गौड ब्राह्मण होता. याला सिंधी, बलुची व कच्छी भाषा येत होत्या. कोंकणांतील

शेणवी ऊर्फ गौड सारस्वत ब्राह्मण आणि आह्मी एकच, असें त्यांनीं मला सांगितलें. त्यामुळें त्यांच्या पुढाऱ्यांत आतां पुन्हां सोयरीक संबंध होऊं लागला आहे. महाराष्ट्रांतील कायस्थ व बंगाल्यांतील कायस्थ एकच असा अलीकडे शोध लागला आहे, त्याप्रमाणेंच हा नवीन शोध आहे. हा ब्राह्मण वृत्यंशी होता व त्याची वृत्ती कच्छमध्यें या बाजूला होती. तो आपल्या यजमानाकडे भिक्षुकीला जात होता. त्याचा आचार, वस्त्रप्रावरण बऱ्या स्थितींत होतीं इतर वृत्यंशांप्रमाणें हा अशिक्षित नव्हता, चांगला सुशिक्षित होता. त्याला इंग्रजी मराठी, गुजराथी, येत नव्हतें तसें हिंदुस्थानी पण येत नव्हतें. पण साधारण संस्कृत येत होतें. यामुळें या प्रवासांत आह्मास एकमेकापासून बरीच करमणूक झाली. एकमेकांचे देशरिवाज, धर्मसमजुती, प्राचीन व अर्वाचीन व्यवस्था, राज्यकारभारांत फरक [illegible] त्याचें व आमचें बोलणें चाललें होतें. त्यांनीं कराचीं येथील आपली गृहस्थिती सांगितली. त्यावरून त्याची बायको मेली होती, मूलबाळ नव्हतें. त्याचें वय सुमारें तीस पसतिशीचें असावें. येथें मुलीला फार पैसे पडतात. हजारों रुपये द्यावे लागतात. यामुळें हयातींत कदाचित एकदांच लग्न होण्याचा संभव असतो आणि तोही दुर्दैवानें गेला ह्मणजे पुरुषाचा जन्म विधवेप्रमाणेंच कर्तृत्वशून्य व अत्यंत निराशेनें जातो असें त्याच्या ह्मणण्यांत आलें. मन संसारप्रपंचा[illegible] काढून दुसरीकडे लावितां येत नाहीं काय? त्यावर त्यानें उत्तर दिलें कीं [illegible] क्वचित. मन ज्यांनीं आपल्या ताब्यांत ठेविलें आहे अशा [illegible] गोष्ट अगदीं निराळी. तो संसारांत असला काय व नसला [illegible] मुक्त आहे. खोटें आत्मसंयमन करून ह्मणजे आत्मसंयमना[illegible] जनतेला फसविणारीच मंडळी फार. ज्यांना संसार नको [illegible] ज्यांना संसार चालविण्याचें ज्ञान नसतें किंवा सामर्थ्य नसतें [illegible] संसाराचें लटांबर पडतें, व याच्या उलट ज्यांना संसार [illegible]. कर्तृत्वाची घमेंड असते त्यांचा संसार चालत नाहीं किंवा [illegible] प्रयत्न केला तर सर्व प्रयत्न व्यर्थ जाऊन अखेर आ[illegible] होतें अशी ईश्वराची अगाध लीला आहे! ती सर्व [illegible] आहे, असें तो ह्मणाला पण त्यावर मी ह्मणालों, [illegible]शिवाय संसार नसला तरी आपल्या भाऊबंदांचा आपण कां [illegible] नसला तरी सार्वजनिक हिताच्या

दृष्टीनें कांहींच विचार कां करूं नये? गीतेचा कर्मयोगाचा सिद्धांत तुमच्या मनास पटला नाहीं असें वाटतें. त्यावर तो ह्मणाला, अशा प्रकारच्या गोष्टी अगोदर समजत नसतात, कदाचित् समजल्या तर उमजत नसतात, आणि उमजल्या तरी स्वतःवर प्रसंग आला ह्मणजे मनुष्य त्याचा विपरीत अर्थ करून ते टाळण्याकरितां मनाचें समाधान करून घेतो! ही गोष्ट सुशिक्षित व अशि-क्षितांना सारखीच लागू आहे. इतकेंच नव्हेतर अशिक्षित मनुष्य एक वेळ मनोनिग्रह करील पण सुशिक्षितास मनोनिग्रह करणें बहुतेक कठीण आहे!! आपलेकडील जहाल व मवाळ यांच्यामध्यें फरक हाच आहे. सरकारपासून होणाऱ्या आपत्तीचा त्रास सरकारचे गोडवे गाऊन सरकारला वळवून तो चुक-विण्याचा एक प्रयत्न करतो व दुसरा आग्रहानें माझें ह्मणणें खरें आहे असें दांडगाईनें सांगून करावयास पाहातो. पण सरकार असें खमंग आहे कीं तें जहालांच्या दांडगाईला भीत नाहीं किंवा मवाळांच्या रडण्याला किंवा भिके-लाही भीक घालीत नाहीं. हें सर्व ठीक आहे. पण ह्या दोन वृत्तीपैकीं, जहाल वृत्तीमुळें मनुष्य ओजस्वी व कर्तृत्ववान राहतो व मवाळ वृत्तीनें मनुष्य रड्या बनतो एवढेंच! ह्मणून मवाळ वृत्ती टाकून जहालवृत्ती सर्वांनीं स्वीकारल्यास अंगांत करारीपणा तरी येईल व तिचा कधींतरी जय होईल. जहालवृत्तींत कर्तृत्व दाखविण्यास जशी सवड असते तशी मवाळ वृत्तींत नसते. ह्मणून कर्तृ-त्ववान मनुष्यानें आपलें कर्तृत्व आपल्या उपयोगी पडण्यासारखें नसलें तरी त्यानें आपलें मन विश्वकुटुंबी करून शक्त्यनुसार परोपकार करावा व आपल्या जीविताचें व कर्तृत्वाचें सार्थक करावें, पण कर्तृत्व ऊर्फ सामर्थ्य फुकट दवडूं नये, असें मला वाटतें. पुरुष जन्म कर्तृत्वाकरितां आहे, रडण्याकरितां नाहीं, हाच कर्म-योगाचा सिद्धांत आहे. अशा प्रकारच्या त्याच्या व माझ्या पुष्कळ गोष्टी होऊन मोठी करमणूक झाली. वेळ व रस्ता केव्हां निघून गेला. भोंवतालीं काय आहे हें मला मुळींच समजलें नाहीं. बाकी गाडी वारंवार धक्के देऊन आह्मांला उताणे पाताणे करून जागृत करीत होतीच! पण नावडतीचें मीठ आळणी याप्रमाणें आह्मी तिकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं!! येथील गाड्यांचीं चाकें लहान व बैल मोठे हत्तीसारखे यामुळें बसावयाची साटी नेहमीं उतरती असावयाची. यामुळें जरा धक्का लागला कीं, मनुष्य पडण्याची पाळी येई. पण मनुष्याचें मन रमलें ह्मणजे असेंच आहे. अखेर त्याचे गांवची वाट फुटण्याची वेळ आली व तो

जाऊं लागला. जातांना त्यानें मोठ्या कळकळीनें आपला पत्ता देऊन सांगितलें कीं, मी कराचीस राहातों. कराची शहर पाहण्यासारखें आहे. आह्मी मांसाहारी आहों, तरी तुमची व्यवस्था निराळी करूं. येथून पंजाब, लाहोर, पेशावर व काश्मीर येथें जातां येतें. हाही प्रदेश पाहण्यासारखा आहे. या योगानें तुमच्या-सारख्या बहुश्रुत मनुष्याला अतिशय आनंद वाटेल व आपल्या ज्ञानामध्यें भर-पडेल. सबब येण्यास चुकूं नका, मी वाट पाहात बसतों. वगैरे प्रेमाचा निरोप देऊन ते निघून गेले.

परत येण्यास पुन्हां चार दिवस लागले. ज्या गांवांतून गेलों त्याच गांवच्या रस्त्यावरून परत यावें लागल्यामुळें पुन्हां लिहिण्यासारखें कांहीं नाहीं. मांडवीपासून नारायण सरोवरापर्यंत चाळीस गांव आहेत. त्यांत अगदीं भिकारी असें गांव मला कोठेंही दृष्टीस पडलें नाहीं, सर्व लोक खाऊन पिऊन सुखी आहेत. पाऊस पडला नाहीं तर कच्छामध्यें उद्योग करण्यासारखा कांहीं एक नाहीं. पण सर्व लोक मुंबईस येऊन या स्थितीला पोहोंचले आहेत. हें महाराष्ट्रियांना लक्ष देण्या-सारखें आहे. 'काय करावें उद्योग नाहीं' असें ह्मणणारास हें गुजराथीमंडळ व्यापाऱ्याच्या दृष्टीनें गुरुस्थानीं आहे. आतां व्यापार हा महाराष्ट्रियांच्या आंग-वळणीं पडण्यास त्यांच्या स्वभावप्रकृतीला विरुद्ध आहे. तरी देशकालाप्रमाणें वर्तन जसें ते करीत आहेत त्याप्रमाणें त्यांनीं हीही कला हातीं घ्यावी. नारायण सरोवरची यात्रा ही अत्यंत प्राचीन आहे. बिंदु सरोवर हें सांख्यशास्त्राचे प्रवर्तक कपिल महामुनीपासून आहे. पंपा राम अवतारीं प्रसिद्ध झालें. त्यापूर्वीपासून तें क्षेत्र ह्मणून प्रसिद्ध होतेंच. पुष्कर अज राजापासून किंवा ब्रह्मदेवापासून आणि मानस आर्यांच्या मूळ स्वर्गांतलि वस्तीपासून प्रसिद्ध आहे. तसेंच नारायणसरो वर हें ज्यावेळीं कच्छ, रण व थरपारकर हे वालुकामय प्रदेश पाण्यांत (समु-द्रांत) होते त्यावेळेपासून प्रख्यात असावें. हल्लीं हें समुद्राचे कांठीं आहेच व त्या भोंवतींही वाळवंटें आहेत. ह्या समुद्रामध्यें हें गोडे पाण्याचें ठिकाण आहे. हा चमत्कार दाखविण्याकरितां ही यात्रा झाली असावी व यावर आलेल्या सत्त समुद्रांत गोड पाण्यांत राहणाऱ्या शेषावर येथें नारायणाची योजना झाली असावी. पूर्वीं येथें जलमय होतें व मध्यें हें बेटासारखें होतें असें दिसतें, व हा यात्रेपासून खात्रीचा शोध मिळण्यासारखा आहे.

परत आल्यावर मांडवीचे पोष्ट मास्तर हें महाराष्ट्र ब्राह्मण होते त्यांनीं

आग्रह केल्यावरून मी त्यांचेकडे उतरलों. बोट ज्या दिवशीं परत मुंबईस जाण्यास येईल असें ठरलें होतें, त्यादिवशीं ती यावयाची नाहीं असें समजलें. येथें निरानिराळ्या बोट कंपन्यांचीं ऑफिसें आहेत. त्यांत ज्या कंपनीची बोट यावयाची असेल त्या कंपनीची जाहिरात एक दिवस अगोदर लागते. त्यांना कराचीहून किंवा द्वारकेहून बोट सुटली म्हणजे तार येते. त्याप्रमाणें हे इकडे आपल्या ऑफिसांत जाहिराती लावतात. जाहिरातींत कोणत्या कंपनीची, कोणती बोट, कधीं, किती वाजतां येणार व कधीं, किती वाजतां सुटणार, मध्यें कोणतीं बंदरें करणार व त्यांचें भाडें काय यांचा खुलासा असतो. आमची बोट येण्यास उशीर होता सबब एक दिवस मला मांडवींत राहावें लागलें. व त्यामुळें मांडवी शहर पाहातां आलें. शहरामध्यें वस्ती अगदीं गच्च आहे. घरें बहुतेक दुमजली तिमजली आहेत. मोठे रस्ते मुळींच नाहींत. सभोंवार ताडभर उंचीचा कोट असून त्याला पांच सहा दरवाजे आहेत. सर्व शहर व्यापार उदीम यांनीं गजबजलेलें असतें. मुख्यतः येथें सोन्यारुप्याचें व जरतारीचें काम चांगलें होतें. यापुढें जास्त वस्ती वाढली ती कोटापासून बंदरापर्यंत वसलेली आहे. ही वस्ती मात्र चांगली प्रशस्त आहे. रस्ते मोठे असून हवा खेळती आहे. संडास बांधलेले आहेत. पण पाणी खारट मचूळ आहे वगैरे वर्णन मागें आलें आहेच. येथें एका गुजराथी ब्राह्मणाची खाणावळ आहे. हा जामनगरचा राहणारा होता. बोटीच्या जाण्यायेण्याच्या वेळीं कोणास भिशीमध्यें म्हणजे (खाणावळींत) यावयाचें आहे कीं काय असा तो तपास करीतच असतो. पुष्कळ गोष्टींचा विचार करितां केवळ धर्मशाळेंत उतरण्यापेक्षां खाणावळींतच उतरणें बरें असें वाटतें. कारण एकतर या बाजूला गोडें पाणी नाहीं. राहावयाला जागा, सिधासर्पण लांब गावांत मिळतें, सबब याच्या खाणावळींतच उतरावें हें उत्तम. याच्याकडे उतरल्यानें स्नानाची, कपडे धुण्याची, भोजनाची सर्व सोय होते व आपलें सामान बंदोबस्तांत राहातें. खाणावळींतील भोजनाचा रिवाज म्हणजे मुगाची खिचडी असते. ही स्वच्छ डाळीची नसते व आंत मसालाही नसतो. नुसते डाळ तांदूळ पातळसें उकडलेले असतात. ह्याशिवाय बाजरीची भाकर असते. एक भाजी, चटणी, लोणचें व थोडें ताक असतें. एकंदर अडचणीला ही सोयीची जागा आहे एवढेंच.

मी येतांना पोष्टमास्तरकडे उतरलों असल्यामुळें माझी सर्व प्रकारची चांगली सोय झाली, हें सांगणें नकोच. त्यांच्या येथें जागा फार प्रशस्त व ऐसपैस होती. त्यांच्या येथें उतरल्यामुळें या प्रदेशाची मला विशेष माहिती कळली. तुमचीं धार्मिक कृत्यें येथें कशीं होतात, श्राद्धपक्षाची व्यवस्था कशी होते, ब्राह्मण कोठें मिळतात, वगैरे प्रश्न मी त्यांस विचारिले. त्यांनीं सांगितलें कीं, येथेंही आपल्यासारखे विद्वान ब्राह्मण आहेत. त्यांस बोलावून आह्मीं धार्मिक कृत्यें करितों. यांचा आचार जरा निराळा आहे, तरी ते मांसाहारी नाहींत. महाराष्ट्राच्या दृष्टीनें मुख्य दोष पाण्याचा, पण तो या बाजूला पाण्याची कमताई असल्यामुळें किंवा कोणत्याही कारणानें ह्मणा, पाण्याला दोष नाहीं असें समजतात. ह्मणजे महाराष्ट्रीयांच्या दृष्टीनें हे सगळेंच निराळें होतें. हे लोक आपलेकडे जेवीत नाहींत, पक्की रसई तेवढी खातात. पक्की रसई ह्मणजे तळलेले भाजलेले पदार्थ खातात. पुरी लाडू, जिलब्या, ज्याला आपण पक्वान्न ह्मणतों ते ते पदार्थ हे खातात. भात भाज्या खात नाहींत. अज्ञानपणाच्या देशरिवाजानें या गोष्टी अद्याप राहिल्या आहेत. दुसऱ्या दिवशीं बोट दहा वाजतां आली आणि मी तेथून निघालों. परदेशांत स्वदेशींचा मनुष्य भेटल्यामुळें एक प्रकारचा विलक्षण आनंद कसा होतो त्याचा येथें मला प्रत्यय आला. त्या मंडळींना मी घरच्या सारखाच वाटलों व त्यांनीं माझा पाहुणचार करून मोठ्या सन्मानानें मला निरोप दिला !

मला येथून सोमनाथास जावयाचें होतें. सोमनाथाला वेरावळ बंदर आहे. तेथें ही बोट थांबतें किंवा नाहीं तो तपास केला, तेव्हां थांबते असें समजलें. पण मध्यें उतारल्यास भाड्याचा आकार विलक्षण जास्त पडतो. रेलवेचेंसुद्धां कांहींसें असेंच आहे. एकदम तिकिटापेक्षां मध्यें मध्यें उतरत गेल्यानें पैसे थोडे जास्त पडतात. पण त्यापेक्षां या बाबतींत बोटींचा फारच गोंधळ आहे. दिवस अखेरचे असल्यामुळें बोटी नियमीत वेळीं सुटत नाहींत. शिवाय ह्या बोटी मुख्यत: मालाच्या असल्यामुळें जेथें माल फार असेल, तेथेंच त्या बंदर करितात, केवळ उतारूंकरितां करीत नाहींत. टाईमटेबलाप्रमाणें ही बोट द्वारकेस लागणार होती व तेथें एक दिवस मुक्काम करून दुसरे दिवशीं निघावयाची होती, परंतु ती द्वारकेस लागलीच नाहीं ! एकदम वेरावळ बंदरास गेली. ह्या बाजूकडे उतारूकरितां कंपनीचे मचवे नसून खासगी आहेत. ते बोटीच्या

वेळीं माणसें आणतात व नेतात, पण त्याबद्दल माणसांकडून विलक्षण पैसे उपटतात. कांहीं सामान नसलें तरी आठ आणे खुशाल घेतात! कोंकण सिस्टिम-प्रमाणें कंपनीची येथें व्यवस्था होईल तर बरें होईल. कारण उतारूंपासून कंपनी जास्त पैसे घेते; मग मचवे कां नकोत? पण धन्याचा धनी कोण? असो. मी एकदाचा बोटींत बसलों व बोट चालूं लागली. मी ज्या बोटीनें इकडे आलों तीच ही बोट असून ती कराचीहून फिरली होती.

बोटींत बसल्यावर ओळखीचा किंवा देशसदृश सुद्धां मनुष्य नसल्यामुळें या लांबच्या यात्रेपासून व्यवहारिक फायदा काय, याचा विचार करूं लागलों. हा मरु देश आहे. यांतील सृष्ट-चमत्कार मेघ, धुकें, पर्जन्य, वारा, मृगजळ तसेंच डोंगर, पर्वत आपल्यापेक्षां निराळे आहेत. येथील हवा नजीक समुद्र असल्यामुळें इतर वाळवंटांपेक्षां फारच निराळी आहे. इतर वाळवंटांत नेहमीं उष्ण वारे सुटतात, पण येथें समुद्र जवळ असून तो दक्षिणेकडे असल्यामुळें तिकडून जसजसें हें वाळवंट तापेल तसतसे जोराचे थंड वारे सुटतात, यामुळें हवा फार पथ्यकारक असते. यांत मलेरियाचा मुळींच अंश नसतो. शिवाय ही हवा उष्ण असून येथें नेहमीं खारा वारा सुटतो. यामुळें उष्णतेचे विकार येथें मुळींच बाधत नाहींत व हवा फारच आरोग्यदायक आहे. इतकी कीं, क्षयाच्या विकाराचे रोगी येथील नुसत्या हवेनें बरे होतात. मी आलों त्यावेळीं अशा आजाराचे कांहीं श्रीमंत मनुष्य येथें हवा पालटण्याकरितां मुद्दाम आले होते. येथील माणसें, विशेषतः बायका जनावरें हीं अगदीं निरोगी व तुंद असतात. खुशाल भर बारा वाजतांसुद्धां उन्हांत चैत्र वैशाखांतसुद्धां हिंडत असतात व त्यांस त्याबद्दल कांहीं बाधा होत नाहीं. खारट पाणी किंवा मचूळ पाणी पचण्यास जड असतें असें म्हणतात, पण ती बाधा येथें मुळींच होत नाहीं. येथें गोडें पाणी नाहींच ह्मटलें तरी चालेल! कारण कच्छरण हा केवळ वाळूचा प्रदेश आहे. त्यांत निदान तीन चार पुरुष तरी खडक नाहीं. दर्याच्या पाण्याचा अंश असल्यामुळें व पाऊस फार पडत नसल्यामुळें पाणी नेहमीं खारें व मचूळ असतें. पण हें पाणी जनावरेंसुद्धां खुशाल पितात. शिवाय हें पाणी किती जरी गाळून घेतलें तरी त्यांतली रेती नाहींशी होत नाहींच. रेती नाहींशी न होण्याचें कारण धुळीकणासारखे रेतीचे कण हवेमध्यें नेहमीं तरंगत असतात! क्षणभर जरा भांडें उघडें राहिलें कीं त्यांत ते येऊन पडतात व

मनुष्याचे पोटांत जातात. हिमालयांतील नेपाळचे यात्रेंत सुद्धां अशीच रेती आहे, पण तिच्या योगानें बाधा होते तशी या रेतीच्या योगानें होत नाहीं. हें ह्या हवेमध्यें विशेष आहे.

या यात्रेंत मी समुद्र किनाऱ्याच्या वाळूंतून चाळीस कोस लांबीचा प्रदेश फिरून आलों, पण त्यांत दवाखाना कोठेंहि दिसला नाहीं किंवा बायका, मुलें, पुरुष कोणीही अशक्त किंवा रोडकीं दिसलीं नाहींत. लोक गरीब आहेत ह्मणून ह्मणावें तर तसेंही नाहीं. सर्वांचीं घरें चुनेगची आहेत. यावरून इकडे रोगराईचें मान कमी हेंच खरें. येथील हवा उष्ण आहे, पण त्यामुळें झाडें पानें करपत नाहींत व मनुष्यांना जनावरांना पाण्याचा सोख लागावा, सर्व अंतर्याम शुष्क व्हावें, नेहमीं थंड पाणी किंवा सोडा आईसची जरूरी लागावी पण ती येथें मुळींच लागत नाहीं. येथें मोठमोठ्या हॉटेलांतसुद्धां बर्फ मिळावयाचा नाहीं. मनुष्यानांसुद्धां फार तहान लागत नाहीं, हें मी स्वतः अनुभविलें आहे. जनावरांनासुद्धां एक वेळ दुपारीं १२ बारा वाजतां पाणी पाजलें ह्मणजे पुन्हां एक दिवसपर्यंत पाणी पाजावें लागत नाहीं. उंटांना तर त्यांच्या वयाप्रमाणें तीन चार दिवस पाणी मिळालें नाहीं तरी चालतें असें ह्मणतात. याचें कारण ही हवाच असावी, कारण ह्या हवेंतच ते जगतात. वाळवंटांत अशी हवा असण्याचें कारण असें दिसतें कीं, येथें पाऊस फार कमी, वर्षांतून सारा चार पांच दिवसच क्वचित पडतो. त्यामुळें वर्षांतील उष्णता किंवा थंडी यांचा संकोच किंवा विकास फारसा होत नाहीं व नेहमीं हवा सारखी असते. विषम हवा आजारी मनुष्यास बाधते. पण येथें विषम हवाच उत्पन्न होत नाहीं यामुळें ही हवा आजाऱ्यास फार पथ्यकर असते. हा हवेचा अनुभव ह्या प्रांतामध्यें हिंडल्याशिवाय कळणार नाहीं. ही यात्रा बंदराजवळ असती तर लोके बंदरावरून लवकर परत गेले असते आणि यात्रेचें महत्व कळलें नसतें. सबब ही यात्रा बंदरापासून थोडी थोडकी नाहीं, चाळीस कोस लांब ठेविली आहे. ह्मणजे निदान चार दिवस जाण्यास व चार दिवस येण्यास मिळून आठ दिवस लागून हवेचा अनुभव कळेल.

याप्रमाणें मला याचा चांगला अनुभव आला व फायदाही झाला. इतर यात्रेमध्यें माझी प्रकृति खालावत असे, पण येथें खाण्यापिण्यास चांगलें न मिळतां प्रकृति उत्तम राहिली. मलेरियाचे किंवा उष्णतेचे विकार मुळींच झाले नाहींत,

हा या यात्रेचा परिणाम आहे असें मी समजतों. मलासुद्धां सिंहगड, महाबळेश्वर, माथेरान यापेक्षां ही हवा उत्तम वाटली व येथें आणखी कांहीं दिवस तरी रहावें असें वाटलें. ज्याला अनुकूलता असेल त्यानें येथें बायका मुलांसह राहून अनुभव घ्यावा. येथें या प्रांतांत अलीकडच्या काळच्या सुधारणा नाहींत, यामुळें मन रममाण होणार नाहीं. शिवाय जाणेयेणेचीं चांगलीं साधनें नाहींत. बोटी आहेत, पण त्या अनियमीत आहेत व कधीं कधीं वादळामुळें बंदही असतात. पण शहरी हवेमुळें किंवा अतीशय दगदगीनें ज्यांची प्रकृति खराब झाली असेल, ज्यांना असाध्य क्षयरोग झाला असेल अशांनीं मांडवी बंदरांतच राहावें, फार आंत जाऊं नये. ह्या अत्यंत मोकळ्या हवेचा त्यांच्या प्रकृतींत आठ दिवसांनीं बदल झालेला वाटेल. येथें मोठें पोष्ट ऑफिस व तार ऑफिस असल्यामुळें त्यांच्या व्यवहारास अडचण पडणार नाहीं. शिवाय या यात्रेचा उद्देश ह्या मरु देशांत आसपास वीस मैलांत गोडें पाणी नसून तें येथें अगदीं समुद्रकांठीं आहे- हाही एक चमत्कारच आहे. दर्याचें सान्निध्य असून व दर्यांत खडक नसून नुसत्या वाळूंत हें आहे हें विशेष आहे. खुद्द समुद्रांतसुद्धां गोडें पाणी आढळतें, पण तेथें खडक असतो तसें येथें नाहीं. हा अगदीं दर्याचा किनारा आहे व सिंधू नदीचा व समुद्राचा संगम आहे ह्मणून या तीर्थाला विशेषत्व प्राप्त झालें आहे, आणि हें कच्छाचें टोंक असल्यामुळें येथल्या हवेशीं वादळाचा संबंध असला पाहिजे, तसा तो दिसतोही. येथें बंदरांत बोटीवरून सुटलेले मचवे अनियमीत वाऱ्यानें बुडून अनर्थही झाले आहेत पण बहुधा वादळ होत नाहीं ह्मणून पाऊसही पडत नाहीं, हा मोठा चमत्कार आहे. ह्या उष्ण हवेचा एक मात्र परिणाम सर्व लोकांवर घडतो तो हा कीं, येथील लोक काळे आहेत. सप्त समुद्राचे पोटांमध्यें या सरोवरावर श्रीविष्णू येथें तपःश्चर्या करीत राहिले ह्मणून तेही काळे झाले असावे असें दिसतें! बायका उन्हांत हिंडत नाहींत ह्मणून त्या काळ्या नसतात. चांगल्या सशक्त, बांधेसूद शरिराच्या व गोंडस राहातात, ह्मणून लक्ष्मीही तशीच सुंदर राहिली! तसेंच हिमालयावर बर्फांत शिव राहिले, ह्मणून ते पांढरे कर्पूरगौर झाले! असें स्थानमहात्म्याशीं वर्ण साद्दश्य असतें असें दोघांनीं दाखविलें आहे. हिमालयाचे अगदीं विरुद्ध येथें परिस्थिति आहे. हवा पाण्याचा कडकपणा येथें मुळींच नाहीं. यामुळें येथें सौम्य देवतेची स्थापना झाली असावी, आणि लोकही यामुळें सौम्य आहेत पण मतलब सोडणारे नाहींत!

अशा रीतीनें ही यात्रा मला सुखावह झाली व पैसे खर्च झाल्याचें कांहीं वाटलें नाहीं. यानंतर मी

## सोरटी सोमनाथ

येथें जाण्याकरितां निघालों. हें बारा ज्योतिर्लिंगापैकीं एक आहे. ज्योतिर्लिंगांपैकीं हें एवढेंच एक राहिलें होतें. त्याची यात्रा करून दर्शनानें मन पवित्र करून आपली सर्व यात्रा संपवूं ह्मणजे झालें.

याची पौराणिक कथा अशी आहे:—पूर्वी ब्रह्मदेवाचा मानसपुत्र दक्षप्रजापति यानें आपल्या साठ मुलींपैकीं सत्तावीस सोम राजाला ह्मणजे चंद्राला दिल्या. त्यांपैकीं फक्त रोहिणीवरच तो जास्त प्रेम ठेवूं लागला. अर्थात्‌ह्मां चंद्र प्रत्येक फेरीला रोहिणीजवळून जितका जातो तितका दुसऱ्या नक्षत्रांजवळून जात नाहीं! हें इतर मुलींस सहन न होऊन त्यांनीं त्याबद्दल आपले पित्याजवळ गाऱ्हाणें केलें. तेव्हां दक्षानें चंद्रास सर्व जणींवर सारखें प्रेम करणेंविषयीं उपदेश केला. पण त्यानें तो ऐकिला नाहीं. तेव्हां, तूं क्षयी होशील असा त्याला शाप दिला त्याबरोबर चंद्रास क्षय रोगानें ग्रासिलें. त्यानें ह्याबद्दल पुष्कळ उपाय केले पण ते निष्फळ झाले. अखेरीस तो ब्रह्मदेवास शरण गेला. त्यानें त्यास तूं सौराष्ट्र देशांत प्रभास क्षेत्रीं शिवलिंग स्थापन करून त्याचें ध्यान कर ह्मणजे शिव प्रसन्न होऊन तूं शापमुक्त होशील असें सांगितलें. त्याप्रमाणें चंद्रानें सहा महिने तपःश्चर्या करितांच त्यास प्रत्यक्ष शंकरानें दर्शन देऊन सांगितलें कीं, जरी दक्षाचा शाप नष्ट होण्यासारखा नाहीं तरी माझ्या कृपेनें तूं महिन्यांतून कांहीं दिवस चांगला व कांहीं दिवस ह्या रोगानें युक्त असा होत जाशील असा वर मिळतांच चंद्रानें हर्षयुक्त होऊन आपण स्थापिलेल्या लिंगांत पूर्णांशानें राहण्याबद्दल शंकरास प्रार्थना केली. ती शंकरांनी मान्य करून आपण त्या लिंगांत अंतर्धान पावले.

या पौराणिक कथेचा सारांशसुद्धां ह्या हवेवर क्षयी बरे होतात असें अनादिसिद्ध आहे, त्याप्रमाणें हल्लीं अनुभवही येत आहे. क्षयी लोक कछ काठेवाडांत येऊन बरे होऊन जाऊं लागले आहेत. क्षयी मनुष्यानें सिंहगड, महाबळेश्वर, लोणावळें, वगैरे हवेच्या ठिकाणीं जाण्यापेक्षां येथेंच येऊन राहावें, हें त्याच्या फायद्याचें आहे.

सोमनाथ हें जसें पुराणप्रसिद्ध आहे तसेंच इतिहासांतही फार प्रसिद्ध आहे. हिंदुस्थानच्या इतिहासांत ज्या घनघोर लढाया झाल्या त्यांपैकींच सुलतान महंमदानें सोरटी सोमनाथावर शेवटची स्वारी करून येथून अपार संपत्ती नेली. सोरटी सोमनाथ हें सर्व रजपुतांचें मुख्य दैवत होतें. ज्यानें त्यानें विजय मिळवून चढाओढीनें ह्याला द्रव्य व बहुमोल वस्तु नजर केल्या होत्या. त्यामुळें अनंत काळापासून ही संपत्ति एकत्र झाली होती. या ठिकाणीं आसपासच्या राजेरजवाड्यांनीं श्रीशंकराला लक्ष्मीच्या सहवासांत ठेविलें, पण मूळचाच जो कफल्लक व संपत्तीनें मोह न पावणारा त्याला हें कसें रुचणार! राजेरजवाड्यांना ही संपत्ति नको होती, त्यांना ती व्यापार धंद्यास लावतां आली नाहीं ह्मणून त्यांनीं देवाला दिली. देव ह्मणतो, मी कफल्लक, मला काय करावयाची! माझ्या आशिर्वादानें तुह्मांला ती मिळाली व ती तुह्मी मलाच परत केलीत ह्मणून ज्याला हवी होती त्याला मी ती दिली!! शंकर ह्मणतात, माझ्या आशिर्वादानें भक्त पाहिजे तर श्रीमंत होतील, पण त्या संपत्तीचा मला दिमाख नको. ह्मणून या संपत्तीला त्रासून सर्वस्वाचा त्याग करून ही स्वारी पळून गेली!! व मग सर्व संपत्ति मुसलमानांनीं नेली किंवा त्याला दिली ह्मणजे फिरून ती इकडे यावयास नको. याचें तात्पर्य, दानधर्म झाला तरी एके ठिकाणीं असा करूं नये. अशानें त्यावर अशीं अरिष्टें येतात. संपत्तीचे अनिष्ट परिणाम, चैन, दुर्व्यसनें, मिजास व आपसांतील भांडणें, यांनीं आपले लोक बिघडून गेले आहेत. त्यांची सुधारणा व्हावी ह्मणूनच महादेवानें हें केलें असेंच ह्मणावें लागतें. संपत्तीचें नादांत तुह्मी राहिल्यामुळें व तिकडे तुमचें मन गर्क झाल्यामुळें तुमचें सामर्थ्य जात चाललें आहे. जागे व्हा, हें ह्या महंमुदानें त्यांना एकदां नाहीं सतरा वेळां स्वाऱ्या करून दाखविलें आहे. या स्वाऱ्यांनीं महंमुदानें ह्या ठिकाणची संपत्तीच नेली इतकेंच नाहीं तर या ठिकाणचें लोकही बाटवून येथील बहुतेक जनता मुसलमान केली आहे! अशी सर्व बाजूंनीं प्रसिद्ध अशी यात्रा करावयाची राहिली होती, ती जातां जातां करण्याचा निश्चय करून मी वेरावळ बंदरीं उतरलों.

येथेंही कंपनीचे मचवे नव्हते. मजजवळ फार ओझें नव्हतें, तरी मचवेवाल्यानें आठ आणे भाडें सांगितलें! अर्ध्या फर्लांग अंतरावर एवढें भाडें बरोबर नाहीं. बोटीवरील तिकीट मास्तरांनींही याला चार आणे द्या असें सांगितलें तरी तो ऐकेना. उलट मास्तरासच त्यानें कचकावलें. आह्मी कंपनीचे

नोकर नाहीं असें ह्मणून तो चालता झाला! तेव्हां मास्तरानें सांगितलें, तुह्मी मालाच्या पडावावर बसून जा. पण तोही पडाववाला ह्मणाला, हा पडाव मालाचा आहे, माणसांचा नाहीं. मी त्यांत माणूस घेणार नाहीं! सर्वांचें एकच मत तेव्हां निरुपायानें दुसऱ्या मचवेवाल्यास आठ आणे भाडें देऊन जावें लागलें. व्यर्थ एक तास वेळ मात्र फुकट गेला! मचवेवाले मात्र फार हुशार असतात. मचवे, पुरुष दीड पुरुष उंचीवरून पाण्यांत भरतीचे लाटेनें बोटीजवळ नाचत असतात, आणि बोटीची उंची पाण्यापासून सुमारें दहा बारा फूट असते. बोट हालत नसते, पण मचवेवाल्यांचा जीव मात्र ठिकाणावर नसतो. बोटीवरून उतरण्यास कंपनीचे चांगले जिने असतात, पण या बोटीवर चांगलीशी शिडीसुद्धां नव्हती, कशीतरी दोरीची होती. कधीं कधीं नुसती दोरीच लावितात!! शिडी किंवा जिना लाविला ह्मणजे तो अगदीं मचव्यापर्यंत जाऊन पोहोंचतो. श्रेष्ठ दर्जाचे पॅसेंजर नसले ह्मणजे बहुधा जिना लावीत नाहींत. ते ह्मणतात, मचव्याचे आदळण्यानें कदाचित् आमचा जिना मोडेल! पण जिने हे माणसांचे सुखाकरितां केलेले असतात, नुसते त्यांचें रक्षण करण्याकरितां नसतात. परंतु मागाहून तक्रार करून त्याचा काय उपयोग? शिड्या किंवा जिने हवेतसे खालींवर होतात व त्या योगानें उतारणांची मोठी सोय होते.

अशा भयंकर प्रसंगांतसुद्धां मचवेवाले टोळधाडीप्रमाणें बोटीवर मचवा लागतांच एकदम बोटीवर उड्या घालतात व प्रवाशाच्या ट्रंका, पेट्या, बोचकीं, किती जरी मोठीं असलीं तरी खांद्यावर घेऊन भराभर उतरतात. जो तो आपल्या मचव्यांत जास्त पॅसेंजर घेऊन पैसे मिळविण्याची धडपड करतो. धन्य आहे त्यांची! स्टेशनवरील टांग्याप्रमाणेंच हा धांगडधिंगा असतो. ज्यानें हा देखावा कधींच पाहिला नाहीं त्याचें धाबेंच दणाणेल. उतारूंना नुसते उतरण्याचीच पंचाईत. मग खलाशी हाताला धरून कसें तरी उतरून मचव्यांत त्यांना एकदां गाठोड्यासारखें फेंकून देतात! तरी ह्यापेक्षां अशा भयंकर प्रसंगीं मचव्याच्या डोलकाठीवर चढून तेथून आडव्या शिडाच्या काठीवर चढून उपडे पडून दोन्ही हातांनीं व पायांनीं मोठें जाड लोंबत असलेलें शीड गुंडाळून चटकन बांधणाराची शिताफी फारच अवर्णनीय आहे! सामान्य मनुष्यतर तोंडांत बोटच घालून आश्चर्यचकीत होतो. मचवा लाटांनीं जोरानें हालत असतो, त्यापेक्षां डोलकाठी जास्त हालत असते, शीड वाऱ्यानें फडकत असतें, वारा

जोरानें पाण्याला, होडीला व माणसाला लोटीत असतो. तरी अशा संकटसमयीं न गडबडतां व न घाबरतां मन स्वस्थ ठेवून आपलें नियमित काम करणाराची योग्यता मोठमोठ्या योग्यांपेक्षांसुद्धां खचीत अधिक आहे असें स्पष्ट ह्मणावें लागतें !! अशा खलाशांना ब्रिटिश लोक अजाणते व अशिक्षित ह्मणोत पण त्यांच्यांतसुद्धां इतके धाडशी लोक कोठें दिसत नाहींत. असो. हीच बोट एक दिवस त्या बंदरांत माल चढविण्याउतरण्याकरितां मुक्काम करून दुसरे दिवशीं त्याचवेळीं नक्की निघणार होती, अशी कप्तानांना विचारून खात्री करून घेतली होती. येथून सोरटी सोमनाथ जवळच ह्मणजे दोन मैलांवर आहे. तेथून एक दिवसांत देवकार्य करून परत यावें, असें मी ठरविलें. कारण ही बोट चुकली तर पुन्हां पांच सहा दिवस दुसरी बोट मिळणार नव्हती. पण यामुळें गिरनार पर्वत, तेथील दत्तस्थान व जैनांचीं लेणीं हीं पहावयाचीं राहिलीं. बाकी आतां बोट चुकली असती तरी हरकत नव्हती. वेरावळपासून रेल्वे होती पण रेल्वेनें विनाकारण वेळ व पैसा जास्त खर्च होतो व मला घाई होती ह्मणून मी याच बोटीनें मुंबईस यावयाचें ठरविलें.

मचव्यांतून मी धक्यावर उतरलों. लगेच कस्टमचे लोक आले. वेरावळ बंदर हें जुनागडच्या नबाबाच्या ताब्यांत आहे, ह्मणजे परराष्ट्रच आहे. ह्मणून सामानाची तपासणी, शारिरीक तपासणी होऊन शिवाय दरमाणशीं आठ आणे कर द्यावा लागतो. हा कर एकदां देऊन चालत नाहीं, जातांनासुद्धां द्यावा लागतो. काय जुल्म हा ! नुसत्या राज्यांत येऊन जाण्याबद्दल हा विशेष कर आहे. बोटींतून येण्यास दुसरे मचवेवाल्यास चार आणे द्यावयाचे ठरविले होते. ते चार आणे व कर आठ आणे मिळून बारा आणे द्यावयाचे, पण मजजवळ सुटे पैसे नव्हते ह्मणून मी एक रुपाया दिला व चार आणे परत मागितले. तर मचवेवाल्यांनीं ठीक आहे असें ह्मणून रुपाया खिशांत टाकला व त्यानें कराची पावती आणून देऊन तो निघून गेला. कारकुनाजवळ तक्रार केली तर कारकून ह्मणाला बरोबर आहे. बोटींतून येण्यास मचवेवाल्याचा आठ आणेच दर आहे !! काय करतां ! परदेश आणि अडाणी व आडदांड मुसलमानांशीं प्रसंग !! हा सुटे पैसे न ठेवल्याचा दंड आला !!! हे सर्व विधी झाल्यावर मी बंदराबाहेर आलों. रेलवे अगदीं बंदरापर्यंत आली आहे. पण ही व्यवस्था फक्त

मालाकरितां आहे. माणसांचें स्टेशन येथून दोन फर्लांगावर आहे. येथून मालाची ने आण करण्याकरितां रेलवेचीं येथें गुड्स ऑफिसें आहेत. येथून सोमनाथ दोन मैल आहे तेथें जाण्यास घोड्याची ट्रामही होती पण मध्यें रस्त्याची दुरुस्ती चालल्यामुळें मध्यें मध्यें उतरावें लागे. ह्या ट्रामनें गेलें तर भाडें माणशीं एक आणा पण ही ट्राम गांवाबाहेर पोहोचविते, इच्छिल्या ठिकाणीं पोहोचवीत नाहीं. मला गांवची माहिती नसल्यामुळें नारायण सरोवरावरून मी उतरलों होतों. तेथून सोमनाथास उतरण्याकरितां एका गृहस्थावर मी चिठ्ठी आणली होती. मग ट्रामला एक आणा देऊन तेथून मजूर केला तरी तो चार आणे घेणार, शिवाय तुटके सडकेचे मध्यें मध्यें खाडे आहेतच त्यांतून ओझें घेऊन गेलें पाहिजेच. त्यापेक्षां एक टांगा केला त्यानें माणशीं आठ आणे घेतले पण तो मार्ग मी पसंत करून मी इच्छिल्या ठिकाणीं बिनतक्रार जाऊन पोहोचलों. ती वेळ सूर्यास्ताची होती.

घरांतले मालक पर ठिकाणीं भिक्षुकीला गेले होते. तरी त्यांच्या घरच्या बायकांनीं माझी व्यवस्था केली. तेथून सोमनाथाचें देवालय गांवाबाहेर दोन फर्लांग होतें. मी संध्याकाळीं पांच वाजतां तेथें पोहोचलों होतों. तरी घरच्या वृद्धबाई ह्मणाल्या, सोमनाथाचें दर्शन व प्रभास तीर्थांत स्नान करावयाचें असल्यास मजबरोबर चला. अनायासें सोमवार प्रदोषाची वेळ असून त्या दिवशीं प्रदोषही होता. सबब मी फारसा विचार न करितां निघालों.

देंवळाजवळ येऊन देवळाचे आवारांत शिरलों. तेंथें सोमनाथाच्या पुजाऱ्याची पाटी दृष्टीस पडली. त्याच्या नांवावरून तो दाक्षिणी ब्राह्मण होता असें पाहून मी त्याच्या घरांत शिरलों. घरांत शिरतांच एक वयोवृद्ध गृहस्थ देवाची पूजा अर्चा करीत मोठ्या थाटानें बसले होते. त्यांच्या जटा व दाढी वाढून त्या पूर्ण पिकल्याही होत्या. मी आंत जाऊन त्यांस नमस्कार केला व पाटीवरच्या नांवाचे गृहस्थ आपणच काय? ह्मणून विचारलें. तेव्हां ते गृहस्थ ह्मणाले, या घराचा मालक मी नाहीं, तुह्मी ह्मणतां ते गृहस्थ देवळांत शंकराची प्रदोष पूजा करावयास गेले आहेत; मी एक यात्रेकरू आहे. नंतर मी देवळांत गेलों. देऊळ अगदीं लहान व आंत सरासरी लहान पिंडी होती व बाहेर जवळ एक दोन असामी बसलेले होते. सोमनाथ महादेवाचें हेंच स्थान काय? असा मी

येथील लोकांस प्रश्न केला. तेव्हां त्यानीं सांगितलें कीं, हें मुख्य स्थान नव्हे. मुख्य स्थान खालीं भुयारांत आहे. मुसुलमानांच्या हल्ल्यांच्या बचावाकरितां इकडील बाजूची शिवालयें हीं अशींच भुयारांत ठेवून नुसत्या देखाव्याकरितां वर लिंगाची अशी स्थापना केलेली असते. कदाचित् मुसलमानांचा सोटा फिरलाच तर त्याचेवरच फिरावा. म्हणजे मुसलमानांची समजूत होऊन हिंदूंच्या देवस्थानांचेंही रक्षण होईल. उज्जनीचा महांकाळेश्वर आणि आंवळ्या नागनाथ हीं दोन शिवस्थानेंही अशींच भुयारांत आहेत. मी भुयारांत गेलों तेव्हां शंकराची प्रदोषपूजा आटोपून आरती चालली होती. भिक्षुक, यात्रेकरू वगैरेंची अगदीं गर्दी होती. साळुंका दोन हात उंचीची गंडकी शिळेची अगदीं गुळगुळीत तेजस्वी होती. तिला सर्वांनीं आपआपल्या परी वाटेल तेथें आडवें गंध लावून व फुलें वाहून पूजा केली होती. देवाला काय, भक्त जेथें जेथें इच्छा करील तेथें त्याचें तोंड आहेच! आरत्यांच्या घोषामुळें सर्व भक्तांची एकतानता झाली होती असें दिसलें. अशावेळीं देवदर्शन झालें हें मी महत्-भाग्य समजतों. मंत्रपुष्प झाल्यावर रीतीप्रमाणें तीर्थप्रसाद वाटला व पुजारी बोवा घरीं आले. यात्रेकरू मंडळी मारवाड, गुजराथ, व बंगाल प्रांताची दृष्टीस पडली. दाक्षिणी, कर्नाटकी किंवा तेलंगी मंडळी दृष्टीस पडली नाहीं. पुजाऱ्यानें आम्हास येथेंच उतरण्यास सांगितलें. अर्थात् माझी इष्ट ती सोय झाल्यामुळें मी आपलें पाकीट त्या गुजराथी बाईला इकडे पाठवून देण्यास सांगितलें. तिनें कबूल करून तें पाठवूनही दिलें. बोटींत मी स्नान करीत असें, त्याप्रमाणें सकाळीं केलें होतें तरी अशा पावन क्षेत्रीं येऊन स्नानाशिवाय अमंगल राहणें योग्य नाहीं असें समजून मी येथून जवळच म्हणजे पाऊण मैलावर प्रभास गंगा आहे तेथें स्नानास गेलों. जशी कुरुक्षेत्र ही भारतियांची रणभूमि आहे तशीच सोमनाथपट्टण उर्फ प्रभासपट्टण हीही यादवांची रणभूमीच आहे. कुरुक्षेत्र व प्रभासपट्टण यांत एवढाच फरक कीं, कुरुक्षेत्र व पानिपत येथें एकमेकांच्या शत्रूंचीं डोकीं फुटलीं व प्रभासपट्टण येथें आपसांतील मंडळीचीं डोकीं फुटलीं! प्रसिद्ध आपसांतील यादवी म्हणतात ती ह्याच प्रभासपट्टणीं झाली. स्नानास रात्र झाली होती, म्हणून तेथील रमणीय देखावा दिसला नाहीं. दुसरे दिवशीं सकाळीं पुन्हां येथें आलों तेव्हां येथूनची सर्व शोभा दिसली.

ज्या वाळवंटावर यादवी माजून यदुकुळाचा संहार झाला, तें हें वाळवंट पाहून

व त्या वेळच्या देखाव्याचें स्मरण होऊन मन उद्विग्न झालें. तो काल निघून गेला, पण तो समुद्र, ती नदी, तें वाळवंट व त्या लव्हाळयाच्या गवताचे वंशज अद्याप शिल्लक आहेत. त्या सर्वभक्षक काळाला अद्याप या ठिकाणीं किती भक्ष्य मिळणार आहे हें कोणाला ठाऊक ? सर्व यादव येथें कालवश झाले हें पाहून बळीराम तेथून जरा लांब ठिकाणीं जाऊन समाधिस्थ झाले. त्यावेळीं त्यांचे तोंडांतून निघालेला प्राणरूपी शेष ( सर्प ) किंवा संकर्षण ह्याच समुद्रांत शिरून पाताळीं गेला. श्रीकृष्ण हे नारायण स्वरूपी व बळिराम हे शेष स्वरूपी होते व ते भूभार हरण करण्याकरितांच आले होते. त्याप्रमाणें त्यांनीं तो करून अवतार समाप्ती. येथें केली. श्रीकृष्णानें जेथें देह ठेविला तें ठिकाण भटकुंड ह्या नांवानें येथें प्रसिद्ध आहे. तें ह्या ठिकाणापासून जरा लांब आहे. " ज्याचा मृत्यु ज्या ठायीं । तो तेथें जाय आपुल्या पायीं " अशी ह्मण आहे, ती येथेंही लागू पडते. श्रीकृष्ण हे क्षत्रिय होते. क्षत्रियास मरण शस्त्राघातानेंच आलें पाहिजे, तरच तो मुक्त होतो पण कृष्णावर शस्त्र कोण चालविणार ! आणि जरी चालविलें तरी त्याच्या सुदर्शनापुढें व योगसामर्थ्यापुढें त्याचा काय पाड लागणार ? पण ईश्वरी सूत्र असलें ह्मणजे

" दैवो दुर्बलतां गते तृणमपि प्रायेण वज्रायते "

असें ह्मणतात तेंच खरें होतें. वेळ आली ह्मणजे ठेंच लागून देखील प्राण जातो. गवतसुद्धां वज्राप्रमाणें मारक होतें. फार काय ज्याला आपण जीवन ( पाणी ) ह्मणून ह्मणतों, त्याचा ठसका लागूनसुद्धां प्राण जातो ! हें आपण नेहमीं पाहातों. अवतार समाप्तीची वेळ आली आहे, हें जेव्हां श्रीकृष्णाला समजलें तेव्हांच त्यानें बलरामासुद्धां सर्व यादव प्रभासतीर्थीं नेले तेथें ऋषीशापानें सर्वांचा अंत झाला, हें त्यांनीं पाहिलें. आतां तोच शाप आपुली आहुती घेण्याची वाट पाहात आहे असें जेव्हां त्यांनीं पाहिलें तेव्हां त्यांनीं त्याचा अनादर केला नाहीं. पण त्यांचेजवळ दिव्य अस्त्रें व ईश्वरी दिव्य शक्ति असेपर्यंत त्यांच्यावर कालाचा अंमल चालला नाहीं. व्यवहारांतसुद्धां हीच रीत आहे. मनुष्य सरकारी नोकर असतां त्यानें गुन्हा केला तर त्याजवळ सरकारी काम असेपर्यंत त्याला सरकारी पोलीसांससुद्धां पकडतां येत नाहीं. पोलीसास पकडावयाचें असल्यास प्रथम त्याच्या वरिष्ठ ऑफिसरास सांगून त्याजकडून

सरकारी काम काढावें लागतें. त्याचप्रमाणें दिव्य अस्त्रांवर यमराजाची सत्ता नाहीं. ती सत्ता फक्त सामान्य देहावर आहे. सबब इष्टकार्य झाल्याबरोबर देह, कालवश करण्याकरितां श्रीकृष्णानें आपलें शंकचक्र सुदर्शनादि चतुरायुधें व अक्षय्य वनमाला यांचा त्याग केला. तेव्हां ती शक्ति व आयुधें यांचें तेज स्वर्गांत गेलें. हीं सोडण्याच्यापूर्वीं श्रीकृष्णानें अर्जुनास बोलावून त्यालाही दिलेली आपली दिव्य शक्ति त्याच्यापाशीं पाणी मागून तें आपल्या तोंडांत घालण्यास सांगितलें, व त्यायोगें त्याची ती दिव्य शक्ति काढून घेतली. याप्रमाणें आपल्या पश्चात आपल्या नांवावर कोणीही वाटेल तसे आचरट अत्याचार करून सृष्टिक्रमाचा बिघाड करूं नये असें केलें. इतकें झाल्यावर श्रीकृष्णाचा देह प्राकृत मनुष्याप्रमाणें राहिला. तेव्हां यःकश्चित व्याधाच्या बाणानें तो कालवश झाला! कृष्णावतार संपूर्ण झाल्यावर अर्जुनाची सुद्धां हीच स्थिती आली.

> तऽएवामि बाणा स्तदपि हरलब्धं धनुरिदं ॥
> सएवाहं पार्थः प्रमथित सुराराति निचयः
> इमास्तास्ता गोप्यो हरिचरण चित्तैक शरणाः
> ह्रियंते गोपालैर्विधिरपि बलीयान्नतुनरः ॥ १ ॥

असें अर्जुन खेदपूर्वक म्हणतो—अरे! तेच ना हे माझे बाण! तेंच ना हें शिवापासून प्राप्त झालेलें गांडिव धनुष्य!! तोच ना हा मी प्रत्यक्ष अर्जुन कीं, ज्यानें दानवासुद्धां सर्वांचा संहार केला! आणि ही सर्व जुनी सामग्री असतां, तसेंच कृष्णाच्या पायांशीं ज्यांचा एकभाव अशा त्या महापुण्यवान गोपी या वनचरांनीं-गुराख्यांनीं मला करपटाप्रमाणें मानून माझ्या समक्ष चोरून न्याव्या काय? आणि मला त्याचा प्रतिबंध करितां येऊं नये! तस्मात् दैव दुर्बल झालें असतां मनुष्यांचा आपल्या पौरुषाविषयीं अभिमान सारा खोटा पडतो हेंच खरें! अर्जुनाची दिव्य शक्ति गेल्यावर त्याचें नेहमीचें कृष्णस्मरण गेलें व त्या ठिकाणीं प्राकृत मनुष्याप्रमाणें त्याला दैवाचा प्रभाव दिसूं लागला! आपल्या देहाला कालस्पर्श डाव्या पायाच्या आंगठ्याला होणार आहे, हें श्रीकृष्णाला आत्मज्ञानानें व योगसामर्थ्यानें पूर्वींच समजलें होतें. सबब त्यानें भारतीयुद्धामध्यें

लढण्याचा भाग घेतला नाहीं. कारण न जाणो, चुकून बाण जर त्या ठिकाणीं लागला तर देह कालवश होईल व अवतार कृत्य तसेंच राहील! सबब त्यानें कोणाशींच युद्ध केलें नाहीं. तरी संसर्गानें बाण अंगाला लागणारच. पण प्रत्यक्ष बाण मारणें निराळें व चुकून लागणें निराळें. पण चुकूनसुद्धां लागू नये म्हणून युद्धसमयीं फक्त युक्ती सांगण्याकरितां, युद्ध निरीक्षण तर प्रत्यक्ष केलें पाहिजे म्हणून त्यानें सारथ्याचें काम पतकरलें होतें. यामुळें त्याचे पाय खालीं निर्धास्त राहिले व त्याचा रथ त्याला युद्धाच्या महत्वाच्या प्रत्येक मोऱ्याच्या जागीं ताबडतोब नेतां आला व त्यामुळें तो यशस्वी झाला.

कृष्णाचें मरण त्याच्या डाव्या पायाच्या आंगठ्यांत आहे, हें फक्त अभिमन्यूला माहीत होतें. दुसऱ्या कोणास नव्हतें. सुभद्रा अभिमन्यूचे वेळीं गर्भार असतां कृष्ण व सुभद्रा यांच्या रात्रीं निजण्याच्या वेळीं सहज भावी भारताच्या म्हणजे लढाईच्या गोष्टी चालल्या होत्या. कृष्ण गोष्टी सांगत होते व सुभद्रा होकार देत होती. अशा रीतीनें गोष्ट युद्धाच्या ऐन रंगाची म्हणजे चक्रव्युहाची चालली असतां सुभद्रेला झोंप लागली व गोष्टीचा हुकारा निराळा आला तेव्हां कृष्ण घाबरला. त्याला वाटलें आपली ही गुप्त गोष्ट कोणी ऐकिली कीं काय नकळे कारण हा हुकारा सुभद्रेचा नाहीं. असें पाहून कृष्णानें युद्धाची गोष्ट तशी ठेवून आंतल्या प्राण्यास विचारिलें, तूं कोण आहेस? तेव्हां मी तुझा शत्रू आहे असें त्यानें सांगितलें! तर माझें मरण कशांत आहे तें सांग! असें कृष्णानें विचारिलें. तेव्हां त्यानें तुझ्या डाव्या पायाच्या आंगठ्यांत आहे असें सांगितलें. तेव्हां श्रीकृष्ण घाबरले व त्यांनीं तो लहान असतांच भारतीय चक्रव्युहांत अडकवून व अर्जुनास स्यमंत पंचकांत गुंतवून त्यांस कौरवांकडून मारविलें. कारण रात्रीं निजतांना चक्रव्युहांत जाण्याचा मार्ग मात्र त्याला समजला होता. चक्रव्युहांतून कसें निघावें हें कृष्णानें सांगितलें नसल्यामुळें प्रसंगीं तो गडबडून मेला! यावेळीं अर्जुनाकडून त्याचें संरक्षण होऊं नये म्हणून त्याला घेऊन आपण स्यमंतक पंचकाकडे गेला. अशा रीतीनें त्याला दिव्यशक्तीची मदत न झाल्यामुळें तो मेला. तात्पर्य, या युद्धांत कृष्णालासुद्धां फार सावधगिरीनें वागावें लागलें. हा अस्तनींतला अग्नी जर पेटता तर सर्व अवतारकृत्य फुकट गेलें असतें.

ज्या ठिकाणीं श्रीकृष्णाचा देह कालवश झाला त्या ठिकाणीं हल्लीं त्याची मूर्ति किंवा देऊळ बांधलें नाहीं, तर पुण्यपुरुषाप्रमाणें केवळ त्याच्या पादुका ठेविल्या आहेत. म्हणजे त्यांचें देवत्व जाऊन मनुष्यत्वदर्शक खूण ठेविली आहे हें विशेष आहे. आपण जी पूजा करितों ती देहाची किंवा दगडाची नसून त्याच्या दर्शनानें आपले मनांत जें तेज किंवा भावना उत्पन्न झाली असते, त्याची असते. आपण श्रीकृष्णाचें देऊळ बांधितों त्यावेळीं दिव्य आयुधासुद्धां त्याचें दर्शन होतें, नुसतें दर्शन होत नाहीं. मनुष्याला आपल्या देहाकडून जसजशीं बिकट कार्यें करावयाचीं असतील तसतशीं त्याचें रक्षण करण्याकरितां मनुष्यानें आपल्या तपःश्चर्येनें व सामर्थ्यानें दैवी शक्तीचीं चिलखतें त्यावर घातलीं पाहिजेत. अशा चिलखताशिवाय देहाचें रक्षण होणार नाहीं. हीं चिलखतें तपःश्चर्येनें प्राप्त होतात. ही तपःश्चर्या कोणाची पूर्व जन्मीची असते, कोणाची या जन्मीची असते. महत्कार्य करण्याकरितां पूर्वजन्मीची तपःश्चर्या श्रेष्ठ असावी लागते. म्हणजे त्याप्रमाणें जन्म होऊन तेजस्वी शरीराची व मनाची प्राप्ती होते. व तींत ह्या जन्मीची भर टाकावी लागते. श्रीकृष्णानें अशीच तपःश्चर्या केल्यामुळें ऋषींकडून, अग्नीकडून व शंकराकडून हीं दिव्य आयुधें व दिव्य शक्ति त्याला प्राप्त झाली होती! ह्मणून ती शेवटपर्यंत टिकली, नाहींतर या दिव्यांतून पार पडणें कठीण होतें. ही तपःश्चर्या कोणी आपल्या आराध्य देवतेची, किंवा इष्टकार्य देवतेची एक निष्ठेनें आराधना करून सिद्धी होईपर्यंत त्यास मिळवावी लागते. पुंडलिकानें पितरांची आराधना करून परमेश्वरावरसुद्धां अधिकार चालविला होता. सावित्रीनें पतीची आराधना करून प्रत्यक्ष मृत्युलाही (यमालाही) जिंकिलें. मनुष्य जागा—सावध असेल तर आलेल्या प्रसंगांतून त्यास कसें तरी प्रयत्नानें कदाचित् पार पडतां येईल, पण आकस्मित प्रसंग येतात त्यांचें निवारण पूर्वपुण्याशिवाय होतच नाहीं.

वने जने शत्रु जलाग्निमध्यें
महार्णवे पर्वत संकटे वा
सुप्तं प्रमत्तम् विषम स्थिति वां
रक्षन्ति पुण्यानि पुरा कृतानि

मनुष्य एकाएकीं घोर अरण्यांत क्रूर श्वापदांच्या तडाक्यांत सांपडला असतां, अकस्मात् शत्रूंनीं त्याला गराडा दिला असतां, अकस्मात् घराला आग लागली असतां, पर्वतावर, पाण्यांत, भयंकर संकटकाळीं, निद्रावश झाला असतां बुद्धिभ्रंश झाला असतां, किंवा यापेक्षां भयंकर अडचणींत संरक्षणास अशक्य अशा स्थितींत सांपडला असतां, त्याचें रक्षण त्याच्या पूर्वपुण्याईनेंच होतें. दुसरे कशानें होणें शक्य नाहीं.

आरंभिलेल्या कार्यापुरती तपःश्चर्या केली असल्यास कार्य सिद्धीस जात• मध्येंच तपःश्चर्या संपली तर कार्याचा बिघाड होऊन तपःश्चर्या फुकट जाते. तपःश्चर्या जास्त झाल्यास कार्यसिद्धि होऊन राहिलेली पुढें उपयोगी पडते किंवा तिनें कार्याचें सुख अनुभवितां येतें. कार्य करीत असतां थोडाबहुत अन्याय हा व्हावयाचाच, आणि त्यामुळें निरपराधी लोकांस इजा व्हावयाचीच त्याचे शापापासून रक्षण करण्याकरितां या तपःश्चर्येचा चांगला उपयोग होतो. इलींच्या मंडळीमध्यें ह्या तपःश्चर्येचा पूर्ण अभाव असल्यामुळें त्यांच्. करण्यास, बोलण्यास किंवा विद्वत्तेस तेज येत नाहीं.

मनुष्याला वाईट स्थिती येण्याला बुद्धिभ्रंश व्हावा लागतो, मग ती बुद्धि कोणत्याही ऐश्वर्यानें जावो. त्याप्रमाणें श्रीकृष्णाच्या आश्रयामुळें सर्व यादव कुळ उन्मत्त झालें होतें. मनुष्य उन्मत्त झाला ह्मणजे तो प्रथम गुरुजनांची, देव-धर्माची निंदा व थट्टा करूं लागतो. त्याप्रमाणें यादवांनीं आपल्यापैकीं श्रीकृष्णाच्या सांब नांवाच्या मुलाला गर्भारीचें सोंग देऊन त्यांनीं या क्षेत्रीं ध्यानस्त बसलेल्या ऋषींची थट्टा करण्याकरितां त्याला पुढें करून प्रश्न विचारिला कीं, मुनी महाराज, या मुलीला मुलगा होईल किंवा मुलगी होईल ? ऋषींनीं अंत• र्ज्ञानानें जाणलें कीं, हे यादव श्रीकृष्णाच्या आश्रयामुळें उन्मत्त होऊन आपल्या सारख्यांची थट्टा करूं लागले आहेत. यांची रग उतरलीच पाहिजे असें ह्मणून त्यांना राग येऊन त्यांनीं त्यांना शाप दिला कीं, याला जें होईल त्यानें तुमच्या कुळाचा नाश होईल ! तेव्हां सर्व यादव घाबरले व त्यांनीं त्याचे पोटाशीं लोखंडाचा तुकडा बांधला होता तो काढला व यापासून आपणाला इजा होऊं नये ह्मणून तो पाण्यामध्यें उगाळून घासून घासून पाण्यांत त्याचा नायनाट केला ! बाकी राहिलेला तुकडा जो उगाळतां येईना तो तसाच फेंकून दिला. याच्या घासण्यानें जो लोखंडाचा अंश पाण्यांत पडला होता. त्याचे हे लव्हाळे

बनले. लव्हाळे हें नांव सुद्धां लोहावळे ह्मणजे लोखंडाच्या अंशाचे किंवा लोखंडाचे बनलेले, अशा अर्थानेंच त्यांना मिळालें आहे. पुढें हें वर्तमान श्रीकृष्णास समजलें. तेव्हां त्यानें अवतार कृत्य संपूर्ण व्हावयाची वेळ आली आहे, असें पाहून त्या शापाबद्दल ऋषींचे आभारच मानिले. ह्मणजे श्रीकृष्ण उन्मत्त झाले नव्हते, अज्ञानी यादव मात्र उन्मत्त झाले होते. ती संहाराची वेळ आली तेव्हां सर्व यादव येथें आले व दारू प्याले आणि त्यांनीं ते लव्हाळे उपटून एकमेकांना मारिले व त्यामुळें ते मेले! त्या लव्हाळांना तितक्या पुरतें ऋषीशापानें वज्रत्व प्राप्त झालें होतें. आणि तें तसें प्राचीन काळापासून होतही आलें आहे. हिरण्य कश्यपूची उक्तीही पुढें दिली आहे.

यत्राऽकुंठित दंति दंत मुसलान्या चूर्णितान्याहवे
धारा यत्र पिनाकपाणि परशोराकुंठिता वक्षसि
तन्मेतावदुरो नृसिंव्ह करजै—र्व्यादीयते सांप्रतं
देवो दुर्बल तागते तृणमपि प्रायेण वज्रायते ॥१॥

माझें शरीर इतकें वज्रदेही होतें कीं, त्यावर मारलेले मोठमोठे हत्तींचे सुळे मोडले. शंकराच्या परशूची धार बसली इतकेंच नव्हे तर देवांचीं सर्व आयुधें बोथट झालीं. तें माझें वज्रदेही शरीर यःकश्चित नृसिंहाच्या नखांनीं विदारलें जात आहे. यावरून दैव दुर्बल झालें असतां (आपली सद्दी सरली असतां) गवतालासुद्धां वज्रत्व येतें असें ह्मणतात तें खरेंच. असें झालें असतांना त्याचा प्रतिकार करून कांहीं उपयोग होत नाहीं. नारदांनीं रावणालासुद्धां त्याचा अंतकाळ प्राप्त झाला असतां असेंच सांगितलें आहे.

गतःस कालो यत्रासन् देवा सेवानुवर्तिनः।
दशानन दशाम् पश्य तरंति दृशदोऽभसा ॥

हे रावणा, तूं देवांना बंदींत घातलें होतेंस तो तुझा वैभवाचा काळ गेला. आतां तुझा काळ फिरला आहे. हे पहा दगडसुद्धां पाण्यांत तरताहेत (राम दगडाचा सेतु बांधून येत आहे.) तेव्हां सावध हो!

त्या प्रभासाच्या खाडीमध्यें आतां क्वचित लव्हाळे आहेत पण ते त्यांचेच वंशज आहेत. हे लव्हाळे ह्मणजे कांहीं निराळ्या प्रकारचे आहेत असें नाहीं.

नेहमीं दृष्टीस पडतात तसेंच लहान मोठे आहेत व त्यांची जाडीही तशीच आहे. कदाचित् समुद्र मागें हटल्यामुळें खाऱ्या पाण्यानें त्यांची ही स्थिति झाली असेल. अशा रीतीनें सर्व यादवांचा संहार झाला. यादवांनीं जो लोखंडाचा तुकडा घासून नदींत टाकिला होता तो फार चकाकत असल्यामुळें एका माशानें तो गिळला. त्याला एका धींवरानें पकडलें. त्यानें तो मासा कापला तेव्हां त्याच्या पोटांतून तो लोखंडाचा तुकडा निघाला. तें तेजस्वी व उंची लोखंड पाहून त्यानें आपल्या बाणास लाविलें व तोच बाण श्रीकृष्ण निज-धामाच्या वेळीं पायावर पाय ठेवून या अशाश्वत जगाचा विचार करीत पडले असतां त्या व्याधाला तीं हरणाचीं शिंगें आहेत असें वाटून त्यानें तोच बाण सोडला, तो श्रीकृष्णाच्या नेमका डाव्या पायाच्या आंगठ्यामध्यें मर्मस्थानीं लागला. तेव्हां श्रीकृष्ण व्यथित होऊन सामान्य मनुष्याप्रमाणें ओरडले तेव्हां व्याध धाऊन येऊन त्यांनीं श्रीकृष्णाचे पाय धरले, व त्याची क्षमा मागितली. परंतु ईश्वरी नेमीत्तरच असें होतें, अशी त्याची उलट समजूत करून त्यावर श्रीकृष्णानें कृपा केली. रामअवतारांतला हा वाली होता. त्यानें अशा प्रकारचा देवाचासुद्धां सूड उगविला. ह्मणजे वेड्यावांकड्या केलेल्या गोष्टीचा परिणाम जरी त्यावेळीं बाधला नाहीं तरी कालांतरानें बाधतोच. रामानें सुग्रीवाच्या नादानें व कपटानें त्याला मारलें होतें याबद्दल वालीनें हा सुडाचा शाप दिला होता. असो. श्रीकृष्णाच्या इच्छेप्रमाणें व क्षत्रिय धर्माप्रमाणें श्रीकृष्णाचा देह शस्त्रा-घातानें कालवश झाला. अशा रीतीनें ऋषिशापानें सर्व यादवांचा अंत ह्या क्षेत्रीं झाला.

या क्षेत्रांत दुसरीं देवळें, धर्मशाळा होत्या त्यांचा नाश मुसलमानांनीं केला त्यांचे अवशेष मात्र जिकडे तिकडे दिसतात. त्यांत हल्लीं एका उंचवट्यावर एक कनकादित्याचें ( सूर्याचें ) देऊळ मात्र थोडें सुस्थितींत आहे. मी आंत गेलों तेव्हा भोंवतीं सूर्याच्या दिशा फाकतात, त्याप्रमाणें भिंतीवर सूर्यनारायणाचें चित्र रंगवून मध्यें श्रीनारायणाची शंखचक्रगदायुक्त मूर्ति बसविली होती. अशीं देवळें येथें बारा होतीं असें ह्मणतात व त्यांपैकींच एक मूर्ति कोंकणांत आडिवऱ्याजवळ कनकादित्य येथें एका भक्तानें नेली असें ह्मणतात. त्याचें वर्णन याच भागांत आडिवऱ्याचें यात्रेंत केलें आहे. पण या दोन्ही मूर्तींत फारसें साम्य दिसत नाहीं.

श्रीकृष्ण निजधामास जेथें गेले तें भटकुंड, वेरावळ बंदर व प्रभासपट्टण यांचेमध्यें सडकेपासून जरा बाजूला आहे. त्या ठिकाणीं आतां अरण्य वगैरें कांहीं नाहीं. श्रीकृष्णाचें देऊळ नसून तेथें फक्त त्याच्या पादुका आहेत, असें मागें लिहिलें आहेच. ह्मणजे त्यावेळींसुद्धां त्याला प्रत्यक्ष देवाचा मान मिळाला नाहीं. ह्या ठिकाणींच काय पण कुरुक्षेत्रांतसुद्धां जेथें प्रत्यक्ष श्रीकृष्णांनीं गीता सांगितली, तेथेंसुद्धां श्रीकृष्णाचें देवालय नाहीं. त्याकाळीं एखाद्याचें हल्लींप्रमाणें देवालय स्थापून स्मारक करणें असेल तेव्हां तेथें तें देवालय शंकराचेंच बांधीत असत. कुरुक्षेत्रांत जें शंकराचें स्थान आहे, त्यास स्थानेश्वर ह्मणतात आणि येथें त्यास सोमनाथ ह्मणतात. पण हें तर्थि कृष्णावतारापूर्वींचेंच आहे, याबद्दल मागें चंद्राची कथा आली आहे. कृष्ण अवतार येथें संपूर्ण झाल्यामुळें त्याला आतां विशेषत्व आलें आहे एवढेंच. श्रीकृष्णाला परमेश्वराचा पूर्ण अवतार ह्मणतात ह्मणजे मनुष्यच ह्मणतात, प्रत्यक्ष परमेश्वर ह्मणत नाहीं हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. यावरून असा बोध होतो कीं, मनुष्यांनीं आपली शक्ति, युक्ति व सामर्थ्य वाढविलें तर तें परमेश्वराच्या कर्तृत्वाजवळजवळ पोहोंचतें. याचाच अर्थ ‘ नर करणी करे तो नरका नारायण होय ’ हा आहे. हा काळ यज्ञप्रधान होता, तो संपून पुढें बौद्धकाल सुरू होऊन भागवत धर्माचा प्रसार झाला, तेव्हां हिंसात्मक यज्ञ बंद होऊन याच विभूतींचीं देवळें बांधू लागले.

ही भूमि पानपतप्रमाणें रुधिरप्रिय आहे. हिनें प्रथम यादवांचें रक्तप्राशन केलें. नंतर गिजनीच्या महंमुदाचे वेळीं हिला अशीच आहुती मिळाली व हें क्षेत्र तेव्हांपासून मुसलमानांकडे गेलें. तें अद्याप जामनगरच्या नवाबाकडेच आहे. मुंबईत हिंदु मुसलमानांचा १८९३ सालीं मोहरममध्यें दंगा झाला. त्यानंतर येथेंही ह्याच जागीं हिंदू मुसलमानांची मोठी मारामारी झाली, यात्रेकरूंचींसुद्धां डोकीं फुटलीं ! या दंग्याचा प्रादुर्भाव महाराष्ट्रांत रत्नागिरी, भिंवडी, विजापूर येथेंही झाला होता पण त्याचें पीक तेथें रुजलें नाहीं. तो दंगा शमल्यास आतां बरींच वर्षें झालीं. अशी ही संहारक देवता शंकर आहे, ह्मणून अशा युद्धभूमीच्या ठिकाणींसुद्धां शंकराचीच स्थापना करीत. मराठेसुद्धां लढाईच्या हल्यांत हरहर महादेव असें ह्मणून हल्ला चढवीत व यशस्वी होत असत.

ही जागा तीर्थाची करण्यांत आर्यांचा हेतु या जागेच्या स्थानिक महत्वा-

कडे गेला असला पाहिजे. वेरावळ हें द्वारकेप्रमाणें काठेवाडचें एक टोंक आहे. हें अगदीं समुद्र किनाऱ्यावर असल्यामुळें या हवेचा वादळाशीं संबंध आहे. शिवाय समुद्राकडून शत्रूचा सामना आल्यास त्यास तोंड देण्याची तयारी ठेविली पाहिजे ह्मणून येथें लोकांचा जमाव जमला पाहिजे, या जागेचा अभिमान सर्वांस राहिला पाहिजे. सबब येथें महाक्षेत्र बनविलें.. ह्मणजे बाराही महिने येथें लोक जमावे व प्रसंग विशेषीं त्यांचा उपयोग व्हावा असाही त्यांत राजकीय हेतु असावा. तो हेतु सोडला तरी हें वाळूचें मैदान असल्यामुळें येथील खारी हवा फारच प्रशंसनीय आहे. समुद्राकडून दक्षिण बाजूनें जी हवा येते तिला कोठेंही प्रतिबंध नसल्यामुळें हिंदीमहासागरांतील निर्दोष हवेचा पुरवठा येथें होतो. यामुळें क्षयासारखें हट्टी रोगसुद्धां येथें बरे होतात. व अशा रीतीनें ते बरे झाले ह्मणजे परमेश्वर प्रसादानें ते बरे झाले असें ह्मणतात आणि यांत कांहीं वावगें नाहीं. अशीं ठिकाणें परमेश्वर प्रसादानेंच उत्पन्न झालीं आहेत. सुशिक्षित मनुष्य हा मान सृष्टीकडे देतो, त्याचा देवावर विश्वास बसत नाहीं. अशिक्षिताचा बसतो, यामुळें येथें देवतेची स्थापना झाली आहे. सारांश धार्मिक विधीनें वागल्यानें अकल्पिक कल्याण असें होतें.

सोमनाथाचें आवार साधारण मोठेंच दिसलें पण देऊळ अगदीं लहान दिसलें. यावरून हें इतिहासप्रसिद्ध देवालय नसावें असें वाटलें. ह्मणून चौकशी केली, तर तें हें देऊळ नाहीं असेंच ठरलें. जुन्या देवळाचा आतां चौथरा मात्र शिल्लक राहिला आहे. तो तेथून जरा लांब आहे तो तेथीऌ लोक दाखवितात. हा चांगला प्रशस्त, मोठा व सुंदर आहे. काशीविश्वेश्वराप्रमाणें ह्या देवाची प्रार्थना भक्तानें केली तेव्हां त्यानें मी हल्लीं विद्यमान असलेल्या स्वयंभू स्थानांतच यापुढें प्रगट झालों आहे, सबब त्याचीच तुह्मी पूजाअर्चा केली ह्मणजे ती मला पोहोचेल, असा दृष्टांत दिला. तेव्हांपासून मूळ सोमनाथाची पूजा करावयाची ती आतां याच देवाची करतात.

वेरावळ बंदर श्रीमंत लोकांचें आहे. बंदरावर अगदीं मुंबई शहरासारखीं घरेंदारें व वस्ती आहे. पांच पांच सात सात मजली मोठमोठ्या धनत्तर इमारती आहेत आणि त्याही अगदीं एकाला एक लागलेल्या, सुंदर व भव्य आहेत. बंदरही नेहमीं मोठमोठीं गलबतें, होड्या व मचवे यांनीं अगदीं गच्च

भरलेलें असतें. येथें मुंबईप्रमाणें बोटी मात्र दिसल्या नाहींत. रेलवे स्टेशनावर उतारूंची गर्दी व बंदरावर मालाचीही अशीच असते. आतां मुंबई इतकी येथें नाहीं, तरी मुंबई बंदरासारखाच मला येथें भास झाला. शहरांत जाऊन शहर पाहण्यास जावयाचें होतें पण तितका वेळ नव्हता. बोटीचा वेळ झाला होता. म्हणून आम्ही बोटीचीं तिकिटें काढून पडावांत बसलों. जातांनासुद्धां माणशीं आठ आणे कर दिला. पडावाबद्दल असेच पैसे खलाशास द्यावे लागतात. माझ्याबरोबर एक श्रीमंत गृहस्थ होते. त्यांना समुद्राचा अनुभव नव्हता. मचव्याचे जोरानें खालीं वर होणें, धसक्यासरशा लाटा पडावांत येणें अशा दंगलींत बोटीवर चढणें याचा भयंकरपणा पाहून त्यांचें धाबें दणाणलें. त्यांच्याजवळून खलाशानें पुष्कळ पैसे उपटले, तरी मजजवळ आणखी तो मागत होताच. कारण त्यांचे हातांतच माझें सामानाचें पाकीट होतें. पण दोघां मिळून हे पैसे दिले आहेत, असें त्यांजकडून त्यांस सांगून त्यांना घालविलें. नंतर मी आपले फाळणीचे पैसे श्रीमंतास परत दिले. ते श्रीमंत होते व जिवापुढें त्यांस पैशाची पर्वा नव्हती हें खरें, पण त्यांना बोटीचा अनुभव नसल्यामुळें हा नेहमींचा सुखसोहळा त्यांस विशेष भयंकर वाटला! हे गारोड्यासारखेंच झालें! या प्रवासांत गिरनारचें दत्तमंदीर व त्या वरचीं जैन मंदिरें पाहणें राहिलीं. ज्याला सवड असेल त्यांनीं तीं अवश्य पहावीं.

मी ज्या पुजाऱ्यांकडे उतरलों होतों, तेथें मागें सांगितलेले श्रीमंत यात्रेकरू ते हेच. त्यांची महिना मिळकत तीन चारशें रुपये होती. त्याची गृहणी इह लोक सोडून गेली होती. तेव्हांपासून त्यांनीं दाढी मिशा व जटा वाढविल्या होत्या. व त्या दाढी मिशांनीं वयपरत्वें आपला रंगही यजमानाप्रमाणेंच पांढरा व तेजस्वी केला होता. यजमानही वृद्ध पण श्रीमंतीस योग्य असे तेजस्वी होते. डोळे घारे होते यामुळें त्यांत विशेष भव्यपणा आला होता. त्यांचे मुलगे सुशिक्षित होऊन आपआपल्या उद्योगास लागले होते. व हे आतां संसाराचे साक्षीभूत होऊन राहिले होते. यामुळें यांची धर्मावर विशेष निष्ठा होती. हे शाक्त होते. हे यात्रेला जरी गेले तरी त्यांचें देवतार्जन मोठें होतें. तीं सांगशीभर सुंदर चांदीचीं उपकरणीं, गंध, पुष्प, अक्षता, नेहमीं जवळ बाळगलेलीं सुगंधी फुलें व पत्री इत्यादि साहित्य भपकेबाज असून श्रेष्ठ पितांबराचें किंवा कदाचें सोवळें, रुद्राक्षमाळा, वगैरे बाह्य थाटमाट फार प्रेक्षणीय व मनमोहक होता. पण

पाण्याला बाट नाहीं. पाणी पाक आहे असा त्यांचा महाराष्ट्रीयां विरुद्ध समज होता, याचें मला आश्चर्य वाटलें! पाणी जर सर्वांना शुद्ध करतें तर तें अपवित्र कसें? असा त्यांचा उत्तर हिंदुस्थानाप्रमाणें समज होता. त्यावर त्यांचें व माझें पुष्कळ बोलणें झालें. पाणी हें स्वतः शुद्ध आहे व दुसऱ्याचा दोष काढून टाकणारें आहे, ह्मणजे मलापह आहे, ही गोष्ट सर्वांना कबूल आहे. पण याच करितां अगदीं थोड्या संसर्गानें तें ताबडतोब बिघडतें, व शुद्धीच्या दृष्टीनें अस्पृश्य होतें!! पांढरा कपडा जसजसा जास्त शुभ्र असेल तसतसा त्याला डाग लवकर पडतो, तसेंच पाण्याला शुद्ध स्पर्श किंवा घाणीचा स्पर्श झाला किंवा नुसता संसर्ग झाला असतांना त्याच्या मल घेण्याच्या धर्माप्रमाणें तें लवकर बिघडतें, अर्थात अपवित्र होतें. पाण्याला प्रत्यक्ष स्पर्श केला नाहीं तरी अपवित्र ठिकाणीं ठेविलें किंवा त्याच्या संगती राहिलें तरीसुद्धां त्यांत अपवित्रपणा येतो. त्याचा सुवास किंवा कुवास त्याला ताबडतोब लागतो. सबब ज्या पवित्र मनुष्याला आपणांस अशुद्ध पदार्थाचा स्पर्श होऊं नये किंवा वारेंही लागू नये अशी इच्छा असेल त्यानें अशुद्ध स्पर्श झालेल्या पाण्याला शिवूं नये हेंच उत्तम.

कोणी ह्मणेल त्यांनीं हातपाय स्वच्छ धुऊन आणल्यावर काय हरकत आहे, तर हरकत मानणाराला आहेच. कारण आपलें शरीर ह्मणजे धातूचें भांडें नव्हे. प्रतिक्षणीं त्यांतून मल, व दुर्गंधी वायूचें विसर्जन होत असतें. अर्थात पाण्यासारख्या शीघ्र ग्राहक पदार्थांत तो सद्गुण किंवा दुर्गुण लवकर उतरतो. सबब निर्मळ राहणाऱ्या मनुष्याला तें दूषणीयच आहे. याच दृष्टीनें एकाच मनुष्यानें स्नान करून आणलेलें, पारोशानें आणलेलें व शौच शुद्धीपूर्वी आणलेलें पाणी यांतही फरक मानण्यांत येतोच व तो रास्तही आहे. एका मनुष्याची ही अवस्था मग भिन्न संसर्गी मनुष्याची गोष्ट निराळी असलीच पाहिजे. स्पर्शास्पर्शासंबंधानें अलीकडे जो वाद माजला आहे, त्याचें कारण परकियांच्या सहवासानें आमचें जुनें सोंवळ्या ओंवळ्याचें धोरणच आमचें आह्मांस समजेनासें झालें आहे. आह्मीं तें पूर्ण विसरून गेलों आहों इतकेंच नव्हे तर आमचे पुढारी अस्पृश्यता हें हिंदुधर्माला लांच्छन आहे, असा उपदेश करूं लागले आहेत! पण ज्यांनीं अस्पृश्यता प्रथम काढली ते यांच्यापेक्षां कितीतरी पटीनें शहाणे विचारी होते. कांहीं झालें तरी शूद्र व अतिशूद्र हे विराट पुरुषाचा एक अवयव असल्यामुळें व्यवहारानुसार त्यांची योजना विराट पुरुषाचे पायाच्या ठिकाणीं

कल्यामुळें समाजाला त्यांची. फार जरूर आहे यांत शंका नाहीं. कारण पायांत सामर्थ्य नसेल तर पंगू समाज नुसतें काय करणार? पायदळ नसेल तर सेना काय लढणार, हें त्यांना समजत नव्हतें असें नाहीं. त्यांनीं त्याचा कधींही अव्हेर केला नाहीं. व तेही आपल्या स्थितीला कधीं कंटाळले नव्हते. पण परक्यांच्या चिथावणीनें पोट व अवयव यांच्या गोष्टीप्रमाणें त्यांना चढवून आपल्या समाजरूपी शरीराचा नाश मांडला आहे. शुद्धतेची जरूर असते. तेव्हां पाय व हात वारंवार अशुद्ध होत असल्यामुळें ते एकसारखे धुऊन पुसून स्वच्छ ठेवण्याची रीत पडली. गुह्येंद्रियेंही त्याच्या घाणीच्या सहवासामुळें तीं सर्व शरीरापासून वस्त्राआड करून अस्पृश्य ठेविलीं जातातच व त्या दृष्टीनें मलमूत्र उत्सर्गाचे व मृत पशूंचे व्यवहार करणारे आरोग्याच्या दृष्टीनें समाजानें व धर्मानें अस्पृश्य मानिलें यांत गैर काय आहे? व त्यांचा काय द्वेष केला? घाणीचा व्यवहार करणाराला घाणीच्या पदार्थांचें महत्व वाटत नाहीं. एकाच बऱ्या वाईट स्थितींत राहाणाराला ती स्थिति आंगवळणी पडून त्याच्या आरोग्याला अपायकारक होत नाहीं. पण शुद्ध व सुगंधी पदार्थांच्या संगतींत राहाणाराला ती घाण अत्यंत वाईट असून त्याच्या मेंदूस अपाय करणारी आहे. याचें विवरण जास्त करावयास नको. आपल्याच मलमूत्राचा हात जर इंद्रिय श्रेष्ठ डोळ्याला लागला तर तेसुद्धां बिघडतात, मग गोमुत्रानें त्याची शुद्धि करावी लागते. याच दृष्टीनें समाजाच्या आरोग्याच्या दृष्टीनें त्यांनीं तसतशी अस्पृश्यता ठेविली होती. स्पर्शास्पर्शाचा विचार मुख्यतः ब्राह्मणच करीत असत. पण अस्पृश्यतेची गोष्ट अगदीं गैर आहे, असें पाश्चात्य आह्माला शिकवितात व आमचे पुढारी माना डोलवितात. पण तेच युरोपियन आमच्याशीं परंपरेनें अस्पृश्यता कां राखतात! व प्लेगसारख्या सार्थीच्या दिवसांत तर नेटिवाशीं भाषणही करण्याची त्यांची तयारी कां नसते? मग स्पर्शाची गोष्ट कशाला? नेटिवाच्या आंगचा वारासुद्धां आह्माला अपवित्र करील, ह्मणजे नुसत्या वाऱ्याबद्दलसुद्धां त्याच्या आंगचे जंतु आपल्याकडे येतील व आपल्याला दूषित करतील असा त्यांचा हल्लीं समज आहे. यांत आणि अति शूद्राची सावलीसुद्धां घेऊं नये असें प्राचीनांनीं कांहीं प्रसंगाकरितां ठरविलेलें होतें त्यांत काय फरक? आह्मी हल्लीं अस्पृश्याशीं जो संबंध ठेवीत आहों तितकाही पाश्चात्य आमचेपाशीं ठेवीत नाहींत. यापेक्षां दुसरें गैर काय आहे! याच्या बुडाशीं त्यांचा आमच्याशीं जितका द्वेष आहे

तितका आमचा अस्पृश्यांशीं खचीत नाहीं. तसेंच ते जे अस्पृश्यतेला बाह्यात्कारी कारण दाखवितात तें जंतु शास्त्रही आहेच, आणि याच तत्वावर आमची अस्पृश्यता उत्पन्न झाली आहे व ती हल्लींच्या शास्त्र दृष्टीनेंही सशास्त्र आहे.

ह्या अस्पृश्यतेसंबंधानें थोडक्यांत समजुती करितां एक गोष्ट सांगितली ह्मणजे खात्री होईल. हात, पाय, तोंड व गुह्येंद्रियें हीं आपलींच असतात, पण शुद्धतेसंबंधानें दोन्ही हात अगदीं स्वच्छ धुतले तरी उजव्या हातानें वाढलेला पदार्थ व डावे हातानें वाढलेला पदार्थ यांत फरक कां मानावा? सर्व अवयव अगदीं उंची साबू लावून धुतले असले तरी नाकांत, तोंडांत बोट घालून तेंच बोट खाण्याच्या पदार्थास लाविले तर कोणासही (पाश्चात्यांसही) खपावयाचें नाहीं. मग खाकेंतून किंवा गुह्येंद्रियांतून किंवा पार्श्व भागांतून स्पर्श केलेल्याची गोष्ट तर बोलावयासच नको. शुद्धतेच्या करितांच मुख्यत्वें गुह्येंद्रियाचें वस्त्रानें नियमन करण्याची व तीं वस्त्रें नेहमीं धुण्याची वहिवाट पडली असावी. ह्मणजे तीं इंद्रियें मूळ भागापासून नेहमीं अस्पृश्य राहावीं हाच त्याचा उद्देश आहे. निरंतर मलमूत्र विसर्जन हांच त्यांचीं कामें असल्यामुळें ते भाग अस्पृश्य ठेवले आहेत. मग त्याची कितीही शुद्धता झाली तरी त्यानें त्यांचें अस्पृश्यत्व नाहींसें होतें नाहीं, असें सर्व मानतात.

अपानंमृत्सहस्रेण धौतंचास्यं कथं भवेत ॥

बृहती हजारों वेळां माती लावून किंवा साबू लावून हवी तशा पद्धतीनें तिची शुद्धता केली तरी तिला तोंडाची पवित्रता कशी येईल? वस्तुतः तोंड व बृहती हीं दोन्हीं शारीर कार्य करणारीं द्वारेंच आहेत. मग असा भेद कां? याचें जें उत्तर तेंच अस्पृश्यतेचें आहे. अस्पृश्यतेमुळें जातिद्वेष उत्पन्न होतो हें ह्मणणें अगदीं खोटें आहे. अस्पृश्यतेसंबंधानें ठिकठिकाणीं बराच उहापोह केल्यामुळें हें पुराण आतां पुरें करितों. बाकी ही पाश्चात्यांची भेदनीति किंवा आमच्या समाजांत फूट पाडण्याची युक्ती आहे. पण ती आमच्या अस्पृश्य मंडळीस समजत नाहीं व आमच्या शहाण्यांस त्यांची समजूत घालतां येत नाहीं व त्यांचीही होत नाहीं त्याला काय करावें? मागें स्वराज्यामध्यें ही अस्पृश्यता यापेक्षां तीव्र होती नाहीं तरी आमचा कोणता व्यवहार अडला होता व कोण कोणाशीं द्वेष करीत होता? पाश्चात्यांची इच्छा हिंदू पुढाऱ्यांची बुद्धि राज्यकारणांतून निघून आपसांत वैर

करण्यांत जावी व त्यांनीं आपणाकडे न्याय मागण्यास यावें, ह्मणजे आपणाला स्वस्थ बसून राज्यकारभार करण्यास बरें सांपडेल. हा त्यांचा लबाडीचा कावा आज फार दिवसांपासून चालला आहे. तरी तो आपल्या लोकांस अद्याप समजत नाहीं याचें आश्चर्य वाटतें. तुह्मी खिस्ती व्हा ह्मणजे तुह्माला राज्य मिळेल, विधवांचीं लग्नें करा, प्रौढ विवाह करा, ह्मणजे आयुष्य व शक्ति वाढेल वगैरे हजारों सुधारणा त्यांनीं आपल्यापुढें ठेविल्या आहेत. परंतु यापासून सुपरिणाम होण्याऐवजीं दुष्परिणाम मात्र भोगावे लागत आहेत. आपल्या समाजाची घडी विसकटावी हेंच त्यांचें ध्येय आहे. हें धोरण समजणारा लोकमान्यासारखा सर्व हिंदुस्थानांत एकच पुरुष जन्मला. लोकमान्यांनीं सर्वांचें आपसांतील वैर नाहींसें करून सर्वांना राजकारणाकडेच वळविलें. आणि स्वराज्य आल्यावर ह्या सगळ्या गोष्टी आपोआप सुधारतील, त्याशिवाय कशाच्यानेंही त्या सुधारणार नाहींत असें सांगून त्यांची समजूत करून सर्वांचीं मनें राजकारणाकडे वळविलीं. ते गेल्यावर खरें राजकारण मागें पडून हीं जातीभेदाचीं भुतें पुन्हां नाचूं लागलीं, हें आमचें दुर्दैव आहे! वगैरे आमच्या पुष्कळ गोष्टी बोटींत चालल्या होत्या. त्यामुळें वेळ केव्हां निघून गेला हें आह्मांस समजलें नाहीं. शेवटीं बोटीवर रात्रीचे बारा वाजले तेव्हां आह्मी निजावयास गेलों.

दुसरे दिवशीं सुप्रभातीं ठाणें जिल्ह्याचा किनारा दिसूं लागला. वसई, वांद्रें, मुंबई, हीं अनुक्रमें दिसूं लागलीं व आमची बोट धक्क्यावर लागून आह्मी उतरलों तों सकाळचे दहा वाजले होते. आजचा दिवस आमचेकडे राहून उद्यां जा, असा त्या श्रीमंतांनीं पुष्कळ आग्रह केला पण मला वेळ नव्हता, ह्मणून त्यांचे आभार मानून मी गाडीचा रस्ता धरला व घरीं आलों. या ठिकाणीं माझ्या यात्रेचीं बारा ज्योतिर्लिंगें संपूर्ण झालीं. यांच्या स्थानांची पौराणिक कथा अशी आहे कीं, देवदानवांना अमृत वाटण्याचे वेळीं श्री विष्णूनें जगन्मोहिनीचें रूप घेतलें होतें तें रूप पहाण्याची श्रीशंकरांना इच्छा झाली. तें रूप पाहून शंकर मदनांतक असत इतके मोहित झाले कीं ते तिच्यामागें नागडेच धांवूं लागले! धांवतांना तें रूप हस्तगत झालें असें पाहून ज्या ज्या ठिकाणीं त्यांचें वीर्यस्खलन पावलें तीं हीं ठिकाणें आहेत. शेवटीं विष्णूनें आपलें मूळ रूप दाखविलें त्यावेळीं शंकर लज्जित झाले! या नंतर मी सवडीनें मांवदें करून यथा विधी यात्रा संपूर्ण करून ती ईश्वरार्पण केली. त्या मांवद्याचा हा पुस्तक रूपी प्रसाद महाराष्ट्रीयांना देता आहें तो त्यांना यशस्वी करो.

—xx—

# उपसंहार.

## भाग १ ला.

हा भाग शेवटचा आहे. सबब हा उपसंहार सर्व भागांमिळून ह्मणजे सर्व तीर्थयात्रांचा आहे. पहिल्या भागाची प्रस्तावना ही या सर्व ग्रंथमालेची प्रस्तावना व हा ह्या ग्रंथमालेचा उपसंहार आहे. ह्मणजे पहिल्या भागापासून चवथ्या भागापर्यंत सर्व ग्रंथ एक आहे. अशा दृष्टीनें प्रस्तावना व उपसंहार हीं लिहिलीं आहेत, ह्मणून यापूर्वी ती प्रस्तावना जरूर वाचावी, प्रत्येक भागाची प्रस्तावना व उपसंहार हीं त्या त्या भागाला अनुलक्षून आहेतच, आणि त्या दृष्टीनें प्रत्येक भाग स्वतंत्रच आहे.

पृथ्वीवर मनुष्य प्राणी उत्पन्न झाला तो मुख्यतः उष्ण कटिबंधांत किंवा त्याच्या आसपास जमिनीवरच उत्पन्न झाला असला पाहिजे. कारण प्राणिमात्राच्या उत्पत्तीला उष्णता हीच कारण आहे. बर्फमय प्रदेशांत कांहींच उत्पन्न होत नाहीं. मनुष्य उष्ण प्रदेशांत उत्पन्न झाल्यावर त्यांची प्रगति पूर्व आणि पश्चिम अशा उष्ण प्रदेशांतच प्रथम झाली. नंतर तो नवीन शोधाकरितां उत्तर व दक्षिण ध्रुवापर्यंत गेला असला पाहिजे किंवा त्यास तेथें जाणें कांहीं कारणानें भाग पडलें असलें पाहिजे. कारण उत्तर ध्रुवाकडे व दक्षिण ध्रुवाकडे प्राचीन वस्ती होती असा हल्लीं पुरावा मिळतो. ह्यापैकीं विचार करून पाहतां सुखाचा उष्ण प्रदेश सोडून थंडीचे हाल सोसण्यास हौसेनें कोणीही गेले असतील असें वाटत नाहीं. पण उत्तर ध्रुवावर व दक्षिण ध्रुवाकडेसुद्धां मनुष्य वस्ती व इतर प्राण्यांची वस्ती होती, असें आतां इतिहासावरून व भूमिगत अवशेषावरूनसुद्धां सिद्ध झालें आहे. सैबिरियाचे उत्तरेस उत्तर महासागराच्या प्रदेशांत हत्तीसारख्या अगदीं निराळ्या व उष्ण प्रदेशांतील प्राण्यांचे अवशेष ( सांगाडे ) बर्फांत पुरलेले सांपडले आहेत त्यावरून त्या काळीं ती हवा प्राणिमात्राला हितकर होती असें दिसतें. उत्तर ध्रुवाकडील वस्तीचा पुरावा वेदांवरून व दाक्षिण ध्रुवाकडील वस्तीचा पुरावा दक्षिण अमेरिकेंतील पेरू व पाटागोनिया येथें सांपडलेल्या अवशेषांवरून व श्रेष्ठ प्रती-

[illegible] मिळाले. तेथें इमारतींचे दागदागिने अशीच फार सुंदर सांपडले आहेत! गेल्या सालीं (१९२९) एका महाराष्ट्रीयानें जर्मनींतून उत्तर-ध्रुवाकडील 'स्पीत्सबर्गेन' बेटाकडे सफर केली. त्या बाजूकडील व लिथोनिया प्रांतांतील रशियन लोक मृतार्थ भाताचे पिंड अर्पण करितात. त्यांचे *बरेंच शद्ब विशेषतः संख्यावाचक शद्ब, विभक्तींचीं रूपें व प्रत्यय यांत संस्कृताशीं* बरेंच साम्य आहे तसें दुसऱ्या कोणतेही भाषेशीं नाहीं. त्यांची बोलण्याची धाटणी हिंदुस्थानांतील वेदपाठकाप्रमाणें आहे असें जर्मन प्रोफेसर ह्मणतात. आणखी आर्यसंस्कृतीचा काय पुरावा पाहिजे?

उष्ण कटिबंधांत ईजिप्त समरकंद, मेसापोटेमिया, सिंध, पंजाब व पाटणा वगैरे ठिकाणीं जमिनीचें उत्खनन केलें आहे. त्यावरून इसवी सनापूर्वी आठ हजार वर्षांच्या काळीं ह्मणजे वेदांच्या फार पूर्वी हल्लीचे इजिप्त, तुर्कस्थान, सीरिया, समरकंद, इराण, हिंदुस्थान व त्यांचे आसपास मनुष्यांनीं गजबजलेलीं अशीं मोठमोठीं साम्राज्यें होतीं, असा पुरावा आतां मिळाला आहे. हल्लीं पेकीन (चीन) येथील एका टेकडीवर एक मनुष्याचा दांत सांपडला असून तो दहा लाख वर्षांपूर्वीचा असावा असा शास्त्रज्ञांचा अंदाज आहे!! या दातांवरून सुद्धां मानवी वस्तीला प्रथम प्रारंभ मध्य आशियांतल्या मैदानांतच, मुख्यतः मागील ठिकाणींच झाला असावा, असा विद्वानांचा तर्क आहे. त्याचप्रमाणें अमेरिकेंतील युनायटेड स्टेटसच्या केंटकी संस्थानांत पृथ्वीच्या पोटांत एक मेमाथ नांवाची फार मोठी गुहा सांपडली आहे तिची रुंदी १० कोस असून पृथ्वीच्या पोटांत ती किती लांब गेली असेल याचा पत्ता धाडसी लोकांस सुद्धां लागत नाहीं! मोठा तीव्र उजेड घेऊन गेले तर हींत मोडक्या घरांचीं चकचकीत दालनें व देवळांचे घुमट दिसतात. अशा कांहीं गुहांत नद्या सरोवरेंही आढळतात. यावरून भू-पृष्ठावरील सुधारलेल्या जगाचें हे अवशेष गडप झाले असले पाहिजेत. ह्या पृथ्वीच्या घडामोडीवरून भूगर्भ व भूस्तर शास्त्रावरून पृथ्वीवर मनुष्य प्राण्याची उत्पत्ती होऊन निदान तीन कोटी तरी वर्षें झालीं असावीं असा विद्वानांचा शोध आहे. त्यानंतर पृथ्वीच्या भ्रमणानें व भूकंपानें ह्याचें स्थित्यंतर होऊन तो प्रदेश असाच जमीन व पाणी यांत गडप होऊन तेथें समुद्र व रेती येऊन त्याचें अगदीं निराळें रूपांतर झालें व तो प्रदेश मनुष्य वस्तीस अयोग्य झाला असावा. हल्लींही भूकंपाची रेषा ह्याच मार्गावरून गेली आहे ह्यावरून हें स्पष्ट दिसतें.

गोबीचें मैदान व हिमालय ह्यांवर शिंपा, कवड्या, वगैरे समुद्राचे अवशेष सांपडले आहेत तसेंच त्याच प्रदेशांमध्यें मिठाचे डोंगरही सांपडतात. ह्यावरून हा प्रदेश समुद्रतळीं केव्हांतरी असावा असें स्पष्ट दिसतें. उष्ण कटिबंधांत त्यावेळीं पुष्कळ जमीन असून उत्तरेकडील गोबी व रशियाकडे पाणी (समुद्र) असला पाहिजे आणि त्याचेच अवशेष हल्लींचे कास्पियन, काळा, आरल व भूमध्यसमुद्र हे असले पाहिजेत. अफ्रिका, अरबस्तान, हिंदुस्थान, जावा, सुमात्रा तें थेट चिनापर्यंत पूर्वी एकत्र असावींत. नंतर त्यांत समुद्र शिरला व गोबी वगैरे प्रदेश उघडे झाले असावेत.

अशा रीतीनें हा प्रदेश मनुष्य वस्तीस अयोग्य झाल्यामुळें कांहीं मनुष्य संघ वर उत्तर ध्रुवाकडे वस्तीस गेला व कांहीं दक्षिणेकडील बेटांत गेला असला पाहिजे. उत्तरेस गेले त्यांचा थंडीमुळें गौर वर्ण झाला व त्यांना मनुष्य मानिलें व दक्षिणेकडे गेले त्यांचा उष्ण प्रदेशच कायम राहिला असल्यामुळें ते काळेकुट्ट होऊन ओबडधोबड झाले व त्यांस राक्षस ह्मणूं लागले. द्राविडी लोकांनीं वेद व आर्यसंस्कृति उत्तम राखली असल्यामुळें ते आर्यांचें आधींचे भाउबंद असले पाहिजे हें उघड आहे. आतां हे अनार्य प्रांतांत राहिल्यामुळें त्यांच्या सहवासानें त्यांचा रंग व भाषा बदलली एवढेंच. या द्रविडांच्या संगतीनें रावणकुंभकर्णादि अनार्य दैत्यराक्षसांना हिंदुधर्माचें वेदाचें, व आर्य-संस्कृतीचें ज्ञान झालें असावें पुढें कडक थंडीमुळें ध्रुव प्रदेश अयोग्य व हा प्रदेश ह्मणजे पृथ्वीचा उष्ण कटिबंध वस्तीस योग्य झाल्यावर किंवा त्यास आपल्या पितृ देशाचें स्मरण झाल्यामुळें उत्तरेकडील लोक दक्षिणेकडे व दक्षिणेकडील लोक उत्तरेकडे येऊं लागले. तेव्हां त्यांच्या पुन्हा गाठी पडल्या, व ओळख गेल्यामुळें उत्तरेकडच्यांस देव व दक्षिणेकडच्यांस दानव किंवा दैत्य ह्मणूं लागले असावे. देव व दानव हे एकाच कश्यप ऋषीची (मानव जातीची) प्रजा असें आमच्या पुराणांत ह्मटलें आहे, याचाही अर्थ हाच दिसतो. ह्या दैत्यांना अजूनसुद्धां "पूर्व देव" ह्मणजे पूर्वींचे देव अशी संज्ञा आहे.

शुक्रशिष्यादिति सुता पूर्वदेवाः सुरद्विषः

असा अमर आहे. पुढें ते देवांचा द्वेष करूं लागले. ह्मणून ते निंद्य झाले व त्यांचीं नांवें देवांनीं निंदावाचक केलीं.

कास्पियन समुद्र हें नांव ह्या कश्यप ऋषीच्या आश्रमापासूनच पडलें असावें.

यावरून मूळ मनुष्य कुळ येथें किंवा याच्या आसपासच उत्पन्न झालें असलें पाहिजे व तसा आधारही मिळतो. पूर्व गोलार्धाचा नकाशा हातांत घेतला तर कास्पीयन समुद्र व काकेशस पर्वत हींच मध्यावर दिसतात. बायबलांत सांगितलेलें नोवाचें गलबत त्याच काकेशस पर्वताला लागलें. तेथूनच प्राचीन धनाढ्य साम्राज्यें बाबिलन, निनवी, मिसर, कार्थेज, ग्रीस, रोम, इराण, समर्कंद, कंदहार, श्रीनगर, ल्हासा, हिंदुस्थान, पेकीन, आफ्रिका, अमेरिका व रशियांतील मास्को येथें झालीं व तेथूनच मनुष्य कूळ पसरलें असा सर्व विद्वानांचा भूमिगत शोधावरून सर्व धर्मांच्या माहितीवरून व इतिहासावरून तर्क आहे व तोच खरा दिसतो. त्याशिवाय तेथें मोठमोठीं साम्राज्यें होणें शक्य नाहीं. मास्को, अमेरिका, जावा, मिसर येथें शिवालयाचे अवशेष सांपडले आहेत. देव व दैत्य ह्यांसच पुढें पौराणिक किंवा ऐतिहासिक काळांत आर्य व अनार्य अशीं नांवें प्राप्त झालीं आहेत. आर्यांचे उत्तरेकडून दक्षिणेकडच्या आगमनासंबंधानें माझी तीर्थयात्रा भाग २ रा यांत खुलासा केला आहे. ते उत्तरेस कसे गेले, याचा खुलासा येथें हा केला आहे. अशा रीतीनें उत्तरेकडचे आर्य आपल्या पितृ लोकांस ह्मणजे वाडवडिलांचे देशास दक्षिणेस आले ह्मणून दक्षिणेस पितृ दिशा ह्मणतात व उत्तरेस देवदिशा ह्मणतात. ह्या भागांतलि हरेश्वराच्या यात्रावर्णनांत एक विष्णुपद तेथें मृत्युलोकांत, एक पितृगयेंत ह्मणजे स्वर्गांत, व एक अरबस्तानांतील मक्केंत आहे असें लिहिलें आहे. यावरून एवढा सर्व प्रदेश बळी दैत्याच्या राज्याचा होता त्यापासून वामनानें ह्मणजे आर्यश्रेष्ठानें आपल्या सामर्थ्यानें, प्रेमानें किंवा सख्यत्वानें ही त्रिपाद भूमी घेऊन त्याला पाताळांत ह्मणजे आफ्रिकेंत किंवा दक्षिणमहासागरांतील बेटांत पाठवून त्याचे द्वाराशीं ह्मणजे मिसर देशांतील कायरो येथें राहून हा सर्व प्रदेश आर्यांच्या प्रगतीस खुला करून दिला अशी वामन अवताराची ह्मणजे आर्यांच्या प्रगतीची दिशा दिसते.

अति प्राचीनकाळीं जग सुधारलें होतें पण त्यांच्यांत लेखनकला नव्हती. तिचा आरंभ चित्रलिपीपासून झाला. नंतर निरनिराळ्या वर्णमाला निघून हल्लींच्या लिपी झाल्या आहेत. तुर्कस्थानांत मेसापोटोमियामध्यें जे अवशेष सांपडले आहेत त्यावरून व सुमेरी संस्कृतीवरून, तसेंच हल्लींच्या चिनी जपानी चित्रलिपीवरून ह्या गोष्टी सिद्ध झाल्या आहेत. त्यानंतर हिंदुस्थानांत येणाऱ्या आर्यांनीं अत्यंत शहाणपणानें आपले उच्चार किंवा ध्वनी लिहिण्याची कला

काढली व तिची पूर्णता झाल्यावर त्यांना तिबेटांतल्या आपल्या पूर्वींच्या वसाहतींचें साम्राज्याच्या वैभवाचें स्मरण होऊन त्यांनीं आपणांस ठाऊक असलेल्या किंवा ऐकिलेल्या व त्याप्रमाणें परंपरेनें पाठकेलेल्या प्राचीन गोष्टी, दंतकथा किंवा ज्ञान यांच्या आठवणी प्रथम लिहून काढिल्या. तोच हा आजचा वेद होय. वेदाला श्रुति ह्मणतात याचें कारण हेंच आहे. नंतर त्यांत घालण्यासारख्या दुसऱ्या कांहीं गोष्टी उत्तरध्रुवाकडील सृष्टितत्वांच्या व घडामोडींच्या आठवल्या. अर्थात त्यांचें स्मरण झालें ह्मणून त्या गोष्टींस स्मृति असें ह्मणून त्याही त्याचवेळच्या असल्यामुळें वेदांत घातल्या. अशा रीतीनें वेदाचा विस्तार झाला. अर्थात् वेद हा प्राचीन प्रळयाच्या पूर्वींच्या साम्राज्याचा किंवा मनुष्यवस्तीचा इतिहासच आहे, ह्मणून ह्यांत आतां नवीन कोणी कधीं बदल करूं नये असें ठरलें. पण याचें पठण मात्र चालू ठेवावें ह्मणजे आर्यांचा मूळ इतिहासाचें स्मरण राहील. वेदांत श्रेष्ठ समाज रचना, कौटुंबिक पद्धति याचा स्पष्ट उल्लेख आहे, इतकेंच नव्हे तर चातुर्वर्ण्याची माहितीसुद्धां त्यांत आहे, असें पुरुषसूक्तावरून स्पष्ट दिसतें. तसेंच गाई, अग्नी, सोनें, रूपें, तांबें व धनधान्य ह्यांचे उल्लेख व त्यांचे उपयोग सांगितले आहेत ह्यावरून त्यांनीं ऐकिलेल्या किंवा स्मरण करून लिहिलेल्या गोष्टी समृद्ध राजाच्या किंवा अत्यंत सुधारलेल्या देशाच्या असल्याच पाहिजेत. भारतीय युद्धाप्रमाणें वेदांतील दाशराज्ञ युद्धाचेंही महत्व मोठेंच आहे.

मनुष्याची देवाविषयीं प्रथम कल्पना झाली तिला कारण सृष्टिकार्येंच होत. सृष्टिकार्यांनीं ह्मणजे भूकंप ( अग्नि ) जल ( वरूण ) पाऊस ( इंद्र ) यांच्या अतिरेकानें व अनियमितपणानें मनुष्याचें अतोनात नुकसान होतें असा त्यांना वारंवार अनुभव आला. (असा प्रकार हल्लीं जपानांत उत्तर व दक्षिण ध्रुव भूमीवरसुद्धां दृष्टोत्पत्तीस येत आहे.) ह्मणून त्यांच्या शमनार्थ त्यांनीं त्यांचीं प्रतिकें करून त्यांच्या पूजेला आरंभ केला. कारण त्यांची प्रत्यक्ष पूजा होणें शक्य नाहीं. वेदांत अग्नि, वरूण व इंद्र ह्यांचीच मुख्यतः स्तुती आहे, ह्यांचें कारण हेंच. त्यांच्या संतोषाकरितां त्यांनीं यज्ञ सुरू केले, व अशानें सृष्टितत्वांचा संतोष होऊन त्यांची अनर्थ परंपरा ते दक्षिणेकडे आल्यावर टळली व ती यज्ञामुळें टळते असा त्यांचा समज झाला. ह्मणून ऋग्वेदानंतर यजुर्वेद हा यज्ञाकरितांच झाला. अशा रीतीनें पंचमहाभूतांची शांती झाल्यावर लोक उद्योगधंद्याला लागले व त्यांच्या उत्तेजनार्थ किंवा त्या त्या धंद्यांत यश येण्याकरितां मागील अनुभवावरून त्या त्या देवतेची धंद्याच्या

दृष्टीनें प्रतिकें करून यश येण्याकरितां त्यांची प्रार्थना व पूजा सुरू झाली. त्यामुळें निरनिराळीं दैवतें उत्पन्न झालीं. ह्या देवांचा आकार त्या त्या धंद्याच्याप्रमाणें व लोकांच्या सोयीस पडेल असा मानिला. प्रथम त्या धंद्यांच्या साधनांची ते पूजा करूं लागले. नंतर वृक्षपाषाणादि अचेतन सृष्टीवरून मत्स्य, कूर्म, सर्प, गाय या पशु सृष्टीवरून, गजानन, नृसिंह, तुंबुरू सारख्या मिश्र सृष्टीकडून देवत्व जाऊन आतां तें पूर्णपणें मनुष्याकाराकडे आलें आहे. अशा रीतीनें त्यांची मनुष्यांसारखी कांहीं प्रतिमा करून तींत तें दैवत जागृत आहे, असें मानून तिची पूजा करूं लागले. अजूनसुद्धां तो प्रकार सुरू आहे. व्यापारी आपल्या तराजूची किंवा शिलकेच्या पेटीची किंवा कीर्द खतावणीची पूजा करून शिवाय कोनाड्यांतील बालाजीची व लक्ष्मीच्या तसबिरीचीही करतो. विद्यार्थी पाटी पुस्तकाची व पोथ्यांची पूजा करून पुन्हां सरस्वतीच्या तसबिरीचीही करतो. कारण त्याशिवाय पूजकाच्या मनाचें समाधान होत नाहीं. देव मनुष्यासारखा असावा म्हणजे त्याची आत्मभावानें पूजा करणें सोईचें पडतें, असा मनुष्य मात्राचा स्वभाव आहे. तोच प्रकार पुढें सर्व देवांचा झाला. शंकरालासुद्धां आपलें मूळचें पिंडीचें रूप टाळून भक्ताकरितां मनुष्यरूप घ्यावें लागलें. त्याचा खुलासा दुसऱ्या भागामध्यें आरंभींच केला. तोच प्रकार अद्यापही रूढ आहे. म्हणजे बुद्धि व यश पाहिजे असेल तर गणपतीची सेवा करावी. बलवर्धनार्थ किंवा शक्तीकरितां हनुमानाची सेवा करावी वगैरे. त्या त्या देवतेची उपासनाही त्याच धोरणानें चालू असतात. पैकीं सर्वांत पहिला धंदा शेतीचा व त्याचीं आयुधें नांगर, बैल, जमीन अर्थात त्याचें दैवतही नांगरासारखें लिंगाकार केलें आहे व त्याचें वाहान बैल मानिलें आहे. पुढें या नांगरास बैलऐवजीं रेडे, घोडे किंवादुसरीं जनावरें लावूं लागले किंवा शेतीकरितां जनावरें बाळगावीं लागलीं म्हणून यास पशुपति नांव मिळालें. पुढें नवीन धंदे निघून जरी नवीं दैवतें झालीं तरी हा मुख्य पोटाचा धंदा असल्यामुळें त्याला महादेव म्हणूं लागले. यजुर्वेदामध्यें जें रूद्रसूक्त आहे तें या देवाच्या पूजेकरितांच आहे. त्यांत त्याची निरनिराळी प्रार्थना करून त्यांत घरदार शेत खटला व धनधान्याचीच मुख्यतः मागणी केली आहे. त्याचा नमुना खालीं देतों.

क्षितिश्च मे कूयवाश्च मे ऽन्नं च मे क्षुच्च मे व्रीहयश्च मे
यवाश्च मे माषाश्च मे तिलाश्च मे मुद्गाश्च मे खल्वाश्च मे
गोधूमाश्च मे मसुराश्च मे प्रियंगवाश्च मे णवच्च मे
श्यामाकाश्च मे नीवाराश्च मे ॥४॥ इत्यादि. रुद्र सूक्त चमकाध्याय

अशाप्रकारें शेत खटला घरगुती जनावरें व धनधान्यें वगैरे कुटुंबाच्या सुखसोयीच्या वस्तु यांचीच मागणी केली आहे. पुढें या वैदिक कवनांच्या आधारावर महिम्नासारखीं पौराणिक कवनें सुरू झालीं. त्यांचें वर्णन दुसऱ्या भागांत केलें आहे. त्यांतसुद्धां हाच अर्थ आहे व तो तेथें स्पष्ट केला आहे.

सारांश, देवतांचीं जीं अनेक प्रतिकें व मूर्ति झाल्या, त्या मूळ मनुष्य स्वभावाला अनुसरून व त्याच्या अपेक्षेप्रमाणें झाल्या. व त्या दृष्टीनें तशी त्यांची आवश्यकताही आहे. कारण अनेक रोगाला एकाच औषधीनें गुण कसा येईल? सोनारी शिक्षण सोनाराकडेच मिळेल. एकच हत्यार सर्व ठिकाणीं कसें चालेल? एकाच युक्तीनें सर्व कामें कशीं होतील? प्रत्येक ठिकाणीं अक्कल व शहाणपणा यांची योजना निरनिराळी असलीच पाहिजे. एकच अन्न पण त्याचे निरनिराळे शक्य तितके जास्त प्रकार करून उपभोग घेणें हेंच व्यवहारीक दृष्टीनें फार उपयुक्त आहे. सारांश, जसजसा ज्याचा व्यवहार किंवा पसारा जास्त तसतशीं त्याचीं साधनें जास्त लागणारच. तोच न्याय निरनिराळ्या प्रतिकांचा ऊर्फ देवतांच्या मूर्तींचा आहे. आपल्या वैदिक धर्माचा प्रसार पूर्वीं सर्व जगभर होता ह्मणून त्याचीं प्रतिकें जास्त झालीं एवढेंच. यांत गैर काय आहे? अशा रीतीनें हिंदुधर्मांत निरनिराळीं देवतें व त्यांच्या निरनिराळ्या यात्रा झाल्या आणि त्या मनुष्याच्या मनोधर्मास पोषक नाहींत असें कोण ह्मणेल? शिवाय त्यांत मनुष्याच्या कल्पनेची उत्क्रांती कसकशी होत गेली हेंही संगतवार सांपडतें हें विशेष आहे. अशा रीतीनें हिंदुधर्माचा इतिहास पृथ्वीवरच्या भिन्न भिन्न स्थळावरून व अगदीं भिन्न भिन्न काळीं निर्माण झाल्यामुळें देशकाल वर्तमानाप्रमाणें 'शास्त्राद्रुढीर्बलीयसी' या तत्वानें त्यांत भिन्न भिन्न ऋषींची त्या स्थळ काळाला अनुसरून भिन्न भिन्न मतें पडलीं आणि त्या दृष्टीनें तीं योग्यच होतीं. हल्लींही तोच प्रकार आहे. उत्तर हिंदुस्थानांत कडक थंडी-

मुळें कुजण्याची क्रिया कमी ह्मणून पाण्याला बाट नाहीं. सोंवळें ओवळें स्पृश्या-स्पृश्य विचार कमी. पण दक्षिणेकडे त्याच्या विरुद्ध रूढी आहे व ती त्या स्थानास योग्यच आहेत. ह्मणून कोणतीही पडलेली रूढी ती कां पडली याचा नीट विचार केल्याशिवाय टाकूं नये.

ह्या चारी भागांच्या यात्रा वर्णनावरून हिंदु धर्माच्या यात्रा ह्या पाश्चयात्य लोकांनीं किंवा सुधारकांनीं किंवा विधर्मी द्वेष्ट्यांनीं ठरविल्याप्रमाणें ह्या केवळ थोतांड किंवा लुच्चे लोकांचे किंवा वाटमाऱ्यांचे अड्डे, धार्मिक भावनानें लुबड-णाऱ्या ठकांचा बाजार, अंधपरंपरा चालू ठेवण्याची साधनें, भोळ्या बापड्यांवर लुच्च्या लोकांनीं आपल्या अकलेनें तयार केलेलीं जाळीं, किंवा उजळ ठकांचा बाजार, असें नसून त्या धर्म आणि व्यवहार यांची सांगड घालून मनुष्य व्यव-हारक्षम करण्याकरितांच मुद्दाम बनविलेल्या आहेत, असें स्पष्ट दिसतें. प्रत्येकानें आपआपल्या धर्माच्या पायावर व्यवहार केल्यास तो व्यवहार इहपर लोकीं लाभप्रद होतो, ह्मणजे धर्माची व्यवहाराला मदत होते. धर्माची उत्पत्ति व्यव-हार सुखकर करण्याकरितांच आहे. व्यवहारांतील महत्वाचीं प्रमेयें धर्मानें जशीं अबालवृद्ध स्त्री–पुरुषांच्या मनावर ठसतात, तशीं तीं कोणत्याही कायद्यानें किंवा नीतिपाठानेंही ठसणार नाहींत. धर्माची व देवाची भीति बाळगून केलेला व्यव-हार कधींही अपेशी होणार नाहीं. हल्लींची मंडळी देवधर्माला झुगारून केवळ कायद्याच्या भीतिनें व्यवहार करतात यामुळें त्यांचे व्यवहार अपेशी होऊन त्यांची सर्व बाजूनें अधोगती होते. ह्मणून यात्रा पद्धतशीर केल्यास त्या इह पर-लोकीं कल्याणदायक खचित होतात, असें ह्यावरून स्पष्ट दिसेल. आतां कांहीं मनुष्यांना कांहीं यात्रांचे परिणाम विपरीत झाले असें वाटेल पण तसें कोण-त्याही कार्याचें होतेंच. त्यांत दोष कार्याचा नसून तें पद्धतशीर केलें जात नाहीं ह्मणूनच तें अनर्थावह होतें असें शहाणे ह्मणतात. त्याचप्रमाणें अविचारानें केलेल्या यात्रांचा परिणाम होतो आणि अशा प्रकारच्या ठेंचा लागून वाईट परि-णाम होऊं नये ह्मणूनच हा एवढा प्रयत्न केला आहे. आतां ज्याची व्यवहाराच्या पलीकडे दृष्टि गेली आहे, अशा साधु पुरुषांना किंवा तत्ववेत्त्यांना, त्यांना व्यव-हारच नसल्यामुळें एकच देव आहे किंवा तोही नाहीं असें ह्मटलें तरी चालेल. हें कसें, याचें वर्णन पुढें क्रमानें दुसऱ्या भागांत येतच आहे.

---

# भाग २ रा.

या चारी भागांमिळून हिंदुस्थानांतील सर्व लहान मोठ्यां, पौराणिक, ऐतिहासिक व सृष्टिचमत्काराच्या वगैरे यात्रांची माहिती आली आहे. आतां कोणी ह्मणतील सर्व भरत खंडांतील यात्रा एवढ्याच कशा असतील ? तर मुख्य मुख्य यात्रांचें वर्णन यांत आलें आहेच. याशिवाय दुसऱ्या लहानसान यात्रा सर्वत्र असणारच आणि त्या कधींच संपणार नाहींत ! तरीपण त्यांचीं वर्णनें या यात्रांत वर्णन केलेल्या त्यासारख्या यात्रांपेक्षां निराळीं असण्याचा संभव फारसा नाहीं, निदान पुष्कळ कमी आहे, ह्मणून या चारी पुस्तकांच्या यात्रांनीं यात्रांचा मूळ हेतु सफळ होण्यास कांहींच अडचण पडणार नाहीं. ह्यापुढें अशा यात्रांचीं वर्णनें देऊन चर्वित चर्वण करण्यांत अर्थ नाहीं व तें कोणासही आवडणार नाहीं, सबब तें दिलें नाहीं. परमेश्वर कृपेनें ह्या यात्रा मजकडून झाल्या व त्यांची माहिती पुस्तक रूपानें लोकांस देतां आली ह्याबद्दल मी परमेश्वराचे फार आभार मानितों. परमेश्वर कृपेवाचून ह्या दोन्ही गोष्टी माझ्या हातून होण्यासारख्या नव्हत्या, पण त्यानें ह्या मजकडून करविल्या हा त्याचाच प्रसाद आहे.

या यात्रांच्या योगानें आपणांस हिंदुस्थानचे निरनिराळे प्रांत पाहण्यास सांपडले. निरनिराळ्या हवा पाण्याचे व लोकांच्या चाली रीतींचे गुणधर्म समजले. ठिकठिकाणचीं सृष्टकार्यें व सृष्टिचमत्कार दिसले. त्यांतील कांहींचीं कारणें अद्यापपर्यंतही अतर्क्य आहेत. कांहीं अगम्य साक्षात्कार दिसले. कोठें हल्लींच्या मानवी शक्तीच्या पलीकडचीं कामें पूर्वींच्या मनुष्यांनींच केलेलीं आहेत असें दिसलें. त्याचे अवशेषाच्या माहितीवरून त्यांची कल्पना आली. सृष्टि सौंदर्याच्या मनोहर शोभा पाहण्यास मिळाल्या. हिमालयाची विशेष माहिती व महति कळली. आर्यांची प्रगति कशी झाली व त्यांच्या दैवतांची उत्पत्ती कशी झाली असावी, पूर्वजांचे यात्रा करण्याचे उद्देश व त्या त्या ठिकाणीं विशिष्ट दैवतें स्थापण्याचे हेतूंचें थोडेंबहुत दिग्दर्शन झालें. कांहीं यात्रांचे उद्देश मोठमोठीं प्रदर्शनें करून व्यापार वृद्धि व्हावी, कठीण प्रदेशाचे मार्ग समजून तीं आश्रयस्थानें व्हावीं, तसेंच आपल्या पूर्वजांनीं कोठेंकोठें कसकसे पराक्रम करून कीर्ति करून ठेवली हें समजलें. निरनिराळ्या देवतांच्या मूर्ती दृष्टीस पडल्या. त्या मनमोहक

नसल्या तरी त्याजविषयीं भक्तांची अलोट भावना दृष्टीस पडली. भक्तांच्या भक्तीचें व आत्मभाव प्रकट करण्याचे त्यांचे मार्ग समजले. एवढी ओढ घेऊन व त्रास सोसून भक्त येथेंच कां येतात, त्यांत त्यांचें ऐहिक व पारलौकिक हित कसें साधतें हेंही ठिकठिकाणीं सांगितलें आहे. निरनिराळया साधुसंतांचीं दर्शनें झालीं. ते आपल्यासारखेच मनुष्य असून त्यांनीं ह्या जगांत केवढा अधिकार संपादन केला आहे ! परोपकारार्थ व राष्ट्राकरितां त्यांनीं देह किती झिजविले, व त्या योगानें त्यांनीं लोकांना कायमचें कसें ऋणी करून ठेविलें आहे, हें समजलें. जुन्या साधूप्रमाणें हेही या जगाला थक्क करून दाखविणारे चमत्कार करितात. चांगदेवाप्रमाणें वाघाचा घोडा व सर्पाचा चाबूक करून दाखवितात. प्रत्यक्ष भिंत चालविली नाहीं तरी चालती गाडी बंद करितात. मृत मनुष्यें मात्र उठविल्याचें दिसत नाहीं तरी त्यांचे चमत्कार वाखाणण्यासारखे आहेत. ही त्यांची पूर्व जन्माची पुण्याई तर खरीच पण ह्या जन्माची तपश्चर्याही त्यांची मोठीच असते. याशिवाय रामकृष्णासारख्या अवतारी विभूतींचें सामर्थ्य व थोरपणा समजला. तसेंच सत्कृत्य करितांना अडचणी कशा येतात, व त्या मनुष्यांना नाउमेद कशा करितात, लबाड लोक कांहीं गुण संपादन न करितां चैनीकरितां किंवा केवळ पोटाची खळगी भरण्याकरितां किंवा आपल्या इष्टांचें पोषण करण्याकरितां वाटमारेपणा करून किती नीचपणा प्रगट करितात, त्यांच्या सापापासून कसें सावध राहिलें पाहिजे इत्यादि गोष्टी समजून व अनुभव येऊन मन प्रगल्भ झालें. अशा प्रकारें नानाप्रकारचे दैहिक व मानसीक प्रसंग येऊन शरीर व मन कठीण व जोमदार बनलें आहे हा यात्रांचा मुख्य व दृश्य फायदा झाला आहे.

ह्रा एक प्रकारचा विचार झाला, व त्या योगानें ऐहिक हित साधलें. आतां यात्राचा तात्विक दृष्टीनें किंवा पारलौकिक दृष्टीनें विचार केला पाहिजे. कारण नुसतें भटकत तरी किती राहावयाचें ? तत्वावांचून नुसत्या कार्याला महत्व नसतें. शिवाय कोणत्याही गोष्टीचा एका बाजूनें विचार करून समजत नाहीं, सर्व बाजूंनीं अनुभव घ्यावा लागतो तेव्हां कांहीं थोडें समजतें. निदान त्याची दिशा तरी समजते. कांहीं अर्ध्या हळकुंडानें पिवळे होऊं पाहतात, व एकदम तत्वमसि या तत्वाशीं गांठ घालतात ! अशानें त्यांस तत्व कसें मिळेल ? तत्व काय वाटेवर पडलें आहे ? " चणे खावे लोखंडाचे, तेव्हां मन ब्रह्मपदिं नाचे. "

अशी त्याची फार बिकट वाट आहे. वर जावयाचें ते पायऱ्यापायऱ्यांनींच गेलें पाहिजे. एकदम आकाशांत उडी मारणाराला कांहीं न मिळतां तो तोंडघशीं पडून कायमचा नाउमेद मात्र होतो. पेरावें तसें उगवतें हें तत्व खरें आहे, पण सडीक तांदूळ किंवा पक्वान्नें पाहिजेत ह्मणून तींच जमिनींत लावून त्यांना पाणी घालून त्याचीं फळें घेण्याची इच्छा करूं लागला तर पढत मूर्खाप्रमाणें त्याचें हंसूं होईल. ह्मणून आरंभीं भातच लाविलें पाहिजे. ह्मणजे त्याचे तांदूळ होऊन पक्वान्नें दृष्टीस पडतील. हें समजण्याला अनुभवच पाहिजे. ह्मणून पारमार्थिक विचार करतांना प्रथम इहलोकींचें शरीर व मन यांचे शुद्धी करितां ह्मणजे तीं तेजस्वी व कार्यक्षम करण्याकरितां ह्या यात्रा झाल्याच पाहिजेत. ह्मणून साधु, संत, बैरागी, तापसी व आत्मज्ञांनीं यांनीं प्रथम याच यात्रा पासून आरंभ केला आहे. व त्यांना ज्ञान झालें तरी वासना पुन्हा बिघडूं नये ह्मणून ते या यात्रा अखेर पर्यंत सोडीत नाहींत. सबब या यात्रांचें वर्णन केलें आहे. आतां पारमार्थिक अशा दुसऱ्या यात्रांचें दिग्दर्शन करूं. दिग्दर्शन ह्मणण्याचें कारण त्या यात्रांची सर्व प्रकारची माहिती देण्याचीं साधनें अगदीं निरनिराळीं आहेत. शिवाय तो मार्ग ग्रंथोक्त नाहीं, गुरु परंपरेचा आहे. पण तो मार्ग सर्वांना उक्त नाहीं व तो सांगण्याचा आपला उद्देशही नाहीं. सबब त्या मार्गाकडे बोट दाखवून आपण मोकळें होऊं ज्याचें सामर्थ्य असेल ते त्या मार्गाला लागतील.

मनुष्याच्या मनांत आपल्या देवाच्या स्वरूपाविषयीं कल्पना असते, त्या कल्पनेप्रमाणें जेथें स्वरूप दिसेल तेथें त्याची देवत्वाविषयीं भावना उत्पन्न होते. हेंच त्या देवतेचें खरें ध्यानावाहन आहे. मग पुढें त्याची स्थापना मंत्रांनीं होवो किंवा भावनेनें होवो, ती मूर्ति किंवा तें स्वरूप त्यास पूज्य वाटतें. अशा रीतीनें त्या मूर्तीची मनोभावनेनें नाना वस्त्रालंकारांनीं व फलपत्रपुष्पांनीं पूजा केली ह्मणजे ते उपचार ध्यानांतल्या मूर्तीवर केल्यासारखे भासतात व त्यामुळें मन प्रसन्न होतें. नंतर रोज सकाळ संध्याकाळ पूजा केल्यानें त्याची जागृति होते व त्यांच्या संगतीनें मन व वासना पवित्र राहतात. अशा रीतीनें मूर्तिपूजा किंवा उत्सव मनोभावानें करीत गेल्यानें, नंतर कदाचित ती मूर्ति फुटली किंवा नाहींशी झाली तरी मनांतली तिजविषयींची भावना नाहींशी होत नाहीं; पुन्हा जेव्हां तो देखावा कोठें दृष्टीस पडेल तेथें तें समाधान व्यक्त होतें. आरशांत

तोंड दिसतें आणि तोंडावर जे उपचार करावे ते आरशांतल्या तोंडावर दिसतात व संतोष होतो. पण आरसा फुटला तरी तोंड फुटत नाहीं तर नवा आरसा तोंडापुढें धरतांच पुन्हा पूर्वीचें समाधान मात्र होतें. स्त्रीपुत्रांबरोबर केलेले प्रेमाचे विलास ते कदाचित नाहींसे झाले तरी त्यांचें स्मरण मुळींच जात नाहीं. प्रसंग येतांच त्याची जागृति होते व हेंच मूर्तिपूजेचें रहस्य आहे. यामुळें बाहेरची मूर्ति फुटली किंवा तिचा नाश झाला तरी देवत्वाची भावना मुळींच कमी न होतां ती दुसऱ्या मूर्तीच्या रूपानें दृश्य होऊन वाढते.

बाहेरची दृश्य मूर्ति नाशवंत आहे ह्मणून सुज्ञ मानसपूजाच श्रेष्ठ मानतात. कारण त्या पुजेला हवे तेवढे मानसिक श्रेष्ठ उपचार करितां येतात व मनरंजन होतें. पण तसें होण्याला त्यानें पूर्वी कधीं तरी प्रत्यक्ष अशा थाटाची पूजाच पहावी लागते, त्याशिवाय त्याला ती कल्पना उत्पन्न होत नाहीं. ह्मणून प्रथम प्रतिमा पूजाच श्रेष्ठ मानली आहे. यापेक्षां ज्ञानी मनुष्य मानसपूजासुद्धां न करितां केवळ आत्मानंदांत निमग्न असतात. पण अशानें एकट्याच्याच मनाचें समाधान होतें. त्या तपःश्चर्येनें त्याचा दर्जा, कर्तृत्व, व सामर्थ्य हीं वाढतात. पण मूर्ति पूजेनें अनेकांची धार्मिक व मानसिक संघशक्ति किंवा सामर्थ्य वाढतें. एका कुटुंबांत असें सामर्थ्य वाढावें ह्मणून प्रत्येक हिंदूचे घरांत देवघर असतें. आणि त्याची रोज सकाळसंध्याकाळ पूजा करावी असें ठरविलें आहे. या पूजांचा व व्रतकैवल्यांचा संकल्पही अस्माकं सकल कुटुंबानां क्षेमस्थैर्य इ. असाच आहे हें विसरतां कामा नये. गांवची शक्ति वाढावी ह्मणून गावदेवांचीं देवळें बांधतात व त्यांचे सार्वजनिक उत्सव मोठ्या थाटानें करितात. याचप्रमाणें प्रांतिक लोकांच्या एकीकरणाकरितां तशा यात्राचे उत्साह करितात व देशाच्या किंवा राष्ट्राच्या धार्मिक उन्नति व अभिमान किंवा संघशक्तीकरितां किंवा आपलेपणा उत्पन्न करण्याकरितां सोईच्या विशेष ठिकाणीं देवता, क्षेत्रें व तीर्थें निर्माण करून त्यांच्या यात्रांचे उत्साह व कुंभमेळ्यासारखे मंडळांचे मेळ्याचे जमाव नियमित वेळीं करून ठेविले आहेत. हल्लींच्या राष्ट्रीय सभा, प्रदर्शनें ह्याच तत्वावर असतात. संघशक्तीची सर्वांना, मनुष्यमात्रांनासुद्धां जरूर आहे. ह्मणून मनुष्य कितीही ज्ञानी किंवा सामर्थ्यवान झाला तरी त्याला समुदायांत मिळालेंच पाहिजे व तसे खरे ज्ञानी असतात ते या समाजांत मिळतातच. ह्मणून ज्ञानी मनुष्यानें सर्वसंग

परित्याग करून संन्यास घेतला तरी होतां होईतों त्यानें यात्रा केल्याच पाहिजेत,. इतकेंच नव्हे तर त्यानें कोठेंही तीन दिवसांवर राहूं नये असा त्यांस मुद्दाम निर्बंध घातला आहे. ह्मणून लो. टिळकांनीं गीतेचें हेंच रहस्य सांगितलें कीं मनुष्य ज्ञानी असला तरी त्यानें लोकसंग्रहाकरितां तरी कर्म केलेंच पाहिजे. ह्मणजे तीं कर्में ह्या निरनिराळ्या यात्राच आहेत. ज्ञानप्राप्तीपेक्षां भक्तिमार्गाची योजना जास्त मानली आहे याचें कारण हेंच कीं ती सर्वांना अनुकरणीय असून त्यानें संघशक्ति वाढते. ह्मणूनच या यात्रांचा एवढा उहपोह केला आहे. केवळ ज्ञानानें सिद्धि, आचार, सामर्थ्य, मोक्ष किंवा साधुत्व ज्यांना प्राप्त करून घ्यावयाचें असेल किंवा अतींद्रिय वादाचे प्रश्न सोडवावयाचे असतील अशा अत्यंत तीव्र बुद्धिमान मनुष्यांना त्यांच्या बुद्धीची रग किंवा सामर्थ्य जिरविण्याकरितां तो मार्ग मोकळा आहेच. पण असे असामान्य बुद्धीचे लोक कितीसे निघणार? अर्थात सर्वमान्य असा भक्तियोगाचा राजमार्गच बरा आहे. ज्यांनीं त्यांनीं स्वसामर्थ्यानें व हिंमतीनें पुढें जावें, ह्मणून हे दोन मार्ग स्पष्टपणें सांगितले आहेत. ज्ञानी मनुष्याला ज्ञान झालें तरी भक्तीचें प्रेम किंवा जिव्हाळा अगदीं और आहे. बाप तान्ह्या मुलाजवळ बोबडें बोलतो व त्याचे प्रेमानें मुके घेतो. त्याचे ते वेडेचार आहेत हें त्याला व लोकांनाही समजतें, पण त्या तशा बोलण्यांत जें प्रेम आहे, तें त्याशीं व्याकरणशुद्ध व सरळ बोलण्यांमध्यें केव्हांही नाहीं. हें कोणीही सांगेल. तोच हुबेहूब प्रकार ज्ञानाचा व भक्तीचा आहे. यामुळें शंकराचार्यांसारखे ज्ञानीसुद्धां त्यांना लहर आली ह्मणजे प्रेमाकरितां भक्तिमार्गांत उतरतातच. (शंकराचार्यांची भक्तिमार्गाची स्तोत्रें प्रसिद्धच आहेत.) सारांश, ब्रह्मतत्व श्रेष्ठ किंवा जिव्हाळ्याचें प्रेम श्रेष्ठ याचा निर्णय एकदेशीयच होईल किंवा दोहोंपासून एकच कार्य होईल व होतेंही. सारांश तान्हें मूल, मध्यम वयाचें मूल व थोर मुलगा ह्यांच्याशीं आईबापांची जी वर्तणूक असते तोच थेट प्रकार भक्ति, ज्ञान व वैराग्य यांचा आहे. तिन्ही अवस्थांत बापाचें मुलाविषयीं जसें जिव्हाळ्याचें प्रेम असतें पण तें दाखविण्याचे प्रकार मुलाच्या वयपरत्वें निरनिराळे दिसतात, तसेंच परमेश्वराविषयीं मनांत अत्यंत सख्य असल्याशिवाय भक्तिज्ञान वैराग्याचे बाह्योपचार अगदीं फुकट आहेत. आजारी प्रेम व खरें प्रेम हें जसें अगदीं निराळें तसें हें आहे. या सर्वांचा इत्यर्थ हा कीं देवाविषयीं अत्यंत प्रेम दाखविण्याचे भक्ति ज्ञान व वैराग्य हे मार्ग आहेत. ज्याला जसें साधेल त्यानें त्या मार्गानें जावें.

भक्ति, ज्ञान आणि वैराग्य ह्या मोक्ष साधनांच्या तीन पायऱ्या आहेत. मुमुक्षु मनुष्यानें प्रथम भक्त झालें पाहिजे. नंतर ईश्वर प्रसादानें त्याला ज्ञान प्राप्त होतें. नंतर तो कैवल्य पदाला जातो. भक्तीशिवाय एकदम ज्ञान. किंवा वैराग्य प्राप्त होत नाहीं. कोणालाही नोकर ठेवावयाचा असला तर तो त्याची अशाच रीतीनें तीन प्रकारची परीक्षा करितो. मनुष्य प्रथम आला ह्मणजे त्याचा आप-त्यावर विश्वास आहे किंवा नाहीं हें पाहावयाचें, तो विश्वासू ठरला ह्मणजे त्याला आपला व्यवहार सांगावयाचा ह्मणजे ज्ञान सांगावयाचें आणि तो व्यवहार दक्ष झाला ह्मणजे त्याच्या ताव्यांत खुशाल तिजोरीच्या किल्ल्या द्यावयाच्या व त्याच्याशीं अभेदपणानें वागणूक करावयाची ह्मणजे त्याला पूर्णपणें मुक्ती द्यावयाची! राजकारणांत सुद्धां हाच सिद्धांत आहे. यामुळें राजा आपल्य खासगी कारभारांत आपल्या जातीचेच लोक घेतो. हाच सिद्धांत मोक्ष मार्गा-लाही लागू आहे. यथा पिंडे तथा ब्रह्मांडे अशी अणूपासून ब्रह्मांडापर्यंत सर्वत्र एकच सूचना आहे. नीट लक्षपूर्वक जो पाहील त्याला ती कळेल. हेंच सृष्टी-च्या घडामोडीचें चातुर्य आहे. हें समजणें हेंच खरें ज्ञान आहे. इतर ज्ञानें या ज्ञानाच्या पोटीं आहेत.

भक्ति यांत भज् धातूचा अर्थ सेवा करणें अर्थात भक्तीमध्यें सेव्यसेवक भाव आहे. ह्मणजे प्रथम परमेश्वराचें किंवा आराध्य दैवतेचें अधिष्ठान केलें पाहिजे. ह्मणजे प्रथम द्वैताची उपासना करावी लागते. ज्ञान यांत धातु ज्ञा जाणणें. आपण व्यवहारांत ज्यांस ज्ञान ह्मणतों तें हें ज्ञान नव्हे, त्या सर्व ज्ञानांना व्यवहारज्ञान असें ह्मणतात. व्यवहार करणाला तीं सर्व किंवा यथाशक्ती तरी आलीं पाहिजेत. तीं येतील त्याप्रमाणें मनुष्य व्यवहार चतुर होईल. पण व्यवहारच जर नाशवंत आहे तर त्याच्या अंगभूत असणारीं सर्व ज्ञानेंही नाशवतच आहेत. ह्मणजे हीं जितकीं सुखाला कारणीभूत होतात तितकीं दुःखाला कारणीभूत आहेत. ह्मणून आमच्या पूर्वजांनीं ह्या भौतिक ज्ञानाचा विचार केला नाहीं ह्याबद्दल अलीकडील मंडळी त्यांस दूषण देत होती. पण त्याची चूक त्यांस आतां थोडी थोडी समजूं लागली आहे. जीं शास्त्रें त्यांच्या सुखाला कारणीभूत झालीं तींच त्यांच्या दुःखाला कारणीभूत होत आहेत, हें गेल्या महायुद्धावरून त्यांना समजूं लागलें आहे. या ज्ञानाच्या योगानें प्राणघातक शस्त्रास्त्रें वायूवास्त्रें अग्निअस्त्रें, व

विद्युत अस्त्रें निर्माण झालीं आहेत व होत आहेत. बुद्धिमान पुरुषांचा कल या शास्त्रांकडे लागल्यामुळें त्यांनीं प्रथम पृथ्वीवरील जंगल व नंतर हिंसक प्राण्यांचा नाश केला, नंतर मनुष्य भक्षक राक्षसांचा नाश केला आणि आतां सर्व मानव जातीचा सत्वर नाश कसा होईल याच्या तजाविजीस ते लागले आहेत. याचा शेवट कधींतरी भारतीय युद्धासारखें युद्ध होऊन सर्व पृथ्वीवरील मनुष्यांचा नाश होईल. ह्मणजे सुधारणांचा कळस होईल! हें आमच्या पूर्वज ऋषींना पूर्ण माहीत होतें. ह्मणून ते या नादीं लागले नाहींत एवढेंच. भौतिक ज्ञानानें मनुष्य जातीची उन्नति, सुधारणा किंवा सुखवृद्धि झाली नाहीं काय? असा भौतिक ज्ञान्यांचा जाहीर सवाल आहे. त्यास नाहीं असा स्पष्ट जबाब ज्ञानी लोकांचा आहे. कारण पदार्थाचा नाश होत नाहीं तर त्याचें रूपांतर मात्र होतें असा पदार्थ विज्ञान शास्त्राचा सिद्धांत आहे तद्वत् सुखदुःखें समान आहेत असा परमार्थ वाद्यांचाही सिद्धांतच आहे. भौतिक ज्ञानानें मनुष्याचें जितके पट सुख वाढलें आहे त्याचेपेक्षां जास्त प्रमाणांत त्याचें दुःख वाढून त्याचें आयुष्य क्षीण व निर्जीव झालें आहे. जितके भोग वाढले त्याचेपेक्षां त्यांचे रोग जास्त वाढले आहेत व आयुष्य जास्त क्षणभंगुर होत चाललें आहे सुधारणेनें पंचपक्वान्नांनीं भरलेलें ताट पुढें आणून ठेवलें खरें परंतु त्या पक्वान्नें वारंवार सेवन केल्यामुळें जिभेचीं चवच गेली. कोणताही पदार्थ तिला गोड लागत नाहींसा झाला. त्यापेक्षां पूर्वीचा शिळया भाकरीचाच [illegible] होता खरा पण जिभेवरच अमृत असल्यानें त्याचा अमृतरस होऊन शरीर [illegible] राहिलें. हीच गोष्ट सर्व ज्ञानेंद्रियांची व कर्मेंद्रियांची झाली. त्यांच्याकडून [illegible] विषयसेवन करवल्यामुळें तीं अगदीं निर्जीव बनत चाललीं. यामुळें त्यांनीं [illegible] केलेल्या अमृताची माती होऊन त्यानें शरीराची माती मात्र केली. ह्या गोष्टी सुशिक्षितांनासुद्धां नाकारतां येण्यासारख्या नाहींत. कारण जे अज्ञानी किंवा [illegible] जे भौतिक सुखांत अद्यापपर्यंत फारसे पडले नाहींत ते अद्यापपर्यंत [illegible] अनुभव घेताना दृष्टीस पडतात. सबब पूर्वजांनीं शाश्वत ज्ञानाचा विचार [illegible] त्याचा कळस केला व मनुष्याची इतिकर्तव्यता किंवा जन्माचें सार्थक [illegible] आहे, हें निश्चित करून टाकिलें आहे. त्यांनीं मनुष्याच्या आयुष्याचे चार आश्रम किंवा भाग करून टाकिले आहेत. ब्रह्मचर्य, गृहस्थाश्रम, वानप्रस्थ व संन्यास. एकंदर तात्विक दृष्टीनें ही सोपान परंपरा अति उत्कृष्ट आहे, अशी आतां पाश्चात्य विचारी मनुष्यांची

सुद्धां खात्री होत चालली आहे. याबद्दल माझी तीर्थयात्रा भाग १ पान ४७ यांत सर व्हॅलेंटिन चिरोल यांचा उतारा दिला आहे तो अवश्य वाचावा. थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे अलीकडचीं शास्त्रें हीं रानटी लोकांप्रमाणेंच अहंकार वाढविणारीं, महत्वाकांक्षी व तामसी आहेत. व जुनीं शास्त्रें सात्विक पायावर रचल्यामुळें तीं मनुष्य जातीचें खरें कल्याण करणारीं आहेत. याचा प्रत्यय प्रत्येक मनुष्याला येतो. नवीन सुधारणेप्रमाणें खाद्य पेयांची चंगळ, किंवा मनसोक्त वागणूक केल्यामुळें मनुष्य शक्तिहीन, बुद्धिहीन व अल्पायुषि होऊन त्यांची संततीही निकस होत चालली आहे. पण जुन्याप्रमाणें आत्मसंयमन करून तापस आचरण ठेविल्यास मनुष्य सशक्त, दीर्घायुषि व महावीर्यवान निपजतो. जुना मार्ग ह्मणजे पहाटे उठणें, थंड पाण्याचें स्नान, संध्या, ईश्वरोपासना, अष्टोत्तरशें नमस्कार वगैरे आहे. नवा कार्यक्रम सर्वांस ठाऊक आहेच. निजून उठण्याचा आरंभ आठ वाजल्यापासून असतो, आणि लगेच नऊ वाजतां पोटाच्या कामाचा आरंभ ह्मणजे नोकरीचा असतो ! ह्मणजे एक तासामध्यें शौच शुद्धीपासून पोट भरण्याची व्यवस्था कशी तरी करावी हें सर्वांस ठाऊक आहेच ! असो. त्याचा उहापोह करण्याचें हें ठिकाण नाहीं. आपल्याला फक्त याचें दिग्दर्शन करून ज्ञानी मनुष्याच्या यात्राचें वर्णन करावयाचें आहे. तें आतां करूं. ह्या सर्व लिहिण्याचा हेतु अलीकडील सर्व भौतिक शास्त्रांचा चालू परिस्थितींतसुद्धां त्याग करावा असें नसून त्यांचा अगदीं जरूर प्रसंगीं मात्र उपयोग करावा, पण हल्लींच्या मंडळीप्रमाणें त्यांत पोहत राहून आपला नाश करूं नये हेंच आहे.

सर्व जग ॐकारापासून उत्पन्न झालें आहे. आणि त्यांतच त्याची स्थिति व लय होतो, असा परब्रह्माचा सिद्धांत आहे. ओंकारांत अ, ऊ आणि म असे तीन वर्ण आहेत. तोंड उघडतें किंवा उघडावयाचें असतें, कांहींतरी उच्चार करावयाचा असला ह्मणजे प्रथम तो अ चा होतो. मग भाषा कोणतीही असो. ह्मणजे शब्द ब्रह्माचें आदिकारण तरी अ आहे हें उघड आहे. ऊ या अक्षराच्या उच्चारानें त्याच तोंडाला विशिष्ट प्रकारचा आकार येतो. हा जगाचा विस्तार ऊर्फ मध्य आहे. शेवटीं म ह्मटलें ह्मणजे तोंड बंद होतें. हाच जगाचा अंत, विनाश किंवा प्रळय आहे. आतां ह्या उच्चाराचें मूळ स्वरूप अर्थात अचा उच्चार होण्याच्या पूर्वींची स्थिति असली पाहिजे. ह्मणजे तो उच्चार करण्याचें

मनांत येणें हें, अदृश्य, काल्पनिक व इंद्रियागोचर आहे. पण तें नाहीं असें मात्र ह्मणतां येत नाहीं. कारण त्यावांचून अच्या उच्चाराचें कार्य घडत नाहीं. कार्य दिसतें पण कारण दिसत नाहीं, तरी तें नाहीं असें ह्मणतां येत नाहीं. ह्मणून कार्याच्या प्रतिकाराची किंवा तें सफल किंवा निष्फल करण्याची व्यवस्था त्याच्या कारणाच्या मीमांसेशिवाय पुरी होत नाहीं. झाडाचें मूळ नाहींसें केल्याशिवाय विस्तार कितीवेळां जरी तोडून भाजून नाहींसा केला तरी तो अनुकूल काळ येतांच पुन्हां जोरानें फुटल्याखेरीज राहात नाहीं. हाच नियम पिंड ब्रह्मांडालाही लागू आहे, आणि त्यांतच परब्रह्म, परलोक, पुनर्जन्म, सृष्टीची उत्पत्ती, स्थिति, लय किंवा घडामोडीचें कार्य, याची उपपत्ती आहे. सारांश सृष्टीच्या प्रत्येक घडामोडीला आधार परब्रह्माचा आहे, असें यावरून स्पष्ट दिसतें. ह्मणून या परब्रह्माचा विचार केल्याशिवाय सृष्टीची उपपत्ती लागत नाहीं. हा विचार बुद्धिवर्चस्वाशिवाय करितां यावयाचा नाहीं. जशी ज्याची बुद्धि तीव्र असेल, तसतशी त्याला ही कारणमीमांसा कळेल. निर्बुद्ध मनुष्य याला थांतांड समजतो, हा त्याच्या बुद्धीचा दुबळेपणा आहे. ह्या अज्ञात तत्वाविषयीं किंवा परमेश्वराच्या शोधाविषयीं, आजपर्यंत पुष्कळ बुद्धिवानांनीं आपली शिकस्त केली आहे. पण तें मनुष्याच्या इंद्रियागम्य किंवा बुद्धि कुंठित करणारें आहे, असा सर्वांनीं निर्णय दिला आहे. पण त्याच्या आरंभींच्या व शेवटच्या बुद्धिगम्य पायरीचा शोध लावण्याचा मान आमच्या पूर्वज ऋषींसच मिळाला आहे. ऋषींनीं लावून दिलेले परब्रह्माचे शोध अलीकडच्या अत्यंत बुद्धिमानालासुद्धां अगम्य वाटतात. पण ते खोटे किंवा अविश्वसनीय, असें त्यांच्या बुद्धीलाही वाटत नाहींत, हाच ऋषींच्या बुद्धिवैभवाचा पुरावा आहे.

ह्या विश्वपरंपरेच्या शेवटच्या किंवा शेवटच्या जवळच्या पायरीवर आपण हल्लीं आहों किंवा जग आहे असें दिसतें. तसेंच पहिली पायरी आह्मांला दिसत नाहींशी झाली आहे. कोणी ह्मणतात कीं, ती नाहीं, कोणी ह्मणतो ती मोडली असेल. पण ज्ञानी ह्मणतात आपल्या दृष्टींतील सर्व पायऱ्या आपणांस सुखरूपपणें दिसतात. पुढें दृष्टि बंद होते. तुटलेलें किंवा संपलेलें असें दिसत नाहीं. यावरून त्या नाहींत असें कसें ह्मणावें ? आपणांस दिसत नाहीं, हा आपल्या दृष्टीचा भ्रम आहे किंवा आपल्या दृष्टीला अगोचर आहे असें फार तर ह्मणावें पण नाहीं हें ह्मणणें चूक आहे. आपण खालीं खालीं न उतरतां तत्वदृष्टीनें वर वर

चढत गेलों तर जास्त जास्त पायऱ्या दिसूं लागतात, पण तुटलेलें कोठेंच दिसत नाहीं. ह्मणून ज्यांच्यांत सामर्थ्य असेल त्यांनीं वर जाण्याचा प्रयत्न करावा व आपल्या बुद्धीचें पारणें फेडावें. मनुष्याच्या कार्य करण्याच्या मर्यादेपलीकडे नियमबाह्य अघटित कृत्यें होऊं लागलीं, त्याचे प्रयत्न निष्फळ झाले ह्मणजे तो अज्ञात कारणांचा शोध करूं लागतो हेंच ह्या तात्विक यात्रांचें मूळ रहस्य आहे. व हें रहस्य शोधण्याकरितां वर गेलें पाहिजे हाच या यात्रांचा हिमालय आहे व तो दृश्य हिमालयापेक्षां फारच बिकट आहे. हा हिमालय चढून गेल्याशिवाय नारायणाचें स्वरूप दिसावयाचें नाहीं. ह्या नारायणाला जाईपर्यंत मध्यें गंगायमुनेप्रमाणें देहांतील कुंडलीनी, सुषुम्ना वगैरे नाड्या लागतात त्या तरून जाणें फार भयंकर आहे. त्याला सद्‌गुरूचाच आश्रय केला पाहिजे. अशासारखीं पुस्तकें कांहीं उपयोगी पडावयाचीं नाहींत.

हें वर कसें जावें, या यात्रांची तपःश्चर्या कशी करावी, याचें दिग्दर्शन मात्र करावयाचें आहे. कारण हा आपला विषय नाहीं. सर्व जातीच्या यात्रांची परिपूर्णता करण्याकरितां हें सांगावयाचें आहे ह्मणजे या दृश्य यात्रांच्या योगानें ज्यांचें समाधान झालें नाहीं अशा महाबुद्धिवानास त्यांच्या बुद्धीलाही अगम्य पण तत्वदर्शी यात्रांचा दरवाजा खुला करून देणें भाग आहे. ह्या केलेल्या यात्राच जर इतक्या कठीण आहेत, तर त्या बाक्या पुढच्या आहेत. ज्यांचें सामर्थ्य असेल त्यानें ह्या करून पुढें जावें, नाहींतर हंसें होईल. ह्या बाह्य स्वरूपाच्या यात्रा आहेत. भक्तिवानांचें यांपासून समाधान होईलच. यांच्या योगानें आपणास जड सृष्टीचें किंवा व्यवहारीक ज्ञान होतें. परंतु या ज्ञान यात्रांनीं अदृश्य परमेश्वराचें किंवा आदि चैतन्याचें दर्शन होतें. ज्ञानानंतर वैराग्य. वैराग्य ह्मणजे विरक्ति; सर्वस्वाचा त्याग नव्हे. विरक्ति यांत रंज् धातूचा अर्थ रमणें असा आहे. मन विशिष्ट प्रकारें ह्मणजे इहलोकच्या सुखाहून निराळ्या प्रकारच्या शाश्वत सुखांत निरंतर रममाण होणें हिच विरक्ती.

मन रामीं रंगलें । अवघें मनचि राम जाहालें ।।

अशी वृत्ति भक्तिमार्गानें होते किंवा ज्ञानमार्गानेंही होते. पण भक्तिमार्गांतला राम व ज्ञानमार्गांतला राम निराळा असतो. भक्तिमार्गाच्या यात्रांनीं मनुष्यास इह परलोकच्या सुखांचा अनुभव घेतां येतो, ह्मणून गृहस्थाश्रमी मनुष्याला

ह्याच वर्णन केलेल्या यात्रा उत्तम आहेत. पण ज्ञानमार्गी इहलोकींचीं सुखें नाशवंत ह्मणून तुच्छ मानतात. इहलोकचें सुख भोगण्याचें साधन, मुख्यतः शरीर किंवा देह पण हे देहातीत असतात. गृहस्थाश्रमी मनुष्याचें मन, इंद्रियांचे द्वारें बाह्य सृष्टीच्या सुखाचा अनुभव घेऊन रममाण होतें. पण ज्ञानी मनुष्याचें मन इंद्रियांत प्रवेश न करितां ब्रह्मरसाचा अस्वाद घेत नेहमीं आत्मानंदांत निमग्न असतें. यामुळें ज्ञानी मनुष्याचीं इंद्रियजन्य कृत्यें वेडगळपणाचीं भासतात. ज्ञानी मनुष्यानें कांहीं केलें तरी त्याला पातक नाहीं असें ह्मणतात, त्याचा अर्थ हाच आहे. अज्ञानी बालक व तो सारखाच. कारण दोघांनाही इहलोकच्या सुखाची चाड नसते. त्यांच्या पुढें इहलोकचीं सुखें ठेविल्यास त्यांना तीं मलासमान वाटतात. त्यांच्यांत स्त्री–पुरुष हा भेदच नसतो !

मनः कृतं कृतमन्ये । न शरीरं कृतं कृतम्
येनैवालिंगिता कांता । तेनैवालिंगिता सुता ॥१॥

कोणतेंही कृत्य मनापासून झालें ह्मणजे त्यानें मन रममाण झालें तरच तें केलें असें होतें. नुसतें केलेलें दिसलें तरी तें खरें नाहीं. तरुण पुरुष आपल्या मुलीला व बायकोला दोघींनाही निरनिराळ्या भावनेनें एकाच मांडीवर घेऊन दोघींनाही आलिंगन देऊन प्रेमानें मुके घेतो. पण प्रत्येक वेळीं उद्देश भिन्न असल्यामुळें कार्यें निराळीं होतात ! अशावेळीं, नुसते भिन्न संशय घेणेंसुद्धां अश्लाध्य किंवा हास्यास्पद आहे. तोच न्याय ज्ञानी मनुष्यास लागू आहे. अशावेळीं ज्ञानी मनुष्यावर इहलोकच्या सुखाचा आरोप केला किंवा ते त्याच्या हातून क्वचित संगतीनें घडले असले तरी ते नाकबूल करीत नाहींत. त्यांना त्याबद्दल पाहिजे ती शिक्षा केली तरी ते आनंदानें भोगतात. त्याबद्दल त्यांना कांहीं वाईटही वाटत नाहीं. त्यांच्या दृष्टीनें हा गुन्हाच नव्हे. “ आंधळ्याचा हात उपस्थानावर ” ह्या ह्मणीप्रमाणें ओढाळ इंद्रियें मनाच्या परवानगीशिवाय आपल्या विषयांकडे धांवलीं पण त्यांत त्यांना त्याची काय चव समजली ? आजारी किंवा वेड्या मनुष्याला कोणतींही सुखें मिळालीं तरी त्याची चव नसते. तद्वत ज्ञानी मनुष्याला इंद्रियजन्य सुखाची व दुःखाची चाडच नसते. ह्मणजे तीं सुखदुःखें त्याच्या शरिराला व मनाला बंधनकारक होत नाहींत. आतां कांहीं असलें तरी व्यवहार दृष्टीनें तो गुन्हा आहे, सबब त्याला शिक्षा केली पाहिजे तर ते ह्मणतात करा ! शिक्षा शरिरानें गुन्हा केला ह्मणून त्याला

होईल आम्हाला काय त्याचें ? आम्ही देहातीत आहों. आम्हाला शरीर सुखें भोगतां येत नाहींत तशीं दुःखेंही भोगतां येत नाहींत ! याबद्दल रामदास स्वामींचेंच प्रख्यात उदाहरण घेऊं.

रामदास स्वामी प्रवास करीत असतां वाटेंत त्यांच्या शिष्यांस अतीशय तहान व भूक लागली, ह्मणून त्यांनीं आपल्या शिष्यांस नजीकच्या उसाच्या शेतांतून ऊस आणण्यास सांगितलें; त्याप्रमाणें शिष्यांनीं ते आणले व ते सर्वांनीं खाल्ले. पुढें ही गोष्ट शेतकऱ्यास कळली व तो तपास करीत धांवत आला, व त्यानें ते ऊस घेऊन, एका उसाच्या काठीनें रामदासांच्या पाठीवर चांगले वळ येईपर्यंत दणके लगावून तो राहिलेले ऊस घेऊन गेला ! पुढें ही गोष्ट शिवाजी महाराजांस कळली. तेव्हां त्यांनीं त्या शेतकऱ्यास बांधून आणून स्वामीपुढें उभे केलें. व यास काय शिक्षा देऊं ती आज्ञा मागितली. स्वामी ह्मणाले, त्याची अशी अप्रतिष्ठा करूं नका. त्याचें काम त्यानें चोख केलें आहे, त्याबद्दल त्याला एक गांव बक्षीस द्या ! शिवाजी महाराजांनीं स्वामींच्या आग्रहावरून निरुपायानें त्यास एक गांव बाक्षिस दिला ! तुकारामबोवांचा मंबाजीबोवानें असाच छळ केला. त्याची गोष्ट अशीच प्रख्यात आहे. तसेंच एका विधवेचें पोट फुगल्या-बद्दल तिच्यावर खटला झाला. तेव्हां काकुळतीस येऊन ती तुकारामास ह्मणाली, मी तुमचें नांव सांगितलें तर मला शिक्षा होणार नाहीं, तर सांगू कां महाराज ! तुकारामबोवा ह्मणाले, माझें नांव घेण्यानें तुझे क्लेश नाहींसे होत असले तर खुशाल नाव घे !! चोख्या मेळ्याच्या जन्माची हकीकतही अशीच आहे. एका चांभारणीनें पोट फुगवून एकनाथाचें नांव घेतल्यामुळें त्यांचेवर खटला झाला. न्यायाधिशानें नाथांस विचारिलें तेव्हां नाथ ह्मणाले, मला काय विचा-रितां ? त्या गर्भासच विचारा. तर तो कसा बोलेल ? असें न्यायाधिशानें विचारिलें. तेव्हां स्वामी ह्मणाले, विचारून पहा, ह्मणजे तो आपल्या बापाचें नाव सांगेल. न्यायाधिशानें विचारतांच गर्भानें हूंकार देऊन उत्तर दिलें !!! स्वामींनीं तो उत्पन्न झाल्यावर आपला शिष्य केला. त्याची आई व जात त्यास मागत असतां तो त्यांस दिला नाहीं. त्याच्यावर गर्भांत असतांच त्यांची कृपा झाली, ह्मणून तो पुढें महा भगवतभक्त चोखा मेळा या नांवानें प्रसिद्ध झाला. संत महात्म्यामध्यें देवानें याच्याकरितां मेलेलीं ढोरेंसुद्धां ओढलीं व त्याला मदत केली असा उल्लेख आहे ! सारांश आत्मज्ञानी मनुष्याचें लक्ष इहलोकच्या

सुखाकडे मुळींच नसतें. तीं सुखें ऊर्फ सिद्धी त्याच्या पाठीस लागतात पण तो त्यांना अगदीं तुच्छ मानितो. त्याच्या स्वाभाविक बोलण्यानें कांहीं चमत्कार झाला तर सामान्य मनुष्याला त्याचें फार आश्चर्य वाटतें. त्यांचा शब्द हा खरा भगवत्प्रसाद आहे असें तो समजतो.

हें ज्ञान मिळविण्याकरितां इंद्रियें प्रथम आत्मसंयमनानें आवरून ह्मणजे इंद्रियें जिंकून मन त्यांवरून काढून अंतर्मुख करून तेथें तें स्थिर, केल्यास त्यास सृष्टीच्या घडामोडीचे फार विलक्षण चमत्कार दिसूं लागतात. अतींद्रिय ज्ञान मिळून त्याचा सर्व प्राणिमात्रांवर अधिकार चालतो. सर्व जीवसृष्टीपैकीं पाहिजे तो प्राणी कीडमुंगीपासून सिंह, वाघ, सर्प वगैरे भयंकर प्राणी त्याचशीं निर्वैर होतात. व्यवहारांत दोघांचें मन मिळालें तर विलक्षण प्रेम उत्पन्न होतें व ते एकमेकाकरितां जीव देतात, मग अशा प्रकारें जगदात्म्याची जाणीव झाल्यावर भेद किंवा द्वेष, वैर कोठें व कोणाशीं उरतच नाहीं. अशाप्रकारें प्राणिमात्रांवरच अधिकार चालतो असें नाहीं, तर जड सृष्टीवर व पंच महाभूतांपासून सृष्टीच्या उत्पत्ति स्थितीवरही त्यांची सत्ता चालते!!! ह्मणूनच जीवो ब्रह्मैव केवलः ह्मणजे जीवाला ब्रह्मत्वाला पोंचतां येतें किंवा जीवो ब्रह्मैव नापरः असें ह्मणतात. शंकराचार्यांचें अद्वैत ह्मणतात तें हेंच. त्यांच्या तोंडून जें निघतें तें इहलोकांत अशक्य व असंभाव्य असलें तरी तें प्रत्यक्ष घडून येतें! अमृत विष होतें, विषाला अमृतत्व येतें! ज्ञानेश्वरांनीं रेड्याकडून वेद ह्मणविले, भिंत चालविली। तसेंच नामदेवांनीं दगडाचे देव नाचावेले. अशा प्रकारें साधुसंतांनीं वांझेला मुलें दिलीं, मेलेलीं माणसें उठवलीं, अलोट ऐश्वर्य दिलें किंवा नाहींसें केलें. इच्छागमन व परकाया प्रवेश हींही करून दाखविलीं. हातांत गवत किंवा पेंढा घेऊन जाळून दाखविला, अग्नींत उड्या टाकून अग्नी शीतळ केला. अशा गोष्टी त्यांना खेळासारख्या वाटतात. सारांश आत्मज्ञानी मनुष्याला अशक्य कांहीं नाहीं. मात्र त्याच्या मनांत ईश्वरी प्रेरणा होऊन त्याचा स्वच्छंदानें उद्गार होऊन त्याचा प्रसाद मिळाला पाहिजे. त्यांचा स्वयंप्रेरणेनें उद्गार हाच वर किंवा शाप आहे. पूर्वीचे ऋषी आत्मज्ञानी होते, अर्थात त्यांचा वर किंवा शाप खरा होई. तोच प्रकार रामदास तुकारामांनीं कलियुगांतसुद्धां प्रत्यक्ष करून दाखविला. ह्मणजे श्रेष्ठत्व आत्मज्ञानाचें आहे, व्यक्तीचें नव्हे. ह्या सिद्धी असल्यामुळें यांच्या नादानें तें ज्ञान नष्ट होतें व मग ह्या सिद्धीही नाहींशा होतात. ह्मणून ज्ञानी

यांचा उपयोग अगदीं प्रसंग आल्याशिवाय करीत नाहींत. शापानें जसा पुण्यक्षय होतो तसा वर देण्यानेंही होतो.

साधूला देवापेक्षां श्रेष्ठत्व येण्याचें कारण त्यानें अशा रीतीनें देव ह्मणजे ( आत्मा ) जिंकिला असतो हेंच खरें. भौतिक ज्ञानानें आपले डोळे दिपून जातात पण त्या ज्ञानाच्या वरचें हें ज्ञान आहे. पण हें मिळणें दुरापास्त आहे, निदान हुकमी तरी नाहीं. भौतिक हें कृतीनें साध्य आहे. पण हें परमेश्वर कृपेनेंच साध्य आहे. भौतिकांत आपलेपणा राखितां येतो, पण यांत तो प्रथमच सोडून मन विश्वकुटुंबी व निर्विकल्प करून तें ईश्वरपरायण करावें लागतें. आत्मज्ञानाची या पुढची पायरी ह्मणजे तो विश्वज्ञानी होतो. असा विश्वज्ञानी अवतारी पुरुष आजपर्यंत मनुष्यप्राण्यांत श्रीकृष्ण मात्र झाला व ह्मणूनच त्याला पूर्णअवतार ह्मणतात. भारती युद्धामध्यें त्यानें अनंत चमत्कार करून दाखविले आणि ते हातांत शस्त्र न घेतां केवळ इच्छामात्रेनें व योग सामर्थ्यानें करून दाखविलें. जयद्रथ वधाचे वेळीं सूर्य अस्त करून त्याचा पुन्हां उदय करून दाखविला. अग्नि, पाणी हवें तेथें उत्पन्न केलें. आपल्या इच्छेनें हवें तें करून दाखविलें. सारांश मनुष्य जसजसा मनोजय करील तसतसा त्याचा अधिकार विश्वापर्यंत ह्मणजे परब्रम्हापर्यंत जाऊन पोहोचेल, हें कृष्णावतारानें सिद्ध करून दाखविलें आहे. यापुढें काय होईल हें कोणी सांगावें! ह्या दैवी संपत्तीचा अंत कसा लागेल? दैवी संपत्ती ही चढावाची व असुरी संपत्ती उताराची आहे. असुरी संपत्तीनें मृगजळाप्रमाणें तात्कालिक सुखाचा भास होतो, पण तो क्षणभरही टिकत नाहीं. पण दैवी संपत्तीनें अक्षय्य सुख मिळतें. ही दैवी संपत्ती मुख्यतः अन्य जन्मीच्या पुण्याईशिवाय मिळत नाहीं. जसजशी ज्याची पुण्याई असेल तसतसा त्याला गुरू भेटून त्याला त्याप्रमाणें ज्ञान प्राप्त होतें.

अहंकारो धियं ब्रूते मा सुप्तं प्रतिबोधय।
उदिते परमानंदे नत्वं नाहं नवैजगत्।

मनुष्याचा अहंकार किंवा अभिमान हा बुद्धीला ह्मणतो, हे बुद्धे, आत्मज्ञानजन्य जो परमानंद त्यास जागा करूं नको. तो जागा झाला कीं, माझें इहलोकीचें नाटक संपलेंच समज. पण मग तुला तरी कोण विचारील व जगाची तरी कसली परवा आहे! सारांश इहलोकींचीं सुखें अभिमानोत्पन्न आहेत. ह्मणून ह्या अभि-

मानाला ज्ञाते राक्षस, रावण किंवा सर्वस्वाचा नाश करून आपला पगडा किंवा अधिकार चालविणारा केवळ मांग चांडाळ समजून त्याचा संचार झाल्यास सचैल स्नान करितात. ह्मणजे ज्ञान दृष्टीला अहंकार अगदीं वर्ज आहे. कोणतेंही ब्रह्मकर्म करितेवेळीं 'सर्वेषामविरोधेन ब्रह्मकर्म समारभे' असा प्रथम संकल्पच करावा लागतो. कोणाशींही विरोध न करितां मी ह्या कर्माला आरंभ करितों. रागद्वेषादि मनोविकारांचा व्यवहाराला फार उपयोग आहे. पण मन त्यांच्या नादीं लागून बहकतें हें वाईट आहे ह्मणून त्यांच्या नादीं लागूं नये एवढेंच.

या आत्मज्ञानाचा एखादा वळसा जर भक्तींत नसेल तर बुद्धिविहिन कार्यें जशीं फिकीं पडतात तशी ती भक्ति फिकी पडते. हरिदास, पुराणीक, लेखक, वक्ते यांच्यांत ती विशेष असावी लागते. त्याशिवाय त्यांचें तेज समाजावर पडणार नाहीं. दैव अनुकूल नसेल तर कार्यास यश येत नाहीं. ह्मणून दैवाची पूजा प्रथम करून ज्ञानाचा प्रसाद मिळवावा लागतो. नाहींतर परमात्म्याच्या पूजेची फलश्रुती न मिळतां दगडाच्या पूजेची मिळेल !!! सर्व साधुसंतांनीं प्रथम कर्ममार्गाचा अवलंब करून अखेर ज्ञानमार्गाकडेच बोट दाखविलें आहे. ज्ञानसूर्याच्या प्रकाशांत केलेलें कार्य यशस्वी होतें व, अज्ञानांधकारांत केलेलें नाश पावून व्यर्थ शीण मात्र होतो.

ज्ञानावीणे जे जे कळा । ते ते जाणावी अवकळा ।

याचा अर्थ तोच आहे. बाह्य भक्तीला अंतःप्रेमाचा उमाळा नसेल तर तें चार्वितचर्वण किंवा सर्व कर्म भारवाहक होतें. आतां साधुसंत बाह्य भक्ति करीत होते व मोठमोठ्या देवांच्या वाऱ्या करीत होते, तरी त्यांच्या अंतरात्म्यामध्यें खरा देव कोणता होता व त्याच्याविषयीं त्यांचा कळवळा किंवा प्रेम कसें होतें यांच्याविषयीं त्यांनींच लिहून ठेविलेले कांहीं अभंग किंवा पद्यें सांगून हा लेख संपवूं. प्रथम तुकारामाचाच अनुभव लिहितों कारण त्यांच्याबद्दल सर्वांचीच पूज्य बुद्धि आहे.

## अभंग

पंढरीस कुणि तरि जारे । विठूला पहारे ॥ पंढरीस ध्रु० ॥
औट हातावरि विठोबा उभा । जशी सुनीळाची शोभा ।
तो हा गगनाचा गाभा । सोऽहं तो रे ॥ पंढरीस ॥ १ ॥

विठोबा उभा ना बैसला । जिकडे तिकडे कोंदाटला ।
अवघा चिदानंद भरियेला । ज्याचा तोरे ॥ पंढरीस ॥२॥
हातीं घेऊनि सद्गुरु चिठ्ठी । उघडा ज्ञानाची निजपेटी ।
स्थूल सूक्ष्म कारणापाठीं ॥ तूर्या पहारे ॥ पंढ० ॥३॥
घेउनि तूर्येचा अनुभव । अंतःकरण शोधित जा सत्वर ।
मी कोण कोठिला आहे । विचारूनि घेरे ॥ पं० ॥४॥
दुर्बुद्धी ते दूर करा । सांडुनी अविद्येचा थारा ।
तुका ह्मणे देह तंबोरा । हातीं घ्यारे ॥ पं० ॥५॥

यांत तुकाराम ज्या पंढरीस जाण्याविषयीं उपदेश करितात ती पंढरी हल्लींचें पंढरपूर शहर हें खचित नव्हे. देह हीच पंढरी. तसेंच तेथला पांडुरंग देव ह्मणजे अंतरात्मा हेंच खरें. ह्या अंतरात्म्याचा त्यांना ध्यास लागून सर्व-सामान्य साधुसंतांकरितां ते बाह्य पंढरीची वारी प्रथम सोपी ह्मणून करण्याकरितां देह तंबोरा घेऊन हिंडत होते. या अभंगांत तुकारामानें, बाहेरच्या पंढरीस पुष्कळ जातील पण ह्या पंढरीस जाऊन तेथील विठोबाचें दर्शन कुणितरी घ्यारे असा कळकळीचा उपदेश केला आहे त्याचें रहस्य हेंच आहे. सारांश बाह्य कर्मांना अंतःकरणाचा आधार नसला तर तीं सवती सावत्राप्रमाणें फिक्कीं पडतात हेंच त्यांचें सांगणें आहे एवढेंच. आतां जनार्दन स्वामी काय ह्मणतात तें ऐका.

काया ही पंढरी । आत्मा हा विठ्ठल । नांदतो केवळ । पांडूरंग ॥१॥
भावभक्ति भीमा । उदक तें वाहे । बरवा शोभताहे । पांडूरंग ॥२॥
दया क्षमा शांती । हेंचि वाळवंट । मिळालासे थाट । वैष्णवांचा ॥३॥
ज्ञान ध्यान पूजा । विवेक आनंद । हाचि वेणू नाद । शोभतसे ॥४॥
दश इंद्रियांचा । एक मेळा केला । ऐसा गोपाळकाला । होत असे ॥५॥
देहीं देखिली पंढरी जनीं वनीं । एका जनार्दनी । वारी केली ॥६॥

देवाचिया द्वारीं उभा क्षणभरी । तेणें मुक्ति चारी साधियेल्या ॥१॥

हें देवद्वार ह्मणजे ज्ञानदेवाचें दार आणि ज्ञानदेव ह्मणजे आत्मा हाच देव; इतर गांव देव नव्हे. या देवाच्या द्वाराजवळ उभें राहिलें किंवा नुसतें दर्शन घेऊन विचार केला, चित्त क्षणभर स्थिर केलें तर त्याला चारी मुक्तींची तरी काय आवश्यकता आहे ! मुक्ती ह्या नियमित सुख देणाऱ्या आहेत. अखंड सुख त्यांच्यानें मिळत नाहीं.

या ज्ञानी लोकांच्या काशी, गंगा, यमुना, सरस्वती, प्रयाग वगैरे यात्रा अगदीं निराळ्या आहेत. काशी यांत कास् धातूचा अर्थ प्रकाशणें असा आहे. ह्मणून ईश्वरी तेजाचें ध्यान करणें हीच काशी व त्यात राहाणाऱ्या प्रकाशाचा कंद हाच विश्वनाथ. याच्या ध्यानानेंच मुक्ति मिळते. " काश्यां मरणान् मुक्तिः " असें ह्मणतात, ती ह्या बाह्य काशींत मेल्यानें येत नाहीं ! ती आत्मज्ञानानें आहे. इडा पिंगला ह्मणजे नाकांतील दोन श्वासधारा यांनाच गंगा, यमुना ह्मणतात. व मधली सुषुम्ना ती सरस्वती. यांच्या संगमीं मन नेणें ह्मणजेच त्यांचे प्रयागांत स्नान करणें आहे. ह्या ब्रह्मरंध्रीं मन गेल्यावर ते मुक्तच आहेत. त्याचप्रमाणें ह्या ज्ञानी माणसांचीं व्रतें कैवल्येंही अगदीं भिन्न आहेत. त्यांची एकादशी करणें ह्मणजे आपण फराळ करतों ती नव्हे. पंच ज्ञानेंद्रियें, पंच कर्मेंद्रियें व अकरावें मन हीं विचाराच्या योगानें अंतर्मुख करणें ही एकादशी. एकादशीला कांहीं खात नाहींत उपवास करितात. याचा अर्थ ह्या इंद्रियांना बाह्य विषय घ्यावयाचे नाहींत. ह्मणजे तिकडे मन रमवावयाचेंच नाहीं. उपवास यांत उप् ह्मणजे जवळ व वास ह्मणजे राहणें. ब्रह्मपदीं मन निश्चळ राहणें हाच खरा उपवास आहे. तसेंच खरें निरशन, निराहार किंवा निर्जल याचा अर्थ निर ह्मणजे नाहीं अशन ह्मणजे खाणें, निरशन ह्मणजे न खाणें असा अर्थ नाहीं. तुह्मी जें वाटेल तें खा, प्या किंवा खाऊं नका. निरशन ह्मणजे इंद्रियांना बाह्य विषय किंवा त्यांचीं सुखें न देतां तीं अंतरमुख करणें. तसेंच निराहार ह्मणजे इंद्रियांना स्वानंदाशिवाय बाह्य खाणें द्यावयाचें नाहीं. निर्जल ह्मणजे बाहेरच्या विषयांतून मन काढून तें जिंकणें. सारांश संसारांतील प्रत्येक बाह्य कृत्याला अंतर्ज्ञानाचा किंवा विचाराचा आधार किंवा उगम नसेल तर तें यशालाभास येत नाहीं. दैव अनुकूल नसेल तर काम निष्फळ होतें, हें सर्वांस

टाऊक आहे. देव अनुकूल आहे किंवा नाहीं हें सांगण्याचें काम पूर्वी आत्म-ज्ञानी करीत असत. कोणत्याही कार्यारंभीं शिवाजीमहाराज हे रामदास-भवानी देवी किंवा जिजाई मातोश्रींचा आशिर्वादरूपीं प्रसाद घेत. पेशवे शाहु, महाराजांचा घेत. देवांचा किंवा वडिलांचा आशिर्वाद घेण्याची पूर्वीची चाल होती. यामुळें त्या कामांत ते यशस्वी होत. हल्लींसुद्धां लग्नकार्यांत किती जरी आधीं ठरविलें तरी शेवटीं जोशास पत्रिका दाखवून त्याचा आशिर्वाद घ्यावाच लागतो. आतां हुंडा, स्वरूप, ऐपत यांकडे लोक विशेष लक्ष देऊं लागले आहेत. टिपण, जोशाचा आशिर्वाद, हें खूळ समजूं लागले आहेत. अशा रीतीनें त्यांचें प्राधान्य गेलें. तसेंच हल्लींच्या लग्नपद्धतीनें लग्नाचें रहस्यही जात चाललें आहे. पूर्वी ब्राह्मणांचें पोषण इतर जातींकडून होंत असे, ह्मणून ब्राह्मण आत्मज्ञाना-करितां मोकळे होते. आतां ब्राह्मणाची कोणी परवाच करीत नाहीं, ह्मणून त्यांना आपल्या पोटाची काळजी घेणें भाग पडतें. पण त्यामुळें आत्मज्ञानाची दृष्टीच नष्ट झाली. हा सर्व जगाचा मोठा तोटा झाला. सरकारी कामांतसुद्धां वरिष्ठांची मंजुरी मिळाल्याशिवाय केलेलें कार्य रद्द होतें. त्यांची मजुरी किंवा पैसा मिळत नाहीं. तोच नियम ह्या पारमार्थिक दृष्टींतही आहे. याप्रमाणें ज्ञानी मनुष्याच्या व्रतकैवल्यांचा विचार हंसराज स्वामींनीं शिवगीतेवर प्राकृत टीका करून तींत खुलासेवार केला आहे. मुमुक्षु यांनीं ती अवश्य वाचावी व कांहीं हातीं लागल्यास पहावें. सारांश, ज्ञानी होऊं पाहणाऱ्यास बाह्य सृष्टींतील सुखाचा हळुहळू त्याग करावा लागतो. हा त्याग जसजसा जास्त होईल, अखेर शरी-राचासुद्धां त्याग होऊन मनुष्य देहातीत होईल तसतसें त्याला आत्मज्ञान प्राप्त होईल. शरीरत्याग करणें ह्मणजे मरणें नव्हे. कारण शरीर गेलें ह्मणजे काय राहिलें? शरीर त्याग करणें याचा अर्थ इष्ट ध्येयाकरितां देहाभिमान सोडणें. हा देहाभिमान सोडण्यास खालीं ह्मणजे विषय सुखांत न उतरतां मार्गें सांगित्या-प्रमाणें वरवर जावें लागतें. इंद्रियें विषयपराङ्मुख करावीं लागतात. एखादा मनुष्य नादी असला आणि तो कांहीं नादाच्या भरांत असला ह्मणजे त्याचीं सगळीं इंद्रियें उघडीं असलीं तरी त्याला पुढचे पदार्थ दिसत नाहींत, ऐकूं येत नाहीं व ढेंकूण चावले तरी समजत नाहीं. फार काय शरिराच्या कोणत्याही भागावर निखारा ठेवला तरी तो त्याला समजत नाहीं. अशी जी मनाची तन्मयावस्था होणें हेंचि समाधी. शेवटीं ज्ञानी मनुष्याची वृत्ति गीतेंत सांगि-तल्याप्रमाणें होते.

या निशा सर्व भूतांना तस्यां जागृति संयमि ।
यस्यां जागृति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः ॥

प्राणिमात्राची जी निशा ह्मणजे—रात्र असा अर्थ नव्हे—ते ज्या ब्रह्मपदाकडे मुळींच लक्ष देत नाहींत तेथें योगी जागा राहतो. व प्राणिमात्र ज्या इंद्रिय-सुखांत जागे राहून निमग्न होतात तेथें योगी निजतात, ह्मणजे मुळींच लक्ष देत नाहींत. अशी ज्ञानी मनुष्याची वृत्ति होते. मनुष्य असा ज्ञानी होण्यास मोक्ष-दायी अनुभविक गुरु भेटावा लागतो. गुरूवाचून केवळ पुस्तकावरून अष्टांग योगसाधन सशास्त्र करून मनोजय मिळविणें फार कठीण आहे. पुस्तकानें त्या मार्गाचें दिग्दर्शन मात्र होतें. येणाऱ्या अडचणींचें निवारण होत नाहीं. पुस्तका-वरून अष्टांग योगसाधनाला लागलेले लोक वेडे, भ्रमिष्ट व कायमचे रोगी मात्र झाले आहेत. असा गुरु प्रारब्धांत असल्यास मिळेल पण त्यापूर्वी आपण ह्या मार्गास अधिकारी आहों किंवा नाहीं याची परीक्षा पुढील तपःश्चर्येनें करावी.

चालू आचारविचारानें मनुष्य खालच्या पायरीवर कसकसा उतरत चालला आहे, याचा प्रथम विचार करूं. मूल उपजलें ह्मणजे त्याचा पहिला आहार श्वासोश्वास हा आहे. नंतर त्यास चिरटोळी घालून दुधाचा आहार सुरू होतो. तें वाढल्यानंतर दुधामध्यें अन्न मिळवून खिरीचा आहार सुरू होतो. अन्नाचा संबंध आल्यामुळें तें पचण्याकरितां पाणी प्यावें लागतें. दूधभातानंतर ताकभात, मीठ, पापड, लोणचें, मेतकूट, भाज्या, चटण्या, कोशिंबिरी, पोळी-तुकडा, पक्वान्नें व शेवटीं तळलेले पोळलेले पदार्थ—भजीं, चिवडा, चहा, कॉफी व निरनिराळीं खाद्यें पेयें हे भिजाशीचे आहार सुरू होऊन त्यांच्यायोगानें इंद्रि-यांची तीव्रता नाहींशी होऊन मनुष्य केवळ मिजाशी, अभिमानी, गर्विष्ठ, लोभी असा होऊन त्याच्या अहंकाराची परमावधी होऊन "खाना, पीना और मजा मारना" "ऋण कृत्वा घृतं पिब !!" याव्यतिरिक्त जगांत दुसरें सुख किंवा कर्मच नाहींसें होऊन मनुष्य अधमतेच्या शेवटच्या पायरीला येऊन पोहोचतो. आतां त्याला तोंड फिरवून वरच्या पायरीवर जावयाचें असल्यास याच उलट अनु-क्रमानेंच त्यानें वर जावें. एकदम जातां कामा नये किंवा तसा अनुभव पाहातां कामा नये. ह्मणजे प्रथम मिजास सोडावी, पुढें रस सोडावे. असें करीत करीत शेवटीं पाण्याच्या आहारावरून मनुष्याला वायूच्या आहारापर्यंत क्रमानें येतां येतें.

त्याचप्रमाणें मुलाला जन्मतः वस्त्र नसतें पण पुढें तीं मिजासीनें वाढतां वाढतां वस्त्रानें सर्व अंग भरलें तरी त्यांचा वर्गधन होऊन तीं ठेवण्यास मोठी ट्रंकसुद्धां पुरत नाहीं. तेव्हां हेंही कर्मी करीत करीत केवळ लंगोटीवरून भस्मावरही येतां येतें. अशा रीतीनें आपल्या सामर्थ्यानुसार मनुष्य अन्नवस्त्राचा जसजसा त्याग करून जसजशा पायऱ्या आनंदानें व अक्लेश वर चढत जाईल तसतसें त्याचें अष्टांग योगसाधन होऊन त्याची बुद्धि, मन व इंद्रियें यांची तीव्रता वाढून तीं अतींद्रिय वादाचे प्रश्न सोडविण्यास समर्थ होतील. मग त्यांना दिव्यदृष्टि येऊन त्यास निराळें जग दिसूं लागेल व जगाची राहाटी माझ्याच इच्छेनें चालली आहे अशी त्याची खात्री होईल. एवढा तो अधिकारी होईल. ही तपःश्चर्या एकदम साधत नाहीं. पण दीर्घ प्रयत्नानें, आत्मसंयमनानें व निधिध्यासानें सिद्ध झाल्यावर परमेश्वर कृपेनें पुढील अष्टांग योगसाधनाकरितां गुरुही मिळतो. व त्यायोगें मनुष्य योगी बनून आत्मज्ञानी, ब्रह्मस्वरूपी किंवा जविन्मुक्त होतो. मनुष्य एकदां जीवन्मुक्त स्थितीला पोहोचला म्हणजे पुढें त्यांनीं कांहींही व्यवहार केले, तरी ते त्याला बाधक होत नाहींत. मात्र हें वर जाणें फार सावकाश व प्रयत्नपूर्वक करावें लागतें. एकदम बदल केल्यास नाश झाल्याशिवाय राहावयाचा नाहीं. सामर्थ्य एकदम उत्पन्न होत नाहीं हें नीट लक्षांत ठेवावें. घाईनेंच सर्व बिघडतें. अन्न पचल्यावर शेवटीं त्याचें अमृत उत्पन्न होतें पण पचलें नाहीं तर त्यानेंच रोग होतो. हा मार्ग अत्यंत अवघड असल्यामुळें हा चांगला साध्य होईपर्यंत जुना भक्तिमार्ग सोडूं नये असें सद्गुरूंनीं मोठ्या प्रेमानें सांगितलें आहे. नाहींतर दोन्ही मार्ग जाऊन मनुष्य धर्मलंड व नास्तीक बनून अगदीं निरुपयोगी होईल.

## पद

साधन तोंवरि सोडुं नये, हातीं जोंवरि मोक्ष नये ।।धृ।।
अभ्यासानें ज्ञानाचा जंव चित्तीं मोडु नये ।।१।।
मार्गी रांधुनि अन्न न खातां मडकें फोडुं नये ।।२।।
कुळाकडुनि जंव द्रव्य न आलें, कतबा फाडुं नये ।।३।।
काम क्रोधां सांडावें परि विवेक दवडुं नये ।।४।।
सद्गुरु सांगे कृष्णसुताला श्रद्धा मोडूं नये ।।५।।

ज्ञानमार्ग हातीं आला तरी सर्व जगाच्या हिताकरितां भक्तिमार्गाचें आचरण कधीं सोडूं नये. मनुष्यानें दिगंबर दिक्षा घेतली तरी जगाच्या संतोषाकरितां त्यानें लंगोटी नेसलीच पाहिजे. आपल्या ज्ञानाच्या घमेंडींत जाऊन जगाकडून हंसें करून घेऊं नये. कांहीं असलें तरी आपलें बाह्याचरण जगद्वंद्यच असलें पाहिजे. असें जगद्गुरूचें ह्या मार्गानें जाणाराला आग्रहाचें सांगणें आहे, तें त्यांनीं ध्यानांत ठेवावें.

सर्व सामर्थ्यांमध्यें योगसामर्थ्य श्रेष्ठ आहे. या योगसामर्थ्यांमध्यें पूर्ण प्रवीणता श्रीकृष्णानें मात्र संपादन केली होती. त्यांनीं काडीचाही पराक्रम न करितां–हातांत शस्त्रही न घेतां–सर्व जग उलथून टाकणारें भारती युद्ध आपल्या योगसामर्थ्यानें जिंकिलें. ही गोष्ट पौराणिक म्हणून कोणाला खोटी वाटेल, पण नाना फडणवीसानेंही केवळ बुद्धिसामर्थ्यानें व अधिकार धोरणानें म्हणजेच योगसामर्थ्यानें पेशव्यांचें किंवा मराठ्यांचें सर्व हिंदुस्थानावर वर्चस्व राखलें व मराठ्यांचा दरारा सर्व हिंदुस्थानावर ठेविला. ही गोष्ट ऐतिहासिक असल्यामुळें कोणालाही खोटी म्हणतां येणार नाहीं. शिवाजी महाराज व अलीकडील लो० टिळक यांचीं धोरणेंही अशींच अचूक असत.

## योगः कर्मसु कौशलं

आकुंठित, श्रेष्ठ धोरणानें व कुशलतेनें कार्य शेवटास नेणें हेंच योगसामर्थ्य आहे. नाना फडणवीसाचे अखेरचे दिवस वाईट गेले. याचें कारण श्रीकृष्णाला अर्जुन मिळाला होता तसा नाना फडणवीसाला सवाईमाधवराव मिळाले होते तोंपर्यंत त्यांचें बुद्धिवर्चस्व चाललें. पुढें दुसरा बाजीराव आल्यावर केवळ द्वेषभावानें त्यानें त्याला काढूनच टाकलें व मारलें तेव्हां निरुपाय झाला. ते गेल्यावर जें काय व्हावयाचें होतें तें झालें व तें त्यानें ठरविल्याप्रमाणेंच झालें. त्यावरून ह्या त्यांच्याच बुद्धीचा पराक्रम होता, असें निःसंशय सिद्ध मात्र झालें. म्हणूनच श्रीकृष्णानें अर्जुनास उपदेश केला कीं,

## तस्मात् योगी भवार्जुन

पण मनुष्य असा ज्ञानी किंवा योगी होणें हें अत्यंत दुर्घट आहे. एकवार शिकंदरासारखें सार्वभौम राज्य मिळवितां येईल, पण दत्तासारखें ज्ञान किंवा श्रीकृष्णासारखें योगसामर्थ्य मिळणें फार दुर्घट आहे. त्यांत जनकासारखे व

श्रीकृष्णासारखें प्रवृत्ति निवृत्तींत कसलेले फारच क्वचित. त्यांना इहपरलोकिचीं दोन्हीं प्रकारचीं सुखें अनुभवितां येत होतीं. त्यांत श्रीकृष्णानें तर कळसच केला. तो प्रवृत्ति निवृत्तींत केवळ पोहतच होता, ह्मणूनच तो इहलोकच्या व परलोकच्या सुख इच्छिणारांचा गुरु किंवा देव झाला होता. अर्जुन बुद्धिभेदानें कर्तव्यमूढ झाला असतां श्रीकृष्णानें अधिकारयुक्त वाणीनें त्यास सांगितलें कीं,

मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ।
मामेवैश्यसि युक्त्वैव मात्मानं मत्परायणः ॥ ३४/९ ॥

मी सांगतों त्याप्रमाणेंच वाग, दुसऱ्या कोणाचें ऐकून भ्रमिष्ट होऊं नको. माझ्यापेक्षां समर्थ या जगांत कोणीच नाहीं. मनुष्य जातीच्या उन्नतीची कृष्णावतार ही परमसीमा आहे. श्रीकृष्ण हे योगीराज होते. दृश्य—उत्पन्न झालेल्या किंवा पुढें होणाऱ्या गोष्टींचे पर्यावसन काय आहे आणि तें आपल्या उपयोगीं कसें करून घ्यावें, हें त्यास योगज्ञानानें व आत्मज्ञानानें कळे व त्या धोरणांनीं ते वागत. ह्यामुळें त्यांची वागणूक कधीं कधीं लबाडीची, कपटी, धर्मबाह्य किंवा निंद्य दिसली तरी ती सर्वस्वी तारक होती. कारण वाकड्या मेढीला वाकडा दर काढलाच पाहिजे. त्याशिवाय ती बसत नाहीं. व उपयोगी होत नाहीं. सरळपणा व सद्धर्म हीं सज्जनाकरितां आहेत, लबाडाकरितां नाहींत. काट्याशिवाय काटा निघणार नाहीं. यांच धोरणानें त्यानें स्वतः पराक्रम केला व करविला व हें धर्मरहस्य जगाला खुलें करून दिलें. त्यापुढें त्यानें आप्त, गोत्र, स्वकीय वगैरे कांहीं पाहिलें नाहीं. हेंच त्यांचें आत्मज्ञान व कर्तृत्व होय. हें त्यांच्या वयाचे उत्तरवयांत तितके तेजस्वी राहिलें नाहीं, हें कृष्णानेंच अर्जुनाला अनुगीता सांगतांना कबूल केलें आहे. सारांश कार्याचें पर्यवसान कांहीं तरी ईश्वरी ज्ञानाशिवाय कळत नाहीं. आणि तें कळल्याशिवाय इहलोकच्या कृत्यांत खात्रीनें यश मिळण्याचा संभव कमी. श्रीकृष्णानें दैविक इच्छामात्रेंन या गोष्टी केल्या; नाहींत ह्मणजे एखाद्या देवाच्या किंवा गुरूच्या बळानें हें विलक्षण स्थित्यंतर घडवून आणलें नाहीं. तर सर्व गोष्टी योग्य व व्यवहाराला अनुसरून केल्या ह्मणजे मनुष्याच्या प्रयत्नानें इतकें करितां येतें असें त्यानें दाखविलें. हा मनुष्यजातीच्या बुद्धीचा, कर्तृत्वाचा व व्यवहारयात्रांचा विजय आहे. ही तेजस्विता श्रीकृष्णाला पूर्व जन्मींच्या भाग्यानें किंवा ईश्वरी प्रेरणेनें तर आलीच, पण इह-

लोकींसुद्धां त्याला ती मिळविण्यास अगदीं खडतर तपःश्चर्या करावी लागली व प्रसंगीं अत्यंत अपमान सोसावा लागला. टांकीचे घाव खाल्याशिवाय देवकळा प्राप्त होत नाहीं ह्मणतात तेंच खरें. भृगुऋषींनीं तो शांतपणें निजला असतां त्यांच्या छातींत लाथ मारिली, दुर्वासानें त्याला व रुक्मिणीला गाडीला जोडून पराण्या मारिल्या, वगैरे त्यांच्या तपश्चर्येचे प्रकार पुराणांत वर्णन केलेले आहेतच. अशा दिव्यांत असेच लोक टिकतात. आतां व्यवहाराला आत्मज्ञानाचे सिद्धांत लावावयाचे नाहींत. व्यवहार हा शक्य तितका आत्मभाव ठेवून जशास तसाच केला पाहिजे. तरच त्याचें नांव व्यवहार. साधू हे व्यवहारी नाहींत. कृष्णानें किंवा साधूंनीं संसार करूं नका असें कधींही सांगितलें नाहीं. तर तो योगसाधनापेक्षां सोपा असून ईश्वरनिर्मित सृष्टिस्थितिला अवश्य आहे. ह्मणून सर्व धर्मांनीं व साधुसंतांनीं त्याचें प्रयत्न करून अवश्य रक्षण केलें आहे. मात्र संसारी मनुष्यानें हा संसार भाडोत्री आहे ( परमेश्वराधीन आहे ) असें समजून त्यांत तितकेंच मन रमविलें पाहिजे. त्यावर मालकी हक्क सांगतां कामां नये. आतां मालकी हक्काशिवाय कोणतेंही काम चांगलें होत नाहीं असें कोणी ह्मणतील तर त्याचें व्यवहारी उदाहरण असें आहे कीं नोकरानें सरकार कोठें नोकरी सांगेल तेथें ती अति उत्तम, मन लावून किफायतीचें धोरण ठेवून अगदीं आपल्या घरच्या कामाप्रमाणें केली तरच त्या नोकराची बढती होत जाते. पण त्यानें त्या नोकरीवर किंवा त्या ठिकाणीं हक्क सांगतां कामा नये. हक्क सांगितला कीं त्यास नोकरीवरून दूर होण्याची पाळी आलीच! तसेंच परमेश्वरानें नेमून दिलेला संसार उत्तम करून दाखविलाच पाहिजे. पण त्याची मालकी परमेश्वराकडेच आहे, माझी नाहीं हें संसाराचें गूढ तत्व लक्षांत ठेविलें ह्मणजे संसार कधींही कष्टमय होणार नाहीं. ह्मणजे संसारांत त्याला वाटेल ती वस्तु तो देईल व पाहिजे ती तो नेईल कारण मालकी त्याची आहे. त्याबद्दल हर्षशोक करून परमेश्वरास नांवें ठेवतां कामा नये. त्या गोष्टी त्यानें तुमच्या परिक्षेकरितांच पाठविल्या असतात. हीहि एक तपश्चर्याच आहे. परमेश्वराची माया ह्मणतात ती हीच.

सारांश मनुष्याची जसजशी तपःश्चर्या श्रेष्ठ होईल तसतसें त्याचें कर्तृत्व वाढेल. या तपःश्चर्येच्या पायऱ्या जसजशा त्याच्यानें वर चढवतील तसतशा त्यानें चढाव्या व कर्तृत्ववान व्हावें, नाहीतर सृष्टिक्रमाचा उतार हा आहेच! मनुष्य स्वस्थ बसला व मिजासीच्या नादीं लागला ह्मणजे कालगतीनें तो

आपोआप सृष्टिनियमानें खालीं घसरत येतोच. त्याकरितां त्याला मुळींच श्रम करावे लागत नाहींत. हल्लीं आमचें कर्तृत्व धोरण, काटकपणा, सहनशीलता, वगैरे सामर्थ्य पार निघून जात चाललें आहे. मिजास व आळस सर्वत्र बोकळत चालली आहेत. त्याला कांहीं तरी आळा घालावा व लोकांची प्रवृत्ति कर्तृत्वाकडे व्हावी म्हणून या एकापेक्षां एक श्रेष्ठ यात्रा सांगितल्या आहेत. जसजसें ज्याचें सामर्थ्य असेल तसतशा त्यानें या पायऱ्या चढाव्या. त्यांतील आरंभीची पायरी या भारतीय यात्रांपासून म्हणजे भक्तिमार्गापासूनच आहे. श्रीरामचंद्रानें मारुतीला आत्मज्ञानाचा उपदेश केला तेव्हां मारुतीनें त्या उपदेशाचें सार असें सांगितलें:

देहबुध्या तु दासोऽहं । जविबुध्या त्वदंशकः ।
तत्वबुध्या त्वमेवाऽहं । इति मे निश्चिता मतिः ॥

सर्व यात्रांचा हा निष्कर्ष आहे. ज्या मनुष्यांची देहबुद्धि जागृत आहे, ज्यांना देहाचें कौतुक करावयाचें आहे, हें माझें, तें माझें असा प्रपंच करावयाचा आहे, किंवा प्रथम मला व मग लोकाला अशी भावना ज्यांची असेल, त्यांनीं आपल्या यशाकरितां किंवा प्रपंच सुखरूप चालण्याकरितां ह्या चारी भागांत सांगितलेल्या पौरणिक यात्रा व अशाच दुसऱ्या व्यवहारिक यात्रा अवश्य केल्या पाहिजेत. पण आपल्या जिवाप्रमाणें सर्व प्राणिमात्रांचा जीव अशी खरी भावना ज्यांची झाली असेल त्यांनीं या प्रतीकांच्या यात्रा विशेष न करितां मानसपूजा कराव्या. पण जे तत्वाला पोंहचिले आहेत, आपपर भाव जाऊन जे देहातीत झाले आहेत, त्यांनींच मागें सांगितलेल्या ज्ञानी लोकांच्या यात्रा कराव्या. त्यांना या देवांच्या दर्शनास जावें न लागतां जरूर पडेल तेव्हां ते देवच यांच्यापुढें हात जोडून उभे राहतात, असा त्यांचा अधिकार होतो! मात्र कोणीही बुद्धिशाठ्य करूं नये. म्हणजे आपला अधिकार नसतां लोकांना फसविण्याकरितां अशा श्रेष्ठ यात्रांच्या भानगडींत पडूं नये. तसेंच अमुक यात्रा श्रेष्ठ व अमुक कनिष्ठ असा बुद्धिवादही कधींही कोणाशीं करूं नये. किंवा त्यांना त्याबद्दल हसूंही नये. कोणाचें मूल कसें जरी असलें तरी त्याला तें प्रिय असतें. त्याप्रमाणें परमेश्वराचे दरबारीं सर्वांचा अधिकार सारखाच आहे. भेद खालीं उतरणाराला आहे.

नद्या ओढे नाले मिळति समभावें जलधिला ।
असाधू वा साधू शरण रिघतां पावति तुला ॥

ह्याच परमेश्वराच्या घरचा न्याय आहे. नद्यां ओढे एकदां समुद्राला मिळाले ह्मणजे त्यांचीं नांवें जाऊन समुद्र होतो, ह्मणजे त्यांनां समुद्र हें नांव येतें, तसेंच साधु असो वा असाधु असो, निर्मळ मनानें जे ईश्वराला शरण गेले तेच ईश्वराला पावतात ह्मणजे ईश्वररूप होतात. मग त्यांना दुसरें नांव राहात नाहीं. मुलाला खेळावेण्याकरितां वडील माणसास त्याचेबरोबर जसें बोबडें बोलावें लागतें तसें ज्ञानी मनुष्यानें सुद्धां अज्ञानाचे समजुतीकरितां अज्ञानासारखेंच बोललें पाहिजे व आचरण केलें पाहिजे. भातकुली खोटी आहे, तसें नाटकही खोटें आहे. पण तें करून दाखविल्याशिवाय मनाचें समाधान होत नाहीं. तोच प्रकार भक्तिमार्गाचा व प्रपंचाचा आहे. प्रपंचसुद्धां खोटाच आहे कारण खरें पाहिलें असतां पशुपक्षांप्रमाणें कोणी कोणाचें नाहीं. समाज रक्षणाकरितां हीं धार्मिक व व्यवहारिक बंधनें घालून प्रपंच केला आहे तरी पण तो कुशलतेनें चालवणें ह्यांतच तात्विक समाधान आहे. शंकराचार्यांसारखे ज्ञानीसुद्धां प्रसंगीं आपला आत्मभाव सोडून प्रेमानें परमेश्वराचे गुणानुवाद गातात व त्यांत तल्लीन होतात, मग इतराची गोष्ट कशाला? ज्ञान्याला सुद्धां देहधर्माकरितां ह्या यात्रा सांगितल्या आहेत व त्याप्रमाणें परमहंस संन्यासीसुद्धां एका ठिकाणीं न बसतां या देहयात्रा करीत हिंडत असतात. त्यांचें हिंडणें हेंच देवदर्शन आहे.

यात्रांची प्रवृत्ति प्राचीन काळापासून आहे. आर्यांच्या प्रगतीला कारण यात्राच आहेत. रामचंद्रानें सर्व हिंदुस्थान पादाक्रांत करून प्रथम आपण यात्रा केल्या व लोकांना हा धडा घालून दिला. हल्लींच्या सभा व प्रदर्शनें हीं यात्रांचेंच स्वरूप आहे. यात्रा कोणतीही असो. पण तिच्या योगानें मनुष्याची किंवा समाजाची कायिक, वाचीक किंवा मानसीक उन्नति होऊन तो कर्तृत्ववान झाला नाहीं तर त्याचा काय उपयोग! पाश्चात्यांना अशा यात्रांमुळें कितीतरी पुण्य मिळत आहे आणि आपल्या यात्रांची फलश्रुति आपल्याला घातक होत आहे. रेलवेला व्यर्थ भाडें देऊन किंवा पंड्यांचें लागत असलेलें कर्ज देऊन कसेंतरी मूर्तीचें दर्शन घेऊन फार तर क्षौर करून एखाद्या गंगेंत बुडी मारून लोक येतात आणि येतांना कदाचित् कॉलऱ्यासारखे रोगही आणतात किंवा त्याला बळी पडतात! ह्मणजे उन्नतीऐवजीं अवनति मात्र होते! ती न व्हावी ह्मणून ही ग्रंथमाला लिहून प्रयत्न केला आहे. हा पहिल्या भागांत केलेला खुलासा शेवटीं करून ग्रंथाची बोळवण कथेप्रमाणें करितों.

हिंदु लोक मूळचे सत्वगुणी व पापभीरू आहेत. सत्व गुण हा मनुष्याच्या उन्नतीला व श्रेष्ठपणाला कारण आहे, ही गोष्ट निश्चयात्मक खरी आहे. पण सत्वगुणाचें रक्षण सत्वगुणानें होत नाहीं. त्याला त्याकरितां रजोगुणाचा व तमोगुणाचा आश्रय करावाच लागतो. सोन्याचें रक्षण सोन्याचे पेटीनें होत नाहीं, त्याला लोखंडाची मजबूत पेटीच लागते. स्वराज्य असतां हिंदुस्थान पूर्वी इतकें सत्वगुणी होतें कीं, त्याचें बोलणें, करणें व उदारता ही अत्यंत प्रसंसनीय होतीं असें 'हल्लींचें' सुधारलेलें जगही ह्मणतें. परंतु तमोगुणी लोकांनीं त्याच्यावर स्वाऱ्या करून त्याच्या ह्या गुणाचा नाश केला आहे व आणखीही चालविला आहे. तेव्हां त्या गुणाचें रक्षण करण्याकरितां अंतर्यामीं सत्वगुण ठेवून बाह्यात्कारीं रजोगुण व तमोगुण आचारलाच पाहिजे आणि रजोगुण व तमोगुणाचे भोक्ते क्षत्रिय व वैश्य यांचा उद्धार केलाच पाहिजे. ते जागृत झाल्याशिवाय पूर्वीची स्थिति येणें शक्य नाहीं. सारांश देशांत जेव्हां शांतता असेल, जो तो स्वधर्माप्रमाणें आचरण करीत असेल, तेव्हां श्रेयस व प्रेयसाकरितां मोक्षधर्माची फार अवश्यकता आहे. पण जेव्हां अंदाधुंदी चालते, स्वकीय व परकीय यांची धर्मछळाला सुरुवात होते, कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत राहत नाहीं, तेव्हां गीतेंत श्रीकृष्णानीं अर्जुनास उपदेश केल्याप्रमाणें आपली तत्व दृष्टि बाजूस ठेवून आपलें अस्तित्व राखण्याकरितां सर्वांनीं क्षत्रियबाणाच पतकरला पाहिजे, त्याशिवाय हा जीवनकलह सुटणार नाहीं.

आज हिंदुस्थानाला कर्तृत्ववान, धाडसी, काटक, खंबीर व कशाही प्रसंगीं न डगमगणारे अशा मनुष्यांची फार जरूर आहे. ती या पूजेनें तो विश्वात्मा पूर्ण करो व असे लोक निपजून आमचा देश, धर्म व संस्कृति यांचे रक्षण करो, एवढेंच त्यापाशीं मागणे मागून त्याच्याच प्रसादानें बनलेली ही ग्रंथमाला त्याचेच चरणीं परम आदरानें अर्पण करितों. नाहीं तर

काय म्यां पामरें । बोलावीं उत्तरें ॥
परि त्या विश्वंभरें । बोलवीलें ॥

तसेंच कोणतेंही कार्य अखेर ब्रह्मार्पण केल्याशिवाय त्याची फलश्रुति होत नाहीं व तें यशालाभाला येत नाहीं ह्मणून आपणही सर्वांच्या हिताकरितां हें ब्रह्मार्पणाचें उदक सोडून आपल्या उद्योगाला लागूं.

## ॐ तत्सत् ब्रह्मार्पणमस्तु.

# माझी तीर्थयात्रा.

**भाग–१.** यांत हिमालयासुद्धां सर्व उत्तर हिंदुस्थानच्या पौराणिक यात्रांचें वर्णन आहे. सोबत हिमालयाच्या प्रवासाचा नकाशा आहे. परिशिष्टांत हिमालयांतील गंगोत्री जम्नोत्री केदार बदरी येथें जाण्याचे मार्गावरील चव्या उर्फ आश्रयस्थानें, त्यांमधील अंतरें व अडचणी यांचा खुलासा करून त्यांचें निवारण कसें करावें हें सांगितलें आहे. प्रवास सुखावह व ज्ञानदायक कसा होईल याचें स्वानुभवानें खुलासेवार वर्णन केलें आहे. किंमत हिमालयाचे नकाशासह दोन रुपये. सुटा नकाशा चार आणे. व्ही. पी. २८७.

**भाग–२.** नेपाळांतील पशुपतिनाथांच्या यात्रेचें वर्णन. यांतही प्रवासाचा नकाशा दिला आहे. हा रक्सौळ या शेवटच्या रेलवे स्टेशनापासून दिला आहे. आतां ही रेलवे नेपाळ हद्दींत पुढें २० मैल गेली आहे. यांत यात्रेचें वर्णन असून नेपाळांतील हवापाणी, लोकाचार, स्थानमहात्म्य, स्वतंत्र देशांतील सुखें व त्याचे शरीरावर व मनावर होणारे परिणाम यांचें चटकदार वर्णन असून तें मृतदेशाच्या परिस्थितीशीं ताडून दाखविलें आहे. किंमत दाहा आणे. सुटा नकाशा दोन आणे. व्ही. पी. ८१५.

**भाग–३.** यांत घारापुरी नाशीकपासून रामेश्वर जगन्नाथपर्यंत सर्व यात्रांचें वर्णन आहे. हिंदुस्थानांतील सर्व रेलवेच्या प्रवासाचा नकाशा आहे, शेवटीं परिशिष्टांत भारतीय पौराणिक देश, पौराणिक, ऐतिहासिक, सृष्ट चमत्कारांचे देखावे, यांचें संक्षिप्त वर्णन असून त्यांचे जाण्याचे मार्गही चालू काळाला अनुसरून असे लिहिले आहेत. किंमत रु. २।; सुटा नकाशा ८४. व्ही. पी. २॥ रु.

**भाग—४.** यांत समुद्र पर्यटण व महाराष्ट्र प्रवास याचें वर्णन आहे, महाराष्ट्राचा सोबत नकाशा आहे. महाराष्ट्रीयांस हा भाग मनापासून आवडेल. यांतील समुद्र पर्यटण व नारायण सरोवराचें वर्णन आश्चर्यचकीत करणारें आहे. ऐतिहासिक स्थळांचें वर्णन उत्तेजक व अभिमानास्पद असून सत्पुरुषाच्या महात्म्यानें मन पवित्र होईल. हवा खाण्याचे वर्णनानें सृष्टिसौंदर्यांत मनुष्यकृत सौंदर्य कसें खुलतें ह्याचा हृदयंगम मिलाफ वर्णन केला आहे. उपसंहार विशेष चिंतनीय आहे. किं. रु. २॥ व्ही. पी. रु. ३ सुटा नकाशा ८४ चार आणे.

**भाग—५.** ( लवकरच छापून तयार होईल ) या मालेचा हा शेवटचा मणी आहे. सर्व यात्रांत लोकयात्रा किंवा कौटुंबिक यात्राच श्रेष्ठ आहे व तिच्या करील सर्व यात्रा आहेत. परमेश्वरानें हीच यात्रा करण्याकरितां मनुष्य जन्म दिला आहे ह्मणून आपलें कुटुंब व संतती ऐहिक व पारलौकिक सामर्थ्यानें कशी

संपन्न होईल, ही यात्रा कशानें सुखावह होऊन परमेश्वराचा प्रसाद मिळेल व तो देशाच्या उन्नतीला व स्वास्थ्याला कारणीभूत होईल, याचें खुलासेवार वर्णन यांत येईल. सर्व आबालवृद्ध स्त्री पुरुषांचें मनरंजन करून ज्ञानदायक अशी ही माला सर्वांना कंठीं घालावी ह्मणजे तिच्या स्वादानें त्यांचें समाधान व मन तेजस्वी बनेल व जीवाचें सार्थक होईल. किंमत अजमास रु. २ व्ही. पी. रु. २॥.

वरील व्ही. पी. सुध्दा नकाशाशिवाय आहेत. प्रवासाकरितां नकाशा जवळ बाळगावा लागतो तो पहाण्याकरितां वारंवार पुस्तक उघडावें लागूं नये ह्मणून सुटे नकाशे छापून विक्रीस ठेविले आहेत व त्यांची किंमतही थोडीच ठेविली आहे सबब यात्रेकरूंनीं सुटे नकाशे अवश्य घ्यावे.

सर्व भाग सुध्दा नकाशांसुद्धां एकदम घेतल्यास टपालखर्च माफ.

सर्व पुस्तकें मी स्वतः यात्रा करून लिहिलीं आहेत. ह्मणून तीं आबाल वृद्ध स्त्रीपुरुषांस अत्यंत मनोरंजक असून ज्ञानदीपक झालीं आहेत यात्रेकरूंना तर तीं अत्यंत उपयोगी आहेत. यात्रा करण्यास जे असमर्थ असतील त्यांस हीं वाचून घरीं बसल्या यात्रेचें खरें पुण्य मिळेल व यात्रांचें रहस्य समजेल. सर्व भाग मुंबई, वऱ्हाड व गायकवाड राज्य येथील शाळाखात्यांत बक्षिसें व लायब्ररऱ्या यांकरितां मंजूर आहेत. दक्षिणा प्राईज ग्रंथोत्तेजक कमेटी, इंदूर यांनीं त्यांस बक्षिसें देऊन पुष्कळ विद्वान व अविद्वान यांनीं त्यांचा गौरव केला आहे. वाचनाची गोडी असणाऱ्या गृहस्थानें हीं पुस्तकें विकत घेतल्यास त्यास आपले पैसे फुकट न जातां चांगले सत्कारणीं लागले आहेत अशी खात्री झाल्यावाचून राहणार नाहीं. पाहिजे तर कोठें तरी लायब्ररींत वाचून मग पुस्तकें संग्रहीं ठेवण्यालायक आहेत किंवा नाहींत हें ठरवा व मग विकत घ्या.

पत्ताः—गोविंद हरी फडके, नेरळ जि. कुलाबा.

क्र. ४५६७

# व्याकरणाचा वृक्ष (नकाशा)

याचे योगानें व्याकरणाच्या भाग प्रभागांचें ज्ञान बुकापेक्षां चांगलें होतें. याचे योगानें व्याकरण हा रुक्ष विषय मुख्यतः लहान मुलामुलींना फार सोपा व आनंददायक झाला आहे. किंमत तीन आणे.

गोविंद हरी फडके, नेरळ जि० कुलाबा.

REFBK-0004566
REFBK-0004566